वैखरी

भाषा आणि भाषाव्यवहार

अशोक रा. केळकर

मॅजेस्टिक

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

वैखरी : भाषा आणि भाषाव्यवहार

या पुस्तकात अशोक केळकरांचे
१९६४ पासून थेट १९८१ पर्यंतचे अठरा लेख एकत्र आणलेले आहेत–
पाच पूर्वी प्रसिद्ध न झालेले आणि बाकीचे प्रसिद्ध झालेले पण संस्कारित स्वरूपात
समाविष्ट केलेले असे एकूण अठरा लेख.

पहिल्या सहा लेखांत भाषा, लेखन, आणि त्यांचे सामाजिक–शैक्षणिक अनुबंध
ह्यांबद्दलच्या दीर्घ चिंतन–व्यासंगातून तयार झालेली आपली सैद्धांतिक भूमिका
केळकरांनी मांडली आहे.

'भारताचे भाषिक प्रश्न' इत्यादि पुढच्या आठ लेखांत ह्या भूमिकेतून कोणत्या
भाषा कशा कुणाला शिकवायच्या किंवा शिक्षणाचें माध्यम म्हणून केव्हा कुठे
वापरायच्या ह्याची, आधुनिक भारतातल्या भाषा आधुनिक कशा होतील आणि
राजधानीपासून प्रयोगशाळेपर्यंत, झोपडीपासून खेळाच्या मैदानापर्यंत विविध भूमिका
वठवायला कशा समर्थ होतील ह्याची चिंता वाहिली आहे.

उरलेल्या चार लेखांत मराठी भाषेबद्दलच्या काही तपशिलात शिरून सैद्धांतिक
भूमिका आणि व्यावहारिक चिंता यांच्या उपयोजनाचा एक वस्तुपाठच मिळतो.

सुरवातीची प्रभाकर परांजप्यांबरोबर झालेली प्रश्नोत्तरी आणि शेवटच्या दोन
सूची यांची वाचकाला या ग्रंथाचा आस्वाद घ्यायला आणि त्यातल्या
विचारांचे अनुबंध लक्षात यायला मदत व्हावी.

या पुस्तकात प्रकट झालेला दृष्टिकोण जरी एका भाषावैज्ञानिकाचा असला तरी येथे
निकोप भाषाव्यवहाराची चिंता वाहणाऱ्या किंवा एकंदरीने भाषेबद्दल निखळ
कुतूहल बाळगणाऱ्या, वयात आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना मुक्त प्रवेश आहे.

डॉक्टर अशोक रा. केळकर सध्या पुण्याच्या डेकन कॉलजमध्ये
भाषाविज्ञान-प्रगत-अध्ययन-केंद्रात उपयोजित भाषाविज्ञानाचे प्राध्यापक
आहेत.

अशोक रा. केळकर ह्यांचीं इतर पुस्तकें :

The Phonology and morphology of Marathi. Ph. D. dissertation. Cornell University, 1958. Available as a microfilm or as an enlarged xerox print from University Microfilms, Ann Arbor, Michigan, USA, 1959.

Studies in Hindi-Urdu I, Introduction and word phonology. Pune: Deccan College, 1968. Rs. 12.

मराठी भाषेचा आर्थिक संसार. औरंगाबाद : मराठवाडा–साहित्य–परिषद्, १९७७. १० रु.

प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा : एक आकलन. पुणें : तत्त्वज्ञान विभाग, पुणें विद्यापीठ, १९७९. १० रु.

Prolegomena to a theory of semiosis and culture. Mysore : Central Institute of Indian Languages, 1980. Rs. 16.

आगामी

रुजवात : समीक्षेकडून मीमांसेकडे. (साहित्य, कला, साहित्याची भाषा ह्या विषयांवरील लेख.)

मराठीमधील वाक्याची जडणघडण.

मराठी भाषेची लेखनव्यवस्था : तत्त्व आणि तपशील.

आस्वादाकडून समीक्षेकडे.

भाषाशास्त्र

वैखरी

भाषा आणि भाषाव्यवहार

अशोक रा. केळकर

७१

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

पहिली आवृत्ति १९८३
प्रती : १५००
४ + २९५ पृष्ठें

लेखक
अशोक रामचंद्र केळकर (जन्म १९२९)
ए–२ परिमल, १२३९–ए आपटे रस्ता, पुणें ४११००४

प्रकाशक
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४००००४

मुद्रक
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० ए शनिवार पेठ, पुणें ४११०३०

प्राश्निक : प्रभाकर नारायण परांजपे
मुखपृष्ठ : र. कृ. जोशी
छायाचित्र : दिलीप शिवलकर

किंमत ५० रुपये

दिशास समर्पित *

* म्हणजेपर्यायानंमाझंमलाचसमर्पितअसंहोतंयखरंपणत्यालाइलाजनाही

अनुक्रमाणिका

काही अगत्याच्या सूचना

अनुक्रमणिकेत कंसांत लेखांचा मुख्य लेखनकाल दर्शविला आहे. ह्या सर्व लेखांच्या तारांकित नोंदी शेवटच्या 'लेखकाच्या भाषाविषयक लेखनाची सूची' मध्ये सापडतील. लेख पूर्वप्रकाशित असल्यास जरूर तो तपशील आणि त्या त्या लेखाबद्दलचे ऋणनिर्देश तिथेच मिळतील. पूर्वप्रकाशित लेखांचा समावेश करताना संबंधितांची अनुमति मिळालेली आहे तिच्याबद्दल आभार.

ह्या पुस्तकातील शुद्धलेखनपद्धति लेखकाच्या 'मराठी भाषेची लेखनव्यवस्था : तत्त्व आणि तपशील' या आगामी ग्रंथात सुचवलेल्या पद्धतीप्रमाणे ठेवली आहे.

विशेषनामांचे लेखन 'मराठीमधील विशेषनामांचें उच्चारण व लेखन' या लेखात सुचवलेल्या पद्धतीप्रमाणे केलें आहे.

ह्या पुस्तकातील शेवटच्या दोन सूचींमधील नोंदींचा क्रम 'मराठी देवनागरी वर्णक्रमी' या लेखात सुचवल्याप्रमाणे ठेवला आहे. त्यांच्यापैकी जी निर्देशसूची आहे तिचा उपयोग परिभाषासूचीसारखा देखील करता यावा.

ह्या पुस्तकातील कालनिर्देश साधारणतः आंतरराष्ट्रीय–मानक–संस्थेने पुरस्कारलेल्या आणि भारतीय–मानक–संस्थेने स्वीकारलेल्या पद्धतीने दिलेले आहेत. उदाहरणार्थ भारताचें संविधान अमलात आलें तें १९५०.०१.२६ रोजी.

प्रश्नोत्तरी

प्र. ना. परांजपे : केळकर, तुमच्या भाषाविषयक लेखांचा संग्रह आज, म्हणजे १९८१–८२ साली, तुमच्या वयाच्या बावन्न–त्रेपन्नाव्या वर्षी, प्रसिद्ध होतोय. माझ्या मते, हा संग्रह दहापंधरा वर्षांपूर्वीच बाहेर पडायला हवा होता.

डॉ. अशोक रा. केळकर : संग्रह काढायची कल्पना दहापंधरा वर्षांपूर्वीच मनात येऊन गेली होती. एका नामवंत प्रकाशकानं तशी विचारणाही केली होती. पण त्यावेळी माझ्या लक्षात आलं की आपल्या आताच्या लेखांचा संग्रह फार विस्कळीत होईल. व्याकरणापासून कवितेपर्यंतचे अनेक विषय मी हाताळले होते. त्या सगळ्या लेखांचा होल्डॉल करणं बरं वाटेना. बरं, भाषा आणि साहित्य याबद्दलचे लेख वेगळे काढून त्यांचे दोन स्वतंत्र संग्रह करायचे असं म्हटलं असतं तर ते संग्रह फार लहान झाले असते. पुस्तकाची व्यावहारिक किमान पृष्ठमर्यादाही त्यांना सांभाळता आली नसती. म्हणून सबुरी करून आणखी लेखन झाल्यावरच संग्रहाचा विचार करावा असं ठरवलं होतं.

: पण ही सबुरी जरा जास्तच झाली. गेली दहापंधरा वर्षं भाषाशास्त्रज्ञ – किंवा तुमचा शब्द वापरायचा तर ‘ भाषावैज्ञानिक ’–म्हणून महाराष्ट्रात तुमचा दरारा आहे, पण पुस्तक मात्र नाही अशी स्थिति होती. त्यामुळं ‘ विद्वान् आहेत, पण मराठीसाठी त्यांनी काय केलय् ? ’ असं शहाजोगपणानं विचारणारे काहीजण अधनंमधनं भेटत.

: तुम्ही म्हणता तसा दरारा निर्माण झाला असलाच तर तो माझ्या लेखांमुळं झाला असं म्हणावं लागेल, पण शहामृगासारखे जे शहाजोग असतात त्यांना गंभीर नियतकालिकं वाचण्याची, संदर्भ टिपून ठेवण्याची सवय नसते. महाविद्यालयांच्या ग्रंथालयांतून प्रमुख नियतकालिकांचे बांधीव अंक सहजी उपलब्ध असणं आणि त्यांतून आपल्याला पाहिजेत ते लेख शोधून वाचणं ही प्राथमिक शिस्त आपल्या अविकसित शिक्षणव्यवस्थेत अजून आलेली नाही. पुस्तक नाही ही तक्रार सामान्य वाचकानं केली तर ती मी समजू शकतो, पण ती अडचण विद्या–अर्थी आणि प्र–अध्यापक ह्यांना खरं म्हणजे भासू नये !

: या संग्रहाला ‘ वैखरी ’ हे शीर्षक तुम्ही दिलं आहे ते संग्रहातील सर्व लेख भाषाविषयक आहेत म्हणूनच ना ? कारण ‘ वैखरी ’ म्हणजे वाणी, भाषा–

: 'वैखरी' म्हणजे 'वाणी' किंवा 'भाषा' हा फार ढोबळ अर्थ झाला. खरं तर, आपल्याकडं 'वाणीत्रया'चा म्हणजे वाणीच्या तीन प्रकारांचा किंवा तीन टप्प्यांचा उल्लेख येतो. 'पश्यन्ती', 'मध्यमा', आणि 'वैखरी' हे ते तीन प्रकार. त्यांच्यातला भेद एका उदाहरणानं स्पष्ट करता येईल. समजा, माझं एक किमती फाउंटनपेन सापडत नसल्यामुळं माझ्या मनाला चुटपूट लागून राहिलेली आहे. त्याबद्दल विचार करता-करता माझ्या एकदम मनात येतं की त्या देवदत्तानं पेनचं फार कौतुक केलं होतं. पेन ठेवलेल्या टेबलाजवळही तोच एकटा पुष्कळ वेळ होता. मग मला एकदम "दिसतं" की देवत्तानं पेन चोरलेलं नाहे. ही 'पश्यन्ती' वाणी. ही अमुक एका भाषेतली आहे असं म्हणता येणार नाही. जे काय "दिसायचं" ते एकदम दिसतं. ना त्याला काही क्रम, ना कसलेही खंड किंवा घटक. पण गोष्ट एवढ्यावरच थांबत नाही. मला हें जें काही दिसलं तें दुसऱ्या कुणाला तरी सांगावंसं वाटतं. निदान मनात खूणगाठ बांधावीशी वाटते. मग मी मनातल्या मनात म्हणतो, 'देवदत्तानं पेन चोरलं असणार', किंवा 'Devadatta must have stolen the pen', किंवा 'देवदत्त ने पेन चुराया होगा'. ही मधली वाणी, म्हणून 'मध्यमा'! ही वाक्यं मनाशी म्हणताना काय झालं पहा—अखंड, निरवयवी आशयाची विभागणी झाली : चोरण्याची क्रिया, तिचं कर्म, कर्ता इत्यादि. या खंडांचा विशिष्ट क्रम आला. क्रियापदांचं कोणतं रूप वापरायचं याची निवड आली. पण हे सगळं करायचं म्हणजे मराठी, इंग्रजी, हिंदी—जी कोणती भाषा आपण निवडली असेल तिच्या संकेतांचीं बंधनं 'मध्यमा' वाणीवर आलीं. यानंतरचा टप्पा म्हणजे हा आशय किंवा हें वाक्य मुखर व्हायचं, दुसऱ्याला ऐकू जाईल असं उच्चारलं किंवा लिहिलं जायचं. हा झाला वाणीचा तिसरा आविष्कार. हा तिसरा आविष्कार म्हणजे 'वैखरी' वाणी. ती लोकव्यवहारात गुरफटलेली असते. अशा रीतीनं माणसाची बुद्धि आणि लौकिक प्रतिभा ह्यांच्या साहाय्यानं तीन टप्प्यांतून वक्त्याचा प्रवास होतो. त्याला 'शब्दांत योग' असं म्हणतात. श्रोत्याचा प्रवास म्हणजे 'शब्दपूर्वयोग' मात्र प्रथम 'वैखरी', मग 'मध्यमा', आणि त्यानंतर 'पश्यन्ती' ह्या उलट्या क्रमानं होतो. वक्त्याला जे "दिसलं" तेच श्रोत्याला "दिसलं" की हा भाषाव्यवहार सफल-संपूर्ण होतो, म्हणजेच भाषेच्या मदतीनं यशस्वी संज्ञापन, कम्यूनिकेशन घडतं. यावरनं तुमच्या लक्षात येईल की ह्या भाषाव्यवहाराच्या केंद्रस्थानी 'वैखरी' असते. शब्दांत योगाचं अंतिम टोक 'वैखरी' हे असतं अन 'वैखरी' पासूनच शब्दपूर्वयोगाला प्रारंभ होतो. थोडक्यात, वक्ता अन श्रोता ह्यांना जोडणारा पूल म्हणजे 'वैखरी' असं म्हणता येईल. ह्या संग्रहातल्या लेखांत भाषाव्यवहाराचा मी जो विचार केला आहे तो 'वैखरी' वाणीला केंद्रस्थानी ठेवूनच. म्हणून संग्रहाचं नाव 'वैखरी'!

: वाणीचा आणखी एक प्रकार गीतेत सांगितला आहे : 'परा वाक्'.

: 'परा वाक्' म्हणजे 'पश्यन्ती'चंच एक दुसरं रूप. आपल्या पूर्वजांचं असं म्हणणं होतं की कधी कधी 'पश्यन्ती' व्यवहाराच्या, म्हणजे लौकिक व्यवहाराच्या पलीकडं जाते. तिच्यामुळं जें "दिसतं" तें अनिर्वचनीय असतं. 'वैखरी' पर्यंत तें पोचतच नाही! पण मी वैज्ञानिक असल्यामुळं मला फक्त वाणीत्रयाशीच कर्तव्य आहे.

: अच्छा, म्हणून संग्रहाचं उपशीर्षक "भाषा आणि भाषाव्यवहार" आहे म्हणायचं. संग्रहातले लेख तुम्ही प्रसिद्धीच्या कालक्रमानं दिलेले दिसत नाहीत.

: ह्या संग्रहातले सगळेच लेख पूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत असं नाही. उदाहरणार्थ, 'भारताचे भाषिक प्रश्न', 'इंग्लिश व मराठी भाषांचें शिक्षणक्रमात स्थान', 'परिभाषेची परिभाषा' हे लेख प्रथम ह्या संग्रहातच प्रसिद्ध होताहेत. शिवाय, लेखांच्या कालक्रमाला स्वतंत्र महत्त्व आहे असं नाही. म्हणजे माझ्या विचारांत, मतांत काही महत्त्वाचे बदल झाले आहेत असं नाही. शिवाय, लेखांच्या प्रथम प्रसिद्धीबद्दलचा तपशील शेवटी दिलेल्या सूचीत आहेच.

: लेखांचे तुम्ही तीन गट केलेले दिसतात, पण त्या गटांना तुम्ही शीर्षकं दिलेली नाहीत.

: तशी आवश्यकता मला दिसत नाही. लेखांचं वर्गीकरण शीर्षकांच्या मदतीशिवाय लक्षात येण्यासारखं आहे. पहिल्या गटात मानवी भाषेबद्दल सैद्धान्तिक भूमिका मांडणारे लेख आहेत. त्यामुळं माझी भाषेबद्दल विचार करण्याची पद्धत ध्यानात यावी. दुसऱ्या गटातल्या लेखांत मानवी भाषेच्या सर्वसाधारण विचाराकडून भारतीय भाषांकडं आणि भारतीयांच्या समोर असलेल्या राजभाषा, परिभाषा, शिक्षणमाध्यम, भाषाशिक्षण यासारख्या भाषिक प्रश्नांकडं मी वळलेलो आहे, असं दिसून येईल. उदाहरणार्थ, पहिल्या गटातल्या 'भाषेचें नियोजन' या सैद्धांतिक लेखात जी भूमिका मांडलेली आहे तिचा उपयोग आपल्यापुढं आज असलेले प्रश्न सोडवण्यासाठी कसा करता येईल हें दुसऱ्या गटातील लेखांवरून स्पष्ट होईल. तिसऱ्या गटातल्या लेखांत मात्र मराठी भाषेच्या काही तांत्रिक स्वरूपाच्या प्रश्नांचा ऊहापोह मी केला आहे. दुसऱ्या गटातला एक लेख मराठीविषयीचा असला तरी तिथं मराठी भाषा केवळ उदाहरण म्हणूनच घेतली आहे.

: पण तिसऱ्या गटातल्या लेखांतही मराठी व्याकरणचर्चेतल्या काही गाजलेल्या प्रश्नांचा ऊहापोह नाही–

: तसा तिथं हेतुही नाही. आधुनिक भाषावैज्ञानिक दृष्टीनं मराठीकडं कसं पाहता येईल हे स्थूलमानानं दाखवणं, एवढाच मर्यादित हेतु त्या लेखांचा आहे.

: तुम्ही साहित्य, साहित्यातली भाषा, सौंदर्यशास्त्र याही विषयांवर लेखन केलेलं आहे. पण त्या लेखांचा समावेश या संग्रहात केलेला नाही–

: मगाशी म्हटल्याप्रमाणं, ते लेख मुद्दामच बाजूला ठेवले आहेत. त्यांचा दुसरा

एक संग्रह– " रुजवात " ह्या शीर्षकाचा– निघायचा आहे.

: तुमच्या लिखाणाबद्दल, ते अवघड असतं, अशी एक तक्रार बऱ्याच वेळा केली जाते–

: खरं आहे. " तुमचं लेखन समजत नाही त्याअर्थी तें विद्वत्तापूर्ण असणार " असा संशयाचा फायदा काही मंडळी माझ्याशी बोलताना मला देतात. पण मला तो नको असतो. वाचकांच्या खऱ्याखुऱ्या अडचणींची मला कदर आहे. त्या कमी कराव्यात असा मी माझ्याकडून प्रयत्न करतो. पण फक्त ' आ ' करणाऱ्या आणि तेवढ्यानंच आपल्या तोंडात जांभूळ आपोआप येऊन पडावं अशी अपेक्षा बाळगणाऱ्या वाचकांसाठी मी लिहीत नाही.

: पण खऱ्या जिज्ञासू वाचकालाही तुमचं लिखाण कधी कधी अवघड वाटतं, त्याचं काय ?

: मराठीमधली गद्याची प्रचलित धाटणी अतिसुलभीकरणाकडं कल असणारी आहे. त्यामुळं तुलनेनं माझं लिखाण अवघड वाटत असावं.

: तुमच्या शैलीची काही वैशिष्ट्ये याला जबाबदार आहेत असं नाही वाटत ?

: शक्य आहे. लेखनाची आकलनसुलभता काही प्रमाणात पुनरुक्तीवर अवलंबून असते. आणि मी तर पुनरुक्ति कटाक्षानं टाळतो.

: तुम्हाला कोट्या, श्लेष यांचाही फार मोह होतो. त्यामुळं वाचकाचं लक्ष तुमच्या विचारसूत्रावरून ढळतं आणि भाषिक चमत्कृतींकडं खेचलं जातं अन त्यामुळं त्याच्या आकलनात व्यत्यय येतो, हें म्हणणं तुम्हाला पटतं का ?

: नाही. मला तर वाटतं, मी माझी शैली संभाषणभाषेच्या जास्तीत जास्त जवळ न्यायचा प्रयत्न करतो आणि मराठीत—विशेषतः वैचारिक गद्यात— असे प्रयत्न फार थोडे झालेले असल्यामुळं मराठी वाचकाला सुरवातीला तरी चुकल्यासारखं होत असावं. शब्दचमत्कृतींबद्दल म्हणाल तर त्या केवळ अलंकरणासाठी मी कधीच वापरत नाही. माझ्या विद्यार्थ्यांसमोरील व्याख्यानांतही मी जोक्स ' टाकत ' नाही, पण विषयातून उद्भवले तर ते टाळतही नाही.

: मनावर घेतलेल्या कुठल्याही विषयाचा तुम्ही मुळाशी जाऊन विचार करता. त्यामुळं तुमच्या विचारांत, त्यांच्या मांडणीत वेगळेपणा असतो. त्या वेगळेपणामुळं इतरांना बिचकल्यासारखं होतं, पण तुम्हाला मात्र त्या वेगळेपणाची आढ्यता नसते; त्यात काही ' विशेष ' आहे असंही तुम्हाला वाटत नाही. त्यामुळं असं मनात येतं की तुमची कौटुंबिक पार्श्वभूमि बौद्धिक विकासाला विशेष अनुकूल असावी.

: तुम्ही म्हणता त्यात बरंच तथ्य आहे. माझे वडील कर्व्यांच्या महिला–विद्यापीठात इतिहासाचे अन समाजविज्ञानाचे प्राध्यापक होते, तर काका फर्गसन महाविद्यालयात इंग्रजीचे. प्रश्न विचारण्याचं घरी स्वातंत्र्य होतं. उत्तरंही सविस्तर आणि

आस्थेनं दिली जात. वडिलांचे विचार साधारणतः रूढ विचारसरणीपेक्षा भिन्न आणि स्वतंत्र असत. अनेक विषयांत त्यांना रस होता, गतिही होती. त्यामुळं भिन्न भिन्न विषयांत डोकावणं; वेगळा, स्वतंत्र विचार मांडणं; प्रश्न उपस्थित करणं ह्यात काही 'विशेष' आहे असं मला कधी वाटलं नाही वडील नेहमी सांगत, "मनात शंका ठेवायची नाही. उत्तर सापडेपर्यंत शोध." ह्या वातावरणाचा फायदा झालाच असणार.

: कुठल्या प्राध्यापकाचे किंवा शिक्षकांचे संस्कार आपल्यावर विशेषत्वानं झाले आहेत असं तुम्हालां वाटतं ?

: इंग्रजीचे प्राध्यापक मनोहर भाटे आणि तत्त्वज्ञानाचे श्रीनिवास दीक्षित ह्यांचे. भाटेलंडन स्कूल ऑव्ह् इकनॉमिक्समधून बी. एस्-सी. झाले होते. त्यामुळे इंग्रजी वाङ्मयाची सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी फार सखोलपणानं त्यांच्या शिकवण्यात यायची. दीक्षित तत्त्वज्ञानाचे नुसते प्राध्यापक नव्हते; स्वतः तत्त्वज्ञ होते. तत्त्वज्ञानातल्या काही समस्या त्यांना खरोखरीच छळताहेत हें नेहमी जाणवायचं. ग. प्र. प्रधान वाङ्मय या विषयाबद्दल उत्साह निर्माण करीत. सुदैवानं शाळेतही मला काही फार चांगले शिक्षक लाभले होते. द. के. कुलकर्णी नावाच्या शिक्षकांनी येस्पर्सनचं 'फिलॉसफी ऑव्ह् ग्रॅमर' हे पुस्तक मला त्यावेळी वाचायला दिलं होतं ! बि. सी. भागवतांनी 'प्रत्यक्ष' पद्धतीनं इंग्रजी शिकवलं आणि इंग्रजीबाबत निर्भय बनवलं. रानडे नावाच्या शिक्षकांनी मी चौथीत असताना मला व्याकरणाची गोडी लावली आणि अभ्यासाची पद्धतही शिकवली.

: तुम्ही पुष्कळ वेळा परदेशप्रवास केला आहे, त्याचा काही ठसा ?

: केवळ 'प्रवास' या उद्देशानं मी एकदाही परदेशी गेलो नाही. अध्ययन, चर्चासत्रं, संशोधन-प्रकल्प अशा निमित्तांनी माझं परदेशी जाणं झालं. त्यातली पहिली खेप संस्कारक्षम वयात–म्हणजे १९५६ ते ५८ या दोन वर्षांत झाली. तीं दोन वर्षं मी कॉर्नेल विद्यापीठात पी-एच्.डी. चा अभ्यास केला. या कॉर्नेल विद्यापीठाबद्दल एक सांगण्यासारखी बाब म्हणजे ज्ञानकोशकार केतकरांनीही तिथंच पी-एच्.डी. केलं. भारतातल्या जातिव्यवस्थेबद्दलचा त्यांचा प्रबंध मी तिथं उत्सुकतेनं पाह्यला होता. तिथला माझा काळ फार चांगला गेला. विद्यापीठ कसं असावं याचा मला तिथं प्रत्यय आला. साक्षात्कारच झाला म्हणानात का ! माझे पी-एच्. डी.चे मार्गदर्शक प्राध्यापक हॉकेट होते. त्यांच्याच काही मुद्यांवर मी माझ्या प्रबंधात टीका केली होती. पण त्यामुळं ते यत्किंचितही नाराज झाले नाहीत. इतकं बौद्धिक स्वातंत्र्य तिथं होतं. तिथल्या 'म्यूझिक रूम'मध्ये मी खूप–विशेषतः अभिजात पाश्चात्त्य संगीत–ऐकलं. आणि 'फिल्म सोसायटी'त चित्रपटही पाहिले.

: तुम्ही 'लिंग्विस्ट' आहात तसे 'पॉलिग्लॉट'ही आहात का ?

: मी ‘ पॉलिग्लॉट ’ जरी नाही तरी चारपाच भाषा मला येतात. अर्थात् भाषा अवगत असणं आणि भाषेबद्दल ज्ञान असणं ह्या दोन वेगळ्या बाबी आहेत. शिवाय, भाषावैज्ञानिकाला पुष्कळ भाषा अवगत असणं आवश्यक आहे असं नाही. मला मराठी आणि इंग्रजी येतातच, शिवाय बऱ्यापैकी येतात म्हणजे हिंदी आणि वाचन करण्यापुरती फ्रेंच. शाळेच्या वयातच चार भाषांशी परिचय झाल्यामुळं माझं भाषांबद्दलचं, त्यांच्या वेगवेगळ्या उच्चाराच्या आणि मांडणीच्या लकबींबद्दलचं, कुतूहल जागं झालं यात शंका नाही.

: फ्रेंच तुम्ही शाळेतंच शिकला ? मग संस्कृतचं काय ?

: शाळेत चौथी भाषा म्हणून संस्कृतच्या ऐवजी मी आवडीने फ्रेंच घेतली. माझे वडील एकदा म्हणाले होते की फ्रेंच लोक भाषांतरात जबरे आहेत, कुठल्याही भाषेत चांगलं पुस्तक निघालं की ते आपल्या भाषेत आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मी तेच लक्षात ठेवलं. वडिलांनी मला मोकळीक दिली होती, पण इतर काही वडीलधाऱ्या मंडळींनी नाराजी दाखवली होती हे मात्र खरं. भाषांचा तौलनिक अभ्यास करण्याचा पुढे भाषाविज्ञानाच्या संदर्भात प्रश्न आला, तेव्हा मी त्या कामापुरतं संस्कृत भाषेबद्दलचं ज्ञान मिळवलं. पण अजूनही मी संस्कृत वाचन करू शकत नाही. ‘ प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा एक आकलन ’ या पुस्तकासाठी मला भाषांतरं आणि इतरांनी संस्कृतमधल्या साहित्यमीमांसेबद्दल केलेलं लेखन यावर विसंबून रहावं लागलं.

: लेखनाला तुम्ही कशी अन केव्हा सुरवात केली ?

: मराठी लेखनाला की इंग्रजी ? कारण लेखनाच्या बाबतीत मी त्रिभाषासूत्राचा—इंग्रजी, मराठी, अन हिंदी ह्या भाषांचा—अवलंब केला आहे.

: मला मराठी लेखनाची सुरवात अभिप्रेत होती.

: के. नारायण काळ्यांनी मला लिहितं केलं. ते साहित्यपत्रिकेचं संपादन करीत तेव्हाची गोष्ट. डॉक्टर वि. भि. कोलत्यांनी साहित्य–संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणाचा बराचसा भाग भाषाविषयक प्रश्नांच्या चर्चेनं व्यापलेला होता. त्यामुळं त्याविषयी लिहायला त्यांनी मला सांगितलं. माझं साहित्यविषयक लिखाण प्रभाकर पाध्यांनी चालवलेल्या पुण्याच्या ‘ सेंटर फॉर इंडियन रायटर्ज ’ मध्ये होणाऱ्या चर्चांमुळं सुरू झालं. माझ्या मराठी लेखनाला भालचंद्र नेमाडेही अंशतः जबाबदार आहे– ‘ द बीइंग ऑव्ह अ पोएम ’ हा माझा इंग्रजी लेख वाचून त्यानं मला पत्र लिहिलं, “ काय राव, तुम्ही इंग्रजीतच लिहिता हे काही खरं नाही. मराठीत लिहायला पाहिजे ! ”

: तुम्ही मुख्यतः सैद्धांतिक लेखनच का करता ? म्हणजे तुमच्या शब्दांत ‘ साहित्यसमीक्षे ’ऐवजी ‘ साहित्यमीमांसे ’त तुम्ही अधिक रमता, याला काही विशेष कारण आहे का ?

: दोनतीन कारणं आहेत त्याला. दृष्टीच्या अधूपणामुळे कमीत कमी लिहून जास्तीत जास्त क्षेत्र व्यापावं, अशी माझी लहानपणापासून मानसिक धारणा असावी. शिवाय, सैद्धांतिक समस्यांच्या कुस्तीत रमण्याचा माझा स्वभाव आहे. मुख्य म्हणजे, पुस्तक-समीक्षात्मक लेखन करण्याइतका वेळ पुष्कळदा माझ्याकडं नसतो. अध्यापन, संशोधन, परिसंवाद, परिचर्चा, निवड-समित्या यासारख्या कामांमधून मला लेखनासाठी जो वेळ मिळतो त्यात काय लिहायचं हे मला फार चिकित्सकतेनं ठरवावं लागतं.

: सैद्धांतिक प्रश्नांमध्ये तुम्ही अधिक रमता. असं असूनही तुम्ही तत्त्वज्ञानाकडं कसं वळला नाहीत ?

: खरं म्हणजे इंटर आर्ट्स् झाल्यावर बी. ए. ला इंग्लिश साहित्य घ्यायचं का तत्त्वज्ञान घ्यायचं हा एक प्रश्नच माझ्यासमोर होता. शेवटी कौल साहित्याच्या बाजूनं लागला, आणि झालं ते ठीकच झालं असं आता म्हणावंसं वाटतं. त्यानंतर तत्त्वज्ञ मंडळींशी संपर्क राहिला हें मात्र खरं. नुकतंच 'प्रॉलिगॉमिना टु ॲन अंडरस्टँडिंग ऑव्ह सीमिऑसिस ॲंड कल्चर' हें माझं पुस्तक बाहेर पडलं. त्यात मी त्यातल्या त्यात तत्त्वज्ञानाच्या जवळ गेलो आहे असं मला वाटतं.

: ह्या पुस्तकाचं स्वरूप नेमकं काय आहे ?

: चिह्नव्यापार अन संस्कृति यांचं स्वरूप समजावून घेण्यासाठी सैद्धांतिक पूर्व-तयारी कोणती करावी लागेल ह्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा त्यात मी प्रयत्न केला आहे. ह्या पुस्तकातल्या काही थोड्या भागाचे पडसाद 'मराठी भाषेचा आर्थिक संसार' ह्या माझ्या दुसऱ्या एका पुस्तकाच्या 'अर्थव्यापार आणि भाषा' ह्या सुरवातीच्या प्रकरणात उमटलेले दिसतील.

: मराठीतले कोणते समीक्षक तुम्हाला महत्त्वाचे वाटतात ?

: दि. के. बेडेकर अन गो. वि. करंदीकर हे समकालीनांपैकी. त्यापूर्वीच्या पिढ्यांपैकी वा. म. जोशी, डॉक्टर केतकर, आणि श्री. कृ. कोल्हटकर मला वेगवेगळ्या कारणांनी महत्त्वाचे वाटतात.

: मराठीतल्या साहित्यसमीक्षेबद्दल तुमचं काय मत आहे ?

: मराठीतली साहित्यसमीक्षा एका संकुचित अन वाईट अर्थानं 'साहित्यिक' आहे. समीक्षक चौरस हवा. त्यानं आपली अभिरुची जोपासायला हवी. चांगला साहित्यसमीक्षक हा शेवटी चांगला जीवन-समीक्षकही असतो हें विसरून चालणार नाही. मराठी माणसाच्या संस्कृतीचं थिटेपण, एकारलेपण मराठी साहित्यसमीक्षेतही प्रतिबिंबित झालेलं दिसतं. विविध विज्ञानं, हस्तकला, तत्त्वज्ञान, वैचारिक कसदार-पणा या गोष्टी मराठी माणसाच्या संस्कृतीतच आढळत नाहीत. मग त्या मराठी साहित्यसमीक्षेत कुठून येणार ! रूपवाद (formalism) सुद्धा मराठीत नीटपणानं आलेला नाही. मर्ढेकरांचा कोता रूपवादच मराठी समीक्षेनं डोक्यावर घेतला.

: समीक्षक मर्ढेकरांचं मूल्यमापन तुम्ही कसं कराल ?

: सर्वसाधारण मराठी माणसाला मर्ढेकर आकर्षक वाटले ते त्यांच्या नावीन्यामुळं. त्यांचं लेखन शास्त्रकाव्याचा आग्रह धरत असलं तरी ते स्वतः त्या कसोटीवर उतरत नाही. शेक्सपियरच्या भरगच्च आणि व्यामिश्र साहित्यावर मी पोसला गेल्यामुळं मर्ढेकरांचा कलेच्या विशुद्धपणाचा आग्रह मला पटला नाही; अजूनही पटत नाही. साहित्य म्हणजे दुसरंतिसरं काही नसून अमूक अमूक आहे किंवा सर्व कला म्हणजे दुसरंतिसरं काही नसून अमूक अमूक आहे. अशा प्रकारचा reductionism (पर्यवस्थांतरण) मला पटत नाही.

मर्ढेकरांची सा हि त्य स मी क्षा चांगली आहे. मी त्यांचं ऋण दोन बाबतीत मानतो– वाङ्मयीन महात्मतेचं विवेचन आणि कलेचं द्रव्य व माध्यम ह्यांमध्ये त्यांनी केलेला भेद. अर्थात् मर्ढेकरांनी हा भेद दुसरीकडून घेतला असं पाध्यानी दाखवून दिलं आहे. पण मला तरी तो मर्ढेकरांकडूनच प्रथम मिळाला.

: आणि कलावंत मर्ढेकर–

: मर्ढेकरांच्या कवितेतली नवीनता अस्सल आहे, हिंदी प्रयोगवादी कवितेतली नवीनता पुष्कळदा असते तशी कृत्रिम नाही. पहाडी अहंता आणि अभिशप्त व्यक्तिमत्त्व हे त्यांच्या कवितेचे दोन विशेष मला टिकाऊ वाटतात; त्यानी केलेले भाषाविषयक प्रयोग नव्हेत. त्यांच्या ‘पिपात मेले ओल्या उंदिर’ला अवास्तव महत्त्व दिलं गेलं. आपल्या भाषिक प्रयोगांच्या मर्यादा मर्ढेकरांच्याही लक्षात आल्या असाव्यात. उत्तरकाळातल्या त्यांच्या कवितांची भाषा नितळ आहे. पु० शि० रेग्यांच्या कवितेपेक्षा मर्ढेकरांची कविता मला श्रेष्ठ वाटते. पण मर्ढेकरांचे काव्यविषयक सिद्धांत आणि पु० शि० रेग्यांची कविता ह्यांच्यामुळं मराठीत काव्यविषयक जी धारणा निर्माण झाली आहे ती मला चुकीची वाटते. तिला मी shivering virgin notion of poetry असं म्हणतो. कवितेवर फार आक्रमणं होताहेत आणि त्यांच्यापासून कवितेचं संरक्षण केलं पाहिजे असं मानण्याचं कारण नाही. कवितेत वक्तृत्वगुण किंवा विनोद आला की ती लगेच भ्रष्ट होते हेही खरं नाही. शेक्सपियरमध्ये हे सर्व आहेच की ! दुर्दैवानं आपल्याकडे शेक्सपियर वाचला जातो तो ढोबळ भाषांतरांतनं किंवा ब्रॅडूलीच्या चष्म्यातनं !

: हे जरा आणखी स्पष्ट करणार का ?

: कवितेच्या शुद्धतेचा आग्रह चुकीचा आहे. साहित्याला बाह्य प्रयोजन नसावं असं कलावादी लोक मानतात, आणि तीच अपेक्षा इतर कलांपासूनही करतात. पण एक तर, साहित्य व इतर कला ह्यांत मूलभूत भेद आहे. दुसरी गोष्ट अशी की, एखाद्या वस्तूला तार्किक दृष्ट्या बाह्य प्रयोजनाची ग र ज नसणं आणि प्रत्यक्षात बाह्य प्रयोजन असणं ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. संगीताचंच उदाहरण घ्या. मैफली-

तल्या संगीताला बाह्य प्रयोजन नसेल. पण आदिवासींच्या जीवनात लावणी—कापणी, विवाह—मृत्यू यांसारख्या गोष्टी साजऱ्या करताना संगीत येतं. म्हणून मग संगीताचे दोन प्रकार मानायचे का ? तें योग्य नाही.

: गंगाधर गाडगीळांसारखे मान्यवर मराठी लेखक—समीक्षक भाषाविज्ञानाचा उल्लेख अत्यंत उपहासानं करतात.

: भाषाविज्ञानाचा उपहास करण्याची टूम आपल्याकडं इंग्लंडमधून आयात झाली आहे. एखाद्या विषयाचा अभ्यास न करता त्याचा उपहास करणं हा मला एक मोठा विनोद वाटतो. भाषाविज्ञानाला साहित्यसमीक्षेत विरोध होण्याची मला दोन कारणं दिसतात; एक म्हणजे ह्या विषयाबद्दलचे गैरसमज आणि दुसरं म्हणजे निव्वळ बावळटपणा ! भाषाविज्ञानाच्या ज्ञानाशिवाय साहित्यसमीक्षा करता येणार नाही, किंवा भाषाविज्ञानामुळं साहित्याच्या आकलनात काही क्रांतिकारक फरक होतो असं मुळीच नाही. आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया इतरांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियांशी पडताळून पाहून त्यांचा उलगडा करण्याचं भाषाविज्ञान हे एक साधन आहे. आस्वादाची कारण-मीमांसा करताना भाषाविज्ञानाप्रमाणंच मनोविज्ञान, तत्त्वज्ञान, समाजविज्ञान, इतिहास अशा अनेक ज्ञानशाखा उपयुक्त ठरतात. पण त्यांचं अगदी तुटपुंजं, कामचलाऊ-सुद्धा ज्ञान नसलं तरी चांगली साहित्यसमीक्षा लिहिता येते. तशी ती स्वतः गंगाधर गाडगीळ लिहीतच आहेत. पण म्हणून ही साधनं उपरी अन त्याज्य आहेत असं ठरवणं हा बौद्धिक बावळटपणा तरी आहे किंवा मनोवृत्तीचा संकुचितपणा तरी !

: एकूण साहित्यव्यवहाराला भाषाविज्ञानाचं कोणत्या प्रकाराचं साहाय्य होऊ शकतं ?

: साहित्याविषयीच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियांमागील निमित्तकारणं शोधण्याचं काम भाषाविज्ञान करू शकतं, कारण भाषा हे साहित्याचं साधन किंवा द्रव्य असतं आणि भाषेचा ‘ भाषा ’ म्हणून अभ्यास करण्याचं काम भाषाविज्ञान करतं. दुसरी गोष्ट अशी की, भाषाविज्ञानाची अभ्यासपद्धती साहित्यक्षेत्रात वापरली गेली तर साहित्याच्या अभ्यासाला वेगळं परिमाण लाभू शकेल. क्लोद लेव्हीस्त्रॉसनं भाषाविज्ञानाची अभ्यास-पद्धती सांस्कृतिक मानवविज्ञानात वापरली आणि त्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली ! आपण साहित्याला नुसता पोटतिडिकीचा विषय मानतो. पण त्याला निव्वळ कुतूहलाचा विषय मानून त्याचा विविध कोनांतून अभ्यास होणं हेही शक्य आणि आवश्यक आहे. तसं झाल्यास ते साहित्यव्यवहाराला उपकारकच ठरेल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहित्य कसं शिकवावं, साहित्याबद्दलच्या मर्मदृष्टीचा विद्यार्थ्यांत कसा विकास करावा याबाबत भाषाविज्ञान मौलिक मदत करू शकतं.

: ‘ भाषाशास्त्र ’ ह्या रूढ शब्दाऐवजी ‘ भाषाविज्ञान ’ हा वेगळा शब्द वापरण्याचा आग्रह तुम्ही का धरता ?

: वेगळ्या शब्दाचा माझा आग्रह हा केवळ वेगळेपणासाठी नाही. ' फिलॉलजी 'ला प्रतिशब्द म्हणून ' भाषाशास्त्र ' हा शब्द मराठीत आला. शब्दांच्या व्युत्पत्ती, त्यांचा उगम व विकास, विविध भाषांमधला ऐतिहासिक संबंध, भाषेचा इतिहास अन विकास इत्यादींच्या अभ्यासाचा समावेश ' फिलॉलजी ' किंवा ' भाषाशास्त्र 'मध्ये होत असे. परंतु भाषेचा भाषा म्हणून वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी जी एक नवीनच ज्ञानशाखा सोस्यूर, ब्लूमफील्ड इत्यादींच्यामुळे प्रस्थापित झाली ती ' लिंग्विस्टिक्स ' किंवा ' भाषाविज्ञान '. गेल्या साठसत्तर वर्षांत ह्या ज्ञानशाखेने जी प्रगती केली आहे ती तिच्या वैज्ञानिक पद्धतीच्या आग्रहामुळं. म्हणून मी ' भाषाविज्ञान ' ह्या शब्दाचा आग्रह धरतो. अलीकडं मात्र ' फिलॉलजी ' हा शब्द दुसऱ्याच एका अर्थानं इंग्रजीत रूढ होऊ पाहत आहे. संस्कृतीच्या इतिहासाचं साधन म्हणून वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या ज्ञानशाखेसाठी तो शब्द आता वापरण्यात येतो. खरं म्हणजे हाच ' फिलॉलजी ' शब्दाचा अगदी सुरवातीपासूनचा अर्थ. त्या अर्थानं त्याचं मराठी भाषांतर ' वाङ्मयविद्या ' असं होईल.

: भाषाविज्ञानाकडं मराठी भाषिकांनी इतकं दुर्लक्ष का केलं असावं ?

: अज्ञान आणि अडाणीपणा यामुळं. १९५४ पासून पुण्याच्या डेकन महाविद्यालयात भाषाविज्ञानाची गंगा वाहते आहे, सिंहली, हिंदी, तेलुगु, तमिळ, मलयालम ह्या भाषिकांनी ती गंगा आपापल्या प्रदेशात नेली. पण महाराष्ट्र कोरडा तो कोरडाच. एखादी गोष्ट सुरक्षितरीत्या प्रस्थापित झाल्याशिवाय आपण तिच्या वाटेला जात नाही हेच खरं !

: मराठीतल्या भाषाविज्ञानविषयक लेखनाबद्दल तुमचं काय मत आहे ?

: डॉक्टर कालेलकरांची तीन पुस्तकं[1] आणि डॉक्टर गजेंद्रगडकरांचं[2] एक पुस्तक यांखेरीज नोंद घेण्याजोगं भाषाविज्ञानविषयक लेखन मराठीत दिसत नाही. पैकी कालेलकरांचीं पुस्तकं सर्वसामान्य वाचकाला विषयाची तोंडओळख करून देतात, पण जिज्ञासू विद्यार्थ्यांची गरज भागविण्यासाठी तीं लिहिलीं गेलीं आहेत असं दिसत नाही. गजेंद्रगडकरांचं पुस्तक बी. ए., एम. ए.ला गौण विषय म्हणून भाषाविज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांना उपयोगी पडेल.

: तुम्ही या विषयावर भरघोस लेखन का नाही करीत ? उदाहरणार्थ, सौंदर्यशास्त्र समजावून देणारा ग्रंथ डॉक्टर पाटणकरांनी लिहिला–

: एक तर, चिकाटीनं ग्रंथलेखन करण्याचा माझा स्वभाव नाही. दुसरी गोष्ट अशी की, पाटणकरांच्यासारखं पूर्वसूरींच्या विचारांचा मागोवा घेत घेत बृहद्ग्रंथ

---

१. ध्वनिविचार, भाषा आणि संस्कृती, भाषा : इतिहास आणि भूगोल.

२. भाषा व भाषाशास्त्र (वर्णनात्मक)

लिहिणं ही लेखनाची एक पद्धत झाली. त्या विषयात स्वतःला सांगण्यासारखं जें असेल तेवढं सांगून मोकळं होणं ही दुसरी पद्धत. मला दुसरी पद्धत भावते. विस्तार करायचाच झाला तर उदाहरणांचा करावा, संदर्भांचा नव्हे असं माझं धोरण असतं. मराठी माणसाचा स्वभाव लक्षात घेता पाटणकरांची पद्धत धोकादायक ठरण्याचा संभव आहे. म्हणजे असं की, मराठी वाचक पाटणकरांच्या पुस्तकापलीकडं काहीही वाचणार नाही. आणि तरीही विद्वान्, बहुश्रुत म्हणून मिरवून घेईल !

: पण असं नाही का म्हणता येणार की एखाद्या विषयावरच्या विशिष्ट लेखनाचं आकलन होण्यासाठी समाजात त्या विषयाबद्दलची मूलभूत समज असणं म्हणजे त्या विषयाची पार्श्वभूमि तयार झालेली असणं आवश्यक असतं. मराठी–भाषिकांत सौंदर्यशास्त्राच्या बाबतीत अशी समज मर्ढेकरांच्या काळी नव्हती. त्यामुळं मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रविषयक लेखनानं त्या काळातील लोक दिपले, चमकले, पण गोंधळलेही ! त्यांना मर्ढेकरांचं आकलन झालं नाही, मूल्यमापन करता आलं नाही. शिवाय, तो विषयही मराठीत मूळ धरू शकला नाही. म्हणून एखाद्या नवीन विषयाबाबत पाटणकरांच्याच पद्धतीचं लेखन आवश्यक असतं असं नाही वाटत ?

: आवश्यक आहे पण ते वाचकांचं कुतूहल जागृत झाल्यावरच ! तोवर, केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे " नित्याच्या अवलोकनें जन पहा होती कसे अंधळे " अशी अवस्था असते. ती संपवण्यासाठी मर्ढेकरांच्यासारखंच बेचैन करणारं, आह्वानकारक प्रश्नांकडं घेऊन जाणारं लेखन होणं आवश्यक असतं.

: पण असं लेखन समकालीनांना अवघड वाटतं त्याचं काय ?

: पण नंतरच्या पिढीला ते अवघड वाटेनासं होतं. यालाच वैचारिक प्रगति म्हणतात !

: तुम्ही पी–एच० डी०साठी लिहिलेल्या प्रबंधाचा विषयक काय होता ?

: ' मराठी स्वनव्यवस्था आणि पदव्यवस्था '.

: ' स्वनव्यवस्था ' म्हणजे काय ?

: वर्णव्यवस्था. म्हणजे उच्चारण किंवा ध्वनिव्यवस्था.

: मग ' स्वनव्यवस्था ' हा शब्द का ?

: कारण वर्णव्यवस्थेपेक्षा मला तिथं काही जास्त अभिप्रेत आहे. वर्णाला वर्ण जोडून वाक्यं बनतात त्या वेळी होणारी जोडतोड, सुराचा चढउतार, बोलण्याचं वजन हे सारं स्वानिक विशेषांत आलं.

: मग ' ध्वनिव्यवस्था ' या शब्दाला काय हरकत आहे ?

: ' ध्वनिविज्ञान ' हा शब्द भौतिकीची एक शाखा म्हणून राखून ठेवायला सोयीचा आहे. तोंडावाटे निघणाऱ्या भाषेतल्या ध्वनींना–म्हणजेच भाषेच्या शब्दांगाच्या संदर्भात ' स्वन ' हा शब्द वापरायचा असं माझं धोरण आहे.

: ' मराठी व्याकरणाची नवी दिशा ' हा एक लेख वगळता मराठी व्याकरणासंबंधी तुम्ही फारसं काही लिहिलेलं नाही, असं का ?

: मराठी व्याकरणावर मला लिहायचंय हें नक्की. या विषयावरील एका संकलित पुस्तकाचं पहिलं प्रकरण मी लिहिलंही होतं. पण या संकलित पुस्तकाचं स्वरूप काय असावं हें मला अजून ठरवता आलेलं नाही. म्हणजे प्राथमिक स्वरूपाचं छोटं पुस्तक हवं, की आजच्या मराठीची मला दिसणारी व्याकरणव्यवस्था वर्णन करणारं पुस्तक हवं, की पूर्वसूरींचा मागोवा घेत घेत त्यांचं खंडनमंडन करीत जाणारा बृहद्ग्रंथ हवा हें प्रथम ठरवल्याशिवाय मला या विषयावर ग्रंथलेखन करता येणार नाही.

: मोरो केशव दामल्यांच्यानंतर मराठी व्याकरणाची परंपरा नष्ट झाली असं म्हटलं जातं. असं का व्हावं ?

: दामल्यांचं व्याकरण हा एका परंपरेचा शिखरबिंदू होता. हिंदीच्या सर्वात गाजलेल्या व्याकरणाचे लेखक कामताप्रसाद गुरु हे दामल्यांच्याच प्रभावाखाली होते हें लक्षात घ्या. शिवाय, भारतीय प्रबोधनाचा महाराष्ट्रीय आविष्कार १९२० च्या सुमारासच संपला हेंही विसरून चालणार नाही. व्याकरणच काय, पण इतर ज्ञानशाखा, साहित्य, राजकारण, समाजकारण ह्याही क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राच्या कामगिरीला १९२० नंतर उतरती कळा लागली. नंतर झाला तो मुख्यतः संख्यात्मक विस्तार; गुणात्मक विकास नव्हे !

: पण असं तरी का व्हावं ?

: इंग्रजांशी आणि इंग्रजीशी आलेल्या संबंधांमुळं १८७० पर्यंत मराठीत खूप भाषांतरं झाली. ह्या भाषांतरांमधून मिळालेल्या नवीन विचारांची शिदोरी १९२० पर्यंत पुरली असावी. पण १८७० नंतर इंग्रजीचं वाचन आणि मनन संपुष्टात आलं. उदाहरणार्थ, आगरकरांना मार्क्स माहीत होता असं त्यांच्या लिखाणावरून दिसत नाही. रविकिरणमंडळाच्या सभासदांनी टेनिसन–स्विनबर्ननंतरची इंग्रजी कविता वाचलेली नसावी. इंग्रजीच्या प्राध्यापकांनाही जॉइस किंवा एलियट यांची ओळख नव्हती.

: तुमची ही निरीक्षणं अशोक शहाण्यांच्या गाजलेल्या ' क्ष–किरणां 'शी मिळतींजुळतीं आहेत–

: आहेत ना ! अशोक शहाणेनं तो निबंध वाचून दाखवला त्या सुमारास अशोक शहाणे, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर वगैरे आम्ही मंडळींनी ' शब्द ' हें मराठीतलं पहिलं अनियतकालिक चक्रमुद्रित स्वरूपात काढलं होतं. मराठीच्या अपुऱ्या 'परपुष्टते'-संबंधीची मर्ढेकरांची तक्रार दूर करण्याच्या उत्साहानं मी फ्रेंच, जर्मन, इटॅलियन कवितांचे अनुवादही त्यात केले होते. अरुण कोलटकरला आणि मला एकदमच राइनर मारिया रिल्के सापडला होता !

: " वैखरी "मुळं भाषावैज्ञानिक अभ्यासाची एक उत्साही लाट निर्माण होईल आणि आपल्या भाषिक प्रश्नांकडे पहायचा एक डोळस दृष्टिकोण स्थिर होईल अशी मला आशा आहे. वय आणि अधिकार ह्या दोन्ही दृष्टींनी तुम्ही माझ्यापेक्षा कितीतरी ज्येष्ठ आहात. त्यामुळं मी तुम्हाला शुभेच्छा व्यक्त करणं हे औद्धत्याचं तर होणार नाही ना अशी शंका मनात आहे. पण ह्या प्रश्नोत्तरीच्या अखेरीस " वैखरी "ला शुभेच्छा दिल्याखेरीज राहवत नाही. आता माझ्यासारखे तुमचे वाचक वाट पाहताहेत ती " रुजवात "ची !

पुणें, फेब्रुवारी–मार्च, जुलै–ऑगस्ट १९८१

भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा

भाषाविज्ञान म्हणजे काय ?

भाषेला दोन अंगें आहेत— भाषाव्यापार आणि त्या व्यापाराची शिस्त (म्हणजेच भाषाव्यवस्था). भाषाव्यापार हें मानवी जीवनाचें महत्त्वाचें अंग आहे आणि भाषाव्यवस्था ही एक सर्वंकष अशी मानवी संस्था आहे. भाषेचा अभ्यास चार पातळ्यांवरून करता येतो—

(१) व्यावहारिक अध्ययन— भाषाव्यापार म्हणजे ऐकणें, बोलणें, वाचणें, लिहिणें, भाषांतर करणें ह्यावर प्रभुत्व मिळवण्यासाठी एखाद्या भाषेची व्यवस्था हस्तगत करणें; भाषा शिकणें.

(२) भाषाविज्ञान— भाषेचें भाषा म्हणून, भाषाव्यवस्थेचें एक चिह्नव्यापार म्हणून वैज्ञानिक अध्ययन करणें.

(३) भाषेचें अनुवर्ती अध्ययन— भाषेकडे भाषा म्हणून न पाहता अन्य मानवी व्यवहारांचें उदाहरण किंवा वाहन म्हणून पाहणें; वाङ्मयसंशोधक आणि साहित्यसमीक्षक, तत्त्वज्ञ आणि समाजसमीक्षक, समाजवैज्ञानिक आणि संस्कृतिवैज्ञानिक, मनोवैज्ञानिक आणि जीववैज्ञानिक, फार काय तर्कज्ञ आणि गणितज्ञ ह्या सर्वांनाच भाषेविषयी आस्था आणि कुतूहल असतें आणि आपापल्या दृष्टिकोणातून ते भाषेकडे पाहतात.

(४) व्यावहारिक उपयोजन— भाषाविज्ञान आणि भाषेचें अनुवर्ती अध्ययन ह्या पातळीवर जो सैद्धांतिक अभ्यास होतो तो व्यवहारात उपयोगात आणणें; भाषाशिक्षण (व्यावहारिक अध्ययनासाठी), भाषिक व्यवहारातील तांत्रिक व यांत्रिक प्रश्न (उदाहरणार्थ टंकयंत्राचा रूळफलक ठरवणें), आणि भाषाव्यवहाराबद्दल धोरण आणि जाणीवपूर्वक योजना आखणें (उदाहरणार्थ परिभाषानिर्मिति, लिपिसुधारणा, आंतरप्रादेशिक व्यवहारासाठी भाषा निवडणें).

यांपैकी भाषाविज्ञानाच्या पातळीवर भाषेसंबंधीच्या काही मध्यवर्ती प्रश्नांना हात घातला जातो आणि त्यांच्याबद्दलचें कुतूहल वैज्ञानिक पातळीवर शमवलें जातें. भाषाविज्ञानाचें स्वरूप समजावून घ्यायचें तर ह्या मध्यवर्ती प्रश्नांचें आणि त्यांच्या

उत्तरांचें ढोबळ स्वरूप समजावून घ्यायला पाहिजे. तीं प्रश्नोत्तरें कोणतीं ?

प्रश्न : मौखिक आणि लिखित भाषाचिह्नांचा अनुबंध त्यांच्या अंतिम चिह्नितांशी कसकसा पोचतो ?

उत्तर : हा अनुबंध भाषागत चिह्नांच्या द्वारा जुळतो. मौखिक किंवा लिखित चिह्नें श्रोत्याला (किंवा वाचकाला) दखल देतात ती भाषिक मजकुराची. भाषिक मजकूर भाषागत चिह्नांचा बनलेला असतो. भाषागत चिह्नें ग्राहकाला फक्त आठवण देतात भाषाबाह्य जगाची. एका भाषिक संज्ञापनाची सांगता कशी होते ? वक्ता (किंवा लेखक) मौखिक/लिखित चिह्नें आणि त्यांच्या द्वारा भाषिक मजकुरातील चिह्नें ह्यांचा उपयोग करतो आणि ह्याला प्रेषक आणि ग्राहक ह्यांना वेढणाऱ्या प्राप्तपरिस्थितीचा संदर्भ असतो. भाषाविज्ञानाचें प्रस्थान ह्या प्रश्नोत्तरांतूनच होतें.

उपप्रश्न १ : हा अनुबंध यशस्वी तरी कसा होतो ? प्रेषकाचें मनोगत ग्राहकापर्यंत पोचतें तरी कसें ? मर्यादित सामग्रीनिशी आपण अगणित वाक्यांची निर्मिति कशी करतो आणि निर्मिलेल्या वाक्यांचें ग्रहण कसें करतो ? म्हणजे एखाद्या भाषेचा उपयोग करण्याइतकी ती आपल्याला येते म्हणजे नेमकें काय काय येतें ?

उत्तर : आपण प्रेक्षकाच्या किंवा ग्राहकाच्या भूमिकेतून काही सामान्य आकृतिबंधांमधून अधिकाधिक विवक्षित आकृतिबंधांकडे निवड करीत करीत वाट काढतो, आणि एक वाक्य उभें राहतें. मग दुसरें. हे आकृतिबंध आणि त्यांच्या निवडीचे संकेत मिळून भाषाव्यवस्था बनते. ह्या भाषाव्यवस्थेमुळे वाक्यांचा एक अक्षयनिधि सिद्ध होतो. भाषिक संज्ञापन म्हणजे प्रेषकाने आणि ग्राहकाने ह्यातल्या एका वाक्याची किंवा वाक्यबंधाची प्राप्तपरिस्थितीमध्ये भाषाबाह्य जगातल्या प्रस्तुतपरिस्थितीशी सांगड घालून देणें. ह्या उत्तरात तपशील भरणें म्हणजेच विश्लेषक भाषाविज्ञान. भाषाव्यवस्थेच्या अंगोपांगानुसार त्याच्या ह्या उपशाखा होतात–

(क) स्वनव्यवस्थाविचार : वर्ण, वर्णसंहिता, सुर, बल आदींचा विचार.

(ख) व्याकरण (रूपांगविचार) : धातुप्रत्ययादि लघुतम रूपांपासून पदें, पदबंध, वाक्य, वाक्यबंध कसकसे सिद्ध होतात याचा विचार. पदविन्यास आणि वाक्यविन्यास हे व्याकरणाचे दोन भाग.

(ग) अर्थांगविचार : अर्थघटक, यौगिक अर्थाची निष्पत्ति इत्यादींचा विचार.

(घ) शब्दनिधिविचार : वर्णावली, व्याकरण, आणि अर्थ ह्यांची सांगड शब्दनिधीच्या प्रत्येक नोंदीत पडते (उदा. मामा– नाम पुलिंगी– आईचा भाऊ).

खेरीज भाषेच्या तीन उपांगाचा विचार करायचा–

(ङ) लेखनव्यवस्थाविचार : लिखित चिह्नें आणि त्यांची भाषेच्या मुख्यांगांशी जोडणी ह्यांचा विचार.

(च) वाचिक आविर्भावविचार : कुजबुजणें, लाडीक बोलणें, श्वास सोडणें, चुकचुकणें इत्यादींचा विचार.

(छ) नामकरणविचार : मानवी व्यक्ति, मनुष्येतर प्राणी, मानवी समूह, स्थल, कालखंड इत्यादींच्या विशेषनामांचा विचार.

उपप्रश्न २ : परंतु चिह्न–चिह्नित ह्यांचा अनुबंध नेहमीच यशस्वी होतो असें नाही. जेव्हा तो तसा होत नाही आणि एकमेकांचें बोलणें-लिहिणें समजत नाही तें का समजत नाही? मानवी समाजात ज्या अनेक भाषा होत्या, आहेत, आणि असतील त्यांची काही संगति लागते का?

उत्तर : ह्यासाठी भाषांची तुलना करायला पाहिजे– विशेषतः त्यांच्या व्यवस्थेतील नियमांची तुलना, सिद्ध वाक्यबंधांची तुलना, त्यांच्या घटकांची तुलना. अशा तौलनिक भाषाविज्ञानाचें लक्ष्य म्हणजे भाषाभेद कसकसे उपस्थित झाले त्याचा विचार किंवा दोन भाषांमध्ये भेद पडतो तरी कोणकोणत्या प्रकारें ह्याचा विचार. ह्यातून दोन उप–उपप्रश्न निघतात.

उपप्रश्न २.१ : एका भाषेची– तिच्यातल्या घटकांची, नियमांची– एका भाषिक समूहातून दुसऱ्या भाषिक समूहात पुनर्निर्मिति कशी होते? विशेषतः एका सामाजिक पिढीतून दुसऱ्या सामाजिक पिढीत?

उत्तर : ही तौलनिक भाषाविज्ञानाची ऐतिहासिक उपशाखा. तीन पायऱ्यांनी ह्या प्रश्नाचें उत्तर ती देते. पहिली पायरी म्हणजे एका भाषेतील घटक, नियम आणि दुसऱ्या भाषेतील घटक, नियम ह्यांमध्ये ऐतिहासिक साम्य किंवा व्युत्पत्तिसाम्य शोधणें. ही साम्यें एका भाषेपासून दुसरी भाषा निघाली, किंवा एका भाषेचा दुसरी-वर प्रभाव पडला असें सुचवतात. (एखाद्या प्राणिवैज्ञानिकाने चतुष्पाद प्राण्याचा पुढचा पाय, पक्षाचा किंवा वाघळाचा पंख, आणि माणसाचा हात ह्यांना त्यांच्या-मधील रूपभेद आणि कार्यभेद डावलून एकाच ऐतिहासिक माळेत गुंफावें किंवा एखाद्या सांस्कृतिक इतिहासकाराने एका हिंदू चालीरीतीच्या माग बौद्धांपर्यंत किंवा ग्रीकांपर्यंत काढावा तशातलाच हा प्रकार आहे.) दुसरी पायरी म्हणजे भाषाभाषां-मधल्या नात्यांचा शोध घेणें— एकीतून दुसरी निघताना टिकतें काय, नवें कसें येतें, आलेलें पसरतें कसें; दोघी तिसरीपासून निघताना भाषाविघटनातून भाषाकुलें कशीं उद्भवतात (उदाहरणार्थ द्राविड भाषाकुल); भाषांच्या एकमेकींवर सातत्याने पडणाऱ्या प्रभावापासून भाषाक्षेत्रें कशीं उद्भवतात (उदा. दक्षिण एशिया भाषाक्षेत्र). तिसरी पायरी म्हणजे एका बाजूला भाषाकुलें, भाषाक्षेत्रें आणि दुसऱ्या बाजूला बदलते –फिरते मानवसमूह ह्यांच्यामधील संबंधांचा शोध घेणें. भाषा टिकून राहतात, त्यांचा संपर्क येतो, त्यांच्या स्पर्धेत एक भाषा विसरून तिची जागा दुसरी घेते असें एक गतिमान भाषाजालच तयार होतें. (भाषिक लोक मरून गेले म्हणून त्यांची भाषा

लयाला गेली असें क्वचित् होतें; पण जास्त करून एका भाषेची जागा दुसरीने घेतली, तिचें विघटन होऊन अनेक भाषांचें कुल आलें, किंवा तिच्यात एकीतून दुसरी निराळी भाषा निघाली असें वाटावें इतकें परिवर्तन झालें अशापैकी स्थिति असते.)

उपप्रश्न २. २ : एका भाषेतील वाक्यबंध, वाक्य, किंवा वाक्यखंड दुसऱ्या भाषेत पुनर्निर्मित कसा होतो ? तो होताना एका भाषेतले घटक आणि नियम आणि दुसऱ्या भाषेतले घटक आणि नियम ह्यांची जुळणी कशी होते ?

उत्तर : ही तौलनिक भाषाविज्ञानाची भाषांतरीय उपशाखा. हिची पहिली पायरी म्हणजे दोन भाषांतील घटक, नियम ह्यांची त्यांच्याबद्दलचा व्युत्पत्तिविचार बाजूला ठेवून केवळ कार्यलक्ष्मी तुल्यबलता ठरवणें. (उदा. मराठी भाऊ म्हणजे कन्नड अण्णा (थोरला) किंवा अप्पा (धाकटा); मराठी खाऊन टाक म्हणजे इंग्लिश ईट् अप्; इंग्लिश र्, ल् म्हणजे चिनी ल्—ह्यामुळे इंग्लिश बोलतांना चिनी लोक इंग्लिश र् चें 'भाषांतर' ल् असें करतात !) दुसरी पायरी म्हणजे अशा तुल्यबलतेच्या समीकरणांच्या आधारे सर्व भाषांना लागू पडणारीं लक्षणें आणि भाषावैविध्यजनक अशीं लक्षणें वेगळीं करणें. (उदा. सर्व भाषांमध्ये वाक्याला सुरावट असते, आरोह-अवरोह असतो, परंतु चिनी, पंजाबी ह्यांसारख्या काहीच भाषांमध्ये एका शब्दापासून दुसरा शब्द वेगळा काढणारी सुरावट असते.) ज्याप्रमाजे भाषांची इतिहासनिरपेक्ष तुलना करता येते त्याप्रमाणे निरनिराळ्या भाषिक परंपरांची तुलना किंवा निरनिराळ्या भाषिक प्रभावक्षेत्रांची तुलना करणें शक्य आहे. तिसरी पायरी म्हणजे निरनिराळ्या भाषाविश्लेषणांच्या किंवा निरनिराळ्या भाषेतिहासांच्या पलीकडे जाऊन एक भाषेची सामान्य उपपत्ति बसवणें. ही भाषाविज्ञानाची सांगता ठरते.

भारतात पाणिनीच्या काळी आणि नंतर भाषाविश्लेषणाचा विचार दिसतो. प्राकृत भाषांच्या व्याकरणात व्युत्पत्तिसाम्यें शोधण्याचा प्रयत्न दिसतो, पण भाषेतिहासाचा साकल्याने विचार दिसत नाही. पश्चिमेकडे प्राचीन ग्रीकांनी भाषाविश्लेषण केलें, परंतु नंतर तें तत्त्वज्ञानात गुरफटलें गेलें. विल्यम जोन्जला १८ व्या शतकात संस्कृत, ग्रीक, लॅटिन ह्या स्थलकालदृष्ट्या दूरच्या भाषांमध्ये कुलसाम्य जाणवलें आणि ह्या भाषा सजात आहेत असें म्हणावेंसें वाटलें तेव्हा आधुनिक ऐतिहासिक तौलनिक भाषाविज्ञानाचा पाया पश्चिमेत घातला गेला. आधुनिक विश्लेषक भाषाविज्ञानाचा पाया विसाव्या शतकाच्या सुरवातीला जिनीव्हाच्या फेर्दिनां द सोस्यूरने घातला. (कंपॅरेटिव्ह फिलॉलजी जाऊन लिंग्विस्टिक्स आलें) भाषांतरीय तौलनिक भाषाविज्ञानाचे प्रयत्न १९ व्या शतकात दिसतात. पण त्याला नव्याने चालना आणि सूक्ष्मता एडवर्ड सपीरने विसाव्या शतकातच दिली, आणि सामान्य भाषालक्षणांचा निकराने विचार असा नोअम चॉम्स्कीने मांडला. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचें लोण भारतात

वै.....२

भांडारकरांच्या पिढीला पोचलें. सुनीतिकुमार चाटार्जींनी तें काम पूर्ण केलें. आधुनिक भाषाविश्लेषणाचें लोण पोचायला १९५४ साल उजाडलें—त्या सालीं भाषावैज्ञानिकांची पहिली प्राच्यविद्यापरिषदेपासून स्वतंत्र परिषद् भरली आणि डेकन कॉलेजमधील रॉकफेलर प्रतिष्ठानाच्या पुरस्काराने झालेल्या भाषाभ्यास प्रकल्पाची (१९५४–५९) सुरवात झाली. त्या वेळी फक्त कलकत्ता विद्यापीठात स्वतंत्र भाषाविज्ञान-विभाग होता, बाकी ठिकाणचें काम तुटपुंज्या स्वरूपात आणि तेही विशिष्ट भाषा आणि साहित्य ह्यांना वाहिलेल्या विभागातून चाले. आज सुमारे वीस ठिकाणी स्वतंत्र विभाग आहेत; मराठी, संस्कृत, इंग्लिश, जर्मन इत्यादि भाषासाहित्य-विभाग मात्र जास्त करून अस्पर्शितच राहिले आहेत. केंद्रीय अंग्रेजी और विदेशी भाषा संस्थान (हैदराबाद), केंद्रीय हिंदी संस्थान (आगरा), आणि केंद्रीय भारतीय भाषा संस्थान (मैसूर) ह्या बाबतीत प्रयत्नशील आहेत ही समाधानाची गोष्ट.

भाषेच्या अनुवर्ती अध्ययनाकडे वळलें तर प्राचीन भारतात नैयायिक (विशेषतः शाब्दबोधी), मीमांसक, साहित्यशास्त्री, आणि भर्तृहरीसारखे भाषातत्त्वज्ञ ह्यांचा उल्लेख करता येईल. टीकाकार (आज ज्यांना आपण वाङ्मयसंशोधक म्हणू) ह्यांनीही भाषेचा विचार केला आहे. पश्चिमेकडेही तत्त्वज्ञ, तर्कज्ञ, साहित्यमीमांसक (पोएटिक्स्चे अभ्यासक), साहित्यसमीक्षक, आणि वाङ्मयसंशोधक (फिलॉलजीचे अभ्यासक) ह्यांच्या भाषाविचाराचा उल्लेख करता येईल. आधुनिक विश्लेषक भाषाविज्ञानाच्या वाढीस संस्कृतिवैज्ञानिकांचा (कल्चरल अँथ्रोपॉलजीचे अभ्यासक) मोठाच हातभार लागला आहे. त्या मानाने मनोवैज्ञानिक, समाजवैज्ञानिक, जीव-वज्ञानिक, आणि गणितज्ञ भाषेच्या प्रांतात अलीकडेच आले आहेत—अर्थात् पश्चिमे-कडे, भारतात काही गणितज्ञ सोडले तर अजून ह्या सर्व क्षेत्रात सामसूम आहे.

भाषाशिक्षणासाठी भाषाविज्ञानाचा उपयोग होऊ शकेल ही कल्पना विसाव्या शतकाच्या सुरवातीला मांडली गेली, पण दृश्य परिणाम दिसायला दुसऱ्या महायुद्धा-पासूनच सुरवात झाली. भारतात ही सर्व वार्ता आताच पोचते आहे. भाषिक व्यवहारातील तांत्रिक व यांत्रिक प्रश्नांच्या बाबतीत आणि भाषिक धोरण आणि योजनाबद्ध विकास ह्या बाबतीत भाषावैज्ञानिक उपयुक्त सल्ला देऊ शकतील ही कल्पनाही नवीन आहे.

भाषावैज्ञानिक संशोधनपद्धतीचीं सामान्य तत्त्वें

भाषाविज्ञान क्षेत्रात औपपत्तिक आणि उपयोजित असें दोन्ही प्रकारचें संशोधन होऊ शकेल. संशोधनपद्धतींचा विचार करताना संशोधनाच्या पाच अवस्था कल्पिता येतील—

(१) निरीक्षण (पाहणी) –सुट्या घटनांची नोंद घेणें, जरूर तर प्रयोग करणें,

सामग्री निवडून घेणें (हे सर्व करण्यासाठी क्षेत्रीय पाहणी, प्रयोगशाळा, ग्रंथांचा धांडोळा ह्यांचा अंगीकार करावा लागतो).

(२) समाकलन (जुळणी) –भाषाविश्लेषण करताना चिह्नांचे अनुबंध लक्ष्यात येणें, भाषेतिहास शोधतांना व्युत्पत्तिसाम्यें लक्ष्यात येणें, आणि भाषांतरीय तुलना करताना तुल्यबलता लक्ष्यात येणें ही पहिली पायरी आहे.

(३) उपपादन आणि उपन्यास (पकड आणि मांडणी) –समाकलनाचें क्षेत्र अतिशय मर्यादित असेल (उदा. वर्तमान मराठीमधले '-ऊन टाक-'चे प्रयोग) किंवा कमी-अधिक विस्तृत असेल (उदा. मराठी आणि प्राकृत ह्यांचे ऐतिहासिक संबंध). त्या क्षेत्राला व्यापणारा आणि जुळवलेल्या सामग्रीला न्याय देणारा आकृतिबंध शोधणें, नियम बसवणें, उपपत्ति किंवा सिद्धांत प्रस्थापित करणें हें त्याच्या पुढचें काम. पण हें करताकरताच हाती आलेल्या तथ्याची रेखीव मांडणी करावी लागते जेणेंकरून पुढचें काम सोपें होईल.

(४) निकषांकन आणि परिष्करण (जोखणी आणि फेरमांडणी) –मांडलेली उपपत्ति मान्य निकषांवर तपासून घेणें, तिला साधक वा बाधक पुरावा गोळा करून त्याची छाननी करणें, आणि जरूर तर ती उपपत्ति सोडून देणें किंवा तिच्यात फेरफार करणें, हेंच तें पुढचें काम. पुष्कळदा दोन किंवा अधिक उपपत्ति समोर आल्या असताना त्यांची सापेक्ष ग्राह्याग्राह्यता ठरवणें एवढ्यावरच समाधान मानावें लागतें. नव्याने मान्य झालेल्या उपपत्तींमधून नवे निकष हाती येतात.

(५) संग्रह (साठवणी) –ही काही संशोधनाची निराळी अवस्था अशी नाही. तर पहिल्या चारी अवस्थांमध्ये करावें लागणारें काम आहे. कार्डांवर सूची करणें, क्षेत्रीय नोंदी किंवा ध्वनिमुद्रणें गोळा करून अभ्यासाला उपलब्ध करणें, गणकयंत्रावर सामग्री किंवा उपपत्ति साठवणें हीं सर्व ह्याच सदरात मोडणारीं कामें आहेत. संग्रह म्हणजे नुसतें गोळा करणें नव्हे तर साठ्यापैकी पाहिजे ती माहिती काढून वापरता येईल ह्या पद्धतीने साठवणी करणें. कोष्टक, अकारविल्हे यादी ह्या काही संग्रहाच्या प्राथमिक क्लृप्त्या.

संशोधनपद्धतीमधल्या ह्या मुख्य क्रियांचा भाषाविज्ञानाच्या संदर्भांत विचार करताना काही गोष्टी ध्यानात येतात. ह्या सर्व क्रियांमध्ये मध्यवर्ती क्रिया म्हणजे उपपादन, एका आकृतिबंधाचा शोध. पण तिच्यासाठी काही निश्चित पद्धत, डोळे मिटून वापरावी अशी यांत्रिक क्लृप्ति सांगणें जवळजवळ अशक्य आहे. संबंधित क्षेत्राशी घनिष्ठ परिचय, मान्य निकषांची आणि उपपत्तींची माहिती, भाषाविज्ञानाच्या संबंधित सिद्धांतावर पकड, आणि प्रतिभेचें किमान देणें एवढ्यांवरच भिस्त ठेवावी लागेल. संशोधनपद्धति म्हणून जिला म्हणायचें ती मुख्यतः पाहणी, जुळणी, साठवणी ह्यांची पद्धत आणि काही अंशाने जोखणी आणि मांडणी ह्यांची

पद्धत. जोखणी आणि मांडणी ह्यांची पद्धत माहीत असणें म्हणजे खरें तर भाषाविज्ञानाच्या सिद्धांतांना आत्मसात् केलेलें असणें. भाषाविज्ञानाच्या उपशाखांत फरक दिसतो. कोणत्याही भाषाव्यवस्थेचीं वाचिक अंग (वर्णादींची व्यवस्था), व्याकरण, कोश, अर्थांग, आणि लेखनव्यवस्था ही अंगें मानली तर वाचिक अंग आणि लेखनव्यवस्था ही अधिक स्थूल, अर्थांग हें अधिक तरल, सूक्ष्म असें म्हणता येईल. हाताळायची सामग्री जेवढी विपुल (उदाहरणार्थ कोशासाठी आणि अनेक भाषांच्या तुलनेसाठी गोळा केलेली सामग्री) तेवढी यांत्रिक क्लृप्त्यांची गरज अधिक. ऐतिहासिक तुलना आणि भाषांतरीय तुलना ह्यांमध्ये अनुक्रमे पहिल्या पायरीकडून तिसऱ्या पायरीकडे जाताना सामग्रीचा आवाका आणि पकडीची ताकद अधिकाधिक लागते.

आता आपण भाषावैज्ञानिक संशोधनपद्धतींचा आढावा घेऊ. अधिक तपशिलासाठी शेवटी दिलेल्या संदर्भसूचीमधील ग्रंथ आणि लेख ह्यांची कास धरावी लागेल.

क्षेत्रीय पाहणी आणि भाषासर्वेक्षण

भाषाविश्लेषणासाठी विशिष्ट स्थळ, सामाजिक स्तर, आणि कालखंड ह्यांनी मर्यादित झालेला एकजिनसी भाषाप्रकार निवडून घ्यावा लागतो आणि त्याचे मौखिक किंवा लिखित, त्रुटित किंवा सलग नमुने गोळा करावे लागतात. मौखिक नमुने मिळण्यासाठी क्षेत्रीय पाहणी हा एक राजमार्ग आहे. विशिष्ट बोलीचा अभ्यास करायचा तर क्षेत्रीय पाहणीशिवाय गत्यंतर नाही. मग ती बोली प्रमाण–बोली असो, प्रमाणेतर–बोली असो, किंवा ज्या भाषेवर प्रमाणीभवनाचा संस्कार झालेला नाही अशी एखादी आदिवासी बोली असो. (उदाहरणार्थ पन्नाशीच्या पुढच्या उच्चवर्णीय निरक्षर किंवा अर्धसाक्षर स्त्रियांची प्रमाण मराठी, किंवा गोदाखोऱ्यामधल्या ग्रामीण अस्पृष्ट समाजाची मराठी, किंवा यवतमाळ जिल्ह्यातल्या कोलामांची बोली–विसाव्या शतकाचा उत्तरार्ध हा कालखंड तीनही ठिकाणी गृहीत धरला आहे.)

क्षेत्रीय पाहणी करायची म्हणजे गावोगावी फिरावें लागतेंच अशातला भाग नाही. एक किंवा अधिक मोजक्याच व्यक्तींची दीर्घ मुलाखत, अनेक व्यक्तींच्या छोट्या मुलाखती (विशेषतः एकाच प्रश्नावलीला धरून), आणि त्या विशिष्ट भाषिक समूहात मिळून–मिसळून राहून सहभागी निरीक्षण करणें हे तीन पर्याय क्षेत्रीय पाहणीत कमीअधिक प्रमाणात अवलंबावे लागतात. तिसरा पर्याय अधिक अनौपचारिक आहे, अधिक अवघडही आहे. निरीक्षकाची स्वतःची बोली आणि अभ्यासाची बोली एकच असल्या तर सहभागी निरीक्षणच करावें लागतें, पण ते पुरेशा तटस्थपणें करावें लागतें. त्या एकमेकीला जवळच्या बोली असल्या तर निरीक्षकाच्या बोलीचा अध्येय बोलीवर परिणाम होत नाही ना ('हां साहेब तुम्ही बोलता तसंच आम्ही म्हणतो!' किंवा 'साहेबांच्या समोर जरा नीट बोलून दाखवावं!') ह्याची खबरदारी घ्यावी

लागते. त्या अजिबात वेगळया असल्या तर निरीक्षकाला अध्येय बोली प्रथम प्रयत्नपूर्वक आत्मसात् करावी लागते. मुलाखत घ्यायची तर काहीसा औपचारिकपणा येणारच. मुलाखतीला बहुधा प्रश्नावलीचा आधार असतो.' ही प्रश्नावली काही जण मनात किंवा खिशातच वागवतात, काहींना ती समोर धरावी लागते. सलग नमुना पाहिजे असेल तर मोघम प्रश्न पुरेसा असतो – उदाहरणार्थ 'ती कालची गोष्ट पुन्हा एकदा सांगा' किंवा 'पोहे कसे बनवतात तें एकदा सविस्तर सांगा बरं' किंवा 'चालू दे तुमचं सौदा पटवण्याचं बोलणं, मी आपला ऐकत बसतो.' लोककथा आणि लोकगीतें ह्यांमध्ये रोजच्या वापरात नसलेले परकी किंवा जुनाट प्रयोग असण्याचा संभव आहे ही जाणीव ठेवावी. लेखन आणि भाषण ह्यांमधील फरकाचेंही काही वेळा भान ठेवावें लागतें. मौखिक नमुना मिळण्याऐवजी लेखनाची मौखिक नक्कल मिळण्याचा धोका टाळावा लागतो (उदा० 'करायचा' ऐवजी 'करावयाचा', 'अन' ऐवजी 'व', 'माल् नई ठऊक' ऐवजी 'मला ठाऊक नाही'). काही कामासाठी सलग नमुन्याऐवजी त्रुटित नमुने मिळवणें पुरेसें किंवा सोयीचें असतें. उदाहरणार्थ विशिष्ट नामाचें लिंग शोधायचें तर सबंध गोष्ट पालथी घालण्यापेक्षा "'त्यानी दुकान बंद केला / केली / केलं' ह्यापैकी तुम्ही कोणतं म्हणता?" असें विचारून मोकळें होणें पुरेसें आणि सोपें. (मात्र "तुम्ही दुकान शब्द कोणत्या लिंगी वापरता?" असें विचारणें म्हणजे भाषिक विश्लेषणाची जबाबदारी तुम्ही अध्येय वक्त्यावरच सोपवली असें होईल!) त्रुटित नमुना म्हणजे सुटा शब्द, वाक्यखंड, वाक्य, किंवा एकदोन वाक्यांचा वाक्यबंध (उदाहरणार्थ प्रश्न आणि त्याचें उत्तर) ह्यापैकी काहीही असू शकेल.

भाषेचा मौखिक नमुना ज्याच्याकडून मिळवायचा त्याला आपण भाषासूचक म्हणू. पहिली गोष्ट म्हणजे तो अध्येय बोलीच बोलतो ह्याची खात्री करून घ्यावी (उदाहरणार्थ ग्रामीण प्रमाणेतर बोली घेतली तर पुरुषापेक्षा बाईमाणूस चांगलें, साक्षरापेक्षा निरक्षर चांगला, वयस्क अधिक बरा). दुसरी म्हणजे एकापेक्षा अधिक सूचक निवडायचे तर ते त्या समाजातील सर्व गटांचे प्रतिनिधित्व करणारे असावे (उदाहरणार्थ भिन्न लिंगी, भिन्न वयोमानाचे, भिन्न उपजीविका करणारे). तिसरी म्हणजे त्यात भाषिक व्यंग नसावे (उदाहरणार्थ दंतविहीनता, तोतरेपणा, बहिरेपणा, कमालीचा मुखदुर्बळपणा). हा सूचक अगोदर सांगितल्याप्रमाणे आपल्यासाठी भाषाविश्लेषण करू शकत नाही, पण पुढील प्रश्नांचीं उत्तरें देऊ शकतो : (१) अमूक प्रसंगी, अमूक अर्थानें, कोणतें रूप, पद, वाक्य वापरायचें? (२) अमूक रूप, पद, वाक्य कोणत्या अर्थानें, कोणत्या प्रसंगी वापरायचें? (३) अमूक प्रसंगी, अमूक अर्थानें अमूक रूप, पद, वाक्य (उदा० तो गेला / गेलेला असतो) वापरलें तर 'चालेल' का? (४) अमूक एक रूप, पद, वाक्य (उदा० 'मला तुला सांगायचं आहे') संदर्भ माहीत नसला तर अनेकार्थी ठरेल का एकार्थी ठरेल? (५) अमूक

दोन रूपें, पदें, वाक्यें (उदा० ' मांजरानं उंदराला पकडलं ' किंवा ' मांजरानं उंदीर पकडला ') काटेकोरपणें वापरलीं तर समानार्थी ठरतील का भिन्नार्थी ठरतील ? (भाषांतरीय तुलनेसाठी नमुने गोळा करतांना हे दोन नमुने भिन्नभाषीय असणार – ' खाऊन टाक ' आणि इंग्लिश ' ईट् अप् ' एकच का ?)

मिळालेल्या नमुन्याची नोंद तीन पातळीवर करावी लागेल – (१) उच्चाराची नोंद, (२) अर्थांगाची नोंद, (३) अवांतर नोंदी. टेपरेकॉर्डर हें उपयुक्त साधन आहे, विशेषतः तोच उच्चार आपण नंतर सावकाशीने आणि पुनः पुनः जशाच्या तसा ऐकू शकतो ह्यासाठी. मात्र टेपरेकॉर्डर कितीही उंची, हाय–फायडेलिटी असला तरी प्रत्यक्ष ऐकण्याइतकें हाय-फायडेलिटी दुसरें काहीच नसतें हें ध्यानात घेतलेलें बरें. मुख्य म्हणजे मागाहून का होईना नोंद ही निरीक्षकालाच करावी लागते ! ही नोंद करण्यासाठी एक चिह्न एक उच्चार ह्या तत्त्वावर आधारलेली श्रवणप्रत्ययी स्वनलिपि वापरावी हें बरें – विशेषतः वाचिक अंगाचें विश्लेषण करण्यासाठी. अर्थाची नोंद निरनिराळ्या प्रकारे करता येईल – उदा० चाफा म्हणजे ' पुष्पविशेष ', किंवा ' Michelia campaka Linn. ' नसून ' Plumeria acutifolia Poir. ' पुतणसून म्हणजे ' पुतण्याची बायको ' किंवा ' (पुरुषाच्या) भावाच्या मुलाची बायको, (बाईच्या) नवऱ्याच्या भावाच्या मुलाची बायको '. ' yes ' म्हणजे ' तुझ्या प्रश्नाचें उत्तर अस्तिपक्षी आहे, तू म्हणतोस तसेंच, मी म्हणतो तसेंच, तुझी आज्ञा पाळली जाईल, हा मी इथे आहे, पुढे काय ? ' (ह्यापैकी शेवटल्या दोन अनुवादांबरोबर ' (कोणी बोलावलें तर) ' किंवा ' (प्रश्नार्थी) ' अशी टीप जोडावी लागेल. ' good morning 'चा अर्थ द्यायचा तर अशी काही टीप देणें एवढेंच आपल्या हाती राहील !) अवांतर नोंदींमध्ये मागे सांगितलेल्या (३), (४), (५) ह्या प्रश्नांचीं उत्तरें जशीं येतील (उदा० ' चालणार नाही ', ' दोन अर्थ होतात – एक अमूक, दुसरा तमूक ') तशीच इतर निरीक्षणें येतील (उदा० ' ष्रष्प 'साठी प्रतिशब्द देतांना सूचक हसला, किंवा लाजला, किंवा त्याने नकार दिला, किंवा आपण हा शब्द अर्थ माहीत नसताच वापरतो अशी कबुली दिली).

भाषिक विश्लेषणाप्रमाणे क्षेत्रीय पाहणीचा उपयोग आणखी एका ठिकाणी होईल तो म्हणजे ऐतिहासिक तुलनेची पहिली पायरी म्हणून व्युत्पत्तिसाम्यें शोधताना. निर-निराळ्या बोलींची तुलना करायची आहे तर प्रत्येक बोलीचें संपूर्ण विश्लेषण आणि कोशरचना प्रथम हाती घ्यायची असें करण्याची आवश्यकता नाही. कोणत्या प्रकारचीं साम्यें किंवा वैषम्यें हाती लागतील ह्याचा अंदाज घेता आला तर त्या अनुरोधाने किंवा तसा अंदाज नसला तर सामान्य ठोकताळ्याने एक प्रश्नावली तयार करायची (उदा० तुम्ही अमक्याला काय म्हणता ? किंवा अमूक ठिकाणी तमूक म्हणता का तमूक ?) ह्या प्रश्नावलीच्या उत्तरांवरुन आपल्याला भाषालक्षणें कोणतीं हजर आहेत

वा नाहीत हें कळेल.

भाषेच्या लक्षणांबरोबर भाषिकांची आणि भाषाव्यापाराचीं लक्षणें कोणतीं ह्याचा शोध घ्यावा लागेल. त्यासाठी सुद्धा एक प्रश्नावली तयार करावी लागेल (उदा० कोणत्या जिल्ह्यात वस्ती, नदीच्या कोणत्या तीरावर, स्थायिक, उपरा, की भटक्या, कोणत्या पिढीचा, कोणत्या लिंगाचा, कोणत्या जातीचा, साक्षर की निरक्षर; भाषा-व्यापार घरगुती, बाजारहाटचा, का औपचारिक प्रसंगीचा).

भाषिक सर्वेक्षण ही एक प्रकारची खानेसुमारी आहे. कोणत्या प्रकारच्या भाषिकां-मध्ये कोणत्या प्रकारच्या भाषाव्यापारात कोणतीं भाषिक लक्षणें (उच्चाराच्या लकबा, व्याकरणिक लकबा, शब्दसंग्रह) किती प्रमाणात हजर आहेत (बहुप्रचलित, अल्प-प्रचलित; संपूर्ण अभाव, ठळकपणे, ओझरतीं) ह्या प्रश्नाचें उत्तर ही खानेसुमारी देत असते.

क्षेत्रीय पाहणी कधीकधी विशिष्ट लक्षणाच्या भाषिकांपुरती मर्यादित केली जाते (उदा० फक्त लहान मुलें, मराठी भाषिकांच्या तोंडचें हिंदी).

प्रायोगिक पाहणी

कोणत्याही क्षेत्रीय पाहणीत कृत्रिमतेचा, औपचारिकतेचा काही भाग असतोच आणि तो कमी करण्याची धडपड निरीक्षक करीत असतो. उदाहरणार्थ लोक नित्याचे व्यवहार करीत असताना एका बाजूला बसून टिपणवही भरून काढायची किंवा टेप-रेकॉर्डर चालू ठेवायचा ह्यात कृत्रिमतेचा धोका कमी असला तरी आपल्या बोलण्याची नोंद होते आहे ह्याची सूचकांना सवय झाली आहे ही खबरदारी घ्यावी लागतेच. दुसरी अडचण म्हणजे कृत्रिमतेचा धोका कमी केला तर ज्या गोष्टींचे समाकलन करायचें त्या मिळालेल्या नमुन्यात हजर असतील ह्याची शाश्वती नाही. (उदा० दुकान शब्द येईल, पण त्याचें लिंग स्पष्ट होणार नाही.) ही शाश्वती मिळावी म्हणून प्रश्नावली आणली आणि काही कृत्रिमता डोळे उघडून पत्करली. अशी डोळस कृत्रि-मता सर्रास अंगीकारणे म्हणजेच प्रायोगिक पाहणीचा अंगीकार करणें.

प्रायोगिक पाहणीचा उपयोग भाषेच्या अभ्यासात पुढील क्षेत्रात होतो.

(१) भाषेच्या मौखिक चिह्नांना एक भाषाबाह्य भौतिक अंग असतें : विशिष्ट उच्चारणप्रयत्नांमुळे विशिष्ट जातीच्या ध्वनिलहरी उत्पन्न होऊन विशिष्ट जातीचे श्रवण-संस्कार होतात आणि एवंगुणविशिष्ट शारीरिक–भौतिकीय–मानसिक घटना विशिष्ट भाषाप्रकाराच्या रचनाव्यवस्थेत विशिष्ट स्थान मिळवून असते. उच्चारणप्रयत्न, ध्वनि-लहरी, आणि मज्जाव्यापार ह्यांचें निरीक्षण करण्यासाठी निरनिराळी प्रायोगिक साधनें आज उपलब्ध आहेत. उदा० ओठांच्या हालचाली सिनेकॅमेरा वापरून टिपता येतील, ध्वनिलहरींची बदलती कंपनसंख्या इलेक्ट्रॉनिक साधनांनी नोंदवता येईल. ह्या घटनांचें

स्वनव्यवस्थेत चिह्न म्हणून स्थान काय हें अजमावण्यासाठी सूचकांची मदत घ्यावी लागते. एका बाजूला सूचकांचा निर्णय (उदा० ‘ बाद ’ ऐकू आलें का ‘ बाध ’ ?) आणि दुसऱ्या बाजूला प्रायोगिक साधनांची नोंद ह्यांची तुलना करून नियम बसवता येतात. ह्यात आणखी भर म्हणजे टेपवर मुद्रित झालेल्या उच्चारात फेरफार करता येतात. ते करून मग ती टेप सूचकाला आणि साधनाला ऐकवायची (उदा. ‘ बाध ’ मधला महाप्राण टेपमधून कापून टाकायचा).

(२) प्रायोगिक साधनांची मदत न घेता केवळ टेपरेकॉर्डरचा उपयोग करून देखील काही प्रयोग करता येतात. मनोवैज्ञानिक ज्याप्रमाणे सूचकांचा ताफा बाळगतो आणि बदलत्या चेतकांबद्दल त्यांचे निर्णय अजमावतो त्याचप्रमाणें भाषावैज्ञानिक सुद्धा करतो. (उदा. वाचिक आविर्भावांविषयी शोध घेताना नेमके कोणते फेरफार उच्चारात केल्यावर वक्ता रागावलेला वाटू लागतो असा निर्णय बहुसंख्य सूचकांकडून येतो हें काढता येईल.)

(३) अशा प्रकारच्या प्रायोगिक पाहणीची जोड क्षेत्रीय पाहणीलाही देता येईल. उदाहरणार्थ दोन बोली एकमेकीपासून किती जवळ किंवा दूर आहेत किंवा मराठी माणसाच्या तोंडचें इंग्लिश हें इंग्लिश किंवा अमेरिकन माणसाला कितपत समजतें ह्याचा अंदाज एक सलग टेप केलेला नमुना संबंधित सूचकांना ऐकवून त्यांची समज अजमावता येईल. गोव्याच्या सारस्वतांची बोली मालवणची किंवा रत्नागिरीची बोली बोलणारांना अमूक टक्के समजते अशासारखा निर्णय ह्यासारख्या प्रयोगांतून निघेल. लहान मुलाची भाषेची जाण कसकशी वाढत जाते ह्याचे मापन करण्यासाठी निरनिराळे प्रयोग बसवता येतील.

हस्तलिखित आणि मुद्रित साधनांची पाहणी

हस्तलिखित साधनें म्हटल्यावर जुनाट पोथ्याच डोळ्यासमोर येतात. परंतु भाषा-वैज्ञानिकाला ज्याप्रमाणें जुन्या पोथ्यांमध्ये रस आहे त्याप्रमाणे अर्वाचीन लेखकांची हस्तलिखितें किंवा जुन्यानव्या सार्वजनिक किंवा खाजगी पत्रांमध्येही रस आहे. शिलालेख आणि ताम्रपत्रें ह्यांचेंही त्याला वावडें नाही. मुद्रित साधनांबद्दलची त्याची भूकही दांडगी आहे. गेल्या साठ वर्षांतल्या लग्नमुंजीच्या मुद्रित निमंत्रणपत्रिका किंवा मंगलाष्टकें जरी कुणी जमा करून दिलीं तरी त्याला तीं हवीं आहेत. ललितसाहित्या-बरोबर ललितेतर वाङ्मय आणि वाङ्मयाबरोबर वाङ्मयेतर गद्य (उदाहरणार्थ साखर कारखान्यांचे अहवाल) हेंही त्याला पाहिजे आहे. मात्र अशा सर्व हस्तलिखित आणि मुद्रित साधनांचा उपयोग त्याला डोळसपणे आणि सावधपणे करावा लागतो. उदाहरणार्थ लोकगीतें किंवा लोककथा ह्यांच्या वह्या किंवा छापील पुस्तिका भाषा-वैज्ञानिकासमोर ठेवल्या तर तो प्रथम ती ती लोकसाहित्यकृति कोणत्या प्रदेशात

कोणत्या काळात कोणत्या सामाजिक गटात मिळाली ह्याचा शोध घेईल. कोणी मध्यस्थाने ती 'शुद्ध' करण्याचा अव्यापारेषु व्यापार केलेला नाही ना ह्याची खात्री करून घेईल, आणि त्या कृतीची रचना अगोदरच्या काळातली, शेजारच्या प्रदेशातली, किंवा निराळ्याच सामाजिक गटातली तर नाही ना ह्याचा अंदाज घेईल. मागे भाषासर्वेक्षणाचा विचार करतांना भाषेच्या लक्षणांबरोबर भाषिकांची लक्षणेंही आणि भाष्याव्यापाराची लक्षणेंही पहावीं लागतात असें म्हटलें आहे तें मौखिक भाषेइतकेंच लिखित भाषेलाही लागू आहे. लिखित भाषा बारा कोसावर बदलत नसली तरी शंभर सव्वाशे कोसावर तरी बदलतेच की. जो न्याय कोसांना तोच न्याय वर्षांना लागू पडतो. दुसरें म्हणजे लिखित साधन हें लिखित भाषेचाच नमुना असेल असेंही नाहीं. लिखित साधनांमधून बोलभाषेचे, निदान बोलभाषेला खूपच जवळ असलेले नमुने मिळण्याचें भाग्य भाषेच्या अभ्यासकाला कधीकधी लाभतें. महानुभावांचें गद्य, नाना फडणिसांचें किंवा गोडसेभटजींचें आत्मचरित्र, मिशनऱ्यांनी छापलेले संवाद ह्या किंवा अशा साधनांचा ह्या दृष्टीने विचार अवश्य करता येईल.

भाषाविश्लेषण आणि भाषेतिहास ह्या दोन्ही प्रकारच्या अध्ययनासाठी मौखिक साधनांबरोबर लिखित साधनांचा उपयोग होईल, मात्र ह्या दोन्ही प्रकारच्या साधनांची गल्लत करता कामा नये, निरनिराळ्या स्थलविशिष्ट, कालविशिष्ट, समूहविशिष्ट, आणि भाषाव्यापारविशिष्ट नमुन्यांचा विचार स्वतंत्र किंवा तौलनिक करता येईल, मात्र तुलना म्हणजे भेसळ नव्हे.

लिखित साधनांच्या दोन ठळक मर्यादा मात्र आहेत त्यांचाही येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ('लिखित' शब्दामध्ये 'उत्कीर्ण' किंवा 'मुद्रित' ह्यांचाही समावेश आपण सध्या करू.) पहिली मर्यादा लेखनाचे आणि भाषणाचे जे विशिष्ट संबंध आहेत त्यातून निघते. जीं लिपिचिह्नें मुख्यतः अर्थानुगामी आहेत (उदाहरणार्थ '+', '१९७०', '६') किंवा पदांचीं चिह्नें आहेत (उदाहरणार्थ इंग्लिश '&', चिनी लिपीमधलीं बरीचशीं चिह्नें) त्यांच्यावरून भाषेच्या उच्चारांबद्दल काही अंदाज करण्याची तर गोष्टच नको. पण जीं लिपिचिह्नें मुख्यतः उच्चारानुगामी असतात त्यांच्यावरून भाषेच्या उच्चारांबद्दल अंदाज करतानाही बरीच सावधगिरी बाळगावी लागते. इंग्लिश भाषेत meat आणि meet मधील स्वर एकेकाळी वेगळे होते, आज एकच आहेत. पण हा बदल केव्हा झाला हें लिखित साधनावरून कळणें अवघडच आहे. कधीकधी यमकांवरून पत्ता लागतो—अठराव्या शतकातल्या पोप कवीने obey आणि tea ह्या शब्दांचें यमक जुळवलें आहे. कधी लेखन उच्चाराच्या मागून जातें. 'येथें', 'येथे', 'इथे' 'इथं', 'एथे' असे लेखन-पर्याय सापडतात (पण 'हितं' हा पर्याय सापडत नाही). लेखनातल्या 'चुका' ही पुष्कळ बोलून जातात. (नवसाक्षरांचें किंवा विद्यार्थ्यांचें 'शुद्धलेखन' भाषावैज्ञानिकाच्या जाणत्या

नजरेने ‘ तपासलें ’ पाहिजे.)

मात्र एक गोष्ट खरी की लेखनाचीं बदलतीं वळणें किंवा शुद्धलेखनाचे बदलते संकेत ह्यांचाच जर अभ्यास करायचा तर लिखित नमुन्यांइतकें उत्तम साधन दुसरें कोणतें असणार ? लेखनसौकर्य आणि मुद्रणसौकर्य ह्यांच्याबरोबर वाचनसौकर्याचा जर विचार करायचा झाला तर असे नमुने (उदा. मोडी पत्र) सूचकांसमोर ठेवून काही प्रायोगिक पाहणीही करावी लागेल.

मौखिक नमुने मिळवताना अध्येय वक्त्याला अर्थांगाबद्दल प्रश्न किंवा अवांतर प्रश्न विचारण्याची सोय असते आणि तिचा उपयोग भाषावैज्ञानिक पुरेपूर करून घेतो हें आपण मागेंच पाहिलें. लिखित नमुने मिळवताना ही सोय सहसा नसते. अध्येय लेखक आणि अध्येय लेखनिक ह्या कधी दोन निराळ्या व्यक्ति असतात. त्या किंवा ती व्यक्ति बहुधा हजर नसते. (हजर असली तरी ‘ मी लिहिलें तेव्हा त्याचा अर्थ खुदा आणि मी ह्या दोघांना माहीत होता, आता फक्त खुदाला माहीत ! ’ असें उत्तर एखाद्या लेखनिकाकडून किंवा लेखकाकडून मिळण्याची शक्यता आहे हें नाकारता येत नाही!) अशा अवांतर नोंदी कधीकधी त्या लिखित नमुन्याच्या आधीच्या वाचकांनी समासात करून ठेवलेल्या असतात. (उदा. कठीण शब्दाचा अर्थ लिहिला असला तर तो अर्थ जसा कळतो तसें हा शब्द नंतर प्रचारात राहिला नसावा हीही अटकळ बांधता येते.)

भाषाविश्लेषण : समाकलन, उपपादन, आणि उपन्यास

उपप्रश्न १ चें उत्तर देताना आपण भाषेचीं तीन प्रधान अंगें आणि तीन गौण अंगें ह्यांचा उल्लेख केला. त्यांचा आपण क्रमाने थोडक्यात विचार करू.

स्वनव्यवस्था : एखाद्या एकजिनसी बोलीची स्वनव्यवस्था शोधून काढायची तर ती साधारणतः तीन हप्त्यांनी हस्तगत करावी लागते. पहिल्या हप्त्यासाठी सुमारे १०००–१५०० शब्दांइतका मौखिक ऐवज हाती असावा लागतो. मग ते त्रुटित शब्द किंवा छोटे वाक्यखंड असोत किंवा सलग वाक्यें असोत. त्रुटित नमुने स्वनलिपीत नोंदायला सुरवातीला बरे पडतात. कारण निरीक्षकाच्या कानांना त्या बोलीची अजून सवय झालेली नसते. स्वनलिपीतल्या नोंदीबरोबर अर्थाची ढोबळ तरी नोंद पाहिजे. दोन स्वनावली भिन्नार्थ आहेत का एकार्थ एवढें तरी उमगायला पाहिजे. नाही तर एखादा उच्चारभेद अर्थभेदक आहे की नाही हें कसें कळणार ? अर्थभेदक उच्चार-भेद स्वनगुणांवर आधारलेले असतील (पतञ्जलीचें उदाहरण घ्यायचें तर कूप, तूप, सूप), किंवा स्वनाभावावर आधारलेले असतील (पतञ्जलीचें उदाहरण वृक्ष, ऋक्ष), किंवा स्वनक्रमावर आधारलेले असतील (मराठी उदाहरण फाटक, फाटकं, हिंदी उदाहरण काँइया ‘ लुच्चा ’, काइयाँ ‘ शेवाळीं ’). अर्थात् हीं साम्यें–वैषम्यें जोखताना कान आणि डोळे ह्यांमध्ये चार बोटांचें अंतर आहे हें लक्ष्यात ठेवायला पाहिजे.

उदाहरणार्थ अनेक मराठी भाषिकांच्या तोंडी वृक्ष, ऋक्ष, रुक्ष ह्या तीन्हींचा उच्चार एकच, फाटक आणि फाटकं ह्यामध्ये अंतर फक्त अ स्वरानंतर क् व्यंजन येतें का क् व्यंजनानंतर अ स्वर येतो एवढेंच आहे. विश्लेषणाचा पहिला हप्ता पुरा होईल तेव्हा शब्दसीमेच्या आतली वर्णव्यवस्था बरीच लक्ष्यात येईल. दुसरा हप्ता व्याकरणापैकी पदविन्यास सर्वसाधारणपणें हाती आल्यानंतरच सुरू करता येईल. एकेका लघुतम–रूपाचे स्थानपरत्वें ठरणारे, अर्थभेदक नसलेले पर्याय कसे होतात ह्याची नोंद प्रथम करावी लागते. काही पर्याय अतिशय अनियत असतील (उदा० जाणें आणि 'टु गो' ह्यांचे भूतकाळी प्रत्ययाबरोबरचे आदेश) ते बाजूला काढले तरी बाकीचे काही स्वनप्रक्रियेच्या नियमात बसवता येतात (उदा० राहणें ह्या क्रियापदाचे तू रहा, तुम्ही रहा, तो राहतो, राहून, रहात नाही, रहातना/राहतना ह्या रूपांतील विविध आदेश). तिसरा हप्ता हाती घेण्यासाठी व्याकरणापैकी वाक्यविन्यास थोडाबहुत हस्तगत व्हावा लागतो. शब्दांची म्हणजे वर्णांची जोडणी कशी होते, सुर आणि बल वाक्यस्तरावर कसे खेळवले जातात ह्याचा शोध घ्यायचा तर त्रुटित नमुने पुरत नाहीत. सलग वाक्यें किंवा वाक्यबंध ह्यांचा स्वनलिपीत नोंदलेला संग्रह हाती असावा लागतो. येथेही तत्त्व मागचेंच, म्हणजे उच्चारभेद आणि अर्थभेद ह्यांची सांगड कुठे जुळते, कुठे जुळत नाही हें शोधण्याचें तत्त्वच. 'एक घरच बांधलं' आणि 'चार घरंच बांधली' ह्यामध्ये जोडणीचा, संहितेचा फरक आहे; (घ् अ र् + अ च् विरुद्ध घ् अ र् अ + च्); 'खुर्ची वर आहे' (खाली नाही) आणि 'खुर्चीवर आहे' (टेबलावर नाही) ह्यामध्ये संहितेचा फरक नसून बलस्थानाचा आहे; 'मामा कुठं गेला?' (मुंबईला का?) आणि 'मामा कुठं गेला?' (इथंच तर आहे) ह्यामध्ये फरक बलाचा नसून सुराचा आहे.

व्याकरण (रूपांगव्यवस्था) : लघुतम रूपांपासून पदें कशीं बनतात (पदव्याकरण) आणि पदांपासून पदबंध, वाक्यें, आणि अंती वाक्यबंध कसे बनतात (वाक्यव्याकरण) असे व्याकरणाचे दोन हप्ते मानण्याची पद्धत आहे. ती बऱ्याच भाषांच्या बाबतीत उपयुक्त असते ह्यात शंका नाही. (व्हिएत्नामी भाषेत मुळीच प्रत्यय नाहीत आणि एस्किमो बोलींतून एकाच पदात अर्धा डझन सुद्धा प्रत्यय आढळतात. ह्या दोन्ही ठिकाणी ही विभागणी वेगवेगळ्या प्रकारे विवाद्य ठरेल.) पण ह्या वाटणीचें फाजील स्तोम माजवण्यात हशील नाही. पदाच्या सीमेच्या आत चालणाऱ्या घडामोडीचें स्वरूप वाक्याच्या संदर्भातच ठरतें. (उदा० 'मी गेलो' मधला 'मी' आणि 'मी जावें' मधला 'मी' उच्चारदृष्ट्या नसले तरी व्याकरणदृष्ट्या वेगळे का ठरतात?) उलट वाक्यस्तरावर चालणाऱ्या घडामोडीचें स्वरूप त्यातल्या पदव्यवस्थेशी पुष्कळदा निगडित असतें. (उदा० 'तिचं आईचं प्रेम' आणि 'तिच्या आईचं प्रेम' ह्यांचे अन्वय आणि अर्थ वेगळे ठरतात ते 'चं' आणि 'च्या' मधल्या फरकामुळेच.)

फार तर एवढें म्हणता येईल की पदव्याकरणासाठी सामग्री म्हणून पुष्कळदा त्रुटित वाक्यखंड पुरतात (उदा० 'काळ्या घोड्यांना', 'तांबडा पाषाण', 'तांबडे पाषाण'), वाक्यव्याकरणासाठी मात्र सांगोपांग वाक्यें आवश्यक ठरतात (उदा० कर्ता, कर्म, क्रियापद यथास्थित असल्याशिवाय कर्तरी, कर्मणी, भावे प्रयोगांचा गुंता कसा उलगडावा ?). व्याकरणाची इमारत उभी करताना मौखिक रूपांमधील भेद ('चित्र' हा शब्द काही मराठी भाषिक दोन्ही वचनात सारखाच उच्चारतात, 'एकवीस बैल' आणि 'एक वीस बैल' ह्यामधले 'एक'चें बदलतें व्याकरणिक स्थान उच्चारातल्या संहितेवरून ठरतें), त्या त्या रूपाचें वाक्यातील स्थान आणि विविध स्थानी येण्याची त्याची पात्रता ('खाऊन घे', 'खाऊन टाक', 'बसून घे,' 'बसून टाक', 'उचलून घे', 'उचलून टाक' हे वाक्यखंड तुलून पहावे), आणि मनोगत अर्थांमधला भेद ('तिला सासरचीं सगळींच मंडळी आवडत नाहीत' ह्याचा नेमका अर्थ काय लावायचा ?, 'तीन बायका' आणि 'तीन बाया' ह्यांमध्ये नेमका काय फरक आहे ?) ह्या तीन्ही पातळीवर भाषाविश्लेषकाला आळीपाळीने अवलोकन करावे लागते. एका पातळीला घट्ट चिकटून सोवळेपणाचें श्रेय मिळेल, पण भाषेचें रहस्य, तिचा चिह्नव्यापार उलगडल्याचें समाधान मिळणार नाही. अशी स्थिति असल्यामुळे विश्लेषणाच्या सुरवातीला तरी एकेरी फुटकळ नमुने गोळा करून फारसा फायदा होणार नाही. काळा घोडा, काळे घोडे, काळी घोडी, काळ्या घोड्या, काळें घोडें, काळीं घोडीं हे साही नमुने एका गटाने नजरेसमोर—चुकलो, कानासमोर–हजर असल्याखेरीज नाम, विशेषण यांच्या रूपावलीचें यथार्थ स्वरूप समजणार नाही. 'तो उठतो' आणि 'मी बसत नाही' हीं दोन फुटकळ वाक्यें काय कामाचीं ? 'मी बसतो', 'मी बसतो आहे', 'मी बसत आहे' ह्या सर्वांचा नास्तिपक्ष 'मी बसत नाही' हा एकच आहे हें त्यामुळे कसें कळावें ? सर्वनामें आणि अध्याहार ह्यांचें वास्तव स्वरूप कळायला एक–एक वाक्य किंवा अशा एक–एक वाक्यांचें कोष्टक घेऊनही पुरत नाही. त्यासाठी एकापुढे एक वाक्यें येऊन तयार होणारे वाक्यबंध तपासावे लागतात. (उदा० 'मला तीन पुऱ्या. तुला किती ?', 'माझे तीन आपटबार. तुझे किती ?')

अर्थांगव्यवस्था : अर्थांगव्यवस्थेचेही शब्दशक्ति आणि वाक्यशक्ति असे दोन हप्ते कल्पिता येतील. व्याकरणाच्या दोन भागांबद्दल वर जें म्हटलें आहे तें ह्या दोन भागांनाही लागू आहे. अर्थांगव्यवस्थेसाठी सामग्री मिळवणें आणि जुळवणें हें अवघड काम आहे. शब्दाचा प्राथमिक अर्थ (गुजरातीत 'चोटली' म्हणजे शेंडीच, दुसरें काही नाही. आणि वाक्याचा प्राथमिक अर्थ ('नदी समुद्राला मिळाली' असेंच ना ? 'समुद्र नदीला मिळाला' असें नाही ना ?) ह्याबद्दल सूचकाला सरळ विचारता येतें. (लिखित मजकुराच्या पाहणीत तर तीही सोय नाही.) पण प्राथमिक अर्थाला

येणारे बारकावे, लक्षणेची किनार, आणि व्यंजनेचे अरण्य ह्यांचें काय विचारावें ! अशा ठिकाणी सूचकाला विचारण्यात पुष्कळदा निराशा पदरी येईल ('काही लक्ष्यात येत नाहीं बुवा ! पण काहीतरी भेद आहे हें नक्की'—एवढेंही खूप झालें !) ह्या ठिकाणी संदर्भाचा समुद्र ओलांडायची तयारी पाहिजे. मग हा संदर्भ आजूबाजूच्या वाक्यांचा किंवा पदांचा असेल ('खुर्ची वर आहे' चे संदर्भ आपण आताच पाहिले), किंवा वक्ता—श्रोता ह्यांना वेढणाऱ्या प्राप्तपरिस्थितीचा असेल ('वेळ झाली' आणि 'वेळ झाला' ह्याचे संदर्भ तुळून पहावे), किंवा वाचिक आणि कायिक आविर्भावांचा असेल (डोळे मिचकावून 'भारतीय क्रिकेटची शान किती मोठी!' असें म्हणणें, 'तो अलीकडे अगदी असा असा झाला आहे' म्हणतांना तर्जनी डोलावणें, अमूक शब्दाचा अर्थ सांगताना सूचकाला हसू आलें ही अवांतर नोंद). हा संदर्भाचा शोध घ्यायचा तर एक तर दीर्घ उतारे गोळा करायला पाहिजेत किंवा सहभागी निरीक्षणाची कास धरायला पाहिजे किंवा (खरें तर) दोन्ही गोष्टी करायला पाहिजेत !

लेखनव्यवस्था : लेखनव्यवस्थेचा अभ्यास दोन पातळीवर करता येईल. एक, लिपीच्या पातळीवर (उदाहरणार्थ रेफाचे देवनारीत र, ॢ, ॅ, ॖ, ॗ इतके पर्याय आहेत, संक्षेपानंतर कधी टिंब दिसतें तर कधी पोकळ शून्य—ता. क. किंवा ता० क०). दोन, ह्या लिपीचें वाचन कसें होतें ह्या पातळीवर (उदाहरणार्थ न्य, र्य; न्ह, र्ह ह्या जोड्या). लेखनव्यवस्था अर्थानुगामी कितपत आहे, रूपानुगामी कितपत आहे, आणि उच्चारानुगामी कितपत आहे, वर्तमान अवस्थेतल्या भाषेला कितपत मान देते आणि व्युत्पत्तिसाम्यांची बूज कितपत ठेवते हें सर्व ह्या वरच्या पातळीवर ठरते. लिपीच्या पातळीवर लिखित, मुद्रित, उत्कीर्ण वळणें किंवा नित्याची, शोभेची वळणें हे फरक लक्ष्यात घ्यावे लागतात.

वाचिक आविर्भाव : हें उपांग स्वनव्यवस्थेला जोडून, पण तिच्यापासून वेगळें आहे. मुख्य म्हणजे तें अभ्यासकांकडून दुर्लक्षित आहे. भाषावैज्ञानिक आणि अभिनय-तज्ज्ञ ह्यांच्या सहकार्याने ह्या क्षेत्रात कितीतरी काम करायला वाव आहे. त्यासाठी प्रयोगशाळेचीही मदत घेता येईल. वाचिक आविर्भाव आणि कायिक आविर्भाव ह्यांची सांधेजोडही तपासायला पाहिजे.

नामकरणव्यवस्था : व्यक्तिनामें आणि आडनावें ह्या बाबतीत जाती, धर्म, प्रदेश ह्यांना अनुसरून वेगवेगळ्या उपव्यवस्था असल्यासारखें चित्र मराठी भाषेच्या बाबतीत दिसतें (होप किंवा आशा ही कॅथलिक नसून प्रॉटेस्टंट स्त्रीनामें असायचीं; सोकर, पिरोज, दशरथ विशिष्ट जातीत असणार किंवा नसणार; खुशाल, भीमाप्पा हे विशिष्ट प्रदेशाकडचे असणार; डिसूझा, इझिकेल, पठाण, वेदपाठक, मोरे ह्या आडनावांवरून जात आणि धर्म अनुमानता येतात). आडनावें आणि स्थलनामें ह्यांच्या मध्ये

आढळणारीं लघुतमरूपें (–कर, –वाडी, –देश, –आण, –ऊर, तळे–, –तळें) हीं वेगळीं काढून अभ्यासण्याजोगीं आहेत. स्थलनामांचा लिंगनिर्णय हा एक विषय आहे. ह्या सर्व अभ्यासासाठी विशेषनामांचे कोश तयार होणें जरूर आहे.

व्युत्पत्तिसाम्यें आणि ऐतिहासिक तुलना

उपप्रश्न २. १ चें उत्तर देताना आपण ऐतिहासिक भाषाविज्ञान आणि त्यामधील अभ्यासाच्या तीन पायऱ्या पाहिल्या. त्यातली पहिली पायरी ही पायाभूत असल्यामुळे तिच्याच विचार आपण मुख्यतः करणार आहोत. व्युत्पत्तिसाम्य शोधणें हा भाषाविज्ञानक्षेत्राबाहेरच्या अनेक हौशी लोकांचा कुटिरोद्योग झाला आहे. आधुनिक भाषावैज्ञानिकांना ऐतिहासिक अध्ययनात काही गम्य नाही किंवा गम्य असलें तरी काही खास नवें सांगण्याजोगें नाही असाही एक गैरसमज पसरलेला आहे. असो.

व्युत्पत्तिसाम्य किंवा ऐतिहासिक साम्य ह्याचा अर्थ काय ? रूप आणि अर्थ ह्यांची सांगड जुळते ती मुख्यतः सांकेतिक असल्यामुळे एका भाषाप्रकारात जुळलेली सांगड दुसऱ्या भाषाप्रकारात जुळली नाही तर आश्चर्य वाटायला नको. एकाच प्राण्याला कुत्रा, श्वान, शियँ, डॉग, नायि अशीं वेगवेगळीं नावें आहेत ही काही सांगण्यासारखी बाब नाही. असलीच तर मराठी, संस्कृत, फ्रेंच, इंग्लिश, कन्नड भाषिकांना ह्या प्राण्याचा परिचय आहे हें सांस्कृतिक साम्य त्यातून सूचित झालें असल्यामुळेंच. परंतु दक्षिण एशियासारख्या एक इतिहास असलेल्या क्षेत्रात काही भाषाप्रकारात कुत्रा, कुत्तर, कूतरो सारखीं रूपें दिसतात तर काही भाषाप्रकारात नाइ, नायि सारखीं रूपें दिसतात ही निश्चित योगायोगाची बाब नाही (जशी मराठी ‘नीट’ आणि इंग्लिश ‘नीट’ ह्यामधली उच्चारसाम्य आणि अर्थसाम्य ही योगायोगाची बाब आहे); त्याचप्रमाणें तिचा उलगडा मानवप्राणि आणि मानवी जीवन ह्यांच्यामधल्या मूलभूत साम्यांचा आधार घेऊन करता येणार नाही (जसा उलगडा ‘म्याव’ या मराठी शब्दासारख्या उच्चाराचे आणि अर्थाचे शब्द पृथ्वीच्या पाठीवर मांजरें जिथे आहेत तिथे अनेक ठिकाणी सापडतात ह्या घटनेचा करता येतो). मग ती ऐतिहासिक संबंधांची म्हणजे व्युत्पत्तिसाम्याची बाब आहे. दोन भाषांमध्ये ऐतिहासिक संबंध शोधायचे तर एक बाजूने त्या भाषा बोलणाऱ्यांचा इतिहास तपासायला पाहिजे (उदाहरणार्थ मराठी भाषेत अरबी, शब्द फारसी किंवा फारसी–दखनी किंवा फारसी–दखनी–हिंदुस्तानी ह्या मार्गाने जसे आले तसे तडक अरबी–भाषिक व्यापाऱ्यांकडून आले असण्याची शक्यता नजरेआड करता येत नाही, हिंदीमध्ये काग़ज़ तर मराठीत कागद असें का ह्याचा उलगडा ह्यामुळे होऊ शकतो), तर दुसऱ्या बाजूने त्या भाषांमधले घटक, भाषालक्षणें ह्याच्यामध्ये ऐतिहासिक साम्य दिसतें का ह्याचा शोध योग्य ती क्षेत्रीय आणि लिखित साधनांची पाहणी करून केला पाहिजे.

क्षेत्रीय पाहणी केल्याशिवाय मौखिक नमुने उपलब्ध होणार नाहीत. केवळ लिखित पुराव्यावर भिस्त ठेवणें बरोबर नाही. जुनी ग्रांथिक मराठी आणि आजची ग्रांथिक मराठी ह्यांची तुलना किंवा ग्रांथिक मराठी आणि ग्रांथिक फारसी ह्यांची तुलना ह्या जशा बोधप्रद होतील, तशाच जुनी ग्रांथिक (आणि मिळाल्यास बोली) मराठी आणि आजच्या प्रमाणेतर बोली, आजची प्रमाण बोली आणि इतर प्रमाणेतर बोली, वऱ्हाडी बोली आणि नागपुरी बोली, अहिराणी बोली आणि दक्षिण गुजरातच्या प्रमाणेतर बोली अशा देखील तुलना बोधप्रद होतील. बोलींचा अभ्यास आणि ग्रांथिक मराठीचा अभ्यास वेगळा ठेवता येणार नाही. दुसरें म्हणजे ह्या तुलना एखाददुसऱ्या शब्दांच्या करून भागणार नाही. प्रमाणेतर बोलीमध्ये कान, नाक सारखे ' नेहमीचे ' शब्द आहेत त्यांचा आणि चित्रविचित्र म्हणून मोहवणाऱ्या शब्दांचा साकल्याने विचार करायला पाहिजे; ' नेहमीच्या ' शब्दांकडे दुर्लक्ष करून उपयोगी नाही. हौशी अभ्या-सकाला व्युत्पत्तिसाम्याची शंका आली किंवा बोलीमधला एखादा शब्द लक्षणीय वाटला तर वावगें काहीच नाही. परंतु हौशी अभ्यासकाच्या ' माहिती 'पुढे जें भलेंमोठें प्रश्नचिह्न असतें तें खोडून फुली टाकणें किंवा बरोबरची खूण करणें हें मोठें कष्टाचें आणि जबाबदारीचें काम असतें. त्या कामाबद्दल घाई करणें आणि तज्ज्ञ वेळ लावतात म्हणून हौशी अभ्यासकाने आपणच तें काम उरकणें बरोबर नाही. तिसरी गोष्ट म्हणजे उच्चारसाम्याबरोबरच व्याकरणिक साम्यें आणि अर्थसाम्यें ह्यांचाही विचार व्युत्पत्तिसाम्यें ठरवताना करावा लागतो. संस्कृतमध्ये (आणि मराठीतही) आत्मा पुंलिंगी असताना हिंदीमध्ये तो स्त्रीलिंगी का हा विचार करताना रूह हा तशाच अर्थाचा अरबी शब्द स्त्रीलिंगी आहे ह्याचाही विचार करावा लागतो. (पुस्तक आणि किताबची गोष्ट निराळी नाही.) मराठी ' अस्पृश्य ' आणि इंग्लिश ' अन्टचेबल् ' ह्या दोन विशेषणांतलें अर्थसाम्य ऐतिहासिक दृष्ट्या लक्षणीय आहे, संस्कृतमध्ये त्या अर्थाने ' अस्पृश्य ' शब्द वापरात नाही हेंही त्याबरोबर लक्ष्यात घेतलें आणि ग्रंथांतरी ' अस्पृश्य ' आणि ' अन्टचेबल ' ह्यांचे जुन्यात जुने उपयोग केव्हाचे आहेत ह्याचा शोध घेतला म्हणजे इतिहासाची साधार जुळणी आणि मांडणी करता येईल. एकदा अर्थसाम्यांचा ऐतिहासिक विचार करू लागलें म्हणजे अर्थवैषम्यांचा म्हणजेच अर्थ-परिवर्तनाचा अंदाज येऊ लागतो. त्याचप्रमाणे समानार्थी वाक्प्रचार आणि म्हणी डोळ्यासमोर येऊ लागतात. ' जुनें तें सोनें ' किंवा ' एका दगडात दोन पक्षी ' ह्यांचा उगम इंग्लिशमध्ये तर नाही ना ह्याची शंका येऊ लागते. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्युत्पत्तिसाम्यें ही केवळ विशिष्ट रूपात, शब्दात, वाक्यखंडातच नसतात तर व्याकरणिक कोटी आणि व्याकरणिक रचना ह्यांच्यामध्येही शोधता येतात. तसा शोध घेतल्यावर ' खाऊन टाक– ' सारख्या रचनांचा एक पट्टाच मध्य एशियापासून पूर्व भारतापर्यंत पसरला आहे असें दिसून येतें. ' दगडबिगड 'सारखे प्रयोग करण्याची

लकब सर्व दक्षिण एशिया भाषाक्षेत्रभर आहे हें ध्यानात येतें. काश्मिरीमध्ये फारसी-प्रमाणे कर्म क्रियापदानंतर ठेवण्याची लकब दिसून येते ह्याचाही वेगळा विचार करावासा वाटतो. ऐतिहासिक भाषावैज्ञानिकास भूगोलाचेंही सतत भान ठेवावें लागतें. कल्पनेच्या पतंगाला सावध कष्टाळूपणाची दोरी लावावी लागते.

व्युत्पत्तिसाम्य निश्चित करायचें म्हणजे केवळ अमूक साम्य योगायोगाचें नाही किंवा अनुभवजन्य (' म्याव ' सारखें) नाही तर ऐतिहासिक (व्युत्पत्तिजन्य) आहे एवढा शिक्का मारणें एवढेंच नाही. त्या साम्याची इतर अनेक तसल्याच साम्या-बरोबर व्यवस्था लावायची हा अधिक महत्त्वाचा भाग आहे. ती व्यवस्था लावायची म्हणजे दोन गोष्टी जवळजवळ एकदमच कराव्या लागतात. एक म्हणजे त्या साम्याला कारणीभूत झालेली प्रक्रिया निश्चित करायची. मराठी ' कान ' हा संस्कृत ' कर्ण ' पासून मधल्या ' कण्ण ' अवस्थेतून अनुवंशपरंपरेतून आला आहे. मराठी ' शेत ' आणि हिंदी ' खेत ' हे दोन्ही शब्द संस्कृत ' क्षेत्र ' पासून भिन्न अनुवंशपरंपरांतून आलेले आहेत. मराठी ' अहिंसा ' आणि इंग्लिश ' अहिम्सा ' हे दोन्ही संस्कृतच्या प्रभावातून आलेले आहेत, अनुवंशपरंपरेतून नाहीत. जुनी ग्रांथिक मराठी आणि आजची प्रमाणेतर मराठी ह्यामधल्या ' येक ' मधली यकाराची लकब द्राविड प्रभावा-पासून आली आहे. इत्यादि. दुसरी गोष्ट म्हणजे ह्या अनुवंशपरंपरा आणि प्रभाव ह्यांबद्दलचे नियम बसवणें. कान–कण्ण–कर्ण ह्या साखळीबरोबर पान–पण्ण–पर्ण, वाण–वण्ण–वर्ण ह्या साखळयाही मनात याव्या लागतात. शेत / खेत–क्षेत्र ह्या त्रिकुटाबरो-बरच ऊंस / ईख–इक्षु, खार / खार–क्षार ह्या त्रिकुटांचें काय करायचें हेंही मनात येतें. ' येक 'मधल्या यकाराबरोबर ' वोघ 'मधला वकारही मनात येतो. ह्या सर्व भान-गडीत आधी पक्क्या वाटलेल्या व्युत्पत्त्या ढासळतात, कच्च्या वाटलेल्या पक्क्या होतात, नव्या व्युत्पत्त्या सुचतात, आणि नवीं प्रश्नचिह्नेंदेखील उभीं राहतात ! ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे फुटकळ व्युत्पत्तींचा शोध नव्हे, तर भाषेच्या समग्र ओघाचा शोध आहे.

कोशरचना

भाषाकोश मुख्यतः तीन प्रकारचे असतात. एक भाषाविश्लेषणाचा भाग म्हणून; व्याकरणात सामान्य नियम सांगून झाल्यावर जें सामान्य नियमांत बसत नाही, जे निपात आहेत त्यांचा परामर्श घेण्यासाठी व्याकरणाला जोडलेलें परिशिष्ट असें ह्या प्रकारच्या कोशाचें स्वरूप असतें. पूर्वी व्याकरणाला गणपाठ जोडीत असत. तो वर्ण-क्रमाने द्यायचा ही केवळ साठवणीसाठी क्लृप्ति. ह्यातील प्रत्येक नोंदीचे तीन भाग असतात : मौखिक / लिखित रूप (मामा), व्याकरणिक कोटी (नाम पुंलिंगी), आणि अर्थविधान (आईचा भाऊ). (डुकृञ्करणे ह्या नोंदीमध्येही कृ–, डु–ञ्,

करणे हे असेच तीन भाग ओळखता येतात हें संस्कृतज्ञांच्या ध्यानात येईल.) नोंदीची गटवारी रूपांप्रमाणे असेल (बहुतेक आधुनिक कोश), व्याकरणिक कोटीं-प्रमाणे असेल (उदा० संस्कृत धातुपाठ), अर्थाप्रमाणे असेल (उदा० संस्कृतमधला अमरकोश, आणि त्यावरून स्फूर्ति घेणाऱ्या रॉझेच्या 'थीझॉरस ऑव्ह इंग्लिश वर्ड्‌ज् अँड फ्रेजिज').

दुसऱ्या प्रकारचे कोश ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे फलित म्हणून असतात. एखाद्या भाषेचा इतिहास लिहिला तर त्याला परिशिष्ट किंवा पूर्वतयारी म्हणून तिचा ऐति-हासिक कोश लिहावा लागतो. अशा कोशात रूपांच्या इतिहासावर भर असेल (उदा. स्कीटचा इंग्लिश भाषेचा व्युत्पत्तिकोश) किंवा अर्थांच्या परिवर्तनावर भर असेल (उदा० ऑक्सफर्ड इंग्लिश महाकोश). एखाद्या भाषाकुलाचा किंवा भाषाक्षेत्राचा इतिहास लिहायचा तर त्याला परिशिष्ट किंवा पूर्वतयारी म्हणून तौलनिक व्युत्पत्ति-कोश लिहावा लागतो (उदा. रॅल्फ टर्नर ह्यांचा इंडोआर्यन कोश किंवा बरो, एमनो ह्यांचा द्राविड कोश).

तिसऱ्या प्रकारचे कोश भाषांतरीय तुलनेचे फलित म्हणून असतात. प्रत्येक द्वभाषिक कोश हा अशा पद्धतशीर तुलनेचे फलित म्हणून जन्माला येत नाही. बहुतेक संस्कृत–इंग्लिश कोश किंवा इंग्लिश–संस्कृत कोश संस्कृत भाषेवर प्रकाश पडावा म्हणूनच लिहिलेले आहेत. तसल्या कोशांच्या आधारे संस्कृत साहित्याचे इंग्लिश छायानुवाद केले तर काय होते ह्यार्ची नामी उदाहरणें आपल्या डोळ्यासमोर आहेत. उलट भाषांतरकाराला उपयोगी पडणारा एक उत्तम कोश म्हणजे मांस्यों ह्यांचा फ्रेंच-इंग्लिश आणि इंग्लिश–फ्रेंच हा जोड–कोश आहे. चांगल्या कोशांचा आणि त्यांच्या प्रस्तावनांचा बारकाईने अभ्यास ही नव्या कोशकाराला आवश्यक अशी पूर्वतयारी आहे.

भाषेचें अनुवर्ती अध्ययन

हें सर्व क्षेत्र भाषाविज्ञानाच्या बाहेरचें आहे. भाषाविज्ञान आणि इतर ज्ञानशाखा ह्यांच्या सहकार्याचें हें क्षेत्र आहे. ह्या क्षेत्रामधल्या अनेक उपक्षेत्रांपैकी तीन उपक्षेत्रां-कडे मला लक्ष्य वेधायचें आहेत. भाषावैज्ञानिकांना आज तरी त्यांच्याबद्दल विशेष जिव्हाळा वाटताना दिसतो.

भाषा आणि साहित्यसमीक्षा : एखादी साहित्यकृति घेऊन तिच्यातील भाषेचें विश्लेषण करणें हें काही ह्या उपक्षेत्राचें स्वरूप नाही (उदा. राजवाड्यांचें ज्ञानेश्वरीचें व्याकरण किंवा वेलिंगकरांचा ज्ञानेश्वरी कोश हीं काही इथे पडत नाहीत). इथे भाषा-

वैज्ञानिक साहित्यसमीक्षकाच्या हाताखाली वावरतो आहे (ही दोन मंडळी एकाच कुडीत रहात असल्यास अधिकच चांगलें). साहित्यसमीक्षकाला एखाद्या साहित्यकृतीबद्दल किंवा साहित्यपंक्तीबद्दल जें भावतें त्याचा भाषिक पुरावा हजर करणें हें शैलीमीमांसेचें मुख्य काम आहे. छंदोरचनेचा स्वनव्यवस्थेमधला पाया उघड करणें, शब्दयोजनेमधले निरनिराळे उच्चारविषयक कल, व्याकरणविषयक कल, किंवा अर्थांगविषयक कल (जरूर तर मोजदाद करून) हुडकून काढणें, एखाद्या कादंबरीतील काळाची हाताळणी क्रियापदांच्या रूपातून कशी प्रकट झाली आहे हें दाखवणें अशीं आणि इतर निरनिराळीं कामें शैलीच्या अभ्यासकाला भाषेच्या अंगाने अंगावर घेता येतील.

भाषा आणि समाजविज्ञान : भाषा ही अखेर सामाजिक संस्था आहे. तिचा इतिहास समाजाच्या इतिहासाचा भाग आहे. (उदाहरणार्थ, प्रमाणबोलीचा उद्भव आणि साक्षरतेचा प्रसार, शहरांची वाढ ह्या गोष्टी परस्परसंबद्ध आहेत.) सामाजिक जीवनाचे ती एक माध्यम आहे (इसाप, झांथस, आणि जिभा ह्यांची गोष्ट इथें आठवावी). भाषालक्षणांमध्ये भाषिकांच्या लक्षणांचें प्रतिबिंब पडतें (वयोभेद, लिंगभेद, जातिभेद, शैक्षणिक भेद हे सर्व भाषेतही उमटतात) आणि मुख्य म्हणजे प्रत्येक भाषिक घटनेला एक प्राप्त सामाजिक परिस्थितीचा संदर्भ असतो. (उदा. अरेतुरे म्हणायचें का अहोजाहो म्हणायचें, गोड सांगायचें का कडक बोलायचें असले अनेक निर्णय वक्ता घेतो; बोलणें दुसऱ्या कानाने सोडायचें का मनावर घ्यायचें, स्तुतीने झालेला आनंद दाखवायचा का कसचें कसचें म्हणायचें असले निर्णय श्रोता घेतो).

भाषा आणि मनोविज्ञान : भाषा ही केवळ मनातला मजकूर कळवायचें साधन नसून मनात मजकूर जुळण्याची एक मूस आहे. (अशक्य हा शब्द फ्रेंच भाषेत नाही असें म्हणतांना नेपोलियनने भाषेचें हें सामर्थ्य सूचित केलेलें आहे.) त्यामुळे उपप्रश्न २.२ चें उत्तर देतांना सर्व भाषांना लागू पडणारीं जीं लक्षणें निघतात त्यांच्यामध्ये मनोवैज्ञानिकाला मोठाच रस आहे. व्यक्तिजीवनात भाषा कशी उगम पावते आणि व्यक्तीचें भाषिक जीवन कसकसें बदलतें ह्याचा शोध भाषावैज्ञानिकाच्या मदतीने तो घेऊ पाहतो. ह्या शोधात माणूस लहानपणी भाषा प्रथम कशी शिकतो आणि नंतरच्या आयुष्यात इतर भाषा कशा शिकतो हा एक महत्त्वाचा विषय आहे. लहान मूल किंवा विद्यार्थी भाषा आत्मसात् करताना कायकाय स्थित्यंतरें होतात हें पाहणें मनोरंजक आहे, उद्बोधक आहे, आणि भाषाशिक्षणतज्ज्ञाला उपयोगी देखील आहे. विद्यार्थ्यांच्या प्रमादांनाही काही एक पद्धत असते! प्रमाद कसे होतात हें कळलें तर ते दूर करणें किंवा टाळणें अधिक सोपें होईल.

संदर्भग्रंथसूची

हिचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात प्रस्तुत लेखाने जागें झालेलें कुतूहल अंशतः शमवण्यासाठी काही प्राथमिक स्वरूपाचे ग्रंथ आहेत. त्यांच्या मार्फत इतर पुढच्या संदर्भांकडे जाता येईल. दुसऱ्या भागात प्रस्तुत लेखात येऊन गेलेल्या विषयांचें लेखकाने अन्यत्र अमळ विस्ताराने विवेचन केलेलें असेल त्या स्थळांची नोंद आहे.

भाग १

Akhmanova, Olga (ed.) Lexicology : Theory and method. Moscow : Moscow State University, 1972.

Allerton, D. J. Essentials of grammatical theory. London : Routledge & Kegan Paul, 1979.

Arlotto, Anthony. Introduction to historical linguistics. Boston : Houghton Mifflin, 1972.

Bhaskararao, P. Practical phonetics, Part I. Pune : CASL at Deccan College, 1972.

Bolinger, Dwight L. Aspects of language. New York : Harcourt, Brace & World, 1968. 2nd ed., 1975.

Bynon, Theodora. Historical linguistics. Cambridge : University Press, 1978.

Chao, Y. R. Language and symbolic systems. London : Cambridge U. P., 1969.

Corder, S. Pit. Introducing applied linguistics. Penguin, 1973.

Dittmar, Norbert. Sociolinguistics. London : Arnold, 1976.

Fromkin, Victoria and Redman, Robert. An Introduction to Language. New York : Holt, Rinehart and Winston, 1974.

Garvin, Paul L. (ed.) Method and theory in linguistics. The Hague : Mouton, 1966.

Gelb, Ignace J. A Study of writing. Chicago : University of Chicago Press, 1952.

Herriot, Peter. An Introduction to the psychology of language. London : Methuen, 1970.

Langacker, Ronald W. Fundamentals of linguistic analysis. New York : Harcourt, Brace and World, 1972.

Lehmann, Winfred P. Historical linguistics. New York : Holt, Rinehart and Winston, 1962. Cheap Indian rpt. : Oxford and & IBH, 1966.

Lyons, John. Introduction to theoretical linguisties. London : Cambridge University Press, 1968.

Mackey, William F. The Description of bilingualism. The Canadian journal of linguistics 7.51–85, 1962

Meillet, Antoine. The Comparative method in historical linguistics. Paris : Honore Champion, 1967. (Translated from French.)

Palmer, F. R. Semantics. London : Cambridge U. P., 1976.

Ross, Alan S. C. Etymology. London : Deutsch, 1958.

Samarin, W. J. Field linguistics. New York : Holt, Rinehart and Winston, 1967.

Turner, R. L. Some problems of sound change in Indo–Aryan. Pune : University of Poona, 1960.

Voegelin, C. F.; Voegelin, F. M. Hopi domains. IJAL supplement. Bloomington, Indiana : Indiana University, 1957.

भाग २

Kelkar, Ashok R. The Anatomy of a dictionary entry. (In 2 pts.) Indian linguistics 29. 142–9 1968; 30.50–64 1969. (Published 1970, 1971.)

—The Scope of a historical dictionary. In : Ghatage, A. M. and others (ed.). Studies in historical Sanskrit lexicography. Pune : CASL at Deccan College, 1973. Pp.57–69.

—The Scope of a linguistic survey. In : Ohanessian, Sirarpi and others (ed.). Language surveys in developing nations. Washington, D. C. : Center for Applied Linguistics, 1975. Pp. 7–12.

केळकर, अशोक रा. अहिंदी भारतीयों के लिये हिन्दी उच्चारण-शिक्षण. भाषा, भाषा-विज्ञान अंक. ४०२–१३, १९७३.

—न. चिं. केळकर आणि मराठी भाषा. समावेश : केळकर जन्मशताब्दी ग्रंथ). पुणें : केसरी प्रकाशन, १९७२. पृ. १९२–२०२.

—भाषा आणि शिक्षण. समाजप्रबोधनपत्रिका अंक ३६.१७–२०, नोव्हें– डिसें. १९७०. (संस्कारित स्वरूपात याच ग्रंथात अन्यत्र.)

—भाषा आणि साहित्य. महाराष्ट्रसाहित्यपत्रिका अंक १७१–२. १८–२८ मार्च १९७०.

—भाषेचें नियमन. महाराष्ट्रसाहित्यपत्रिका. अंक १६१.४१–५४, एप्रिल–जून १९६७. (संस्कारित स्वरूपात याच ग्रंथात अन्यत्र.)

—मराठी भाषेचा आर्थिक संसार. औरंगाबाद : मराठवाडा साहित्य परिषद, १९७७.

—मराठी महाकोशाची योजना. महाराष्ट्रसाहित्यपत्रिका अंक १६०, जानेवारी–मार्च १९६७.

—मराठी व्याकरणाची नवी दिशा. सत्यकथा (जानेवारी १९६६) १९–३१. (संस्कारित स्वरूपात याच ग्रंथात अन्यत्र.)

—लिपि. नवनीत मराठी डायजेस्ट (जुलै १९७४) २२–८. संस्कारित स्वरूपात याच ग्रंथात अन्यत्र.)

आधुनिक भाषाविज्ञानाची परंपरा

सर्वसाधारणतः आपल्याकडे विज्ञान आणि परंपरा यांचा विरोध मानलेला आहे. त्यामुळे विज्ञानाची परंपरा असें म्हणणें कदाचित् चमत्कारिक वाटेल, पण तसें वाटायचें कारण नाही. विज्ञानालाही परंपरा असते आणि काही अंशी विज्ञानाचा व्यवहार परंपराप्रियही असतो. म्हणजे असें की विज्ञानातील ज्ञानात सतत भर पडून विज्ञानाचा चेहरामोहरा पालटतो हें खरे असलें तरी ही भर जास्त करून परंपरेच्या चौकटीतच पडत राहते, चौकट बदलण्याचें वैज्ञानिक सहसा टाळत असतो. न्यूटनची चौकट बदलायला आणि वाढवायला भौतिकीविदांनी किती खळखळ केली हा ताजा इतिहास आहे. मात्र एकदा चौकट बदलणें अटळ आहे असें वैज्ञानिकाच्या ध्यानात आलें की मग तो मागेपुढे पहात नाही. 'प्लेटो महान होता, पण सत्य त्याहून मोठें आहे' असें आपल्या गुरूची विचारसरणी खोडून काढताना नम्रपणे पण आग्रहाने म्हणणारा ॲरिस्टॉटल ह्या बाबतीत त्याच्या गुरुस्थानी आहे. नव्हे, विज्ञानव्यवहारातली परंपराप्रियता म्हणजे रूढिप्रियता नव्हेच, ती व्यवस्थाप्रियता आहे, आणि अखेर अनुभवाची व्यवस्था लावणें ही तर विज्ञानाची आद्य प्रतिज्ञा आहे.

मानवी संस्कृतीच्या इतिहासात भाषाविज्ञानाचा भाषेचा व्यापक आणि स्वतंत्रपणे विचार करणारी ज्ञानशाखा म्हणून जन्म अलीकडचा आहे. असें असलें तरी व्याकरण, उच्चारण, व्युत्पत्ति इत्यादि भाषेच्या विशिष्ट अंगांचा पद्धतशीर विचार प्राचीन काळापासून मानवी संस्कृतीच्या विशिष्ट केंद्रांमधून चालू झाला होता. अशा विचाराच्या पाच ठळक परंपरा सांगता येतील, इतर परंपरा स्वतंत्र म्हणून भासमान न होता यांचाच विस्तार किंवा संकोच म्हणून आपल्याला इतिहासात भेटतात—

(१) प्राचीन अभिजात भारतीय संस्कृति.

(२) प्राचीन अभिजात ग्रीक संस्कृति—हिच्यामधला भाषाविचार पुढे प्राचीन रोमन, मध्ययुगीन आणि रिनैसन्सकालीन यूरोपीय संस्कृतींमधून चालवला गेला.

(३) प्राचीन चिनी संस्कृति— हिच्यामधला भाषाविचार पूर्व आणि आग्नेय एशियात चालवला गेला.

(४) अभिजात अरबी संस्कृति— हिच्यामधला भाषाविचार पश्चिम एशियात चालवला गेला.

(५) अर्वाचीन पाश्चात्य संस्कृति— हिच्यामधका भाषाविचार अन्यत्र (उदाहरणार्थ आधुनिक भारतात) फैलावला आहे, त्यातही दोन ठळक टप्पे दिसतात : (क) तौलनिक भाषाविज्ञान (कंपॅरटिव्ह फिलॉलजी) आणि त्याला फुटलेले बोलीविचारासारखे धुमारे, (ख) आधुनिक भाषाविज्ञान (मॉडर्न लिंग्विस्टिक्स).

सध्या आपल्याला दोन विषयांशी कर्तव्य आहे : प्रथम आपण अर्वाचीन पाश्चात्य जगात झालेला आधुनिक भाषाविज्ञानाचा उदय आणि विकास पाहू, आणि नंतर कंपॅरटिव्ह फिलॉलजी आणि आधुनिक भाषाविज्ञान (५ क, ५ ख) ह्यांचे हें अर्वाचीन पाश्चात्य जगातलें रोप आधुनिक भारतीय उपखंडात कसें आणि कितपत रुजलें तें थोडक्यात पाहू.

कंपॅरटिव्ह फिलॉलजी कडून आधुनिक भाषाविज्ञानाकडे

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उदय पावलेल्या आणि एकोणिसाव्या शतकात भराला आलेल्या भाषाविज्ञानाच्या परंपरेत ऐतिहासिक तुलनेची कल्पना केंद्रीभूत आहे, म्हणून कंपॅरटिव्ह ह्या विशेषणाची योजना, आणि ही कल्पना हस्तलिखितांची तुलना करून जुना पाठ शोधू पाहणाऱ्या वाङ्मयविद्येकडून म्हणजे फिलॉलजीकडून मिळाली म्हणून फिलॉलजी या नामाची योजना. पुढे भाषाविज्ञान ही स्वतंत्र ज्ञानशाखा आहे, फिलॉलजीची उपशाखा नाही हे लक्षात आल्यावर कंपॅरटिव्ह फिलॉलजी हें नाव मागे पडलें. आज आपण ऐतिहासिक भाषाविज्ञान ही भाषाविज्ञानाची शाखा मानतो, पण हेर्मान पाउलसारखे एकोणिसाव्या शतकातील भाषेचे अभ्यासक भाषाविज्ञान हेच मुळी इतिहासनिष्ठ आहे असें मानत होते.

परंपरेचा सांधा बदलण्याची वेळ आली होती, आणि तें काम फेर्दिनां द सोस्यूर (१८५७–१९१३) ह्या फ्रेंचभाषी स्विस विद्वानाने केलें. इतिहासनिरपेक्ष भाषाविश्लेषण ही भाषाविज्ञानाची कोनशिला आहे असें त्याने मांडलें. भाषांची ऐतिहासिक तुलना जरूर करा, पण ती करण्याअगोदर एकेका भाषेचें बिनचूक वर्णन इतिहासनिरपेक्ष विश्लेषणाच्या रीतीने करायला नको का असा प्रश्न त्याने विचारला. सोस्यूरने तरुण वयात ऐतिहासिक तुलनापद्धतीचा सुंदर आविष्कारच असा आपला छोटा प्रबंध लिहिला, भाषेमध्ये इतिहासाच्या ओघात होणारीं परिवर्तनें व्यवस्थाबद्ध असतात ह्या तत्कालीन विचारसूत्राला धरूनच तो लिहिला आहे. भाषिक परिवर्तनें जशीं व्यवस्थाबद्ध असतात तशी भाषाही व्यवस्थाबद्ध असते असें त्याने प्रगल्भ वयात मांडलें व परंपरेचा सांधा बदलवला. अर्थात् असें मन्वंतर एकाएकी होत नसतें. सोस्यूरप्रमाणे इतरांनाही ऐतिहासिक तुलनापद्धतीच्या मर्यादा जाणवू लागल्या होत्या.

पहिली गोष्ट म्हणजे पाश्चात्य भाषाविदांचें लक्ष प्रतिष्ठा पावलेल्या व प्रचारातून

गेलेल्या ग्रीक, लॅटिन, हिब्रू सारख्या अभिजात भाषांकडून आधुनिक भाषांकडे वळलें होतें. फार काय रोमॅंटिक विचारसरणीच्या प्रभावामुळे त्यांच्याकडून आधुनिक भाषांच्या अप्रतिष्ठित बोलींचाही कसोशीने अभ्यास चालू झाला होता. परिचित अशा भारतीय, यूरोपीय, किंवा सेमिटिक कुलांतल्या भाषांखेरीज पाश्चात्यांच्या जागतिक भ्रमणांमुळे नव्याने परिचित झालेल्या चिनी सारख्या प्रतिष्ठित भाषा आणि उत्तर-दक्षिण अमेरिका, आफ्रिका, आणि उत्तर एशिया या भूभागांतील स्थानिक आदिवासींच्या अलिखित बोली ह्यांच्याकडेही लक्ष वळलें. त्या नाना कुलांमधल्या होत्या आणि त्यांच्यामध्ये अपरिचित उच्चार, शब्दरचना, वाक्यरचना यांची रेलचेल होती. ज्या ऑटो ब्योटलिंकने (१८१५–१९०४) पाणिनीच्या अष्टाध्यायीचा परिचय पाश्चात्यांना करून दिला त्याने याकुत या सायबीरियन भाषेला लॅटिन किंवा संस्कृतच्या साच्यात ठाकूनठोकून न बसवता पाणिनीच्या पद्धतीपासून स्फूर्ति घेऊन ती लावून दाखवली. (आम्हा भारतीयांना अशी काही स्फूर्ति अजूनही झालेली नाही, आम्ही फक्त ग्रंथपूजा करतो आणि पाणिनीचे पवाडे गात बसतो!) ऑटो येस्पर्सन (१८६०–१९४३) याला आधुनिक भाषा परभाषा म्हणून शिकवताना लॅटिन, ग्रीक ह्या पुराण भाषा शिकवायच्या पुराण पद्धति मंजूर नव्हत्या; त्यासाठी त्याने व्याकरणाची अर्थानुसारी नवी मांडणी केली आणि स्वनविज्ञानाची कास धरली. स्वनवैज्ञानिक मंडळींनी आपलें स्वतंत्र बिऱ्हाड एव्हाना थाटलें होतें आणि तुमचे उच्चार बिनचूक लिहून दाखवू का, ते सुधारण्यासाठी मौखिक कवाईत करून घेऊ का, आणि त्यांचें यांत्रिक उपकरणांनी पृथक्करण करून दाखवू का अशी विचारणा सुरू केली होती. (बोलभाषेचें व्याकरण लिहिणारा स्वनवैज्ञानिक हेन्री स्वीट (१८४५–१९१२) या आपल्या मित्राला बर्नर्ड शॉने आपल्या 'पिग्मेलियन' नाटकात प्रोफेसर हेन्री हिगिन्जच्या रूपाने अमर करून ठेवलेलें आहेच.) जर्मनीमधून फ्रान्ट्स् बोआस (१८५८–१९४२) ह्या भौतिकीविदाने अमेरिकेत स्थलांतर केलें आणि अमेरिकन इंडियन लोकांची संस्कृति आणि त्यांच्या भाषा ह्यांचा अभ्यास चालू केला – मात्र आपली भौतिक वैज्ञानिकाला साजेल अशी वस्तुनिष्ठा आणि काटेकोरपणा, पुराव्याशिवाय सैद्धांतिक इमले बांधण्याचा तिटकारा, आणि आपल्या ईप्सिताला धरून राहण्याची चिकाटी ह्यांचा त्याग न करता. ह्या सर्व घटितांचा एकत्र परिणाम होऊन ऐतिहासिक पद्धतीची पकड ढिली झाली होती. तिच्या जागी नवी अशी कोणती पद्धति येत होती? असें कोणतें नवें आलोकतारतम्य जाणवत होतें?

आधुनिक भाषाविज्ञानाचें स्वरूप

ह्या भाषाविज्ञानाच्या नव्या आविष्काराचे चार विशेष सिद्धांत सांगता येतील : (१) कोणतीही भाषा ही स्वयंस्पष्ट असते; (२) ती रचनेवर आधारलेलीं कार्यें

आणि कार्यावर आधारलेल्या रचना ह्यांची बनलेली असते; (३) भाषा ही एक समाजात अस्तित्वात आलेली आणि समाजात आपलें काम करणारी संस्था आहे; आणि (४) मानव ज्या विविध चिह्नपद्धति आणि चिह्नव्यवस्था वापरतो त्यांपैकी मानवाची भाषा ही एक आहे. ह्या सर्व विशेषांची स्पष्ट मांडणी सोस्यूरमध्ये आढळते हें त्याचें थोरपण आहे.

कोणतीही भाषा वापरायची तर वापरणाराला तिच्याबाहेर जाण्याची गरज पडत नाही. मग त्या वापराचें वर्णन करणाऱ्या भाषाविश्लेषकाला तरी अशी गरज का पडावी ? भाषा ही स्वयंस्पष्ट असते, विविध भाषांचे विश्लेषण प्रथम करू या, मग त्यांची ऐतिहासिक दृष्टीने तुलना करू या. अमूक शब्द कसा वापरला जातो, अमूक वाक्य कसें घडलें आहे याची चौकशी करताना त्यांच्याजागी पूर्वी काय स्थिति होती किंवा शेजारच्या बोलीत वा भाषेत काय स्थिति आहे याची उठाठेव काय कामाची ? ती उठाठेव पाहिजे तर मागाहून सावकाश करू. भाषेतिहासाची भाषाविश्लेषणात लुडबूड नको. उलट भाषाविश्लेषणाचा आधार भाषेतिहासाला मिळणें आवश्यक आहे. भाषेचा वैज्ञानिक अभ्यास हा असा अंतर्निहित पाहिजे. सोस्यूरनंतर कालांतराने हें भाषेच्या स्वयंस्पष्टतेचें तत्त्व दुसऱ्याच एका दिशेने खेचलें गेलें. भाषेमध्ये एका बाजूला उच्चार, हवेत दवडलेली वाफ (किंवा सपाटीवर ओढलेल्या रेघोट्या) असतात तर दुसऱ्या बाजूला बदलत्या परिस्थितीत आणि संदर्भात त्यांना प्राप्त होणारे विविध अर्थ असतात हें तर खरें. भाषा ह्या दोन टोकांमध्ये गुंतागुंतीचे दुवे जोडते. हे दुवे स्वयंस्पष्ट असतात. उच्चारांची साखळी आणि हे मधले दुवे ह्यांचा विचार पुरेसा आहे, अर्थांच्या जंगलात सध्या शिरण्याची गरज नाही – असा विचार झेलिग हॅरिस ह्या अमेरिकन भाषावैज्ञानिकाने मांडला आणि ह्या वाटेने गेल्यास कुठपर्यंत पोचता येतें (आणि कुठपर्यंत पोचता येत नाही हें देखील !) त्याने आपल्या ' मेथड्ज् इन् स्ट्रक्चरल लिंग्विस्टिक्स ' (१९५१) ह्या विख्यात ग्रंथात दाखवलें. डेनिश भाषावैज्ञानिक लुई ह्येलमस्लेव्ह याने तर शब्दांग आणि अर्थांग ह्या दोन्हींची केवळ बाह्य द्रव्यें म्हणून संभावना करून रूपाकार हेंच भाषेचें प्राणतत्त्व मानलें.

मुखर शब्द आणि मनोगत अर्थ ह्यांना जोडणाऱ्या दुव्यांचें स्वरूप गुंतागुंतीचें आहे म्हणजे नेमकें कसें आहे ? रचना आणि कार्य ह्या दोन तत्त्वांच्या आधारे ही गुंतागुंत उलगडते असें आधुनिक भाषावैज्ञानिकांचें म्हणणें आहे. एकेक सुटी उक्ति घेऊन किंवा त्या उक्तीचा एक सुटा तुकडा घेऊन काही उपयोग नाही. त्या ऐवजी एक सुटा तुकडा त्याहून मोठ्या समग्र भाषिक वस्तूमध्ये कसा बसतो, ठिकठिकाणी तो कोणतें कार्य किंवा कोणकोणतीं कार्यें करतो ह्याचा शोध घ्यायला हवा. त्याचप्रमाणे निरनिराळ्या उक्तींची, समग्र भाषिक वस्तूंची पाहणी करून त्यांच्यामध्ये साम्यस्थळें कोणतीं आहेत, भेदस्थळें कोणतीं आहेत याचाही शोध घ्यायला हवा.

एकाच भाषेतलीं विविध रूपें घेऊन त्यांच्यामध्ये अशी तुलना करीत गेल्यानेच भाषेची अंतर्गत व्यवस्था स्वयंस्पष्ट होत जाते. समग्र वस्तूमध्ये भाग कार्य करतो, अशा भागांना समग्र वस्तूमध्ये स्थान मिळतें, त्यांची एक रचना तयार होते. शब्दांग, अर्थांग, आणि त्यांना जोडणारें रूपांग ह्या भाषेच्या तीनही अंगांमध्ये अशी कार्य व रचना नियत करणारी आणि कार्य व रचना यांनी नियत झालेली व्यवस्था भेटते.

अल्पप्राण–महाप्राण ह्या भेदाला सरावलेल्या मराठी कानाला ताबडतोब लक्षात येतें की इंग्लिश peach शब्दातलें पहिलें व्यंजन महाप्राण आहे आणि speech शब्दातलें दुसरे व्यंजन अल्पप्राण आहे– अर्थात् इंग्लिश–स्वभाषींच्या उच्चारणात. पण ह्या दोन व्यंजनांचें इंग्लिश भाषेतलें कार्य लक्षात घेतलें तर हे दोन ध्वनि फ् आणि प् व्यवच्छेदक कधीच नसतात (मराठी फीत आणि पीत ह्या शब्दांत आहेत त्याप्रमाणे), त्यांचें इंग्लिश स्वनव्यवस्थेमधलें स्थान एकाच वर्णाचे स्थानपरत्वे झालेले भेद एवढ्यापुरतेंच मर्यादित आहे. शब्दांगाकडून रूपांगाकडे वळलें तर स्थिति वेगळी नाही. इंग्लिश a आणि the ह्या शब्दांचा प्रयोग मराठी माणसाला बुचकळ्यात पाडतो. भरीत भर म्हणजे कधी ह्या दोन्हीपैकी कोणतेंच पद नामापूर्वी येत नाही. आता हीं वाक्यें तुळून पहा.

(१) (क) There was a peach in the fridge.
(ख) There were — peaches in the fridge.
(ग) There was — milk in the fridge.
(२) (क) The boy was in the room.
(ख) The boys were in the room.
(ग) — John was in the rocm.
(३) (क) The boy who was in the room left.
(ख) The boys who were in the room left.
(ग) The John who was in the room left.

ह्या सर्व वाक्यांचा एकत्र विचार केला तर (१ ख), (१ ग) ह्या वाक्यांमधल्या रिकाम्या जागी indefinite article चा लोप झाला आहे तर (२ ग) ह्या वाक्यामधल्या रिकाम्या जागी definite article चा लोप झाला आहे असें आपल्या लक्षात येतें. अर्थांगाचें विश्लेषण बिकट असतें असें सामान्यतः मानलें जातें. पण कार्य आणि रचना ह्या अंगानी निरनिराळ्या वाक्यांची तुलना करीत जाण्याची पद्धति ह्या ठिकाणीसुद्धा कामी येते. आता ह्या समानार्थी पण भिन्नरूपी वाक्यांच्या जोड्या तुळून पहा—

(४) (क) I require you to read this book.
(ख) I don't permit you not to read this book.

(५) (क) I permit you to read this book.
(ख) I don't require you not to read this book.
(६) (क) You must read this book.
(ख) You can't not read this book.
(७) (क) You may read this book.
(ख) You needn't not read this book.
(८) (क) I hope it will rain.
(ख) I don't fear it won't rain.
(९) (क) I fear it will rain.
(ख) I can't hope it won't rain.

ह्या (ख) वाक्यात दोन नकार तर त्याला समानार्थी (क) वाक्यात एकही नकार नाही असें दिसतें. पण नेहमीच्या दोन नकार म्हणजे एक होकार (वाईट वाटत नाही असें नाही— वाईट वाटतें) ह्या तत्त्वापेक्षा हा वेगळा प्रकार दिसतो. त्याचा अधिक शोध घेतला तर आपल्याला require आणि permit, must आणि can, need आणि may, hope आणि fear ह्या जोडीच्या क्रियापदांचे आर्थी संबंध कोणत्या स्वरूपाचे आहेत हें समजून येईल. भाषाविश्लेषणाचें हें नवें हत्यार आपण इंग्लिश ह्या परकी भाषेवर अलिप्तपणे चालवून पाहिलें. तितक्याच थंडपणे ते आपण स्वभाषेवर चालवू शकलो तर फ्रांट्स् बोआसने घालून दिलेला वसा पुरतेपणी घेतला असें होईल. (रूपांगाच्या विश्लेषणाच्या मराठी उदाहरणासाठी पहा : 'मराठी व्याकरणाची नवी दिशा'.)

सोस्यूरने भाषा स्वयंस्पष्ट आहे असें मानलें आहे ह्याचा अर्थ त्याने भाषा स्वयंसिद्ध आहे असें मानलें असा होत नाही. उलट त्याने भाषेला पुस्तकाच्या बंदिस्त कपाटातून काढून समाजाच्या चवाठ्यावर आणून ठेवलें— खरें म्हणजे भाषा पहिल्यापासून तिथेच होती, पुस्तकांत तिचा शोध घेणाऱ्या अभ्यासकाला त्याने खेचून तिथे आणलें असें म्हणायला पाहिजे! ('पिग्मेलियन' नाटकाची सुरवात चवाठ्यावर होते ती उगीच नव्हे.) ह्यामुळे भाषेच्या लिखित आविष्कारापेक्षा तिच्या मौखिक आविष्काराला महत्त्व तर आलेंच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषा ही एक एक सामाजिक संस्था आहे यावर सोस्यूरने भर दिला. भाषा ही एक स्वयंस्पष्ट व्यवस्था असेल, फार काय तिला काही मर्यादेपर्यंत स्वयंपूर्ण सुद्धा म्हणता येईल, पण ती स्वयंसिद्ध मात्र अजिबात नाही. तिचें अस्तित्व सामाजिक आहे, तिची व्यवस्था टिकून राहते आणि प्रतीत होते ती भाषाप्रयोगातच. उगीच नाही वैयाकरण हा प्रयोगाला शरण जात! आणि हा भाषाप्रयोग माणसाच्या सामाजिक व्यवहारातच जमा होतो. कुणीतरी कुणाशी तरी बोलणें म्हणजेच भाषाप्रयोग. त्या बोलण्यातली व्यवस्था

म्हणजेच भाषाव्यवस्था. ही भाषाव्यवस्था पिढ्यानपिढ्या टिकते—तो भाषाप्रयोग टिकेपर्यंत, अखेर ती एक सामाजिक संस्था आहे. अलीकडे भाषेच्या सामाजिक अवगुंठनावर जो भर सोशियोलिंग्विस्टिक्स ह्या नावाखाली देण्यात येत आहे तो म्हणजे सोस्यूरने सांगितलेल्या सामाजिक संदर्भाची नव्याने झालेली जाणीव आहे. (विज्ञानाच्या इतिहासात मन्वंतरें असतात तशीं पुनरुज्जीवनेंही असतात.) भाषेच्या अभ्यासकांच्या एकदम लक्षात आलें की कोण कुणाशी कोणत्या परिस्थितीत कोणत्या रीतीने बोलतो यातही एक संगति आहे, नियतता आहे. हॅरिसप्रभृतींनी भाषेच्या स्वयंस्पष्टतेच्या तत्त्वाला फार ताणलें होतें त्या प्रवृत्तीला ह्यामुळे शह बसला.

भाषेची स्वयंस्पष्टता, व्यवस्थितता, सामाजिकता ह्या आधुनिक भाषावैज्ञानिक सिद्धांतांकडे ह्याप्रमाणे नजर टाकल्यावर आता आपण चवथ्या सिद्धांताकडे वळू. तो म्हणजे भाषेची चिन्हमयता. ही कल्पना मांडून सोस्यूरने भाषाव्यवहार आणि मानवी संस्कृतीचा चिह्नमय विस्तार ह्यांचा संबंध जोडून दिला. ह्या भाषिक चिह्नांची त्याने बुद्धिबळातील प्यादीं–मोहरीं यांच्याशी तुलना केली आहे— दोन्ही सांकेतिक आहेत. दोन्हींच्या खेळ्या सांकेतिक आहेत आणि दोन्ही ह्या खेळ्यांतून सिद्ध होतात. बुद्धिबळातला घोडा म्हणजे एक अडीच घरें चालणारें आणि हत्ती व उंट ह्यांच्यामध्ये खेळाच्या सुरवातीला उभें असणारें मोहरें— मग तें लाकडी, हस्तिदंती, नाही तर काल्पनिक असो, त्याला घोड्याचें तोंड असोनसो किंवा इंग्लिशमध्ये म्हणतात त्याप्रमाणे शिलेदार असें नाव असोनसो. त्याचप्रमाणे भाषेतल्या 'घोडा' ह्या शब्दाची स्थिति आहे. 'घोडा' म्हणजे 'गाढव' नसलेल्या, सिंहाप्रमाणे 'आयाळ' असणाऱ्या, 'खिंकाळणाऱ्या' इत्यादि गुणविशिष्ट प्राण्याचें नाव, जें नाव बंदुकीच्या 'घोड्या'ला किंवा शाळेतला फळा ठेवायच्या 'घोड्या'लाही लावलें जातें, जें कर्ता, कर्म इत्यादि स्थानावर येऊ शकतें, ज्याचें बहुवचन 'घोडे' होतें, इत्यादि. भाषेची चिह्नमयता, व्यवस्थितता, आणि स्वयंस्पष्टता हे तीनही धर्म ह्या भाषा आणि बुद्धिबळाचा खेळ यांच्या तुलनेमधून सुचवले जातात. चिह्नांनी एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीशी दळणवळण करता येतें, संज्ञापन करता येतें हें तर खरेंच. पण त्याचबरोबर चार्ल्स सॉंडर्स पियर्स (१८३९–१९१४) ह्या अमेरिकन फलप्रामाण्यवादी (प्रॅग्मॅटिस्ट) विचारवंताने म्हटल्याप्रमाणे चिह्नांच्या द्वारे चिह्नें ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला आसपासच्या परिस्थितीचें ज्ञानही होतें. ज्ञापनही होतें. मग हीं चिह्नें सांकेतिक, कृत्रिम असोत किंवा अग्नीची सूचना देणाऱ्या धुराप्रमाणे नैसर्गिक असोत. पियर्स आणि सोस्यूर ह्यांनी चिह्नमीमांसेचा (सीमियॉटिक्स) पायाच घातला असें म्हणायला हरकत नाही.

भाषेच्या अभ्यासाच्या क्षेत्रामधल्या ह्या मन्वंतराचा आशय ह्याप्रमाणे समजावून घेतल्यावर त्याचा पाश्चात्य विचारपरंपरेशी असलेला अन्वय समजावून घेणें उपयुक्त

होईल. अठराव्या शतकात युरोपमध्ये एक प्रबोधनयुग (द एज ऑव्ह एन्लायटन्मेंट) अवतरलें, त्याचा अत्युच्च आविष्कार म्हणजे कांटने लावून दिलेली विश्वाची एक व्यवस्था. पण एकोणिसाव्या शतकात ह्या व्यवस्थितपणाबद्दलच एक असमाधान उत्पन्न झालें. जीवनाच्या पृष्ठावर व्यवस्था दिसते खरी, पण ह्या व्यवस्थेच्या पोटी दडलेल्या किंबहुना तिला शह देणाऱ्या अजस्त्र धांदलीचें काय? डार्विन आणि त्याच्या जीवनसंघर्षातून जीवनविकासाचा सिद्धांत, मार्क्स आणि त्याचा आर्थिक वर्गकलहातून ऐतिहासिक विकासाचा सिद्धांत, फ्रॉइड आणि त्याचा जीवनमरणाच्या ऊर्मि आणि वास्तवाचीं, समाजनियमनाचीं बंधनें ह्यांच्यामधल्या संघर्षाचा सिद्धांत, आणि आदिवासींच्यामधून आद्यमानव शोधणाऱ्या आणि आधुनिक मानवाचें या आद्यमानवाशी सातत्य शोधणाऱ्या जेम्स फ्रेझर प्रभृति संस्कृतिवैज्ञानिकांचे सिद्धांत ह्यांनी ह्या व्यवस्थित विश्वाला आणि सुव्यवस्थित संस्कृतीला वारंवार हादरे दिले. दिसतें तसें नसतें ह्या कडू मात्रेचे वळसेच एकामागून एक पाश्चात्य विचारपरंपरेला मिळाले— वर वर काहीही म्हणा, आत स्वसंरक्षण आणि वंशसंरक्षण, उत्पादन-साधनांचा कब्जा, बुद्धीचें दास्य न पत्करता उलट बुद्धीला दासी करणाऱ्या प्रमाथी मानसिक ऊर्जा, बावरलेल्या आद्यमानवाची जगण्याला आकार देण्याची आणि त्यात अर्थ शोधण्याची धडपड ह्यांचेंच खरें राज्य आहे अशी ही नवी विचार-धारणा होती. होती म्हणायचें कारण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी एका नव्या विवेचक चिकित्सेचा जन्म झाला.

मानवी जीवनांचा विचार करताना अमूक म्हणजे दुसरेंतिसरें काही नसून तमूक-तमूक असें म्हणत राहणें म्हणजे स्वलक्षण वस्तूचा (Ding an sich) शोध व्यर्थ आहे ह्या कांटच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करणें आहे, समग्र मानवी जीवनाला एका सिद्धांताच्या कवेंत घेण्याचा प्रयत्न न करता व तपशिलाचा साक्षेपी आढावा घेताघेता एकदम हनुमान–उडी न घेता मर्यादित सिद्धांत मांडणें अधिक श्रेयस्कर आहे— अशी ही नवी विचारसरणी आहे. आपण अधिक विनीत झालो तर आपल्याला अधिक हिम्मत बांधता येईल. वस्तूचा शोध घेण्यापेक्षा वस्तूंना जोडणाऱ्या नात्यांचा शोध घ्या. बुद्धिबळामधला घोडा म्हणजे नेमकें काय असा प्रश्न विचारण्यापेक्षा त्याचीं पटातलीं घरें आणि पटावरची इतर मोहरीं–प्यादीं ह्यांच्याशी कायकाय नातीं आहेत असा प्रश्न विचारा. मग ह्या नात्यांपेक्षा वेगळा असा काही घोडा असतो का ह्याची नसती फिकीर तुम्हाला पडणार नाही. मानव अनेक खेळ खेळतो, त्यापैकी एकेका खेळाची व्यवस्था शोधून पहा. ती शोधल्यावर तुम्ही बांधलेला छोटासा सैद्धांतिक इमला पुढे मागे कोसळला तर तो तेवढाच कोसळेल. आजूबाजूंचें सगळेंच भुईसपाट होणार नाही. एकोणिसाव्या शतकाच्या वारशापैकी कालक्रमिक, ऐतिहासिक मागोव्या-वर पूर्णपणे विसंबून राहण्याची प्रवृत्ति दूर सारली गेली, जी काही टिकून राहिली ती

ह्या वस्तुमात्राच्या जुळणीची जाणीव. आधुनिक भाषाविज्ञान घ्या, आधुनिक अर्थविज्ञान घ्या, आधुनिक मनोविज्ञान घ्या, ह्यांचें आणि इतरांचेंही बोधवाक्य ई. एम्. फॉर्स्टर ह्या इंग्लिश कादंबरीकाराचेंच बोधवाक्य जणू दिसतें. फॉर्स्टर म्हणतो, 'फक्त जुळवून घ्या' (Only connect).

आधुनिक भाषावैज्ञानिक परंपरेचा विस्तार आणि विकास

आधुनिक भाषाविज्ञानाचा पुढचा इतिहास म्हणजे ह्या सिद्धांताच्या अनुयोजनाचा इतिहास आहे. बोआसचें काम एडवर्ड सपीर (१८८४–१७३९) ह्या पोलंडमध्ये जन्मलेल्या अमेरिकन भाषावैज्ञानिकानें चालवलें, संस्कृति आणि भाषा यांचें निकटचें नातें कसें आहे हें दाखवून त्यानें एथ्नोलिंग्विस्टिक्स ह्या ज्ञानशाखेची मुहूर्तमेढ रोवली. लेनर्ड ब्लूमफील्ड (१८८७–१९४९) ह्या अमेरिकन भाषावैज्ञानिकानें एकोणिसाव्या शतकातल्या ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा जो टिकाऊ भाग होता तो वेगळा करून त्याचा विश्लेषक भाषाविज्ञानाशी सांधा जुळवून दिला आणि पाणिनीचा आदर्श समोर ठेवून भाषाविज्ञानाच्या सिद्धांतांची एक सूत्रमय मांडणी केली. सोस्यूरच्या निकटवर्ती शिष्यवर्गानें आपल्या गुरूच्या व्याख्यानांचा लाभ ग्रंथरूपानें बाकीच्या जगाला करून देण्याची मोठीच कामगिरी केली तरी नंतरचा काळ त्यानें भाषेचा अभ्यास करण्यापेक्षा सोस्यूरचा अभ्यास करण्यातच घालवला. त्याची परंपरा खरी पुढे चालवली ती फ्रान्समधला आंत्वान मेये (१८६६–१९३६), डेन्मार्कमधला लुई ह्येल्म्स्लेव्ह (१८९९–१९६५), आणि रशियामधले निकोलाय त्रूबेत्स्कोय (१८९०–१९३८), रोमान याकोब्सन, श्चेर्बा, आणि पोलिव्हानोव्ह ह्यांनी. ब्रिटनला (आणि त्यामुळेच की काय भारतालाही) फिलॉलजीमधून लिंग्विस्टिक्स मध्ये यायला जरा वेळच लागला आणि सोस्यूर आणि हेन्री स्वीट ह्यांची आठवण काढत आणि भाषेच्या सामाजिकतेवर भर देत ब्रिटनला जाग आणायचें काम जॉन रूपर्ट फर्थ (१८९७–१९६०) यानें इमानानें केलें. सपीर आणि ब्लूमफील्ड या अनुक्रमे कविप्रकृतीच्या आणि वैज्ञानिक प्रकृतीच्या अमेरिकन विद्वानांच्या प्रेरणेनें एक रचनावाद्यांची नवी पिढीच तयार झाली— झेलिग हॅरिस, बर्नर्ड ब्लॉक, चार्ल्ज हॉकेट, जॉर्ज ट्रेगर, केनेथ पाइक हीं त्यातलीं काही ठळक नावें. ततः प्रविशति चॉम्स्की.

नोअम चॉम्स्की येता झाला, पाहता झाला, आणि जिंकता झाला–निदान त्याच्या सुरवातीच्या शिष्यवर्गाचें तसें म्हणणें आहे. चॉम्स्कीनें आधुनिक भाषाविज्ञानाच्या परंपरेत भर घातली आणि ती पुढे नेली ह्यात शंका नाही. पण ह्या क्रियेला मन्वंतर म्हणता येईल की नाही याबद्दल मी साशंक आहे. असो. प्रथम चॉम्स्कीनें पूर्वसूरींचें काय पुढें चालवलें किंवा कशाला उजळा दिला तें थोडक्यात पाहू—

(क) भाषाविश्लेषकाच्या समोर भाषाप्रयोग असतो, ह्या भाषाव्यवहारातून

उत्पन्न झालेले तऱ्हेतऱ्हेचे भाषेचे नमुने किंवा पाठ्यसंहिता असते. पण ह्या नमुन्यांशी थबकून भागत नाही— नमुन्यांमधले हीण काढून टाकावें लागतें (उदाहरणार्थ बोलताना आलेली जांभई किंवा धांदलीने झालेले प्रमाद) आणि प्रत्यक्ष हाती आलेल्या वाक्यांबरोबर हाती न आलेलीं संभाव्य वाक्येंही हिशोबात घ्यावीं लागतात. वर्णांच्या आणि पदांच्या मर्यादित निधीमधून असंख्य वाक्यांचा अमर्याद निधीच भाषा उभारते आणि तोही विधिवत्. आपण अखेर विश्लेषण करतो तें या किंवा त्या भाषेच्या नमुन्याचें किंवा पाठ्याचें नव्हे तर या विधीचें.

(ख) भाषावैज्ञानिकाच्या अभ्यासाचा विषय भाषाप्रयोग नव्हे, भाषाप्रयोग ज्याच्यामुळे शक्य होतो तें भाषाप्रभुत्वही नव्हे, तर ह्या सर्व प्रत्यक्षांच्या पलीकडची त्यांना आधारभूत अशी परोक्ष व्यवस्था. मूल भाषा शिकतें म्हणजे अखेर ही व्यवस्था आत्मसात् करतें.

(ग) ही व्यवस्था कोणती हें ठरवायचें तें वस्तुनिष्ठ पुराव्यानिशी ठरवायचें, भाषा बोलणाऱ्याला काय वाटतें ह्याचा पडताळा तो प्रत्यक्ष बोलतो कसा यावरून ठरवायचें, हाती आलेल्या व्यवस्थेची इतकी रेखीव आणि सुस्पष्ट मांडणी करायची की वाचकाला त्या व्यवस्थेचा स्वतंत्रपणे पडताळा घेता यावा हीं सर्व पथ्यें तर योग्यच आहेत. पण तीं पुरेशीं नाहीत. हॅरिसप्रमाणे निश्चित शोधपद्धति बसवण्याच्या मागे लागण्यापेक्षा मांडलेल्या विश्लेषणाच्या मूल्यमापनाची पद्धति बसवणें जरूर आहे, अवलोकनामुळे हाती आलेल्या सामग्रीची अव्याप्ति आणि अतिव्याप्ति टाळून व्यवस्था लावण्यावर संतुष्ट न राहता उपपत्ति कशी लागेल याचा ध्यास घ्यायला पाहिजे, एक व्याख्यासंग्रह सिद्ध करणें पुरेसें नाही (शेवटी कोणत्याही तार्किक व्यूहाच्या बुडाशी अव्याख्यायित संज्ञा राहणारच) तर व्याकरणांचें असें एक व्याकरण सिद्ध करता आलें पाहिजे की ज्याच्यावरून आपलें प्रस्तुत व्याकरण विधिवत् झालें आहे ना हें पडताळता येईल.

पण चॉम्स्कीचें प्रतिपाद्य एवढेंच नाही. त्याने आणखी काही नव्या गोष्टींची भर टाकली—

(घ) पहिली गोष्ट म्हणजे त्याने भाषावैज्ञानिकांच्या लक्षात आणून दिलें की आपण काय बोलतो ह्याच्याबरोबर आपण काय बोलत नाही, बोलायला तयार नसतो ह्याचाही तपास करावा लागतो (उदाहरणार्थ इंग्लिशभाषी The John was in the room म्हणायला तयार नसतो) आणि आपण आपल्या किंवा इतरांच्या बोलण्यावर जी टीकाटिप्पणी करतो तिचीही नोंद घ्यावी लागते (उदाहरणार्थ पुढील वाक्यांच्या जोडीपैकी पहिल्या वाक्याबद्दल काही अडचण येणार नाही, दुसऱ्या वाक्याबद्दल इंग्लिशभाषी असें म्हणण्याची शक्यता आहे की– चालेल, पण असें कुणी सहसा म्हणाणार नाही :

(१०) (क) There was a peach in the fridge.

(ख) A peach was in the fridge.

आता indefinite article च्या कार्याबद्दल तुम्ही जें काही म्हणाल त्यात हें असें का होतें याचाही उलगडा व्हायला पाहिजे, याचीही उपपत्ति मिळवायला पाहिजे). असें केलें तरच आपलें व्याकरण अतिव्याप्ति–अव्याप्तिविरहित म्हणजेच केवळ समव्याप्त न राहता औपपत्तिक देखील ठरेल.

(ङ) एखाद्या उक्तीची अंतर्गत रचना सगळीच्या सगळी कानाला गोचर होत नाही. एखादें वाक्य मनात वाचलें तर त्याचा नीट अर्थ लागत नाही, पण मोठ्याने योग्य तें बल, सुर, आणि विराम देऊन म्हटलें तर त्याचा अभिप्राय उमजतो असें कधी कधी होतें (११ क पहा). पण नेहमीच असें होईल अशी स्थिति नाही (११ ख पहा).

(११) (क) Old men and women should be looked after.

(men वर किंचित आरोही सुर आणि विराम दिला तर 'म्हातारे आणि बायका' हा अर्थ स्पष्ट होईल.)

(ख) They are flying planes.

('तीं उडतीं विमानें आहेत' किंवा 'ते विमानें उडवत आहेत' हें बाह्य संदर्भ नसला तर गुलदस्तातच राहतें.) एका शब्दरूपाला दोन अर्थरूपें (११ क लिखित स्वरूपात, ११ ख लिखित व मौखिक स्वरूपात, ११ क मौखिक स्वरूपात पण men वर आरोही सुर व विराम न देता) किंवा दोन शब्दरूपांना एकच अर्थरूप (१२ क, ख) असा प्रकार पुष्कळदा होतो याची भाषेचें व्याकरण लिहिताना दखल घ्यायला पाहिजे.

(१२) (क) Was John not in the room ?

(ख) Wasn't John in the room ?

(च) एखाद्या वाक्याचें शब्दरूप आणि त्याचें अर्थरूप यांचा नेहमीच मेळ बसतो असें नाही. (उदाहरणार्थ १२ क, १२ ख ह्या दोन्ही वाक्यात अर्थरूपाच्या पातळीवर in the room चा संबंध was च्या मार्फत John कडे पोचतो आहे, आणि not किंवा n't चा संबंध was in the room च्या मार्फत John was in the room कडे पोचतो आहे.) काही वाक्यात तो मेळ सहजपणे बसतो. (उदाहरणार्थ ११ क च्या तुलनेने १३ क, १३ ख किती तरी पारदर्शक आहेत.

(१३) (क) Old men should be looked after and women should be looked after too.

(ख) Old men should be looked after and old women should be looked after too.

म्हणजे अर्थाच्या पातळीवर ११ क ची रचना कधी १३ क सारखी तर कधी१३ ख सारखी राहील.)

(छ) भाषा ही स्वयंस्पष्ट असते आणि भाषा ही प्रथम भाषा असते हें सगळें खरें. भाषेभाषेत फरक असतो. त्यामुळे एका भाषेतला मजकूर जसाच्या तसा दुसऱ्या भाषेत उतरवता येत नाही. फार काय एका भाषेतला मजकूर त्याच भाषेत पण दुसरी एखादी भाषा बोलणाराने सांगितला तरी उच्चारात फरक पडतो. इंग्लिश माणूस मराठी कितीही सफाईने बोलला तरी त्याचे मराठी उच्चार इंग्लिश वळणाचे राहतात. हें सगळें खरें. तरी भाषाभाषांची भाषांतरीय तुलना संभवते. भाषाभाषांमध्ये, किंबहुना सर्वच मानवी भाषांमध्ये, काही साम्यें असतात. उदाहरणार्थ शब्दांगाच्या पातळीवर स्वरव्यंजनभेद आणि वाक्यबल, वाक्यसुर सगळ्या भाषांतून सापडतात; रूपांगाच्या पातळीवर द्रव्यपद (नाम) आणि क्रियापद हा भेद आणि अस्तिपक्ष–नास्तिपक्ष हा वाक्यभेद सगळ्या भाषांतून सापडतात; अर्थांगाच्या पातळीवर मीतू आणि इतर हा भेद आणि गतकाळ आणि अ–गतकाळ हा भेद सगळ्या भाषांतून सापडतात. चॉम्स्कीचें म्हणणें–हीं साम्यें काय थोडीं आहेत? भाषेची सांकेतिकता लक्षात घेता तर खूपच आहेत. खूपच आहेत तर का बरें खूपच आहेत? ह्या अखेरच्या प्रश्नाचें चॉम्स्कीप्रणीत उत्तर जरी पत्करण्याजोगें वाटलें नाही तरी तो प्रश्न डावलता येणार नाही. मुद्द्याचा प्रश्न विचारणें ही तर विज्ञानाच्या प्रगतीची पहिली पायरी असते. (चॉम्स्कीप्रणीत उत्तर असें आहे की हीं साम्यें खूपच आहेत कारण माणसाच्या मनात काही जन्मजात कल्पना असतात. काहींना हें उत्तर चुकीचें वाटतें, तर काहींना अशी शंका येते की ह्या उत्तराचें खरें स्वरूप 'हीं साम्यें खूप असतात म्हणून खूप असतात' एवढेंच आहे! म्हणजे प्रश्न शिल्लकच राहतो.)

आधुनिक भारत आणि कंपॅरटिव्ह फिलॉलजी

सांगायला आनंद वाटतो की आधुनिक भाषाविज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जे चिंतनाचे आणि वादावादीचे विषय दिसतात त्यातले अनेक प्राचीन भारतामधल्या विचारवंतांमध्येही दिसतात. मात्र आज आपण ज्यांना भाषावैज्ञानिक प्रश्न म्हणू ते पूर्वी शिक्षा, व्याकरण (किंवा शब्दशास्त्र), मीमांसा (किंवा वाक्यशास्त्र), न्याय (किंवा तर्कशास्त्र), आणि साहित्यशास्त्र (किंवा अलंकारशास्त्र) ह्या ज्ञानक्षेत्रात विखुरलेले किंवा पुनरुक्त झालेले दिसतात.

सांगायला वाईट वाटतें की आम्ही प्राचीन भारताचा वारसा सांगणाऱ्यांनी भाषेच्या सैद्धांतिक अभ्यासाकडे दुर्लक्ष केलें. आम्ही फक्त अनुकरण केलें– कधी विदेशी लोकांचे कधी स्वदेशी लोकांचें, पण अनुकरणच. ह्यांतून पुढे जायचें तर आधुनिक

भाषाविज्ञान आणि प्राचीनांचा भाषाविचार खऱ्या अर्थानें आपलासा केला पाहिजे. नुसता भयमिश्रित दबदबा किंवा भाबडें कौतुक नको, तर चिकित्सक जिज्ञासा हवी. आणि ही जिज्ञासा अखेर पाणिनि, भर्तृहरि, ब्रुगमान, सोस्यूर, चॉम्स्की यांच्याबद्दल नव्हे तर भाषेबद्दल, तुमच्याआमच्या बोलण्यासवरण्याबद्दल.

आधुनिक भारताच्या आधुनिकतेला विद्येच्या क्षेत्रात सुरवात होते ती भारतीयांचा संपर्क पाश्चात्य विद्येशी आल्यावर. पाश्चात्य पुरातत्त्ववेत्त्यांनी भारताच्या पुराणविद्येचे भांडार उपसण्यासाठी हिंदु पंडित किंवा मुस्लिम मौलवी यांची मदत घ्यायला सुरवात केली. मात्र हें नातें एकतर्फीच राहिलें. पारंपरिक भारतीय विद्वानाची भूमिका दुय्यमच राहिली, कधीकधी तर हे विद्वान् फक्त पढीकच होते, कसेंही असो ह्या सर्वच विद्वानांनी माहितीची देवाण केली, मर्मज्ञानाची देवाण फारशी केली नाही, घेवाण तर कसलीच केली नाही. दुर्दैवानें आजही ह्या पारंपरिक विद्वानांचें स्थान दुय्यमच आहे, फक्त त्याची मदत घेणारा साहेब कधी गोरा असतो तर कधी काळासावळा असतो. भाषेच्या अभ्यासापुरतें पाहिलें तरी ह्या क्षेत्रात अजूनही पुरातत्त्वअन्वेषणाची ओढ टिकून आहे.

पाश्चात्यविद्याविभूषित भारतीय विद्वानांचें काय? आपल्याला ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठी १८५७ साली आधुनिक विद्यापीठें स्थापन होऊन त्यांच्यातून बाहेर पडलेल्या विद्वानांची पहिली पिढी येईपर्यंत थांबावें लागतें. त्यांनी मुंबईच्या आणि कलकत्त्याच्या एशिॲटिक सोसायट्यांमधून होणाऱ्या चर्चासत्रांमधून भाग घ्यायला सुरवात केली. त्यांच्यापैकी काहींनी जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स देशी जाऊन पुढचें शिक्षण घेतलें. मुंबईहून १८७२ पासून एक संशोधनपत्रिका निघू लागली. तिचें संपूर्ण नाव Indian antiquary : A Journal of oriental research in archaeology, epigraphy, ethnology, geography, history, folklore, languages, literature, numismatics, philosophy, religion &c. &c. ह्या पहिल्या कालखंडात (१८७७–१९१९) भाषांच्या अभ्यासाला प्राच्यविद्येच्या पसाऱ्यात असें आंग चोरून बसावें लागायचें. १८७७ सालाचें महत्त्व अशासाठी की त्या साली मुंबई विद्यापीठात मराठी भाषेचे अभ्यासक आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. जॉन विल्सन (मृ. १८७५) ह्यांच्या स्मरणार्थ विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चर्जची माला पहिल्यांदा गुंफली गेली आणि ती डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांच्याकडून. भांडारकर, जॉन बीम्ज, रुडॉल्फ ह्योर्न्ले, आणि द्राविडी भाषांचे अभ्यासक रॉबर्ट कॉल्ड्वेल ह्यांनी मिळून भारतीय उपखंड म्हणजे दक्षिण एशिया ह्या भूप्रदेशातल्या भाषांच्या अर्वाचीन अभ्यासाचा पाया घातला. भांडारकरांच्या आधी प्राच्यविद्या आणि संस्कृत यांचा पाश्चात्य वळणानें अभ्यास करणारे राममोहन राय ह्यांच्यासारखे विद्वान होऊन गेले नाहीत असें नाही, पण कंपॅरटिव्ह

फिलॉलजीचा अभ्यास करणारे ते पहिले भारतीय होते. ह्या कालखंडात भाषांचा अभ्यास मुख्यतः ऐतिहासिक वळणाने झाला, स्वनविचार आणि पदविचार यावर भर राहिला, आणि क्षितिज मुख्यतः भारतीय–यूरोपीय कुल, त्यातल्या त्यात भारतीय–इराणी उपकुल, त्यातल्या त्यात भारतीय–आर्य उप–उपकुल, आणि त्यातल्या त्यात संस्कृत ह्यांच्यापुरतें मर्यादित राहिलें. ही अवस्था जवळजवळ अशीच्या अशीच पुढच्या कालखंडातही कायम राहिली आणि त्याबद्दल वि. स. सुकथनकर ह्यांनी १९४१ साली अखिल–भारतीय– प्राच्यविद्या– परिषदेत तीव्र शब्दात खंत व्यक्त केली आहे : आपल्या पिढीबद्दल ते म्हणतात, " We are so conservative– and I may even say, intellectually so inert and slothful–that it never occurs to any one of us to study any language outside our special, hallowed system of languages. " (" आपण इतके जैसेथेवादी आहोत– मी तर म्हणेन बौद्धिक जीवनात इतके जड आणि सुस्त आहोत— की आपल्यापैकी कुणाच्या मनातही येत नाही की आपापल्या पूजनीय भाषापरिवाराबाहेरच्या एखाद्या भाषेचा अभ्यास करावा. ") सामान्यतः हिंदू अरबी– फारसीमध्ये, मुस्लिम संस्कृत-मध्ये, उत्तर भारतीय द्राविडी भाषांमध्ये, आणि गैर–पारशी मंडळी अवेस्ता–पह्लवी-मध्ये लक्ष घालणार नाहीत. भारतातल्या आदिवासी भाषांचा अभ्यास ख्रिस्ती धर्मो-पदेशक आणि गोरे लष्करी– मुलकी अधिकारी ह्यांच्यावर सोडला गेला. दक्षिण एशियाच्या बाहेरच्या भाषांचें तर नावच नको— अगदी ग्रीक, लॅटिन ह्या पाश्चात्य अभिजात भाषा आणि तिबेटी, चिनी ह्या शेजारी भाषा यांचें देखील.

पुढचा कालखंड (१९१९–५४) झुल ब्लॉक ह्यांच्या ' ला फॉर्मास्यों द ला लांग मारात ' (मराठी भाषेची घडणूक) ह्या ग्रंथापासून सुरू होतो असें मानायला हरकत नाही. फ्रीड्रिख माक्स म्युलरच्या पायघोळ, ईषत्– रोमँटिक विचारबंधाची पकड अखेर ढिली झाली. संस्कृतचे खूपच स्तोम माजवणाऱ्या त्याच्या ' लेक्चर्स ऑन द सायन्स ऑन लँग्वेज ' (१८६२–६) ह्या ग्रंथाची मोहिनी भारतीयांच्या नव्या राष्ट्रीय अस्मितेस सुखावणारी होती यात शंका नाही. एकुणिसाव्या शतकाच्या उत्त-रार्धात पाश्चात्यांच्या ऐतिहासिक भाषाभ्यासाला Junggrammatiker (तरुण वैया-करण मंडळी) गटामधल्या ब्रुगमान आदि संशोधकांनी वैज्ञानिक पाया दिला. दक्षिण एशियामधील भाषांचा अभ्यास करणाऱ्या मंडळींना त्याची खबर थोडी उशिरा म्हणजे ह्या कालखंडात लागली. १९१९ सालाच्या सुमारास ब्लॉकच्या ग्रंथाच्या प्रका-शनाखेरीज इतरही गोष्टी घडल्या. १९१३ साली कलकत्ता विद्यापीठात कंपॅरटिव्ह फिलॉलजीचे अध्यासन स्थापले गेलें, त्यावर १९१७ मध्ये प्रथम भारतीय व्यक्तीची नेमणूक झाली– आय्. जे. एस्. तारापोरवाला ह्यांची. १९२१ मध्ये लंडन विद्या-पीठाने सुनीतिकुमार चाटार्जी ह्या तरुण अभ्यासकाला त्याच्या ' द ऑरिजिन अँड

डिव्हेलपमेंट ऑव्ह द बेंगाली लँग्विज ' ह्या प्रबंधाबद्दल डी. लिट्. पदवी दिली. चाटार्जी यांनी नंतर (१९२२–५२) कलकत्त्याचें तें अध्यासन भूषविलें आणि भाषा-विज्ञानाच्या आंतरराष्ट्रीय नकाशात भारताला स्थान मिळवून दिलें. इतर भारतीय भाषांच्या उद्‌गम आणि विकासाबद्दल मग लिहिलें गेलें. पहिली भारतीय प्राच्यविद्या-परिषद् पुण्याला १९१७ साली स्थापन झालेल्या भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन–मंदिराच्या पुढाकाराने १९१९ साली भरली. पां. दा. गुणे यांच्या ' इंट्रोडक्शन टु कंपॅरटिव्ह फिलॉलजी ' (१९१८) ह्या पुस्तकाने अनेक पिढ्या विद्यार्थ्यांना ह्या विषयाचे पाठ दिले–त्याच्याबरोबर ए. सी. वुल्नरचें 'इंट्रोडक्शन टु प्राक्रिट ' (१९१७), ऑटो येस्पर्सनचें ' लँग्विज ' (१९२२), जोझेफ व्हांद्रियेसचें ' ल लांगाझ ' (१९२१, इंग्लिश अनुवाद १९३१), आणि आय्. जे. एस्. तारापोरवालांचे ' एलिमेंट्स ऑव्ह द सायन्स ऑव्ह लँग्विज ' (१९३१) ह्याही भारतात लोकप्रिय झालेल्या पाठ्य-पुस्तकांचा उल्लेख करायला पाहिजे. (दुर्दैवाने आम्ही येस्पर्सनच्या ' द फिलॉसफी ऑव्ह ग्रॅमर ' १९२४ आणि ' ॲनालिटिक सिंटॅक्स ' १९३७ ह्या अधिक मौलिक पुस्तकांची ओळख करून घेतली नाही.) दक्षिण एशियामधील भाषांच्या अभ्या-सकांची ह्या कालखंडातील पिढी म्हणून ब्लॉक, चाटार्जी ह्यांच्याखेरीज एल्. पी. तेस्सितोरी, रॅल्फ टर्नर, सिद्धेश्वर वर्मा, बाबूराम सक्सेना, धीरेंद्र वर्मा, आणि एल्. व्ही. रामस्वामी ऐयर ह्यांचा उल्लेख करावा लागेल. प्रशासकाने विद्येच्या क्षेत्रात नाव कमावण्याच्या ब्रिटिशांच्या परंपरेत बसणारे जॉर्ज एब्रहॅम ग्रियर्सन ह्यांनी स्टेन कोनौ ह्यांच्या मदतीने भारतीय–भाषा– सर्वेक्षण (१९०३–२८) ह्या भव्य प्रकल्पाची सांगता ह्याच काळात केली. आज ती परंपरा चालवणारे एकदोनच आय्. ए. एस्. अधिकारी दिसतात. त्याचा परिणाम कालांतराने दिसून प्रमाणेतर बोली आणि अलिखित भाषा ह्यांचा अभ्यास अधिक कसोशीने होऊ लागला. आंतरराष्ट्रीय स्वनलिपीची ओळख भारतीयांना करून देण्याचें श्रेय ग्रेअम बेली (' ए पंजाबी फोनेटिक रीडर ' १९१४) व चाटार्जी (' अ ब्रीफ स्केच ऑव्ह बेंगाली फोनेटिक्स ' १९२१) ह्यांच्याकडे जातें. ह्या कालखंडाचा हा आढावा पुरा करताना आणखी एका घटनेचा उल्लेख करायचा आहे. एकुणिसाव्या शतकापासून हळूहळू प्रमाण–भाषांचीं व्याकरणें आणि शब्दकोश यांची निकड विविध कारणांमुळे जाणवू लागली—प्रादेशिक भाषांमध्ये अर्वाचीन साहित्याची निपज, जुन्या काळातली पद्यावरची भिस्त कमी होऊन नव्या गद्यभाषेचें होणारें प्रमाणीकरण, यूरोपीय अधिकारी व धर्मोपदेशक यांची नड, शालेय आणि विद्यापीठीय शिक्षणात प्रादेशिक भाषांचें वाढतें महत्त्व (उदाहरणार्थ उच्च–माध्यमिक अवस्थेत मराठी माध्यम, बी. ए. व एम्. ए. साठी विषय म्हणून मराठीला मान्यता), आणि प्रादेशिक अस्मितेची जोपासना ह्या सर्वांचा एकत्रित परिणाम पहिल्या व दुसऱ्या कालखंडात दिसून येतो. मराठीपुरता विचार करायचा तर दादोबा पांडुरंग,

नवलकर, दामले ह्यांची एकभाषिक व द्वैभाषिक व्याकरणें आणि मोल्ज्वर्थ–कॅंडी, दाते–कर्वे यांचे द्वैभाषिक व एकभाषिक शब्दकोश यांचा उल्लेख करता येईल. मात्र ह्या व्याकरणांवर व कोशांवर वैज्ञानिक पद्धतीचे संस्कार दिसत नाहीत (वि. का. राजवाड्यांची दामल्यांच्या व्याकरणावरची टीका पहावी). ह्यांच्या मागोमाग प्रादेशिक भाषांत भाषाविज्ञानाचीं लोकप्रिय पाठ्यपुस्तकें निघालीं. ह्या सगळ्यांची भौगोलिक आणि कालक्रमिक पाहणी केली तर कोणता प्रदेश केव्हा ब्रिटिश अमलाखाली आला, प्रादेशिक संस्कृति आणि विद्याभ्यास यांची वाढ कशी झाली, आणि वाघिणीच्या दुधापासून कोणत्या प्रदेशातले लोक केव्हा दूर झाले याचा छडा लावणें उद्बोधक होईल.

आधुनिक भारत आणि आधुनिक भाषाविज्ञान

तिसऱ्या म्हणजे सध्याच्या कालखंडाची सुरवात १९५४ साली पुण्याच्या डेकन कॉलेजच्या पुढाकाराने झालेल्या लिंग्विस्टिक सोसायटी ऑव्ह इंडिया ह्या संस्थेच्या पहिल्या स्वतंत्र अधिवेशनापासून धरता येईल. (१९२८ पासून ही संस्था प्राच्य-विद्यापरिषदेशी संलग्न होती.) १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे भारत आणि इतर जग ह्यांच्यातील विद्येच्या क्षेत्रामधील संपर्क मुदलातच पालटून गेला. त्यात आतापर्यंत डोकावणारा अवघडलेपणा जाऊन एक निकोपपणा येणें शक्य झालें. उदाहरणार्थ पाश्चात्य विद्वानाला आता तुच्छता किंवा भारताबद्दल जादा कैवार दाखवायचें कारण उरलें नाही आणि भारतीय विद्वानाला विद्याविनय आणि स्वाभिमान ह्यांची सांगड घालताना राष्ट्रप्रेमाच्या अस्थानी प्रदर्शनाचा मोह राहिला नाही. भारतीयांना आणखी असाही उमज पडतो आहे की बाह्य जगाकडे पहायला इंग्लिश भाषा ही काही एकच खिडकी नाही आणि इंग्लंड, जर्मनी, आणि फ्रान्स एवढ्याच देशात काही विद्वत्ता साठवलेली नाही. रॅल्फ टर्नर ह्यांच्या अध्यक्षतेखाली डेकन कॉलेजमध्ये भाषातज्ज्ञ आणि भारतीय शिक्षणतज्ज्ञ यांची १९५३ मध्ये बैठक झाली, आणि तिच्यात भारतीय तरुणांना आधुनिक भाषाविज्ञानाचें शिक्षण देण्यासाठी जारीने कार्यक्रम आखण्यावर आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीवर आधारलेल्या एका नव्या भारतीय भाषा-सर्वेक्षणाची पूर्वतयारी करण्यावर जोर देण्यात आला. सुदैवाने ह्या निश्चयाला न्यूयॉर्कच्या रॉकफेलर प्रतिष्ठानाकडून आर्थिक पाठबळ मिळून डेकन कॉलेजमधील भाषाप्रकल्प (१९६४–९) उभा राहिला आणि उन्हाळी सत्रांच्या द्वारे भाषाविज्ञानाचें शिक्षण मिळू लागलें. सोस्यूर–सपीर–ब्लूमफील्ड ह्यांच्यासारख्यांनी घडवून आणलेल्या मन्वंतराचें लोण उशिरा का होईना भारतापर्यंत पोचलें. भारतापाठोपाट पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ ह्याही देशात ह्या नव्या विद्येचा शिरकाव झाला आहे, आणि पाकिस्तान सोडून या इतर देशांतील तरुण अभ्यासक आज भारतात या विषयाच्या

शिक्षणासाठी येऊ लागले आहेत. भारतात आज पंधराच्या वर विद्यापीठांत स्वतंत्र भाषाविज्ञानविभाग आहेत— ज्या ठिकाणी अगदी परवापर्यंत कलकत्ता विद्यापीठ हें एकच केंद्र होतें. पहिली अखिल भारतीय भाषाविद् परिषद् लिंग्विस्टिक सोसायटी ऑव्ह इंडियाच्या विद्यमाने डेकन कॉलेज, पुणें येथे १९७० साली चाटार्जी ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाली व सोसायटीची सुवर्णजयंती १९७८ साली दिल्ली येथे देवीप्रसन्न पट्टनायक ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली. भारताच्या विद्याक्षेत्रीय नकाशात एकदाचें भाषाविज्ञानाला शेकडो वर्षांच्या मध्यंतरानंतर पुन्हा एकदा स्थान मिळालें. (प्रस्तुत लेखकाला भाषाविज्ञान ही काय भानगड आहे बुवा ह्या पृच्छेला हल्ली कमी वेळा तोंड द्यावें लागतें. महाराष्ट्राने मात्र या ज्ञानगंगेकडे जरा पाठच फिरवलेली दिसते.)

ह्या सर्व खटाटोपाला एक नवें व्यावहारिक अधिष्ठानही आता मिळालें आहे. ज्ञान हें पवित्र खरें, पण तें एक सामर्थ्यही आहे. अक्कलवंताला गरज नसते. भारतीय उपखंडामधील भारतादि देशांपुढे विविध भाषिक प्रश्न आहेत आणि अधिकाधिक लोकांना अधिकाधिक भाषा अधिकाधिक परिणामकारक रीतीने शिकवण्याची गरज अधिकच जाणवते आहे. हे प्रश्न सोडवताना आणि ही गरज भागवताना भाषावैज्ञानिकांची मोठ्या प्रमाणावर मदत घ्यावी लागणार आहे. प्रादेशिक किंवा राष्ट्रीय पातळीवरच्या भाषिक दुरभिमानाचा गढूळपणा ह्या विद्याक्षेत्रात येऊ न देण्यासाठी जागरूक मात्र राहिलें पाहिजे. ह्या संदर्भात एका सुचिह्नाचाही उल्लेख करायला पाहिजे. गणित, भौतिक विज्ञान, अभियांत्रिकी ह्या क्षेत्रांमधली मंडळी भाषेकडे आकर्षित होऊ लागली आहेत. (जैविक विज्ञान, मानव्य विज्ञान, आणि वैद्यक ह्या क्षेत्रांमध्ये मात्र अजून आधुनिक भाषाविज्ञानाचें वारें पोचलेलें दिसत नाही.)

भारताला भाषाविज्ञानाचें जन्मस्थान म्हणतात आणि भाषांचें म्यूझियम म्हणतात, मात्र भाषाविज्ञानाचें एक महत्त्वाचें जागतिक केंद्र म्हणण्याची वेळ जवळ यायची असेल तर प्राचीन भारतीयांकडून आणि पाश्चात्यांकडून आपल्याला मिळालेलें भांडवल बँकेत न गोठवता खेळतें केलें पाहिजे आणि तें व्यावहारिक प्रश्न सोडवण्यातही गुंतवलें पाहिजे. आमचा आळस आणि आत्मसंतुष्टता, आमचा कूपमंडुकपणा आणि बुजरेपणा झडझडून दूर केला पाहिजे.

भाषेचें नियमन

भाषा आणि बोली

‘ भाषा ’ आणि ‘ बोली ’ हे खरें म्हटलें तर समानार्थक शब्द. उदाहरणाथ ‘ मातृभाषा ’ आणि ‘ मायबोली ’ हीं दोन्ही mother–tongue ह्या एकाच इंग्लिश शब्दाचीं भाषांतरें [1] : एक प्रौढ, भारदस्त, दुसरें साधें, जिव्हाळ्याचें एवढेंच. परंतु language आणि dialect ह्यांमधील फरक मराठीत दर्शवायची जरूर भासली तेव्हा dialect ला सुचवले गेलेले ‘ पोटभाषा ’ आणि ‘ विभाषा ’ हे पर्याय मागे पडून ‘ भाषा ’ आणि ‘ बोली ’ ही जोडी पुढे आली. ही परिस्थिती लक्षात घेता ‘ भाषा ’ आणि ‘ बोली ’ ह्यांच्यामधील तांत्रिक अंतर समजावून घ्यायचें तर language आणि dialect ह्या मूळ शब्दांकडे आपल्याला गेलें पाहिजे.[1]

प्राचीन ग्रीसमध्ये निरनिराळ्या प्रदेशांमध्ये स्थिर झालेले भाषाप्रकार सुरवातीला समान दर्जाने साहित्यात वापरले जात असत. त्याना एकत्र बांधणाऱ्या गोष्टी दोन– ह्या भाषाप्रकारांचा उगम एकच असल्यामुळे त्यांच्यामध्ये पुष्कळ सारखेपणा होता आणि त्यांचा पाया जरी प्रादेशिक असला तरी साहित्यात त्या ग्रीसभर ओळखल्या जात होत्या. म्हणजे स्पार्टामधील लेखकांनी डॉरिकमधून लिहायचें, अथेन्समधील लेखकांनी ॲटिकमधून लिहायचें अशी परिस्थिती नव्हती; तर ट्रॅजिडी लिहायची तर ॲटिकमध्ये (मग ती लिहिणारा अथेन्सचा असो वा नसो), समूहगीत (chorallyric) लिहायचें तर तें डॉरिकमध्ये, इतिहास लिहायचा तर आयॉनिकमध्ये,[2] ह्याप्रमाणे. (अशा प्रकारची व्यवस्था भारतीयांना अपरिचित नाही. प्राकृताच्या प्रादेशिक नावे असलेल्या उपप्रकारांची थोडोबहुत अशीच स्थिती होती. मध्ययुगीन उत्तरभारतीय साहित्यातही कृष्णभक्ती गायची तर ब्रजमध्ये, रामकथा सांगायची तर अवधीमधे,


---

१. ह्यामुळे प्रा. रा. श्री. जोग आवर्जून ‘ स्व-भाषा ’ असा शब्द वापरतात.

२. ‘ यावनी ’ म्हणजे खरे तर Ionic.

निर्गुण भक्तीचा आविष्कार सधुक्कडीमध्ये अशी काहीशी वाटणी आढळते.)[1] मात्र नंतरच्या काळात अथेन्सचें प्राबल्य वाढलें आणि ग्रीक संस्कृतीचा फैलाव ग्रीसबाहेर झाला ह्यामुळे व्यापार, विचारांची देवाणघेवाण इत्यादि गोष्टींमध्ये हे dialektos म्हणून ओळखले जाणारे भाषाप्रकार मागे पडले, आणि त्यातल्या त्यात ॲटिकला जवळ असणारा एक संमिश्र भाषाप्रकार koine dialektos (म्हणजे 'सामान्य भाषाप्रकार') ह्या नावाने पुढे आला. (बायबलचा नवा करार मूळ ह्याच भाषाप्रकारात लिहिला गेला; आणि ह्याचेच 'परिवर्तित रूप' म्हणजे आधुनिक ग्रीक.)

म्हणजे language आणि dialect ही जोडी दोन निरनिराळ्या स्वरूपांत आपल्यासमोर येते. एक स्वरूप असे—language म्हणजे उगमस्थानी असलेला भाषाप्रकार किंवा त्याच्या विघटनातून जन्मलेल्या भाषाप्रकारांचा समूह, आणि dialects म्हणजे ह्या समूहातील एकाच पातळीवरच्या सदस्य.




ह्या पद्धतीने बोलायचें तर मराठी, व्रज, गुजराती ह्या इंडो–एरियन भाषाकुलातील काही बोली आहेत किंवा संस्कृत भाषेच्या एक पश्चिमेकडील आणि एक पूर्वेकडील अशा दोन बोली होत्या असें म्हणायला प्रत्यवाय नाही. भाषा आणि बोली ह्यांमध्ये जनक–जन्य–भाव किंवा सामान्य–विशेष–भाव ह्याप्रमाणे मानला जातो. ह्या जोडीचें दुसरें स्वरूप निराळें आहे—language म्हणजे निरनिराळ्या भाषाप्रकारांना (किंवा अधिक बिनचूक बोलायचें म्हणजे ते भाषाप्रकार बोलणाऱ्या लोकांना) एकत्र आणणारा मान्य असा भाषाप्रकार किंवा त्याच्या वर्चस्वाखाली असलेल्या भाषाप्रका-

---

१. 'सधुक्कडी' म्हणजे जिच्यावर खडी बोलीचे संस्कार झालेले आहेत अशी व्रज; 'पिंगल' म्हणजे जिच्यावर राजस्थानीचे संस्कार झाले आहेत अशी व्रज. तुलसीदास ह्यांनी विषयानुसार अवधी आणि व्रज या दोन्हींचा उपयोग आपल्या काव्यलेखनात केलेला दिसतो.

रांचा समूह, आणि dialects म्हणजे हें वर्चस्व मानणारे भाषाप्रकार.[1] भाषा आणि बोली ह्यांमध्ये येथे उच्च–नीच–भाव किंवा गट–सदस्य–भाव अभिप्रेत आहे.



ही जी मान्य झालेली प्रमाण-बोली ती ऐतिहासिकदृष्ट्या (क) एका विशिष्ट प्रदेशाची बोली असेल किंवा (ख) एका विशिष्ट वर्गाची बोली असेल किंवा (ग) ह्या बोलीच्या उगमस्थानी असलेली परंतु घरगुती वापरातून नष्ट झालेली जी जनक–बोली तिचे लेखनामुळे स्थिर झालेलें स्वरूप असेल किंवा (घ) अजिबात बाहेरचीच एक बोली असेल. (ह्याची उदाहरणें म्हणजे अनुक्रमे–(क) प्रमाण इंग्लिश मूळची आग्नेय इंग्लंडची बोली, (ख) प्रमाण–चिनी ही मूळचीं बेइजिंगमध्ये शिक्षण घेऊन देशभर पसरलेल्या बादशहाच्या सनदी नोकरांची (mandarins) , (ग) आजची प्रमाण–तेलुगु ही मूळची तेराव्या शतकात बोलली गेलेली तेलुगु[2], (घ) प्रमाण–इंडोनीशियन म्हणजे मलायामधील मेलायू भाषेचें एक रूप.) ह्या दुसऱ्या सरणींने बोलायचें झालें तर (आणि तरच) ब्रज, अवधी, भोजपुरी इत्यादी हिंदी भाषेच्या बोली आहेत असे म्हणता येईल.

ह्या दोन सरणींची गल्लत होऊन language आणि dialect ह्यांच्या वापरामध्ये आधीच असलेली संदिग्धता आणखीनच वाढली आहे आणि मराठीमध्येही ' भाषा ' आणि ' बोली ' ह्या संज्ञांच्या बाबतीत ती संदिग्धता उतरली आहे.

---

१. हें वर्चस्व मानणाऱ्या भाषाप्रकारांना जर एके काळी असलेली पण नंतर अस्तंगत झालेली स्वतंत्र लिखित साहित्याची परंपरा असेल तर त्यांना हिंदीमधील ' पडी बोली ' हे नाव अन्वर्थक आहे. चौदाव्या शतकानंतर फ्रेंचमध्ये dialects ची प्रतिष्ठा लयास गेली आणि त्यांना patois म्हणू लागले.

२. आंध्र प्रदेशामधील नवी पिढी या बोलण्यातून नाहीशा झालेल्या प्रमाण बोलीचें वर्चस्व झुगारून विजयवाड्याच्या आसपासच्या आजच्या बोलीला तिचें स्थान देण्याच्या खटपटीत आहे हें मात्र येथे नमूद करायला हवें. ' ग्रांथिक ' तेलुगु आणि प्रादेशिक 'व्यावहारिक' बोली यांच्यामधली 'शिष्टव्यावहारिक' तेलुगु 'ग्रांथिक' तेलुगुऐवजी यायला पाहिजे असें या पिढीचें म्हणणें वास्तवात उतरत आहे.

परिभाषानिश्चिति

ही संदिग्धता टाळण्यासाठी आपल्याला पुढीलप्रमाणे अर्थ निश्चित करता येतील :

बोली—कोणताही एकजिनसी भाषाप्रकार.[१]

प्रमाण–बोली—जी बोली सार्वजनिक व्यवहार, लिखित साहित्याची निर्मिति इत्यादि कामासाठी वापरायला इतर बोली बोलणारे लोक तयार असतात अशी बोली.

जनक–बोली—ज्या बोलीमध्ये परिवर्तन आणि विघटन होऊन उत्तरकालीन इतर काही बोली उत्पन्न झाल्या असें मानता येते अशी बोली.

बोली–कुल—एका (जनक) बोलीपासून उत्पन्न झालेल्या बोलींचा समुदाय (मग त्या एक प्रमाण–बोलीचें वर्चस्व मानोत वा न मानोत). अशा काही जनकबोलींची जनकबोली मिळाली तर अनेक बोली–कुलें एका मोठ्या बोलीकुलाच्या पोटात सामावलेली राहतील हें उघड आहे.

बोली–क्षेत्र—एका (प्रमाण) बोलीचें वर्चस्व मानणाऱ्या बोलींचा समुदाय (मग त्यांचें एक समग्र बोली–कुल बनलेलें असो वा नसो).[२] कोणत्याच बोली–क्षेत्रात समाविष्ट न होणाऱ्या बोली असू शकतात.

वाचन–बोली— जी मुख्यतः किंवा पूर्णतः लिहिणें आणि लिहिलेलें वाचणें ह्याच पद्धतीने वापरली जाते अशी बोली. (अभ्यासिली जाणें आणि वापरली जाणें ह्या दोहोंत अर्थातच अंतर आहे.)

एखाद्या व्यक्तीची प्रारंभिक–बोली—एखाद्या व्यक्तीने लहानपणी बोलायला शिकतानाच जी बोली आत्मसात् केली ती त्या व्यक्तीची प्रारंभिक–बोली. साधारणतः एका व्यक्तीला एकच प्रारंभिक–बोली असते. ह्या काटेकोर अर्थाने प्रमाण–हिंदी ही जगात फारच थोड्या लोकांची प्रारंभिक–बोली आहे; त्याचप्रमाणे आज तरी महाराष्ट्रातील थोड्या लोकांचीच प्रमाण–मराठी ही प्रारंभिक–बोली आहे. संस्कृत किंवा अभिजात–अरबी ह्या आज कुणाच्याच प्रारंभिक–बोली नाहीत.

एखाद्या व्यक्तीची स्व-बोली—एखाद्या व्यक्तीला जी बोली वापरताना चुका होतील म्हणून दिक्कत वाटत नाही ती त्या व्यक्तीची स्व–बोली. प्रारंभिक–बोली ही बहुशः जन्मभर स्व–बोली राहते, स्व–बोली प्रारंभिक–बोली असेलच असें नाही.

---

१. ह्याच अर्थाने प्रस्तुत लेखकाने अन्यत्र microlect हा शब्द सुचवला आहे.

२. बोली–कुल आणि बोली–क्षेत्र ह्यांतील फरक महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र आणि गोवा ह्या प्रदेशांतील बोलींचे एक बोली–कुल बनतें किंवा नाही हें अभ्यासकांनी शोध घेऊन ठरवायचें आहे; पण त्या बोलींचे एक बोली–क्षेत्र बनतें किंवा नाही हे त्या प्रदेशातील लोकांनी ठरवायचें आहे. दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें वेगवेगळीं येऊ शकतील.

एखाद्या समाजाची स्व–प्रमाण–बोली—एखाद्या बोलीक्षेत्रातील समाजातील बहु-संख्य लोक—निदान नेतेवर्गातील सर्व लोक—जी प्रमाण–बोली स्व–बोली म्हणून बोलू शकतात किंवा (ती वाचन–बोली असल्यास) लिहू शकतात ती त्या समाजाची (आणि क्षेत्राची) स्व–प्रमाण–बोली.

भाषिक समाज (speech community) — एखाद्या समाजाची काही एक स्व–प्रमाण–बोली असेल तर तो त्या बोलीचा भाषिक समाज. साधारणतः एका भाषिक समाजाची एकच स्व–प्रमाण–बोली असते. मात्र एका बोली–कुलात एकच भाषिक समाज असेल असें नाही; उदाहरणार्थ आयबीरियन द्वीपकल्पात एकच बोली-कुल आहे. पण भाषिक समाज मात्र दोन आहेत–स्पॅनिश आणि पोर्तुगीज. उलट एका भाषिक समाजात एकापेक्षा अधिक बोली–कुलें आढळू शकतील; उदाहरणार्थ फ्रेंच समाजात ब्रेटन (Breton) बोलणारे लोक येतात किंवा हिंदीभाषिक समाजात राजस्थानी इत्यादि बोली–कुलें येतात. साधारणतः एक व्यक्ति एकाच भाषिक समाजाची सदस्य असते.

अभिजात–बोली (classical microlect)— जी प्रमाण–बोली जगातल्या कोणत्याच व्यक्तीची प्रारंभिक–बोली (राहिलेली) नाही, परंतु तिच्यामध्ये समृद्ध लिखित साहित्य उपलब्ध असल्यामुळे एखाद्या समाजातील नेतेवर्गात जी मोठ्या प्रमाणात अभ्यासिली जाते ती. उदाहरणार्थ अभिजात फारसी आज कोणत्याही समाजाची स्व–प्रमाण–बोली नाही, पण इराण, अफगणिस्तान, भारत ह्या देशांत ती अभ्यासिली जाते. अभिजात–अरबी मात्र पश्चिम एशिया आणि उत्तर आफ्रिका येथील बऱ्याच बोली–कुलांची प्रमाण–बोली आहे, अभिजात तेलुगु ही आजही तेलुगु समाजाची स्व–प्रमाणबोली आहे, अभिजात–हीब्रू ही बऱ्याच शतकांचा खंड पडल्यानंतर एका समाजाची (इस्रायलची) स्व–प्रमाग–बोली आणि नव्या पिढीची प्रारंभिक–बोली झाली आहे.

सहायक–बोली—जिचा एकापेक्षा अधिक भाषिक–समाजातून उपयोग होतो अशी प्रमाण–बोली. दुसऱ्या महायुद्धाअगोदर डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, हंगेरी, पोलंड, चेकोस्लोव्हेकिया ह्या देशांत प्रमाण–जर्मन सहायक–बोली म्हणून वापरली जात असे. स्वाहिली ही पूर्व आफ्रिकेच्या किनारपट्टीवरील काही थोड्या लोकांची प्रारंभिक–बोली आहे, पण बऱ्याच मोठ्या प्रदेशात ती सहायक–बोली म्हणून वापरली जाते. भारतात प्रांतोप्रांतीचे शास्त्रीपंडित जमले की कधीकधी ते संस्कृतचा सहायक–बोली म्हणून वापर करतात.

भाषा—निरनिराळ्या बोलींच्या रूपाने प्रतीत होणारी एक मानवी संस्था.

जेव्हा काटेकोरपणाची अपेक्षा नसेल किंवा संदर्भावरून अर्थ स्पष्ट होत असेल तेव्हा वरील संज्ञांबद्दल अनुक्रमे भाषा(प्रकार), (प्रमाण)भाषा, (जनक)भाषा, भाषा

(कुल), भाषा(क्षेत्र), (वाचन)भाषा, प्रारंभिक–भाषा, स्व–भाषा, स्व–(प्रमाण)भाषा, अभिजात–भाषा, सहायक–भाषा असे प्रयोग करायला हरकत नाही. प्रत्यक्ष वापरात ‘ भाषा ’ हा शब्द जास्त करून ‘ प्रमाण–बोली ’, ‘ बोली–कुल ’, आणि ‘ बोली–क्षेत्र ’ ह्यांच्या जागी येतो असें दिसून येतें.

‘ मातृभाषा ’ हा शब्दही असाच अनेक अर्थांनी वापरला जातो. ‘ मराठी ही क्षची मातृभाषा आहे ’ हें विधान पाचांपैकी कोणत्याही एक वा अनेक अर्थांनी खरें असू शकेल : (क) प्रमाण–मराठी ही क्षची प्रारंभिक–बोली आहे, (ख) प्रमाण–मराठी ही क्षची स्व–बोली आहे, (ग) क्षची प्रारंभिक–बोली मराठी बोली–कुलात मोडते, (घ) क्षची प्रारंभिक–बोली प्रमाण–मराठीच्या बोली–क्षेत्रात मोडते, (ङ) क्ष हा मराठी भाषिक समाजाचा सदस्य आहे. सरकारी खानेसुमारीच्या अहवालात अमूक इतक्या लोकांची अमूक मातृभाषा आहे अशी माहिती मिळाली तर भाषा-वज्ञानिकाला त्या माहितीचा उपयोग अतिशय सावधगिरीने करावा लागतो.

प्रमाण–बोली, सहायकता, आणि प्रतिष्ठा

प्रमाण–बोली आणि सहायक–बोली ह्या दोहोंपाठीमागची मूळ कल्पना एकच आहे. दोन व्यक्तींनी त्यांना समान असलेल्या प्रारंभिक–बोलीतून व्यवहार करणें ही झाली सगळ्यात सरळ, साधी अवस्था. त्यांना अशी समान प्रारंभिक–बोली उपलब्ध नसताना त्यांनी तिसऱ्याच एका बोलीचा आश्रय करणें हें सहायक–बोलीचें बीज आहे. त्या दोघांनी आपल्यापैकी एकाच्या बोलीचा आश्रय घेणें ह्यात बोलीच्या प्रतिष्ठेचा प्रश्न उपस्थित होतो. ह्यात सगळ्यात मौजेची अवस्था म्हणजे दोन व्यक्तींना समान प्रारंभिक –बोली असूनही त्यांनी अन्य बोलीचा आश्रय करणें ! सहायक–बोलीची प्रतिष्ठा वाढणें किंवा प्रतिष्ठित लोकांची बोली सहायक–बोली ठरणें ह्यातून ही परिस्थिति उत्पन्न होते. प्रमाण–बोलीचें आणि सहायक–प्रमाण–बोलीचें मूळ ह्या परिस्थितीत आहे. समजा वऱ्हाडी बोलणाऱ्या दोन व्यक्ति आहेत. एकमेकांशी बोलताना त्या व्यक्ती वऱ्हाडात वऱ्हाडीचा, पुण्यात प्रमाण–मराठीचा, नागपुरात प्रमाण–हिंदीचा, किंवा मुंबईत इंग्लिशचा उपयोग परिस्थितीनुरूप करतील अशी कल्पना करणें अवघड नाही.

प्रतिष्ठा आणि सहायकता ह्यांचें हे साहचर्य महत्त्वाचें आहे. हें साहचर्य पुढील क्षेत्रांमधून दिसून येतें—

लेखनवाचन (ह्यात पत्रें आणि खाजगी टिपणें आली);

शालेय शिक्षण (ह्यात भाषा शिकवणें आणि माध्यम म्हणून वापरणें हीं दोन्ही आलीं);

व्यापार–उदीम (हिशोब ठेवणें, प्रवास करणें तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, जाहिरात हींही त्यात आलीं);

मुद्रण (ह्यात वृत्तपत्रें, मासिकें, पुस्तकें आलीं);

ध्वनिमुद्रण आणि ध्वनिक्षेपण (ह्यात ध्वनिमुद्रिका, रेडिओ, सिनेमा, टेलिव्हिजन आलीं);

लिखित वा अभिजात साहित्याची निर्मिति आणि आस्वाद (लोकसाहित्याची गोष्ट थोडी वेगळी आहे);

प्रयोगक्षम कला (ह्यात गीत, नाटक, सिनेमा आलीं);

धर्म (ह्यात धर्मग्रंथांचें लेखनवाचन, पारायण, भजनपूजन, तीर्थयात्रा हीं आलीं);

नियमन आणि कारभार (ह्यात कायदा आणि शासन ह्यांच्याबरोबर शासनेतर संस्थांचें नियमन आणि कारभार आला);

वैचारिक देवाणघेवाण (ह्यात व्यासपीठाचा उपयोग, चर्चा, प्रचार, प्रवचन, उच्च शिक्षण, ज्ञान, विज्ञान–सर्व आलें).

जोपर्यंत रोजच्या मामुली गरजांच्या पातळीवर एखाद्या बोलीचें साहाय्य घेतलें जात आहे तोपर्यंत प्रतिष्ठेचा प्रश्न येत नाही; उदाहरणार्थ प्रमाण–बोली ज्यांची प्रारंभिक–बोली आहे असे लोकही कामापुरता मराठी बोली–कुलातील एखाद्या अप्रतिष्ठित बोलीचा वापर विनासंकोच करताना आढळून येतात. दुसरी गोष्ट म्हणजे दोन वा अधिक प्रमाणबोलींमध्ये कामाची निश्चित वाटणी असेल तर संघर्ष वा चढा-ओढ उत्पन्न होण्याचें कारण नाही; उदाहरणार्थ— पूजन एका भाषेत तर भजन दुसऱ्या भाषेत; साहित्य (त्यातल्या त्यात काव्य) एका भाषेत, व्यापार–उदीम दुसऱ्या भाषेत. मात्र अशी वाटणी जरी झाली तरी बहुधा एका प्रमाण–बोलीला विशेष महत्त्व मिळतें–शेषाधिकाराच्या तत्त्वावर. म्हणजे असें की थोड्या निर्दिष्ट गरजा सोडून उरलेल्या सर्व त्या प्रमाण–बोलीत भागवायच्या असा संकेत उत्पन्न होणें किंवा दोन अपरिचित व्यक्ति भेटल्या तर निदान पहिली सलामी व्हायची ती त्या प्रमाण–बोलीत असा संकेत मान्य होणें. अशी परिस्थिति उत्पन्न झाली की एक भाषिक समाज आणि त्याची एकुलती स्व–प्रमाण–बोली सिद्ध होतात. ह्याहून गुंतागुंतीची परिस्थिति असली तर एका भाषिक समाजाच्या पोटात दुसरा भाषिक समाज असें होऊ शकतें. उदाहरणार्थ काश्मीरमध्ये प्रमाण–काश्मीरी (श्रीनगरची बोली) आणि उर्दू अशा दोन बोली वापरल्या जातात. स्विट्सर्लंडमध्ये कार्यपरत्वे प्रमाण–स्विस–जर्मन आणि प्रमाण–जर्मन अशा दोन प्रमाण–बोली वापरल्या जातात.

एखाद्या समाजाची स्व–प्रमाण–बोली म्हणून जेव्हा एखादी बोली सिद्ध होते आणि नांदते तेव्हा त्या बोलीवर त्याचे काही परिणाम होणें अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ प्रमाण–हिंदी ही आज मेरठच्या आसपास बोलल्या जाणाऱ्या स्थानिक खडी बोलीपासून वेगळी पडली आहे. तसेंच आज जरी इस्रायलमध्ये बोलली जाणारी हीब्रू आणि कालपरवाची अभिजात–हिब्रू एकच असली तरी जसा काळ जाईल तसें दोहों-

मध्ये अंतर पडत जाणें अटळ आहे. अभिजात-हिब्रू परत धर्मग्रंथांच्या बासनात गुंडाळली जाईल आणि तिची जागा एक परिवर्तित अशी इस्रायली हिब्रू बोली घेईल. असें होण्याचें मुख्य कारण असें की अशा स्व–प्रमाण बोलीला एका वेळी दोन भिन्न, काहीशा परस्परविरुद्ध गोष्टी साधाव्या लागतात. जें अभिव्यक्त करायचें त्याची विविधता राहणार (वर जें शेषाधिकाराचें तत्त्व सांगितलें त्यातून ही गरज उत्पन्न होते), परंतु जी अभिव्यक्ति करायची तिच्या सरणीत मात्र एकरूपता हवी. ही लवचीक स्थिरता साधताना प्रमाण–बोलीचें परिवर्तन व्हायचें तें विशिष्ट दिशेने होत जातें.

(१) निरनिराळ्या गरजा भागतील एवढा शब्दसंग्रह वाढवण्यासाठी तीन मार्गांचा कमी अधिक अवलंब स्वभावपरत्वे आणि परिस्थितीनुरूप निरनिराळ्या प्रमाण–बोली करताना आढळतात. आहे त्या धातु–प्रत्ययादि सामग्रीतून नवीन शब्द तयार करणें किंवा दुसऱ्या प्रमाण–बोलीतून वा अभिजात–बोलीतून वा सहायक-बोलीतून सरळ उसनवारी करणें किंवा उसनवारीच करणें पण ती भाषांतराचा आश्रय घेऊन करणे.[१] ही वाढ करताना त्या बोलीच्या स्वनव्यवस्थेवर आणि व्याकरणव्यवस्थेवर ताण पडतो आणि तो सोसावा लागतो; उदाहरणार्थ फारसीला काही अरबी वर्ण आणि अरबी प्रयोग सामावून घ्यावे लागले. मुख्य म्हणजे प्रमाण–बोलीचें भोवतालच्या प्रमाण–बोलींशी एक नवें नातें जुळतें. त्यांच्याशी बरोबरी करण्याची धडपड सुरू राहते.

(२) उलटपक्षी ही प्रमाण–बोली मूळची जरी एका विशिष्ट प्रदेशातील वा वर्गातील लोकांची बोली असली तरी हळूहळू हें नातें तुटतें, निदान शिथिल होतें. परिणामतः प्रमाण–बोली विशिष्ट प्रदेशाची वा वर्गाची मालमत्ता[२] रहात नाही. तशी ती राहिली

---

१. रेखागणिताला ‘ जॉमेट्री ’ म्हणणे ही उसनवारी, तशीच ‘ भू–मिति ’ (geo– भू, –metry मिति) म्हणणें हीही उसनवारीच. भाषाशुद्धिवाल्यांच्या लक्षात हा मुद्दा नेहमी आलेला असतोच असें नाही ! प्रत्यक्ष आदान व अप्रत्यक्ष आदान असा हा फरक मानता येईल.

२. ‘ मालमत्ता ’ शब्दावरून आठवण झाली. रशियन राज्यक्रांतीनंतर प्रमाण–रशियन ही माजी शोषक वर्गाची बोली म्हणून झुगारून द्यावी असा एक मतप्रवाह बळावू लागला होता. त्या वेळी ट्रॉत्स्कीने त्याला पुढीलप्रमाणे कलाटणी दिली. प्रमाण–रशियन ही शोषक वर्गाची मिरास थोडीच आहे ? उलट ती आता सर्वांना शिक्षणाद्वारे खुली झाली आहे. शेतकरी–कामगार–बंधूंना काय प्रमाण–रशियनमध्ये बोलता येणार नाही ? (मला नक्की संदर्भ मिळाला नाही; कुणी मिळवून दिल्यास आभारी होईन.) अमेरिकेत ही मिरास सर्वांना खुली करण्याचे ऐतिहासिक कार्य मास्तरीणकाकू आणि वेब्स्टरचा घरोघर सापडणारा शब्दकोश ह्या जोडगोळीने पार पाडलें आहे.

तर इतरांना ती स्व–बोली वाटणार नाही. प्रमाण–इंग्लिश जेव्हा युनायटेड स्टेट्स्‌मधील जर्मन, इटॅलियन, फ्रेंच आदि अन्य भाषिकांनी शिकून घेतली तेव्हा तिचा 'इंग्लिश'-पणा जशाचा तसा राहणें शक्य नव्हतें. विविधतेत एकरूपता साधताना कधीकधी एक प्रमाण–बोली सिद्ध न होता एक प्रमाण–बोली–कुल तयार होते. चौदाव्या शतकापर्यंत फ्रान्समध्ये किंवा प्राचीन ग्रीसमध्ये koinē उत्पन्न होईपर्यंत अशी प्रमाण-बोली–कुलें असल्याचें आपण पाहिलें. किंबहुना अगोदर एकजिनसी असलेल्या प्रमाण–बोलीचेंसुद्धा विघटन होऊन प्रमाण–बोली–कुलात रूपांतर होतें. प्रमाण–इंग्लिश आणि प्रमाण–खडीबोली ह्यांची आज तीच परिस्थिति आहे.[1] अर्थात् असें विघटन काही एका मर्यादेपर्यंत राहिलें तरच तो भाषिक समाज पोटविभाग असूनही एकसंध राहतो. ह्या विघटनाचें एक नित्याचें, मर्यादित स्वरूप म्हणजे एकाच प्रमाणबोलीच्या स्थानपरत्वे निराळ्या उच्चार–सरणी (local accents) असणें. उदाहरणार्थ आगऱ्यामध्ये बोलल्या जाणाऱ्या प्रमाण–हिंदीवर ब्रजचे संस्कार आहेत. पटन्यामध्ये बोलल्या जाणाऱ्या प्रमाण–हिंदीवर भोजपुरी, मगही, मैथिली ह्यांचे संस्कार आहेत. स्थानपरत्वे काही शब्दही निरनिराळे असतात. उदाहरणार्थ प्रमाण–मराठीत ज्या गोष्टींना ' सुट्टी ', ' गेट ', ' पौंडभर ' म्हणतात, त्या गोष्टींना मुंबईला ' रजा ', ' चौकी ', ' रत्तलभर ' म्हणतील. परंतु हे सर्व फरक इतके अल्प असतात की बोलीचे एकत्व अभंग राहतें. फार तर एका प्रमाण–बोलीच्या अनेक स्थानिक सरणी आहेत एवढें म्हणता येतें.[2] मात्र ह्या सरणी जलाभेद्य नसल्यामुळे एका सरणीतून दुसरीत शब्द वा लकबी पसरत जातात, आणि पर्यायाने एखाद्या प्रमाणेतर बोलीत असलेला

---

१. अशा ठिकाणी ' विभाषा ' ही संज्ञा वापरता येईल. जसें एका प्राचीन–ग्रीक भाषेच्या ॲटिक, डॉरिक, इत्यादि विभाषा किंवा एका प्रमाण–खडी–बोलीच्या उर्दू, प्रमाण–हिंदी, हिंदुस्तानी ह्या विभाषा मानता येतील. ' विभाषा ' म्हणजे जी अशा प्रमाण–बोली–कुलाची सदस्य आहे अशी प्रमाण–बोली.

२. असेच विघटनजन्य स्थानिक सरणीभेद प्रमाणेतर बोलींमध्येसुद्धा असतात, पण ते इतके जास्त असतात की सर्व बोलींच्या प्रदेशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जावें तर बारा बारा कोसांवर भाषा बदलत जाते आणि ज्या प्रमाणेतर बोली एका बोली–कुलातल्या आहेत त्यांच्या मधोमध सीमारेषा ओढणें अशक्य-प्राय होतें किंवा रेषेऐवजी धूसर असा सीमा–पट्टा मानावा लागतो.

शब्द वा लकब प्रमाण–बोलीत स्थिर होऊन बसते.[१]

(३) प्रमाणेतर बोलीमधील शब्द वा लकबी प्रमाण–बोलीने आपल्याशा करणें ही एका दृष्टीने प्रमाणेतर बोलींनी प्रमाण–बोली आपलीशी करून घेतल्याची खूण आहे. प्रमाण–बोलीला त्या भाषिक समाजाच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करावा लागत असल्यामुळे ही प्रमाणेतर बोलींमधून केलेली उसनवारी उपकारकच ठरते. मराठी बोली–क्षेत्रापुरते पहायचें तर प्रमाण–मराठी ज्यांची प्रारंभिक–बोली होती व आहे ते ब्राह्मण–वा–शिक्षित–वर्गीय[२] परवापरवापर्यंत तरी जीवनाच्या अनेक क्षेत्रांबद्दल, अनेक उदिमांबद्दल उदासीन, अनभिज्ञच होते. उदाहरणार्थ अनेक पक्षी वा मासे, शेतीचीं अनेक अवजारें, कुस्तीचे बारकावे इत्यादींना त्या वर्गीयांच्या शब्द-संग्रहात शब्दच नाहीत वा नव्हते. श्री. म. माटे ह्यांच्या 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' (साहित्यधारा, पुणे १९४३) ह्या सुप्रसिद्ध लेखाचें मर्म ह्या संदर्भात लक्षात यावें. प्रमाणेतर वाक्प्रयोगांच्या उसनवारीचा विचार केवळ ह्या गद्य गोष्टींपुरताच मर्यादित ठेवायचें आपल्याला कारण नाही. साहित्यिकाला, कवीला ज्यांची उठाठेव विशेष अशा अनुभवविश्वातील खाणाखुणा, संवेदनेचे बारकावे ह्यांचाही विचार व्हायला हवा. ज्या मोकळेपणाने सूक्ष्म अर्थच्छटा दर्शविण्यासाठी कवि अल्पपरिचित संस्कृत शब्दांची उचल करील त्याच मोकळेपणाने त्याला निदान काही वाचकांना तरी सुरवातीला अपरिचित असतील अशा प्रमाणेतर शब्दांची उचल करणें शक्य आहे.

---

१. ज्यांची प्रारंभिक–बोली प्रमाणेतर आहे असे लोक जेव्हा प्रमाण–बोली वापरतात आणि जेव्हा ती प्रमाण–बोली त्यांची स्व–बोली झालेली नसते, तेव्हा प्रमाण–बोलीची एक संपर्कजन्य स्थानिक सरणी तयार होऊ शकते, तिला अपप्रमाण (substandard) सरणी म्हणता येईल. ह्याउलट प्रमाणेतर बोलीमधूनही अशी प्रमाण–बोलीचे संस्कार झालेली संपर्कजन्य सरणी तयार होऊ शकते. 'लई' हा शब्द प्रमाणेतर असेल, पण 'पुश्किल' हा अपप्रमाण आहे. रेडियोवरील ग्रामीण कार्यक्रमांतील सरणी ही अशी संपर्कजन्य सरणी आहे, 'खरीखुरी' प्रमाणेतर ग्रामीण बोली नाही. प्रमाण आणि प्रमाणेतर ह्यांमधील धूसर संधि-प्रदेशाचा अधिक खोल अभ्यास जरूर आहे. असा एक अभ्यास म्हणजे मॅक्सीन बर्न्ट्सन् यांचा प्रबंध. (The Speech of Phaltan : A Study in sociolinguistics. University of Pennsylvania, Ph. D. dissertation, 1973.)

२. 'ब्राह्मण–वा–शिक्षित' म्हणण्याचें कारण ह्या वर्गात काही अशिक्षित ब्राह्मण (मुख्यतः स्त्रिया) आणि काही शिक्षित ब्राह्मणेतर हेही येतात.

(४) प्रमाणेतर बोली आणि प्रमाणबोली ह्यांच्या संदर्भात एक महत्त्वाच्या विरोधाभासाची दखल घेतल्याशिवाय प्रस्तुत विवेचन पुरें होणार नाही. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. संस्कृतीचा ती एक अविभाज्य भाग आहे. ह्यासाठी प्रमाणेतर बोली आणि प्रमाणबोली ह्यांच्या सामाजिक–सांस्कृतिक पार्श्वभूमीचा आपल्याला थोडा विचार येथे करायचा आहे.

प्रमाणेतर बोली ह्या अभ्यसनीय आहेत, नव्हे अनुकरणीयही असू शकतील हा विचार जोरदारपणे पुढे येण्याचें श्रेय मुख्यतः युरोपमधील रोमँटिक–संप्रदायाला आहे.[१] 'नागर', 'शिक्षित', 'सु-संस्कृत' जीवनात मानव निसर्गाला पारखा होतो, त्याच्या व्यक्तित्वाचा संकोच होतो, त्या जीवनाचें वाहन जी प्रमाणबोली ती अंतःकरणाच्या मुक्त आविष्काराला पुरेशी पडत नाही—असे रोमँटिक शिक्षितांचे म्हणणें. 'जानपद', 'अ–शिक्षित', 'अ–संस्कृत' जीवन आणि प्रमाणेतर भाषा ह्यांतून ह्या अप्राप्य गोष्टी प्राप्त होऊ शकतील अशी त्यांची अपेक्षा. वास्तववादी कादंबरीकार आणि समाजवैज्ञानिक ह्यांनी ह्या विचारसरणीतील एका गृहीतकृत्याचा पोकळपणा दाखवून दिला. एका भूक्षेत्रातील पाच जानपद समाज आणि पाच नागर समाज निवडून घेतले तर चालीरीती, आविष्कार, भाषा ह्यांच्या विविधतेची रेलचेल त्या त्या पाच जानपद समाजांची एकमेकांशी तुलना करता दिसेल, परंतु तेवढी विविधता पाच नागर समाजांतून दिसणार नाही. परंतु एका जानपद समाजात अंतर्गत विविधता तुम्हांला मिळणार नाही, त्या समाजातील व्यक्तीला विविध आविष्कारातून एक निवडून घेण्याचें स्वातंत्र्य असणार नाही, एकच कल्पना तऱ्हतऱ्हेने व्यक्त करायला जानपद बोलीमध्ये वाव ती बोली बोलणाऱ्याला मिळणार नाही. उलट एका नागर समाजातील पाच व्यक्ती निवडून घेतल्या तर चालीरीती, आविष्कार, भाषासरणी ह्यांच्या विविधतेची रेलचेल दिसून येते. नागर व्यक्तीला विविध आविष्कारांतून एक निवडून घ्यायला वाव जास्त असतो, एकसुरीपणा आणणारें सामाजिक दडपण तुलनेने कमी असू शकतें, प्रमाण-बोली एकच पण तिचा वापर विविध ढंगांनी होतो. व्यक्तित्वाचा मुक्त आविष्कार आणि त्याद्वारे विकास हें एक श्रेयस् लोकशाही समाजात मानलें जातें. तें तसें मानावें का (आणि का मानावें) ह्याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. पण तें तसें मानलें, तर तें मिळवताना प्रमाणबोलीच्या विविधरंगी एकरूपतेने, लवचीक स्थिरतेने अडथळा होणार नाही, उलट मदतच होईल एवढें मात्र ह्या स्थळी निश्चितच सांगता येईल. भाषेच्या स्थूलांगांच्या बाबतीत एकरूपता, निश्चितता असल्यामुळे व्यक्तीला प्रमाण-बोलीच्या द्वारा संख्येने जास्त आणि अधिक विविध व्यक्तींशी संवाद,

---

१. लोकसाहित्य आणि लोकश्रुति (folklore) ह्यांच्या अभ्यासाला सुरवातही ह्याच प्रेरणेमुळे झाली.

निदान संपर्क साधता येईल. उलट सूक्ष्मांगांच्या बाबतीत विविधता असल्यामुळे व्यक्तीला आपलें मनोगत—मग ती एक तरल कल्पना असो वा एक जटिल प्रमेय असो वा एखादें वेशीवर टांगायचें दुःख असो—अधिक नेमकेपणाने, निश्चितपणाने व्यक्त करता येईल. प्रमाण-बोली ही प्रमाणेतर बोलींच्या संपत्तीची एक उतारपेठ होऊ शकत असल्यामुळे तोही फायदा खेरीज आहेच : माणदेशी माणसाला नागपुरी शब्द वापरण्याची सोय माणदेशी मराठीत नसेल पण प्रमाण-मराठीत आहे.

एवंच एखादी प्रमाण-बोली आधुनिक समाजजीवनाच्या संदर्भात जसजशी स्थिरपद होईल, नेतेवर्गात नसलेल्याही अधिकाधिक लोकांची ती जसजशी स्व–बोली होईल, तसतशी तिच्यामध्ये निरनिराळ्या शैलींची जोपासणी होत जाणें आवश्यक होत जातें. शैली म्हणजे सहेतुक भाषासरणी. हल्लीच्या काळात कोणतीही स्व–प्रमाण-बोली क्वचितच केवळ वाचन–बोली म्हणून राहू शकते.[१] कोणा ना कोणाची तरी ती दैनंदिन गरजा भागवणारी प्रारंभिक-बोली देखील असते. तिच्यातून प्रेमगीतें वा प्रेमकथा लिहायच्या असतात त्याचप्रमाणे खऱ्याखुऱ्या प्रेयसीशी वार्तालाप आणि पत्रव्यवहारही करायचा असतो, वाण्याकडून जिन्नस आणायचे असतात त्याचप्रमाणे सहकारी सोसायट्यांच्या वाटाघाटीही चालवायच्या असतात, शिळोप्याच्या गप्पा मारायच्या असतात त्याचप्रमाणे परिसंवाद घडवून आणायचे असतात, देवळातल्या प्रवचनातून माफक तत्त्वज्ञान सांगायचें असतें त्याच प्रमाणे एम्. ए.च्या विद्यार्थ्यांना हेगेलचें तत्त्वज्ञानही समजावून द्यायचें असतें. ह्यामुळे प्रमाण-बोलीमध्ये निरनिराळ्या शैली, उपशैली उपलब्ध असणें जरूर असतें. त्या सर्वांचा आपल्याला येथे विचार करायचा नाही, पण एका मुद्द्याला जरूर स्पर्श करायला हवा. तो म्हणजे साहजिक, अनौपचारिक (casual) आणि संस्कारित (formalized) अशा किमान दोन तरी सरणी प्रमाण-बोलीमध्ये सहेतुक जोपासाव्या लागतात. उच्चार–सरणी, व्याकरण, शब्द-योजना ह्या सर्व बाबतींत संस्कारित शैलीला एक प्रकारचा तंगपणा राखावा लागतो. उदाहरणार्थ, सारख्याच अर्थाचे अनेक शब्द आहेत आणि ते साळढाळपणे वापरले जात आहेत, हें काही शब्दसमृद्धीचे लक्षण नाही, अस्थिरतेला आमंत्रण आहे. संस्कारित सरणीमध्ये अशा शब्दपुंजापैकी प्रत्येक शब्दाची छटा निश्चित व्हावी लागते. वैचारिक गद्य आणि भावकाव्य ह्या दोहोंनाही हें पथ्य पाळावे लागते. अनौपचारिक सरणीमधला वाक्प्रयोग उसना घ्यायचा तर तोही सहेतुक घ्यावा लागतो ! (अलीकडेच साहित्यचर्चेत आलेला ‘ बांधिलकी ’ हा शब्द ह्या संदर्भात पाहण्याजोगा आहे.) प्रमाण-बोलीला लवचीक स्थिरपणाइतकाच हा सहेतुक नेमकेपणा महत्त्वाचा आहे.

---

१. भारतातील उरल्यासुरल्या वाचन–बोली म्हणजे साधु–बांगला, ग्रांथिक–तेलुगु, आणि तेन–तमिळ. परंतु स्वप्रमाण-बोली म्हणून त्या त्या भाषिक समाजांतील त्यांचें स्थान आता डळमळीत होत आहे.

प्रमाण-बोलीची कार्यक्षमता कोणकोणत्या गुणांवर अवलंबून आहे ह्याचें थोडक्यात दिग्दर्शन आतापर्यंत केलें आहे.

वाक्प्रयोगाची शुद्धता, प्रामाण्य, आणि लेखनीयता

येथवर निरनिराळ्या बोलींचे परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे असू शकतात हें आपण पाहिलें. कोणत्याही एका बोलीच्या अंतरंगाची उकल त्यात अभिप्रेत नव्हती.[१] ह्या अंतरंगाचें स्वरूप स्थूलमानाने असें मांडता येईल—क्ष अमूक बोलीमध्ये बोलतो आहे म्हणजे तो जें बोलतो आहे, त्याच्या तोंडून जे वाक्प्रयोग निघत आहेत त्यांची जास्तीत जास्त व्यवस्था लावायची तर ती अमूक बोलीचे स्वनव्यवस्था, व्याकरण, आणि अर्थांगव्यवस्था ह्यांच्याबद्दलचे जे नियम आहेत त्यांना अनुसरून लावता येईल; ते नियम शोधून काढताना क्षच्या तोंडून निघणारे वाक्प्रयोग हे सुद्धा कामी येतील; अमूक एक वाक्प्रयोग (समजा 'त्यानी मला मारलं') अमूक एका बोलीनुसार (प्रमाण-मराठी बोलीची जी साहजिक अशी सरणी आहे तिला अनुसरून) व्याकरणीय आहे म्हणजेच व्याकरणशुद्ध आहे. वाक्प्रयोगाची शुद्धता ही अशी बोली-सापेक्ष आहे हे तेव्हाच ध्यानात यावे.

अमूक एक प्रयोग प्रमाण आहे का ? अमूक प्रयोग अमूक बोली–क्षेत्रात प्रमाण आहे म्हणजे त्या क्षेत्रावर वर्चस्व असलेल्या प्रमाण-बोलीला अनुसरून शुद्ध आहे. वाक्प्रयोगाचे प्रामाण्य हे बोली–क्षेत्र–सापेक्ष आहे हें ह्यावरून लक्षात येईल.

'त्यानी मला मारलं' आणि 'त्यानं मला मारलं' हे प्रयोग वर उल्लेखिलेल्या बोलीत (आणि सरणीत) विकल्पाने शुद्ध आहेत आणि मराठी बोली–क्षेत्रात प्रमाण आहेत. आता समजा की वर उल्लेखिलेला क्ष काही वेळ गेल्यानंतर पुढे 'मी रात्चो आभ्यास कर्तोय्', 'तो ह्या रस्त्यान् इलो' अशा प्रकारचे प्रयोग करू लागला तर अभ्यासकापुढे तीन पर्याय उभे राहतील : (१) क्ष प्रमाण–मराठीत अशुद्ध वाक्यें वापरू लागला आहे (अनवधानाने म्हणा, मुद्दाम म्हणा, आणखी कशाने म्हणा); (२) प्रमाण–मराठीच्या व्याकरणाचें वर्णन बरोबर झालें नाही, त्यात आणखी नियम दाखल करून वा विकल्प दर्शवून तें वर्णन दुरुस्त करायला हवें; (३) क्षने गियर बदललें आहे, प्रमाण–मराठीऐवजी तो आता कुडाळी–मराठी बोलीमध्ये व्याकरणशुद्ध

---

१. ह्याबद्दल विचार मी अन्यत्र अधिक विस्ताराने मांडला आहे (पहा : 'मराठी व्याकरणाची नवी दिशा').

वाक्यें बनवू लागला आहे.[१] तिसरा पर्याय अधिक प्रशस्त आहे हे उघड आहे.[२]

'तो मला मारलं' असें कुणी म्हटलें तर तें प्रमाण–मराठीत अशुद्ध आहे असा निर्णय आपण चटकन घेऊ. परंतु 'त्यानी मला मारलं' आणि 'त्यानं मला मारलं' ह्या विकल्पांबद्दल शंका राहण्याचा संभव आहे. त्याबद्दल अधिक खुलासा असा की प्रमाणमराठीच्या संस्कारित सरणीत 'त्याने मला मारलं' असा तिसरा विकल्पही आहे. 'मारलं' ऐवजी 'मारले' घालून आणखी तीन विकल्प मिळतील. म्हणजे संस्कारित सरणीत सहा आणि साहजिक सरणीत त्यांपैकी दोन असे विकल्प आहेत. आता पुढचा प्रश्न असा येईल की प्रमाण–मराठीत हे सहाही पर्याय लेखनीय आहेत का? लेखनीयता ही शुद्धता आणि प्रामाण्य ह्यांपेक्षा वेगळी कसोटी आहे. ती १९१० च्या सुमारच्या मराठी बोली-क्षेत्रात लावून असे म्हणता येईल की 'त्यानी' आणि 'मारलं' वाले प्रयोग अलेखनीय, प्रमाण–मराठी बोलीच्या वाचन–सरणीप्रमाणे अशुद्ध आहेत. आजच्या घटकेला 'नि', 'मारलं' लेखनीय ठरलीं आहेत, पण वाचन–सरणीत[३] तीं आजही अशुद्ध आहेत. एकवचनी 'त्यानी' मात्र आजही लेखनीय नाही.

एखाद्या वाक्प्रयोगाबद्दल तो शुद्ध की अशुद्ध, प्रमाण की अप्रमाण, लेखनीय की अलेखनीय, संस्कारित की साहजिक असे प्रश्न विचारता येतात हें आपण आतापर्यंत पाहिलें. ते प्रश्न भिन्न आहेत, कारण त्यांची उत्तरें नेहमीच जुळतीं असतील असें नाही हेंही आपण पाहिलें. ह्या चार जोड्यांसारख्याच आणखी तीन जोड्या आहेत.

---

१. अर्थातच हीं वाक्यें कुडाळी बोलीत शुद्ध असलीं तरी मराठी बोली-क्षेत्रात प्रमाण नाहीत हें उघड आहे. उलटपक्षी 'त्यानं मला मारलं' हा प्रयोग कुडाळी बोलीत अशुद्ध आहे हेंही लक्षात ठेवायला हवे.

२. गियर बदललें आहे की नाही किंवा गियर कोणतें लावलें आहे हें ठरवणें नेहमीच सोपें असतें असें नाही. वाक्यैच्या वाक्यें अशीं दाखवता येतील की जीं हिंदी, उर्दू, हिंदुस्तानी ह्या प्रमाण-खडी बोलीच्या तीनही विभाषांमधून सारखीच शुद्ध ठरतील.

३. वाचन–बोलीची व्याख्या मागे दिलीच आहे. त्याच धर्तीवर वाचन–सरणीची व्याख्या करायची. प्रमाण–मराठीच्या वाचन–सरणीमधील विशिष्ट प्रयोग म्हणजे 'व', 'अगर,' 'वरील', 'येणार काय?', 'कोठे', 'येथे', 'ह्यांमधील', 'खालीलप्रमाणे', 'करावयाचा', 'करणेचा', 'केल्यास', 'सायंकाळ', 'करीत असता', 'हेंच योग्य होय' इत्यादि. हे प्रयोग साहजिक सरणीत येत नाहीत. उलट 'मारलं', 'मारतोय', 'लांबनं', 'नाही आहे', 'आणीक' ह्यासारखे साहजिक सरणीतील प्रयोग वाचन–सरणीत टाळले जातात.

त्यांचा जाता जाता उल्लेख करता येईल. एक म्हणजे 'प्रौढ की साधा' ही जोडी. 'मातोश्री', 'बंधु', 'श्वशुर', 'वास्तव्य असणे/करणे', 'विवाह', 'तद्विषयक', 'ज्ञातिबंधू', 'नाभिक समाज' इत्यादि वाक्प्रयोग प्रौढ शैलीमधील आहेत. त्यांना समांतर प्रौढेतर वाक्प्रयोग म्हणजे 'आई', 'भाऊ', 'सासरे', 'राहणे', 'लग्न', 'त्याबद्दल', 'जातभाई', 'न्हावी जात' इत्यादि. दुसरी जोडी म्हणजे 'शुद्धीकृत (puristic) की साधा' ही. 'तथा', 'ठीक पाच वाजता', 'स्थानक', 'उत्तर-दायित्व', 'बाबाराव' इत्यादि शुद्धीकृत वाक्प्रयोगांना समांतर साधे प्रयोग म्हणजे 'उर्फ', 'बरोबर पाच वाजता', 'स्टेशन', 'जबाबदारी', 'बाबासाहेब' इत्यादि. तिसरी जोडी 'व्याज–प्रमाणेतर आणि साधे'. प्रमाण–मराठी वापरताना प्रमाणेतर बोलीमधून किंवा अपप्रमाण सरणीतून काही वाक्प्रयोग हेतुतः घेतले जातात ते व्याज-प्रमाणेतर प्रयोग, उदाहरणार्थ 'इनोद', 'यडा', 'बामण', 'चार बुकं'. प्रौढ, शुद्धीकृत, व्याज–प्रमाणेतर ह्या स्वयंपूर्ण सरणी नाहीत हे उघड आहे. त्यांना आपण शैलिका म्हणू.[२]

ह्या सर्व वर्गीकरणांपैकी भषावैज्ञानिकाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचें वर्गीकरण म्हणजे शुद्ध–अशुद्ध. त्याशिवाय भाषेचें वैज्ञानिक वर्णन सिद्धच होऊ शकणार नाही. 'तो मला मार्ऌं', 'ग्रम् पाणी—ग्रम् पाणी—पमग्राणी—पमग्रॅनेट्स्—डाळिंबाचा रंग –वाळिंबे डाळिंबी डॉक्टर', 'फाकूटा मुकूटा खुंटीवर् ठेव्ला', 'कमूतनूरकर' हे प्रयोग 'मराठी' नाहीत (असलेच तर 'व्याजमराठी' आहेत) आणि 'त्यानं मला मार्ऌं', 'वाळिंबे डॉक्टर् गरम् पाणी माकूतात्', 'फाट्का मुकूटा खुंटीवर् ठेव्ला', 'कमतूनूरकर' हे प्रयोग 'मराठी' आहेत अशी काही वर्गवारी झाल्याशिवाय भाषा-

---

२. प्रमाण–मराठी बोलीमधील अशा आणखी काही शैलिका म्हणजे—'सामंती' ('आईसाहेब', 'मुदपाकखाना', इ०), 'साहेबी' ('डॅडी', 'मिसेस', 'बाँबे', 'फिश्', 'मॅनर्स' इ.), 'शिशुसुलभ' ('हम्मा', 'जम्मत', 'शू करणें' इ.), 'अमुद्रणीय' ('गांड', 'रांड', 'लांडा' इ.), 'साहित्यिक' ('साश्रु नयनांनी', 'निजधामास जाणें' इ.) ह्या व इतर अशा लेबलांतून सुटणारे शब्द म्हणजे खरेखुरे साधे शब्द. माझ्या कल्पनेप्रमाणे प्रौढ 'गुदद्वार' आणि अमुद्रणीय 'गांड' ह्यांना प्रतियोगी साधा असा शब्दच प्रमाण–मराठीत उपलब्ध नाही! प्रमाण–बोलीमध्ये एखाद्या प्रमाणेतर बोलीपेक्षा आविष्काराची विविधता अधिक असते असे जें मागे म्हटलें आहे त्याचा पडताळा ह्या शैलिकांच्या बाबतीत पाहण्यासारखा आहे.

वैज्ञानिकाला पुढे पाऊलही टाकता येणार नाही.[१] 'प्रमाण', 'लेखनीय', 'प्रौढ', 'संस्कारित', 'शुद्धीकृत' इत्यादी इतर सर्व लेबलें भाषावैज्ञानिकाच्या लेखी केवळ सामाजिक आणि सांस्कृतिक तळटिपा आहेत. तीं लेबलें हजर नसतानाही भाषा-व्यवहार चालू शकतो. कोणतीच बोली प्रमाण नाही अशी पुष्कळ बोली–कुलें पृथ्वीच्या पाठीवर आहेत व होतीं.

असें असता हे घोटाळे का झाले? 'म बोलीमध्ये शुद्ध' आणि 'म बोलीक्षेत्रात प्रमाण' ह्या दोन विधेयांमध्ये 'बोली' आणि 'बोलीक्षेत्र' ह्यांच्याऐवजी 'भाषा' हा ढोबळ शब्द घातला की 'शुद्ध' आणि 'प्रमाण' हे शब्द समानार्थक वाटणें अगदी साहजिक आहे. 'लेखनीय', 'संस्कारित' हीं विधेयेंही मग त्या घोटाळ्यात ओढलीं जातात.[२] हा घोटाळा उलगडला म्हणजे दुसऱ्याही एका नित्याच्या गैर-समजाचें निराकरण होते. 'मागास' समाजाच्या बोली (ज्यांच्या बाबतीत प्रमाण–बोली निवडण्याची कल्पनाही पुष्कळदा उत्पन्न झालेली नसते), भाषिक समाजातील प्रमाणेतर बोली, फार काय प्रमाण–बोलीची साहजिक सरणी ह्यांना कसलें आलें आहे

१. अशी वर्गवारी करून पुढचें पाऊल टाकलें म्हणजे मराठी बोली–कुलातील निर-निराळ्या बोलींची वर्णनात्मक व्याकरणें लिहिता येतील. उदाहरणादाखल— अहिराणी : विजया चिटणीस, The Khanadeshi dialect as spoken by farmers in the village of Mohadi in the Dhulia Taluka, पुणें विद्यापीठ, पी–एच्. डी. प्रबंध, १९६४. प्रमाण : अशोक रा. केळकर, The Phonology and morphology of Marathi, कॉर्नेल विद्यापीठ, पी–एच्. डी. प्रबंध १९५८; म. ल. आपटे, A Sketch of Marathi transformational grammar, विस्कॉन्सिन विद्यापीठ, पी–एच्. डी. प्रबंध १९६२. मध्य-कोकणी कुणबी : अ. मा. घाटगे (व वि. वा. परांजपे) Kunabi of Mahad, मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति–मंडळ, १९६६. मध्यकोकणी कोळी : सुहासिनी लद्दू, Linguistic analysis of Koli : A Dialect of Marathi, पुणें विद्यापीठ, पी–एच्. डी. प्रबंध १९६१. मराठीचे 'यथातथ्य दर्शक किंवा वर्णनात्मक (descriptive) व्याकरण अद्याप झालेलें नाही' अशीच तक्रार कधी ऐकू येते ती का हें लक्षात येत नाही. अर्थात् अशीच आणखी वर्णनें व्हायला पाहिजेत, वर्णनात्मक कोशही त्या जोडीला व्हायला हवेत हें मला कबूल आहे.

२. अर्थात् 'संस्कृतमध्ये शुद्ध नव्हे तें सर्व अपभ्रष्ट' (उदाहरणार्थ सर्व मराठी त्यात आलें) किंवा 'संस्कृतमध्ये अशुद्ध तें मराठीतही अशुद्ध' (उदा० 'पाश्चिमात्य', 'अधिकारीवर्ग', 'विद्वान् स्त्री') ह्या घोटाळ्यांपुढे वरील घोटाळा काहीच नव्हे!

व्याकरण, कसली आहे उच्चार–सरणी, आणि कसली अर्थांगव्यवस्था हा तो चुकीचा समज होय. प्रत्येक भाषाप्रकाराला, बोलीला स्वतःची एक शिस्त, नियमन, आंतरिक संगति असते; ही शिस्त, नियमन, संगति अमूक वाक्प्रयोगात दिसून येणें म्हणजेच तो वाक्प्रयोग उच्चारदृष्ट्या, शब्दविन्यासदृष्ट्या, वाक्यविन्यादृष्ट्या, अर्थदृष्ट्या शुद्ध असणें. बोलणाऱ्याची प्रतिष्ठा, प्रतिभा, सुसंस्कृतता किंवा ह्यांचा अभाव ह्यांचा ह्यात मूलतः काहीही संबंध नाही.

प्रामाण्यादि ज्या इतर कसोट्या वा वर्गीकरणतत्त्वें आहेत त्यांचीं पाळेमुळें मात्र आपल्याला भाषेच्या बाहेर जाऊन, एकंदर संस्कृति आणि समाजव्यवस्था ह्यांचा विचार करून शोधावीं लागतील. तो शोध घेण्याचें हें स्थळ नव्हे. राष्ट्रवादाचा उदय, मध्यमवर्गीयांचे युग, मुद्रणकलेचा भाषाव्यवहारावर परिणाम, अमेरिका व तत्सम संमिश्र समाजांचें एकीकरण. रोमँटिक संप्रदायाचे साहित्यबाह्य परिणाम, अभिजात साहित्य आणि लोकसाहित्य ह्यांची फारकत, साक्षरताप्रसार, औद्योगीकरण, व्यापार, सत्ता, आणि धर्म ह्यांची केंद्रें म्हणून शहराची वाढ– ह्या घटनांचा भाषेच्या संदर्भात अभ्यास करायला हवा. एकुणिसाच्या शतकाअगोदरच्या महाराष्ट्रात भाषेच्या प्रामाण्याबद्दल कोणी कधी उठाठेव केली होती किंवा नाही, तेव्हाच्या भाषेच्या लिखित नमुन्यांमध्ये एकापेक्षा अधिक आणि समकालीन अशा बोली किंवा सरणी दिसतात का, तशा दिसत असल्यास प्रमाण–प्रमाणेतर, संस्कारित–साहजिक असा काही भेद-भाव त्यांच्यामध्ये दिसतो का—ह्या प्रश्नांचा इतिहासकाराच्या निर्लेप आणि साक्षेपी नजरेने शोध घ्यायला हवा.[1]

सध्या प्रमाणबोली ह्या संस्थेबद्दल काही स्थूल विधानें करूनच आपण थांबणार आहोत. समाजदृष्ट्या पाहिलें तर प्रमाणबोली ही जोडण्याबरोबर तोडण्याचेंही काम करते— भाषिक समाजातील सर्वांना ती जशी एकत्र आणते, निष्ठा आणि अभिमान ह्या भावबंधनात गुरफटवते, तशीच ती त्यांना शेजारच्या भाषिक समाजापासून अलग काढते. प्रमाणबोली शिकणाऱ्यांना प्रतिष्ठेचें बक्षीस देऊन ती ओढून घेते, त्याच-बरोबर त्यांच्यामध्ये आणि इतरांमध्ये दुरावा उत्पन्न करते. संस्कृतिदृष्ट्या पाहिलें तर प्रमाणबोली कालदृष्ट्या दूर असलेल्या पिढ्यांना जोडून परंपरा टिकवायला मदत करते. मागच्या पिढीचा आशय नंतर जन्मलेल्या, तुटलेल्या पिढीपर्यंत नेमकेपणाने

१. एकोणिसाव्या शतकापुरता एक उपयुक्त अभ्यास म्हणजे कृ. भि. कुलकर्णी ह्यांचा ('एकोणिसाव्या शतकातील मराठी शालेय वाङ्मय व त्याचा आजच्या मराठी भाषेच्या घटनेवर झालेला परिणाम', मुंबई विद्यापीठ, पी–एच्. डी. प्रबंध; हा १९५६ साली 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति' ह्या चुकीच्या नावाखाली प्रसिद्ध झाला.)

पोचवते; पण ह्याचबरोबर प्रमाण– बोली विचार, तंत्रविद्या, आणि भावनाभिव्यक्ति ह्या बाबतीत ' जाण ' उत्पन्न करते आणि प्रयोगशीलता, परिवर्तनशीलता ह्या गुणांना मदत करते. कोणत्याही बोलीला एक आंतरिक नियमन, स्व–भाव असतो. प्रमाण– बोलीलाही तो असतो, पण त्याला जाणिवेची, नियोजनक्षमतेची एक किनार लाभलेली असते.

काही उपयुक्त संदर्भ

Baugh, Albert C. A History of the English language. 2nd ed. London : Routledge & Kegan Paul, 1959. (ch. 9, 11).

Ferguson, Charles A. Diglossia. Word 15. 325–40, 1959. Reprinted in : Hymes (ed.) 1964.

Garvin, Paul L. The Standard language problem : concepts and methods. Anthropological linguistics 1 : 3. 28–31, 1959. Reprinted in : Hymes (ed.) 1964.

Gumperz, John J. Speech variation and the study of Indian civilization. American anthropologist 63. 976–88, 1961. Reprinted in : Hymes (ed.) 1964.

Haugen, Einar. Dialect, language, nation. American anthropologist 68. 922–35, 1966.

Hill, Trevor. Institutional linguistics. Orbis 7. 441–55, 1958.

Hymes, Dell H. (ed.). Language in culture and society. New York : Harper & Row, 1964.

Jespersen, Otto. Mankind, nation and individual from a linguistic point of view. Danish ed., 1925. English translation : London : Allen & Unwin, 1946. (ch. 3 to 6.)

Martinet, André. Dialect. Romance philology 8. 1–11, 1954.

Ray, Punya Sloka. Language standardization. The Hague : Mouton, 1963. (ch. 11, reprinted from : Word 18 : 3, 1962).

भाषा आणि शिक्षण

भाषा आणि शिक्षण ह्या विषयाचा चार वेगळ्या अंगांनी विचार करता येईल. एक म्हणजे, शिक्षण भाषेमधून घेतलें जातें हा. भारदस्त भाषेत सांगायचें तर 'भाषा शिक्षणाचें माध्यम असतें.' दोन, स्वभाषा शिकवण्याबद्दलचा विचार. तीन, परभाषा शिकवण्याचा विचार. आणि चार, विविध भाषांचें ज्ञान मिळवणें ह्याच्या पलीकडे जाऊन, त्या भाषांबद्दल म्हणा किंवा भाषा ह्या एकंदर सामाजिक संस्थेबद्दल म्हणा ज्ञान मिळविणें. एखाद्या भाषेचें ज्ञान मिळणें आणि त्या भाषेबद्दल ज्ञान मिळणें ह्या दोन्हींत पुष्कळच अंतर आहे. शिक्षणक्रमात अमूक भाषेचा विषय म्हणून समावेश ही शब्दयोजना मोघम आणि म्हणून कधीकधी फसवी ठरते. म्हणून ही फोड करून सांगितली.

शिक्षणाचें माध्यम म्हणून भाषा

शिक्षण म्हणजे एका पिढीच्या ज्ञानाचें, संस्कारांचें, एकंदर संस्कृतीचें संचित दुसऱ्या पिढीपर्यंत पोचण्याची व्यवस्था असें मानलें आणि भाषा म्हणजे एका व्यक्तीला आलेला कोणताही अनुभव, कोणतीही जाणीव, भावना, इच्छा दुसऱ्या एक किंवा अनेक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी समाजाकडून सर्वांना उपलब्ध झालेलें एक साधन असें मानलें तर ह्या दोन गोष्टींचा संबंध कसा निकटचा आहे हें सहज ध्यानात येईल. भाषा हें केवळ संपर्काचें माध्यम रहात नाही, तें शिक्षणाचें, विशेषतः विधिवत् शिक्षणाचें माध्यम राहतें.

साहित्य, इतिहास, नागरिकशास्त्र ह्यांच्यासारखे विषय शिकायचे आणि शिकवायचे म्हणजे त्याने फाडफाड किंवा धडाधड बोलावे अशी शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची एकमेकांकडून अपेक्षा असते. परंतु तांत्रिक किंवा प्रायोगिक विषयांच्या बाबतीत अशी अपेक्षा आपण ठेवत नाही. एखादा फिटर किंवा एंजिनिअर, डॉक्टर, किंवा गवई आपल्या विषयाबद्दल मुखदुर्बळ असला तर फारसें बिघडत नाही अशी आपली भावना दिसते. किंबहुना असा मुखदुर्बळपणा त्याला थोडा शोभूनच दिसतो अशीही कल्पना आपल्या समाजात आढळते. तांत्रिक किंवा प्रायोगिक अभ्यासक्रमात भाषेला स्थान द्या; कृषि, वाणिज्य, विज्ञान अशा विषयांच्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमात

मराठी किंवा इंग्लिश ह्या विषयांना स्थान द्या—असें म्हटलें तर त्या क्षेत्रांतली मंडळी नाखूष असतात. परंतु ही नाखुषी बरोबर नाही. बरोबर असलीच तर नुसत्या वाचाळपणापेक्षा मूक कौशल्य परवडलें एवढ्यापुरतीच ती बरोबर आहे. तांत्रिक कौशल्य आणि भाषेवर आपल्या विषयापुरतें का होईना प्रभुत्व असणें ह्या दोन गोष्टी एका माणसात सापडणें हा केवळ अद्‌भुत योगायोग न मानता त्याबद्दल शिक्षणात आग्रह धरायला हवा. औद्योगिक व वैज्ञानिक युगाची ती एक प्राथमिक गरज आहे.

आईने मुलीला स्वयंपाक शिकवणें, बापाने मुलाला घरात चाललेली चांभारकी शिकवणें आणि तंत्रशाळेत पाकक्रिया किंवा कातडकाम शिकवणें ह्यात फरक असायचा तो केवळ नावापुरता नको. भाजीत मीठ किती घालायचें तें आईला हाताने दाखवावें लागतें, तोंडाने सांगता येत नाही, आणि त्यात फारसें बिघडत नाही. पण फिटरला किंवा वायरमनला हाच न्याय लावून भागणार नाही. पण तसा तो पुष्कळदा लावला जातो आणि परिणाम असा होतो की त्याला हाताखालच्या किंवा शिकाऊ लोकांना निश्चित आणि रेखीव सूचना देणें किंवा गिऱ्हाईकांकडून आणि वरिष्ठांकडून आलेल्या अशा सूचना समजावून घेऊन पाळणें किंवा तंत्रशाळेतून बाहेर पडल्यानंतर प्रचारात आलेलीं नवींनवीं तंत्रें आत्मसात् करणें ह्यातलें काही जमत नाही. समक्ष डोकेफोड आणि वेळाची आणि मालाची नासाडी ह्यांच्याशिवाय कामें होत नाहीत. तंत्रशाळेत नुसती साधनसामग्री आणून भागणार नाही.

शास्त्रीय गायन, एंजिनियरिंग, डॉक्टरी, प्रायोगिक विज्ञान ह्या सारख्या वरच्या पातळीवरील क्षेत्रांत हीच रड वरच्या पातळीवर आहे! ह्या क्षेत्रांत अत्यंत निष्णात आणि नाणावलेले लोक भारतामध्ये दिसून येतात. परंतु त्यांचें नैपुण्य पुढच्या पिढी-पर्यंत पोचत नाही, त्यांनी जाताजाता केलेले यशस्वी प्रयोग त्यांच्यापुरतेच राहतात, त्या त्या क्षेत्रात सतत भर टाकण्याचें काम जसें व्हायला पाहिजे तसें तें भारतात होत नाही. फार काय, जी काही भर पडते आहे किंवा परदेशातून उसनवारीने आणली जाते तिचें अंशतः तरी ज्ञान सर्वसामान्य सुशिक्षित माणसापर्यंत पोचवायलासुद्धा ही मंडळी असमर्थ असतात.

आजीबाईंच्या बटव्यातलीं औषधें कुणाला न सांगितल्यामुळे आजीबाईंच्या बरोबर नाहीशीं झालीं ही तक्रार आणि भारतात निष्णात डॉक्टर आहेत पण वैद्यकीय संशोधन होत नाही ही तक्रार ह्या एकाच प्रकारच्या मध्ययुगीन प्रवृत्तीवर प्रकाश टाकतात. आमचे तंत्रज्ञ पुरेसे वाचाळ नाहीत, मुखदुर्बळ आहेत. तांत्रिक शिक्षण आणि प्रगति भाषेच्या सढळ आणि कुशल उपयोगाशिवाय होणार नाही ह्याची सार्वत्रिक जाणीव होणें जरूर आहे. तंत्रज्ञाला आणि वैज्ञानिकाला भाषा येणें म्हणजे केवळ परिभाषा येणें नव्हे तर विषयाची सुव्यवस्थित आणि सुबोध मांडणी करता येणें—मग तो अध्यापक असो वा नसो. भाषेच्या तुजवी ज्ञानावर भागणार नाही.

शिक्षणाचें माध्यम स्वभाषा असावी का परभाषा असावी अशी एक चर्चा आपल्याकडे चालते. शिक्षणाचें माध्यम म्हणजे परीक्षेच माध्यम आणि वर्गात बोलण्याचें माध्यम एवढाच विचार सुरवातीला होता. नंतर लायब्ररी लँग्वेजची कल्पना त्यात आली. प्राथमिक शाळेत तरी स्वभाषेला पर्याय नाही. आदिवासी मुलांना प्राथमिक शिक्षण द्यायचें तर एकदम प्रादेशिक भाषेत त्यांना डुब्या खायला लावण्यापेक्षा प्रारंभीचीं दोनतीन वर्षें तरी विद्यार्थ्यांची घरची भाषा आणि प्रादेशिक भाषा ह्या दोन्ही भाषा जाणणारे शिक्षक त्यांना मिळणें जरूर आहे. (या उपप्रश्नाच्या अधिक चर्चेसाठी पहा : ' आदिवासींच्या प्रश्नाची भाषिक बाजू. ')

शालेय शिक्षणात स्वभाषा हें माध्यम असावें ह्याला एक कारण आहे. त्या शैक्षणिक अवस्थेत अमूक इतकें ज्ञान मुलाला द्यायचें एवढाच प्रश्न नसतो, तर ज्ञान घ्यायची ओढ मुलांमध्ये उत्पन्न करणें आणि ज्ञान ग्रहण करण्याचा सराव त्याला होणें ह्याही गोष्टी साधायच्या असतात. त्या तशा साधायच्या तर मुलांच्या स्वानुभवाचें, स्वभाषेतून आकार घेणारें विश्व आणि शाळेतून मिळणाऱ्या ज्ञानाचें विश्व ह्यांचा सांधा जुळला पाहिजे. स्वभाषेतून शिक्षण देणें ह्यासाठी आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतच इंग्लिश माध्यमाचा सामना करणाऱ्या सधन वर्गातील मुलाची स्थिति त्या आदिवासी मुलाइतकीच दयनीय आहे.

स्वभाषेतून असा सांधा जुळल्यावर ज्ञानाची ओढ उत्पन्न होणें आणि विचारांची मांडणी करण्याची पद्धत शिकणें ह्यांचें काय ? ह्या गोष्टी घडायला स्वभाषा–माध्यम उपकारक असलें तरी पुरेसें मात्र नाही. आपल्या माध्यमिक शाळांमधून बाहेर पडणारीं मुलें विद्यापीठीय शिक्षणाला कमी पडतात याचें कारण केवळ त्यांचें इंग्लिश कच्चें असतें, वर्गात काय चाललें आहे किंवा इंग्लिश पुस्तकांतून काय सांगितलें आहे हें त्यांना समजत नाही एवढेंच नाही. ह्या अडचणी उपस्थित नसल्या तरी तीं कमी पडतात. ह्याचें मुख्य कारण माध्यमिक शाळेत ज्ञानाची ओढ उत्पन्न होईल आणि विचारांची मांडणी करण्याची पद्धत उमगेल अशी तजवीज होत नाही हेंच आहे. तशी तजवीज करतांना इतर विषय शिकवण्याच्या पद्धतींबरोबरच भाषा शिकवण्याच्या पद्धति देखील सुधारायला पाहिजेत.

माध्यमिक शाळेत स्वभाषेच्या जोडीला इंग्लिश, हिंदी ह्या परभाषा शिकवल्या जातात. ह्या परभाषांवर प्राथमिक प्रभुत्व आल्यावर त्यांचा उपयोग माध्यम म्हणून स्वभाषेच्या ऐवजी जरी नव्हे तरी स्वभाषेच्या जोडीला असा केला तर ? किमान पक्षी इतर शालेय विषयावरचीं ह्या परभाषांतून लिहिलेलीं पुस्तकें मुलांच्याकडून पद्धतशीरपणे वाचवून घेतलीं तर ? असें केलें तर परभाषा–प्रभुत्वाला वाढीव सरावामुळे येणारी बळकटी तर येईलच, पण इंग्लिश, हिंदी ह्यांचा उपयोग लुटुपुटीचाच नव्हे तर खरोखरीचा करायचा असतो हें मुलांच्या मनावर ठसेल. ज्या ठिकाणी वर्गाच्या चार

भिंतींच्या बाहेर मुलांच्या कानांवरून किंवा नजरेखालून इंग्लिश, हिंदी ह्या भाषा जवळजवळ जातच नाहीत अशा ठिकाणी ही जाणीव मुलांना होणें अतिशय अगत्याचें आहे. आज ती तशी होताना दिसत नाही.

विद्यापीठीय शिक्षणाचें स्वरूप प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षणापेक्षा आणि तांत्रिक प्रशिक्षणापेक्षा वेगळें आहे. स्वानुभव आणि ज्ञानविश्व यांमध्ये बांधलेला भाषेचा पूल इथे गृहीत धरून पुढे जायचें आहे. स्वभाषा, इंग्लिश, हिंदी ह्या भाषा आवश्यक विषय म्हणून शिकवण्याची जरुरी उच्च माध्यमिक पातळीच्या नंतर खरें म्हणजे राहू नये. ह्या भाषांवर बऱ्यापैकी प्रभुत्व (केवळ प्राथमिक प्रभुत्व वा कामचलाऊ ज्ञान नव्हे) शाळेत अगोदरच प्रस्थापित झालेलें असलें पाहिजे. ह्या प्रस्थापित पुलावरून पुढे जायचें म्हणजे काय? ज्ञानविश्वाचीं क्षितिजें रुंदावायचीं आहेत आणि पदव्युत्तर पातळीवर तर स्वतः नवीन ज्ञान पैदा करून एकंदर मानवी ज्ञानात भर घालण्याची हिम्मत बांधायची आहे. विद्यापीठीय शिक्षणाचें माध्यम केवळ स्वभाषा ठेवणें भागण्यासारखें नाही. आयुर्वेद किंवा भारतीय तत्त्वज्ञान शिकायचें तर जरुरीपुरतें संस्कृत यायला पाहिजे, हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या अध्ययनासाठी हिंदी यायला पाहिजे, रसायनासाठी जर्मन यायला पाहिजे, स्थापत्यविद्येसाठी फ्रेंच यायला पाहिजे.

भाषेचें जरुरीपुरतें ज्ञान म्हणजे किती ज्ञान? आता हें उघड आहे की विद्यापीठीय शिक्षणातले काही विषय– उदा० साहित्य, तत्त्वज्ञान, इतिहास, कायदा, वृत्तपत्रविद्या– भाषेशी अधिक निगडित आहेत, तर काही विषयांची प्रमुख भाषा मराठी वा इंग्लिश नसून गणित ही आहे– उदा० भौतिकी, अर्थविज्ञान, अभियांत्रिकी.

शिक्षणाचा विषय म्हणून स्वभाषा

माध्यम म्हणून प्राथमिक, माध्यमिक, आणि काहीशा मर्यादित प्रमाणात उच्च शिक्षणामध्ये भाषेवरच्या प्रभुत्वाला केवढें महत्त्व आहे हें एव्हाना लक्षात यावें. अर्थातच भाषेच्या अध्यापकावर केवढी मोठी जबाबदारी यामुळे येते हेंही ध्यानात यावें. जॉर्ज सॅम्सन ह्या इंग्लिश शिक्षणतज्ज्ञाने असें म्हणून ठेवले आहे की, "Every teacher is a teacher of English" (English for the English, लंडन, १९२२). आपल्या परिस्थितीला अनुलक्षून आपण, मराठीत शिकवणारा शिक्षक हा मराठीचाही शिक्षक असतो असें म्हणू या. ह्याचा अर्थ मराठीचा वर्ग काय कुणाही सोम्यागोम्याकडे द्यावा असा नाही. तर भाषेखेरीज इतर विषय शिकवणारांनाही मराठीचें पक्कें ज्ञान हवें आणि त्यांनी आपापला विषय शिकवताना विद्यार्थ्यांचें मराठीही जोपासायला हवें आणि हें सर्व साधताना स्वभाषा म्हणजे मराठी शिकवणारा शिक्षक त्या सर्वांचें नेतृत्व करीत आहे एवढा सगळा अर्थ त्या उक्तीत आहे.

आता प्राथमिक शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्राथमिक शिक्षणाचें माध्यम जी प्रमाण-मराठी ती येते हें धरून चालता येईल का? उघडच आहे की तसें तें धरून चालता येत नाही. कोलाम किंवा कोर्कू मुलांच्या बाबतीतच नव्हे तर मराठीच्या प्रमाणेतर अशा प्रादेशिक बोली बोलणाऱ्या सर्वच मुलांच्या बाबतीत ही अडचण आहे. ह्या अडचणीचा परिहार जाणीवपूर्वक आणि समजुतीने व्हायला हवा. मराठी-भाषिक मुलाला हिंदी शिकवताना त्याने मराठी विसरून जावें ही भूमिका नसते, तर मराठीच्या जोडीला एक नवीन भाषा शिकायची आहे ही भूमिका असते. हाच विवेक प्राथमिक शाळेत प्रमाण-मराठी शिकवताना व्हायला पाहिजे. आपल्याला 'शुद्ध' प्रमाण-मराठी येत नाही म्हणून आपण फुकट किंवा आपल्याला प्रमाण-मराठी नाही आलें तर काही बिघडत नाही ह्यांपैकी कोणतीच भूमिका विद्यार्थ्यांच्या मनात रुजू देता कामा नये. आपण 'शुद्ध' माणदेशी मराठी बोलतो त्याचप्रमाणे 'शुद्ध' प्रमाण-मराठीसुद्धा आपल्याला बोलता येणें आणि तीदेखील स्व-भाषा होणें अवघड नाही आणि कुटुंबाच्या आणि गावाच्या बाहेरील मोठ्या जगाचें ज्ञान करून घ्यायला त्याची जरुरीही आहे अशी भूमिका प्रस्थापित होणें आवश्यक आहे. जशी हिंदी ही भारताची लिंक-लँग्वेज आहे तशीच प्रमाण-मराठी ही अखिल महाराष्ट्राची जोड-भाषा आहे– कारण कुणा एकाच समाज-घटकाची ती मिरास नाही. (ह्यांसंबंधीची तात्त्विक बैठक मी अन्यत्र विस्ताराने मांडली आहे. (पहा : 'भाषेचें नियोजन' आणि 'भारताचे भाषिक प्रश्न'.) 'शुद्ध' माणदेशी मराठी बोलीत ती बोलणाऱ्याला कविता किंवा कथा लिहाविशी वाटली तर तेंही स्वाभाविक आहे. अशी ही कविता, कथा अखिल महाराष्ट्राने आपलीशी केली तर उत्तमच.

आतापर्यंतच्या विवेचनाचा असा अर्थ समजायचा का की प्रादेशिक भाषा (उदाहरणार्थ महाराष्ट्रात मराठी) तिच्या प्रमाणित (किंवा 'शुद्ध') विभेदाच्या स्वरूपात ज्यांच्या घरीच बोलली जाते अशा मुलांच्या बाबतीत स्वभाषाशिक्षणाला प्राथमिक शाळेची पातळी ओलांडल्यावर फारसें महत्त्व नाही म्हणून? मराठी काय आपलीच भाषा आहे, तिच्यात काय शिकायचें आहे– या चालीवरची बेफिकिरी बरोबर नाही. कारण भाषा शिकवणारा शिक्षक हा अमूक एक विषय– इतिहास, भूगोल, भौतिकी– शिकवत नसला तरी कोणताही विषय ग्रहण करताना आणि त्याची दुसऱ्यासमोर मांडणी करताना भाषा कशी वाकवायची हें शिकवत असतो. सारांश-लेखन, निबंध-लेखन, वक्तृत्व स्पर्धेसाठी तयारी ह्यासारख्या गोष्टी विद्यार्थ्यांकडून करवून घेताना भाषाशिक्षक विचारांची शिस्त शिकवत असतो– म्हणजे निदान त्यांच्याकडून तशी अपेक्षा ठेवणें रास्त होईल. ही रास्त अपेक्षा माध्यमिक अध्यापक पुरी करू शकला नाही तर त्याचा विद्यार्थी विद्यापीठीय शिक्षणात चांगलाच कमी पडतो– मग शालेय किंवा विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम कोणतेंही असो. (ह्या

मुद्द्याचा अधिक विस्तार ' परिभाषेची परिभाषा ' ह्या लेखात केला आहे.)

भारतासारख्या अंशतः अविकसित आणि अंशतः विकसनशील देशामध्ये ह्या प्रश्नामध्ये आणखी एक अडचण उपस्थित होते. अखिलभारतीय पातळीवर अनेक भाषा असणें आणि प्रादेशिक पातळीवर अनेक बोली असणें एवढ्यापुरताच भारताचा भाषिक प्रश्न मर्यादित नाही. भारतापुढे बहुभाषितेखेरीज दुसरीही एक भाषिक समस्या आहे. (भारतापेक्षा भाषिकदृष्ट्या अधिक एकजिनसी असलेल्या अविकसित वा विकसनशील देशांच्या पुढेही ती समस्या आहे.) ती म्हणजे भारतीय संस्कृति आणि भारतीयांच्या आजच्या गरजा ह्यांच्यामध्ये असलेली भाषिक फट. आपल्या भारतीय भाषा एका शेतकीप्रधान, ग्रामीण, स्थितिप्रिय, सामंती, जलद दळणवळण नसलेल्या समाजात पोसल्या गेलेल्या आहेत, आणि त्यांना एका विकास-सन्मुख, आधुनिक समाजाच्या उभारणीला हातभार लावायचा आहे. ह्यासाठी ह्या भाषांमध्ये त्यांच्यामधले समर्थ वक्ते आणि लेखक परिवर्तन घडवून आणीत आहेत. ह्या परिवर्तनाची चाहूल विद्यार्थ्याला लागेल आणि तो समर्थ श्रोता आणि वाचक बनेल ह्याची तजवीज माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणात होणें आवश्यक आहे— देशाच्या भवितव्यासाठी आवश्यक आहे. (ह्या मुद्याच्या अधिक विस्तारासाठी पहा : ' भाषेचें नियोजन ' आणि ' भारताचे भाषिक प्रश्न ' आणि **मराठी भाषेचा आर्थिक संसार** त्या पुस्तकामधलें ' भाषाप्रदूषण ' हें प्रकरण.)

शिक्षणाचा विषय म्हणून परभाषा

स्वभाषा म्हणजे माणूस जी पूर्णपणे आत्मसात् करतो ती भाषा, जी भाषा बोलताना किंवा लिहिताना त्याला आत्मविश्वास असतो, आपण चूक करू अशी दिक्कत वाटत नाही ती भाषा. ही स्वभाषा पुष्कळदा त्या माणसाची प्रारंभिक बोली असते, आयुष्यात सुरवातीलाच ती तो शिकतो. पण कधी तसें नसतें. द्वैभाषिक प्रदेशात किंवा कुटुंबात, प्राथमिक किंवा पूर्वप्राथमिक शाळेत मूल पुष्कळदा दुसरीही बोलभाषा हस्तगत करतें. मग तीही त्याची स्वभाषा बनते. उदाहरणार्थ ज्यांची प्रारंभिक बोली मराठीची एखादी प्रादेशिक प्रमाणेतर बोली आहे परंतु ज्यांना प्रमाणमराठी देखील उत्तम येते अशा व्यक्ति आपल्या आढळात येतात. त्यांना प्रमाणमराठी ही स्वभाषा म्हणून येते असेंच म्हटलें पाहिजे.

मग परभाषा म्हणजे काय ? परभाषा म्हणजे स्व-भाषेखेरीज इतर कोणतीही भाषा असा अर्थ इथे करायचा आहे. मराठी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हिंदी, बांगला, संस्कृत, इंग्लिश, फ्रेंच, फारसी, चिनी ह्या सर्व परभाषाच. त्या शिकत असताना वर्गाच्या बाहेरही त्यांचा वापर करायची वेळ विद्यार्थ्यांवर येत नाही. म्हणजे वर्गात त्यांचा वापर करायची संधि प्रत्येक विद्यार्थ्याला जास्तीत जास्त मिळायला हवी हें ओघानेच

आलें. वापर करायची संधी म्हणजे ती भाषा ऐकायला, बोलायला, वाचायला, लिहायला मिळणें. पण प्रत्यक्षात आपल्याला काय दिसतें ? शाळेत किंवा महाविद्यालयात संस्कृत शिकवण्याचा उद्देश तिच्यातील ललित आणि ललितेतर वाङ्मयाची गोडी मुलांना लावणें हा आहे. प्रत्यक्षात मुलें व्याकरणाचा धसका घेतात आणि परीक्षा दिल्यानंतर पुन्हा संस्कृतच्या वाटेला जात नाहीत. ज्या काळी इंग्लिशमधून सगळे विषय शिकवण्याची पद्धत होती त्या काळच्या पिढीला भाषांतरपाठमालेने काम भानण्यासारखें होतें. परंतु इंग्लिशचा वापर इतर तासांना करण्याची संधि गेल्यावर इंग्लिशच्या तासाला मराठीच जास्त कानावर पडणें आणि मराठीतच विचार करून त्या कुबड्यांनिशी इंग्लिश लिहिणें–वाचणें हें काही खरें नाही. भाषांतराची अवघड आणि उपयुक्त कला अवगत असणें वाईट नाही. पण ती इंग्लिशचें प्रभुत्व प्राप्त झाल्यानंतर शिकायची कला आहे. भाषांतरापासून इंग्लिश शिकवायला आरंभ करणें म्हणजे नीट उभे राहता येत नसलेल्या मुलाला अडथळ्याची शर्यत धावायला लावण्यासारखें आहे. हिंदी ही मराठीला जवळची भाषा असूनही त्या मानाने हिंदीमधील प्रगतिसुद्धा समाधानकारक नाही. शाळेमधून विद्यार्थी बाहेर पडतो तेव्हा हिंदीमध्ये ळ नसतो, दोनच लिंगें असतात, नामाला संज्ञा म्हणतात, इत्यादि हिंदीबद्दल आणि हिंदीमधल्या व्याकरणविषयक परिभाषेबद्दल माहिती त्याच्याजवळ असते. पण त्याला अस्खलित बोलता-लिहिता येत नाही. फ्रेंच इत्यादि भारताबाहेरच्या परभाषांची तीच स्थिति आहे. बांगला, कन्नडसारख्या इतर भारतीय भाषा शिकण्याची सोय नेहमीच्या पाठ्यक्रमात अजून व्हायचीच आहे. (कोठारी अहवालात संस्कृत, फारसी, जर्मन, फ्रेंच इत्यादींच्या जोडीला अन्य भारतीय भाषा ऐच्छिक विषय म्हणून शिकवण्याची सोय व्हायला हवी असें म्हटलें आहे. त्याची महाराष्ट्रात अंमलबजावणी कधी होणार ? हरियाणाने काही शाळांमधून मराठी शिकवण्याचा निर्णय घेतला आहे.)

परभाषा कशी शिकवायची हा एक स्वतंत्र विषय आहे. सध्या त्याचीं मुख्य चार सूत्रें सांगता येतील. तीं अशीं–पहिलें सूत्र म्हणजे भाषा शिकवणें म्हणजे भाषा ऐकायला, बोलायला, लिहायला, वाचायला शिकवणें, भाषेबद्दल बोलायला-लिहायला शिकवणें नव्हे. भाषांतर आणि साहित्याचें रसग्रहण ह्या कला भाषा पुरतेपणी आल्यानंतर शिकायच्या आहेत; साध्य आणि साधन ह्यांची तिथे गल्लत करू नये.

दुसरें सूत्र म्हणजे विद्यार्थ्यांची पूर्वतयारी, वय इत्यादि; शिक्षकाची कुवत, पूर्वतयारी; उपलब्ध असलेला वेळ आणि साधनसामग्री; जी भाषा शिकायची ती शिकवण्याचा विशिष्ट हेतु; आणि ती भाषा आणि विद्यार्थ्याला अवगत असलेली स्वभाषा ह्यांच्यामधले भाषिक अंतर– ह्या सर्वांचा एकत्रित विचार करून त्या त्या परिस्थितीत योग्य ती पद्धत निवडणें किंवा जरूर तर निरनिराळ्या पद्धतींचा समन्वय करणें.

तिसरें सूत्र म्हणजे जी पद्ध अंगीकारायची तिच्यामध्ये तीन गोष्टींचा मेळ घालणें. ऐकणें, बोलणें, चालणें, लिहिणें ह्या क्रमाने भाषा वापरायची संधि विद्यार्थ्याला मिळाली पाहिजे हें खरें. तशी ती संधि मिळताना भाषेचे उच्चार, शब्दयोजना, वाक्यरचना विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पडण्यासाठी पाठांतर आणि संथा ह्यांचा मर्यादित उपयोग करावा लागेल. (संथा म्हणजे, उदाहरणार्थ, प्रश्नांचें उत्तर देणें, उत्तराचा प्रश्न बनवणें, होकाराचा नकार बनवणें, इत्यादि कसरती करून घेणें.) हा जो वापर करायचा त्याला विद्यार्थ्यांच्या शालेय आणि शालाबाह्य जीवनाशी संबंध आणून म्हणा, चित्रादिकांचा उपयोग करून म्हणा, नाट्यपद्धतीचा उपयोग करून म्हणा, पाठ्यक्रमाच्या त्या त्या टप्प्याला पेलतील अशा उताऱ्यांची निवड करून म्हणा, अर्थपूर्ण संदर्भ उत्पन्न करायचा. पण हें सर्व करताना भाषा आत्मसात् करणें म्हणजे केवळ शिकलेल्या मजकुराची जिवंत संदर्भात उजळणी नव्हे, तर नव्या unseen मजकुराचें ग्रहण करणें किंवा निर्मिति करणें हाही भाग त्यात आहे ह्याचा विसर पडता कामा नये. ह्यासाठी साधन म्हणून, साध्य म्हणून नव्हे, व्याकरणाचा मर्यादित उपयोग वर्गात करावा लागेल. अभ्यास किंवा घोटवणें, जीवनात घोळवणें, आणि जाणवलेले नियम नव्याने लावणें ह्यांपैकी कशाकडेही फार काळ दुर्लक्ष झालें तर ती परभाषाशिक्षणपद्धती एकांगी आणि म्हणून अयशस्वी ठरण्याचा धोका उत्पन्न होतो.

चौथें सूत्र म्हणजे व्याकरण आणि स्वनव्यवस्थाविचार ह्यांचा वर्गातला उपयोग जरी अप्रत्यक्ष आणि मर्यादित स्वरूपात करायचा असला तरी त्या विषयांचें अद्ययावत् आणि पक्कें ज्ञान भाषाशिक्षकाला आणि त्या शिक्षकाच्या शिक्षकाला असणें जरूर आहे.

परभाषा कशी शिकवायची हा जसा प्रश्न आहे तसा परभाषा शिकायच्या का आणि अमूक एक परभाषा शिकायची तर ती का शिकायची असाही एक प्रश्न विचारासाठी आपल्यापुढे येतो. त्याचा विचार करताना मानवी जीवनात भाषेचीं कार्यें कोणतीं ह्या मूलभूत प्रश्नाकडे आपण येतो. मानवी जीवनात भाषेचें स्थान काय? (मग ती स्वभाषा असो किंवा परभाषा असो.) भाषा तीन प्रकारचीं कार्यें पार पाडते : उपयुक्ततताप्रवण, सामाजिकताप्रवण, आणि सांस्कृतिकताप्रवण (म्हणजेच आत्मिक) अशीं त्रिविध कार्यें भाषा पार पाडते.

उदाहरणादाखल आपण भारतीय इंग्लिश शिकतो तेव्हा ती का शिकतो, कोणत्या उपयुक्ताप्रवण, सामाजिकताप्रवण, किंवा आत्मिक कारणांसाठी ती शिकतो हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. (तसा तो अन्यत्र विचारला आहे. पहा : ‘ इंग्लिश व मराठी भाषांचें शिक्षणक्रमात स्थान ’.)

शिक्षणाचा विषय म्हणून भाषाविचार

आतापर्यंत आपण शिक्षणाचें माध्यम म्हणून भाषेचें स्थान, स्वभाषाशिक्षणाचें

महत्त्व, आणि परभाषाशिक्षणाची पद्धति ह्या तीन अंगांचा विचार केला. तो करताना भाषेचें ज्ञान आणि भाषेबद्दलचें ज्ञान वेगळीं आहेत ह्यांवर आपण विशेष जोर दिला. आता शेवटी भाषेबद्दलचें जें हें ज्ञान त्याला शिक्षणात काही स्थान आहे की नाही ह्याचा विचार आपण करू.

उच्चस्तरीय शिक्षणात भाषाविज्ञान ह्या विषयाचें अध्ययन आणि संशोधन ह्यांना महत्त्वाचें स्थान आहे ह्याची जाणीव भारतात गेल्या काही वर्षांत झाली आहे. त्याप्रमाणे त्या ज्ञानशाखेला विविधप्रकारे उत्तेजन मिळतें आहे ही स्वागतार्ह अशीच गोष्ट आहे. परंतु एवढ्याने भागणार नाही. भाषेसारखी सर्वांच्या जिव्हाळ्याची गोष्ट. तिच्या प्रकृतीचें ज्ञान आणि निदान हें केवळ विशेषज्ञांनाच होणें पुरेसें नाही.

आपल्या देशाचा व जगाचा इतिहास–भूगोल हा सर्वांनाच थोडाथोडा माहीत असावा अशी आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे भाषेसारख्या महत्त्वाच्या सामाजिक संस्थेबद्दल सर्वांना प्राथमिक माहिती असावी, निदान तिच्या संबंधात कुणाच्या मनात प्राथमिक अपसमज नसावेत अशी अपेक्षा ठेवणें वाजवी ठरेल असें मला वाटतें. भारतासारख्या बहुभाषी देशात हें नुसतें वाजवी नव्हे, आवश्यक आहे.

अगदी प्राथमिक आणि माध्यमिक शालेय पाठ्यक्रमातदेखील इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र ह्यांच्या अनुषंगाने भाषेबद्दल कुतूहल आणि समंजसपणा जोपासणें शक्य आहे. पण ह्याच्याही पुढे जाऊन उच्चारण, लेखनपद्धती, व्याकरण, शब्दसंग्रह, अर्थनिष्पत्ति ह्या भाषेच्या विविध अंगांबद्दल आणि त्यांच्या परस्परसंबंधांबद्दल स्पष्ट जाणीव करून देण्याचें सुयोग्य स्थान म्हणजे स्वभाषाशिक्षण. भाषाविश्लेषणाचें प्राथमिक ज्ञान करून द्यायला तसा स्वतंत्र विषय ठेवण्याची जरूर नाही. स्वभाषेच्या संदर्भात हें ज्ञान करून देणें शक्य आहे. मात्र त्यासाठी पाठ्यपुस्तकांची नव्याने रचना करायला हवी. शिक्षकांनाही हा नवा दृष्टिकोण समजावून द्यायला हवा. विद्यार्थ्याला स्वभाषेबद्दल जर डोळस जाणीव झाली तर तिचा सुपरिणाम त्याच्या परभाषाशिक्षणावर होण्याचा संभव आहे. माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शालेय स्तरांकडून आपण महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळलो तर भाषाविज्ञान हा एक ऐच्छिक गौण विषय म्हणून ठेवता येईल. सगळ्या सामान्य सुशिक्षितांमध्ये भाषेबद्दल सुबुद्ध दृष्टिकोण फैलावण्यासाठी ह्याची मदत होईल.

भाषा किती शिकवायच्या, कुणाला शिकवायच्या, माध्यम म्हणून कोणत्या भाषेला कितपत स्थान द्यायचें ह्या सर्वांचा राजकीय आणि व्यावहारिक दृष्टीने आपण बराच खल करीत असतो. त्याचबरोबर भाषा काय साधण्यासाठी आणि कोणत्या पद्धतीने शिकवायची ह्याचाही खल होणें जरूर आहे. परभाषाशिक्षणाची आबाळ थांबवण्याइतकेंच स्वभाषाशिक्षणाची आबाळ थांबवणें अगत्याचें आहे.

भाषेचें नियोजन

परिवर्तन हा जीवनाचा नियम आहे. मात्र जीवनात जसा बदल असतो तसें सातत्यही असतें, बदलातून एक सुसंवाद टिकवण्याची धडपड असते. एका बाजूला प्राण्याच्या बदलत्या गरजा आणि आकांक्षा आणि दुसऱ्या बाजूला परिसराकडून जाणवलेली निकड किंवा मिळणारी सुसंधी ह्या दोहोंमध्ये सुसंवाद घडून यायचा असतो. हा परिवर्तनशील सुसंवाद राखण्याचें जीवसृटीचें एक साधन म्हणजे वंशपरंपरा. वंशपरंपरेमार्फत विकसनशील क्रांति कशी होते ह्याचाच डार्विनने सिद्धांत मांडला. परंतु आपण मानवाच्या पायरीपर्यंत पोचतो तेव्हा विकास ही केवळ जैविक बाब रहात नाही. मानवाकडून विकासाला एक नवीच गतिमानता मिळाली. त्याने वंशसातत्याला सांस्कृतिक सातत्याची जोड दिली. संस्कृति हा शब्द इथे एका व्यापक अर्थाने वापरला आहे—कोणताही लोकसमाज भोवतालच्या परिसराशी नातें जोडतो तो सामाजिक संकेतांमार्फत. हे संकेत, चालीरीती, रूढिरिवाज मिळून संस्कृति होते. अगोदरच्या पिढ्यांचें शहाणपण चालू पिढीला जसें म्हणींच्या मार्फत पोचतें म्हणतात तसेंच तें चालीरीती, परंपरा ह्यांच्यामार्फतही पोचतें. पण माणसाच्या शहाणपणाबरोबर मूर्खपणाही मिसळलेला असतो, किंवा जो एके काळी शहाणपणा ठरला असेल तो आज मूर्खपणा ठरतो. “ The old order changeth, yielding place to new ” असें कवीने म्हटलें आहे तें उगीच नाही. मात्र हें सर्व परिवर्तन फारच सावकाश होतें. संस्कृतिविकासाचें पाऊल वंशविकासापेक्षा चटकन उचलतें हें खरें आहे. वंशविकासाचें काळ–काम–वेगाचें गणित लक्षावधि वर्षांत करावें लागतें, तर संस्कृति–विकासासाठी शतकांची मोजपट्टी पुरते. असें जरी असलें, तरी आजच्या जगात होणाऱ्या बदलांच्या वेगापुढे संस्कृतिविकासाचा वेग कमीच पडतो. राममोहन राय आणि महादेव गोविंद रानडे ह्यांच्या सारख्या आधुनिक भारताच्या द्रष्ट्यांनी ही मेख ओळखली होती. म्हणून त्यांनी आपल्या पारंपरिक संकेतांमध्ये जाणीवपूर्वक परिवर्तन करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. हें जाणीवपूर्वक परिवर्तन म्हणजेच नियोजनाची पहिली ओळख. वंशसातत्य आणि संस्कृतिसातत्य ह्यांच्या नंतर विकासाचा तिसरा राजमार्ग खुला झाला आहे तो म्हणजे नियोजनसातत्य. थोडक्या शब्दात सांगायचे तर वंशसातत्य, संस्कृतिसातत्य, आणि नियोजनसातत्य ह्या क्रमाने विका-

साचाच विकास झाला आहे असें म्हणता येईल.

नियोजन म्हटलें की आपल्या डोळ्यासमोर आर्थिक नियोजन उभें राहतें, आणि आर्थिक नियोजन आवश्यक आहे की नाही, मागणी आणि पुरवठा ह्यांच्या नियमांवर भिस्त ठेवायची की त्यांच्यावर सरकारचें किंवा समाजाचें नियंत्रण ठेवायचें हा सगळा वाद आपल्याला आठवतो. आर्थिक क्षेत्रात कमीअधिक सामाजिक नियंत्रण पाहिजे ह्याबद्दल आज फारसें दुमत नाही. पण भाषेच्या क्षेत्रामधली मागणी आणि पुरवठा ह्यांच्यावर सरकार कशी काय नियंत्रणें घालणार हा प्रश्न तुमच्या मनात आला असणार. पण आताच आपण पाहिलें की, नियोजनाचा नियंत्रण एवढाच अर्थ घेणें ही फारच संकुचित दृष्टि झाली. नियोजनाची भूमिका व्यापक आहे.

तसें म्हटलें तर नियोजन हें प्रत्येक माणूस नेहमी करीत असतोच की ! आपल्या वाट्याला आलेल्या आयुष्याचें काय करायचें हें तो ठरवतो. हा त्याचा मुख्य निर्णय. त्याच्यापुढे येणाऱ्या समस्यांना तोंड कसें द्यायचें हें जें तो ठरवतो, तें ह्या मुख्य निर्णयावर आणि त्याला जें जगाचें भलेंबुरें ज्ञान असतें त्याच्यावर अवलंबून असतें. पुढच्या परिणामांचा अंदाज घेऊन तो अमूक करायचें की तमूक करायचें की स्वस्थ बघत बसायचें, हें ठरवतो, आणि एकदा स्वीकारलेले धोरण अंमलात आणण्याची पराकाष्ठा करतो. हें सर्व करताना त्याचे काही अंदाज चुकले, अडचणी आल्या तर तो आपल्या धोरणाचा फेरविचार करील.

उदाहरणार्थ, आपल्याला मिळालें त्यापेक्षा आपल्या मुलांना अधिक चांगलें शिक्षण मिळावें असें ठरवून तो पैसा साठवू लागतो. आपल्याला पुष्कळ मुलें नकोत असें तो ठरवतो. सिगारेट सोडायचा तो बेत करतो. तो धंद्यात पडतो आणि त्याच्या लक्षात येतें की त्याची तिखट जीभ त्याला नेहमी नडणार. मग तो आपल्या जिभेवर लगाम ठेवतो. वैयक्तिक नियोजनाची अनेक उदाहरणें देता येतील. एखाद्या जोडप्याने आपल्याला थोडीं आणि तींही अंतराने मुलें व्हावीं असें ठरवलें की त्याला आपण कुटुंबनियोजन म्हणतो. पण एक संपूर्ण समाज कुटुंबनियोजनाचा पुरस्कार करायचें एक धोरण म्हणून ठरवतो, तेव्हा त्याला लोकसंख्येचें नियोजन म्हणतात. एखाद्या तरुणाने गोड बोलायचे किंवा रासायनिक अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी जर्मन भाषा शिकायचें ठरवलें तर तें त्याचें वैयक्तिक नियोजन झालें. पण एखादा समाज ठरवतों की, जर्मन भाषेच्या अभ्यासाला उत्तेजन द्यावें किंवा भाषेच्या निष्काळजी आणि मोघम उपयोगाला आळा घालावा, तेव्हा तेथे भाषेचें नियोजन सुरू होतें.

नियोजन आणि लोकशाही ह्यात एक साम्य आहे. दोन्हींचा आधार एकच आहे. वैयक्तिक जीवनाच्या पातळीवरून सामाजिक जीवनाच्या पातळीवर नियोजन गेलें तरी त्याचा हा मूळचा आधार कायम राहतो – तो म्हणजे माणसाला आपल्या प्रश्नांचीं उत्तरें बुद्धीच्या कसोटीवर पारखून ते प्रश्न सोडवता येतात ही श्रद्धा. भोवतालचें

वास्तव केवळ समजावून घेण्यापुरता बुद्धीचा उपयोग करून माणूस थांबत नाही, तें वास्तव बदलण्यासाठी देखील त्याला त्या बुद्धीचा उपयोग करायचा असतो. मात्र सामाजिक पातळीवर बुद्धीचा ह्या प्रकारे उपयोग करताना नियोजनात काही अंतर्विरोध उपस्थित होतात. पहिली गोष्ट म्हणजे वास्तव बदलताना जुनी घडी मोडावी लागते, 'जुनें जाउं द्या मरणालागुन' हें मत कवळावें लागतें, पण त्याच बरोबर नवी घडी बसवावी लागते, सातत्य टिकवावें लागतें. सातत्य आणि क्रांति यांमधला अंतर्विरोध निरसण्याचा सोपा पण चुकीचा उपाय म्हणजे 'माझी क्रांति ही अखेरची क्रांति' असें ठरवणें, अवघड पण टिकाऊ उपाय म्हणजे 'निरंतर क्रांति'चें तत्त्व स्वीकारणें. नियोजन म्हणजे निरंतर क्रांति – आणि म्हणूनच आपण नियोजनसातत्याला आपण वंशसातत्य आणि संस्कृतिसातत्य या सर्वंकष विकासतत्त्वांच्या पंगतीला बसवलें. इतिहास हा माणसाला घडवितो हें खरें आहे, पण सामाजिक पातळीवरच्या नियोजनात माणूस इतिहास घडवायच्या प्रयत्नात असतो.

नियोजनामधला दुसरा एक अंतर्विरोध आहे. एका बाजूला प्रश्नांची उत्तरें शोधणें, बुद्धीच्या कसोटीवर तीं पारखणें हें करण्यासाठी व्यक्तीला उत्तेजन आहे, नव्हे तशी मागणी आहे. ह्याच्या बरोबर उलट दुसऱ्या बाजूला अशी एक प्रखर जाणीव आहे की व्यक्तीला समाजाबरोबर रहायचें आहे, व्यक्तीला समाजाबाहेर मोक्ष (म्हणजे मुक्तता) नाही, असलाच तर तो पुरुषार्थ नसून एक हव्यास आहे. ह्या ठिकाणी नियोजन आणि लोकशाही ह्यांच्यामधलें साम्य पुन्हा एकदा जाणवतें. उपक्रमशीलता आणि शिस्त, आत्मनिर्भरता आणि बांधिलकी ह्यांच्यामधला हा अंतर्विरोध कसा निरसायचा? थोड्यांनी आपल्या मतलबासाठी बाकीच्यांचें नियोजन करणें हें तर वैयक्तिक नियोजन झालें बुद्धीचा मक्ता एकदोघांकडे नसतो, प्रश्न सोडवण्यासाठी तज्ज्ञांसकट सगळ्यांचा हातभार लागतो हें विसरून सामाजिक नियोजन दामटणें हें लोकशाही नियोजन नाही.

नियोजनाचा एखाद्या क्षेत्रात स्वीकार होणें म्हणजे पारंपरिक कलाकौशल्य, हस्तव्यवसाय, कारागिरी, आणि हुन्नर ह्यांची जागा 'एंजिनियरिंग' आणि तंत्रज्ञान ह्यांनी घेण्यासारखें आहे. नियोजन आणि एंजिनियरिंग ह्यांच्यामधलें हें साम्य ओळखूनच की काय ज्याला आपण भाषेचें नियोजन म्हणतो आहोत त्याला काही लोक 'भाषेचें एंजिनियरिंग' म्हणत असतात.

भाषा ही आपल्याला इतकी परिचित गोष्ट आहे की, ती पुरेशी परिचित नाही आणि त्यामुळे तिचें नियोजन करणार तरी कसें हें चटकन लक्षात येत नाही. आपण भाषा केवळ आपले विचार किंवा भावना किंवा इच्छा उघड करण्यापुरती (किंवा लपवण्यापुरती म्हणा) म्हणजे साधन म्हणून बहुदा वापरत असतो. प्रसंगाला अनुरूप असें वाक्य आपण बेतून घेतो किंवा एखादें वाक्य तयार कपड्यासारखें निवडतो :

उदाहरणार्थ, ' कृपया आहेर आणू नये '. वाक्य वापरून झाल्यावर आपण जणू तें बाजूला टाकून देतो. ज्या खेपेला काही अडचण जाणवेल त्यावेळी फक्त आपण भाषेची एक प्रश्न म्हणून दखल घेतो : समजा the father could not communicate with the son या वाक्याचें योग्य मराठी भाषांतर कसें करायचें हें आपल्या लक्षात येत नाही आहे, किंवा रेडियोवरचें वार्तापत्र श्रोत्याला समजलें नाही, किंवा प्रवाशाला स्थानिक भाषा माहीत नाही, किंवा निरुपद्रवी वाटणाऱ्या शेऱ्यामुळे एखादें भांडण भडकलें आहे. असे भाषिक प्रश्न लोक सोडवीतही असतात—बोलणारा एखादा नवा शब्द पाडतो, किंवा तोच मजकूर आडवळणाने सांगून पाहतो, किंवा पत्र वाचल्यावर पत्रवाचक पत्रलेखकाकडे खुलासा मागतो, किंवा प्रवासी खिशात एक स्थानिक भाषेचा वाक्यकोश बाळगतो, किंवा दुकानदार दारावर पाटी लावून देतो की English is spoken here. एक ना दोन.

पण काही भाषिक प्रश्न असे असतात की ते वारंवार उद्‌भवू लागतात, काही इतके अवघड असतात की ते सोडवण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो, तर काहींच्या बाबतीत पुष्कळ लोकांनी सहकार्याने आणि समन्वयाने काय करण्याची गरज असते. निराळ्या शब्दांत सांगायचें तर भाषेच्या तज्ज्ञांच्या मदतीने भाषा-नियोजन करायची जरुरी भासते. भाषेचे तज्ज्ञ आणायचे कुठून हा प्रश्न चुटकी-सरसा सुटतो, कारण प्रत्येकाला वाटतें की, आपण भाषातज्ज्ञ आहोत, निदान प्रत्येक साक्षर व्यक्तीला तसें वाटतें. पण ही समजून बरोबर नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, ज्या भारताने भाषेच्या वैज्ञानिक अभ्यासाची मुहूर्तमेढ शेकडो वर्षांपूर्वी रोवली त्याच भारतात आज भाषाविज्ञान आणि त्याच्याशी जोडलेल्या अशा भाषेचें मनो-विज्ञान किंवा भाषेचें समाजविज्ञान ह्यांसारख्या ज्ञानशाखांची उपेक्षा होत आहे. एवढेंच नव्हे तर काही प्रश्नांवर भाषातज्ज्ञांचा सल्ला घ्यायला पाहिजे हें सुद्धा कुणाच्या ध्यानात येत नाही. नसुन्यादाखल सांगायचें तर काही वर्षांपूर्वी मराठी टंकलेखनासाठी कळफलक पक्का करण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यात टंकलेखनातल्या तज्ज्ञांना जसें बोलावलें गेलें तसें भाषावैज्ञानिकांना काही बोलावलें गेलें नाही. त्यामुळे टाळता येण्यासारख्या चुका झाल्या आणि मागून त्या निस्तरल्या गेल्या. पण त्यासाठी बरीच किंमत द्यावी लागली. त्याहून वाईट उदाहरण द्यायचें तर हिंदीमधून तार पाठवतां येण्यासाठी बसवलेली लघुगुरुसंकेतांची पद्धत म्हणजे डॉट–डॅश–कोड हें तयार करतानाही भाषातज्ज्ञांना बोलावलें गेलें नाही. बसवलेली पद्धत बोजड असल्यामुळे तार पाठवताना चुका होतात. तिचा वापर करायला कुणी फारसें धजत नाही. ज्यांना हिंदीमधून तार पाठवायची असते ते ती कशीतरी रोमनमध्ये लिहितात. (मी एक निराळी पद्धत बसवली आहे आणि तिची चाचणी घेऊन पहावी ह्यासाठी विविध संबंधित अधिकाऱ्यांना लिहिलेंही. सांगायला नकोच की मला साधी पोच देखील

आली नाही.) आणखी एक प्रकार म्हणजे संस्कृत भाषा येत असली तर ती व्यक्ति सर्व प्रकारच्या भाषिक समस्यांवर तज्ज्ञ ठरते — निदान भारतीय भाषांसंबंधीच्या समस्यांवर तज्ज्ञ ठरते — हा भ्रम. आता संस्कृतच्या ज्ञानाचा काही वेळा उपयोग होईलही, पण अशा ज्ञानाच्या जोडीला भाषिक समस्यांकडे पाहण्याची वैज्ञानिक दृष्टि नसली तर तें ज्ञान अडसर सुद्धा बनू शकतें !

भाषाविज्ञान आणि संलग्न भाषाविषयक ज्ञानशाखा ह्यांच्या संबंधीचें हें अज्ञान दुर्दैवाने केवळ सामान्य नागरिक आणि राज्यकर्ते आणि प्रशासक ह्यांच्यापुरतें मर्यादित नाही. भारतामधली विद्याक्षेत्रातली मंडळीही फारशीं वेगळीं नाहीत. भरीत भर म्हणजे ह्या अज्ञानाला साथ द्यायला कधी उघड किंवा छुपा वैरभाव प्रकट होतो (विशेषतः साहित्याच्या अध्यापकांमध्ये), तर कधी सरळ उपेक्षावृत्ति दिसून येते (विशेषतः सामाजिक वैज्ञानिकांमध्ये). [१]

आताच मी भाषेशी संबंधित तंत्रविद्येचीं दोन उदाहरणें सांगितलीं— तार पाठवण्याच्या संकेतपद्धति आणि टंकयंत्राचे कळफलक. ही यादी आणखीही वाढवता येईल —आंधळ्यांसाठी ब्रेल लिपी, लघुलेखन, दूरसंपर्क-संकेतपद्धती, खिळे जुळवण्याचे आणि गणकयंत्राचे कळफलक, वर्णक्रमी किंवा अकारविल्हेची पद्धत, भारतीय माणसांचीं आणि भौगोलिक विशेषांचीं विशेषनामें देवनागरी आणि रोमनमध्ये कशीं लिहावींत ह्याबद्दलचे संकेत, भारतीय किंवा विदेशी भाषांमध्ये प्रावीण्य अजमाविण्यासाठी प्रमाणित चाचण्या, विविध भाषांतून विविध माध्यमांतून संदेश पाठवण्याच्या प्रावीण्याच्या चाचण्या. पण एव्हाना हें सांगायला नको की भाषेचें नियोजन म्हणजे अशा भाषाविषयक तंत्रविद्येच्या प्रमाणीकरणापेक्षा पुष्कळच काही आहे. भाषेच्या नियोजनाचें प्रमुख सूत्र काही असेल तर तें म्हणजे भाषा ही राष्ट्राची साधनसंपत्ति आहे. मनुष्यबळ किंवा रेल्वे किंवा ऊर्जेची पुरवठा-केंद्रें ह्यांच्या बरोबरीने भाषेची देखभाल व्हायला पाहिजे. कुशल आणि उत्साही आणि उपक्रमशील लोक ही राष्ट्राची मोठी शक्ति आहे, उलट रोगट आणि आळशी आणि कळाहीन लोक म्हणजे केवळ लोकसंख्येची समस्या. भाषेबद्दलही हें खरें आहे. काहीजण असें म्हणताना दिसतात की जगातलीं आर्थिकदृष्ट्या मागास राष्ट्रें बहुभाषी दिसतात किंवा जगातलीं बहुभाषी राष्ट्रें मागास दिसतात— आणि अर्थात या बाबतीत भारताकडे बोट दाखवलें जातें.

---

१. परिणामी भाषेच्या वैज्ञानिक अध्ययनाचें एक अव्वल दर्जाचें केंद्र महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून असून सुद्धा आज घटकेला भाषाविज्ञान आणि संलग्न ज्ञानशाखा ह्यांमध्ये प्रशिक्षित अशा तरुण मंडळींची महाराष्ट्रात कमालीची उणीव आहे. उद्या निरनिराळ्या कामांसाठी भाषातज्ज्ञ पाहिजेत अशी मागणी आली तर महाराष्ट्रात तुटवडा भासणार आहे.

आता प्रश्न असा आहे की असा अन्वयार्थ काढणें एकंदरीत आणि विशेषतः भारताच्या बाबतीत कितपत रास्त ठरेल ?

भारतात पुष्कळ भाषा बोलल्या जातात हें तर खरेंच. मात्र भारतातल्या भाषांची संख्या पाश्चात्य अभ्यासक मुद्दाम फुगवून दाखवतात अशी एक टीका भारतीयांकडून ऐकायला मिळते. काही भाषांना एकापेक्षा अधिक नावें आहेत म्हणून त्या चुकून नावागणीक वेगळ्या मोजल्या जातात, काही भाषानामें जनगणनेत नजरचुकीने पडली आहेत (उदाहरणार्थ कुळू खोऱ्यात नोंदलेली झुळू भाषा), काही भाषा बोलणाऱ्यांची संख्या फारच लहान आहे इत्यादि बचाव मग पुढे केले जातात. ह्याचा अर्थ भाषांची संख्या फुगवून दाखवणारे आणि बचाव करणारे ह्यांचें एका गोष्टीवर एकमत आहे ती म्हणजे — भाषा अनेक असणें ही वाईट गोष्ट आहे. आता भारतीय संविधानाच्या भाषा–अनुसूचीत नोंदली आहे ती पंधरा ही लहान संख्या घेतली तर ? राष्ट्रीय एकात्मतेचा आधार घेऊ पाहणारें एक राज्य म्हणून भारताकडे पाहिलें तर ती संख्या मोठी आहे, मात्र जगातलें एक उपखंड म्हणून भारताकडे पाहिलें तर मात्र ही संख्या बेताचीच ठरावी. खरी गोष्ट अशी आहे की भारतात पुष्कळ भाषा आहेत ही चांगली गोष्ट नाही किंवा वाईट गोष्टही नाही. तो केवळ इतिहासाचा वारसा आहे. युरोपमध्ये बरीच एकभाषिक राष्ट्रें दिसतात हाही असाच इतिहासाचा वारसा आहे. ह्या वारशाचें कोण काय करतो, तें वाईट की चांगलें — हा खरा प्रश्न आहे.

भारतापुढे एवढे महत्त्वाचे आर्थिक आणि राजकीय प्रश्न आहेत, भाषिक प्रश्न गौण आहेत, त्यांना सध्या जरा खुंटीला टांगून ठेवू असें म्हणणाऱ्यांच्या नजरेला मात्र एक गोष्ट आणावीशी वाटते. भाषा ही राष्ट्राची साधनसंपत्ति आहे. तिचें आपण काय करतो हाही इतर साधनसंपत्तीच्या विनियोगाइतकाच निकडीचा प्रश्न आहे. भाषेचें नियोजन योग्य दिशेने केलें तर आर्थिक आणि राजकीय प्रश्नांच्या सोडवणुकीला मदत होते. उलट भाषिक प्रश्न चुकीच्या पद्धतीने हाताळले गेले तर मात्र ही भाषा संपत्ति न ठरता एक कायमची डोकेदुखी ठरू शकेल.

लिपि आणि लेखनव्यवस्था

आपल्याकडे अशी म्हण नाही, पण असायला पाहिजे होती–की गरजवंताला अक्कल सुचते. लिपि ही अशीच एक गरजेमधून सुचलेली अक्कल आहे. ह्याच्या अगदी उलट भाषेची स्थिति आहे–भाषा म्हणजे एक गरजच आहे, माणसाची अक्कलच उदाहरणार्थ भाषेत साठवलेली आहे. मानवजातीने भूतलावर देशोदेशी हजारो उन्हाळे-पावसाळे काढलेले आहेत– तिथे तिथे आणि तेव्हा तेव्हा भाषेने माणसाची सोबत केलेली आहे. लिपीचें तसें नाही. लिपीचा इतिहास जेमतेम पाच हजार वर्षांचा–किंबहुना त्यालाच आपण इतिहास म्हणतो, बाकीचा आधीचा तो प्रागितिहास. भाषा अमोज, तर लिप्या मोजक्या, बरेच भाषिक समाज लिपिच नसलेले, बरें, ज्या समाजात लिपि आहे, तिथेही बरेच निरक्षर किंवा अर्धसाक्षर. भाषा मुख्यतः बोलली ऐकली जाते. हे बोलणें-ऐकणें थांबलें की भाषा संपली. त्यात बदल झाला (आणि तो पुष्कळसा नकळत आणि स्वाभाविक असतो) की भाषाही बदलते. उलट भाषेला जोडून, तिच्यात आश्रयाने तिची लेखनव्यवस्था असते. ती मुद्दाम शिकवावी लागते; तिच्यात जाणीवपूर्वक सुधारणा करायला अधिक वाव असतो. पण एका अर्थाने ती उपरी असते. वेळ पडली तर एक भाषा दोन-तीन अगदी भिन्न लिप्यांमधून लिहिणें शक्य असतें.


मग लिपीने होतें काय ? लिपीने भाषेची स्थलकालाचें अंतर तोडण्याची शक्ति वाढते एवढेंच. जें काम ध्वनिमुद्रण आणि ध्वनिप्रक्षेपण ह्यांच्या मदतीने होतें आहे तें काम कमी खर्चात आज इतकी शतकें लिपीने केलें आहे. एखादें आकाशवाणीवरचें व्याख्यान ध्वनिमुद्रण आणि ध्वनिप्रक्षेपण ह्यांच्या मदतीने श्रोत्यांपर्यंत पोचू शकेल. तसेंच तें श्रोते साक्षर असतील तर लेखाच्या रूपानेही त्यांच्यापर्यंत पोचू शकेल.

हें एवढें सांगायचा उद्देश असा की तुमच्यापैकी बऱ्याच जणांच्या मनात भाषा आणि लिपि ह्यांची जी अगदी घट्ट निरगाठ बसलेली आहे तिची जरा सैलशी सुरगाठ करून घ्यावी म्हणून. तसें केलें नाही तर सगळे घोटाळे होतात. उदाहरणार्थ भाषा आणि बोली हे शब्द मुळात समान अर्थाचे—मायबोली जवळची तर मातृभाषा भारदस्त एवढाच फरक ! पण आज प्रमाण-भाषा ही जणू काही बोली नव्हेच. आणि प्रमाणेतर बोली किंवा लिपिविरहित बोली ही जणू काय भाषा नव्हेच ह्या थाटात

बोलणें चालतें. काही लोक कोंकणी रोमन लिपीतून लिहितात असें म्हणायच्या ऐवजी ते लोक ती पोर्तुगीजमधून किंवा इंग्रजीतून लिहितात असें म्हणायची चूक आपण करायला नको. उलट बांगला हें भाषेचेंही नाव आहे आणि लिपीचेंही—बांगला लिपीत संताली भाषाही कधीकधी लिहिली जाते.

अशा ह्या बोलभाषेतल्या मजकुराला तोंडची वाफ विरून जाण्यापूर्वी पकडून ठेवण्याचा मार्ग म्हणजे तो मजकूर ध्यानात ठेवणें, वेळ पडली तर पाठ करणें, आणि तो योग्य वेळी योग्य स्थळी पुन्हा मुखरित करणें. पण त्यालाही काही मर्यादा आहेत. पुन्हा पुन्हा बोलून तोंड दुखतें. (तोंड दुखायला लागलें म्हणजे 'सुटे पैसे द्यावे मोडीची टंचाई आहे' अशी पाटी लिहायची बुद्धि होते.) मजकूर लांब असला किंवा काळ जास्त गेला म्हणजे बहुतेकांची स्मरणशक्ति दगा देते. (लहान मुलांना तर हातचाही लिहून ठेवावा लागतो.) आणि त्याहून म्हणजे सांगणारा गैरहजर असू शकतो. चुकलेली गाय कुणाची आहे हें सांगायला किंवा मागच्या पिढीत काय ठराव झाला होता हें सांगायला संबंधित मंडळी जागेवर नसतात. अशा वेळी माणसांचें सर्वांत कार्यक्षम असें ज्ञानेंद्रिय जो डोळा, त्याच्यामार्फत कार्यभाग साधून घेण्याचा प्रयत्न त्याने करणें हें क्रमप्राप्त होतें. डोळ्याने ग्रहण केलेले संदेश स्थल-कालाच्या अंतरावर मात करून येतात असें नाही. माणसाचे हावभाव किंवा आग पेटवून दाखवलेला तिचा उजेड किंवा धूर ह्या मार्गाने पोचणारे संदेश अल्पजीवी आणि अल्पगामी ठरतात. त्याहून टिकाऊ म्हणजे प्रतीक-वस्तु. हिशोब करताना खडे मांडणें, कवड्यांचा उपयोग नाण्यासारखा करणें, जानव्याला गाठ मारणें, प्रेमादाखल फुलाचा गजरा देणें हे ह्यातलेच प्रकार. चिनी तुर्कस्तानात एका मुलीने आपल्या प्रियकराला प्रेमपत्र पाठवल्याची नोंद आहे. तिचें प्रेमपत्र म्हणजे एका पिशवीत भरलेल्या काही वस्तु. चहाची वीट—म्हणजे तुझ्यासाठी चहासुद्धा सोडला. वाळलेलें गवत आणि सुकलेला जर्दाळू—म्हणजे इतकी मी वाळले. एक लाल फळ, एक कोळशाचा तुकडा—म्हणजे इतकी मी लाजून वा जळून लाल होते. एक फूल आणि साखरेचा खडा—हें प्रियकराचें वर्णन. एक दगड—हेंही त्याचेंच बरं का! ससाण्याचें पीस आणि अक्रोडाचा गर—म्हणजे उडून येऊन तुला समर्पित व्हावंसं मला वाटतंय. पण एकंदरीत प्रतीक-वस्तु तितक्या भरवशाच्या आणि वापरायला सुलभ नाहीत.

इकडे बऱ्याच अगोदरपासून माणसाने सपाट पृष्ठभागावर रंग-रेषा ह्यांची चित्राकृति काढण्याची कला अवगत करून घेतलेली होतीच. रॉकी पर्वतात एका अवघड वाटेच्या तोंडावर एका दगडावर चित्र कोरलेलें आहे—कोलमडलेला घोडा आणि घोडेस्वार आणि बेधडक चढणारी शेळी. प्रवाशाला आदिवासी कारागिराने दिलेला हा इषारा आणि आजच्या राजरस्त्यावर धावणाऱ्या मुलांचें किंवा आगगाडीच्या एंजिनाचें चित्र लावून मोटरहाक्याला दिलेला इषारा ह्यात काय फरक आहे?





अमेरिकन इंडियन प्रस्तर–रेखाटण : न्यू मेक्सिको

सामीप्य आणि सादृश्य ह्या दोन तत्त्वांवर हे चित्र-संकेत आधारलेले आहेत. घटनांचा क्रम दाखविण्यासाठी चित्रमालाही योजता येईल. आदिवासींच्या ढालीवर जसे चित्र-समूह दिसतात तसे प्रगत समाजातील क्रेस्टवरही दिसतात. चित्रसमूह म्हणजे चित्रांची बेरीज नव्हे, तर गुणाकार.

ह्याच्या पुढची पायरी म्हणजे चित्रें आणि इतर दृश्य खुणा—मग त्या ओरखाडलेल्या, चिरे पाडलेल्या, कुंचल्याने लेपलेल्या, बोरू, पीस, किंवा धातूच्या लेखणीने फराटलेल्या, छिन्नीने खोदलेल्या, उठावाच्या, उमटवलेल्या, डागलेल्या, गोंदलेल्या, विणलेल्या, कातरलेल्या, प्रकाशमुद्रित केलेल्या कशाही असोत–ह्यांची गाठ भाषेतल्या मजकुराशी घालणें. ही लिपीची खरी सुरवात. ह्यामुळे पाठवायचे संदेश अधिक विविध, गुंतागुंतीचे करण्याची आणि ठसठशीतपणे, जसेच्या तसे पोचण्याची शक्यता वाढली. पण ह्यासाठी साध्या प्रतीक-चित्रामध्ये आवश्यक नसलेली दोन बंधनें आवश्यक झालीं. ती बंधनें म्हणजे पंक्तिबद्धता आणि पूर्वसंकेत. बोलणें क्रमान्वित असतें त्यामुळे लिहिणें हेंही क्रमान्वित राहणार हें पहिलें बंधन. ओळ पाहिजे–मग ती डावीकडून उजवीकडे, उजवीकडून डावीकडे, गोमूत्रबंधाप्रमाणे आलटून पालटून, किंवा चिनी, जपानी लिप्यांप्रमाणे वरून खाली कशीही असू दे. आणि दुसरें बंधन म्हणजे पूर्वसंकेत पाहिजे–वर्तुळ काढलें की तो सूर्य, आणि चंद्र काढायचा तर तो मात्र कोरीच्या रूपाने अशी काही व्यवस्था पाहिजे. कारण आपण चंद्र आणि सूर्य दाखवीत नसून ते दाखवणारे भाषेतले शब्द दाखवीत आहोत. ह्या पूर्वसंकेताच्या बंधनामुळे काही अडचणींचा परिहार करणें सोपें झालें आहे. चित्रें काढायला लागणारें कौशल्य नसणाऱ्यालासुद्धा तें जलद काढता आलें पाहिजे. हाडामासाच्या माणसापेक्षा काड्या-मोड्यांचा माणूस काढणें सोपें. ह्या सोपेपणापायीच चित्राच्या रंग, रंगच्छटा, आणि रेषा ह्या अंगांपैकी पहिल्या दोन्ही अंगांना लिपीत फाटा मिळाला आहे. (इतिहास

लिहिताना सुवर्णाक्षरांचा उपयोग फक्त संकल्पापुरताच आहे!) प्रतीकचित्रांकडून खऱ्याखुऱ्या चित्रलिपीकडे जाताना दुसरी एक अडचण आली—ती म्हणजे ज्यांच्या बाबतीत चित्र काढता येत नाही अशा शब्दाचें काय करायचें ? डोक्यावर हात मारून घेणारा माणूस म्हणजे 'हजार' हें मेक्सिकन संख्या–चिह्न, दोन बायका म्हणजे 'भांडणें क्रियापद' किंवा बाईकेरसुणी म्हणजे 'पत्नी' ही चिनी लिपिचिह्नें किंवा विजेचा पेटलेला बल्ब म्हणजे 'आयडिया!' हा आजच्या कॉमिक्समधला संकेत हीं काही उदाहरणें पहा. त्यात ह्या अडचणीतून मार्ग काढलेला दिसेल. पण आज घटकेची कोणतीही लिपि घेतली तर ती—अगदी चिनी लिपिदेखील घेतली तरी तीही—अशी कोंडीत सापडलेली केवळ चित्रलिपी नाही. उदाहरणार्थ डोळ्याचें चिह्न आणि 'कू' अक्षराचे चिह्न ही एकत्र लिहिली म्हणजे कू शब्द आणि त्याचा अर्थ 'आंधळा' (कू शब्दाला इतर अर्थ आहेत ते नव्हेत) एवढें सूचित होतें. तिने प्रत्येकीने ही कोंडी फोडून भाषेचें ध्वनिरूप हस्तगत करण्याचा प्रयत्न केलेला दिसेल. ही कोंडी फोडतांना संकरित चिह्नें प्रथम वापरावीं लागलीं.

इराकमधील सुमेर व्यापाऱ्याच्या 'खाते-वही'तलें एका खापरावर लिहिलेलें 'पान' (इ. स. पू. ३१००); वर्तुळ म्हणजे १०, ढाल म्हणजे १, उजवीकडे पाठीमागच्या पृष्ठावर ५४ गाईबैल पाठवण्याची नोंद, इतर चित्रें व्यक्तिनाम-दर्शक आहेत.

आजही हा चित्रें आणि वर्णचिह्नें ह्यांचा संकर चिनी लिपीमध्ये सरसकट आणि इंग्लिशच्या लेखनव्यवस्थेत क्वचित् दिसतो. ख्रिस्मस हा शब्द क्रॉस काढून त्यापुढे मस् (Xmas) असा लिहिणें ह्यात हा संकर दिसतो. समजा मुकुटाचें चित्र 'मुकुट' आणि 'राजा' ह्या दोन्ही शब्दांबद्दल वापरायचें झालें तर घोटाळा कसा टाळायचा ?

एक मार्ग म्हणजे मुकुट चिह्नाचा अर्थ जेव्हा ' राजा ' असेल तेव्हा एक ' माणूस ' चिह्न किंवा ' जा '–अक्षराचें चिह्न त्याच्या शेजारी काढायचें. पण ' जा ' अक्षराचें चिह्न मुळात कुठून उपलब्ध होणार ? तर ' जा ' जात्याचा म्हणून ' मुकुट ' चिह्ना-शेजारी एक दळायचें ' जातें ' काढायचें. ' कुत्रें जातें ' असें लिहायचें तर कुत्र्याच्या चिह्नाच्या पुढें जात्याचें चिह्न काढायचें. आता तुम्ही म्हणाल हा सगळा भोंगळ प्रकार दिसतो. पण अशा भोंगळ प्रकारांतूनच व्यवस्था लावीत आजच्या लिप्या सिद्ध झाल्या.[१] त्यांची लेखनव्यवस्था वरीच कमी भोंगळ आहे इतकेंच. ही व्यवस्था समजावून घेताना लिपि ही कमी-अधिक ध्वन्याश्रयी असली तरी ती मूलतः आणि मुख्यतः भाषाश्रयी आहे हें लक्षात ठेवायला पाहिजे.

カ का
キ की
ク कू
ケ के
コ को

जपानी बाराखडी (काताकाना लिपी)

लेखन हें वाक्यें लिहिण्यासाठी आहे, ध्वनि लिहिण्यासाठी नाही. (संशोधक श्रवण-प्रत्ययी लेखन करण्याचा मुद्दाम प्रयत्न करतात त्याचा अर्थातच इथे विचार करायचें कारण नाही.) वाक्य लिहिताना लिपि–चिह्नें ही भाषेच्या कोणत्याही घटकाचें अनु-सरण करतील. थेट अर्थाचें करतील—Xmas मधला X आपण पाहिलाच आहे. आकड्यात १९७४ असा लिहिलेला ' एकोणीसशे चौऱ्याहत्तर ' किंवा ' एक हजार नऊशे चौऱ्याहत्तर ' हा शब्दसमूह त्यातलाच. व्याकरणप्रक्रियेचें करतील—' तो म्हणाला की मी यायची गरज नाही ' ह्याचा अर्थ ऐकताना संदर्भाप्रमाणे घ्यावा लागतो, पण

१. आधार : Ignace J. Gelb, A Study of writing, Chicago : University of Chicago Press, 1952.

वाचताना अवतरण-चिह्नें आहेत का नाहीत हें पाहून आपण काय तें ठरवू. लिपिचिह्नें शब्दसमूहांचा पाठपुरावा करतील—उदाहरणार्थ 'सा. न. वि. वि.' किंवा R.S.V.P. शब्दांचा पाठपुरावा करतील. इंग्रजीमधलें 'ॲण्ड' शब्दाचें & हें चिह्न पहा. वर्ण-समूहाचा आधार त्या चिह्नाला असेल—मराठीतला 'ज्ञ' पहा. जपानी बाराखडीत का, की, कू, के, को म्हणजे पाच अजिबात वेगळींच एकमेकाशी साम्य नसलेलीं चिह्नें आहेत. वर्णाचा आधार तर आपल्याला परिचित आहेच. उच्चारघटकही आपण लिहिताना विचारात घेतो— 'पऱ्या', 'पर्याय', आणि 'दुर्‍या' ह्या तीन शब्दांचें लेखन ह्या दृष्टीने पाहण्याजोगें आहे. ह्या विविध तत्त्वांचा संकर तर लेखनव्यवस्थेत होतोच. पण जिथे चालू शकेल तिथे वाक्याच्या काही घटकांचा विचार संपूर्ण टाळलेला दिसेल. उदाहरणार्थ अरबी लिपीमध्ये आणि त्यामुळे उर्दू लेखनव्यवस्थेतही बरेच स्वरभेद सामान्यतः दुर्लक्षिलेले आढळतात. उलट काही ठिकाणी नको त्या गोष्टींची आठवण ठेवलेली असेल—उदाहरणार्थ night (नाइट) मध्ये gh का लिहायचा तर पूर्वी त्याचा उच्चार 'नीख़्त्' असा होत होता म्हणून! लेखनव्यवस्थेतील अशा गफलतींचें एक महत्त्वाचें कारण लेखनाची गतानुगतिकता आणि त्यामुळे आलेली अगतिकता.

ही लेखनव्यवस्था आणि लिपि यांत अंतर करायला आपण शिकलें पाहिजे. कधी कधी एक भाषा एकापेक्षा अधिक लिप्यांतून लिहिली जाते—उदाहरणार्थ सिंधी भाषा अरबी आणि देवनागरी लिप्यांमधून लिहितात, हिंदुस्तानी देवनागरी, फार्सी वळणाची अरबी लिपि, आणि रोमन लिपि यातून लिहिली गेली आहे, तर कोकणी देवनागरी, रोमन, आणि कन्नड लिप्यांतून लिहिली गेली आहे. एवढ्यानेच भागलें नाही म्हणून की काय कोकणी रोमन लिपीमधून लिहिण्याच्या दोन पद्धति, दोन व्यवस्था आहेत. एका लेखनव्यवस्थेत 'शांतादुर्गा' हें नाव पोर्तुगीज धर्तीवर Xantadurga तर दुसऱ्या लेखनव्यवस्थेत तेंच इंग्लिशच्या धर्तीवर Shantadurga असें लिहिता येईल.

लेखनव्यवस्थेला एक लिपीचें तोंड असतें. त्याला आपण लिपिरेखनव्यवस्था म्हणू. उदाहरणार्थ मराठी देवनागरीमध्ये लिहायला कुणी शिकत असला तर त्याला 'ख' शब्द 'रव' शब्दापासून वेगळा कसा दाखवायचा, क्त लिहायचें का क्‍त लिहायचें, र अक्षराच्या ॖ, ्र, ॅ, ‸ ह्या पर्यायी रेखिका केव्हा कुठे वापरायच्या, भ आणि ध अक्षरांना छपाईत नसलेली गाठ द्यायची या असल्या तपशिलात लक्ष घालावें लागेल. हा तपशील लिपिरेखनव्यवस्थेत मोडतो.

ह्याच्या उलट लेखनव्यवस्थेला एक भाषेकडे वळलेलें तोंडही असतें. त्याला आपण लिपिवाचनव्यवस्था म्हणू. ह्या व्यवस्थेत लिपिचिह्नें आणि भाषेचे घटक ह्यांची सांगड कशी घालायची याचा विचार असतो. ती सांगड किती विविध प्रकारे घालता येते, लिपिचिह्नाचा दुवा अर्थ, व्याकरणप्रक्रिया, शब्दसमूह, शब्द, वर्णसमूह, वर्ण, उच्चार-

घटक ह्यांच्यापैकी प्रत्येक भाषाघटकाशी कसकसा जोडता येतो हें आपण आताच पाहिलें आहे. एकाच लिपिवाचनव्यवस्थेत बहुदा ह्यांपैकी एका दुव्याचें प्राबल्य राहतें आणि त्याचा उरलेल्या तत्त्वांशी कमी अधिक संकर होतो.

लेखनाचें साध्य भाषेची नोंद करणें हें आहे, त्यासाठी उच्चारांची नोंद करणें हें केवळ एक उपयुक्त साधन आहे—हा मुद्दा वर दर्शविलेल्या विविधतेतून स्पष्ट होईल. लेखन आणि उच्चार ह्यांचा संबंध स्वायत्त आणि अपरिहार्य नाही, तो भाषा–सापेक्ष आणि त्या त्या लेखनव्यवस्थेने नियत आहे. देवनागरी लिपीच्या 'शास्त्रशुद्धते'ने भारलेल्या आपल्या मनाला हें सत्य ग्रहण करणें अवघड पण अटळ आहे.[1]

अमूक लेखनव्यवस्था सोयीची, उपयुक्त, काटकसरीची आहे किंवा नाही हें विधान आपण जितक्या सहज करू शकतो, तितक्या सहच अमूक बोली कार्यक्षम, महागडी, गैरसोयीची असें आपल्याला म्हणवत नाही. मानवाच्या दृष्टीने भाषेच्या बाबतीत ती असते हेंच सत्य अधिक महत्त्वाचें आहे. मानवी जीवन–समाज–संस्कृति आणि भाषा ही संस्था, एखादी व्यक्ती आणि तिची प्रारंभिक–बोली ह्यांच्यामध्ये एक विशेष प्रकारचें आणि न तुटणारें नातें राहतें. प्रारंभिक–बोली अनायासे, सहजगत्या प्राप्त होते. तिचें नियमन आणि परिवर्तन आंतरिक, स्वाभाविक राहतात. लेखन-व्यवस्थेची स्थिति भाषेप्रमाणे नसते. लेखनाच्या बाबतीत जाणीवपूर्वक नियमन, नियोजनबद्ध परिवर्तन ह्यांना वाव मिळणें भाषेच्यापेक्षा सुलभ जातें.[2] सोय, उपयुक्तता, काटकसर, सोपेपणा इत्यादि कसोट्या लेखन–व्यवस्थेला लावणें अधिक सहज वाटतें. अर्थात् नियोजनाचा विचार लेखनाच्या बाबतीत करणें सुलभ असलें तरी तो तसा केला जातोच असें नाही. ज्या ठिकाणी एखाद्या बोली–कुलात स्थिरपद झालेली प्रमाणबोली नाही, पण भाषेचें लेखन तर होत आहे, त्या ठिकाणी एकजिनसी लेखन-व्यवस्था सिद्ध न होता विकल्पांची रेलचेल असलेलें एक लेखन–व्यवस्था–कुलच अस्तित्वात येऊ शकतें. परंतु नंतर प्रमाणबोली स्थिर होऊ लागली, लेखन यंत्रस्थ झालें, साक्षरताप्रसार सुरू झाला की लिपि–रेखन–व्यवस्था आणि लिपि–वाचन–व्यवस्था

१. लिखित चिह्न आणि त्याचा उच्चार ह्यांची गाठ आपल्या डोक्यात इतकी घट्ट बसलेली आहे की रोमन लिपीत लिहिलेला कुठलाही शब्द आपण इंग्लिश धाटणीने वाचतो. स्तालीन, नात्सी, देहरादून, येस्पर्सन असे कोणी म्हटलें वा लिहिलें तर तेंच आपल्याला चमत्कारिक वाटू लागतें.

२. ह्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे स्व–बोली बोलताना नियमशून्य वरळणें अवघड असलें तरी तीच लिहिताना बेधरबंध लिहिणें सहज शक्य असतें. (असंबद्ध भाषणाची चढाओढ मुद्दाम ठेवावी लागते; असंबद्ध लेखनाची चढाओढ करणारे परीक्षार्थी परीक्षकाला नित्य भेटतात!)

ह्यांमध्ये अधिक एकसूत्रीपणा येऊ लागतो, तशी गरजच उत्पन्न होते. फलतः ती लेखन–व्यवस्था सर्व बोलींची न राहता प्रमाण-बोलीचीच लेखन–व्यवस्था ठरते, त्यातही पुन्हा लेखनीय काय आणि काय नाही ह्याचा विचार होऊ लागतो.

प्रमाण-बोलीचें वर्चस्व आणि कार्यक्षमता वाढण्याचें लेखन एक महत्त्वाचें साधन बनल्यामुळे प्रमाण-बोलीच्या गरजा म्हणजे लवचीक स्थिरता, विविधरंगी एकरूपता ह्या लेखन–व्यवस्थेच्याही गरजा ठरतात. त्यातही लेखन हें भाषा–व्यवहाराचें स्थूलांग असल्यामुळे लेखनाच्या संबंधात लवचीकपणापेक्षा स्थिरता आणि विविधतेपेक्षा एकरूपता ह्या गुणांना महत्त्व येणें स्वाभाविक आहे– आणि मला वाटतें, इष्टही आहे. पत्र वाचताना पत्रलेखक हजर नसतो, त्याच्याकडून खुलासा तत्काळ मागणें शक्य नसतें, त्याचे कायिक, वाचिक आविर्भाव उपलब्ध नसतात, अशा वेळी लिपिरेखनव्यवस्था आणि लिपिवाचनव्यवस्था ह्या दोन्ही अंगांत गोंधळ उत्पन्न झाला, संदिग्धता आली तर आपल्याला विशेषच राग येतो. हीच गोष्ट मुद्रित मजकुराची. मागच्या पिढीचा नंतरच्या पिढीशी संबंध जोडणें, बोलीक्षेत्रातील प्रमाण-बोलीच्या स्थानिक उच्चार-सरणींचा समन्वय राखणें आणि भोवतालच्या इतर प्रमाण-बोलींशी— विशेषतः अभिजात-बोली आणि सहायक-बोलींशी— संपर्क ठेवणें आणि बरोबरी करणें हीं जीं प्रमाणबोलींचीं कार्यें त्यामध्ये अस्थिर, विकल्पांची रेलचेल असलेल्या लेखन-व्यवस्थेमुळे आणि वाचन-सरणीमुळे व्यत्यय येईल. मोल्स्वर्थ आणि कॅन्डी ह्यांच्या मराठी-इंग्लिश शब्दकोशाच्या दुसऱ्या आवृत्तीत (१८५७) अनेक शब्दांना दोन-दोन तीन-तीन लेखन-विकल्प आणि उच्चार-विकल्प आहेत आणि ह्यांपैकी बऱ्याच शब्दांच्या बाबतीत आज एकेकच पर्याय शिल्लक आहे असें दिसून येतें (अजून/अझून, टांगा/तांगा, चौकस/चवकस— शेवटचा केवळ लेखन-विकल्प आहे, उच्चारण-विकल्प नाही) आणि उलट प्रकार मात्र आढळत नाही हा केवळ योगायोग नव्हे. नॉर्वेमधील भाषिक चळवळीचा इतिहास ह्या दृष्टीने पाहण्याजोगा आहे.[१] सन १८१४ साली डेन्मार्कच्या ४०० वर्षांच्या आधिपत्यापासून नॉर्वे मुक्त झाला आणि प्रमाण-डेनिश ही इतके दिवस नॉर्वेमध्येही प्रमाण-बोली होती ती तशी राहणें डेन्मार्क आणि नॉर्वे ह्या देशांतील बोली एकाच बोली-कुलातील असूनही अशक्य झालें. तिच्या जागी विदेशी डेनो-नॉर्वीजियन (म्हणजे नॉर्वेमधील बोलींचे संस्कार झालेली प्रमाण-डेनिश) आणि देश-भाषा (म्हणजे स्थानिक प्रमाणेतर बोलींमधून जिचें पोषण करण्यात आलें आहे अशी इव्हार ऑसेन ह्या एकोणिसाव्या शतकातील देशभक्ताने तयार करून

१. आयनार हॉगन, 'Planning for a standard language in modern Norway', Anthropological linguistics 1:3.8–21, March 1959.

रुजवलेली बोली) ह्यांपैकी कोणती रहावी ह्यासाठी आज जवळ जवळ शंभर-सव्वाशे वर्षें शीतयुद्ध चालू आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षांत समझोत्याचे प्रयत्न चालू झालेले आहेत. ह्यातील तपशिलाबद्दलचे वाद मुख्यतः लेखन–व्यवस्था आणि नामें आणि क्रियापदें ह्यांचे प्रत्यय ह्यांच्यावर येऊन ठेपत आले आहेत. आपण ह्यापासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे.

लेखन-व्यवस्थेचा विचार हा सोयी-गैरसोयीचा, सुलभतेचा, आणि व्यापक सामाजिक गरजांचा विचार आहे. एक निर्णायक तत्त्व पकडून तें लावीत जाणें हें का चांगलें ? तर शिकायला आणि अनुसरायला नियम थोडे आणि सोपे रहावेत म्हणून, एकरूपतेला मदत होते म्हणून. पण जरूर तेथे तत्त्वाला बेलाशक मुरड घालावी, मग धारवाडी काटा धरल्याचें नैतिक समाधान, 'शास्त्रशुद्धते'चा गौरव मिळाला नाही तरी बेहत्तर ! लोकांच्या भावना लिपीच्या निवडीशी संबद्ध असतात तितक्या लिपीच्या तपशिलाशी असतात असें दिसत नाही. अनुच्चारित शीर्षबिंदू काढून टाकल्यामुळे मराठीच्या भाळीचें कुंकू पुसलें असें वाटणारे निघाले पण ते थोडे. लिपिवाचन-व्यवस्था आणि उच्चार ह्यांचा संबंध काय असावा ह्याचा विचार आता करायचा. उच्चाराचे सर्व बारकावे लिपि–चिह्नांनी दाखवण्याचा प्रयत्न करायचा तो भाषा-वैज्ञानिकांनी आपल्या अभ्यासासाठी; सामान्य वापरातील लेखन-व्यवस्थेचें तें कार्य नव्हे. उलट उच्चारांकडे जर फारच दुर्लक्ष केले, तर चिनी भाषेच्या शब्दलिपीची अवस्था येते आणि प्रत्येक शब्दाचें लेखन स्वतंत्र शिकून घ्यावें लागतें. उदाहरणार्थ इंग्लिश आणि फ्रेंच लेखन-व्यवस्थेची ही शोचनीय अवस्था आली आहे. उच्चार–लिपि आणि शब्द–लिपि ह्यांच्या मधला बिंदु सुलभता, स्थिरता, एकरूपता इत्यादि कसोट्या लावून निश्चित करण्याचा हा प्रश्न आहे आणि प्रत्येक प्रमाण-बोलीला आणि तिच्या बोली-क्षेत्राला तो बिंदु स्वतंत्रपणे ठरवावा लागेल.

वाऱ्यावर विरून जाणारें भाषण पकडून ठेवणें आणि दूरवर नेणें ह्या गरजेतून लेखनाची कला निघाली. ह्यामुळे चार प्रकारची कामें साधलीं.


एक अंकन— उदाहरणार्थ गाईवर डागलेलें नाव किंवा दस्तऐवजावर टाकलेली सही.

दुसरें स्मरण— उदाहरणार्थ डायरीमधील कामाची किंवा हिशोबाची नोंद, मृत्यु-पत्र, अहवाल, प्रमाणपत्र, विजयस्तंभावरचा लेख.

तिसरें संदेशवहन — उदाहरणार्थ कामाचें किंवा सुखदुःखाचें पत्र, राजाचा खलिता किवा राणीचा जाहीरनामा, मालाची जाहिरात किंवा वार्तापत्र.

आणि चौथें (आणि संस्कृतीच्या पोषणाच्या आणि सातत्याच्या दृष्टीने महत्त्वाचें काम म्हणजे) पारायण— उदाहरणार्थ कोणताही वाङ्मयीन मजकूर.

किंबहुना वाङ्मय म्हणजेच ज्याचें पारायण होतें असा मजकूर. मग तो वाङ्मयीन मजकूर म्हणजे कुराण असो, भारतीय संविधान असो, प्लेटोचा संवाद असो, की कालिदासाचें महाकाव्य असो.



मोहेंजोदड़ो येथील लिपि. ही वाचण्याची सर्वमान्य 'किल्ली' अजून मिळालेली नाही, अनेक प्रयत्न झाले व होत आहेत.

शेवटचें उदाहरण अर्थात् ललित अशा वाङ्मयाचें म्हणजेच साहित्याचें आहे. सामान्य माणसाच्या मनात लेखनाबद्दल जो दबदबा असतो तो मुख्यतः लेखन आणि हा पारायण करण्याजोगा मजकूर ह्यांच्या साहचर्यामुळे.

गरज ही शोधाची जननी आहे हें खरें आहे, तसेंच शोधातून नव्या गरजा उत्पन्न होतात, अक्कलवंताला गरजा सुचतात हेंही खरें आहे. लिपीमधून नव्या गरजांचें समाधान कसें होतें, किंवा त्यासाठी लिपीला प्रतिलिपि कशा उत्पन्न होतात, किंवा लिपि हीच गरज कशी ठरू पाहते तें पाहण्याजोगें आहे.

पहिलें म्हणजे लिपीच्या जशा काही उणिवा आहेत (उदाहरणार्थ बोलण्यापेक्षा लिहिण्यात जीवंतपणा जरा कमीच) तशा काही विशेष सोयी पण आहेत. गेलेला बाण किंवा तोंडचा शब्द परत आणण्यापेक्षा लिहिलेला शब्द खोडणें सोपें. वाचताना रेंगाळता येतें, डुलकी किंवा ठेच लागली तर मागे जाता येतें. ज्या गोष्टी मोकळेपणाने लिहिता येतात त्या बोलता येतीलच असें नाही. पंचांग पाहणें-रचणें हें लिपीमुळे शक्य आहे. तें तोंडी सांगण्याची कल्पना करून पहा बरें. अकारविल्हे रचना ही खास लिपीमुळे शक्य झालेली सोय आहे.

लेखनाचें पाठचें भावंड मुद्रण. लिपीच्या बाह्य स्वरूपामधलीं आणखी काही परिवर्तनें म्हणजे आंधळयांची उठावाची ब्रेलची स्पर्श-लिपि, पिट्मनची लघुलिपी, अक्षरांचें रूपांतर कड-कट्टमध्ये ज्या पद्धतीने होतें ती मोर्सची पद्धति.

बहुभाषी चीनमध्ये हजारो चिह्नांच्या चित्रलिपीने देशाला एकत्र बांधलें आणि

लहानशा साक्षर वर्गाच्या कबजात ठेवलें. मूर्तिभंजक इस्लामी संस्कृतीत चित्रांचा निषेध असल्यामुळे सगळी चित्रकला लिपीत उतरली. ह्या दोन्ही संस्कृतीत लिपि ही स्वतंत्र ललितकलेच्या प्रतिष्ठेला पोचली होती.

आधुनिक जगात ज्ञानी असणें म्हणजे सर्व अवगत असणें नव्हे तर प्रा. श्री. म. माटे म्हणत असत त्याप्रमाणे ज्ञानाचे पत्ते अवगत असणें. आणि हे पत्ते ग्रंथालयातले असतात.

भारतीय संस्कृति त्या मानानें मौखिकतेला अधिक मानणारी–पंडितांचें काम ज्ञान मुखोद्‌गत ठेवण्याचें, चिटणिशी करायची ती इतरांनी. पैशाची मोठी उलाढाल चिठ्ठीचपाटीशिवाय होऊ शकते. प्रत्यक्ष भेटल्याशिवाय नुसत्या पत्राचा भारतात पुष्कळदा उपयोग होत नाही.

पण भारताला आधुनिकतेची कास धरायची असेल तर डोळा हा कानाच्या चार बोटें पुढेच असतो हें मान्य करायला हवें. ह्याचा अर्थ छाप्यात येईल तें सगळें खरें असा मात्र नव्हे ! तर साक्षर होणें म्हणजे सुसंस्कृत होणें असा आहे. गुजरातीत सुसंस्कृत माणसाला नुसतें बहुश्रुत म्हणत नाहीत, साक्षर म्हणतात तें स्वाभाविकच आहे.

भारताचे भाषिक प्रश्न

भारताच्या भाषांबद्दलचे प्रश्न म्हणून विचार करू लागलें की पहिल्याप्रथम आपल्या मनावर जी गोष्ट ठसते ती म्हणजे भारतात पुष्कळ भाषा आहेत ही. त्या फारच पुष्कळ आहेत का असाव्या तितक्याच पुष्कळ आहेत ह्याबद्दल इतर देशांचे दाखले देऊन आणि भाषा कशा मोजाव्यात याबद्दल चर्चा करून हुज्जत घालण्यात फारसा अर्थ नाही. पुष्कळ भाषा असणें हा भारतीयांना मिळालेला एक इतिहासाचा वारसा आहे एवढें मात्र खरें.

ह्या वारशाबद्दल भारतीय लोक चिंता करतात आणि साधारणतः दोहोंपैकी एका टोकाची भूमिका पकडून बसतात. एक तर आपण म्हणतो ह्या पुष्कळ भाषा म्हणजे एक सावळा किंवा बावळा गोंधळ आहे. त्यावर प्रत्येकाचा लाडका तोडगा हिंदी किंवा इंग्लिश किंवा वेळेला संस्कृत ह्यांपैकी एक असतो — महत्त्वाचें सर्व संज्ञापन किंवा संदेशवहन ह्या लाडक्या भाषेत व्हावें, फार फार तर स्वयंपाकघरातल्या वाटाघाटी किंवा पारावरच्या गप्पा स्थानिक भाषेत व्हायला हरकत नाही. ह्याउलट दुसरें टोक गाठून आपण ठरवतो की स्वभाषेचा अभिमान म्हटला की त्याबरोबर कुठल्याही तडजोडीला किंवा जुळतें घेण्याला आडमुठा नकार किंवा दुसऱ्या भाषांबद्दल बेभान असूया ही आलीच.

गेलीं सुमारे पन्नास वर्षें कन्नड आणि तेलुगु–भाषिकांच्या वाटाघाटी होत आल्या आहेत — कशासाठी तर त्या भाषांची जवळ जवळ एकच लिपि आहे तिच समान वळण ठरवण्यासाठी. दर पाळीला निष्कर्ष तोच — कन्नड–भाषिक शिफारस करतात की तेलुगु–भाषीयांनी कन्नड लिपि स्वीकारावी आणि तेलुगु-भाषिक उलट शिफारस करतात. असें काही कुणाला सुचलें नाही की रोमनमध्ये जिथे इटॅलिक वळण वापरतात तिथे कन्नड-भाषीयांनी तेलुगु वळण वापरायला सुरवात करावी आणि तेलुगु–भाषीयांनी ह्याच्या उलट करावें. निदान एकमेकांना दुसऱ्या वळणाची डोळे–ओळख घडून येईल आणि एकीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचें पाऊल पुढे पडेल. भारताच्या इतर भागांतूनही अशा प्रकारचीं उदाहरणें देता येतील. (कन्नड किंवा तेलुगु-भाषीयांच्या बद्दल माझ्या मनात शत्रुत्व नाही. भाषेच्या बाबतीत भारतीय माणूस इतका हळवा आणि संशयी बनला आहे की हेंही मला सांगणें आलें!)

प्रादेशिक भाषांना गौण लेखून एकाच कोणत्या तरी संपर्क-भाषेला महत्त्व द्यायचें किंवा प्रादेशिक भाषेचा असहिष्णु अभिमान बाळगायचा ह्या दोन टोकांपैकी कोणतेंही आपण जवळ केलें तर तो राष्ट्राच्या भाषिक संपत्तीचा दुरुपयोग ठरेल. भारत हा विशाल क्षेत्रफळाचा आणि दाट लोकवस्तीचा देश असल्यामुळे वाहतुकीसाठी फक्त विमानें (किंवा फक्त बैलगाड्या म्हणा) वापराव्या असें कोणी सुबुद्ध माणूस म्हणणार नाही. आपण असेंच म्हणू की आपल्याला विमानें हवीं आणि बैलगाड्या हव्या अणि ह्या दोन्हींच्या मधल्याही बऱ्याच गोष्टी हव्या. आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट खरी निराळीच आहे : आपल्याला जास्त चांगलीं विमानें हवीं आणि जास्त चांगल्या बैलगाड्या हव्या. जास्त चांगल्या म्हणजे त्या त्या विशिष्ट गरजांना अधिक अनुरूप. जर बैलगाडीसारख्या पुराण वाहनात बदल होऊन रबराचे हवा भरलेले टायर त्याला लागू शकतात तर भाषांमध्ये नक्कीच बदल होऊ शकतील. परिवर्तन हा भाषेचा अटळ नियम आहे हें भाषाविज्ञानाचा होतकरू विद्यार्थीसुद्धा सांगू शकेल. भाषेबद्दलचे निर्णय जमेची बाजू आणि तोट्याची बाजू ह्यांचा नीट ताळेबंद बांधून थंड डोक्याने घेणें हिताचें ठरेल. त्याबद्दल आततायीपणा आपल्याला परवडण्यासारखा नाही.

एकदा आपण थंड डोक्याने भारताच्या भाषिक प्रश्नांकडे पाहू लागलो की काही महत्त्वाच्या गोष्टींकडे आपलें लक्ष जाऊ लागतें.

(१) आपल्या आर्थिक जीवनाची नव्याने घडी बसवणाऱ्या देशाला अनेक भाषा ही सहज परवडणारी गोष्ट नाही असें जें म्हणतात त्यात काही तथ्य आहे. बहुभाषितेसाठी द्यावी लागणारी किंमत अनेकविध आहे. महत्त्वाच्या संज्ञापनासाठी अनेक भाषांतरें व रूपांतरें द्यावीं लागणें ही खर्चाची बाब आहे (उदा. केंद्रीय सरकारचीं विज्ञापनें, मोठा व्याप असलेल्या कंपन्यांच्या जाहिरात–मोहिमा, प्रादेशिक भाषांत उपलब्ध असलेल्यां महत्त्वाच्या संशोधनाचें फलित). त्याचप्रमाणे नोकऱ्या, शिक्षणाच्या सोयी, तांत्रिक शोध इत्यादिकांच्या बाबतीत देशभर खुलेपणाने अभिसरण होऊ शकत नाही. भारताचे काही प्रदेश इतरांपेक्षा आर्थिक किंवा शैक्षणिक बाबतीत विशेष पुढारलेले किंवा मागासलेले आहेत. बहुभाषितेमुळे हा आर्थिक असमतोल दूर करणें अधिकच बिकट होऊन बसणार हें मग ओघाने आलेंच.

(२) पण ह्या अडचणींचा पाढा वाचून कुंठित होणें म्हणजे उपयुक्ततावादाच्या फाजील आहारी जाणें ठरेल. ही बहुभाषिता भारताच्या सांस्कृतिक बहुविधतेचा म्हणजेच वैभवाचा भाग आहे, प्रादेशिकतेची आणि लोकमानसाच्या अभिव्यक्तीची शंभर फुलें फुलू द्या, त्यामुळे भारताच्या लोकशाहीला आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बळकटीच येणार आहे इत्यादि विचारशृंखला म्हणजे केवळ कविकल्पना नाही, त्याला वस्तुस्थिति आणि काही सामाजिक मूल्यें यांचा भक्कम आधार आहे.

(३) यापुढे जाऊन असेंही म्हणता येईल की या दोन मतप्रवाहांचा नेहमीच एक-मेकाशी विरोध येईल असें नाही. उदाहरणार्थ, भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार राज्यकारभाराची सोय, आर्थिक हितसंबंधांची जपणूक, प्रादेशिक अस्मिता, लोकानुवर्ती राज्यकारभाराची पूर्वतयारी ह्या सर्व अंगांनी केला गेला.

(४) प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात भाषाभिन्नतेचा प्रश्न जाणवला होता (चार कोस पर पानी बदले और बारह कोस पर बानी). व्यापारी, वाटसरू, यात्रेकरू, राज्यकर्ते, पंडित ही मंडळी तो प्रश्न आपापल्या पद्धतीने, अनौपचारिक रीतीने, आणि कालगतीने सोडवीतही होती. आजच्या गतिमान युगात संपूर्ण अनौपचारिकता आणि संथपणा जमण्यासारखा नसला तरी जुन्या युगांचा भाषिक समजूतदारपणा आणि लवचीकपणा ह्यांचा वारसा अवश्य जतन करण्यासारखा आहे. नियोजन म्हणजे ह्या दोन गुणांना सोडचिठ्ठी नव्हे तर दंगली, कालहरण, शाब्दिक आतषबाजी, ठोकळेबाज घोषणा ह्यांना सोडचिठ्ठी देणें होय.

(५) स्वभाषेखेरीज अमूक एक परभाषा सगळ्यांनी, निदान बऱ्याच जणांनी शिकणें जरूर आहे असें म्हणतांना काही परिस्थितिजन्य अडचणींचें भान सतत ठेवणें जरूर आहे. एक म्हणजे आपल्या देशात साधनसामग्रीचा तुटवडा आहे. मनुष्यबळाचाही तुटवडा आहे—प्रशिक्षित शिक्षक थोडे, त्यातून त्यांचें प्रशिक्षण पुष्कळदा जुनाट आणि टाकाऊ पद्धतीने झालेलें, लायक शिक्षक तर फारच थोडे. (शिक्षकांचे वेतनमान तौलनिक दृष्टीने पाहता, ज्यांच्यात हाडाच्या शिक्षकाचे गुण आहेत अशीं मंडळी मजूर पुढारी किंवा जाहिराततंत्रज्ञ किंवा वृत्तपत्रकार असेच काही होण्याची शक्यता जास्त!) विद्यार्थ्यांचें काय विचारावें ? मनापासून अध्ययन करणें ही जुनी फॅशन झाली आहे असें मानणारेच अधिक. (डेकन कॉलेजमध्ये मराठी ही परभाषा म्हणून एकदा वीसएक अमेरिकन विद्यार्थ्यांना आणि पाठोपाठ तितक्याच भारतीय विद्यार्थ्यांना त्याच शिक्षकांनी त्याच साधनसामग्रीनिशी तितकेच आठवडे शिकवली. फलश्रुती मात्र अनुक्रमे अपेक्षेपेक्षा थोडी सरस आणि अपेक्षेपेक्षा फारच वाईट ठरली. आधुनिक पद्धतीने भाषा थोड्या कालावधीत चांगली शिकवता येते खरी पण ती कोणाला ? ज्याला शिकण्याची कळकळ आहे त्याला.)

(६) अखिल भारतीय पातळीवर हिंदी वा इंग्लिश वा उर्दू वा संस्कृत ही प्रादेशिक भाषांना जोडणारी संपर्कभाषा म्हणून वापरली जाते. मात्र असा मेळावा पारंपरिक पंडितांचा, संगीतकारांचा, आधुनिक विद्वानांचा वा वैज्ञानिकांचा, मुल्लामौलवींचा, का आणखी कुणाचा आहे यावर संपर्कभाषा निवडली जाते. प्रादेशिक पातळीवर निराळें चित्र दिसतें. त्या पातळीवर प्रादेशिक प्रमाणभाषा ही संपर्कभाषा म्हणून तिच्या प्रमाणेतर बोली, त्या प्रदेशातल्या अल्पसंख्याकांच्या भाषा, आणि आदिवासींच्या

बोली ह्यांना एकमेकींशी जोडते. संपर्कभाषा लादू नये, इतरांना दिलासा द्यायला हवा इत्यादि पथ्यें दोन्ही पातळीवर सारखींच पाळायचीं आहेत. यात फक्त प्रादेशिक भाषेच्या वाट्याला आलेल्या दोन भूमिका मात्र अजिबात वेगवेगळ्या ठरतात. (प्रादेशिक भाषेच्या अभिमान्यांच्या हे लक्षात मात्र येत नाही ! इंग्लिश किंवा हिंदी भाषेची प्रादेशिक भाषेवर कुरघोडी नको म्हणून खबरदारी आणि प्रादेशिक भाषेची प्रदेशातल्या इतर बोली किंवा भाषा ह्यांच्यावर कुरघोडी होते आहे का या प्रश्नाबद्दल बेफिकिरी असा त्यांचा खाक्या असतो.)

(७) बहुभाषिता हा काही भारतापुढचा एकमेव भाषिक प्रश्न नाही. जे अविकसित किंवा विकसनशील देश जवळजवळ एकभाषी आहेत त्यांना सुद्धा काही भाषिक प्रश्नांचा सामना करावा लागतोच की ! भारताच्या समोर तसलेही काही प्रश्न आहेत आणि बहुभाषितेच्या प्रश्नात गुंतल्यामुळे आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो आहोत ही गोष्ट चांगली नाही.

(८) तुम्हाला अमूक एक भाषा येत असली म्हणजे त्या भाषेत तुम्ही आपला आशय प्रभावी रीतीने प्रकट करू शकालच असें नाही. भाषेचें कामचलाऊ ज्ञान अगदी मामुली गरजच भागवू शकतें. उदाहरणार्थ इंग्लिश भाषेतलें अर्थविज्ञानावरचें पुस्तक वाचायचें किंवा एखाद्या संसदपटूचे हिंदी भाषण ऐकायचें म्हणजे त्या त्या भाषेचें पोटापुरतें ज्ञान पुरत नाही. त्या बाबतीत आपण स्वतःची फसवणूक करून घेऊ नये हें बरें. फार काय स्वभाषेवरती हुकमत सुद्धा प्रयत्नांनी मिळवावी लागते. (आपल्याच भाषाक्षेत्रात राहणारीं पण स्वभाषेत बोलायला–लिहायला चाचरणारीं इंग्लिश–माध्यमाच्या शाळेत जाणारीं मुलेंमुलीं आपल्या परिचयाचीं आहेत.)

भारतामधल्या भाषानियोजकांनी दोन मूलभूत तत्त्वांचा पाठपुरावा कटाक्षाने करायला पाहिजे. एक म्हणजे भारतीयांना उपलब्ध असणारी प्रत्येक भाषा ही कोणत्या ना कोणत्या कामासाठी संपर्क–भाषा म्हणून ठरते. उदाहरणार्थ महाराष्ट्रात ज्या अनेक प्रदेशागणिक किंवा सामाजिक–भेदागणिक बोली वा भाषा बोलल्या जातात त्यांना जोडणारी संपर्कभाषा म्हणजे प्रमाण–मराठी. दक्षिण रत्नागिरीमधला शेतकरी आणि उत्तर चंद्रपुरमधला शेतकरी ह्यांना एकत्र येऊन भातशेतीची चर्चा करायची असेल तर प्रत्येकाने आपली स्थानिक बोली वापरून काम होणार नाही. प्रमाण–मराठी ही इतर प्रकारेही संपर्क–भाषा ठरेल. जर एखाद्या तमिळभाषी तरुणाला मराठी साहित्य आणि संस्कृति ह्यांचा विशेष अभ्यास करायचा असेल तर त्याला प्रमाण–मराठीच अगोदर शिकून घ्यावी लागेल आणि असा विशेष अभ्यास त्याने करणें ह्यात विशेष असें काय आहे ? तो जर आज फ्रेंच भाषेत विशेष प्रावीण्य संपादू शकतो तर त्याला मराठी भाषेत प्रावीण्य संपादावें असें वाटल्यास शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या

चौकटीत तशी संधि का मिळू नये ? आणखी भाषा शिकणें ह्याचा आपण बाऊही करू नये किंवा सोपस्कारही करू नये. भाषा शिकण्याच्या सोयी भारतात जेवढ्या विविध, विपुल, आणि दर्जेदार होतील तेवढ्या पाहिजे आहेत. भाषेचें नियोजन म्हणजे निरनिराळ्या भाषांची सक्ती करणें नव्हे तर निरनिराळ्या भाषारूपी वाटा खुल्या करणें, नवी भाषा शिकणें म्हणजे नवें नागरिकत्व बहाल होणें आहे, नवें स्वातंत्र्य मिळणें आहे. जुन्या भाषिक भिंतींमधून सुटका होणें आहे.

भाषानियोजनाच्या दुसऱ्या महत्त्वाच्या तत्त्वाचें सूतोवाच आपण जास्त चांगल्या बैलगाड्यांची आणि विमानांची निर्मिति करण्याबद्दल बोलत होतो तेव्हाच करून ठेवलें आहे. हें तत्त्व स्पष्ट करण्यासाठी आपण एक जरा दूरचें उदाहरण घेऊ म्हणजे आपल्याला पुरेशा तटस्थतेने त्याच्याकडे पाहता येईल. स्वीडिश भाषेमध्ये सामाजिक दर्जा आणि श्रेणी–व्यवस्था व्यक्त करण्यासाठी नको इतक्या तरतुदी आहेत. स्वीडन देशाच्या सामंतयुगातील इतिहासाचा तो वारसा आहे. आज सामाजिक समतेवर भर देणाऱ्या स्वीडनच्या समाजात तरुण पिढीला ह्या तरतुदी म्हणजे वैताग वाटतो. स्वीडिश भाषेत तोंड उघडायची खोटी की बोलणाऱ्याला समोरच्या माणसाचा स्वतःच्या तुलनेत नेमका दर्जा कोणता ह्याचा हिशोब करावा लागतो. आज ना उद्या स्वीडिश भाषेतल्या ह्या तरतुदी अडगळीच्या खोलीत रवाना होतील ह्याबद्दल शंका नको. भारतीयांपुढे प्रश्न असा आहे की सामाजिक संकेतांच्या ह्या धिम्या चालीने अशा प्रकारचे बदल घडू देणें आपल्याला कितपत परवडण्यासारखें आहे. ज्या ऐतिहासिक टप्प्यावर आपण आहोत त्या टप्प्यावर ह्या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी द्यावें लागेल. आपल्याला काही प्रकारचीं परिवर्तनें अधिक गतिमान करावीं लागतील, तर काही प्रकारचीं परिवर्तनें रोखावीं लागतील. आपल्याला भाषा–संपत्तीचें नूतनीकरण करण्यासाठी नियोजनाचा मार्ग चोखाळावा लागेल. कृषिप्रधान, ग्रामीण, उच्चनीच भेदांनी व्यापलेला, तऱ्हेतऱ्हेच्या फाळण्या झालेला असा आपला समाज. त्या समाजाच्या कुशीत आपल्या भाषा वाढलेल्या आहेत. आधुनिक भारताच्या काही नव्या भाषिक गरजा आहेत. त्या गरजा भागवण्याचें सामर्थ्य आपल्याला त्या भाषांमध्ये आणायचें आहे. ह्या नव्या भाषिक गरजा मुख्यतः तीन प्रकारच्या आहेत—

एक : पहिली गरज विज्ञान आणि तशाच शिस्तशीर क्षेत्रात निश्चित आशय अलिप्तपणे आणि टरीव पद्धतीने व्यक्त करणें आणि ज्याला जिथे गरज असेल त्याला तिथे तो आशय उपलब्ध करून देणें.

दोन : दुसरी गरज म्हणजे महाकाय अशा आजच्या जनसागरात व्यक्तीला हरवू न देणें आणि तिला स्वतःचा वेगळा नवा विचार, खास स्वतःची वेगळी भावना व्यक्त करण्यासाठी भाषेची वेगळी वाट काढायला अवसर ठेवणें.

वैचारिक आणि ललित वाङ्मयाची निकोप वाढ स्वतंत्र शैलीच्या अभावी होणार नाही.

तीन : तिसरी गरज म्हणजे सामुदायिक जाणिवा आणि सामुदायिक भावना वृत्तपत्रें आणि सार्वजनिक जीवन ह्यांमधून व्यक्त करणें. मात्र असें करताना भाषेला कळकट किंवा निवर तोचतोचपणा, अवजड जडजंबालपणा, किंवा फाल्तू तांत्रिक किचकटपणा येऊ न देणें.

प्रत्येक भारतीय भाषेला ह्यातली प्रत्येक गरज भागवता यायला पाहिजे असा आग्रह आज तरी धरता येणार नाही. एखाद्या व्यक्तीने तिच्या निरनिराळ्या गरजांसाठी निरनिराळ्या बोली आणि भाषा वापरणें ह्यात अस्वाभाविक असें काही नाही. भारतात आज कित्येक शतकें ही स्थिति आहे. (एकाच तुलसीदासाने रामकथा अवधीमधून गायली तर इतर काही कविताग्रंथ व्रजमधून लिहिले.) आपण आग्रह धरायला पाहिजे तो कोणतीही व्यक्ति तिची कोणतीही भाषिक गरज पुरी होण्यापासून वंचित होऊ नये ह्या गोष्टीचा. (इथे दिलेल्या तीन गरजांपैकी पहिलीचा विस्ताराने विचार अन्यत्र केला आहे, पहा: 'परिभाषेची परिभाषा'.)

युरोपमधल्या प्रमुख भाषांना आधुनिकीकरणासाठी चार शतकांचा अवधि मिळाला. भारतीय भाषांना तेवढा अवधि घेणें परवडणारें नाही. या नव्या भाषिक गरजा भागवण्यासाठी निरनिराळे उपाय फुटकळपणे योजायचे असें न करता आपल्या भाषांना नवीं वळणें देण्यासाठी एक उपाययोजना हवी. मात्र याचा अर्थ असा नाही की आपल्या भाषांना अशीं नवीं वळणें देण्याचें कार्य केवळ समित्यांकडून किंवा शिक्षणसंस्थांकडून होणार आहे. भाषासमित्यांना दिशा दाखवता येतील किंवा विविध शक्यता नोंदवता येतील; अध्यापकांना ह्या प्रश्नाबद्दल आपल्या विद्यार्थ्यांमध्ये जागरूकपणा आणता येईल आणि नव्या दमाचे वक्ते आणि लेखक जीं नवीं भाषिक उपकरणें पाजळत आहेत त्यांची ओळख विद्यार्थ्यांना करून देता येईल. हें काम जर चोख बजावलें गेलें तर नवें काही सांगणाऱ्या लेखकावर, आपला आळशी जनताजनार्दन आपल्याला भेटायला येऊन विटेवरी उभा रहायला देखील तयार नाही म्हणून हताश होण्याचा प्रसंग येणार नाही! शाळा कुणाला शेक्सपियर किंवा बर्ट्रंड रसेल बनवू शकत नाही हें तर खरेंच. पण तुमच्याशी बोलायला आला आहे तो कोणी शेक्सपियर किंवा रसेल आहे हें ओळखण्याची क्षमता शाळा तुम्हाला जरूर देऊ शकेल. शाळा तुम्हांला वाङ्मयाचा तानसेन बनवू शकणार नाही, पण वाङ्मयाचा कानसेन बनवू शकेल. निदानपक्षी शब्दांच्या डोलाऱ्यामागे खऱ्या विचाराची आणि भावनेची पोकळी कुठे आहे हें हेरण्याची कुवत तुम्हाला देऊ शकेल. कुणीही यावें आणि तुम्हाला भुरळ घालावी असें तरी होऊ नये.

त्यामुळे भाषेचें नियोजन ही केवळ सरकारी अखत्यारीमधील बाब नाही, नसावी. भाषेच्या नियोजनाला सगळ्यांचे हात लागायला पाहिजेत. तज्ज्ञ विद्वानांचे आणि शिक्षणतज्ज्ञांचे, लेखकांचे आणि सार्वजनिक वक्त्यांचे, वृत्तपत्रीय लिखाण करणारांचे आणि रेडियो किंवा दूरदर्शन किंवा चित्रपट ह्यांसारखीं जनसंपर्कमाध्यमें हाताळणारांचे —फार काय सामान्य नागरिकांचेही हात ह्या जगन्नाथाच्या रथाला लागायला पाहिजेत.

इंग्लिश व मराठी भाषांचें शिक्षणक्रमात स्थान

विविध भाषांचें शिक्षणक्रमात काय स्थान असावें हा आज भारतात चर्चेचा विषय बनलेला आहे. केवळ शिक्षणतज्ज्ञांमधील चर्चेचा विषय नव्हे तर सार्वजनिक चर्चेचा विषय बनलेला आहे. आपण हा भारतीय संदर्भ सतत डोळ्यांसमोर ठेवणार असलो तरी या ठिकाणी मुख्यतः महाराष्ट्रापुरता विचार करणार आहोत. ही चर्चा सामान्यतः इंग्लिश भाषेच्या स्थानाभोवती घोटाळत असते आणि हें साहजिक आहे. मात्र त्याचा अर्थ असा नव्हे की 'अंग्रेजी हटाओ' किंवा 'अंग्रेजी बचाओ' अशा एखाद्या एकसुरी घोषणेला धरून आपण रहावें किंवा अशा घोषणांना बिचकून 'जैसे थे' राहण्यात संतुष्ट रहावें. आपण कोणत्याही प्रश्नाचा त्याच्या मुळात जाऊन विचार करायला नेहमीच मोकळे आहोत याचा कधी विसर पडायला नको. तसें मुळात जायचें ठरवलें तर मराठी भाषेच्या स्थानाचा विचार केवळ इंग्लिश भाषेच्या तुलनेमधून करायला नको. इंग्लिश भाषेला शह देण्यासाठी म्हणून मराठीचें घोडें दामटणें म्हणजे मराठीचें काही स्वतंत्र स्थान आहे ह्याबद्दल पुरेसा विश्वास नसल्याचें लक्षण आहे. ह्या ठिकाणी मराठी भाषा म्हणजे खरें तर कोणतीही आधुनिक भारतीय स्वभाषा. भारतामधल्या बंगाली लोकांनी इंग्लिश भाषेची कास न सोडता, त्या भाषेची धास्ती न बाळगता आपली स्वभाषा बांगला हिची जोपासना केली, तिचा वाजवी आणि कधी वाजवीपेक्षा जास्तच अभिमान बाळगला हें उदाहरण मराठी माणसाने ध्यानात बाळगण्यासारखें आहे. इंग्लिश भाषा आणि आधुनिक भारतीय स्वभाषा ह्यांच्याखेरीज हिंदी भाषा; फ्रेंच, जर्मन, जपानी, चिनी ह्यांसारख्या आधुनिक विदेशी भाषा; संस्कृत, अरबी, लॅटिन ह्यांसारख्या प्राचीन अभिजात भाषा; आणि बांगला, कन्नड ह्यांसारख्या आधुनिक भारतीय परभाषा ह्यांचाही विचार भारतीय शिक्षणक्रमाच्या संदर्भात करायला पाहिजे. पण आपण या ठिकाणी तो बाजूला ठेवून मुख्यतः इंग्लिश आणि स्वभाषा किंवा प्रादेशिक भाषा म्हणून मराठी ह्यांचाच विचार करणार आहोत. आज आपल्याकडे परिस्थिति अशी आहे की अमूक भाषेला वाचवा किंवा हटवा असें म्हणण्यापेक्षा एकंदर भाषेलाच वाचवा असें म्हणण्याची वेळ आली आहे. भाषा ही शिक्षणक्रमात माध्यम म्हणून येते, अध्ययनाचा सामान्य विषय म्हणून येते, विशेष अध्ययनाचा विषय म्हणूनही येते. भाषाविषय म्हटला की आपण वाङ्मयाचाही

त्यात आपोआप समावेश करतो. असा समावेश करणें कितपत योग्य आहे याचाही विचार करणें जरूर आहे. भाषेचें शिक्षणक्रमात स्थान निश्चित करण्याच्या अगोदर तिचें एकंदर मानवी जीवनात काय स्थान आहे हें पहायला हवें. तिथूनच आपण सुरवात करू.

भाषेचें मानवी जीवनातलें स्थान

भाषा स्वभाषा असो किंवा परभाषा असो, तिचें माणसाच्या जीवनात तीन प्रकारचें कार्य असतें :

(१) उपयुक्ततेचें वळण : माणूस आपल्या परिसरात जगतो, परिसरात घर करतो. हा परिसर निसर्गनिर्मित असतो किंवा मानवनिर्मित असतो. (सरोवर निसर्गनिर्मित, तर तलाव मानवनिर्मित; सस्तन प्राणी निसर्गनिर्मित, तर दुग्धव्यवसाय मानवनिर्मित.) जगण्यामधून गरजा उत्पन्न होतात. त्या भागवताना परिसर कसा आहे हें समजावून घ्यावें लागतें आणि इतरांना समजावून द्यावें लागतें. हें करताना माणसाला भाषा उपयोगी पडते. उदाहरणार्थ, 'अरे, बाहेर पाऊस पडतो आहे का ? पाऊस असला तर माझी छत्री आणून दे.'

(२) सामाजिकतेचें वळण : माणूस केवळ भाकरीवर जगत नाही. त्याला इतरांच्या सहवासाचा आनंद मिळवायचा असतो. ज्यांचा सहवास घडेल त्यांच्याशी नातीं जुळतात, इतरांशी नातीं जुळत नाहीत, किंवा जुळलेलीं नातीं क्षीण होतात – म्हणजे पिढ्या तुटतात, सामाजिक वर्ग वेगळे पडतात, प्रादेशिक अस्मिता निर्माण होते. ह्या विलगपणाबरोबर त्याच्यावर मात करणारी सलग समाजाची रचना देखील होत असते. ह्या प्रत्येक टप्प्यावर भाषेचा हातभार लागत असतो. (ईसपची जिभांच्या पक्वान्नांची गोष्ट आठवावी.) उदाहरणार्थ, 'काय आज इकडे कुठे वाट चुकला ? कसं काय बरं आहे ना ?' किंवा 'चला आपण लपंडाव खेळू या' किंवा 'साल्या तुझं तोंड नको बघायला'.

(३) सांस्कृतिकतेचें वळण : पण माणूस भाषेची जोपासना केवळ उपजीविकेचें किंवा सहजीवनाचें एक साधन म्हणून करीत नाही. लहानपणी त्याला जशी भाषा येऊ लागते, केवळ रडण्याओरडण्यावर काम भागवावें लागत नाही, तसा तो भाषेशी खेळू लागतो, तिच्यात त्याचें मन रमतें. उदाहरणार्थ, 'ये रे ये रे पावसा' किंवा 'एक होता कावळा एक होती चिमणी' किंवा 'सकाळी चार पायावर चालतो, दुपारी दोन पायावर चालतो, संध्याकाळी तीन पायावर चालतो, तर तो कोण ?' मोठेपणी तो भाषेचा वापर करून पुढे जातो, जणू तिला तो विसरून जातो. पण भाषेशी क्रीडा करणारा, आपलें शैशव जपणारा कवि तिला विसरत नाही, आणि भाषेचा कीस काढणारा, आपलें प्रौढत्व जपणारा विचारवंत तिला विसरत नाही

आणि ही मंडळी इतराना तिचा पुरतेपणी विसर पडू देत नाहीत. इतरेजनही साहित्याचा आस्वाद घेतात आणि तत्त्वबोधासाठी खेळायच्या वादात ओढले जातात.

थोडक्यात भाषा मानवी जीवनात उपयुक्तता, सामाजिकता, आणि सांस्कृतिकता अशा तीन वळणाने कार्य करते. हीं कार्यें करताना भाषा माणसाची जाणीव केवळ वाढवत नाही तर माणसाला जाणिवेची जाणीव करून देते – निराळ्या शब्दांत सांगायचें तर माणसाचें आत्मभान जागवते. आणि तसें तें जागृत झालें म्हणजे उपयुक्ततेच्या वळणावर मूक नैपुण्य आणि कारागिरी यांचें तंत्रज्ञान बनतें, सामाजिकतेच्या वळणावर परंपरेमधल्या शहाणपणाचें सामाजिक नियोजनाचें चातुर्य बनतें, सांस्कृतिकतेच्या वळणावर जात्यावर सुचणाऱ्या ओव्यांच्या आणि व्यवहारचातुर्याच्या म्हणींच्या जागी अर्थघन काव्य आणि विचारघन सूत्रें, त्यांचें विवेचन हीं येतात.

आता इंग्लिश भाषा आणि आधुनिक भारतीय स्वभाषा म्हणून मराठी भाषा ह्यांची भारतीय जीवनात, विशेषतः महाराष्ट्राच्या जीवनात, आपापलीं स्थानें प्रत्यक्षात कोणतीं आहेत याची पाहणी करू. अशी पाहणी केल्याशिवाय त्यांचीं स्थानें आपल्या शिक्षणक्रमात आदर्श स्थितीमध्ये कोणतीं असावींत याचा विचार करणें योग्य होणार नाही.

इंग्लिश भाषेचें भारतीय जीवनातलें स्थान

आताच ज्यांचा उल्लेख केला त्या तीन पातळ्यांवर आज इंग्लिश भाषा भारतीय जीवनात कोणकोणतें कार्य करते ?

(१) उपयुक्ततेच्या पातळीवर : इंग्लिश भाषा शिकायची ती केवळ एक उपयुक्त संपर्काचें माध्यम म्हणून, तिच्यामधलें वाङ्मय शिकायचें तें फार तर या माध्यमाचा सराव व्हावा म्हणून असा एक विचार काही भारतीय मांडतात. भारतीय लोक इंग्लिश भाषा प्रत्यक्षात विविध व्यवहारात माध्यम म्हणून वापरत आले आहेत —

> खाजगी पत्रें आणि टिपणें; विद्यापीठीय आणि थोड्या प्रमाणात शालेय शिक्षण; प्रवास; राज्यपातळीवरचा व्यापार–उदीम – हिशोब, संबंधित पत्रव्यवहार, आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण; वृत्तपत्रें, मासिकें, पुस्तकें भारतात छापणें व वाचणें; बाहेरून आलेलीं मासिकें, पुस्तकें वाचणें (क्वचित् भारतातून मासिकें, पुस्तकें बाहेर पाठवणें); रेडियो, सिनेमा, टेलिव्हिजन यांचा मनोरंजनार्थ व शैक्षणिक उपयोग करणें; धर्मप्रसार व धर्मचर्चा (विशेषतः ख्रिस्ती धर्म समजावून घेण्यासाठी व हिंदू धर्म इतरांना समजावून देण्यासाठी); सार्वजनिक संस्थांचें नियमन आणि कारभार; कायदा व सरकारी कामकाज; व्यासपीठें, चर्चा, प्रचार; उच्चज्ञानविज्ञानग्रहण; सुरक्षादलांचे वरच्या पातळीवरचे व्यवहार.

ह्या विविध उपयोगांवर आधारलेल्या नोकऱ्या आणि स्वतंत्र व्यवसाय हस्तगत होण्यासाठी इंग्लिश शिकणें ओघानेच येतें. पण हे विविध व्यवहार इंग्लिशमध्ये होतात तें तरी का ? ती भाषा एके काळी भारताच्या राज्यकर्त्यांची भाषा होती आणि तीच सवय आपण पुढे चालवतो आहोत हें ह्या प्रश्नाचें एक उत्तर आहे. मात्र तें पुरेसें नाही. उरलेल्या दोन पातळींवरही आपल्याला अवलोकन करायला हवें.

(२) सामाजिकतेच्या पातळीवर : भारतामधले भिन्न भाषिक समाज जोडण्यासाठी त्या त्या क्षेत्रानुसार संस्कृत, हिंदी, उर्दू, आणि इंग्लिश ह्या भाषांचा उपयोग करून येण्यात येतो. (एके काळी प्राकृत भाषा आणि फारसी ह्यांचाही असा उपयोग झालेला आहे, पण तो इतिहासजमा झालेला आहे.) त्याचप्रमाणे भारतीय आणि परदेशीय ह्यांच्यातलें दळणवळण इंग्लिशमधून होतें. मग तो परदेशीय इंग्लिशभाषीच असेल असें नाही[1] पण भाषा केवळ समकालीन समाज एकमेकांना जोडते असें नाही, तर आजच्या इथल्या समाजाचा एकतर्फी संपर्क भूतकालीन किंवा दूरच्या समकालीन समाजाशी स्थापण्यासाठी सुद्धा भाषा कामी येते. ह्यात फक्त घेवाण असते, देवाण नसते. प्राचीन अभिजात भाषा अवगत करून घेतल्या जातात त्या अशा भूतकालीन समाजाशी नातें कायम करण्यासाठीच. इंग्लिश भाषेमुळे आपण पाश्चात्त्यांचा भूतकाळ आणि काही अंशी वर्तमानकाळ यांच्याशी असा एकतर्फी संबंध जोडतो.

इंग्लिश भाषा ही भारताचा बाह्य जगाशी कित्येक शतकें तुटलेला संबंध पुन्हा जोडण्यासाठी उघडी झालेली खिडकी आहे ती बंद करू नका – असें म्हणताना केवळ उपयुक्ततेचा विचार नसतो. भारतीय आणि जागतिक एकतेचा म्हणजे सामाजिकतेचाही विचार त्यामागे असतो. हा सामाजिकतेच्या अंगाने करायचा विचार भारतात इंग्लिशच्या बाबतीत आणखी एका तऱ्हेने उपस्थित होतो. इंग्लिश भाषा आणि कधी तिच्या जोडीला इंग्लिश वैचारिक किंवा ललित वाङ्मयही जाणणारे दोघे भारतीय एकत्र आले तर त्यांना आपण एकमेकाच्या विशेष जवळ आहोत असें वाटत राहतें.

---

१. ह्या संदर्भात रशियन लोक काही वर्षांपूर्वी भारतीयांना म्हणत – आपण रशियन किंवा हिंदी ह्यांपैकी एका भाषेत बोलू या, आपल्यामध्ये इंग्लिशची लुडबूड कशाला ? मला स्वतःला रशियन येत नाही, तेव्हा हिंदी जाणणारा रशियन माणूस भेटला तर मी आवर्जून हिंदीमध्ये बोलू लागतो. पण माझा अनुभव असा आहे की तो हटकून थोड्या वेळाने म्हणतो–एक्सक्यूज मी, बट कुड वी स्पीक इन इंग्लिश ? हा मला अनेकदा आलेला अनुभव बोलका आहे. इंडोनीशियाने पूर्वीच्या राज्यकर्त्यांची डच भाषा टाकून दिली, भारताने इंग्लिश टाकली नाही, उलट इंडोनीशियात इंग्लिशचा अभ्यास चालू झाला. जपानमध्ये १९३० मध्ये इन्स्टिटयूट फॉर रिसर्च इन इंग्लिश टीचिंग स्थापन झालें.

इंग्लिश न जाणणारीं मंडळीही त्यांची आंग्लभाषाविभूषित म्हणून संभावना करतात. (दोन मराठी-भाषी काही प्रसंगी आपापसांत इंग्लिशमध्ये बोलतात किंवा खाजगी पत्रव्यवहार करतात ह्याचीही नोंद ह्या संदर्भात घेण्याजोगी आहे.) किंबहुना पश्चिमी खिडकी असणारें आणि तशी खिडकी नसणारें अशीं दोन दालनेंच भारतीय जीवनाला असावीत असें मग वाटू लागतें. उदाहरणार्थ क्रीडा क्षेत्रात विदेशी व्यायाम व खेळ इंग्लिशमध्ये आणि देशी व्यायाम व खेळ देशी भाषांमध्ये अशी स्पष्ट वाटणी दिसते; गायनवादननर्तनकला देशी तर चित्रमूर्तिवास्तुकला विदेशी असा प्रकार दिसतो (ह्या विभागणीमुळे आपल्याकडे 'नव' चित्रकला निर्माण झाली, पण 'नव' संगीत निर्माण झालें नाही); विलायती दवा आणि देशी दवा हा भेद सगळ्यांना परिचित आहेच. हा दुभंगलेपणा तर आहेच, पण त्याचबरोबर पश्चिमी खिडकी उघडी असणारांची इतरेजनांवर कायम कुरघोडी चालत असते. अशी कुरघोडी चालत राहण्यामध्ये आर्थिक व राजकीय सत्ताधाऱ्यांचे हितसंबंधही गुंतलेले असतात. ही परिस्थिति मनाला अस्वस्थ करणारी आहे. पण इतरांनी तिचा राग इंग्लिश जाणणारांवर काढणें किंवा इंग्लिश जाणणारांना ह्या परिस्थितीमुळे इतरांसमोर ओशाळें वाटणें हें काही खरें नाही; आणि पश्चिमी खिडकी बंद करा असें वैतागाने म्हणणें तर नाहीच नाही. ह्या चमत्कारिक दुभंगलेपणावर एका बाजूला फ्रेंच, जर्मन, जपानी, अरबी अशा आणखी नव्या खिडक्या पाडणें आणि दुसऱ्या बाजूला देशी–विदेशी दालनांना जोडणाऱ्या अंतर्गत खिडक्या पाडणें हा खरोखरी उतारा आहे. बा. सी. मर्ढेकर जेव्हा म्हणत की आपण इतके परपुष्ट आहोत की अजून पुरेसे परपुष्ट नाही तेव्हा ते बाहेरच्या नव्या खिडक्यांची आवश्यकता सांगत होते. 'अव्वल इंग्रजी' कालखंडाला भाषांतरयुग म्हणून न हिणवता आज नव्याने भाषांतरयुग सुरू करण्याची आणि भाषांतरें आणि स्वतंत्रपणाने लिहिलेले सारग्रंथ ह्यांच्या रूपाने इंग्लिश, फ्रेंच, अरबी इत्यादि भाषांमधलें ज्ञान देशी भाषांमधून आणण्याची नितांत गरज आहे. ही नितांत गरज पुरी करणें म्हणजेच दोन्ही दालनांमध्ये अंतर्गत खिडक्या पाडणें, हळूहळू ही दोन्ही दालनें एक करणें ठरेल. इंग्लिशबद्दल भलता आदर वाटणें किंवा भलता तिटकारा वाटणें हीं दोन्ही एकाच न्यूनगंडाचीं बाह्य लक्षणें आहेत! हा न्यूनगंड नाहीसा झाला तर (माझे ज्येष्ठ स्नेही प्राध्यापक कांतिलाल शाह म्हणतात त्याप्रमाणे) आपल्याला हें उमजेल की बौद्धिक क्षेत्रात आपल्याला स्वदेशीची ओढ नको आहे तर स्वराज्याची ओढ पाहिजे आहे.[१]

---

१. महात्मा गांधींच्या स्वदेशीच्या आग्रहाच्या संदर्भात रवींद्रनाथ ठाकुरांनी असाच काहीसा इषारा वैचारिक क्षेत्राच्या संदर्भात दिला होता असें समजतें. संबंधित संदर्भांच्या शोधात मी आहे. कुणी ते कळवले तर आभारी होईन.

(३) सांस्कृतिकतेच्या पातळीवर : आतापर्यंत इंग्लिश भाषेकडे आपण सामान्य व्यवहाराचें साधन म्हणून पाहिलें. पण मग इंग्लिश भाषेमधल्या ललित आणि वैचारिक वाङ्मयाचा अभ्यासही मोठ्या प्रमाणावर होतो आणि तो विशेषज्ञांपुरता मर्यादित नाही हें कसें ? मानवी जीवनाचीं काही दालनेंच इंग्लिश भाषेमार्फत भारतीयांना खुली झालीं हा अनुभव आय ॲम द शिवाजी ऑव्ह द मराठी लँग्वेज असें इंग्लिशमधून ठासून सांगणाऱ्या, वाघिणीचें दूध पिणाऱ्या, आणि डॉक्टर सॅम्युएल जॉन्सनच्या वळणाचें मराठी लिहिणाऱ्या, विष्णुशास्त्री चिपळूणकरांना गेल्या शतकात आला आणि आजही तो अनेकांना येतो आहे. मराठीमध्ये ज्यांना आपला आवाज सापडला आहे अशा केशवसुत, बा. भ. बोरकर, पु. शि. रेगे, बा. सी. मर्ढेकर, किंवा अरुण कोलटकर ह्यांनाही मग इंग्लिशमध्ये कविता कराव्याशा वाटतात. हीं अनुभवाचीं नवीं दालनें म्हणजे आधुनिकतेचे विविध आविष्कार आहेत—

विनोद (विदूषकीपणा नव्हे); प्रेमाविष्कार (शृंगार नव्हे); इतिहास आणि ऐतिहासिक दृष्टि; धर्मनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष आणि सत्ताधाऱ्याच्या मर्जीपेक्षा स्वतंत्र असा कायदा; धर्मनिरपेक्ष तत्त्वज्ञान; विज्ञान; प्रतिपक्षाला प्रतिस्पर्धी न मानणारी चर्चापद्धति; नेहमीच्या चाकोऱ्या मोडून वैयक्तिक रीतीने अनुभव घेण्याची आणि त्याचा धीट आविष्कार करण्याची ओढ; परंपरा, स्थान-माहात्म्य ह्या तत्त्वांवर आधारलेल्या समाजामधून वैयक्तिक जबाबदारी, राजी-खुषीने केलेला करार, प्रयोगशीलता ह्या तत्त्वांवर आधारलेल्या आधुनिक समाजाची उभारणी (' श्रुतिस्मृतिपुराणोक्त ', ' चालायचंच ', ' गरजवंताला अक्कल नसते ', ' परधर्म हा भयावह ' असली भाषा टाकून ' अद्ययावत् ', ' नही चलेगा नही चलेगा ', ' गरज ही शोधाची जननी असते ', ' प्रयोग तर करून पाहू ' असली भाषा करणें); गणित, तर्क, आणि संशयवाद (' कशावरून म्हणता ? ', ' का म्हणून असें करायचें ? '); घोळ न घालता आखीवपणे आणि चटपटीतपणे माहिती देणें-घेणें आणि शिस्तशीरपणे कामें पार पाडणें (डॉक्टरला आपला आजार सांगण्याची किंवा आजाऱ्याची देखभाल करण्याची ' देशी ' आणि ' साहेबी ' पद्धत पहावी).

इंग्लिश भाषेचें हें सांस्कृतिक ऋण मान्य केलें म्हणजे जनरल इंग्लिश या शिक्षण-क्रमातील विषयाचा प्रपंच करताना केवळ ग्रॅमर-कॉम्पोझिशन, स्पोकन इंग्लिश, फंक्शनल इंग्लिश ह्यांच्यापुरता विचार न करताना ललित व वैचारिक वाङ्मयाचीही दखल घ्यावी लागेल हें उमजेल. आधुनिक समाजाच्या उभारणीचा तो विचार आहे.

आता मराठीच्या रूपाने आधुनिक भारतीय स्वभाषांचा विचार करायचा आहे.

मराठी भाषेचें महाराष्ट्रीय जीवनातलें स्थान

उपयुक्ततेच्या, सामाजिकतेच्या, आणि सांस्कृतिकतेच्या पातळीवर मराठी भाषा महाराष्ट्रीय जीवनात कोणकोणतें कार्य करते ?

(१) उपयुक्ततेच्या पातळीवर : महाराष्ट्रातल्या शिक्षणव्यवस्थेमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला नोकरी करायची आहे किंवा धंदा, व्यवसाय चालवायचा आहे तो मुख्यतः मराठी-भाषी समाजातच. डॉक्टर नर्सशी किंवा दोघें रुग्णाशी, वकील अशिलाशी वा साक्षीदाराशी, वरचा अधिकारी कारकुनाशी आणि दोघे नागरिकाशी वा नागरिकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीशी, एंजिनियर गवंड्याशी किंवा मेकॅनिकशी आणि दोघे गिऱ्हाइकाशी मराठीमधूनच बोलणार. तीच गत व्यापारी, अध्यापक, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, शेतकीतज्ज्ञ इत्यादिकांची राहणार. उपयुक्तता जशी इंग्लिशची आहे तशीच मराठीचीही आहे. (हा महाराष्ट्रातला विद्यार्थी भारतात परप्रांतात गेला तरी त्याला स्थानिक भारतीय भाषा किंवा हिंदी जवळ करावीच लागणार, मग तो साधा कामगार असो नाही तर टेबलाशी बसणारा ' कर्मचारी ' असो !)

(२) सामाजिकतेच्या पातळीवर : पण मराठी शिकण्याचा विचार केवळ पोट भरण्याचा विचार नाही. एकसंध समाज उभारण्याचाही तो विचार आहे. जसा अनेक-भाषी भारताच्या संपर्कभाषा कोणत्या असा प्रश्न आपल्याला पडतो, तसा मराठीच्या विविध प्रादेशिक बोली (कोल्हापुरी, वऱ्हाडी, नागपुरी, मालवणी इत्यादि) आणि मराठीखेरीज इतरही भारतीय बोली (गुजराती, कोर्कू, कोलामी, पारसी–गुजराती इत्यादि) जिथे बोलल्या जातात त्या महाराष्ट्राची संपर्कभाषा कोणती असाही प्रश्न आपल्या लक्षात यायला पाहिजे. अशी महाराष्ट्राची संपर्कभाषा म्हणजे प्रमाण–मराठी. महाराष्ट्रातील कोणत्याही अल्पसंख्य गटाची भाषा बोलणाऱ्या मुलांना शाळेत निदान कामचलाऊ, व्यावहारिक मराठी शिकवणें हिताचें आहे असा आग्रह धरण्यामागे उपयुक्तता आणि सामाजिक एकता अशा दोन्ही पातळ्यांवरचा विचार आहे.

एकसंध समाज उभारण्याच्या कल्पनेला आणखीही एक महत्त्वाचा पदर आहे. परिचमेची खिडकी उघडी असणारें दालन आणि तशी खिडकी उघडी नसणारें दालन ह्यांना जोडणें किती महत्त्वाचें आणि तातडीचें आहे हें आपण मागेच पाहिलें. ह्या दोन दालनांना जोडणाऱ्या अंतर्गत खिडक्या पाहिजेत हेंही आपण म्हटलें. ह्या अंतर्गत खिडक्या म्हणजे दुसऱ्यातिसऱ्या कोणत्या नसून मराठी आणि इतर आधुनिक भारतीय स्वभाषा ह्याच आहेत हें सहज ध्यानात यावें. नव्या वैज्ञानिक किंवा तांत्रिक किंवा वैद्यकीय शोधांबद्दल किंवा नव्या कायद्यांबद्दल किंवा नव्या विचारधारांबद्दल मराठीत लिहायचें – बोलायचें कुणी ? अंधश्रद्धा, घातक रूढि इत्यादींच्यावर हल्ला चालू ठेवायचा कुणी ?

(३) सांस्कृतिकतेच्या पातळीवर : पण मराठीकडे पहायचें तें केवळ साधन किंवा हत्यार म्हणून नव्हे. मराठी भाषेला धार्मिक व ललित पद्याची दीर्घ आणि समृद्ध परंपरा आहे. ललित व वैचारिक गद्याची परंपरा तितकी दीर्घ नसली तरी ती समृद्ध आहे. हें वाङ्मय सर्व मराठी समाजाचा वारसा आहे, तो काही केवळ संबंधित भाविकांचा किंवा मराठीच्या प्राध्यापकांचा वारसा नाही. (हें लक्षात आलें म्हणजे मग डॉक्टर किंवा एंजिनियर होऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याची किंवा नाटकाची आवड मोठ्या प्रमाणावर कशी दिसून येते ह्याबद्दल अचंबा वाटण्याचें कारण राहणार नाही.)

आधुनिक जगामध्ये विविध विचार, मूल्यें, कल्पना, आमिषें, भावनेला आवाहनें यांचा वर्षाव लहानथोरांवर, स्त्रीपुरुषांवर सतत होत असतो. त्याला चोखंदळपणे, डोळसपणे तोंड द्यायचें, नव्याला बुजायचें नाही पण केवळ नव्यामागे धावायचें नाही, जगाचा नागरिक व्हायचें आणि परकीय जीवनपद्धतीमधला ग्राह्य अंश उचलायचा पण भारतीय अस्मिता विसरायची नाही, स्वदेशीचा आणि स्वराज्याचा योग्य विवेक करायचा, भारताचा नागरिक व्हायचें पण आपलें मराठीपण जपायचें – हें सर्व करायला सुजाणपणा आणि चांगली अभिरुची ह्यांची शिदोरी प्रत्येकाजवळ असायला पाहिजे. ह्यासाठी भाषेप्रमाणे वैचारिक व ललित वाङ्मयाचेंही महत्त्व आहे. पूर्वी धार्मिक शिक्षण आणि नीतिबोध करण्याची कल्पना होती, पण त्यासाठी एक सुनिश्चित, सर्वमान्य, जवळजवळ स्थिर जीवनपद्धति गृहीत धरावी लागते. पण भारतासारख्या बहुजिनसी समाजात आणि आधुनिक काळासारख्या गतिमान आणि विविध संस्कृतींचा संपर्क घडवून आणणाऱ्या युगात धार्मिक शिक्षण आणि नीतिबोध या कल्पना सार्वजनिक पातळीवर तरी सोडून द्याव्या लागतात. वाङ्मय हें संस्कारांचें माध्यम म्हणून सध्याच्या परिस्थितीत अधिक प्रभावी, अधिक लवचीक ठरेल. अशा संस्कार-माध्यमाची नितांत गरज आहे. नाहीपेक्षा व्यावसायिक हा केवळ धंदेवाला होईल आणि धंदेवाला लुटारू होईल, व्यापारी किंवा उद्योजक हा केवळ सामाजिक जबाबदारी व जाण नसणारा पैसेवाला होईल, नोकरदार मग तो कामगार असो किंवा कर्मचारी असो हा केवळ पाट्या टाकणारा बिगारी होईल. होईल कशाला, आजच होत आहे ह्याचा कटु अनुभव आपल्याला पदोपदी येतोच आहे.

महाराष्ट्रातील शिक्षणक्रमाचें आणि सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीचें अवलोकन

इंग्लिश व मराठी भाषा, इंग्लिश व मराठी वैचारिक व ललित वाङ्मय यांचें विषय म्हणून आणि माध्यम म्हणून शिक्षणक्रमात कोणतें स्थान असावें हें ठरवताना पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, आणि विद्यापीठीय ह्या विविध शैक्षणिक पातळ्यांवर

कोणत्या गरजा आहेत आणि आज त्या महाराष्ट्रात कितपत पुऱ्या होत आहेत याचें भान असणें जरूर आहे. (वाङ्मय हा शिकण्याचा विषय असतो त्याप्रमाणेच तें जाणिवा, वृत्ति, संवेदनक्षमता शिकण्याचें माध्यमही असतें हें आता निराळें सांगायला नको.)

पूर्वप्राथमिक शिक्षण (वय चार ते सहा अशीं दोन वर्षें) हें त्यासाठी मुद्दाम स्थापलेल्या शाळेतच मिळतें असें नाही. तें एखाद्या निरलसपणे आणि जागरूकपणे चालवलेल्या संस्कारकेंद्रात जसें मिळेल तसें एखाद्या संस्कारसंपन्न घरामध्येही मिळेल. पूर्वप्राथमिक शिक्षणाचीं कोणतीं कार्यें आहेत? घरी उच्छाद आणणाऱ्या लहानग्या-पासून आईला थोडी उसंत देणें, कामावर जाणाऱ्या आईला आपल्या मुलाबद्दल निभ्रांत करणें, किंवा त्याला स्वच्छतेच्या आणि तत्सम बऱ्या सवयी लावणें हीं चटकन उमगणारीं तर कार्यें आहेतच. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलाची शाळेशी आणि पर्यायाने घराबाहेरच्या मोठ्या जगाशी प्रथम ओळख आणि नंतर दोस्ती करून देणें ही आहे. जगाचें ज्ञान केवळ मुकें निरीक्षण आणि मुकी नक्कल करून होत नाही, तर बोलचाल करून होतें, प्रश्न विचारून होतें, स्वप्रयत्न करून आणि ठेचा खाऊन होतें ह्याबद्दल मुलाची खात्री पटवणें हें त्यासाठी आवश्यक आहे. मुक्त क्रीडा आणि भाषा हीं पूर्वप्राथमिक शिक्षणाचीं माध्यमें आहेत.

प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ते ४, वय सहा ते दहा) ही त्याच्या थोडी पुढची पायरी. मुलाच्या स्वानुभवाचें आणि एव्हाना आत्मसात् झालेल्या घरातल्या प्रारंभिक बोलीमधून आकार घेणारें विश्व आणि शाळेतून औपचारिकपणे आणि अनौपचारिक-पणे मिळणाऱ्या ज्ञानाचें विश्व ह्यांचा सांधा ह्या अवस्थेत जुळावा लागतो. भाषा आणि जिला थोडा आकार मिळालेला आहे अशी क्रीडा (नियमबद्ध खेळ, नाचगाणें, चित्रें काढणें, कोडीं घालणें – सोडवणें इत्यादि) ही प्राथमिक शिक्षणाचीं माध्यमें आहेत.

निम्न–माध्यमिक शिक्षण (इयत्ता ५ ते ८, वय दहा ते चौदा) ह्या अवस्थेत केवळ मुलाला अमूक इतकें ज्ञान द्यायचें एवढेंच प्रयोजन नसतें तर ज्ञान घ्यायची ओढ मुलाच्या ठिकाणी उत्पन्न करणें, ज्ञान घ्यायचा सराव करणें, आवडीनिवडीची आणि चांगल्यावाइटाची जाणीव जागृत करणें हेंही प्रयोजन असतें. भाषा, क्रीडा, आणि कार्यानुभव ही निम्न–माध्यमिक शिक्षणाचीं माध्यमें आहेत. ह्याच अवस्थेत मुलांना वाचनाची आवड आपोआप लागते किंवा थोड्या प्रयत्नाने लावता येते.

उच्च–माध्यमिक शिक्षण (इयत्ता ९ ते १२, वय चौदा ते अठरा) आणि तांत्रिक प्रशिक्षण ह्या अवस्थेत मुलाला अमूक इतकें तयार ज्ञान (विशेषतः माहिती या स्वरूपात) द्यायचें ह्याला तर महत्त्व असतेंच पण त्या ज्ञानाची मांडणी कशी करून घ्यायची आणि तें ठरीव क्षेत्रात कसें उपयोगात आणायचें हेंही त्याला शिकवणें रूर आहे. भाषा, शिक्षकाचें अनुकरण, आणि कार्यानुभव ही उच्च–माध्यमिक

शिक्षणाचीं आणि तांत्रिक प्रशिक्षणाचीं माध्यमें आहेत. वाङ्मयाचाही माध्यम म्हणून उपयोग करून घेण्याची थोडीफार शक्यता येथे आहे. पण उच्च-माध्यमिक अवस्था ही मुख्यतः वैचारिक आणि ललित वाङ्मयाची जाण येण्याची पहिली संधि आहे असें मानावें लागतें. कार्यानुभवात छोटासा प्रकल्प तडीस नेणें हेंही येऊ शकेल.

पदवीपूर्व विद्यापीठीय शिक्षण (तीन ते पाच वर्षें) शालेय शिक्षण आणि तांत्रिक प्रशिक्षण ह्यांच्यापेक्षा मुळातच वेगळें आहे. विद्यार्थ्याची पैसे मिळवण्याची क्षमता पदवीवर अवलंबून नसली तरी पदवीमुळे ती सुधारते आणि ह्या क्षमतेकडे इतर मंडळी डोळे लावून असतात हें नाकारण्यात अर्थ नाही, आणि त्यात वावगें काय आहे ? पण इतरांच्या सुशिक्षिताकडून आणखी काही अपेक्षा असतात. 'आपल्या-सारख्या सुशिक्षिताकडून ही अपेक्षा नव्हती' असें त्याला कधी ऐकवण्यात येतें तें उगीच नव्हे. सुशिक्षित आणि केवळ प्रशिक्षित यांच्यामध्ये त्यांच्या विशिष्ट ज्ञान-शाखेच्या दृष्टीनेही फरक आहे. तो जर नीट लक्षात घेतला तर दुसरी एक गोष्ट ओघाने येते. ती म्हणजे स्वानुभव आणि ज्ञानविश्व ह्यांमध्ये बांधलेला भाषेचा पूल इथे गृहीत धरावा लागतो, किंबहुना भाषेवर बऱ्यापैकी प्रभुत्व असणें जरूर आहे, केवळ प्राथमिक प्रभुत्व किंवा कामचलाऊ भाषाज्ञान पुरेसें नाही. काही विद्याशाखां-मध्ये तर भाषेइतकेंच, किंबहुना अधिकच, गणिताचें महत्त्व आहे. त्यासाठी गणिता-वरही बऱ्यापैकी प्रभुत्व अगोदरच प्रस्थापित होणें जरूर आहे. ह्या भाषा आणि/किंवा गणित यांच्या पुलावरून पुढें जायचें म्हणजे ज्ञानविश्वाचीं क्षितिजें रुंदावणें आणि ज्ञानविश्व तयार नसून सतत बदलतें असतें याची जाणीव होणें आणि साध्या माहितीच्या पलीकडे जाऊन मर्मदृष्टीचा लाभ होणें, प्रश्नाची मेख कळणें.[3] भाषा,

---

३. वाणिज्य, विधि, शिक्षण, वृत्तपत्रविद्या, वैद्यक, अभियांत्रिकी ह्या व्यावसायिक शाखांच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि व्यवहारोपयोगी शिक्षण देणें पुरेसें आहे; भाषा, वाङ्मय व इतर मानव्य-शाखेमधल्या 'फालतू' विषयाची त्यांना गरज नाही — असा विचार शिक्षणव्यवस्थेमधली मंडळी आणि पालकवर्ग यांच्यामध्ये बळावला आहे. ह्या संबंधांत मतें अजमावताना भारत सरकारने डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या नेतृत्वाखाली वाणिज्य शिक्षणासाठी नेमलेल्या १९५८-६१ च्या विशेष समितीला आलेला अनुभव प्रस्तुत चर्चेच्या संदर्भात तर विशेष लक्षणीय आहे : "... an intriguing feature of the evidence received on [combining liberal and vocatlonal content in commerce education] has been that while academicians have☆

[पुढील पानावर पहा

गणित, क्षेत्रीय कार्य, प्रयोग, वाङ्मय हीं पदवीपूर्व विद्यापीठीय शिक्षणाचीं माध्यमें आहेत.

पदव्युत्तर विद्यापीठीय शिक्षण (दोन ते पाच वर्षें) ही त्याच्या थोडी पुढची पायरी. ह्या अवस्थेत तर स्वतः नवीन ज्ञान पैदा करून एकंदर मानवी ज्ञानात भर घालण्याची हिम्मत बांधायची आहे. ह्यासाठी मिळालेल्या ज्ञानाचा ठरीव क्षेत्राच्या बाहेर उपयोग करण्याची सवय पदवीपूर्व अवस्थेपासूनच हळूहळू व्हायला पाहिजे. पदव्युत्तर शिक्षणात तर ती सवय अधिकच महत्त्वाची आहे. भाषा, गणित, क्षेत्रीय कार्य, प्रयोग, वाङ्मय ह्यांच्या जोडीला प्रबंधलेखन ह्या नव्या शैक्षणिक माध्यमाचाही उपयोग ह्या अवस्थेत होत असतो. एम्. ए., एम्. एस्–सी., एम्. डी. सारख्या पदव्यांच्या पाठ्यक्रमात नेहमीच्या परीक्षांच्या सोबत विद्यार्थ्यांकडून एक छोटा प्रबंध लिहून घेण्याची कल्पना आज रुजत आहे.

शैक्षणिक अवस्थांचें नेमकें आणि आदर्श स्थितीमधलें शैक्षणिक कार्य कोणतें ह्याचा आपण क्रमशः आढावा घेतला. तो घेताना शिक्षणाचा केंद्रबिंदु विद्यार्थी आहे

मागील पानावरून]

☆stressed the vocational content of commerce education, businessmen have been inclined to stress the need of its being more liberal in character." पुढे समिति असेंही नमूद करते : "As one employer told us : 'The employers want men with broad general education, initiative, and an alert and analytical mind, so that whatever be the department he is transferred to, he can pick up the technicalities and procedures quickly.'" वरच्या जागांवरच्या नेमणुका करताना मालकमंडळी बी. कॉम्. तरुणांना आणि बी. ए. किंवा बी. एस्–सी. तरुणांना एकाच मापाने मोजताना, परीक्षेमधली श्रेणी पाहताना, आणि विद्याशाखेचा विचार न करताना समितीला दिसून आली. समितीच्या शिफारशी सध्याच्या बी. कॉम्. च्या पाठ्यक्रमात इंग्लिश, प्रादेशिक भाषा, आणि अर्थविज्ञान ह्यांना रास्त स्थान द्यावें आणि केवळ व्यावसायिक विषयांना अवाजवी महत्त्व दिल्यामुळे वाढलेला बोजा कमी करावा अशा स्वरूपाच्या आहेत. त्यांच्याकडे आपल्या विद्यापीठांनी अजूनही लक्ष दिलेलें दिसत नाही. (अवतरणें : Report of the Special Committee for Commerce Education. New Delhi, 1961, pp. 7,20.)

हें गृहीत धरलेलें आहे. ह्या विद्यार्थ्याला कोणत्या प्रकारचे अनुभव उपलब्ध करून द्यायचे आणि अशा अनुभवांतून त्याने कोणती माहिती, कोणती मर्मदृष्टि, कोणती प्रवृत्ति, कोणतें नैपुण्य मिळवायचें, कोणते संस्कार घ्यायचे हे प्रश्न आपण विचारले आहेत. उपलब्ध करून घ्यायच्या अनुभवांना आपण शिक्षणाचें माध्यम म्हटलें आहे — शिक्षणाचें माध्यम केवळ अमूक भाषा हा मर्यादित विचार व्यापक करून घेतला आहे आणि शिक्षणाचें माध्यम भाषा, गणित, क्षेत्रीय कार्य, प्रयोग आणि प्रकल्प, वाङ्मय, कार्यानुभव, क्रीडा, शिक्षकाचें अनुकरण, प्रबंधलेखन ह्यांपैकी त्या त्या अवस्थेला अनुरूप कोणतेंही असू शकेल असें आपण मानलें आहे. आणि ह्या माध्यमाच्या मार्फत जें शिकवायचें त्याला आपण शिक्षणाचा विषय किंवा शिक्षणाचें साध्य मानलेलें आहे. सुरवातीला भाषा, वाङ्मय, गणित हे विषय म्हणून असतील. पुढे ते आत्मसात् झाल्यावर त्यांचाच माध्यम म्हणून उपयोग करता येईल किंवा स्वतंत्रपणे विशेष अभ्यासाचा विषय म्हणूनही काही थोडे विद्यार्थी त्यांच्याकडे पाहू शकतील. शिक्षणाचें माध्यम ज्याप्रमाणे शैक्षणिक अवस्थेला अनुरूप असें पाहिजे त्याप्रमाणे साध्य विषयालाही अनुरूप असें पाहिजे हें स्पष्ट आहे.

आता कागदोपत्री रुजू झालेल्या ह्या तात्त्विक आदर्शाकडून आपण वर्तमान वास्तवाच्या भूतलावर उतरू. मात्र तसें करताना दोन गोष्टींचें भान एकाच वेळी आपल्याला ठेवायचें आहे. आपले पाय भूमीवर घट्ट रोवलेले असले तरी डोकें भविष्याच्या आभाळाचा वेध घेण्यात गुरफटलेलें असावें लागतें. तसें केलें नाही तर आपलें पाय शिक्षणाच्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या भूमीवर टिकून न राहता आज जो शिक्षणाचा व्यापार होतो आहे त्याच्या गाळातच अधिकाधिक फसत जातील हा धोका आहे. आदर्शवाद आणि वास्तववाद यांचें भांडण असायचें कारण नाही. पण आदर्शवाद म्हणजे अजागळ स्वप्नाळूपणा आणि वास्तववाद म्हणजे निराशावाद किंवा सिनिसिझम मात्र नव्हे!

पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी बेताच्या कसाच्या थोड्या शाळा, बऱ्या कसाच्या नगण्य शाळा, आणि बेताच्या कसाचीं अगदी थोडीं संस्कारकेंद्रें शहरी आणि निमशहरी परिसरांतून उपलब्ध आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षणाचा कस सामग्री मुबलक असणें, शिक्षक प्रशिक्षित असणें, आणि मुलें बऱ्या आर्थिक स्तरामधली असणें ह्यांच्यावर ठरत नाही हें स्पष्ट केलेलें बरें. ह्या अटी पुऱ्या करणाऱ्या शाळांमधून आपल्याकडे बहुतेक वेळा पूर्वप्राथमिक शिक्षणाचें विडंबनच झालेलें आणि मुलांची दयनीय अवस्था झालेली दिसून येते. पूर्वप्राथमिक शाळेचा जणू काही 'कोचिंग क्लास' बनतो आणि प्राथमिक शाळेचा बराच अभ्यास चक्क पूर्वप्राथमिक शाळेत पुरा करण्याचा अट्टाहास केला जातो! बरोबर ह्याच्या उलट ग्रामीण परिसरात पूर्वप्राथमिक शिक्षणाची जबाबदारी प्राथमिक शाळेवरच पडते. अशा ठिकाणी ती जबाबदारी

काही अंशी विभागून जावी ह्यासाठी संस्कारकेंद्रांची मोठ्या संख्येने जरुरी आहे.

प्राथमिक आणि माध्यमिक टप्प्यावर आपल्याला व्यवहारातः इयत्ता १ ते १० यांचा विचार करायचा आहे. ह्या ठिकाणी आपल्याला तीन प्रकारच्या शाळा दिसून येतात—

(१) संख्येने बऱ्याच आहेत पण फारच कमी कसाच्या आहेत अशा शाळा,

(२) संख्येने कमी आहेत पण कसाने बऱ्या आहेत अशा शाळा,

(३) भाषिक दृष्ट्या संमिश्र विद्यार्थीवर्गासाठी बऱ्या कसाच्या काही थोड्या शाळा.

शाळेचा कस तीन गोष्टींवरून ठरवायचा आहे — सामग्रीची गुणवत्ता आणि मुबलकपणा, त्याहून महत्त्वाची गोष्ट प्रशिक्षित शिक्षकांची संख्या, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकांचा कस. शाळेचा कस सुधारायचा तर ह्या तीनही गोष्टी सुधाराव्या लागतील. शिक्षकांचा कस वाढवणें हें नुसतें महत्त्वाचें नाही, अधिक फलदायीही आहे – म्हणजे त्यासाठी गुंतवलेल्या दर रुपयामागे अधिक शैक्षणिक फल देणारी ही सुधारणा आहे.

आपली शिक्षणव्यवस्था जशी विकसित होईल तसतशी दुसऱ्या वर्गातील शाळांची संख्या वाढत जाईल, कमी कसाच्या शाळा निदान बेताच्या कसाच्या होतील, आणि बऱ्या कसाच्या काही थोड्या शाळा तरी उत्तम कसाच्या होतील असा सावध आशावाद बाळगायला हरकत नाही.

शिवाय आपल्याला तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा एक वर्ग लक्षात घ्यायला पाहिजे. (गृहविद्या, ग्रंथपालनशास्त्र ह्यांचें शिक्षण म्हणजे एक तांत्रिक प्रशिक्षणच आहे, मग भले त्यांना कुणी होम सायन्स, लायब्ररी सायन्स असें गौरवान्वित करू दे.)

(४) संख्येने कमी आहेत पण कसाने बऱ्या आहेत अशा धंदेशाळा किंवा पदविका देणारी तंत्रनिकेतनें.

आपली शिक्षणव्यवस्था जशी विकसित होईल तशा तांत्रिक प्रशिक्षणाच्या संस्था संख्येने बऱ्याच होतील आणि त्यांचा कस सुधारेल असा सावध आशावाद बाळगायला हरकत नाही. एंजिनियरिंगचें पदविकेसाठी प्रशिक्षण आणि पदवीसाठी व्यावसायिक शिक्षण, चित्रकलेचें पदविकेसाठी प्रशिक्षण आणि पदवीसाठी शिक्षण ह्यांमध्ये नेमका काय फरक आहे हें लक्षात घेणें जरूर आहे. जेव्हा सगळें सुरळीत चाललेलें असेल तेव्हा पदविकाधारक आणि पदवीधारक ह्यांच्या मधला फरक ध्यानात येत नाही, जेव्हा काही बिघडतें किंवा जेव्हा नव्याने उभारणी करायची असते किंवा बदलत्या परिस्थितीचें आह्वान झेलायचें असतें किंवा जेव्हा नव्याने सापडलेलीं तंत्रें आत्मसात् करायचीं असतील तेव्हा हा फरक आणि त्यात अनुस्यूत असलेला बुद्धीचा गुणात्मक

फरक कसा आहे तें स्पष्ट होतें.

अर्थात् शाळांचे हे चार वर्ग म्हणजे हवाबंद कप्पे नसावेत, आणि प्रत्यक्षात ते तसे नसतातही–अशी भूमिका या टिकाणी घेतलेली आहे. किंबहुना पहिल्या वर्गातील शाळांमधून निम्नमाध्यमिक पातळीवर विशेष गुणवत्ता दाखवणाऱ्या मुलांना उच्चमाध्यमिक पातळीवर दुसऱ्या वर्गातील शाळांत जायला किंवा चौथ्या वर्गातील संस्थांमधून विशेष गुणवत्ता दाखवणाऱ्या मुलांना महाविद्यालयांत जायला विशेष उत्तेजन द्यावें. तसें करताना त्यांच्यासाठी हें संक्रमण व्यवस्थित व्हावें ह्यासाठी जरूर तेथे पुरवणी पाठ्यक्रम आखावे लागले तरी हरकत नाही.

इयत्ता ११, १२ पातळीवरचें शिक्षण देणाऱ्या उच्चमाध्यमिक शाळा वा कनिष्ठ महाविद्यालयें आणि पदवीपूर्व शिक्षण देणारीं विद्यापीठीय महाविद्यालयें ह्यांचा आता विचार करायचा. त्यांचे साधारणतः तीन वर्ग पडतात–

(५) संख्येने बरींच आहेत पण कसाने बेताचीं आहेत अशीं मानव्य–विज्ञान–वाणिज्य विद्याशाखांचीं महाविद्यालयें,

(६) कसाने बरीं आहेत पण संख्येने कमी आहेत अशीं मानव्य–विज्ञान–वाणिज्य विद्याशाखांचीं महाविद्यालयें,

(७) कसाने बरीं आहेत पण संख्येने बेताचीं आहेत अशीं विधि–शिक्षण–वृत्तपत्रविद्या या व्यावसायिक विद्याशाखांचीं महाविद्यालयें,

(८) कसाने बरीं आहेत पण संख्येने फार कमी आहेत अशीं कृषि–वैद्यक—अभियांत्रिकी या व्यावसायिक विद्याशाखांचीं महाविद्यालयें.

‘ मानव्य ’ ह्या संज्ञेमध्ये साहित्य, भाषा, तत्त्वज्ञान, इतिहास, ललितकला, आणि मानवी जीवनाचें वैज्ञानिक अध्ययन ह्यांचा सध्या समावेश केला आहे. ‘ विज्ञान ’ ह्या संज्ञेमध्ये भौतिकसृष्टि आणि जीवसृष्टि यांच्या वैज्ञानिक अध्ययनाबरोबर गणित व सांख्यिकी ह्यांचाही सध्या समावेश केला आहे. गृहविद्या आणि ग्रंथपालनविद्या देणाऱ्या विद्यापीठीय विभागांचा समावेश अगोदर उल्लेखिलेल्या चौथ्या वर्गामध्ये केला आहे हें पूर्वीच स्पष्ट केलें आहे.

वर दिलेल्या पाचव्या आणि सहाव्या वर्गातल्या महाविद्यालयांचा उल्लेख कधीकधी अनवधानाने अनुक्रमे मुफस्सल महाविद्यालयें आणि शहरी महाविद्यालयें असा करण्यात येतो. तें अर्थातच योग्य नाही. मुफस्सल गटात बऱ्या कसाचीं आणि शहरी गटात बेताच्या कसाचीं महाविद्यालयें आहेत.

आपल्या शिक्षणव्यवस्थेचा जसा विकास होईल तशीं बेताच्या कसाचीं महाविद्यालयें बऱ्या कसाचीं आणि बऱ्या कसाचीं महाविद्यालयें उत्तम कसाचीं होतील असा सावध आशावाद बाळगायला हरकत नाही. महाविद्यालयांचा कस ठरवताना अगोदर शाळांच्या बाबतीत साधनसामग्री, अध्यापकसंख्या, आणि अध्यापकांचा कस ह्या ज्या तीन

चढत्या महत्त्वाच्या कसोट्या मांडल्या आहेत त्या इथेही लागू करता येतील. सातव्या आणि आठव्या वर्गातल्या व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या वाढेल अशी खटपट करायला पाहिजे–मात्र साधनसामग्रीची गुणवत्ता व मुबलकपणा आणि अध्यापकांची संख्या यांच्याकडे आठव्या वर्गातल्या महाविद्यालयांच्या संबंधात विशेष लक्ष पुरवायला पाहिजे.

मानव्य–विज्ञान–वाणिज्य विद्याशाखांमधल्या महाविद्यालयांच्या एकूण संख्येबद्दल काय धोरण असावें ? समाजाच्या ऐहिक गरजा आणि विद्यापीठीय शिक्षण घ्यायची विद्यार्थ्यांची अंगभूत क्षमता ह्यांचा मेळ घालूनच जरूर ती संख्यावाढ करावी. दुसरीकडे कुठे जायचें तें लक्षात येत नाही म्हणून केवळ अगतिकपणे मानव्य, विज्ञान, वाणिज्य विद्याशाखांच्या महाविद्यालयांमधून प्रवेश घ्यायचा असें करणाऱ्या विद्यार्थ्यांचें भरताड खरें म्हणजे महाविद्यालयीन पातळीवरूनच पण निदान सुरवातीला काही निवडक महाविद्यालयांमधून आणि सर्व पदव्युत्तर विभागांमधून निग्रहाने कमी करायला पाहिजे. हा आग्रह धरताना केवळ विद्यार्थ्यांच्या प्रतवारीचा प्रश्न नाही, वर्गवारीचाही प्रश्न आहे. विद्यापीठीय शिक्षणासाठी पात्र विद्यार्थी इतर ठिकाणी अपात्र असू शकेल आणि विद्यापीठीय शिक्षणासाठी अपात्र विद्यार्थी इतर ठिकाणी पात्र असू शकेल. (सगळयाच ठिकाणी अपात्र अशीं माणसें सुदैवाने कमी संख्येने जन्माला येतात !) हा निग्रह अमलात आणला तर बौद्धिक कुवत बेताची असणारांचें वास्तव हित जपता येईल आणि बौद्धिक कुवत चांगली असणारांचें अहित थांबवता येईल; महाविद्यालयांचा कस वाढवणें सोपें होईल. बौद्धिक कस उत्तम आहे पण व्यावसायिक महाविद्यालयांतून जागेच्या अभावी प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी नंतर जरूर तर विद्याशाखा बदलून मानव्य शाखेत यायला उत्तेजन द्यावें.

हा प्रतवारीचा आणि वर्गवारीचा प्रश्न ठासून मांडण्यात मला दोन विपरीत गोष्टींकडे मुद्दाम लक्ष वेधायचें आहे. एका बाजूला भारतात विद्यापीठीय शिक्षणाला फाजील महत्त्व मिळालें आहे. विद्यापीठीय शिक्षणासाठी पात्र नसलेला पण दुसऱ्या ठिकाणी नाव कमावू शकणारा तरुण महाविद्यालयीन पदवी मिळवून टेबलखुर्चीवाला बाबू किंवा ‘ कर्मचारी ’ होऊ पाहतो किंवा तो योग्य ठिकाणी पोचला तरी देखील बाबू व्हायला मिळालें नाही म्हणून हिरमुसला आणि म्हणून कुचकामी बनतो. उलट दुसऱ्या बाजूला विद्यापीठीय शिक्षणाच्या गुणवत्तेला किमान महत्त्व देखील दिलें जात नाही. अपात्र विद्यार्थ्यांचें वर्गात मोठ्या संख्येने अस्तित्व पात्र विद्यार्थ्याला आळशी किंवा सिनिकल बनवतें, अपात्र अध्यापकाला मुजोर किंवा बेपर्वा बनवतें, आणि पात्र अध्यापकाला नाउमेद आणि म्हणून कालांतराने कुचकामी बनवतें. पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यापीठीय शिक्षणाला सुसज्ज ग्रंथालय लागतें, वर्ग लहान लागतात, ज्यांना संशोधनात रस आहे असें पात्र अध्यापक लागतात यांसारख्या प्राथमिक वाजवी

मागण्यांकडे आता कुठे थोडेंसें लक्ष देण्यात येऊ लागलें आहे. पण अपात्र विद्यार्थ्यांचें भरताड कमी व्हायला पाहिजे हें म्हणायला मंडळी कचरतात. अर्थात् ही मागणी पुरी व्हायची तर विद्यापीठात ज्यांनी जाऊ नये असें वाटतें त्यांना इतर वाटा खुल्या होणें जरूर आहे. देशाचा आर्थिक विकास होऊन रोजगार उपलब्ध होणें, तांत्रिक प्रशिक्षणाच्या तरतुदी उपलब्ध होणें, रोजगार उपलब्ध होऊन रांकेला लागल्यानंतर ज्यांची बौद्धिक भूक जागृत होते त्यांच्यासाठी मुक्त विद्यापीठें किंवा निरंतर शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होणें अशा काही वाटा इथे सांगता येतील. अर्थात् घोड्याला नुसतें पाण्यावर नेणें पुरेसें नाही, त्याने पाणी प्यावें ह्यासाठी शैक्षणिक प्रचाराची जरूर आहे. विद्यार्थी, पालक, आणि रोजगार देणारे लोक यांचें मतपरिवर्तन करायला पाहिजे, त्यांना विश्वासात घ्यायला पाहिजे.

आपल्याला जें काही धोरण ठरवायचें आहे तें एकाच वेळी आतापर्यंत वर्णिलेल्या परिस्थितीशी सुसंगत पाहिजे (नाहीपेक्षा तें राबवता येणार नाही) आणि तिच्याशी विरोध पत्करणारें पाहिजे (नाहीपेक्षा ह्या परिस्थितीमधून वर निघणें तर दूरच, पण ती झपाट्याने आणखी बिघडण्याचा धोका राहतो). पुरवठा तशी मागणी असू द्या असें म्हणून उपयोगी नाही. उदाहरणार्थ, आज नोकरीच्या शोधात असलेले मराठी घेऊन एम्. ए. झालेले लोक किंवा विद्यार्थ्यांच्या शोधात असलेले मराठीचे प्राध्यापक ऱ्याच प्रमाणात दिसतात म्हणून त्यांना 'तारण्यासाठी' म्हणून जिकडे तिकडे पदवीपूर्व पातळीवर मराठीचे अभ्यासक्रम सुरू करणें योग्य ठरणार नाही. किंवा बरोबर ह्याच्या उलट दिशेने मागणी तसा पुरवठा करण्याची भाषा सोडावी लागेल. उदाहरणार्थ विज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांना हव्या आहेत कुठे भाषा आणि त्यांच्यातले वैचारिक किंवा ललित वाङ्मय, म्हणून मराठीच काय पण इंग्लिश देखील विज्ञानशाखेतून काढून टाकावें असें म्हणणें योग्य होणार नाही. वास्तविक गोष्ट अशी आहे की भारतासारख्या अविकसित देशात[४] नुसता पुरवठाच अविकसित असतो असे नाही तर मागणीही अविकसित असते. मागास समाजात मुलांना नुसतें दूध किंवा फळें उपलब्ध करून भागत नाही, तीं खायला देखील शिकवावें लागतें. अशा प्रकारच्या अविकसित समाजात अगोदर गरजा निश्चित कराव्या लागतात. ह्यासाठीच तर आपण भाषेचें मानवी जीवनात नेमकें स्थान काय आहे ह्या केवळ तात्त्विक भासणाऱ्या प्रश्नापासून आपल्या शोधाला सुरवात केली. गरजा निश्चित केल्यावर त्यांना धरून मागणी आणि पुरवठा यांचा विकास घडवून आणावा लागतो. उदाहरणार्थ, ऱ्याच विद्यार्थ्यांची गरज विद्यापीठीय शिक्षण नसून तांत्रिक प्रशिक्षण, रोजगार, गृहविद्या ही आहे हें

---

४. विकसित देशांनी आपल्या भावना जपण्यासाठी आपल्याला विकसनशील म्हणावें हें ठीक आहे. आपण मनात काय तें समजून असावें !

एकदा लक्षात आलें की लोकशिक्षण करून या खऱ्या गरजांना अनुसरून मागणीचा विकास करणें आलें आणि उपलब्ध तंत्रज्ञान, मनुष्यबळ, पैसा यांचा ओघ ह्या गरजांच्या दिशेने वळेल अशी तजवीज करणें आलें. तसें केलें नाही तर मानव्य किंवा वाणिज्य महाविद्यालयात जाणें शक्य आहे म्हणून केवळ घाला मुलाला किंवा मुलीला त्याच्यात आणि मुलामुलींचा लोंढा ह्या दिशेने वाहतो आहे म्हणून काढा अधिक महाविद्यालयें ह्या घातचक्रात शिक्षणव्यवस्था सापडते आणि तिला शिक्षण-अनवस्था म्हणण्याची पाळी आपल्यावर येते.

गरजेला धरून मागणी आणि पुरवठा असें तत्त्व आपण एकदा स्वीकारलें की आणखी एक तत्त्व आपल्याला स्वीकारावें लागतें. तें तत्त्व म्हणजे कोणतेंही शैक्षणिक धोरण आखताना आजच्या अडचणीच्या काळातलें अल्पमुदतीचें धोरण कोणतें आणि हा संक्रमणकाळ आपल्या प्रयत्नाने संपल्यावर दूरच्या पल्ल्याचें धोरण कोणतें असा विवेक आजच करणें आणि दोन्ही टप्प्यांवरचीं धोरणें आजच ठरवणें. उदाहरणार्थ निम्नमाध्यमिक स्तरावर इंग्लिश भाषेची तयारी आज कागदोपत्री असलेल्या पाठ्य-क्रमाला धरून होत नाही, बऱ्याचशा विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह पंधराशे शब्दांपर्यंत पोचतच नाही ह्यावर उपाय म्हणून समजा आपण उच्चमाध्यमिक स्तरावर, विशेषतः इयत्ता ११ व १२ साठी, ‘ आजारी ’ विद्यार्थ्यांसाठी रेमीडियल इंग्लिश पाठ्यक्रम योजला. पण तिथे थांबून उपयोगी नाही. रेमीडियल इंग्लिश हा काही कोणत्याही शिक्षणव्यवस्थेचा स्थावर भाग होऊ शकत नाही ! अशा पाठ्यक्रमाची पुढे जरुरी राहू नये ह्यासाठीच्या खटपटीलाही त्याबरोबर लागलें पाहिजे. अर्थात् निम्नमाध्यमिक स्तरावर कसूर झाली तर आम्ही काय करणार, खाऊ दे त्या ‘ आजारी ’ विद्यार्थ्यांना गटांगळ्या असें म्हणून हात झटकण्यापेक्षा रेमीडियल इंग्लिशची सोय उपलब्ध करणें केव्हाही बरें म्हणायला हवें.

इंग्लिश व मराठी यांच्या शिक्षणक्रमातल्या स्थानाविषयी शिफारसी

आतापर्यंत केलेलें विवेचन लक्षात घेतलें तर अल्पमुदतीचें धोरण, दीर्घमुदतीचें धोरण, आणि ह्या धोरणांना राबवण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी सुचवणें असा ह्या शिफारशींचा आटोका राहील हें स्पष्ट व्हावें. ह्या शिफारसी पूर्वप्राथमिक, प्राथ-मिक, निम्नमाध्यमिक, उच्चमाध्यमिक, तांत्रिक, पदवीपूर्व विद्यापीठीय, आणि पद-व्युत्तर विद्यापीठीय अशा शिक्षणाच्या सर्व अवस्थांबद्दल राहतील. तसें करण्याखेरीज गत्यंतर नाही. उदाहरणार्थ उच्चमाध्यमिक अवस्थेत जितपत तयारी होणार तिच्या पायावरच पदवीपूर्व विद्यापीठीय अवस्थेची इमारत उभी राहणार, उलटपक्षी उच्च-माध्यमिक शिक्षणाचा कस वाढवायचा असेल तर त्या अवस्थेवरच्या भावी शिक्षकांची तयारी विद्यापीठीय अवस्थेमध्ये कशी करून घ्यायची इकडे लक्ष पुरवावें लागेल.

तुकड्यांनी केलेलें शैक्षणिक नियोजन तुकड्यांनी केलेल्या शेतीसारखेंच तोट्याचें ठरतें.

ह्या शिफारसींच्या कक्षेत पुढील बाबी येतील. इंग्लिश व मराठी ह्या भाषांना विविध अवस्थांवर शिक्षणाचें माध्यम म्हणून, सामान्य अभ्यासाचा विषय म्हणून (जनरल इंग्लिश, सामान्य मराठी), आणि विशेष अभ्यासाचा विषय म्हणून (स्पेशल इंग्लिश, विशेष मराठी) काय स्थान असावें ? त्याचप्रमाणे इंग्लिश व मराठी वैचारिक व ललित वाङ्मयांना शिक्षणाचें माध्यम म्हणून, सामान्य अभ्यासाचा विषय म्हणून, आणि विशेष अभ्यासाचा विषय म्हणून काय स्थान असावें ? वाङ्मयाचा माध्यम म्हणून विचार करताना दोन पातळींवर तो करावा लागतो. जेव्हा वाङ्मय केवळ भाषेचा सराव होण्यासाठी विद्यार्थ्यांपर्यंत पोचवायचें असतें तेव्हा तें केवळ भाषा शिकवण्याचें साधन म्हणून बनतें. जेव्हा वाङ्मय स्वतःच्या किंवा परकीय संस्कृतीशी जवळीक किंवा जवळून ओळख होण्यासाठी माध्यम म्हणून शिक्षणक्रमात जागा घेतें तेव्हा वाङ्मयाची भाषा सामाजिकतेच्या किंवा सांस्कृतिकतेच्या वळणाने आपलें कार्य करत असते. वैचारिक वाङ्मय त्यातलें त्यात सामाजिकतेचें भान करून देतें, तर ललित वाङ्मयामुळे सांस्कृतिकतेचें भान येणें सुलभ होतें.

ह्या शिफारसी करताना आपल्या अविकसित किंवा अल्पविकसित शिक्षणव्यवस्थेचें अवधान सुटता उपयोगी नाही. (आपण बरा, बेताचा, कमी, फारच कमी कस अशी ढोबळ प्रतवारी केली, पण उत्तम कसाच्या शाळा किंवा महाविद्यालयें असा वर्ग मानण्याची वेळ काही आपल्यावर आली नाही!) मागे आपण शाळांची किंवा महाविद्यालयांची जी वर्गवारी केली ती ह्यासाठी कामी यावी– तिची दखल घेतल्याशिवाय महाराष्ट्रातल्या विकासात जो उंचसखलपणा आहे त्याला न्याय दिला असें म्हणता येणार नाही.

जे प्रश्न ह्या शिफारसींच्या कक्षेबाहेरचे आहेत त्यांची नीट सोडवणूक होणें हेंही अगत्याचें आहे हें उघड आहे. अशा प्रश्नांपैकी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा उल्लेख मागेच केला आहे— विद्यापीठीय शिक्षणाला आपण इतकें महत्त्व देतो की आपण त्याच्या गुणवत्तेकडे पुरेशा गांभीर्याने बघत नाही हा तो प्रश्न. ह्या आणि इतर प्रश्नांमुळे उत्पन्न झालेल्या व्यापक शैक्षणिक अनवस्थेला दूर करण्यासाठी प्रशासकीय, शासकीय, आणि जरूर तर राजकीय पातळीवर निकराने प्रयत्न करायला हवेत. अशा प्रयत्नांशिवाय ह्या शिफारशी राबवून मिळायचें फळ पुरतेपणी पदरात पडणार नाही हा इषारा देणें जरूर आहे.

आता आपण पूर्वप्राथमिक अवस्थेपासून सुरवात करून एकेक अवस्थेचा क्रमाने विचार करू.

पूर्वप्राथमिक शिक्षण : स्वभाषेतून आकार घेणाऱ्या मुख्यतः घरातल्या स्वानुभवाच्या विश्वाचा आणि बाहेरच्या विश्वाचा मैत्रीपूर्ण सांधा जोडून देणें हें पूर्वप्राथमिक

शिक्षणाचें कार्य आपण मागे पाहिलें आहे. तें पाहता इंग्लिश भाषेला ह्या अवस्थेत कोणतेंही स्थान नसावें. ज्या वस्तीमध्ये भाषिक दृष्टीने संमिश्र मुलांना एकत्र शिक्षण देणेंच इष्ट आणि व्यवहार्य आहे, अशा ठिकाणी सुद्धा इंग्लिश माध्यमाच्या पूर्वप्राथमिक शाळा नकोत. अशा ठिकाणी कोणती भाषा माध्यम म्हणून निवडायची ह्या प्रश्नाचें उत्तर त्या ठिकाणचीं मुलें कोणत्या भाषेत एकत्र खेळतात ह्याचा तपास करून ठरवावें लागेल. जी भाषा मुलांना शाळेच्या बाहेर माहीत नाही त्या भाषेचा माध्यम म्हणून वापर करणें हा नुसता बावळटपणा नाही तर सरळ अत्याचार आहे. सामान्यतः मराठी भाषा आणि क्रीडा हींच माध्यमें या अवस्थेत असावींत. भाषा किंवा वाङ्मय विषय म्हणून शिकवण्याचा तर प्रश्नच नाही.

प्राथमिक शिक्षण : प्राथमिक शिक्षणाचें भाषिक माध्यम इंग्लिश नसावें, सामान्यतः प्रादेशिक भाषा मराठी हेंच भाषिक माध्यम असावें. ज्यांची घरातली बोली मराठी नाही अशा मुलांचें काय ? अशा मुलांपैकी आदिवासी मुलांचा प्रश्न इथे विचारात घेतलेला नाही. (त्यासाठी पहा : 'आदिवासींच्या प्रश्नाची भाषिक बाजू '.) दुसरा एक गट म्हणजे जे परभाषी आहेत पण महाराष्ट्रात स्थायिक आहेत अशांची मुलें. अशांपैकी ज्यांची मोठ्या गावांतून बरीच वस्ती आहे अशा लोकांनी स्वभाषा माध्यम असलेल्या शाळा काढलेल्या आहेत– उदाहरणार्थ गुजराती, उर्दू शाळा. इतर ठिकाणी तीं मुलें मराठी शाळांतून जात असतात. ही व्यवस्था ठीक दिसते— फक्त एवढेंच म्हणता येईल की अल्पसंख्य-भाषी प्राथमिक शाळांतून प्रादेशिक भाषेचें म्हणजे महाराष्ट्रात मराठीचेंही विषय म्हणून शिक्षण द्यावें, मराठी शाळांतून जाणाऱ्या अल्पसंख्य– भाषी मुलांच्या भाषिक अडचणींकडे सहानुभूतिपूर्वक विशेष लक्ष द्यावें, आणि अल्पसंख्य– भाषी शाळांतून भाषेखेरीज इतर विषयांच्या अभ्यासाचा दर्जा त्या भाषांमधून शिकवू शकणाऱ्या चांगल्या कसाच्या शिक्षकांच्या अभावी घसरलेला नाही ना याची दक्षता घ्यायला पाहिजे. (उर्दू शाळांच्या शैक्षणिक दर्जाबद्दल अशी शंका पुष्कळदा व्यक्त केली जाते.) लहान मूल वय दोन ते सुमारे सात वर्षे ह्या अवधीमध्ये त्याच्या जन्मभाषेखेरीज इतर भाषाही विनायास शिकून जातें, मात्र त्या भाषेशी मुक्त संपर्क मात्र आला पाहिजे. तसा तो आला तर मुलें अक्षरशः इतर मुलांशी हसता खेळता भांडता ती भाषा शिकतात. (मात्र पूर्व-प्राथमिक शाळेत शिक्षकाने आपल्या तुटपुंज्या इंग्लिशचा मारा मुलावर करणें ह्याला असा मुक्त भाषसंपर्क म्हणून समजता येणार नाही !) भारतासारख्या बहुभाषी देशात स्वभाषेचा अभिमान अवश्य धरावा, पण म्हणून स्वभाषेचा दुरभिमान आणि इतर भाषांबद्दल उदासीनता चांगली नाही. ह्या दृष्टीने महाराष्ट्रांतल्या गुजराती समाजाने समजुतदारपणा दाखवला आहे. अल्पसंख्यांची भाषा, वाङ्मय, संस्कृति आणि प्रादेशिकांची भाषा, वाङ्मय, संस्कृति यांच्यात नुसता संपर्क नव्हे तर देवाणघेवाण व्हायला

पाहिजे. या देवाणघेवाणीचा पाया प्राथमिक शाळेत घालायला पाहिजे.

तिसरा एक गट म्हणजे जे परभाषी आहेत पण महाराष्ट्रात स्थायिक नाहीत, नोकरीधंद्यानिमित्त जे आज महाराष्ट्रात आले आहेत, पण जे उद्या दुसऱ्या प्रदेशात जाऊ शकतील, अशा लोकांची मुलें. पण त्यांचा विचार करण्याअगोदर आपण मागे करून ठेवलेल्या शाळांच्या तीन वर्गांकडे पाहू : (१) संख्या बरीच, कस फारच कमी, (२) संख्या कमी, कस बरा, (३) भाषिक दृष्ट्या संमिश्र, संख्या फार थोडी, कस बरा.

पहिल्या वर्गातल्या प्राथमिक शाळांमधून इंग्लिश भाषेला माध्यम किंवा सामान्य विषय म्हणून स्थान नसावें; मराठी भाषेला माध्यम आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; बालवाङ्मयाला अवांतर वाचन व क्रीडामाध्यम या स्वरूपात भाषेचा आनंद आणि सराव वाढवण्यासाठी म्हणून स्थान असावें. ज्या मुलांच्या घरी मराठीची प्रमाणेतर बोली बोलण्यात येते त्या मुलांकडे विशेष लक्ष पुरवावें, अवांतर वाचनाचें व क्रीडा माध्यमाचें त्यांच्या बाबतीत विशेष महत्त्व राहील.

दुसऱ्या वर्गातल्या प्राथमिक शाळांमधून इंग्लिश व मराठी भाषांना तसेंच स्थान असावें.

तिसऱ्या वर्गातल्या प्राथमिक शाळांमधून इंग्लिश भाषेला इयत्ता ३ व ४ मध्ये आवश्यक विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला आवश्यक विषय म्हणून स्थान असावें. माध्यमाचा प्रश्न मात्र सोपा नाही. घरातली बोली मराठी नाही अशा मुलांपैकी जो तिसरा गट म्हणून आताच सांगितला त्याचा विचार ह्या संदर्भातच करायचा आहे. तो प्रश्न त्या त्या ठिकाणची परिस्थिति पाहून सोडवावा लागेल. मराठी, हिंदी या दोन्हींचा विचार करावा लागेल.

निम्नमाध्यमिक शिक्षण : पहिल्या वर्गातल्या शाळांमधून इंग्लिश भाषेला माध्यम म्हणून स्थान नसावें, ऐच्छिक सामान्य विषय म्हणून असावें; मराठी भाषेला माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. इंग्लिश बालवाङ्मयाला अवांतर वाचन या स्वरूपात भाषेचा आनंद आणि सराव वाढवण्यासाठी म्हणून स्थान असावें. इंग्लिश भाषा थोड्या विद्यार्थ्यांनी घ्यावी, पण शिकवण्याचा कस सुधारावा अशी अपेक्षा आहे. त्यासाठी तिच्या ऐच्छिक निवडीवर मुरड घालावी लागली तरी हरकत नाही.

दुसऱ्या वर्गातल्या शाळांमधून इंग्लिश भाषेला माध्यम म्हणून स्थान नसावें, आवश्यक सामान्य विषय म्हणून असावें; मराठी भाषेला माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. इंग्लिश बालवाङ्मय व किशोरवाङ्मय यांना अवांतर वाचन या स्वरूपात भाषेचा आनंद आणि सराव वाढवण्यासाठी म्हणून स्थान असावें.

तिसऱ्या वर्गातल्या शाळांमधून दोन वर्षे इंग्लिशचा अभ्यास व सराव झालेली मुलें येतील. इंग्लिश भाषेला काही विषयांपुरते आवश्यक माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें.

उच्चमाध्यमिक शिक्षण (इयत्ता ८ ते १० पर्यंत) : पहिल्या वर्गातल्या शाळांमधून इंग्लिश भाषेला माध्यम म्हणून स्थान नसावें, आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. ज्या मुलांनी निम्नमाध्यमिक अवस्थेत इंग्लिश हा ऐच्छिक विषय म्हणून घेतलेला असेल, त्यांच्यासाठी थोडीशी वेगळी सोय पाठ्यक्रमात करावी लागेल. —उदाहरणार्थ इंग्लिश किशोर वाङ्मयावर थोडा अधिक भर द्यावा लागेल. मराठी किशोरवाङ्मय आणि प्रौढवाङ्मय यांना आवश्यक सामान्य विषय म्हणून आणि अवांतर वाचनाच्या रूपाने संस्कारमाध्यम म्हणून स्थान असावें. ह्यासाठी ग्रंथालयांची सध्याची आबाळ थांबवावी लागेल आणि अवांतर वाचन थोडें मुद्दाम करवून घ्यावें लागेल.

दुसऱ्या वर्गातल्या शाळांमधून इंग्लिश भाषेला काही विषयांपुरतें ऐच्छिक माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. इंग्लिश किशोरवाङ्मयाला आवश्यक अवांतर वाचनाच्या रूपाने भाषेचा आनंद व सराव वाढवण्यासाठी स्थान असावें, प्रौढवाङ्मयाला ऐच्छिक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. मराठी प्रौढवाङ्मयाला आवश्यक सामान्य विषय म्हणून आणि अवांतर वाचनाच्या रूपाने संस्कारमाध्यम म्हणून स्थान असावें.

तिसऱ्या वर्गातल्या शाळांमधून इंग्लीश भाषेला काही विषयांपुरतें आवश्यक माध्यय म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला ऐच्छिक विशेष विषय म्हणून स्थान असावें. इंग्लिश प्रौढ वाङ्मयाला आवश्यक सामान्य विषय म्हणून आणि मराठी प्रौढ वाङ्मयाला ऐच्छिक सामान्य विषय म्हणून स्थान असावें.

आतापर्यंतच्या विवेचनात स्वभाषेचें शिक्षणाचें माध्यम म्हणून महत्त्व मान्य केलें असलें तरी शिक्षणाचें माध्यम म्हणून स्वभाषेला पर्याय नाही हें घोषवाक्य स्वीकारलेलें नाही असें दिसून येईल. ज्या ठिकाणी स्वभाषा हेंच माध्यम स्वीकारलेलें असेल त्या ठिकाणी सुद्धा त्या त्या विषयांवर इंग्लिश, हिंदी सारख्या परभाषांतून लिहिलेलीं सोपीं पुस्तकें वाचायला मुलांना उत्तेजन द्यावें, जमलें तर मुलांकडून तीं पद्धतशीरपणे वाचवून घ्यावीं असें वाटतें. असें केलें तर परभाषानैपुण्य तर वाढेलच, पण इंग्लिश, हिंदी ह्यांचा उपयोग केलाच तर वर्गाच्या चार भिंतींच्या आड लुटपुटीचा करायचा असतो अशी भावना विशेषतः पहिल्या प्रकारच्या शाळांतल्या मुलांच्या मनांमधून

आज पक्की रुजलेली दिसते ती नाहीशी व्हायला मदत होईल. आजच्या संपूर्ण इंग्लिश माध्यमाच्या शाळांमधल्या मुलांना मिळणाऱ्या इंग्लिश भाषेचा कस पुष्कळदा बेताचाच असतो, वाङ्मयाचा कस तर निकृष्टही असू शकतो, पण इंग्लिश ही खरोखरी वापरायची भाषा आहे हें मुलांच्या मनावर चांगलें बिंबतें. मला वाटतें की हा फायदा दुसऱ्या आणि काही अंशी पहिल्या वर्गातल्या शाळांमधल्या मुलांनाही मिळवून देणें अवघड नाही. सोव्हिएत यूनियन आणि इतर देशात उच्चमाध्यमिक अवस्थेत इंग्लिश, फ्रेंच, हिंदी ह्या सारख्या परभाषांचा मर्यादित आणि ऐच्छिक माध्यम म्हणून उपयोग करण्याचे प्रयोग चाललेले आहेत. आपल्याकडेही असे प्रयोग चाललेले आहेत. हे प्रयोग आपल्याला समजावून घेतले पाहिजेत.

तांत्रिक प्रशिक्षण : चवथ्या वर्गातल्या शिक्षणसंस्थांतून इंग्लिश भाषेला वाचनाचें आवश्यक माध्यम म्हणून आणि ऐच्छिक सामान्य विषय म्हणून स्थान असावें; मराठी भाषेला माध्यम म्हणून आणि आवश्यक सामान्य विषय म्हणून स्थान असावें. इंग्लिश बालवाङ्मय आणि किशोरवाङ्मय आणि मराठी किशोरवाङ्मय आणि प्रौढवाङ्मय यांना अवांतर वाचनाच्या रूपाने आवश्यक स्थान असावें.

उच्चमाध्यमिक शिक्षण (इयत्ता ११ व १२) आणि पदवीपूर्व विद्यापीठीय शिक्षण ह्या अवस्थेचा विचार करताना आपण मागे करून ठेवलेल्या संबंधित शाळांच्या आणि महाविद्यालयांच्या चार वर्गांकडे पाहू : (५) संख्या बरीच, कस बेताचा, विद्याशाखा मानव्य, विज्ञान, वाणिज्य, (६) संख्या कमी, कस बरा, विद्याशाखा मानव्य, विज्ञान, वाणिज्य, (७) संख्या बेताची, कस बरा, विद्याशाखा विधि, शिक्षण, वृत्तपत्रविद्या, (८) संख्या फार कमी, कस बरा, विद्याशाखा कृषि, वैद्यक, अभियांत्रिकी.

पाचव्या वर्गातल्या संस्थांमधून इंग्लिश भाषेला आवश्यक वाचन–माध्यम म्हणून आणि मराठी भाषेला आवश्यक माध्यम म्हणून स्थान असावें. सहाव्या वर्गातल्या संस्थांमधून इंग्लिश भाषेला आवश्यक वाचन–माध्यम आणि ऐच्छिक अध्यापन–माध्यम आणि परीक्षा–माध्यम म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला ऐच्छिक माध्यम म्हणून स्थान असावें. इंग्लिश वाङ्मयाला मानव्य शाखेतला ऐच्छिक विशेष विषय म्हणून सहाव्या वर्गातल्या संस्थांमधून स्थान असावें. मराठी वाङ्मयाला मानव्य शाखेतला ऐच्छिक विशेष विषय म्हणून पाचव्या आणि सहाव्या वर्गातल्या संस्थांमधून स्थान असावें. सातव्या वर्गातल्या संस्थांमधून इंग्लिश भाषेला आवश्यक वाचन-माध्यम आणि ऐच्छिक अध्यापन–माध्यम आणि परीक्षा–माध्यम म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला ऐच्छिक माध्यम म्हणून स्थान असावें. आठव्या वर्गातल्या कृषि शाखेतल्या संस्थांमधून सातव्या वर्गातल्या संस्थांमधून जशी माध्यमव्यवस्था सुचवली आहे तशीच रहावी. आठव्या वर्गातल्या वैद्यक, अभियांत्रिकी शाखातल्या संस्थांमधून इंग्लिश भाषेला आवश्यक माध्यम म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला पुरवणी

वाचन–माध्यम म्हणून स्थान असावें.

उच्चमाध्यमिक (इयत्ता ११ व १२) या अवस्थेमधल्या पाचव्या व सहाव्या वर्गातल्या संस्थांमधून आवश्यक सामान्य विषय म्हणून पुढील दोन विषयांना स्थान असावें :

व्यावहारिक इंग्लिश
व्यावहारिक मराठी किंवा व्यावहारिक हिंदी

पुढील तीन विषय आवश्यक सामान्य विषय म्हणून उपलब्ध असावे :

इंग्लिश वैचारिक व ललित वाङ्मय
मराठी वैचारिक व ललित वाङ्मय
हिंदी वैचारिक व ललित वाङ्मय

मानव्य शाखेतल्या विद्यार्थ्यांनी या तीन वाङ्मयीन विषयांपैकी कोणतेही दोन विषय निवडावेत. विज्ञान व वाणिज्य शाखेतल्या विद्यार्थ्यांनी यांच्यापैकी कोणताही एक निवडावा.

पदवीपूर्व विद्यापीठीय शिक्षणात पुढील सहा विषयांना सामान्य विषय म्हणून स्थान असावें, प्रत्येक विषयाचा एक वर्षाचा किंवा दोन सत्रांचा पाठ्यक्रम असावा.

इंग्लिश व्यावहारिक
मराठी व्यावहारिक
हिंदी व्यावहारिक
इंग्लिश वैचारिक व ललित वाङ्मय
मराठी वैचारिक व ललित वाङ्मय
हिंदी वैचारिक व ललित वाङ्मय

ह्या सहा विषयांपैकी पहिले तीन विषय संक्रमणकाळापुरतेच असावेत. त्या विषयांची माध्यमिक अवस्थेमध्ये आज होणारी आबाळ काही वर्षांनी थांबली तर मात्र ते ह्या यादीमधून वगळावेत. दुसरें म्हणजे परीक्षेमधल्या यशाच्या दृष्टीने हे सर्व विषय इतर विषयांच्या बरोबरीचे समजावे. मानव्य शाखेतल्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांत ह्यांच्यापैकी दोन विषय पुरे करणें अनिवार्य असावें, मात्र हे दोन विषय एकाच भाषेचे नसावेत आणि ह्या दोनांपैकी किमान एक वाङ्मयाचा असावा. विज्ञान, वाणिज्य, विधि, शिक्षण, आणि कृषि शाखांमधल्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांत ह्यांच्यापैकी दोन विषय पुरे करणें अनिवार्य असावें, मात्र हे दोन विषय एकाच भाषेचे नसावेत. वैद्यक व अभियांत्रिकी शाखांतल्या विद्यार्थ्यांना ह्यांच्यापैकी एक विषय पहिल्या वर्षात पुरा करणें अनिवार्य समजावें.

पदव्युत्तर विद्यापीठीय शिक्षण : मानव्य शाखेत इंग्लिश भाषेला आवश्यक वाचन-माध्यम, ऐच्छिक अध्यापन-माध्यम व परीक्षा-माध्यम, आणि ऐच्छिक विशेष विषय

म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला ऐच्छिक माध्यम, पुरवणी वाचन-माध्यम, ऐच्छिक सामान्य विषय, व ऐच्छिक विशेष विषय म्हणून स्थान असावें. वाणिज्य, शिक्षण, व कृषि शाखेत इंग्लिश भाषेला आवश्यक वाचन–माध्यम व ऐच्छिक अध्यापन–माध्यम व परीक्षा–माध्यम म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला ऐच्छिक माध्यम म्हणून स्थान असावें. विधि, वैद्यक, व अभियांत्रिकी शाखांमधून इंग्लिश भाषेला आवश्यक माध्यम म्हणून स्थान असावें आणि मराठी भाषेला पुरवणी वाचन–माध्यम म्हणून स्थान असावें.

आपल्या वाचन–माध्यम, अध्यापन–माध्यम, व परीक्षा–माध्यम ह्यांबद्दलच्या आणि सामान्य विषय व विशेष विषय ह्यांबद्दलच्या शिफारसी करून झाल्या. त्या शिफारसी एका दृष्टिक्षेपात तालिका १ मध्ये पाहता येतील.

शिफारसींना पूरक अशीं काही स्पष्टीकरणें देणें आवश्यक आहे—

(क) ज्या ठिकाणी इंग्लिश, मराठी, हिंदी वाङ्मयाचा उल्लेख आहे त्या ठिकाणी अभ्यासासाठी निवडायच्या वाङ्मयकृतींमध्ये मूळ त्या त्या भाषेत लिहिलेल्या वाङ्मयकृतींच्या जोडीला त्या त्या भाषेत अनुवादित झालेल्या वाङ्मयकृतींचाही समावेश व्हावा. विशेषतः इंग्लिश वाङ्मयाबरोबर इतर पाश्चात्य भाषांमधून इंग्लिश भाषेमध्ये अनुवादित झालेलें वाङ्मय विचारात घ्यावें, आणि मराठी वाङ्मयाबरोबर इतर भारतीय भाषांमधून मराठी भाषेमध्ये अनुवादित झालेलें वाङ्मय विचारात घ्यावें. (जी गोष्ट मराठीची, तीच हिंदीची समजावी.)

(ख) वाङ्मयाचा सामान्य विषय म्हणून अभ्यास करणें (मग तो आवश्यक असो किंवा ऐच्छिक असो) आणि वाङ्मयाचा विशेष विषय म्हणून अभ्यास करणें (हा साहजिकच ऐच्छिक असणार, मग तो गौण विषय असो किंवा प्रधान विषय असो) ह्यांमध्ये खूपच अंतर आहे. हें अंतर आज ओळखलें गेलेलें दिसत नाही.

सामान्य विषय म्हणून वाङ्मयाचा पाठ्यक्रम आखताना वैचारिक आणि ललित वाङ्मय ह्यांना सारखेंच महत्त्व द्यावें लागेल. जीवनाचा एकंदर संदर्भ आणि आधुनिक मानवी समाजापुढचे प्रश्न (विशेषतः आधुनिक भारतापुढचे प्रश्न) यांची प्रखर जाण सामाजिकतेच्या वळणाने विद्यार्थ्यापर्यंत पोचवणें हें मुख्यतः वैचारिक वाङ्मयाचें कार्य राहील. सांस्कृतिकतेच्या वळणाने विद्यार्थ्याची अभिरुची संपन्न व्हावी आणि त्याची माणसामाणसांतल्या संबंधाविषयी संवेदनक्षमता निकोप रहावी म्हणून ललित वाङ्मयाचा अभ्यास करायचा. साहजिकच गेल्या दोनएकशे वर्षांतल्या वाङ्मयकृतींना अगोदरच्या वाङ्मयकृतींच्या तुलनेने बरेंच अधिक महत्त्व द्यावें लागेल. वाङ्मयाकडे आपण इथे खरें तर शिक्षणाचें माध्यम म्हणून, विद्यार्थ्यावर संस्कार करण्याचें आणि त्याला सुशिक्षित करण्याचें साधन म्हणून आपल्याला पहायचें

तालिका १

शैक्षणिक अवस्था	वर्ग १, ५ मधील संस्था	वर्ग २, ६ मधील संस्था	वर्ग ३ मधील संस्था	वर्ग ४, ७, ८ मधील संस्था
पूर्वप्राथमिक	मा मराठी	मा मराठी	मा संपर्कभाषा	
प्राथमिक	मा मराठी सा मराठी	मा मराठी सा मराठी	मा संपर्कभाषा सा मराठी, इंग्लिश (इ.३,४)	
निम्नमाध्यमिक	मा मराठी सा मराठी, ऐ–इंग्लिश	मा मराठी सा मराठी, इंग्लिश	मा संपर्कभाषा, इंग्लिश सा इंग्लिश, मराठी	
उच्चमाध्यमिक (इ. ८ ते १०) व तांत्रिक प्रशिक्षण	मा मराठी सा मराठी, इंग्लिश	मा मराठी, इंग्लिश सा मराठी, इंग्लिश	मा इंग्लिश, हिंदी सा इंग्लिश वि ऐ–मराठी	मा मराठी, इंग्लिश सा मराठी, ऐ–इंग्लिश
उच्चमाध्यमिक (इ. ११, १२)	मा मराठी, इंग्लिश सा इंग्लिश, मराठी, हिंदी	मा मराठी, इंग्लिश सा इंग्लिश, मराठी, हिंदी		
पदवीपूर्व	मा मराठी, इंग्लिश (वैदयक, अभियांत्रिकी : इंग्लिश, मराठी) सा इंग्लिश, मराठी, हिंदी कोणत्याही दोन (वैदयक, अभियांत्रिकी : कोणतीही एक) वि मराठी वि : मराठी, इंग्लिश			
पदव्युत्तर	मा मराठी, इंग्लिश (वैदयय, अभियांत्रिकी, विधि : इंग्लिश)			

(संक्षेप : मा माध्यम, सा सामान्य विषय, वि विशेष विषय, ऐ ऐच्छिक)

असल्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीपेक्षा आशयाकडे त्याचें अधिक लक्ष वेधावें लागेल. मानव्य, विज्ञान, वाणिज्य इत्यादि शाखांच्या विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा उताऱ्यांची निवड करताना ध्यानात घ्याव्या लागतील. आपल्या विशिष्ट विद्याशाखेपेक्षा निराळ्या विद्याशाखांकडे डोकावून पाहण्यासाठी खिडकी म्हणून वैचारिक उताऱ्यांची निवड काही अंशी करावी लागेल.

विशेष विषय म्हणून वाङ्मयाचा पाठ्यक्रम आखताना ललित वाङ्मय म्हणजेच साहित्य हें केंद्रवर्ती राहील, वैचारिक वाङ्मय त्याला पूरक म्हणून राहील. वाङ्मयाच्या समग्र परंपरेचें भान विद्यार्थ्याला व्हावें या दृष्टीने निरनिराळ्या कालखंडांना जरूर तें महत्त्व द्यावें लागेल. आज विशेष विषय म्हणून इंग्लिशचा किंवा मराठीचा जो शिक्षणाचा कस दिसतो तो खूपच वाढवावा लागेल. बुद्धिमान् विद्यार्थ्याला अर्थविज्ञान, जीवविज्ञान यांसारख्या विषयांच्या तोलाचा विषय म्हणून साहित्याचा अभ्यास हा जाणवला पाहिजे. आज दुर्दैवाने साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान, ललितकला ह्यांची ‘ सॉफ्ट ऑप्शन ’ म्हणून ख्याती आहे. विज्ञान घेऊन उच्चमाध्यमिक शिक्षण पुरें करणाऱ्या पण व्यावसायिक विद्याशाखांकडे जागेअभावी जाऊ न शकणाऱ्या हुषार विद्यार्थ्यांना ह्या मानव्य शाखेतल्या विषयांकडे वळवणें हिताचें होईल. विद्यार्थी बेताच्या कसाचे म्हणून अध्यापक बेताच्या कसाचे (किंवा चांगल्या कसाचे असून आळसावलेले) आणि अध्यापकांची प्रतिमा उतरलेली म्हणून बेताच्या कसाचे विद्यार्थीच इकडे वळणें ह्या घातचक्रातून या विषयांची सुटका झाली नाही तर त्या विषयांचें ‘ व्यापारी भवितव्य ’ देखील धोक्यात आहे !

(ग) सामाजिकता आणि सांस्कृतिकता यांच्याखेरीज उपयुक्तता ही पातळी भाषेच्या कार्याला आहे. विद्यार्थीदशेत (आणि पुढेही) ज्ञानग्रहण प्रभावीपणे करता यावें, शिक्षण पुरें करून व्यवसायात पडल्यानंतर व्यावसायिक दळणवळ प्रभावीपणे करता यावें, आणि आपापल्या विशिष्ट विषयाचें नवनवें ज्ञान आकर्षक रीतीने इतरांपर्यंत जरूर तेवढें पोचवण्याची सामाजिक जबाबदारी पाळता यावी म्हणून इंग्लिश आणि मराठी ह्यांचा सामान्य-भाषा-विषय म्हणून समावेश केला आहे. व्यावहारिक इंग्लिश किंवा मराठी यांचें हेंच प्रयोजन राहील. ज्यांनी विद्यापीठीय शिक्षणासाठी मराठी माध्यम निवडलें आहे त्यांनाही वाचन–माध्यम म्हणून व्यावहारिक इंग्लिशची जरुरी आहे. ज्यांनी इंग्लिश माध्यम निवडलें आहे त्यांनाही पुरवणी वाचन–माध्यम म्हणून आणि व्यावसायिक संज्ञापन आणि लोकशिक्षणासाठी संज्ञापन करण्याचें माध्यम म्हणून व्यावहारिक मराठीची जरुरी आहे.

आता हें इंग्लिशचें किंवा मराठीचें आवश्यक व्यावहारिक ज्ञान विद्यापीठीय शिक्षणासाठी पात्र असणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना उच्चमाध्यमिक अवस्थेपर्यंत मिळणें जरूर आहे. (आवश्यक ज्ञान म्हणजे कामचलाऊ इंग्लिश किंवा कामचलाऊ

मराठी नव्हे ह्याची फिरून एकदा आठवण करून देतो.) उदाहरणार्थ विज्ञानाच्या विद्यार्थ्यांचा विचार करू. विज्ञानाची प्रमुख भाषा आहे गणित, ती ना इंग्लिश आहे ना मराठी. पण त्याचबरोबर विज्ञानामधल्या मूलभूत संकल्पना गणिताच्या भाषेत रुळवण्याअगोदर त्यांचा दुवा अनुभवाशी जुळणें अत्यावश्यक आहे. निराळ्या शब्दात सांगायचें तर महत्त्वाच्या पारिभाषिक संज्ञांचे अर्थ काही अंशी नेहमीच्या साध्या इंग्लिशमध्ये किंवा साध्या मराठीमध्ये समजून घेण्याची आणि समजावून देण्याची कुवत विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांच्या (आणि त्यांच्यापैकीच्या भावी अध्यापकांच्या) अंगी यायला पाहिजे. ती तशी आली नाही आणि स्वानुभवाशी भाषिक दुवा जुळला नाही तर विज्ञानाचा सामान्य विद्यार्थी आणि प्रयोगशाळेतली उपकरणें कसबीपणें हाताळणारा तिथला शिपाई ह्यांच्यात तत्त्वतः फरक राहणार नाही. (कदाचित् हा फरक आजच पुसला गेला आहे असें कठोरपणें म्हणावें लागेल.) विशेष हुषार विद्यार्थ्याची स्थिति इतकी वाईट नसते, पण तो आणि विज्ञानाचें जरूर तेवढें गणित पढवलेलें गणकयंत्र यांची बरोबरी होऊ लागते. पढवलेलें ज्ञान तो वापरू शकतो, पण नवीन ज्ञान तो पैदा करू शकत नाही. परप्रांतातील किंवा परदेशातील वैज्ञानिकाशी तो नव्या ज्ञानाची देवाणघेवाण करू शकत नाही. त्याचें भावी संशोधन परभृत आणि प्रतिक्रियात्मक राहतें; 'फॉरिन कोलॅबोरेशन'च्या विळख्यातून तो सुटत नाही; आणि बौद्धिक स्वराज्य मग दूरच राहतें. हीच स्थिति कमी अधिक प्रमाणात गणित, अर्थविज्ञान इत्यादि विषयांची आहे. (गणित विषय म्हणजे विज्ञान नव्हे हें एव्हाना लक्षात यावें.)

भाषांचें व्यावहारिक ज्ञान उच्चमाध्यमिक अवस्थेपर्यंत मिळून गेलेलें आहे अशी आज खात्री देता येत नाही. म्हणून असें ज्ञान ज्यांना मिळालेलें नाही तेवढ्या विद्यार्थ्यांना ते पदवीपूर्व अवस्थेमध्ये मिळवून देण्याची सोय करणें ह्या संक्रमणकाळात आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणें अयोग्य आहे. (आय. आय. टी. मधल्या निवडक विद्यार्थ्यांसाठी सुद्धा आज व्यावहारिक इंग्लिशचे पाठ्यक्रम उपलब्ध केलेले आहे. पण तें शहाणपण अजून महाराष्ट्रातल्या विद्यापीठांना येत नाही!) अर्थात् अशी सोय करायची तर त्यांना थोडा अधिक ताण पडणार यात संशय नाही. नाही तरी शाळेतलें गणित, शाळेतलें विज्ञान फार कमी पडत असल्यामुळे विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्याला इयत्ता ११, १२ आणि पदवीपूर्व पहिलें वर्ष या कालावधीमध्ये खूपच ताण सोसावा लागतोच ना! हा जादा ताण – मग तो गणित, विज्ञान यांसाठी असो किंवा भाषांसाठी असो – ही देशाच्या विकासासाठी द्यावी लागणारी अटळ किंमत आहे. गरजांची हेळसांड न करता तो ताण कमी कसा करता येईल, सुसह्य कसा करता येईल याची फिकीर आपण जरूर करावी. परंतु हा ताण अजिबात टाळता येईल या भ्रमात आपण राहू नये, विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या

पालकांना ठेवू नये.

भाषेचें व्यावहारिक ज्ञान कमी अधिक असू शकतें. त्यामुळे भाषेचा तपशिल्वार पाठ्यक्रम निश्चित करण्याअगोदर ही भाषिक नैपुण्याची प्रतवारी ठरवावी लागते. कामचलाऊ नैपुण्य, बऱ्यापैकी नैपुण्य अशी मोघम शब्दयोजना न करता पुढीलप्रमाणे पारिभाषिक शब्दयोजना करता येईल :

प्रारंभिक १ : प्रवासातल्या किंवा दैनंदिन जीवनातल्या साध्या निकडीच्या गरजा भागवता येणें व शिष्टाचारातले प्राथमिक उपचार पाळता येणें. मुद्दाम सोप्या भाषेत लिहिलेला मजकूर किंवा सार्वजनिक पाट्या, पत्रावरचे पत्ते, मालावरचीं लेबलें इत्यादि वाचता येणें; चुकतमाकत आणि चाचरत का होईना हे सगळे व्यवहार करता येणें.

प्रारंभिक २ : दैनंदिन जीवनातल्या नेहमीच्या गरजा भागवता येणें, सामान्य सामाजिक व्यवहार करता येणें, कामावरच्या सहकाऱ्यांशी कामाबद्दल जरुरीपुरतें बोलता येणें, साधा निरोप सांगता येणें, ह्या सगळ्या गोष्टींना अनुलक्षून सोपा मजकूर वाचता येणें (उदाहरणार्थ नोटिसा, रोजच्या बातम्या, संवाद, गोष्टी) आणि लिहिता येणें (उदाहरणार्थ चिठ्ठी, साधी हकिगत किंवा तक्रार); अडखळत, कोशाचा आधार घेत, समोरच्या माणसाला थोडें हळू बोला अशी विनंती करत का होईना हे सगळे व्यवहार करता येणें.

माध्यमिक : एखाद्या प्रसंगाचें किंवा घटनेचें स्वतंत्रपणे वर्णन किंवा कथन करणें, दुसऱ्याचा मुद्दा समजून घेणें आणि आपला मुद्दा दुसऱ्याला पटवण्याचा प्रयत्न करणें, कामापलीकडच्या गप्पाटप्पा किंवा साध्या चर्चा यात बऱ्यापैकी भाग घेता येणें, ह्या सगळ्या गोष्टींना अनुलक्षून सोपें विवेचन वाचता येणें आणि एखादा प्रसंग किंवा अडचण लिहून कळवता येणें, फॉर्म भरता येणें, नोकरीसाठी वा रजेसाठी अर्ज करता येणें; विशिष्ट क्षेत्रापुरते का होईना पण फारशा चुका न करता बऱ्यापैकी आत्मविश्वासाने हे सगळे व्यवहार करता येणें.

प्रगत १ : सामान्य व्यवहारातले (उदाहरणार्थ थट्टामस्करी, वादावादी, उपदेश) आणि साहित्य, विज्ञान, वाणिज्य, विधि, वृत्तपत्रविद्या, ललितकला अशा विशिष्ट क्षेत्रातले (उदाहरणार्थ एखादया मुद्दयाचें साधकबाधक विवेचन) सर्व पातळीवरचे व्यवहार श्रोता, वक्ता, वाचक, लेखक हया भूमिकांतून हाताळणें, अनौपचारिक पातळीवर दुभाष्याचें किंवा काम भागवण्याइतपत भाषांतरकाराचें काम करणें; मुलाखत घेणें–देणें; भाषेवर स्वतःची छाप न उठवता का होईना पण चुका जवळजवळ टाळून आणि नेमकेपणाने, बारकाव्यांसहित हे सगळे व्यवहार पार पाडता येणें.

प्रगत २ : स्वतःच्या क्षेत्रातले सगळे व्यवहार आणि इतरांच्या क्षेत्रातले निदान माध्यमिक पातळीपर्यंतचे व्यवहार हाताळणें, दुभाष्याचें किंवा भाषांतरकाराचें काम

सफाईने करणें; सुशिक्षित प्रौढ माणसाच्या आत्मविश्वासाने आणि कौशल्याने हे सगळे व्यवहार करता येणें.

ह्या कसोट्या वापरल्या तर आतापर्यंतच्या भाषाविषयक शिफारसींना अधिक नेमकेपणा आणता येईल. (तो कसा आणता येईल यासाठी पहा : तालिका २. तालिकेत मराठी परभाषा दाखवली आहे तो स्तंभ हिंदी परभाषा यासाठी सुद्धा लावता येईल.)

तालिका २

शैक्षणिक अवस्था	मराठी स्वभाषा	मराठी परभाषा	इंग्लिश कमी महत्त्वाकांक्षी	इंग्लिश अधिक महत्त्वाकांक्षी
पूर्वप्राथमिक	क्रीडामाध्यम	—	—	—
प्राथमिक	प्रा १, २	प्रा १	—	प्रा १
निम्नमाध्यमिक	मा	प्रा २	प्रा १, २	प्रा २, मा
उच्चमाध्यमिक (इयत्ता ८ ते १०) किंवा यांत्रिक प्रशिक्षण	प्र १	मा (ऐच्छिक)	मा	प्र १
उच्चमाध्यमिक (इयत्ता ११, १२) किंवा पदवीपूर्व (सामान्य विषय म्हणून)	प्र २	प्र १ (ऐच्छिक)	प्र १	प्र २
पदवीपूर्व किंवा पदव्युत्तर (विशेष विषय म्हणून)	—	—	प्र २	—

(संक्षेप : प्रा प्रारंभिक नैपुण्यें, मा माध्यमिक नैपुण्य, प्र प्रगत नैपुण्यें; भाषा-नैपुण्य हा शिक्षणक्रमाचा भाग नसेल तिथे केवळ — अशी खूण केली आहे.)

(घ) ह्या शिफारसी परिणामकारक रीतीने राबवायच्या तर त्यासाठी एक पूर्व-तयारीचा कार्यक्रम पद्धतशीरपणे हाती घ्यावा लागेल. ह्या पूर्वतयारीच्या कार्यक्रमात पुढील गोष्टी हाती घ्यावा लागतील–

तपशिलवार आणि निश्चित असा पाठ्यक्रम आखणें (अमूक इतकें भाषिक किंवा वाङ्मयीन नैपुण्य प्राप्त व्हावें म्हणून अमूक अमूक गोष्टी अमूक पात्रता आणि पूर्वतयारी असलेल्या शिक्षकाकडून अमूक पात्रता आणि पूर्वतयारी असलेल्या विद्यार्थ्यांने अमूक वेळ देऊन अमूक कालावधीत शिकणें).

अशा पाठ्यक्रमाला धरून नित्य वापरायचीं क्रमिक पाठ्यपुस्तकें आणि नैमित्तिक वापरायचीं संदर्भपुस्तकें नव्याने तयार करणें किंवा तयार असतील तिथे तीं निवडून घेणें (त्यासाठी भाषा, वाङ्मय, आणि शिक्षण ह्यांमधल्या तज्ज्ञांबरोबर विविध विद्याशाखांमधल्या अनुभवी अध्यापकांची मदत घ्यावी लागेल).

असा पाठ्यक्रम शिकण्यासाठी सध्याच्या शिक्षकांची किंवा प्राध्यापकांची किमान वेळात पूर्वतयारी करून घेणें (त्यासाठी चर्चासत्रें, लघु वा दीर्घ अभ्यासक्रम योजणें).

असा पाठ्यक्रम योग्य त्या नैपुण्याने हाताळू शकतील असे शिक्षक भावी काळात मिळत रहावे ह्यासाठी प्रशिक्षणाच्या किंवा विद्यापीठाच्या पातळीवर योग्य ते पाठ्यक्रम योजणें (उदाहरणार्थ व्यावहारिक मराठीचा किंवा नव्या धरतीवरचा सामान्य मराठी वाङ्मयाचा पाठ्यक्रम शिकवता येईल अशी विशेष मराठीच्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेणें).

अशा पूर्वतयारीच्या अभावी घिसाडघाई केल्यास शिफारसी राबवण्यापासून अपेक्षित असलेलें फल मिळणार नाही आणि ज्यांना नवीन काहीच नको असतें अशा 'जैसे थे' वाद्यांना रान मोकळें सापडेल. एकदा शिफारसी क्रमाने अमलात आणल्यावर येणारा अनुभव जमेला धरून स्वीकारलेल्या धोरणात इष्ट ते थोडे बदल करावे लागतील. मात्र धोरणें नुसतीं कागदोपत्री राहू नयेत. मनुष्यबळ आणि सामग्री ह्यांची अडचण असेल तेथे बदलाची गति साहजिकच धिमी करावी लागेल. पण कागदोपत्री झपाट्याने नव्या गोष्टी आणायच्या आणि प्रत्यक्षात जुनी वहिवाट चालवायची (आजही तर्खडकरांची **भाषांतरपाठमाला** वापरणारे शिक्षक आहेत) ही भारतीयांची सवय मात्र फारच वाईट. (आम्ही पुराणातलीं वांगीं पुराणातच ठेवण्यात पटाईत आहोत, मग ती वांगीं जुन्या पुराणांतलीं असोत किंवा नव्या पोथ्यांतलीं असोत.)

ह्या पूर्वतयारीचा भाग म्हणून एक तुलनेने सोपी उपाययोजना करता येईल. ('तुलनेने' शब्द महत्त्वाचा. तशी कोणतीही उपाययोजना प्रभावी असली तर सोपी नसते आणि सोपी असली तर प्रभावी नसते!) आज माध्यमिक शाळेत (इयत्ता ५ ते १०) विज्ञान विषय शिकवणाऱ्या शिक्षकाने पदवी-परीक्षेला विज्ञान

आणि शिक्षक म्हणून प्रशिक्षण घेताना विज्ञानशिक्षण हे विषय घेतलेले असावेत अशी अपेक्षा असते. उलट मराठी विषय कुणीही शिकवावा, त्याला मराठीची पदवी असो-नसो अशी स्थिति आहे. हळूहळू इंग्लिश विषयही त्याच 'पोरक्या' विषयांच्या पंक्तीला येऊन बसत आहे. 'भाषा बचाओ' असें जर वाटत असेल तर किमानपक्षी हा भयानक प्रकार थांबवला पाहिजे. त्यासाठी ह्या भाषा घेऊन पदवी घेणारांना आर्थिक उत्तेजन द्यायला पाहिजे. आंध्रप्रदेश–सरकारने तेलुगु, उर्दू, मराठी या भाषांबाबत असा उपक्रम केला आहे. पदवीसाठी या भाषांचा विशेष अभ्यास करणाराना सरकार शिष्यवृत्त्या देतें आणि शाळेत ह्या भाषा शिकवणाऱ्या शिक्षकाला अशी पदवी अनिवार्य केली आहे. हा उपक्रम मला अनुकरणीय वाटतो आणि तो इंग्लिश, मराठी, हिंदी ह्या भाषांसाठी राबवता येईल. (पदवी परीक्षेला विशेष विषय म्हणून मराठी घेणारांची आजची फारच रोडावलेली संख्या त्यामुळे सुधारेल हा एक आनुषंगिक फायदा म्हणता येईल.) मराठीचें शालेय शिक्षण सुधारावें म्हणून आंध्र-प्रदेश–सरकार जेवढी रक्कम खर्च करतें तेवढी सुद्धा महाराष्ट्र–सरकारने करू नये ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

(ङ) ह्या शिफारसी मांडताना भारतामधल्या शिक्षणसंस्था कमी अधिक अविकसित आहेत याची सतत जाणीव ठेवली आहे. त्यासाठी शाळांची आणि महाविद्यालयांची वर्गवारीही केली आहे. साहजिक एक प्रश्न मनात उभा राहील की ही वर्गवारीची घंटा कुणी गळयात बांधायची? शाळांची वर्ग १ किंवा २ आणि मानव्य-विज्ञान–वाणिज्य कनिष्ठ किंवा विद्यापीठीय महाविद्यालयांची वर्ग ५ किंवा ६ अशी वाटणी कुणी करायची? आज उपाहारगृहांची ए–बी–सी किंवा होटेलांची एक ते पाच तारांकित अशी वाटणी मंडळी निमूटपणे ऐकून घेतात. शिक्षणसंस्थांची अशी वाटणी प्रत्यक्षात आहे हें विद्यार्थी, पालक, शिक्षकवर्ग ह्या सगळयांना मनोमन ठाऊक आहे, पण तशी उघड वाटणी करून घ्यायला शिक्षणसंस्था तयार होणार नाहीत. उपाहारगृहें किंवा होटेलें बोलून चालून व्यापारी संस्था आहेत. शिक्षणसंस्था बोलून चालून व्यापारी संस्था आहेत असें महाराष्ट्रात तरी कोण म्हणायला धजेल?

ह्या पेचातून दोन तऱ्हांनी वाट काढता येईल. एक म्हणजे अशी वाटणी कागदो-पत्री करायची जरूर नाही. मात्र शिक्षणसंस्थांच्या चालकांनी जी गोष्ट ते मनात ओळखून असतात तिला धरून कृति करायची, अंथरूण पाहून पाय पसरायचे. नियमांची जागा निकोप अशा संकेतांनी, स्वतःवरच घालून घेतलेल्या बंधनांनी घ्यायची. दुसरी वाट म्हणजे आज ज्याप्रमाणे विद्यापीठ हें आपल्या कक्षेमधल्या महाविद्यालयांना केवळ सामान्य मान्यता देऊन किंवा नाकारून थांबत नाही, तर विशिष्ट निकषांनुसार विशिष्ट विषय शिकवायला मान्यता देतें किंवा नाकारतें त्याप्रमाणे ही लोकशाहीला अनुरूप अशी पद्धति विषयांप्रमाणे माध्यमांनाही लागू करावी आणि महाविद्यालयां-

प्रमाणे शाळांनाही लागू करावी. शाळांना मान्यता अर्थात् माध्यमिक-शिक्षणमंडळें देतील, किंवा यासाठी लोकसेवा-आयोगाच्या धरतीवर एक स्वतंत्र स्थायी आयोग नेमावा. (मात्र त्याच्या कामाची गति लोकसेवा–आयोगाच्या सध्याच्या गतीपेक्षा बरी असावी!) ह्या तरतुदीमध्ये दुसराही एक फायदा करून घेता येईल. अमूक उच्चमाध्यमिक शाळेने अमूक भाषा माध्यम किंवा विषय म्हणून ठेवण्यासाठी मान्यता मागितली, की त्या अर्जाची छाननी करण्यासाठी जी चौकशीसमिति नेमायची त्यात विद्यापीठीय स्तरावरचेही तज्ज्ञ समाविष्ट असावे. (आज विद्यापीठें स्वतःच्या प्रवेश-चाचण्या घेऊन शकत नाहीत, तसें करण्यात अडचणीही आहेत. निदान त्यांना उच्चमाध्यमिक शाळांचा कस सुधारायला पाहिजे असा आग्रह धरता यावा हा ह्या सूचनेमागचा हेतु आहे.) ह्या समितीने संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ते-बरोबर स्थानिक गरजांचाही विचार करावा.

(च) उच्चमाध्यमिक आणि मुख्यतः पदवीपूर्व विद्यापीठीय शिक्षण ह्या अवस्थेत इंग्लिश वैचारिक आणि ललित वाङ्मयाला मी संस्कारमाध्यम म्हणून मानलें आहे. इंग्लिश भाषेखेरीज इतर विदेशी भाषांचें महत्त्व मी अगोदरच मानलें आहे आणि इंग्लिशमध्ये अनुवादित वाङ्मयाचा समावेश करावा असें यासाठीच म्हटलें आहे. असें जरी असलें तरी इंग्लिश ललित वाङ्मय (विशेषतः काव्य) आणि इंग्लिश वैचारिक वाङ्मय (विशेषतः समाजसमीक्षा आणि संस्कृतिसमीक्षा) ह्यांना मी विशेष मानतो हें मला कबूल केलें पाहिजे.

जगाच्या इतिहासात निरनिराळ्या समाजांची सर्जक प्रतिभा विशिष्ट क्षेत्रात केंद्रित झाल्याचें दिसून येतें. उदाहरणार्थ भौतिक विज्ञान, तत्त्वज्ञान, आणि संगीत ह्या क्षेत्रात जर्मनांची; कायदा आणि राज्यकारभार ह्या क्षेत्रात प्राचीन रोमनांची. इंग्लिश भाषीयांची सर्जक प्रतिभा ललित वाङ्मय (विशेषतः काव्य), नाट्य, विनोद (गद्य, काव्य, चित्र, चित्रपट), समाज आणि संस्कृति यांची सतत जागृत समीक्षा ह्या क्षेत्रात दिसून येते. वाङ्मयाच्या रूपाने तिचा फायदा आपल्या सुशिक्षित होऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्याला मिळत राहणें हें आधुनिक भारताच्या उभारणीसाठी उपकारक ठरलें आहे आणि यापुढेही तें ठरावें.

मराठी भाषा व वाङ्मय यांना महत्त्व द्यायला नको असें मी म्हणत नाही. पण मराठी बचाओ म्हणजे अंग्रेजी हटाओ ह्या समीकरणाला माझा निकराचा विरोध आहे. त्यासाठी मी बंगाली समाजाचें उदाहरण मागे दिलेलेंच आहे.

आधुनिक भारतामधल्या प्रादेशिक समाजांची (ज्यांत मराठी समाजही आला) सर्जक प्रतिभा कोणकोणत्या क्षेत्रात दिसणार आहे हा एक उत्सुक अशा कुतूहलाच विषय राहील. प्रादेशिक भाषांमधून जीवनाची कोणतीं नवीं दालने खुलीं होतील हें यातून ठरायचें आहे.

समारोप

भाषेचें मानवी जीवनात कोणतें स्थान आहे हा प्रश्न आपण प्रथम विचारला. नंतर इंग्लिश भाषेचें भारताच्या जीवनात आणि मराठी भाषेचें महाराष्ट्राच्या जीवनात कोणतें स्थान आहे ह्याची पाहणी केली. हें करताना भाषेबरोबरच तिच्यामधल्या वैचारिक आणि ललित वाङ्मयाचीही दखल घेतली.

नंतर आपला दुसरा ध्रुव शिक्षण याच्याकडे आपण वळलो. शिक्षणाच्या क्रमाने कोणत्या अवस्था आहेत आणि त्यांच्या भाषिक गरजा कोणत्या आहेत ह्यांच्याकडे दृष्टिक्षेप केल्यानंतर महाराष्ट्रातल्या शिक्षणव्यवस्थेचा आणि प्रत्यक्ष शैक्षणिक व्यवहाराचा त्यामधल्या उणिवांसकट आढावा आपण घेतला. अशा ह्या परिस्थितीत कोणत्याही सुधारणा करताना कोणत्या अडचणी येतील आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी कोणती सावधगिरी बाळगावी लागेल याची आपण स्वतःला आठवण करून दिली.

शेवटच्या छेदकात इंग्लिश व मराठी भाषा आणि वाङ्मय यांचें महाराष्ट्राच्या शिक्षणव्यवस्थेत माध्यम म्हणून आणि अभ्यासाचा विषय म्हणून कोणतें स्थान रहावें आणि तें स्थान मिळवून देण्यासाठी काय काय करावें ह्याचा ऊहापोह शिफारसींच्या रूपाने केला. शिफारसींचें समर्थन सर्वच निबंधभर जागजागी अनुस्यूत आहे. (शिवाय 'भारताचे भाषिक प्रश्न' आणि 'भाषा आणि शिक्षण' हे निबंधही पहावेत.) ह्या शिफारसी सरधोपट न राहता लवचीक आणि बहुमुखी राहिल्या आहेत हें खरें. पण हा त्यांचा दोष आहे असें मी मानत नाही. तो दोन्ही डगरीवर हात ठेवण्याचा प्रयत्न नसून परिस्थितीची जटिलता आणि अनेकविधता ओळखण्याचा प्रयत्न आहे.

ताजा कलम

मागे पृष्ठ ११४ वरच्या तळटिपेत गांधी आणि रवींद्रनाथ ठाकुर यांच्यामधल्या मतभेदाचा निर्देश केलेला आहे. त्यासंबंधी संदर्भ : R. V. Prabhu & Ravindra Kelekar (compilers & editors). Truth called them differently : Tagore–Gandhi controversy. Ahmedabad : Navajivan, 1961.

राजभाषा मराठीचा वाद

पूर्वपीठिका

यादवकाळात महाराष्ट्राची राजभाषा मराठी होती. त्यानंतर बहामनी राज्य आणि त्याच्या विघटनामधून उत्पन्न झालेली निजामशाही आणि आदिलशाही राज्यें यांमधून फार्सी ही राजभाषा झाली. मराठी आणि दखनी-उर्दू ह्या भारतीय-आर्य भाषा-कुलामधल्या भाषा काही अंशी वापरल्या गेल्या तरी त्यांमधून राज्यकारभार आणि न्यायव्यवहार ह्यांसाठी फार्सीमधून आयात केलेल्या शब्दांचा भरणा अतिशय वाढला. मुगल बादशाहीच्या विघटनामधून नंतर उत्पन्न झालेल्या आणि महाराष्ट्राचा बराच भाग व्यापून असणाऱ्या आसफजाही राज्यात म्हणजे निजामीत तीच स्थिति राहिली. अरबी शब्दांचा वेगळा उल्लेख केला नाही, कारण अरबी शब्द फार्सीमार्फतच आल्याचें दिसतें. तडक अरबीमधून कागद तर फार्सीमार्फत कागज़ अशा जोड्या फार तुरळक आहेत. मराठेशाहीच्या स्थापनेच्या वेळेलाच शिवाजीने मराठी राजभाषा म्हणून आणण्याचा उपक्रम केला. रघुनाथ नारायण हणमंते ह्याच्याकडून ' राजव्यवहारकोश ' हा पारिभाषिक फार्सी-संस्कृत कोश करवून घेतला. त्याचा परिणाम म्हणून राज्यकारभारातील मराठीमधील फार्सी शब्दांचें प्रमाण बरेंच घटल्याचें दिसून येतें.[1] हा प्रयत्न संस्कृतवर जादा भिस्त ठेवल्याने फसला आणि मराठीतून राज्यकारभारविषयक असे फार्सीमधून आलेले शब्द जसेच्या तसे राहिले अशी एक समजूत दिसते ती बरोबर नाही. फार्सी शब्द घटले म्हणजे हद्दपार झाले असें अर्थातच नाही. संस्कृतमधून घेतलेले तत्सम शब्द आणि संक्रुतप्रचुर भाषा ही कोणत्याही प्रौढ कामाला योग्य आणि साधी, तद्भव शब्द आणि देशी शब्द ह्यांच्यावर विसंबणारी

१. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासासाचीं साधनें, खंड ८, कोल्हापुरः ग्रंथ-माला, १९०३, प्रस्तावना (संकलनः राजवाडे, ऐतिहासिक प्रस्तावना, पुणेः चित्रशाळा, १९२८, पृ. ३६८-४५०, पैकी पृ. ३८३–४ पहा). १६२८, १६७७, १७२८ मधल्या तीन उताऱ्यांत फार्सी शब्द अनुक्रमे ८५.६, ३७.८, ६.३ टक्के आहेत.

भाषा ही प्राकृतजनांसाठी योग्य असा त्या वेळचा हिशोब होता. मोरोपंतांनी पहिल्या शैलीत महाभारत जसें लिहिलें तसें दुसऱ्या शैलीत मुलीबाळींसाठी सीतागीत, सावित्रीगीत हीं लिहिलीं. शिवाजीपेक्षा संभाजीचें शिक्षण अधिक स्वस्थतेने झालेलें असल्यामुळे त्याचा ओढा संस्कृताकडे अधिक दिसतो. राज्यकारभार हें अर्थात् प्रौढ कार्य गणलें जात असे. आजही हा हिशोब आपल्या मनातून पूर्णतः गेलेला नाही. लोकशाहीमध्ये राज्य हें प्राकृतजनांसाठी असतें हा नवीन तपशील मात्र प्रस्थापित होत आहे. आजच्या काळच्या कल्पना त्या काळातील घटनांचा अन्वयार्थ लावताना जपूनच लावल्या पाहिजेत. ब्रिटिश राजवट आल्यानंतर साधारणतः जिल्हा-पातळी-पर्यंतचा राज्यकारभार प्रादेशिक भाषेमध्ये आणि प्रांतिक आणि अखिल-भारतीय पातळीवरचा कारभार इंग्लिशमध्ये ही वाटणी राज्यकर्त्यांनी केली. राज्यकारभारातल्या मराठीमध्ये इंग्लिश शब्द बरेच शिरले. न्यायव्यवहारात मात्र फार्सीमधून आलेल्या व आतापर्यंत टिकून राहिलेल्या शब्दांचें स्थान कायम राहिलें. महाराष्ट्रातल्या संस्थानांत हीच संस्कृत–फार्सी–इंग्लिश शब्दांचा उपयोग करणारी मराठी भाषा राज्यकारभारासाठी सामान्यतः वापरली जात असे. जंजिरा संस्थानात कदाचित् वेगळी स्थिति असू शकेल. निजामीबद्दल पूर्वी सांगितलेंच आहे.

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळालें. स्वातंत्र्यचळवळीच्या ओघात भाषावार प्रांतरचना आणि देशी भाषांचा राज्यकारभारात उपयोग हे विचार पुढे आले होते. माधव ज्यूलियन ह्यांच्या मराठी भाषेच्या गौरवगीतात "जरी आज ती राजभाषा नसे" ह्या शब्दांत व्यक्त केलेली खंत आणि सूचित केलेली उमेद ह्या विचारांच्या संदर्भातच उमजते. फार काय 'राजव्यवहारकोश' १८६०, १८८० साली छापून काढणाऱ्या संपादकांच्या मनांतही अशीच काही ऊर्मी दिसते. मात्र ह्या दोन्ही विचारांना प्रत्यक्षात आणण्याचा प्रश्न येताच त्यांना छेद देणारे इतर विचार आणि इतर प्रवृत्ति (उदाहरणार्थ आळस, हातातला ससा सोडण्याचा पारध्याने केलेला कंटाळा) पुढे आल्या. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य आजच्या स्वरूपात स्थापन झालें आणि मराठी ही राज्यपातळीवर (म्हणजे पूर्वीच्या भाषेत प्रांतिक पातळीवर) राजभाषा म्हणून मान्य होण्याच्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली. (जाताजाता या ठिकाणी एक नोंद केली पाहिजे. १९५३ ते १९५६ या काळात जुन्या द्वैभाषिक मध्यप्रदेशात मराठी आणि हिंदी यांचा राजभाषा म्हणून उपयोग जारी झालेला होता.)

प्रश्नाला चालना मिळाली आणि उत्तरें शोधताना फाटे फुटले. मराठी ही राज-भाषा म्हणून खरोखरीच करावी का हा पहिला प्रश्न आणि त्याचें उत्तर होकारार्थी आल्यास ती राजभाषा कशी असावी, कशी नसावी हा दुसरा प्रश्न. दुसऱ्या प्रश्नाचीं दोन उत्तरें मिळालीं—ती संस्कृत आणि संस्कृतप्रचुर हिंदीकडे झुकलेली असावी हें

एक उत्तर, आणि राजभाषा मराठीने आपलें देशी मराठी वळण सोडू नये हें दुसरें उत्तर. एकूण हिशोबात इंग्लिशधार्जिणा, संस्कृतधार्जिणा, आणि मराठमोळाधार्जिणा असे तीन पक्ष पुढे आले. मराठी भाषा ही उपचारापुरती राजभाषा करायला इंग्लिशधार्जिण्या पक्षाचा विरोध नव्हता हें विशेष. कदाचित् एकंदर भारतीय मनाची उपचारप्रियता लक्षात घेता हें विशेष नसून स्वाभाविकच आहे असें म्हणायला पाहिजे. किंबहुना नंतरच्या वादात इंग्लिशधार्जिणा पक्ष हिरीरीने भाग न घेता बाजूला राहून टीकाटिप्पणी करण्यात समाधान मानतो असें दिसतें. फाटे फुटल्यामुळे प्रश्न काहीसा रेंगाळला हें खरें, पण त्याचबरोबर प्रश्नाच्या निरनिराळ्या बाजूही पुढे आल्या आणि त्याचें सोपें धोपट उत्तर निघत नाही हें लक्षात आलें हें नाकारण्यात अर्थ नाही. लोकशाही राज्यप्रक्रियेत असें होणें स्वाभाविक आहे आणि इष्टही आहे.

ह्या वादाच्या पार्श्वभूमीवर १९६० नंतरच्या घटना पहाव्या लागतील. (हें सगळें वाक्य इंग्रजी आहे असें कुणी म्हटले तर ?) १९६१ साली भाषासंचालकांचें कार्यालय आणि भाषा–सल्लागार–मंडळ ह्यांची स्थापना झाली. राजभाषा मराठीसाठी पारिभाषिक संज्ञा तयार करण्याचें काम सुरू झालें. १९६२ साली कामाचा पहिला हप्ता म्हणून **पदनाम कोश** बाहेर पडला. त्यावर प्र. के. अत्र्यांनी कडाडून हल्ला चढवला. राजभाषा ही संस्कृतधार्जिणी नको, देशी वळणाची हवी हें मत त्यांनी मांडलें. १९६५ मध्ये “ मराठी राजभाषा विधेयक ” मांडलें जाऊन संमत झालें. नंतर **शासकीय व्यवहार कोश** ह्या पुस्तकाची कच्ची, गोपनीय आवृत्ति १९६८ साली निघाली आणि तिच्यावर अभिप्राय मागवण्यात आले. ती कच्ची आवृत्ति गोपनीय ठेवली नसती तर अधिक प्रमाणात आणि अधिक उपयुक्त अभिप्राय मिळाले असते असें वाटतें. १९७३ साली सुधारलेली पक्की आवृत्ति प्रकाशात आली. वाद पुढे चालू राहिला. राज्यकारभाराच्या आणि न्यायव्यवहाराच्या परिभाषेचा प्रश्न आणि नैसर्गिक आणि मानवी विज्ञानांची आणि गणिताची परिभाषा मराठी शैक्षणिक माध्यम म्हणून स्वीकारल्यावर कशी असावी हा प्रश्न—हे दोन्ही प्रश्न काहीसे एकत्र झाले. वैज्ञानिक परिभाषेच्या प्रश्नासंबंधीही तसेच तीन पक्ष उभे राहिले हेही पाहण्याजोगे आहे. १९७९ साल हें भारत सरकारच्या सूचनेप्रमाणे राजभाषा वर्ष म्हणून साजरें झालें. (खरें म्हणजे **शासकीय व्यवहार कोशा**नुसार ‘ भारत शासनाच्या निदेशाप्रमाणे ’ असें म्हटले पाहिजे—नाहीपेक्षा “ डायरेक्टिव्ह ”च्या ऐवजी “ इन्स्ट्रक्शन ” हा चुकीचा अर्थ निघायचा.) त्या निमित्ताने सरकारी आणि बिनसरकारी पुढाकाराने भाषणें, लेख, चर्चासत्रें इत्यादींच्या रूपाने राज्यकारभाराची परिभाषा आणि तिच्यासंबंधाने अगोदर उल्लेखिलेले तीन पक्ष ह्यांच्या विचाराला जोरदार चालना मिळाली.

आतापर्यंत झालेल्या चर्चेचा थोडक्यात आढावा

संस्कृतधार्जिणा पक्ष, मराठमोळाधार्जिणा पक्ष, आणि इंग्रजीधार्जिणा पक्ष असे तीन पक्ष ओळखले जातात हें खरें. पण ते पक्ष कोणकोणते मुद्दे मांडतात ह्याचा परामर्श घेण्याच्या अगोदर एक-दोन गोष्टी स्पष्ट केलेल्या बऱ्या. पहिली म्हणजे ही मुद्द्यांची विभागणी विचारांच्या सोयीसाठी केलेली आहे. त्या विभागणीला गैरवाजवी महत्त्व देऊ नये. दुसरी म्हणजे ह्या तीन पक्षांना डकवलीं जाणारीं हीं लेबलें तितकीशीं बरोबर नाहीत हें त्यांच्याकडून मांडल्या जाणाऱ्या मुद्द्यांचें परीक्षण केल्यावर ध्यानात यावें. ब्राह्मणी पक्ष, मराठा पक्ष, आणि नोकरशहा पक्ष हीं लेबलें तर वस्तुस्थितीपासून आणखीनच दूर जातात—तीं बाजूलाच ठेवलेलीं बरीं.

पहिला पक्ष आणि दुसरा पक्ष ह्यांचें एका गोष्टीवर एकमत आहे तें म्हणजे मराठी ही खरोखरीची राजभाषा व्हायला पाहिजे आणि ती लवकर व्हावी यासाठी ह्या प्रक्रियेला मुद्दाम गति द्यायला पाहिजे, निराळ्या शब्दांत सांगायचें तर हे दोन्ही पक्ष भाषिक नियोजनाचा पुरस्कार करतात. दोन्ही पक्षांत अंतर आहे तें ह्या नियोजनाच्या स्वरूपाबद्दल आहे. पहिल्या पक्षाचें म्हणणें भाषा पाहिजे तशी नियंत्रित करावी. आज ना उद्या ती लोकांच्या गळी उतरेल. तसें होणें त्याच्या हिताचें आहे. संस्कृतची कास धरणें किंवा हिंदीचें अनुकरण करणें हा तपशिलाचा भाग झाला. त्याला नियंत्रणवादी पक्ष म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. ह्याउलट दुसऱ्या पक्षाला भाषेच्या स्वाभाविक प्रक्रियेवर भिस्त ठेवून नियोजन करणें अधिक वाजवी आणि अधिक लोकाभिमुख धोरण आहे असें वाटतें. मर्यादित-नियोजनवादी पक्ष हें नाव दुसऱ्या पक्षाला अधिक योग्य होईल. देशी आणि तद्भव शब्दांचा पुरस्कार हा साधनविचार झाला. तुलनेने तिसरा पक्ष अधिक स्थितिप्रिय आहे. भाषिक नियोजनावर आणि कृत्रिम गति देण्यावर त्याचा विश्वास नाही. जिल्हापातळीवर मराठी आणि राज्य-पातळीवर इंग्रजी ही आजवरची व्यवस्था काय वाईट आहे असा प्रश्न ही मंडळी विचारत असतात.

नियंत्रणवादी पक्ष, मर्यादित-नियोजनवादी पक्ष, आणि नियोजनाबद्दल उदासीन असा स्थितिप्रियतावादी पक्ष ह्यांचा तोंडवळा अनुक्रमे मध्यवर्ती नियंत्रण, मिश्र अर्थ-व्यवस्था, आणि निरंकुश अर्थव्यवहार यांचा पुरस्कार आर्थिक क्षेत्रात करणाऱ्या पक्षां-सारखा आहे हें लक्षात यावें.

केवळ आपापल्या नजीकच्या स्वार्थाचा विचार करून काही मंडळी यातला एक पक्ष निवडत असणार. परंतु वैचारिक पातळीवर हेतूंचे आरोप करण्याचा मोह टाळला नाही, तर वादामधून व्हायचा अपेक्षित तत्त्वबोध आणि कार्याची दिशा ठरणें आपल्यापासून अधिकच दूर पळणार.

नियंत्रणवादी आपल्या बाजूने पुढील मुद्दे मांडत असतात.

१. स्वाभाविक प्रक्रियेला आता फारसा अवसर नाही. पाश्चात्त्य देशांत प्रादेशिक

भाषा राजभाषा म्हणून स्थिर व्हायला चारपाच शतकें मिळाली : आपल्याजवळ चार-पाच दशकें देखील नाहीत. ज्याला इंग्रजी येतच नाही त्याच्या आपण देऊ तो शब्द अंगवळणी पडेल. ह्या बाबतीत हिंदी-भाषिकांचा कित्ता मराठी लोकांनी ठेवावा. (चोजले न करता निमूट सरकारी परिभाषा स्वीकारावी असाही उपदेश मात्र जेव्हा करण्यात येतो तेव्हा असें म्हणावेंसें वाटतें, की मराठी लोक आपल्या भाषेबद्दल चोखंदळ जागरूकपणा दाखवू लागले तर त्याबद्दल एवढी नापसंती दाखवायची काय जरूर आहे? त्याऐवजी हिंदी-भाषीयांची त्यांच्या फाजील सहनशीलतेबद्दल कीव का करू नये?)

२. सोपेपणाचें फाजील स्तोम माजवू नये. सामान्य माणूस इतका का बुद्दू आहे की चार अपरिचित शब्दांनी तो बुजेल? त्याच्यावर थोडा विश्वास टाका की?

३. सोपेपणा म्हणजे केवळ जोडाक्षरें टाळणें नव्हे. विविध अर्थच्छटांना विविध शब्द, जुळत्या अर्थासाठी जुळतीं शब्दरूपें ह्यांचा विचार करायला नको का? 'विधि' शब्दावर पाणचट कोट्या करण्यापेक्षा वैध, अवैध, विधेयक इत्यादी शब्दसाधना आणि उपविधि, अधिनियम, अध्यादेश, संविधि, नियम अशा बारकाव्यांची सोय लक्षात घ्याल तर बरें.

४. भारताची भाषिक एकात्मता इंग्रजी किंवा फार्सी ह्या परकी भाषांपेक्षा संस्कृत ह्या भारतीय भाषेवर आधारावी हें चांगलें.

५. राजभाषेला काही भारदस्तपणा नको का? झाडूवाला, कारकून, डुक्करवाडा-अधिकारी ह्यापेक्षा स्वच्छक, लिपिक, सूकरालय-अधिकारी असें म्हटलें तर त्या त्या लोकांचा कसें मान ठेवल्यासारखें वाटतें!

थोड्या विचारांती यातले मुद्दे १, २, ३ विचार करण्याजोगे आहेत, तर ४, ५ ठिसूळ आहेत हें पटेल.

मर्यादित-नियोजनवादी आपल्या बाजूने पुढील मुद्दे मांडत असतात.

१. भाषिक नियोजन करावें आणि तसें करून मराठीची राजभाषा म्हणून क्षमता वाढवायला पाहिजे हें मान्य. पण ज्याच्यासाठी हें सर्व करायचें त्या सामान्य नागरिकाला शासकीय परिभाषा कळली आणि उमजली नाही तर हा सर्व खटाटोप व्यर्थ नव्हे का?

२. सामान्य नागरिकाच्या अडी-अडचणींबद्दल सहानुभूति असेल तरच भाषिक दुरावा राज्यव्यवहाराला किती घातक आहे हें पटेल. सवयीने सर्व अंगवळणी पडतें असें म्हणण्याचा अर्थ सामान्य नागरिक वाटेल ती गळचेपी सहन करतो असा तर नाही ना?

३. मराठी भाषा म्हणजे पर्यायाने मराठी–भाषी ह्यांच्या उपक्रमशीलतेवर विश्वास टाका. भाषांतरावर मराठीचें पोषण किती दिवस करणार? "दहा दशलक्ष" हें

" टेन मिलियन "चें आंधळें भाषांतर कशाला ? त्यापेक्षा मराठीतच विचार केला तर " एक कोटी " म्हणायचें सहज सुचलें असतें.

४. मराठीने संस्कृत, फार्सी, इंग्रजी ह्या भाषांचा सासुरवास इतके दिवस सोसला. आता नवीन हिंदीचें आक्रमण नको. मराठीचें मराठीपण टिकवा.

ह्या मुद्द्यांपैकी १, २, ३ विचार करण्याजोगे आहेत. ४ हा केवळ भावनेला आवाहन करणारा आहे. "मराठीचें मराठीपण इतकें तकलुपी आहे की काय की दुसऱ्या भाषांतून आयात केल्यावर तें कोसळावें ? " असे उलट भावनिक आवाहन केल्यावर त्याला छेद जातो.

स्थितिप्रियतावादी आपल्या बाजूने पुढील मुद्दे मांडत असतात :

१. आपले पाय वास्तवाच्या भुईवर जरा टेकवा. भाषा आणि विशेषतः परिभाषा हें साधन आहे, साध्य नाही. जिचा आशय ऐकणारापर्यंत पोचत नाही अशा पोकळ परिभाषेचा दिमाख कशाला ?

२. मराठीची अभिवृद्धि इतर भाषांचा द्वेष करून होणार नाही. इतर भाषांतून शब्द आयात करताना फाजील सोवळें न पाळल्यामुळेच तर इंग्लिश भाषा समृद्ध झाली नाही का ? इंग्रजी किंवा फार्सी ह्या भाषांचा द्वेष करून काय साधणार ?

३. भारतातल्या सामान्य नागरिकाला वऱ्याच अधिक महत्त्वाच्या नव्या गोष्टी शिकायच्या आहेत. त्यात नवी परिभाषा ओझ्यासारखी होऊन बसणार असेल तर ती काय कामाची ?

४. राज्यकारभारात नेमकेपणाला फार महत्त्व आहे. इंग्लिश भाषेने तो इतक्या वर्षांनंतर कमावला आहे. तिचा आधार टाकून आपलें भागणार नाही.

ह्या मुद्द्यांपैकी १, २ हे सबळ आहेत, ३ व ४ हे त्या मानाने अर्धसत्यावर आधारलेले असे आहेत.

प्रत्येक पक्षात टोकाला जाऊन बोलणारी मंडळी आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें तर प्रत्येक पक्षाकडून हातात धरण्यासारखे मुद्दे आपल्याला मिळतात आणि राजभाषेच्या प्रश्नाचीं निरनिराळीं अंगें आपल्या ध्यानात येतात.

भारताच्या इतर राज्यांकडे थोडा दृष्टिक्षेप

शासकीय परिभाषेचा प्रश्न—किंबहुना शासकीय, वैज्ञानिक, तंत्रविद्याविषयक अशा सर्वच परिभाषेचा प्रश्न एकट्या मराठीलाच पडला आहे असें नव्हे. भारतामध्ये इतर भाषा बोलणारे लोक, भारताबाहेरच्या इतर विकसनशील आणि अविकसित देशातले लोक यांनाही तो कमी अधिक प्रमाणात पडला असणारच.

सध्या आपण केवळ भारतातल्या काही राज्यांकडे ओझरती नजर टाकू आणि आपल्याला काही बोध घेता येईल का तें पाहू.

पंजाबमध्ये मुख्यतः पंजाबी भाषा बोलली जाते. भारतातल्या काश्मिरी, उर्दू, सिंधी आणि काही अंशी पंजाबी ह्या भाषांचा मोहरा संस्कृतपेक्षा फार्सीकडे वळलेला आहे. आपली भाषा साधी ठेवायची का फार्सीप्रचुर ठेवायची असा प्रश्न त्यांच्यापुढे असतो. (पाकिस्तानी उर्दूला अति-फार्सी-अरबी-प्रचुर म्हणून भारतामधले उर्दूभाषी नाकें मुरडतात.) पंजाबमध्ये आता मुसलमान फारसे नाहीत, शिखांचा ओढा पंजाबी आणि फार्सीकडे, तर हिंदूंचा आर्यसमाजी विचारांच्या छायेत हिंदी आणि संस्कृतकडे ओढा अशी स्थिति आहे. हळूहळू पंजाबी हिंदीच्या किंवा उर्दूच्या वरचष्म्यातून बाहेर पडून स्थिर होते आहे. मात्र परिभाषेसाठी संस्कृतकडे वळण्याची प्रवृत्ति वाढते आहे. उदाहरणार्थ "इकॉनमी"साठी "मुआशीमुआमला" ऐवजी "संजम" शब्द वापरतात.

हिंदी भाषेची प्रवृत्ति अधिकाधिक संस्कृतप्रचुर होण्याकडे आहे. मराठीमध्ये "निवडणूक" हा सोपा शब्द असताना हिंदीमधला "निर्वाचन" शब्द कशाला घ्यायचा अशी तक्रार करताना आपण हें लक्षात घेत नाही की काही थोडे हिंदीभाषी नेमकें तसेंच काही म्हणत आहेत—"चुनाव" हा सोपा शब्द असताना संस्कृत-मधला "निर्वाचन" हा शब्द कशाला घ्यायचा ? असे जागरूक हिंदीभाषी दुर्दैवाने संख्येने पुरेसे नाहीत असें म्हणणें भाग आहे. हिंदी ही संघराज्याची भाषा असल्या-मुळे ह्या प्रश्नात एक दुसरा तिढा येतो त्याचा मात्र उल्लेख करायला पाहिजे. "चुनाव" म्हणणारी हिंदी सामान्य हिंदी भाषिकांना सोपी होईल. उलट "निर्वाचन" म्हणणारी हिंदी द्राविडभाषीयांना कदाचित् कमी अवघड वाटेल. आता हिंदी भाषेने करायचें काय ?

मलयालम, कन्नड, आणि तेलुगु ह्या द्राविडभाषीयांना जरूर तिथे संस्कृतमधून शब्द उचलायला संकोच वाटत नाही. मात्र तमिळ-भाषीयांना तो अलीकडे वाटू लागला आहे असें दिसतें. शब्दाची जरूर भासली तर काहीजण प्राचीन तमिळकडे वळतात. कधी ह्याचा अतिरेक होतो, आणि ही "अतिशुद्ध" तमिळ आम्हाला समजत नाही अशी सामान्य तमिळ वाचक किंवा श्रोता तक्रार करतो !

विविध भारतीय भाषांनी संस्कृतमधून घेतलेल्या शब्दांची पाहणी केली तर एकाच संस्कृत तत्सम शब्दाचे निरनिराळ्या भाषांत निरनिराळे अर्थ ही परिस्थिति अनेकदा दिसते. उदाहरणार्थ "चेष्टा" म्हणजे बांगला, हिंदी यांमध्ये "प्रयत्न"; मराठी, तेलुगु यांमध्ये "मस्करी". इंग्रजी शब्दांच्या प्रतिशब्दात हें विशेष आढळतें— "हिस्टरी" साठी मराठीत "इतिहास" तर तेलुगुमध्ये "चरित्रमु". "कल्चर"-साठी "संस्कृति" हा राजवाड्यांचा शब्द मराठीतून रवींद्रनाथ ठाकुरांमार्फत इतर भाषांत फैलावला. संस्कृतची कास धरून एकरूपता साधेलच असें नाही असें यावरून

दिसतें.

बंगालचें उदाहरण उल्लेखनीय आहे. परिभाषा स्वाभाविक रीतीने तयार व्हायला बांगला-भाषीयांना जीं काही दशकें मिळालीं तीं त्यांनी पुरेपूर वापरलीं. विविध वैज्ञानिक आणि इतर विषयांवर ललितेतर वाङ्मय बांगला भाषेत बरेच वर्षांपासून विपुल प्रमाणात निर्माण होत आलें आहे. (उलट मराठीचा प्रकाशनसंसार म्हटलें की मुख्यतः शालेय पाठ्यपुस्तकें आणि ललितवाङ्मय आपल्या डोळ्यांसमोर येतात. मराठी वाचकही ह्या दारिद्र्याला जबाबदार आहेत.) बंगाल्यांचें स्वभाषाप्रेम काही वेळा अतिरेकी होऊ पाहते. मात्र तें त्यांच्या इंग्लिश भाषेच्या उपयोगाच्या आड आलेलें नाही. भारतामध्ये जीं इंग्लिश पुस्तकें लिहून प्रसिद्ध होतात त्यात संख्या व गुणवत्ता ह्या दोन्ही दृष्टींनी बंगाल्यांचा वाटा मोठा आहे. (मराठी—भाषीयांनी मात्र थेट केसरी-मराठाच्या काळापासून इंग्रजी भाषेबद्दल एक धसका घेतलेला दिसतो. इंग्लिश आणि मराठी ह्या दोन्ही भाषांतून विपुल लेखन करणारे धनंजयराव गाडगिळांसारखे लेखक तर फारच थोडे. उलट केवळ मराठी भाषेत लेखन केल्यामुळे आणि त्याच्या इंग्लिश भाषांतराची व्यवस्था न झाल्यामुळे महाराष्ट्राबाहेर अज्ञात राहिलेले विद्वान् पुष्कळ आहेत. स्वभाषाप्रेम आणि इंग्लिश भाषेचा द्वेष ह्यांचें समीकरण होण्याचें कारण नाही. थोडे खोलवर गेलें तर असें म्हणता येईल की, मराठी माणसांमध्ये दिसणारा इंग्लिशचा भोळा सोस आणि इंग्लिशचा आंधळा द्वेष हे दोन्ही एकाच न्यूनगंडाचे आविष्कार आहेत. प्रकाशन संसाराचें मागें सांगितलेलें दारिद्र्य आणि हा न्यूनगंड—दोन्ही बाबतीत मराठी लोकांनी कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ अजून टळलेली नाही. (ती न टळो !)

राजभाषेच्या प्रश्नाच्या संबंधाने काही लक्षवेधी सूचना

ह्याप्रमाणे थोडा ऐतिहासिक आणि भौगोलिक आढावा घेतल्यानंतर राजभाषेच्या प्रश्नाचीं काही दुर्लक्षित अंगें नजरेसमोर आलीं त्यांची नोंद आता केली पाहिजे. ही नोंद मी चार लक्षवेधी सूचनांच्या रूपाने करणार आहे. ह्या वादविवादामधील पहिली उणीव मला जाणवते ती ही, की शासकीय परिभाषा हा राजभाषेच्या प्रश्नाचा केवळ एक उपप्रश्न आहे ह्याची पुरेशी जाणीव झालेली नाही. राजभाषेला परिभाषे-खेरीज इतरही तीन अंगें आहेत ह्याचा विसर पडायला नको. त्यांच्यापैकी पहिलें म्हणजे परिभाषेबाहेरचे इतर साधे शब्द. पारिभाषिक संज्ञांमुळे कितीही नाही म्हटलें तरी भाषेला थोडा जडपणा येणें अटळ आहे. ह्यावर उतारा म्हणून इतर शब्द सोपे ठेवण्याची विशेष खबरदारी घेणें जरूर आहे. " दृष्टोत्पत्तीस येतें " कशाला म्हणायचें ? " दिसून येतें " ठीक आहे. " उर्वरित राशि " ऐवजी " उरलेली रक्कम " ठीक नाही का ? " हा दुर्दैवी विचार आहे " म्हणजे काय ?

" अन्फॉर्चुनेट आयडिया " ह्या इंग्रजी शब्दप्रयोगाचें हें दुर्दैवी भाषांतर आहे हें लक्षात आल्याखेरीज त्याचा अर्थ ध्यानात येणार नाही. त्याऐवजी संदर्भानुसार " करंटा विचार ", " वेडगळ कल्पना " असा मराठी वळणाचा शब्दप्रयोग केला तर ही अडचण येणार नाही. राजभाषेचें दुसरें अंग म्हणजे वाक्याची मोडणी. शब्द सुबोध पण वाक्य दुर्बोध असा प्रकार होऊ शकतो. " अशाच अधिकाऱ्याला हुकूम रद्द करता येईल की ज्याने तो मुळात दिला आहे " हे वाक्य आडवळणी आहे. " ज्या अधिकाऱ्याने मुळात हुकूम दिला आहे त्यालाच तो रद्द करता येईल " असें म्हणून काही बिघडत नाही, उलट अर्थ चटकन लक्षात येतो. तिसरें आणि महत्त्वाचें अंग म्हणजे शासकीय भाषाशैली. ती नेमकी आणि सुटसुटीत असावी. परंतु शासकीय भाषाशैली हमखास शब्दबंबाळ आणि मुख्य मुद्द्याला स्पर्श करायला आळस करणारी होऊ पाहते. (ब्रिटनमध्ये सर अर्नेस्ट गावर्ज यांनी तर ह्याबद्दल एक मोहीमच उघडली होती. " कंप्लीट प्लेन वर्ड्ज् ", पेंग्विन हें त्यांचें पुस्तक राजभाषा मराठीसंबंधी विचार करणारांनी अवश्य डोळ्याखालून घालावें.) भारतीय राजभाषेतही हा दुर्गुण खासच आढळतो. त्याचबरोबर ती पुष्कळदा अकारण-उद्धट किंवा सौजन्यशून्य असते. " गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेखाली आलेली ही सुधारित झोपडपट्टी आहे " अशी पाटी लावणाऱ्या कल्पनाशून्य अधिकाऱ्याची किती तारीफ करावी ! लेखकांना उत्तेजन देण्यासाठी निर्मिलेल्या एका निमसरकारी योजनेतील करारपत्र कमालीचें उद्धट आणि तुच्छताबुद्धि दाखवणारें आहे. तें वाचून दुखावलेली लेखिका मी पाहिलेली आहे. अर्थात् शासकीय शैली हा शेवटी शासकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार असतो. पण पुष्कळदा त्यामागे भाषेच्या बऱ्यावाईट परिणामांबद्दल अज्ञान आणि बेफिकिरी असते. राजभाषेच्या वादात श्री. य. शं. कानिटकरांचें मराठी किती चांगलें आहे ह्याचा मुद्दाम उल्लेख अनेकांना करावासा वाटला. हें जसें त्यांना भूषण आहे तसें एकंदर सरकारी अधिकारीवर्गाला दूषण आहे. मराठीवर त्याला जसजसें प्रभुत्व मिळेल तसतसा त्याचा मराठीबद्दलचा कंटाळा दूर होईल.

राजभाषेबद्दल दुसरी लक्षवेधी सूचना अशी, की राजभाषा कशी असावी ह्याबद्दलचे निकष लावताना सब घोडे बारा टक्के असें करता येणार नाही. राजभाषा ही निरनिराळ्या संदर्भात वापरली जाते. आणि त्या त्या संदर्भात ती विशिष्ट गरजा भागवते आणि गरजांना अनुसरून तिच्याकडून वेगवेगळ्या अपेक्षा कराव्या लागतील. निदान वेगळ्या निकषांवर जोर द्यावा लागेल. कायद्याच्या क्षेत्रात नेमकेपणाला महत्त्व आहे, सोपेपणाला त्या मानाने कमी महत्त्व आहे एवढा ढोबळ विचार मांडला गेला आहे, पण तो पुरेसा नाही. कायदेमंडळाचें कामकाजही राजभाषेत चालतें, प्रशासकांच्या भाषेइतकीच लोकप्रतिनिधींची भाषा सुधारण्याची जरूर आहे ह्याचा तर मंडळींना विसरच पडलेला दिसतो. सामग्र्याने विचार केला तर पुढीलप्रमाणे फरक दाखवता

येतील—

(१) नागरिक – लोकप्रतिनिधि ह्यांच्यामधलें दळणवळण : सोपेपणा विशेष महत्त्वाचा, नेमकेपणा हळूहळू येईल अशी आशा.

(२) नागरिक – प्रशासक दळणवळण : प्रशासकांकडून नागरिकांपर्यंत जाणारा मजकूर सोपा आणि काटेकोर दोन्ही हवा, काटेकोरपणा नसल्यास गैरसमज होऊन दिशाभूल केल्याबद्दलची तक्रार नागरिकांकडून येते.

(३) लोकप्रतिनिधि – प्रशासक दळणवळण : याचें स्वरूप बऱ्याच अंशी (२) प्रमाणेच राहील.

(४) प्रशासक – प्रशासक दळणवळण : याचें स्वरूप बरेंच तांत्रिक स्वरूपाचें राहील. काटेकोरपणासाठी थोडा जडपणा पत्करावा लागेल.

(५) नागरिक – वकील दळणवळण : याचें स्वरूप बरेंचसें (२) प्रमाणेच राहील.

(६) वकील – न्यायाधीश दळणवळण : याचें स्वरूप काहीसें (४) प्रमाणे राहील.

(७) लोकप्रतिनिधि – न्यायाधीश, वकील दळणवळण : कायदेकानूंची भाषा ही सर्वांत तांत्रिक राहते, लोकप्रतिनिधि क्वचितच ती घडवतात, मात्र त्यांचा हेतु त्या भाषेत हरवणार नाही ह्याची खबरदारी घेणें महत्त्वाचें आहे.

परिभाषेच्या अखिलभारतीय एकरूपतेबद्दल बरेचसें बोललें गेलें आहे. कायद्याच्या परिभाषेत म्हणजे (६) व (७) मध्ये अधिकात अधिक एकरूपता असावी ह्याबद्दल दुमत नसावें. इतरत्र एकरूपतेचा आग्रह थोड्या मर्यादेतच धरण्यात हशील आहे– पूर्वी एकाच हुद्द्याला तहसिलदार, मामलेदार, लंबरदार अशी विविध नावें प्रांतवार होतीं तीं जाऊन एकच नाव सर्व राज्यात आलें तर ती सुधारणाच होईल. चुनाव, निवडणूक इत्यादी राज्यवार संज्ञांच्या बरोबर निर्वाचन ही दुय्यम संज्ञा म्हणून भारतीय एकरूपतेसाठी ठेवावी : उलट "अरियर्ज्"साठी अखिल भारतीय संज्ञा असण्याची काही खास गरज दिसत नाही. मराठीसाठी "थकबाकी" पुरे आहे. सरतेशेवटी आणखी एक प्रस्ताव मांडून हा मुद्दा पुरा करतो. सामान्य नागरिकासाठी लागणाऱ्या पारिभाषिक संज्ञांची संख्या (शासकीय दळणवळणाचे संदर्भ १, २, ५ यांचा इथे विचार आहे) मर्यादित आहे. **शासन व्यवहार कोशा**मधल्या सुमारे तीस हजार संज्ञांपैकी अंदाजे चाळीस टक्के संज्ञा या वर्गात पडतात असें घटकाभर समजू. अशा संज्ञांचा एक लघुकोश वेगळा प्रसिद्ध करता येईल. मराठी–इंग्लिश–सोप्या मराठीत सोदाहरण अर्थविवरण अशा नोंदी देणारा एक भाग आणि इंग्लिश–मराठी सूची हा दुसरा भाग असें त्याचें स्वरूप राहील. अर्थविवरण म्हणजे काटेकोर व्याख्या नव्हे हें उघड आहे.

परिभाषा हें राजभाषेचें केवळ एक अंग आहे हें मागे सांगितलेंच आहे. त्या

अंगाचा तिसऱ्या सूचनेत विचार करायचा आहे. पारिभाषिक शब्द घडवताना आणि निवडताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील ? पहिली गोष्ट म्हणजे इथे भाषिक सोवळ्याची काडीमात्र गरज नाही. कोणतीही समिति न बसता ओघाओघाने मराठीत क्रिकेटची परिभाषा तयार झाली आणि ती अ. ब. कोल्हटकर इत्यादींच्या प्रयत्नांमुळे रुजली. लेग, ऑफ हे इंग्रजी शब्द, बिनबाद हा फार्सी शब्द, यष्टिरक्षक हा संस्कृत शब्द, पायचीत हा देशी शब्द गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. यष्टिरक्षक हा बोजड शब्द काढून दांडीराख्या म्हणावें अशी कुणी मागणी केल्याचें ऐकिवात नाही. फार काय गोलंदाज हा गंगाजमनी शब्द देखील रुळला आहे. जें क्रिकेटच्या परिभाषेत होतें तें इतरत्र का होऊ नये ? दुसरी गोष्ट निरनिराळ्या स्रोतांमधून एकाच अर्थाचे शब्द आले तरी त्यांचा उपयोग असतो. " भूमिति " हा गणिताचा भाग तर " जमीन-मोजणी " हा महसूलखात्याचा भाग. " संसद् ", " लोकसभा ", " राज्यसभा ", " विधानपरिषद् ", आणि " विधानसभा " ह्या सगळ्यांचा एकत्र उल्लेख करण्यासाठी " कायदेमंडळ " हा शब्द उपयोगी पडेल. तिसरी गोष्ट सोपेपणाबद्दलची –ह्या संबंधात पुढील हिंदी म्हण सदैव मनात बागवावी : सीधी लकीर खींचना बहुत टेढा काम होता है. सोपेपणा म्हणजे केवळ जोडाक्षरांची मोजदाद नव्हे–" भाषा–संचालनालय " ह्या जोडाक्षरविरहित शब्दापेक्षा " भाषा–संचालन–कार्यालय " हा उच्चारायला अधिक सोपा. प्रत्येक शब्द परिचित असावा हा आग्रह रास्त नाही. तो परिचयसुलभ असला म्हणजे झाले ! " प्रसाधन " बऱ्यापैकी परिचयसुलभ आहे, पण तो मुतारीला वापरणें अन्वर्थक नाही ! " टॉयलेट " शब्दाचें तें अडाणी भाषांतर आहे. इंग्लिश शब्द पुष्कळदा इंग्लिश न जाणणारालासुद्धा परिचित असतो. पण तो त्याला खऱ्या अर्थाने कळतो असें नाही. शेतकऱ्याला " शीडफार्म " शब्द कळतो असें म्हणणें म्हणजे गणिताची रीत न कळता अनुमान धपक्याने बरोबर उत्तर मांडणाऱ्या विद्यार्थ्याला गणित कळलें म्हणण्यासारखेंच आहे. हीं दोन्ही विधानें सारखींच दिशाभूल करणारीं आहेत. सोपेपणासाठी नेमकेपणाचा बळी देऊन चालणार नाही. " कल्व्हर्ट "साठी " अधःप्रणाल " शब्द बोजड म्हणून जसा योग्य नाही तसाच हिंदी परिभाषा–कोशातला " पुलिया " शब्दही सोपा असून योग्य नाही. " कल्व्हर्ट " हा गाडीचा मार्ग नसून पाण्याचा मार्ग आहे. " भुयारी गटार " हा त्याला योग्य प्रतिशब्द ठरू शकेल. " सुईण " ऐवजी " प्रसाविका " शब्द दुर्बोध वाटतो हें खरें आहे, पण तो सुचवण्यामागे " प्रसूति " आणि " सूतिका " ह्या परिचित शब्दांशी अनुसंधान ठेवून तो निराळ्या दिशेने सोपा करण्याची दृष्टि असू शकते. " सोपा " हा शब्द " क्वेस्चन–बेगिंग " आहे, जें सिद्ध करायचें तें गृहीत धरून तो मोकळा होतो ! एकंदरीने आखुडशिंगी आणि बहुदुधी परिभाषा जेवढी वापरायला सोपीची तेवढी घडवायला अवघड असते. ती घडवणारांना बाहेरून मदत मिळाली व त्यांच्या-

वर टीकेचा अंकुश राहिला तर ती स्वागतार्ह गोष्ट मानायला पाहिजे.

सरतेशेवटी सूचना करायची ती टीकाविषय बनलेल्या **शासन व्यवहार कोशा**बद्दल. त्या कोशाची २० पानें म्हणजे सुमारे तीस हजार शब्दांपैकी एक हजार शब्द मी तपासले. त्यांपैकी सुमारे एक टक्का संज्ञा अशा निघाल्या की त्यांना एक दुर्बोध आणि एक सुबोध पर्याय ठेवलेला आहे.

government—शासन, सरकार

over–head expenses—वरकड खर्च, उपरिव्यय

शिवाय तीन टक्के संज्ञा अशा निघाल्या की त्यांना अधिक योग्य प्रतिशब्द मिळणें शक्य आहे.

overseer—अवेक्षक

part–time—अंशकालिक

passed with grace—अनुग्रहोत्तीर्ण

म्हणजे सुमारे तीनशे अधिक नऊशे शब्दांपायी हा कोश बदनाम कोश झाला आहे. आणि असें होणें स्वाभाविक आहे. भात खाताना लागलेले खडे लक्षात राहतात, पोटात गेलेल्या शितांची कोणी मोजदाद करीत नाही. शिवाय ह्या तीन टक्के शब्दांपैकी काही शब्द वारंवार वापरले जाणारे असल्यामुळे त्यांची भाषाप्रदूषण करण्याची शक्ति तुलनेने जास्त असणार हेंही विसरून चालणार नाही.

तर शासनाने म्हणजे सरकारने हा प्रश्न चांगल्या अर्थाने प्रतिष्ठेचा प्रश्न करावा आणि तपासणी समिती नेमून **शासन व्यवहार कोशा**ची एक सुधारित म्हणजे सुधारलेली आवृत्ति काढावी, आणि त्याची बदनामी थांबवावी. यशवंतराव चव्हाणांना एकदा प्र. के. अत्रे म्हणाले (लोकराज्य १९७९.१०.०१ : पृ. ७०) की तुमचें काम तुम्ही करा, टीका करण्याचें काम आम्ही करतो, आणि एक दिवस अधिक सोपे शब्द सापडतीलही.

इत्यलम् !

ताजा कलम

शासकीय परिभाषेची तपासणी करून सुधारणा करण्याची एक योजना महाराष्ट्र सरकारकडे यानंतर विचाराधीन होती असें कळतें. नंतर तिचें पुढे काय व्हायचें तें झालें–म्हणजे काहीच झालें नाही.

संदर्भग्रंथसूची

ही संदर्भग्रंथसूची दोन भागात दिली आहे. पहिल्या भागात मराठी ही राजभाषा म्हणून वापरता यावी ह्यासाठी बनवलेले शब्दकोश लेखकांच्या नावांनुसार दिलेले

आहेत. दुसऱ्या भागात ह्या कोशांच्या प्रस्तावना सोडून इतर ठिकाणी राजभाषेबद्दल मराठीत झालेल्या चर्चेची लेखकांच्या नावांनुसार नोंद केलेली आहे. ही सूची तयार करताना मला अनेक नोंदी डॉ. गीता सुभाष भागवत आणि एक नोंद प्रा. दि. द. माहूलकर यांच्याकडून मिळाल्या आणि कै. डॉ. सुहासिनी लद्दू व सकाळ कार्यालय पुणे यांच्याकडून काही लेखांचीं कात्रणें मिळालीं हें साभार नमूद करायला पाहिजे. अनामिक नोंदी प्रथम घेतल्या आहेत.

(१) मराठीसाठी राजभाषाकोश

बडोदें सरकार. श्रीसयाजीशासन कल्पतरु. बडोदें : न्यायमंत्री कचेरी, बडोदें सरकार, १९३१. (इंग्लिश–गुजराती, मराठी, संस्कृत, उर्दू, फार्सी, हिंदी, बांगला; प्रचारातील शब्द, काही नवे पर्याय; अंदाजे ५४०० नोंदी.)

महाराष्ट्र शासन, भाषासंचालनालय. पदनामकोश. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९६२. (इंग्लिश–मराठी.)

—प्रशासन वाक्प्रयोग. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९६८. (प्रस्तावना १९६४ची; इंग्लिश–मराठी, मराठी–इंग्लिश.)

—वित्तीय शब्दावली. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९७२. (इंग्लिश–मराठी.)

—शासन व्यवहार कोश, मुंबई : महाराष्ट्र शासन, १९७३. (गोपनीय कच्ची आवृत्ति, १९६८; दोन्ही इंग्लिश–मराठी.)

सामंत, मधुकर ल.; व इतर. अर्वाचीन राज्यव्यवहारकोश. मुंबई : साहित्यमंदिर, १९६२. (इंग्लिश–मराठी.)

हणमंते, रघुनाथ-पंडित नारायण-अध्वरी. राजव्यवहारकोश. सुमारे १६७५–६. मुद्रित प्रकाशन : १. संपा. क्षत्री, काशिनाथ गंगाधर. मुंबई १८६०. २. संपा. अनामिक. पुणें १८८०. ३. संपा. काटे, रा. ग. हैदराबाद : मराठवाडा–साहित्य–परिषद्, १९५६. (संस्कृत पद्यात रचलेला, १० वर्गांत विषयानुसार विभागणी; फार्सी, अरबी, हिंदुस्तानी शब्दांना संस्कृत पर्याय.)

(२) मराठीमधलें राजभाषेविषयीचें विवेचन

निवेदन : शासनव्यवहारातील मराठी : भाषा सल्लागार मंडळाची भूमिका. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.०९.१६.

वृत्तांत : परिसंवाद. महाराष्ट्र टाइम्स १९७९.०६.०५.

संपादकीय. महाराष्ट्र टाइम्स १९६५.०२.२५.

संपादकीय. लोकसत्ता १९६५.०२.२६.

संपादकीय : न समजणारी भाषा. मराठी– विज्ञान– परिषद् पत्रिका १९७९-०१.

संपादकीय : राज्यकारभारात मराठी. महाराष्ट्र टाइम्स १९७९.०३.३०.
संपादकीय : भाषाविवेक. महाराष्ट्र टाइम्स १९७६.०३.३०.
संपादकीय : राज्यकारभारात मराठी. महाराष्ट्र टाइम्स १९७६.०४.३०.

अत्रे, प्र. के. संपादकीय : बदनामकोश. मराठा १९६५.०२.१८.
आठवले, नारायण. झिंज्या धरून इंग्रजीला सिंहासनावरून खाली खेचा. मुंबई रविवार सकाळ १९७९.०६.१०.
कानिटकर, य. शं. परिभाषा कृत्रिम असणे अटळ आहे. किर्लोस्कर १९७९.०९.
—भाषा व शब्दसाधना. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
—राजभाषा : कशी असावी ? कशी नसावी ? पंचधारा १९८०.०१–०३.
—शासन व्यवहारातील मराठीचे स्वरूप आणि समस्या. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.०५.०१.
—पहा : गडकरी, माधव.
कालेलकर, ना. गो. नवमराठीची निर्मिती : वास्तवदृष्टीचा सहानुभूतिशून्य अभाव. महाराष्ट्र टाइम्स रविवार १९७९.०५.१३.
—भारतीय भाषा : नव्या जबाबदाऱ्या. समावेश : पानसे, मु. ग. (संपा.). भाषा : अंतःसूत्र आणि व्यवहार. पुणें : महाराष्ट्र–साहित्य–परिषद्, १९६९. पृ.१–१०.
—मराठी भाषा : खोटा अभिमान काय कामाचा ? महाराष्ट्र टाइम्स. १९७९.०५.२०.
केळकर, इंदुमति. मराठी असे आमुची मायबोली, जरी अजूनी ती राजभाषा नसे. पंचधारा १९८०.०१–०३.
गडकरी, माधव. ' मराठा ' सरकारचे ' ब्राह्मणी ' मराठी. मुंबई रविवार सकाळ १९७९.०५.०६. प्रतिक्रिया : कानिटकर, य. शं. ०५.१७. (उत्तर ०६.२४). देशपांडे, स. ह. ०६.१०;१७. (उत्तर : ०७.०१;०८)
गवांदे, राजाभाऊ. न्यायव्यवहारात मराठीचा वापर. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१.–१६.
गुप्ते, रा. भा. सर्वांना समजणारी परिभाषा हवी. रविवार सकाळ (पुणें) १९४९.०५.२७.
ग्रामोपाध्ये, गं. ब. पेशवेदप्तरांतील मराठी भाषेचें स्वरूप. पुणें : लेखक, १९४०.
चंद्रचूड, म. वि. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
चव्हाण, यशवंतराव, भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
जोशी, द. पं. राजभाषा लोकभाषा : तत्त्व आणि व्यवहार. पंचधारा १९८०.०१–०३.
जोशी, वेंकटेश लक्ष्मण. नवशब्दनिर्मितीची प्रक्रिया आणि मराठी परिभाषेची जडणघडण. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका १९७१.१०–१२.

टिकेकर, श्री. रा. पुस्तक परीक्षण : शासन व्यवहार कोश. नवभारत १९७४.०३.
तळवलकर, गोविंद. संपादकीय. महाराष्ट्र टाइम्स १९७९.०३.३०.
—संपादकीय. महाराष्ट्र टाइम्स १९७९.०६.०६.
देशपांडे, पु. ल. अध्यक्षीय भाषण... १० डिसेंबर १९७८ (पुस्तिका). मुंबई : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९७९. प्रतिक्रिया : पहा : रेगे, मे. पुं.
देशपांडे, स. ह. पहा : गडकरी, माधव.
देशमुख, बा. न. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
धर्माधिकारी, चंद्रशेखर. न्यायालयीन व्यवहार व मराठी भाषा. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
परांडेकर, शं. आ. परिभाषा आणि क्लिष्टता. रविवार सकाळ (पुणें) १९७९.०६.०३.
पवार, शरदचंद्र. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
पाटील, ग. मो. राजभाषेची दैन्यावस्था. युगवाणी १९७९.११–१२.
पाटील, न. व. राजभाषेची वाटचाल. युगवाणी १९७९.११–१२.
पाटील, राजारामबापू. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
प्रधान, ग. प्र. शासनव्यवहाराची भाषा. समावेश : पानसे, मु. ग. (संपा.) भाषा : अंतःसूत्र आणि व्यवहार. पुणें : महाराष्ट्र– साहित्य– परिषद्, १९६९. पृ. ११–२५.
बडोदेकर, शरच्चंद्र. वाचकांचा पत्रव्यवहार : भाषा–फेरविचारार्थ समिती नेमा. महाराष्ट्र टाइम्स १९७९.०५.१३.
भारत सरकार, सरकारी–भाषा–मंडळ. अहवाल. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९५६. (मराठी अनुवाद; मूळ : इंडिया, गव्हर्नमेंट ऑव्ह, ऑफिशियल लँग्वेज कमिशन. रिपोर्ट. नयी दिल्ली : भारत सरकार.)
भिडे; कानिटकर. वृत्तपत्रीय निवेदन, महाराष्ट्र टाइम्स १९७९.०६.०२.
भोळे, भा. ल. लोकभाषा आणि लोकशाही. तरुण भारत (नागपुर) १९८०.०१.२६.
मंचरकर, रत्नाकर बापूराव. आजचा भाषिक संघर्ष. पंचधारा १९८०.०१–०३.
मराठे, श्रुति. वाचकांचा पत्रव्यवहार : कोणा प्रमस्तिष्काची करामत ? महाराष्ट्र टाइम्स १९७९.०५.१३.
महाराष्ट्र शासन, भाषासंचालनालय. प्रशासनिक लेखन. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९६६.
—राजभाषा परिचय. मुंबई : महाराष्ट्र शासन, १९६८.
—शासनव्यवहारात मराठी : समस्या, स्वरूप, प्रक्रिया. मुंबई : महाराष्ट्र शासन, प्रकाशनवर्ष दिलेलें नाही (१९६३). पदनामकोशावरील टीकेला उत्तर.

महाराष्ट्र शासन, विधानसभा. ऑफिशियल लँग्वेज बिल १९६४ यावरील चर्चा. महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्ली डिबेट्स् १४ : २, १९६४. ११–१२. (वृत्तांत–लेखक : आठल्ये, एस्. के.; धारिया, के. एस.)
—शासकीय कामकाजातील मराठी बाबतच्या ठरावावरील चर्चा. महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्ली डिबेट्स् २३ : २, १९६८.०२–०–०४. (वृत्तांत लेखक : माडगूळकर, ग. दि.)
मुणगेकर, श्री. ग. संपादकीय. रविवार सकाळ (पुणें) १९७८.१२.१७.
—संपादकीय. रविवार सकाळ (पुणें) १९७९.०५.१३.
राजवाडे, वि. का. प्रस्तावना. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८. कोल्हापुर : ग्रंथमाला, १९०३. (संग्रह : राजवाडे, वि. का. ऐतिहासिक प्रस्तावना. पुणें : चित्रशाळा, १९२८. पृ. ३६८–४५०.)
रत्नाकर, सरिता. वाचकांचा पत्रव्यवहार : राजभाषेवर टीकाच केली पाहिजे काय ? लोकसत्ता १९७९.०६.१०.
रेगे, मे. पुं. संपादकीय : डुकर, वराह आणि डिग्री. नवभारत १९७९.०८. (पहा : देशपांडे, पु. ल.) प्रतिक्रिया : देशपांडे, पु. ल. क्वच भवान् क्व पुलः क्वच सूकरः । १९७९.०९. (उत्तर : रेगे, मे. पुं. ज्ञानामि त्वां प्रकृतिपुरुषम् । १९७९-०९.)
वर्दे, सदानंद. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
वैद्य, भाई. भाषणवृत्तांत. लोकराज्य (पाक्षिक) १९७९.१०.०१–१६.
सामंत, मधुकर ल. मराठा.
क्षीरसागर, श्री. के. मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार. युगवाणी १९७९.११.१२.
—हरवले आहे : मराठीचे मराठीपण. महाराष्ट्र टाइम्स रविवार १९७९.०५.०६.

टीप : ह्या संदर्भसूचीमध्ये कालनिर्देश करण्याची पद्धति (१९७९.०५.०६, १९७९.०५,०५.०६ म्हणजे अनुक्रमे ६ मे १९७९, मे १९७९,६ मे) ही आंतरराष्ट्रीय मानकसंस्थेने पुरस्कारलेली आणि भारतीय–मानक–संस्थेने स्वीकारलेली पद्धति आहे.

ही सूची पुरी नाही, शिवाय दिलेल्या नोंदींपैकी काही अपुऱ्या आहेत. अधिक नोंदी पाठवल्यास मी आभारी होईन.

परिभाषेची परिभाषा

परिभाषासापेक्ष भाषाव्यवहाराचें स्वरूप

विशिष्ट विज्ञानक्षेत्र, विशिष्ट तंत्रविद्या, कायदा आणि शासनव्यवहार, फार काय विशिष्ट खेळ किंवा कला यांची एकएक स्वतंत्र परिभाषा असते, त्यात त्या क्षेत्रामधल्या ठळक गोष्टी आणि बारकावे असे दोन्ही टिपणाऱ्या पारिभाषिक संज्ञा असतात. ह्या पारिभाषिक संज्ञांच्या भोवती त्या क्षेत्राशी संबंधित असा भाषाव्यवहार फिरत असतो. एखादी संगीताची मैफल किंवा क्रिकेटची मॅच होऊन गेल्यावर तिचें स्मरणातून निरीक्षण करता करता चर्चेत रंगलेलीं त्या क्षेत्रातलीं जाणकार मंडळी तुम्ही कधी पाहिलीं आणि मुख्य म्हणजे ऐकलीं आहेत का? एखाद्या प्रयोगाचा खल करणारे वैज्ञानिक किंवा तंत्रज्ञ, एखाद्या केसचें विच्छेदन करणारे दोन डॉक्टर किंवा वकील किंवा उपसचिव यांची चर्चा आणि आताच सांगितलेली जाणकारांची चर्चा ह्यांत काहीच फरक नसतो. कारण ह्या सगळ्याच जाणकारांच्या चर्चा आहेत. अशा ह्या चर्चांमधून परिभाषा जन्माला येते आणि हा भाषाव्यवहार सुरळीत ठेवण्यात तिचें सार्थक आहे. परिभाषासमित्यांचे अहवाल आणि परिभाषाकोश हीं परिभाषेचीं नैसर्गिक वसतिस्थानें नव्हेत हें आपण जितक्या लवकर उमजू तितके बरें.

परिभाषा ही पारिभाषिक संज्ञांची बनते. पारिभाषिक संज्ञा म्हणजे काय? पारिभाषिक संज्ञा ही केवळ विज्ञान आणि तंत्रविद्या ह्यांच्याशीच संबद्ध असते हा गैरसमज आपण प्रथम दूर केला पाहिजे. (टेक्नॉलजी आणि टेक्निकल टर्म ह्यांमधल्या रूपसाम्यामुळे हा गैरसमज बळावला असावा!) व्याकरणाची पाणिनीय परिभाषा, देशी जमाखर्चाची परिभाषा आणि दुहेरी–नोंदपद्धतीच्या आधुनिक जमाखर्चाची परिभाषा, मुस्लिम कायद्याची परिभाषा, बुद्धिबळाच्या खेळाची परिभाषा अशा कितीतरी परिभाषा माणसाने वेळोवेळी तयार करून वापरल्या आहेत. परिभाषेसंबंधी दुसरा एक गैरसमज 'संज्ञा' ह्या शब्दामुळे होण्याची शक्यता आहे. पारिभाषिक संज्ञा तयार करायच्या म्हणजे व्याकरणात ज्यांना नामें म्हणतात तसले शब्द बनवायचे असें नव्हे. एक तर नामांबरोबरच विशेषणें, क्रियापदें, फार काय सर्वनामें आणि अव्ययें ह्यांचा देखील विचार करावा लागतो. (कायद्यातला whereas आणि he, तसेंच and/or प्रसिद्धच आहे!) दुसरें म्हणजे सुट्या शब्दांबरोबरच कधी

शब्दसमूह, फार काय वाक्यें ह्यांचाही विचार करावा लागतो. (वाणिज्यव्यवहारातल्या डबल एंट्री किंवा कॅश ऑन डिलिव्हरी किंवा फर्स्ट् कम फर्स्ट् सर्व्हड् ह्या आपल्या कानांवरून गेलेल्या असणार.) शेवटी तिसरा एक गैरसमज दूर करायचा म्हणजे परिभाषा म्हणजे एक वेगळीच भाषा आहे हा समज. नेहमीच्या भाषेतले शब्द अलग आणि परिभाषेतले शब्द अलग असें नेहमीच नसते. उद्दीपन–विभाव, लाइव्ह लोड, किंवा दरखास्त अशा शब्दांना त्या त्या परिभाषेबाहेर काही जीवनच नसतें आणि लबाड, चमत्कारिक, धडपडणें, डुलकी सारख्या शब्दांना कोणत्याच परिभाषेत शिरकाव मिळणें जरा अवघड दिसतें हें खरें आहे. पण ह्या सीमेवर दोन्हीकडून आवकजावक सतत असते हेंही तितकेंच खरें आणि अधिक महत्त्वाचें आहे. आडलरचा न्यूनगंड शब्द आज निराळ्याच अर्थानें तुम्ही आम्ही वापरतो तर व्हान हेल्मॉंट ह्या रसायन वैज्ञानिकाचा ‘ गॅस ’ पार स्वयंपाकघरात घुसला आहे. उलट ‘ क्रॉसिंग द फ्लोअर ’, ‘ फील्ड् ’ ह्या सारख्या साध्या शब्दांना पारिभाषिक अर्थ लाभला आहे, ‘ जेवण ’ आणि ‘ फराळ ’ ह्या शब्दांवर विमान कंपन्यांमध्ये त्यांच्या पारिभाषिक अर्थावरून काही वर्षांमागे वाद माजला होता, आणि ‘ फोर्स ’, ‘ पॉवर ’, ‘ स्पीड ’ ह्या नेहमीच्या शब्दांनाच भौतिकविज्ञानामध्ये थोडे वेगळे पारिभाषिक अर्थ लाभले आहेत.

असे गैरसमज का उत्पन्न होतात ? त्याचें एक साधें कारण हें आहे की ‘ पारिभाषिक संज्ञा ’ ही पारिभाषिक संज्ञा नाही. त्यामुळे व्यवहारातल्या कोणत्याही शब्दाप्रमाणे तिला नितळ कडा नाहीत. (जी स्थिति व्यवहारातल्या शब्दांची तीच स्थिती व्यवहारातल्या वाक्यरचनांची. आताच येऊन गेलेलें वाक्य पहा– व्यवहारातल्या शब्दाप्रमाणे तिला नितळ कडा नाहीत. ह्या वाक्याला चक्क दोन अर्थ आहेत. पण आपलें नडत नाही. आपण समजून घेतो की त्यांपैकी अमूक अर्थ प्रस्तुत संदर्भात बाद ठरतो. व्यवहारातली भाषा समजूतदारपणावर बरीच भिस्त ठेवते.) पण नाही नाही म्हणता आपण पारिभाषिक संज्ञा म्हणजे काय ह्या प्रश्नाच्या उत्तराच्या जवळ आलो की ! पारिभाषिक संज्ञा गैरसमजाला जागा ठेवत नाहीत आणि ह्या उलट व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार हा मंडळी समजूतदार असल्यामुळे गैरसमज फारसे उद्भवणारच नाहीत ह्यावर भिस्त ठेवतो ह्या दोन अपेक्षा आपण व्यक्त केल्या. गोष्ट अशी आहे की हा केवळ संज्ञेच्या पारिभाषिक उपयोगाचा प्रश्न नाही तर भाषेच्या पारिभाषिक उपयोगाचा प्रश्न आहे.

भाषेचा ठळक आणि मध्यवर्ती उपयोग व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार आहे हें उघडच आहे. हा भाषाव्यवहार एका साचेबंद अशा अर्थनिश्चितीकडे कलला की परिभाषासापेक्ष व्यवहार उद्भवतो. ही अर्थनिश्चिति संदर्भावर भिस्त न ठेवता

पूर्वसंकेतावर किंवा व्याख्येवर[1] भिस्त ठेवून साधायची असते.[2] हें कसें साध्य होतें? एक किंमत देऊन; भाषाव्यवहार क्षेत्र म्हणजे संपूर्ण मानवी जीवन असतें तसें तें न ठेवता एका मर्यादित आणि जाणकारांच्या आवाक्यातल्या उपक्षेत्राची निवड करून हें साध्य होतें. प्रत्येक परिभाषेचें म्हणून एक क्षेत्र असते.

परंतु भाषाव्यवहार एका बरोबर उलट दिशेने कलणें देखील संभवतें. ह्या दिशेने तो जास्तीत जास्त कलला म्हणजे आपण कवितेच्या रिंगणात प्रवेश करतो. इथे काव्याची भाषा न करता कवितेला महत्त्व मुद्दामच दिलें. इकडे कललेला भाषा-व्यवहार पूर्वसंकेतावर भिस्त न ठेवता कवितेच्या संदर्भावर भिस्त ठेवतो. येथे क्षेत्राचा संकोच केलेला नाही : संपूर्ण मानवी जीवनातलें इथे काहीच वर्ज्य नाही. परंतु हें मानवी जीवन त्या कवितेच्या रिंगणात प्रथम सामावलें पाहिजे. अमूक शब्दामुळे अमूक अर्थघटक अशी स्पष्ट वाटणी इथे नाहीं.

व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहाराला दोन विरुद्ध अंगांनी वेगवेगळी डूब मिळू शकते हें आपण पाहिलें– एका अंगाने परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार उद्‌भवतो असें आपण म्हणू. दुसऱ्या अंगाने काय उद्‌भवतें? काव्य उद्‌भवतें असें म्हटलें तर त्याच्या अलीकडच्या बऱ्याच प्रांताचें काय करायचें? तो सर्व प्रांत आणि काव्य मिळून शैलीसापेक्ष भाषाव्यवहार असें आपण म्हणू शकतो. व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार ह्या दोन्हींच्या मध्ये असल्यामुळे काही बाबतीत त्याचें परिभाषासापेक्ष व्यवहाराशी अधिक साम्य दिसतें. आपण काय म्हणतो आहोत त्याला महत्त्व आहे, तें नीट म्हटलें गेलें किंवा नाही हें जपण्यापुरतेंच शब्दाला साधन म्हणून महत्त्व. मुद्द्याचा मजकूर समोरच्या माणसापर्यंत पोचणें ह्याला महत्त्व आहे, तो मजकूर मराठीत की इंग्लिश मध्ये की चिनी भाषेत सांगायचा ह्याला तेवढ्यापुरतेंच साधन म्हणून महत्त्व आहे. क्रिकेटचा आस्वाद आपण इंग्लिशमधून घेतला काय किंवा हिंदीमधून घेतला काय सारखेंच. यूक्लिडची भूमिति मूळ ग्रीक मधून आपल्याला वाचता आली नाही ह्याची रूखरूख हाडाचा गणिती बाळगणार नाही. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार आणि व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार सारखेच रोखठोक आणि भाषा–शैलीबद्दल उदासीन असे असतात.

उलट काही बाबतीत व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार आणि शैलीसापेक्ष भाषाव्यवहार हे एकमेकाजवळ येतात. समजूतदार मंडळी संदर्भावरून योग्य तो अर्थ घेऊ शकतात

---

१. 'परिभाषा' ह्या शब्दाला व्याख्या असाही एक अर्थ संस्कृतमध्ये आहे. हिंदीमध्ये 'परिभाषा' म्हणजे 'व्याख्या, 'व्याख्या' म्हणजे विवेचक टीका, आणि 'तक्नीकी शब्दावली' म्हणजे परिभाषा.

२. हा पूर्वसंकेत आणि ही व्याख्या कृत्रिम असू शकेल किंवा परंपरेने चालत आलेली असू शकेल.

ह्यावर दोन्हींचा विश्वास आहे. पूर्वसंकेत लागत नाही असें कोण म्हणेल ? पण तो ढोबळ मानानें असला म्हणजे पुरे आहे, आणि तोही त्या त्या शब्दाला पूर्वीच्या प्रसंगी कोणकोणते संदर्भ लाभले होते आणि त्यांच्यापैकी बोलणारा आणि ऐकणारा ह्या दोघांनाही कोणते उपलब्ध आहेत ह्या माफक गोष्टीवर अवलंबून असतो. पूर्वसंकेत व्याख्येच्या पिंजऱ्यात अडकवण्याचा आग्रह नाही. एकाच संदर्भातही अर्थ व्यक्तिपरत्वे थोडा अरतापरता झाला तर त्याचीही फिकीर नाही.

गंमत अशी आहे की 'एक्स्ट्रीम्ज् मीट' ह्या उक्तीचा प्रत्यय ह्या त्रिपुटीच्या बाबतीत सुद्धा आपल्याला येतो. म्हणजे असें की काही बाबतीत परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार आणि शैलीसापेक्ष भाषाव्यवहार हे दोन्ही व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहारापासून वेगळे पडतात आणि एकमेकांशी साम्य राखून असतात. व्यवहारसापेक्ष भाषेचा साळढाळपणा, ढोबळपणा, अंगचोरपणा दोन्ही ठिकाणी खपत नाही. इकडचा शब्द तिकडे ठेवला, ह्या शब्दाऐवजी तो शब्द ठेवला तर 'तेंच तें ! मिळून काय ? एकच !' असें म्हणण्याची सोशीकता दोन्ही ठिकाणी मंडळी दाखवीत नाहीत. दोन्ही ठिकाणी मजकूर अर्थघन करण्याची धडपड असते. वेळ पडली तर नवीन कृत्रिम रूपेंही वापरायला परिभाषाकार आणि शैलीकार मागेपुढे पाहणार नाहीत. मात्र ह्या सगळ्या प्रकारांमुळे अर्थप्रस्तावन आणि अर्थग्रहण ह्या दोन्ही क्रिया अवधानपूर्वक कराव्या लागतात. पण ही सर्व साधना करण्याचे त्यांचे मार्ग वेगळे आहेत एवढेंच ! परिभाषासापेक्ष व्यवहारात एकूण मानवी भाषेच्याच मर्यादा ओलांडण्याची जिद्द असते. बुद्धिबळाच्या खेळी, परीक्षानळीमधल्या रासायनिक प्रक्रिया, संगीतामधल्या स्वरांचा विहार साध्या भाषेची कास सोडून सरळ नोटेशनमध्ये पकडून ठेवण्याचा प्रघात पडतो. उलट शैलीसापेक्ष भाषाव्यवहारात आपल्याला त्या त्या विशिष्ट भाषेच्या शक्यता आणि मर्यादा ह्यांचा उपयोग करून घ्यायचा असतो. कवितेच्या भाषांतराला उगीच नाही यातायात पडत ! ही भाषा व्यवहारसापेक्ष भाषेपासून दूर चालली बुवा अशी कुरकूर सामान्य वाचक दोन्ही ठिकाणी करतो. पण दोन्ही ठिकाणी जाणकार ह्या दूर जाण्याबद्दल अधिक समजूतदारपणा दाखवतात, तसेंच सामान्यांच्या कुरकुरीबद्दल दोन्ही ठिकाणी ते बेफिकिरीच दाखवतात.

परिभाषासापेक्ष, व्यवहारसापेक्ष, आणि शैलीसापेक्ष भाषाव्यवहाराची तीन उदाहरणें म्हणून या लेखाच्या शेवटी तीन उतारे जोडले आहेत. ते ढोबळपणे एकाच विषयावरचे आहेत त्यामुळे त्यांची एकमेकांशी तुलना करून प्रस्तुत विवेचनाचा पडताळा पाहणें वाचकाला सोपें जावें.

एवढ्या पार्श्वभूमीवर पारिभाषिक संज्ञांचें नेमकें स्वरूप काय हें समजायला अधिक सोपें जाईल. पारिभाषिक संज्ञा आकाशातून पडत नाहीत; नित्याच्या लोकव्यवहारातल्या भाषेमधूनच त्या वेगळ्या पडत जातात. भाषेतली कोणतीही संज्ञा घेतली तर तिला

शब्द आणि अर्थ अशी दोन अंगें असतात. त्यांचा योग चिह्नांकन-संबंधामुळे घडून येतो. मात्र तसा योग होण्यापूर्वी दोन्ही अंगावर संस्कार व्हावे लागतात. शब्द म्हणजे तान्ह्या बाळाची लुबलुब नव्हे तर शब्दरूपें. अर्थ म्हणजे तान्ह्या बाळासमोरचें विल्यम जेम्झ् म्हणतो तें 'बूमिंग बझिंग कन्फ्यूझन' नव्हे, तर अर्थरूपें. शब्द–शब्दरूपें–चिह्नांकन–अर्थरूपें–अर्थ अशी ही अखंड साखळी आहे. ती अखंड राहिली नाही की संदेश–संक्रमण थांबतें, बोलणारा आणि ऐकणारा ह्यांच्यामधलें दळणवळण तुटतें किंवा भरकटतें. परिभाषानिर्मितीचीं मार्गदर्शक तत्त्वें आपण पुढें पाहू त्या वेळी अर्थरूपें, चिह्नांकन, शब्दरूपें ह्या साखळीतल्या तीन दुव्यांचा आपल्याला क्रमाने विचार करावा लागेल.

तूर्त आपण अर्थरूप ह्या दुव्याचें अधिक निरीक्षण करू. त्याशिवाय पारिभाषिक संज्ञांचे दोन महत्त्वाचे प्रकार कसे पडतात हें आपल्याला समजणार नाही. तें समजलें नाही तर रसायनाची मराठी परिभाषा बनवताना ऑक्सिजन, कार्बन ह्यासारख्या संज्ञा तशाच इंग्लिश शब्दरूपात ठेवायला हरकत नाही पण रिॲक्शन, ॲसिड, मॉलिक्यूल ह्यासारख्या संज्ञांना मात्र मराठी प्रतिशब्द बनवायला पाहिजेत हा भेदभाव का पत्करला गेला हें (उदाहरणार्थ) आपल्या ध्यानात येणार नाही. त्याचप्रमाणे परिभाषा बदलत कशी जाते हेंही स्पष्ट होणार नाही.

अर्थरूपाला दोन अंगें असतात तीं म्हणजे गुणबोध आणि वस्तुनिर्देश. निराळ्या शब्दात सांगायचें तर विशिष्ट प्रसंगी श्रोत्याला चिन्हांकनामार्फत वक्त्याला अभिप्रेत असलेल्या वाच्यार्थाकडे पोचताना कधी गुणबोध ह्या पुलावरून जावें लागतें, कधी वस्तुनिर्देश ह्या पुलावरून जावें लागतें, कधी दोन्ही पूल उपलब्ध होतात. एक दृष्टांत देऊन आपल्याला हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल. आपण दोन तऱ्हेने चित्र काढू शकतो– समोर एका माणसाला किंवा वस्तूला ठेवून त्याची प्रतिकृति करायची म्हणून किंवा तसें काही न करता मनानेच एक आकृति काढायची म्हणून. चित्र पाहणाराही मग दोन तऱ्हेने त्या चित्राकडे पाहू शकतो–समोरच्या चित्राचा आपल्या अनुभवक्षेत्रातल्या वस्तूशी पडताळा पहायचा म्हणून किंवा त्या चित्रातली आकृति मनात बिंबवून तशी वस्तु आपल्या अनुभवक्षेत्रात मिळते का हें पाहण्यासाठी म्हणून. चित्र पाहणाराची तऱ्हा आणि तें काढणाराची तऱ्हा ह्यांचा मेळ बसेलच असें नाही. त्या दोन्ही तऱ्हा आपण कायम एकमेकीपासून अलग ठेवू शकू असेंही नाही. प्रत्येक जोडीतल्या पहिल्या तऱ्हेला आपण वस्तुनिर्देश म्हणू (चित्रावरून प्रथम वस्तूकडे जायचें) आणि प्रत्येक जोडीतल्या दुसऱ्या तऱ्हेला आपण गुणबोध म्हणून (चित्रावरून प्रथम आकृतीची दखल घ्यायची). भाषेकडे परत वळलें तर आपल्याला असें दिसून येईल की काही संज्ञा वस्तुनिर्देशाशी आपल्याला अधिक खिळवतात, तर काही संज्ञा तुलनेने गुणबोधात आपल्याला अधिक गुंतवतात.

'घोडा', 'खिंकाळला' हे शब्द बोलतांना किंवा ऐकल्यावर वस्तुनिर्देशाला प्राधान्य मिळतें—घोडा 'दिसतो', खिंकाळणें 'ऐकू येतें'. कोशातल्या व्याख्या पाहिल्या तर गुणबोधाचा दृष्टीने त्या कच्च्या पडतात—'चार पाय, शेपूट, आयाळ असलेला प्राणी' ही काय व्याख्या झाली! (ती तर सिंहालाही लागू पडते.) त्या मानाने 'एक प्राणिविशेष' म्हणणें अधिक प्रामाणिकपणाचें. स्पष्टच बोलायचें तर तर्कज्ञ ह्या संज्ञांना भले सामान्य नामें म्हणोत. भाषाव्यवहारात तरी त्यांचा तोंडवळा विशेष नामांशी अधिक जुळतो. 'घोडा' ऐवजी 'एक्वुस काबाल्लुस' म्हणून फारशी सुधारणा होत नाही. प्राणिवैज्ञानिक घोड्याचें तपशिलवार वर्णन अवश्य करील, पण हा गुणबोध होणार तो वस्तुनिर्देश पक्का झाल्यानंतरचा. 'ऑक्सिजन', 'कार्बन', 'ग्रॅम', 'व्हिटॅमिन बी-ट्वेल्व्ह' ह्या संज्ञांची स्थिति फारशी वेगळीं नाही. गुणबोधापेक्षा वस्तुनिर्देशाला प्राधान्य देणाऱ्या संज्ञांना आपण वस्तुलक्षी संज्ञा म्हणू.

'पक्षी', 'उडाला' हे शब्द बोलतांना किंवा ऐकल्यावर गुणबोधाला प्राधान्य मिळतें — वाघूळ हा पक्षी आहे की नाही हें ठरवण्यात सामान्य माणूस रस घेऊ शकतो, कारण गुणबोधाच्या आधारे वस्तुनिर्देश निश्चित करण्याचा हा प्रश्न आहे. वाघूळ हा पक्षी का नाही ह्याला सामान्य माणसाचेंही एक उत्तर असेल. प्राणिवैज्ञानिकाच्या उत्तरापेक्षा त्याचें उत्तर ढोबळ असेल एवढेंच. वाघूळ 'उडत' नाही, त्याच्या स्थलांतरक्रियेला 'ग्लायडिंग' म्हणणें अधिक युक्त होईल असा वादही 'उडाला' ह्या शब्दाच्या गुणबोधाच्या अंगाने घालता येईल. 'रिॲक्शन', 'ॲसिड' 'मॉलिक्यूल' ह्या संज्ञांचा व्यवहारही अशाच रीतीने चालतो — स्फटिकाला 'मॉलिक्यूल' म्हणायचें का असा प्रश्न विचारता येतो. वस्तुनिर्देशापेक्षा गुणबोधाला प्राधान्य देणाऱ्या संज्ञांना आपण गुणलक्षी संज्ञा म्हणू शकू.

भवभूतीच्या 'उत्तररामचरित' ह्या नाटकामधले वाल्मीकींच्या आश्रमातले ऋषिकुमार जेव्हा 'घोडा घोडा म्हणून ऐकून होतो तो हाच का?' असें म्हणतात तेव्हा आपल्याला गंमत वाटते ती सकारण आहे. कारण सामान्यतः वस्तुलक्षी ठरणाऱ्या संज्ञेचा व्यवहार इथे गुणलक्षी संज्ञेप्रमाणे होतो आहे. ह्या ठिकाणी तुमच्यापैकी काही जण मनात अस्वस्थ होऊन एकमेकांना कुजबुजत विचारत असणार की, 'गुणलक्षी संज्ञा' आणि 'वस्तुलक्षी संज्ञा' असें म्हणतांना केळकरांच्या मनात नेमक्या कोणत्या इंग्लिश संज्ञा आहेत? ही माझी अटकळ खरी निघाली तर मलाही सकारण हसू येईल. कारण ह्या दोन गुणलक्षी संज्ञांची संभावना इथे त्या वस्तुलक्षी संज्ञा असल्याप्रमाणे होते आहे. वास्तविक ह्या क्षणी तुमच्या मनात उपस्थित व्हायला पाहिजे तो प्रश्न असा – आपल्याला परिचित अशा मराठी शब्दांपैकी कोणते बरे गुणलक्षी ठरतील? आणि कोणते वस्तुलक्षी ठरतील? 'गुणलक्षी संज्ञा' आणि 'वस्तुलक्षी संज्ञा' ह्या

संज्ञांच्या मार्फत तुम्हाला झालेला गुणबोध अशा रीतीने वस्तुनिर्देशात परिणत होईल.[३]

पारिभाषिक संज्ञांमध्ये ह्या दोन्ही प्रकारच्या संज्ञा आढळतात. इतरही काही पद्धतींनी पारिभाषिक संज्ञांचे प्रकार पाडता येतील. पण तूर्त आपण तो विचार बाजूला ठेवून विज्ञानाच्या परिभाषेमधल्या संज्ञांच्या अर्थरूपांत कशाप्रकारे परिवर्तन होतें ह्याचा शोध घेऊ. फ्रॉइडच्या एका ठिकाणच्या प्रतिपादनाचा गोषवारा मी प्रथम देतो (कलेक्टेड पेपर्स, लंडन १९२५, खंड ४, पृ. ६०–१). विज्ञानाच्या परिघात निश्चित होणाऱ्या संकल्पनांच्या बाबतीत फ्रॉइड म्हणतो– अवलोकन आणि प्रयोग ह्यातून गाठी येणाऱ्या अनुभवसामग्रीची संगति लावताना वैज्ञानिकाच्या मनात ह्या संकल्पना आकार घेतात. ह्या संकल्पनांचें नातें त्या सामग्रीशी जडलेलें असतें हें निश्चित– पण अजून आपल्याला त्यांची स्पष्ट ओळख पटणें किंवा दुसऱ्याला पटवून देणें जमण्यासारखें नसतें. आपण त्या संकल्पनांना बदलत जातो– ठिकठिकाणी त्यांचें उपयोजन तर करीत जायचें पण तार्किक अंतर्विसंगति तर येऊ द्यायची नाही अशी आपली खटपट राहते. केव्हा तरी त्यांना व्याख्येमध्ये ठाणबंद करून टाकायची वेळ येते. अर्थात् ही सर्व क्रिया इथेच थांबत नाही. त्यांचा आशय बदलतच राहतो आणि त्याला अनुसरून व्याख्याही बदलावी लागते. फ्रॉइडने वर्णिलेली ही क्रिया गुणलक्षी पारिभाषिक संज्ञांसंबंधातली आहे. अशी गुणलक्षी पारिभाषिक संज्ञा आपल्या गुणबोधात एका सबंध उपपत्तीचें ओझें वागवीत राहते. फ्रॉइडच्याच ‘ इड ’, ‘ ईगो ’,

---

३. ह्या ठिकाणी उपस्थित केलेला प्रश्न केवळ हसून पुढे जाण्यासारखा नाही. इथून विचाराला जी वाट फुटते ती भारतामधल्या शिक्षणाला फार पूर्वीच्या काळापासून जडलेल्या एका जुनाट दुखण्याकडे घेऊन जाते. संस्कृत ही रोजच्या व्यवहारातली बोली राहिली नाही, तिचा लहान मुलाच्या स्वाभाविक भाषासंपादनाशी संबंध तुटला. ह्याचा एक परिणाम असा झाला की संस्कृतमधल्या गुणलक्षी संज्ञांचे अवमूलन होऊन त्या वस्तुलक्षी संज्ञा असल्याप्रमाणे त्यांचा वापर सुरू झाला. (उगीच नाही डझनभर संज्ञांचा अगदी एकच अर्थ अशी उदाहरणें पुष्कळ मिळू लागलीं.) संस्कृत भाषेचा अशा रीतीने निकस झालेला वापर ज्ञानग्रहण आणि ज्ञानाची पुनरुक्ति यांच्यासाठी सुरू झाला. (‘ अभ्यास ’ हा शब्दाचा जुना अर्थ पुनरुक्ति, तो ‘ अध्ययन ’ ह्या अर्थाने वापरात यावा ही घटना अनर्थसूचक आहे.) इंग्रजी विद्या आली, पण ज्ञानग्रहणाच्या आणि शिक्षणाच्या सवयी जुन्याच राहिल्या. माध्यमिक शाळा आणि नंतर महाविद्यालयें ह्यांच्यामधून नंतर मराठी माध्यम आलें. पण दुखण्यावर इलाज झाला नाही. नवज्ञाननिर्मितीची क्रिया इंग्रज यायच्या आधीपासूनच कुंठित झाली होती.

' सुपर-ईगो ' इत्यादि संज्ञा घेतल्या तर आपल्याला दिसून येईल की ह्यातली कोणतीही एक संज्ञा समजावून घेणें म्हणजे जोडीच्या इतर संज्ञा समजावून घेणें आणि सगळ्या समजावून घेणें म्हणजे त्याची एक सर्वच उपपत्ति समजावून घेणें. आधी ह्या संज्ञा एकएकट्या समजावून घेऊ आणि त्यांच्या साहाय्याने नंतर उपपत्ति समजावून घेऊ असें शाळकरी वेळापत्रक आपल्याला आखता येणार नाही.

वस्तुलक्षी पारिभाषिक संज्ञाही परिवर्तनामधून सुटत नाही. वैज्ञानिक उपपत्ति बदलते तशी वस्तूंचीं वर्गीकरणें बदलावीं लागतात. तीं बदललीं की वस्तुलक्षी संज्ञांचा वस्तुनिर्देश क्वचित् बदलतो, पण मुख्य म्हणजे त्यांनी होणारा वर्णनात्मक गुणबोध बदलतो. उपपत्ति जेवढी प्रगत होते तेवढा हा गुणबोध औपपत्तिक होतो–उदाहरणार्थ ' ऑक्सिजन ' ची गुणबोधात्मक व्याख्या मग आम्लजनक वगैरे रहात नाही. (' ऑक्सिजन ' हें नाव आम्लजनक ह्या अर्थी मिळालें हा भाग इतिहासजमा ठरतो), ती ' ज्याचा आण्विक बोधांक १६ आहे तें मूलतत्त्व ' अशी होते. ' एक्वुस कावाल्लुस ' च्या बाबतीत ती स्थिति अजून तरी आलेली नाही. ' कावीळ ' ची व्याख्या ' रोगविशेष ' अशी न राहता ' रोगलक्षणसमुच्चयविशेष ' एवढीच राहते आणि काविळीचे उपप्रकार हे आता स्वतंत्र ' रोगविशेष ' ठरतात. सबंध प्राणि-सृष्टीचा वंशवृक्ष उभा राहिल्यानंतर ' पक्षी ' (' एव्हीज ') ही वैज्ञानिकाच्या लेखी गुणलक्षी संज्ञा न राहता ह्या वृक्षाच्या एका शाखेची वस्तुलक्षी संज्ञा म्हणूनच केवळ राहते. (काही पक्षिविशेष उडत नाहीत ह्यामुळे तो विचलित होत नाही.) ' केवळ ' शब्द वापरण्याचें कारण विज्ञानाच्या औपपत्तिक गाभ्याचा भार गुणलक्षी संज्ञाच वाहतात, वस्तुलक्षी संज्ञावर ती जबाबदारी नसते–हें आपण मागेच पाहिलें. सगळ्याच गुणलक्षी संज्ञा इतक्या महत्त्वाच्या असतात असें मात्र नाही–' चतुष्पाद ' ह्या संज्ञेला पूर्वीइतकें महत्त्व राहिलेलें नाही. सगळ्या महत्त्वाच्या संज्ञा गुणलक्षी असतात एवढेंच आपण म्हणत आहोत.

कोणतीही परिभाषा ही अखेर एक मानवी निर्मिति आहे. तिच्यात होणारीं परिवर्तनें हीं नेहमीच सुधारणा ठरणार असतील असा भरवसा नाही. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार स्थिर झाला तर परिभाषा स्थिर होते. त्यात विकृति उत्पन्न झाली तर पारिभाषिक संज्ञांचा गुणबोध आणि वस्तुनिर्देश चुकीच्या वळणावर जाऊ शकतो. कधी कधी तो शून्याजवळ येऊन ठेपतो. आधुनिक समाजवैज्ञानिक गद्याचा हा नमुना पहा(अवतरणस्थळ एनकाउंटर, डिसेंबर १९७२, पृ. ४१) Modernization is the process whereby national elites seek successfully to reduce their *atimic* status and move towards equivalence with other " well-placed " nations. The goal of equivalence is not a fixed but a moving " target ". आधुनिकीकरण ह्या संज्ञेची व्याख्या परिभाषेच्या ओझ्या-

खाली चेंगरून गेली आहे. अशीच काहीशी गफलत उपमेचे अठ्ठ्यांयशी प्रकार करणाऱ्या प्राचीन भारतीय आलंकारिकांची झाली होती.

ज्याप्रमाणे व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहारात भाषेचा दुरुपयोग होऊ शकतो (उदाहरणार्थ आपल्या फायद्यासाठी दुसऱ्याला खोटें सांगणें) त्याचप्रमाणे शैलीसापेक्ष भाषाव्यवहारात भाषेचा दुरुपयोग होऊ शकतो (उदाहरणार्थ लोकांना नादी लावण्यासाठी किंवा त्यांच्या भावना भलत्या दिशेने भडकावण्यासाठी) आणि परिभाषासापेक्ष भाषाव्यवहारात भाषेचा दुरुपयोग होऊ शकतो (उदाहरणार्थ जाणता जाणत्याशी वितंडवाद करतो तेव्हा किंवा जाणता नेणत्यावर फुकट भाव मारतो तेव्हा किंवा नेणता स्वतःच्या अज्ञानावर परिभाषेचें पांघरूण घालून घेतो तेव्हा). मात्र अशा दुरुपयोगाच्या भीतीने आपण व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार टाकत नाही त्याप्रमाणे शैलीसापेक्ष किंवा परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार देखील टाकत नाही — आणि टाकू नयेही. (लोक पलंगावर पडल्यापडल्या मरतात म्हणून कुणी पलंगावर झोपायचें टाकत नाही!) परिभाषा हा जाणत्यांनी नेणत्यांच्या विरुद्ध केलेला कट नसून ती जाणत्यांनी जाणत्यांची पाहिलेली सोय आहे. मात्र ही सोय, ही सुकरता आणि कार्यक्षमता कायम टिकावी म्हणून डोळ्यात तेल घालून परिभाषेला अखंड जपावें लागतें.

परिभाषेच्या प्रश्न म्हणजे केवळ अविकसित किंवा विकसनशील समाजांपुढचा भाषासंक्रमणाचा प्रश्न अशी चुकीची समजूत आपल्याकडे रुळलेली दिसते. जणू इंग्लिशमध्ये अशा पारिभाषिक संज्ञा तयारच असतात, त्यांना एकएक करीत आपल्या भाषेसाठी प्रतिशब्द तयार करायचे, काही शब्द इंग्लिशच ठेवून नुसते लिप्यंतरित करायचे अशी ही भोळी समजूत दिसते. खरें तर ही परिभाषेसंबंधीची एक गौण बाब झाली. जे प्रगत, विकसित समाज परिभाषा नव्याने घडवतात, रंगलेल्या चर्चांमधून घडवतात, त्यांच्यापुढे परिभाषेचे खरे प्रश्न असतात. पुढच्या विवेचनात मुद्दाम इंग्लिश उदाहरणें काही वेळा निवडलीं आहेत.

परिभाषेसंबंधीचीं मार्गदर्शक सूत्रें

पूर्वी सूचित केलेंच आहे की अर्थसंक्रमण निर्वेधपणे होण्यासाठी शब्द – शब्दरूप – चिह्नांकन – अर्थरूप – अर्थ ही साखळी अखंड रहावी लागते. ह्या साखळीच्या अनुरोधाने परिभाषेसंबंधीच्या सूत्रांचे तीन गट पडतात :

(क) सूत्रें १ ते ४ : हीं अर्थरूपांसंबंधी वस्तुनिर्देश व गुणबोध यांच्याबद्दल आहेत. तीं परिभाषेला परिभाषा बनवतात.

(ख) सूत्रें ५ ते १३ : हीं चिह्नांकनासंबंधीं आहेत आणि परिभाषेला नेटकी, वापरायला सोयिस्कर, आणि शिकायला सुलभ बनवतात.

(ख – १) पैकी ४ ते ८ शब्द आणि अर्थ ह्यांची सांगड घालतात.

(ख – २) आणि ९ ते १३ समग्र परिभाषेची व्यवस्था नियंत्रित करतात व ती सुलभ बनवतात.

(ग) सूत्रें १४ ते १५ : हीं शब्दरूपांसंबंधी आहेत आणि परिभाषेला परिचयसुलभ बनवतात.

चौथ्या गटामधल्या सूत्रांचें स्वरूप मात्र काहीसें निराळें आहे.

(घ) सूत्रें १६ ते १९ : हीं आंतरक्षेत्रीय संदेशवहनासंबंधी आहेत आणि हें संदेशवहन कसें आणि कितपत सुकर करता येईल ह्याचा विचार करतात.

म्हणजे एकूण १९ सूत्रें होतात. ह्यांपैकी सूत्रें १ ते १५ साधारणपणे उतरत्या महत्त्वाचीं आहेत, म्हणजे कोणत्याही दोन सूत्रांत विरोध आला तर त्यांच्यापैकी आधीचें बलवत्तर मानावें. प्रथम ह्या १९ सूत्रांची यादी दिली आहे.

(क) अर्थरूपविषयक कार्यक्षमता
- (१) क्षेत्राचा निश्शेष परामर्श
- (२) केवळ क्षेत्राचाच परामर्श
- (३) व्याख्यासुलभता
- (४) एकतंत्ररक्षण आवश्यक

(ख) चिह्नांकनविषयक सुविधा
- (ख – १) शब्द – अर्थ ह्यांचें समायोजन
- (५) जिथे अर्थवैषम्य तिथे रूपवैषम्य
- (६) जिथे रूपवैषम्य तिथे अर्थवैषम्य
- (७) शब्दरूपाकडून अर्थाची सुलभ प्राप्ति
- (८) अर्थाकडून शब्दरूपाची सुलभ प्राप्ति
- (ख – २) समग्र परिभाषाव्यवस्थेचें नियंत्रण
- (९) भाषेच्या स्वाभाविक मर्यादांचें भान
- (१०) बदलत्या गरजांचा मुकाबला आवश्यक
- (११) सीमोल्लंघनासाठी तरतूद आवश्यक
- (१२) स्वीकार्यता
- (१३) परिचितता

(ग) शब्दरूपविषयक परिचयसुलभता
- (१४) अल्पाक्षरता
- (१५) अल्पसंश्लिष्टता

(घ) आंतरक्षेत्रीयसंदेशवहनविषयक मर्यादित सुकरता
- (१६) पारिभाषिक आदानप्रदानावर मर्यादा
- (१७) पारिभाषिक भाषांतरासाठीचे पर्याय

(१८) मतभिन्नतेच्या परिभाषांतरणावर मर्यादा
(१९) स्थलकालसापेक्षतेच्या परिभाषांतरणावर मर्यादा

या प्रत्येक सूत्राला शीर्षक दिलें आहे तें संबंधित सूत्र काय आहे तें समजलें म्हणजे अन्वर्थक वाटेल अशी अपेक्षा आहे. या सूत्रांची तपशीलवर चर्चा इथे करायचा विचार नाही. फक्त एक एक सूत्र मांडायचें आणि एखादुसरें उदाहरण घेऊन त्याला तें लावून दाखवायचें एवढाच मर्यादित हेतु सध्या ठेवला आहे. हीं उदाहरणें पुष्कळदा इंग्लिश भाषेतलीं घेतलीं आहेत.

(१) क्षेत्राचा निश्शेष परामर्श : परिभाषा अशी असावी की तिच्या मदतीने क्षेत्रात येणाऱ्या सर्व गोष्टींची दखल घेता येईल, कोणतीही गोष्ट सुटणार नाही.

उदाहरणार्थ व्यावहारिक संदर्भातून पाऊस, दव, हिम, गारा या सारखे शब्द वातावरणविज्ञानाला उपलब्ध होतात, पण त्यांच्याखेरीज ह्या व अशा सर्वच क्रियांना सामावून घेणारा precipitation हा शब्द लागतोच. व्यावहारिक भाषेत आपण तारेत एकंदर बारा शब्द मोजतो, बाळाला आता एकंदर बारा शब्द येऊ लागले म्हणतो. भाषेच्या सांख्यिकीय अध्ययनात मात्र अनुक्रमे १२ word-tokens आणि १२ word-types असा फरक करू. नेहमी डावा। उजवा ही दिशादर्शक जोडी पुरते. क्रिकेटच्या गरजा अशा आहेत की off आणि on वा leg अशी नवी जोडी कल्पावी लागते – मात्र मग बोलर डावखुरा आहे की नाही याचा स्वतंत्र उल्लेख करावा लागत नाही.

(२) केवळ क्षेत्राचाच परामर्श : परिभाषा अशी असावी की तिच्या आटोपात फक्त क्षेत्रात मोडणाऱ्या गोष्टींची दखल घेतली जाईल, क्षेत्राशी अप्रस्तुत असणाऱ्या गोष्टीत ती पडणार नाही.

हें सूत्र सूत्र १ ला पूरक आहे. वातावरणविज्ञानात प्रसन्न हवा किंवा कंटाळवाणें हवामान या शब्दसमूहांना स्थान नाही. भौतिकविज्ञानात mass, force, acceleration due to gravity ह्या संकल्पना सुस्थिर झाल्यावर weight ह्या स्वतंत्र संज्ञेला गचांडी मिळाली. ether ह्या संज्ञेला टाकून दिलें तें थोड्या निराळ्या प्रकारच्या कारणासाठीं—तशी काही गोष्ट मानण्याची गरज नाही हें दिसून आलें. rhythm हा शब्द अनेकांना आकर्षक आणि उपयुक्त वाटला. आता त्यामुळे तुम्हाला जर सगळीकडेच rhythm चा प्रत्यय येऊ लागला तर ती संज्ञा कोणत्याच क्षेत्रात उपयोगी राहणार नाही.

(३) व्याख्यासुलभता : पारिभाषिक संज्ञा अशी असावी की तिने होणारा वस्तुनिर्देश वा गुणबोध पडताळण्याजोगा असावा.

(क) संज्ञा गुणलक्षी ठरल्यास कोणत्या गुणांची अपेक्षा आहे हें व्याख्येत सांगणें महत्त्वाचें, शिवाय वस्तुनिर्देश पडताळण्यासाठी बाह्य लक्षणें दिल्यास उत्तम.

(ख) संज्ञा वस्तुलक्षी ठरल्यास तिच्या व्याप्तीत कोणत्या वस्तूंची अपेक्षा आहे हें व्याख्येत सांगणें महत्त्वाचें, शिवाय गुणबोध होण्यासाठी आंतरिक लक्षणें दिल्यास उत्तम.

force ची व्याख्या mass × acceleration अशी देण्यामागे तो मोजता कसा येईल याचा विचार आहे. perfect gas किंवा perfect market या संज्ञांमुळे कोणत्या गुणांचा बोध होतो तें महत्त्वाचें; मग तसा gas किंवा तसें market आपल्याला कधी भेटेल ह्याची चिंता करायचें कारण नाही. कोणत्याही रंगाच्या नावाची व्याख्या द्यायची तर hue, brightness (म्हणजेच valus), आणि saturation (म्हणजेच chroma) ह्या परिमाणावर तो कुठे पडतो हें सांगावें लागतें. झाड फुलें देणारें असलें तर झाडाच्या नावामुळे होणारा वस्तुनिर्देश सांगताना फुलाच्या पाकळ्या किती वगैरे तपशील देतात.

(४) एकतंत्ररक्षण आवश्यक : एकाच परिभाषेतल्या एकाच संज्ञेचा उपयोग दोघांनी केला तर त्यांना होणारे वस्तुनिर्देश आणि गुणबोध एकतंत्र होणें आवश्यक आहे. विशेषतः प्रेषकाला अभिप्रेत अर्थ आणि ग्राहकाला आकलन झालेला अर्थ एकच ठरायला पाहिजे. म्हणून ह्या तरतुदी कराव्या :

(क) संज्ञेच्या शब्दरूपात किंवा अर्थरूपात परिवर्तन करायचें झालेंच तर तें जाणीवपूर्वक आणि जाहीरपणें करावें.

(ख) परिभाषेत अभिप्रेत नसलेला गुणबोध एखाद्या शब्दरूपाला भाषेत चिकटलेला असेल आणि तो गुणबोध अर्थग्रहणात विक्षेप आणत असेल तर तो शब्द परिचित असला तरी बदलावा.

(ग) वस्तुनिर्देश बिनचूक व्हावा ह्यासाठी एक तर त्या संज्ञेची साध्या व्यवहारसापेक्ष भाषेत मांडलेली व्याख्या उपलब्ध असावी किंवा बाह्य लक्षणांवरून त्या वस्तूचें निदान करण्याची एखादी पद्धत उपलब्ध असावी किंवा निर्देशित वस्तु नव्याने निर्मिण्याची कृति उपलब्ध असावी.

एखाद्या वनस्पतीबद्दल अधिक माहिती मिळाली की तिचें वर्गीकरण बदलतें. मग कुणी वनस्पतिवैज्ञानिक तिला नवें पारिभाषिक नाव सुचवतो. पण अशा सूचनांची छाननी होऊन आंतरराष्ट्रीय मंडळाकडून मान्यता मिळाल्याशिवाय बदल अधिकृत ठरत नाही.

piggery officer साठी डुक्करवाडा-अधिकारी हा प्रतिशब्द का नको तर 'डुक्करवाडा' शब्दाला चिकटलेलें नित्याचें अर्थवलय त्या अधिकाऱ्याला उपद्रवकारक व्हायला नको म्हणून. साहित्यमीमांसेत अलंकार या शब्दाऐवजी काव्यविभ्रम हा शब्द का सुचण्यात आला तर काव्यातले अलंकार दागिन्यांप्रमाणे काढते-घालते आणि म्हणून उपरे वाटायला लागले म्हणून.

मोस (Mohs) ह्या जर्मन खनिजवैज्ञानिकाने hardness ची एक श्रेणी बसवली उदाहरणार्थ २ क्रमांकाचें काठिण्य म्हणजे जिप्समचें, ज्यावर १ क्रमांकाचा टॅल्क (संगजिरें) याने ओरखडा उठत नाही, पण ३ क्रमांकाचा कॅल्साइट किंवा त्याहून वरच्या क्रमांकाचा कोणताही पदार्थ यांनी ओरखडा उठतो. हिऱ्याचा क्रमांक अर्थातच सगळ्यात वरचा (मोसच्या पद्धतीने १०, हल्लीच्या सुधारित पद्धतीने १५) आहे. ह्या पद्धतीमुळें hardness ही पारिभाषिक संज्ञा झाली.

(५) जिथे अर्थवैषम्य तिथे रूपवैषम्य : एकाच परिभाषेतल्या आणि विशेषतः एकाच संदर्भात येण्याजोगल्या दोन संज्ञा घेतल्या तर त्यांच्यात घोटाळा होईल अशीं त्यांचीं शब्दरूपें नसावीं : विशेषतः तुल्यार्थ संज्ञा समरूप किंवा तुल्यरूप नसाव्या.

graphology ही संज्ञा phonology च्या धर्तीवर लेखनव्यवस्थेच्या अध्ययनासाठी वापरता येईल : परंतु graphology ला हस्ताक्षरावरून स्वभाव ओळखण्याची विद्या हा एक अर्थ अगोदरच चिकटला आहे त्यामुळे विचार पडतो. document आणि inscription ह्या संज्ञांसाठी अभिलेख हा एकच शब्द सुचवण्यात आला आहे. इतिहासविषयाच्या अभ्यासकाच्या दृष्टीने तर हें फारच गोंधळाचें आहे. स्वर ह्या शब्दाला musical note आणि vowel हे दोन अर्थ आहेत त्याने गोंधळ होण्याचा संभव फारसा नाही. पण भाषेच्या उच्चारणाच्या संदर्भात स्वर ह्या शब्दाला vowel आणि वैदिक संस्कृतमधला pitch accent असे दोन अर्थ राहणें किंवा ध्वनींच्या संदर्भात स्वर ह्या शब्दाला musical note आणि pitch असे दोन अर्थ राहणें म्हणजे घोटाळा होण्याचा संभव फारच आहे. organic हें विशेषण इंग्लिशमध्ये organ कडेही जाते (इंद्रियविषयक) आणि organism कडेही जाते (जीवसंबंधी) ह्यातून घोटाळा होऊन सेंद्रिय खत ही अभावितपणे विनोदी संज्ञा तयार झाली आहे.

(६) जिथे रूपवैषम्य तिथे अर्थवैषम्य : एकाच परिभाषेतल्या दोन संज्ञा घेतल्या तर त्यांचीं अर्थरूपें पुरेशीं वेगळीं असावीं : समानार्थी किंवा तुल्यार्थी संज्ञांचें भरताड परिभाषेत नसावें. विशेषतः एकाच संदर्भात तोच अर्थ दोनदा व्यक्त करायचा तर तो एकाच शब्दरूपाने करावा.

हें सूत्र सूत्र ५ ला पूरक आहे. ज्या व्यंजनांमध्ये हवेला तोंडामधून किंवा घशामधून निरुंद फटीतून जावें लागतें आणि त्यामुळे घर्षण–ध्वनि उत्पन्न होतो (उदाहरणार्थ f, s) त्यांना इंग्लिशमध्ये अमेरिकेत spirant व इंग्लंडमध्ये fricative म्हणतात. हें टाळता आलें तर बरें. संस्कृत साहित्यमीमांसेच्या परिभाषेत कविकर्म, कविव्यापार, काव्यक्रिया, काव्यकरण, काव्यनिर्मिति, आणि (एका अर्थाने) काव्यालंकार ह्या पूर्णपणे समानार्थी संज्ञा आहेत. हें भरताड नसतें आणि एकच संज्ञा असती तर अधिक नेटकेपणा आला असता.

(७) शब्दरूपाकडून अर्थाची सुलभ प्राप्ति : संदेशग्राहकाला शब्दरूपाकडून

अर्थाकडे प्रवास सुलभतेने करता यावा म्हणून शक्य तो ह्या तरतुदी कराव्या :

(क) संश्लिष्ट (म्हणजे निरनिराळ्या घटक-रूपांच्या जोडणीमधून तयार झालेलें) शब्दरूप आणि संश्लिष्ट अर्थरूप असल्यास त्या दोन्हीमध्ये सुसंवाद असावा. निराळ्या शब्दात सांगायचें तर संज्ञा शबलार्थ आणि म्हणून अपारदर्शी नसावी, अन्वर्थ आणि म्हणून पारदर्शी असावी.

(ख) संज्ञा विविधार्थ असली तर तिचे विविध अर्थ एकमेकांशी स्वाभाविकपणे आणि पद्धतशीरपणे जोडलेले असावे—म्हणजे विविधार्थ संज्ञा पारदर्शी असावी.

(ग) संज्ञेच्या शब्दरूपावरून अर्थाचें अनुमान करणें शक्य झालें तर ती संज्ञा प्रतिमादायी आणि म्हणून पारदर्शी ठरते. प्रतिमादायी संज्ञा अनुस्वनन, अनुरेखन, अवतरण, किंवा अनुक्रमण ह्यांच्यावर अवलंबून असतात.

प्राण्यांचे तापमानावर आधारलेले warm–blooded आणि cold–blooded असे वर्ग मानतात, पण संज्ञा अन्वर्थ नाहीत. तापमान कायम राहतें का भोवतालच्या परिसराइतकें राहतें हा खरा मुद्दा आहे, रक्त गरम राहतें का थंड राहतें हा मुद्दा नाही. म्हणून हल्ली homeothermic आणि heterothermic ह्या संज्ञा अनुक्रमे वापरतात. द्रव्याज्ञा म्हणजे moneyorder का आणि धनादेश म्हणजे cheque का हें सांगता येत नाही, तेवढ्यापुरत्या तरी त्या संज्ञा अपारदर्शी ठरतात.

inert हें विशेषण inert gas आणि inert body या संज्ञांमध्ये थोड्या वेगवेगळ्या अर्थानें वापरलें जातें. solution शब्दालाही संदर्भाप्रमाणे द्रावणक्रिया आणि द्राव असे अर्थ येतात. पण तरी सुद्धा inert आणि solution संज्ञा पारदर्शी राहतात. व्यक्तीच्या सन्मानार्थ तिच्या नावावरून संज्ञा साधणें हा पारदर्शी वस्तुलक्षी संज्ञा बनवण्याचा एक परिचित प्रकार आहे— उदाहरणार्थ 'मार्क्सवाद'.

प्रतिमादायी संज्ञांचीं हीं उदाहरणें पहा : sonic boom मध्ये अनुस्वनन आहे, U–tube मध्ये अनुरेखन आहे, 'बहुव्रीहि समास' मध्ये 'बहुव्रीहि' (पुष्कळ-तांदुळवाला) ह्या उदाहरणाचेंच अवतरण दिलें आहे, तर cash–and–carry मध्ये निर्देशित घटनांचा अनुक्रम संभाळला आहे.

(८) अर्थाकडून शब्दरूपाची सुलभ प्राप्ति : संदेशप्रेषकाला अर्थाकडून शब्दाकडे प्रवास सुलभतेने करता यावा म्हणून शक्य तो ह्या तरतुदी कराव्या. (शिवाय अशा तरतुदी केल्या तर ती संज्ञा अधिक पारदर्शी ठरण्याचा संभव आहे.)

(क) संज्ञेचें शब्दरूप संश्लिष्ट असलें तर तें शब्दरूप नियमात बसणारें असावें.

(ख) संज्ञा रूपांतरक्षम असली तर तीं रूपांतरें नियमांत बसणारीं असावीं.

हें सूत्र सूत्र ७ ला पूरक आहे : विशेषतः ८ क हें ७ क शी, ८ ख हें ७ ख शी तुल्य आहे. organism साठी organic हें विशेषण किंवा tooth साठी dental हें

विशेषण ही स्थिति नेटकी नाही. इंग्लिशमधलें voice, voiceless, voiced हें संज्ञांचें त्रिकुट संस्कृतवरून घेतलेलें आहे. मराठीत घोष, अघोष, सघोष हें त्रिकुट ठीक दिसतें. पहिल्याऐवजीं नाद आणि तिसऱ्याऐवजी घोषवत् वापरलें तर ही घडी विस्कटेल. इंग्लिशमध्ये indices हें वहुवचन न वापरता indexes हें बहुवचनी रूप वापरण्याकडे कल आहे तोही नियमितपणा सोयिस्कर ठरतो म्हणून.

(९) भाषेच्या स्वाभाविक मर्यादांचें भान : पारिभाषिक संज्ञा अशी असावी की ती नेहमीच्या वाक्यरचनेत सुखाने रुळावी. पण चिह्नांकनाची हानि होणार असेल तर भाषेच्या मर्यादा जरुरीपुरत्या निश्शंकपणे ओलांडाव्या.

मराठीत एखादें नाम रुळवायचें तर त्याला एक लिंग ठरवावें लागतें, मग तें लिंग क्षेत्राच्या दृष्टीने निरर्थक का असे ना. कायद्याच्या परिभाषेत and/or हें एक नवें अव्यय तयार करून घेतलें, मग त्याचा उच्चार कसा करायचा याची फिकीर मागाहून. कार्बन–रसायनामध्ये संयुगांचीं नावें एका दमात उच्चारण्यासारखीं किंवा एका ओळीत लिहिण्यासारखीं नसलीं किंवा त्या नावांत कंस टाकले असले तरी तीं आपण सुखाने खपवून घेतो.

(१०) बदलत्या गरजांचा मुकाबला आवश्यक : परिभाषेच्या क्षेत्रामधल्या वापराच्या गरजा विविध असणार. त्याचप्रमाणे त्या बदलत्या राहणार. ह्यामुळे एका गरजेतून निवडलेल्या संज्ञेचा मेळ दुसऱ्या गरजेशी कदाचित् बसणार नाही, परिणामी ती संज्ञा अपारदर्शी ठरणार, नव्या गरजेसाठी नवी संज्ञा योजावी लागणार. हे फेरफार शक्य तो टाळावे किंवा अटळ ठरले तर ते सुखाने व्हावे म्हणून ह्या तरतुदी कराव्या :

(क) एखादी संज्ञा जितकी विविध संदर्भांसाठी युक्त तितकें चांगलें. विविध संदर्भ म्हणजे एका क्षेत्रामधलीं उपक्षेत्रें किंवा जवळजवळचीं क्षेत्रें किंवा एका क्षेत्रामधले संप्रदाय किंवा एका भाषाक्षेत्रामधल्या विविध भाषाउपभाषा किंवा एका जीवंत परंपरेमधले विविध कालखंड.

(ख) एखाद्या संज्ञेचें शब्दरूप तिच्यापासून विविध भाषिक संदर्भात लागतील तशा नवनवीन संज्ञा सिद्ध करायला जितकें अनुकूल असेल तितकें चांगलें.

(ग) एखादी संज्ञा पुरेशी गुणबोधाच्या दृष्टीने व्याख्यासुलभ नसेल तर तिच्यासाठी संश्लिष्ट व अन्वर्थ शब्दरूप योजणें जिकिरीचें असतें, योजलें तरी तें कालांतराने अपारदर्शी ठरू शकणार. अशा ठिकाणी ती संज्ञा संश्लिष्ट नसावी, नसल्यास शबलार्थ असावी. (व्याख्यासुलभ नसणें म्हणजे व्याख्या सध्या तरी लांबलचक किंवा किचकट किंवा वादग्रस्त किंवा अनुपलब्ध असणें.)

(घ) वस्तुलक्षी संज्ञेला पारदर्शी करण्यात फारसें हशील नाही, कारण अशा संज्ञेकडून स्पष्ट गुणबोध अपेक्षित नसतो.

मेंदूच्या रचनेसंबंधीची परिभाषा शरीररचनाविज्ञानामधून तशीच मनोविज्ञानाच्या क्षेत्रात घ्यावी हेंच युक्त. सोन्याच्या शुद्धतेसाठी १ ते २४ कॅरट वापरणें, अल्कोहोल-युक्त पेयासाठी १ ते २०० प्रूफ वापरणें असें करण्यापेक्षा सगळ्याच पदार्थांसाठी १ ते १०० टक्के वापरलेले काय वाईट ? (उदाहरणार्थ १०० नंबरी सोनें.) सारख्याच पदावरच्या अधिकाऱ्यांस पश्चिम महाराष्ट्रात मामलेदार म्हणायचें, उरलेल्या महाराष्ट्रात (आणि भारताच्या बऱ्याच मोठ्या भागात) तहसिलदार म्हणायचें हें कशाला ? अर्थात् एकरूपता आणण्यात अडचणी येणार. उदाहरणार्थ मराठी–भाषिकांमध्ये education minister साठी शिक्षामंत्री हा शब्द रुळणें जरा अवघडच आहे. पण संस्कृतमधून शब्द घेतला तर भारतामधल्या बऱ्याच भाषांमधून एकच संज्ञा वापरता येईल हा आडाखा सामान्यतः बरोबर आहे.

सरकार शब्दावरून सरकारी, गैरसरकारी, निमसरकारी हे शब्द तयार करता येतात ही सोय आहे. उलटपक्षी बाळंतीण, बाळंतपण, सुईण ह्या तीन शब्दांपेक्षा सूतिका, प्रसूति, आणि प्रसाविका हे एकमेकांशी शब्दरूपांनी जुळते शब्द ठेवले तर ?

रोमँटिक ह्या संज्ञेला मराठी प्रतिशब्द कोणताही निवडला तरी तो अन्वर्थ नाही असा आक्षेप येऊ शकतो. मग मुळातली शबलार्थं अशी इंग्लिश संज्ञाच काय वाईट आहे ? रॉंट्यनला जेव्हा नवीन किरण सापडले तेव्हा त्याने x–ray हें नावच पसंत केलें. oxygen (आम्लजनक) ही संज्ञा विशेष अन्वर्थ नाही असें नंतर दिसून आलें; oxygen नसलेलीं आम्लें असतात; अशा वेळी oxygen पेक्षा O हें रूपच बरें असें वैज्ञानिकांना वाटू लागलें तर त्यात आश्चर्य नको. फ्रॉइडच्या अडचणींबद्दलचा उल्लेख अगोदरच येऊन गेला आहे. संज्ञा गुणबोधाच्या मार्गाने व्याख्यासुलभ नसण्याची अडचण वस्तुलक्षी संज्ञांच्या बाबतीत विशेषच संभाव्य आहे. वैज्ञानिक नियमांना जिथे ' घटत्या फळाचा सिद्धांत ' यासारखीं सुटसुटीत नावें देता येत नाही तिथे शोधकाचें नाव (उदा. ' ग्रिमचा नियम ') देऊन मोकळें होणें श्रेयस्कर ठरतें.

(११) सीमोल्लंघनासाठी तरतूद आवश्यक : परिभाषेच्या क्षेत्रासंबंधी त्या क्षेत्रामधलीं जाणकार मंडळी आणि क्षेत्राबाहेरचीं मंडळी ह्यांच्यात संदेशसंक्रमण सुखाने होण्याची काही प्रसंगी गरज असते. अशा प्रसंगी ह्या तरतुदी कराव्या :

(क) शक्यतो अपारदर्शी संज्ञा न वापरता पारदर्शी संज्ञा वापराव्या.

(ख) विविध संदर्भासाठी उपयुक्त ठरतील अशा संज्ञा अधिक पसंत कराव्या.

(ग) परिचित किंवा परिचयसुलभ संज्ञा अधिक पसंत कराव्या.

पारदर्शित्व साधायचें तर सूत्र ७ क, ख, ग आणि काही प्रमाणात सूत्र ८ क, ख हीं विचारात घ्यायला पाहिजे. क्षेत्राबाहेरचीं मंडळी दुसऱ्या जवळपासच्या क्षेत्रात जाणकार असणें अगदी शक्य आहे. आंतरक्षेत्रीय संवाद साधणें आणि जाणकाराने

आपलें म्हणणें लोकग्राह्य करणें ह्या व्यवहारांच्या गरजा पुष्कळदा भिन्न असणार. ह्या सूत्राला अनुसरून जाणकाराने आपलें म्हणणें इतरेजनांना सांगताना लोकग्राह्य करण्याचा प्रयत्न केला नाही तर परिभाषा ही सोय न वाटता परवलीचा शब्द वाटण्याचा संभव आहे. परिचयसुलभ संज्ञांची चर्चा सूत्रें १२ ते १५ मध्ये यायची आहे.

क्षेत्राबाहेरच्या मंडळींशी बोलताना ethics न म्हणता moral philosophy म्हणणें बरें, larynx न म्हणता voice–box म्हणणें बरें, arteriosclerosis न म्हणता hardening of the arteries म्हणणें बरें, vocable, lexeme, term, word ह्यामधले बारकावे किंवा word–type, word–token ह्यामधला बारकावा बाजूला ठेवून word शब्द वापरून भागलें तर पहावें.

(१२) स्वीकार्यता : पारिभाषिक संज्ञा शक्य तोवर अशी असावी की संबंधित भाषा बोलणारे लोक ती सहज स्वीकारतील आणि त्यामुळे ती परिचय-सुलभ ठरेल. ह्यासाठी ती संज्ञा त्या विशिष्ट भाषेच्या उच्चारण, व्याकरण, अर्थप्रकटन या संबंधीच्या मर्यादा न ओलांडणारी असावी, निदान त्या भाषेच्या एकंदर प्रकृतीशी विसंवादी नसावी.

हें सूत्र सूत्रें ९ आणि ११ ग यांच्याशी तुलावें. स्क्रू हा शब्द इंग्लिशमध्ये उच्चार-सुकर असला तरी तो मराठीत तसा ठरत नाही हें आपण लक्षात घ्यायला पाहिजे. उच्चारसौकर्य मराठीत देखील केवळ जोडाक्षरें टाळण्यावर अवलंबून नाही. directorate साठी संचालन–कार्यालय हा शब्द संचालनालय शब्दापेक्षा उच्चारसुकर ठरेल. मराठीत बहुव्रीहि समास हे तत्पुरुष समासापेक्षा अधिक दुष्कर ठरतात. एखाद्या संज्ञेचा संक्षेप P. E. E. किंवा A. S. S. हा कितीही सोयीचा असला तरी मंडळी सहसा स्वीकारतील असें वाटत नाही !

(१३) परिचितता : पारिभाषिक संज्ञा शक्यतोवर अशी असावी की ती व्यवहार-सापेक्ष भाषाव्यवहारात किंवा दुसऱ्या एखाद्या परिचित परिभाषेत रुळलेली असावी आणि तिला मिळायचा नवा पारिभाषिक अर्थ जुन्या परिचित अर्थाशी जुळता असावा. निदान ती संश्लिष्ट असल्यास तिचे घटक परिचित असावे. हें साधताना साहजिक पैतृक शब्द, शब्दघटक हे आदत्त शब्द, शब्दघटकांपेक्षा अधिक पसंत केले जातील.

हें सूत्र सूत्र ११ ग शी तुलावें. atom आणि molecule साठी पूर्वी मराठीत अनुक्रमे परमाणु आणि अणु प्रतिशब्द निवडले गेले. पैकी atom आणि अणु अधिक परिचित, atom bomb साठी 'अणु-बॉंब' सगळ्यांच्या तोंडी झाला. आता atom साठी अणु आणि molecule साठी रेणु कायम झालेले दिसतात, परमाणु प्रचारात आला नाही. bureaucracy साठी नोकरशाही, goods train साठी मालगाडी, luxury bus साठी आरामगाडी, आणि employment office साठी हिंदी भाषेतला

कामदिलाऊ दफ्तर हीं परिचित घटकांमधून बनवलेल्या आणि म्हणून सुखाने रुळलेल्या संज्ञांचीं उदाहरणें. overnight bus साठी रातराणी किंवा दिल्ली परिवहनच्या Ring Road Circular Route bus साठी मुद्रिका हीं थोडीं अधिक कल्पक उदाहरणें. आदत्त स्क्रूपेक्षा पैतृक पेच बरा; 'स्क्रू'चे पुष्कळांना 'इस्क्रूर' शब्दरूप करून घ्यावें लागतें.

(१४) अल्पाक्षरता : पारिभाषिक संज्ञा शक्य तोवर अल्पाक्षर आणि म्हणून परिचयसुलभ असावी—विशेषतः जी वारंवार वापरावी लागणार अशी संज्ञा अल्पाक्षर असावी. ह्यासाठी, जिथे पर्याय उपलब्ध असतील तिथे अल्पाक्षर पर्याय निवडता येईल किंवा संक्षेप करून अल्पाक्षर पर्याय उपलब्ध करता येईल. मात्र मूळ संज्ञा अति—अल्पाक्षर नसावी.

हें सूत्र सूत्र ११ ग शी तुलावें. cycles per second हा शब्दसमूह वापरावा लागतो, त्यासाठी c. p. s. हा संक्षेप आला आणि नंतर Hertz हे संबंधित वैज्ञानिकाचें नावच त्याऐवजी पसंत करण्यात आलें. शालेय अंकगणितामधले म. सा. वि. (महत्तम साधारण विभाजक) आणि ल. सा. वि. (लघुतम साधारण विभाज्य) आपल्याला माहीत आहेतच. पाणिनीच्या ठक्, डु सारख्या अति-अल्पाक्षर संज्ञा सर्वसाधारण वापरासाठी सोयीच्या नाहीत. वर्तमानपत्र पेक्षा वृत्तपत्र शब्द पुढे आला हें अल्पाक्षरतेमुळे झालें असावें.

(१५) अल्पसंश्लिष्टता : पारिभाषिक संज्ञा शक्य तोवर व्याकरणदृष्ट्या कमी संश्लिष्ट आणि म्हणून परिचयसुलभ असावी—म्हणजे घटक कमी, रचना सोपी असें असावें. विशेषतः जी वारंवार वापरावी लागणार अशी संज्ञा अल्पसंश्लिष्ट असावी. ह्यासाठी, जिथे पर्याय उपलब्ध असतील तिथे अल्पसंश्लिष्ट पर्याय निवडतात येईल किंवा संज्ञेमधले काही घटक वा उपघटक अध्याहृत ठेवून अल्पसंश्लिष्ट पर्याय उपलब्ध करता येईल.

हें सूत्र सूत्र ११ ग शी तुलावें. road traversible by a motor vehicle यापेक्षा motorable road अधिक सुटसुटीत म्हणून परिचयसुलभ. मराठी भाषाभाषी ऐवजी मराठीभाषी हा शब्द बरा. leave of absence (म्हणजे गैरहजेरीसाठी रजा किंवा परवानगी) ऐवजी leave, acknowledgement of receipt (प्राप्तीची स्वीकृति) ऐवजी receipt किंवा acknowledgement, minority group ऐवजी minority, वृत्तपत्रकारव्यवसाय ऐवजी पत्रव्यवसाय हीं संक्षेपाने अल्पसंश्लिष्ट पर्याय करून घेण्याचीं काही उदाहरणें देता येतील.

(१६) पारिभाषिक आदानप्रदानावर मर्यादा : प्रत्येक मानवी कार्यक्षेत्राच्या आपल्या म्हणून काही गरजा आणि काही साध्यें असतात. त्यामुळे एका कार्यक्षेत्रामधून दुसऱ्या कार्यक्षेत्रात एखादी पारिभाषिक संज्ञा प्रदान

व्हायची असेल तर तसें होताना त्या दोन्ही कार्यक्षेत्रांशी संबंधित मर्यादा अशा प्रदत्त संज्ञेवर पडतात.

व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहारातल्या force किंवा power किंवा work ह्या संज्ञा भौतिकविज्ञानात घेताना त्यांचा मानवी स्नायूंच्या हालचालींचा संदर्भ बाजूला ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागते; weight ह्या संज्ञेबरोबर येणारा पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा संदर्भ नको असल्यास mass ही नवी संज्ञा स्वीकारावी लागते; light शब्दाचा अनुकूल मूल्यभाव आणि heat शब्दाचा प्रतिकूल मूल्यभाव (उदाहरणार्थ there was more heat than light in the argument) अप्रस्तुत म्हणून त्याज्य ठरतो.

व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहारातल्या power किंवा opinion ह्या संज्ञा मानवी समाजाच्या वैज्ञानिक अध्ययनात वापरताना आपण समाजावर सचेतन प्राण्याचा किंवा मन असलेल्या व्यक्तीचा आरोप तर करीत नाही याची खबरदारी घ्यावी लागते.

लॅटिन ही फ्रेंच भाषेची जननी आहे असें कुणी भाषावैज्ञानिकाने म्हटलें तर त्याला 'मग फ्रेंच भाषेचा जनक कोणता ?' हा प्रश्न विचारणें किंवा फ्रेंच भाषेतून इंग्लिश भाषेत आलेल्या loanword संबंधी बोलतांना 'त्याची परतफेड केव्हा करायची ?' असा प्रश्न विचारणें मूर्खपणाचें ठरेल.

(१७) पारिभाषिक भाषांतरासाठीचे पर्याय : जेव्हा एका मानवी भाषेत उपलब्ध असलेल्या पारिभाषिक संज्ञांचें दुसऱ्या मानवी भाषेत संक्रमण म्हणजे अनुप्रेषण करायचें असतें तेव्हा तें दोन मार्गांनी होऊ शकतें : एका भाषेतलें शब्दरूप थोड्याफार फेरफारांनिशी दुसऱ्या भाषेत प्रत्यक्षतः आदान करणें किंवा एका भाषेतलें केवळ अर्थरूप थोड्याफार फेरफारांनिशी दुसऱ्या भाषेत अप्रत्यक्षतः आदान करून त्या दुसऱ्या भाषेत समानार्थी प्रतिशब्दरूप बनवणें. ह्या दोन मार्गांनी परिभाषासंक्रमण करताना पुढील विचारांचें तारतम्य बाळगावें :

(क) जिथे प्रदायक भाषेत संश्लिष्ट आणि बऱ्यापैकी अन्वर्थ ठरणारें शब्दरूप आदायक भाषेत अपारदर्शी ठरण्याचा धोका असतो तिथे प्रत्यक्ष आदान बरें.

(ख) संज्ञा वस्तुलक्षी असेल तर ती प्रत्यक्ष आदानाला अधिक अनुकूल असते आणि गुणलक्षी असेल तर ती अप्रत्यक्ष आदानाला अधिक अनुकूल असते.

(ग) जिथे संज्ञा अन्वर्थ असणें अधिक श्रेयस्कर तिथे अप्रत्यक्ष आदान बरें.

(घ) प्रदायक आणि आदायक भाषांमध्ये अगोदरपासून ऐतिहासिक

कारणांमुळे किंवा क्वचित् योगायोगाने जीं साम्यस्थळें निघतील त्यांचा फायदा घ्यावा.

(ङ) अप्रत्यक्ष आदान करताना आदायक भाषेतल्या जुन्या शब्दरूपांचें पुनरुज्जीवन करून भागलें तर पहावें.

(च) परिभाषासंक्रमण करताना प्रदायक भाषेतील परिभाषेत शिरलेले अर्थरूपविषयक किंवा शब्द–अर्थ ह्यांच्या समायोजनासंबंधीचे दोष काढून टाकण्याची संधि घ्यावी आणि समग्र परिभाषाव्यवस्थे-संबंधीचे किंवा शब्दरूपविषयक दोष नव्याने येणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.

सूत्र १७ क शी १० ग तुलावें. सूत्र १७ ग साठी ७ क, ११ क विचारात घ्या. सूत्र १७ च मध्ये दोषांचे चार प्रकार सांगितले आहेत त्यांचा संबंध सूत्रांच्या चार गटांशी अनुक्रमे पोचतो—सूत्रें १ ते ४, सूत्रें ५ ते ८, सूत्रें ९ ते १३, आणि सूत्रें १४ ते १५. आता १७ क ते १७ च ह्यांचीं उदाहरणें अनुक्रमाने पाहू.

heavy water साठी जड पाणी ठीक दिसते, पण hard water साठी टणक पाणी जमणार नाही, कठीण पाणी कदाचित् चालेल.

रासायनिक मूलद्रव्यांसाठी ऑक्सिजन, ॲल्युमिनियम, कार्बन, निकेल, ॲंटिमनी इत्यादि संज्ञा गंधक, लोखंड, पारा इत्यादि संज्ञांच्या बरोबर रुळायला अडचण नाही. ऑक्सिजनऐवजी प्राणवायु म्हणणें हें सूत्रें ४ क, ४ ख, आणि १० घ यांच्या विरुद्ध जाईल, ॲंटिमनीऐवजी सुरम्याचा धातु म्हणणें सूत्र १५ विरुद्ध जाईल, पण मुख्य म्हणजे असे शब्द करून काही साधणार नाही. ह्या मुख्यतः वस्तुलक्षी संज्ञा आहेत, त्यांच्या गुणबोधक व्याख्या केल्याच तर त्या atomic number वर आधारित आहेत. उलट reaction, catalyst, compouud इत्यादि गुणलक्षी संज्ञांची गोष्ट निराळी आहे. त्या मराठीत लिप्यंतर करून प्रत्यक्ष आदानाच्या मार्गे घेणें श्रेयस्कर नाही. तीच गोष्ट seed–farm या शब्दाची. इंग्लिश न जाणणाऱ्या शेतकऱ्याला शीडफारम शब्द ‘ माहीत ’ झाला असें समजून समाधान मानण्यात अर्थ नाही. त्याला वस्तुनिर्देश होईल, गणिताचें उत्तर ठाऊक होईल; पण गुणबोध होणार नाही, गणिताची रीत न कळलेल्या मुलासारखी त्याची अवस्था होईल. बीजप्रगुणन–क्षेत्र सारखी संज्ञा सूत्रें ११ ग, १२, १३, १४ यांच्या विरुद्ध जाईल. बियाण्याचें शेत ही संज्ञा ठीक राहील.

जड पाणी, बियाण्याचें शेत हीं अशा अप्रत्यक्षतः आदत्त शब्दांचीं उदाहरणें ठरतात. हें करतांना अडचणी येतात—सेंद्रिय खत या प्रतिशब्दाचें उदाहरण सूत्र ८ क च्या संबंधात दिलेंच आहे. प्रदायक भाषेमधली गुणलक्षी संज्ञा शबलार्थ असली तर अप्रत्यक्ष आदान केवळ तिच्या अर्थरूपावर आधारावें लागतें. syntax साठी वाक्य-व्यवस्था आणि वाक्यव्याकरण असे दोन शब्द योजावे लागतील; संन्यास किंवा

संरचन करून भागणार नाहीं. संधि साठीं euphonic combination ठीक वाटे ना, तेव्हा इंग्लिशने सरळ sandhi (सँडी) शब्दच पत्करला.

जर्मन Lehnwort साठी इंग्लिश प्रतिशब्द loanword, इंग्लिश geometry (मूळ ग्रीक geometria) साठी बांगला ज्यामिति ही सूत्र १७ व चीं उत्तम उदाहरणें. sonnet साठी सुनीत, survey साठी सर्वेक्षण ह्यात योगायोगाचा आधार घेतला आहे. पण semantics साठी काहींनी सुचवलेली संज्ञा सीमांतिकी—हें जरा फारच झालें ! यात नुसतीच काकतालीयन्यायावर भिस्त आहे, अर्थबोधाचा पत्ताच नाही. (semantics हें भाषाविज्ञानाच्या सीमेवर असतें म्हणे !)

algebra साठी बीजगणित, geometry साठी रेखागणित हीं अशी पुनरुज्जीवनाचीं उदाहरणें आहेत. हुंडीचे शहाजोग, नामजोग, धनीजोग असे प्रकार असत, त्यावरून bearer cheque साठी शहाजोग चेक, order cheque साठी नामजोग चेक किंवा धनीजोग चेक असे प्रतिशब्द सुचवण्यात आलेले आहेत. (bearer cheque म्हणजे दर्शनी चेक मात्र नव्हे; दर्शनी हुंडी म्हणजे bill (of exchange) payable at sight, तिचें साम्य uncrossed cheque शी आहे.)

इंग्लिशमध्ये spirant, fricative अशा दोन संज्ञा समानार्थी आहेत, म्हणून आपण दोन ठेवण्याची गरज नाही, घर्षक पुरे आहे, उष्मा किंवा सोष्मा ही शबलार्थ संज्ञा पुनरुज्जीवित करायचें प्रयोजन दिसत नाही. vocal cord मधली चूक लक्षात घेऊन vocal fold ही संज्ञा पुढे आली आहे, तर आपण घोषवली शब्द ठेवावा, घोषरज्जु किंवा घोषतंत्री यांची गरज नाही. संस्कृत व्याकरणातील स्वर शब्दाच्या vowel आणि pitch accent अशा दोन अर्थांमुळे अडचण येत असेल तर मराठीत ती अडचण तशीच वागवण्याचें कारण दिसत नाही. pitch साठी स्वरमान शब्द ठेवला तर accent साठी समुन्नति किंवा दुसरा काही शब्द ठेवता येईल.

(१८) मतभिन्नतेच्या परिभाषांतरणावर मर्यादा : जेव्हा एखाद्या परिभाषाक्षेत्रात मतभिन्नता उत्पन्न होऊन संप्रदाय निर्माण होतात तेव्हा एका परिभाषेच्या जागी अनेक परिभाषा निर्माण होण्याचा संभव असतो. असें झालें तर एक संप्रदायाच्या परिभाषेतील मजकुराचें दुसऱ्या संप्रदायाच्या परिभाषेत परिभाषांतरण करण्याची गरज उत्पन्न होऊ शकेल. मात्र असें परिभाषांतर काही मर्यादेपर्यंतच समानार्थ होऊ शकेल. ही मतभिन्नता जितकी तपशिलाकडून गृहीतकांपर्यंत पोचणारी असेल तितकी ती अशा परिभाषांतराला अटकाव करते. ह्यामुळे समान गुणबोधाऐवजी केवळ समान वस्तुनिर्देशावर आपल्याला पुष्कळदा समाधान मानून घ्यावें लागेल. मग परिभाषांतराची समानार्थता मर्यादितच राहते.

संस्कृत साहित्यमीमांसेत असा प्रकार काही अंशी दिसून येतो. उदाहरणार्थ ज्याचा

निर्देश ध्वननपक्षी ध्वनिव्यापार म्हणून करतात त्या गोष्टीचा निर्देश काही परिपुष्टिपक्षी (उदाहरणार्थ भट्टलोल्लट) भावकत्वव्यापार म्हणून करतात. वस्तुनिर्देश समान, पण गुणबोध अलग. ह्याच क्षेत्रातलें दुसरें थोडें निराळ्या प्रकारचें उदाहरण म्हणजे भरताने वापरलेली अनुकीर्तन ही संज्ञा सर्वजण वापरतात, म्हणजे उत्पत्तिपक्षींना त्यात अनुव्यवसायाचा बोध होतो, तर अभिव्यक्तिपक्षींना त्यात अभिव्यक्ति दिसून येते. म्हणजे शब्दरूप एकच पण गुणबोधाच्या अंगाने अर्थरूपें वेगवेगळीं.

अशाच प्रकारच्या अडचणी जेव्हा मार्क्सवादी बिगरमार्क्सवाद्यांशी किंवा मार्क्स-वादामधले उपपंथी एकमेकाशी अर्थकारण किंवा राजकारण यावर चर्चा करतात तेव्हा काही महत्त्वाच्या संज्ञांसंबंधाने उभ्या राहतात.

(१९) स्थलकालसापेक्षतेच्या परिभाषांतरणावर मर्यादा : एका भाषाक्षेत्रातल्या आणि कालखंडातल्या परिभाषेतल्या मजकुराचें दुसऱ्या भाषाक्षेत्रातल्या किंवा कालखंडातल्या परिभाषेला अनुसरणाऱ्या संदेशग्राहकाला अर्थग्रहण करायचें असेल किंवा त्याहून म्हणजे तो मजकूर आपल्या परिभाषेला अनुसरून पुन्हा सांगायचा असेल तर ह्या स्वरूपाच्या परिभाषासापेक्ष भाषाव्यवहारावर काही मर्यादा पडतात. विशेषतः ही भाषाभिन्नता जितकी तपशिलाकडून गृहीतकांपर्यंत पोचणारी असेल तितकी ती अशा परिभाषां-तरणाला अटकाव करते. ह्यामुळे समान गुणबोधाऐवजी समान वस्तुनिर्देशा-वर आपल्याला समाधान मानून घ्यावें लागेल. मग परिभाषांतराची समानार्थता मर्यादितच राहते.

हें सूत्र सूत्र १८ शी तुलावें.

आयुर्वेदीय ग्रंथात एखाद्या रोगाचें किंवा औषधीच्या परिणामांचे वर्णन आयुर्वेदीय परिभाषेला अनुसरून केलेलें असतें. तें समजावून घेतांना आधुनिक डॉक्टरला अशाच अडचणी येतात. उदाहरणार्थ दोष म्हणजे काय ? निरोगी शरीरातही ते असतातच. औषध उष्ण पडेल म्हणजे काय ? त्या रोग्याला तें औषध घेतल्याने ताप येईल असा त्याचा खासच अर्थ नाही. कदाचित् मध्ययुगीन युरोपातल्या डॉक्टराला कमी अडचणी आल्या असत्या. आयुर्वेदामधले त्रिदोष त्याला ओळखीचे वाटले असते, कफ दोष आणि आपला phlegmatic humour यांचें समीकरणही त्याने मांडून पडताळा घेण्याचा प्रयत्न केला असता.

प्राचीन भारतीय साहित्यमीमांसेमधल्या व्यंजनाशक्ति किंवा भाव किंवा रस ह्या संज्ञांचे इंग्लिशमध्ये भाषांतर काय करायचें हा केवळ भाषाभिन्नतेचा प्रश्न रहात नाही, परिभाषाभिन्नतेचा प्रश्न ठरतो. power of suggestion, emotion, flavour ही भाषांतरें अनुक्रमे सुचवलीं जातात, पण त्यामुळे समाधान होत नाही आणि ह्या गुणलक्षी संज्ञा असूनही त्यांचें केवळ लिप्यंतरण करून प्रत्यक्ष आदानाने हें भाषांतर

करायची तोड निघते. पण रस ऐवजी rasa लिहून ही निरगाठ सोडवली जात नाही, निवळ कातरली जाते !

बरोबर हाच विवेक हेगल किंवा मार्क्स ह्यांच्या dialectic सारख्या संज्ञांबद्दल बाळगायला पाहिजे. dialectic साठी मराठीत डायलेक्टिक लिहून प्रश्न सुटत नाही— dialectic म्हणजे विरोधविकास किंवा दि. के. बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे द्वंद्वात्मक स्वयंगति किंवा आणखी काही हा प्रश्न निरर्थ नाही, व्यर्थ तर नाहीच नाही. डायलेक्टिक असें लिहिणें हा फार तर अंतरिम उपाय ठरेल.

परिभाषेसंबंधीच्या एकुणीस मार्गदर्शक सूत्रांचें सोदाहरण संक्षिप्त विवरण इथे संपलें. (ह्या ठिकाणी प्रस्तुत छेदकाच्या प्रारंभी दिलेली १९ सूत्रांची वर्गीकृत यादी पुन्हा एकदा डोळ्यांखालून घालणें उपयुक्त होईल.) हीं सूत्रें पळता पळता समजण्या-सारखीं आणि बसल्याबसल्या पाठ करण्यासारखीं नाहीत हें तर खरेंच. परिभाषेसंबंधी काही चुटपुटीत दिसणारीं तत्त्वें सांगितलीं जातात–उदाहरणार्थ पारिभाषिक संज्ञा सोपी, सुटसुटीत, नेमकी वगैरे वगैरे असावी. पण त्या तत्त्वांचा सोपेपणा किती फसवा आहे हें परिभाषा तयार करताना ज्याने तीं लावून आपल्यापुढचे तपशिलाचे प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला असेल त्याला तेव्हाच उमगेल. (संज्ञा सोपी आहे म्हणजे काय ? ती पुरेशी नेमकी आहे हें कसें ठरवायचें ?)

३

समारोप

परिभाषेचा एवढा काय बाऊ करायचा आहे असें ज्यांना मनापासून वाटतें त्यांचा भ्रमनिरास मी करू शकलो तर ती समाधानाची गोष्ट होईल. (जाणूनबुजून डोळे मिटून घेणारांची गोष्ट वेगळी आहे.) उलट परिभाषेच्या प्रश्नाची ज्यांनी मनापासून धास्ती घेतली आहे त्यांना परिभाषेचा प्रश्न हा असाध्य नसून कष्टसाध्य आहे असा दिलासा मी देऊ शकलो तरी मला बरें वाटेल.

परिभाषेच्या प्रश्नाबद्दल आणखीही काही गैरसमजांचें निराकरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे : एक म्हणजे परिभाषेचा प्रश्न खास करून विज्ञान आणि तंत्रविद्या ह्यात मागासलेल्या समाजांपुढचाच प्रश्न आहे—वास्तविक तो प्रगत, विकसित समाजां-पुढेही आहे आणि तो सोडवल्यावाचून गत्यंतर नाही. प्रगतीची किंमत अखंड सावधानता ही आहे. समाजातील ज्ञानव्यवहाराचे चार टप्पे मानता येतात : (क) नव्या ज्ञानाची निर्मिति, (ख) ह्या ज्ञानाचें त्या क्षेत्रात अभिसरण, (ग) आंतर-क्षेत्रीय दळणवळण, आणि (घ) उपलब्ध झालेल्या आणि होणाऱ्या ज्ञानापैकी निवडक ज्ञान सामान्य लोक, सामान्य विद्यार्थी, आणि जाणकार होण्याच्या तयारीने आलेले

विद्यार्थी ह्यांच्यापर्यंत पोचवणें. ह्या चारांपैकी प्रत्येक टप्प्यावरचा ज्ञानव्यवहार कधी औपचारिक, नियमांनी बंदिस्त अवस्थेत असतो तर कधी अनौपचारिक, मोकळया-ढाकळ्या अवस्थेत असतो. प्रत्येक टप्प्यावरच्या दोन्हींपैकी प्रत्येक अवस्थेमधली परिभाषेचे प्रश्न हाताळण्याची एक खास सरणी असते. भारतात नव्या ज्ञानाची निर्मिति मोठ्या प्रमाणावर होऊ लागली तर काही प्रश्न सोपे होतील, पण काही खऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांना (गट क, ख–२) नव्याने तोंड द्यावें लागेल.

दुसरा गैरसमज म्हणजे हा प्रश्न शिक्षणाची माध्यम-भाषा इंग्लिश किंवा देशी भाषा (विशेषत: स्वभाषा) ह्यांपैकी कोणती निवडायची ह्या प्रश्नाशी संपूर्णतया निगडित आहे. प्रश्न निगडित आहे, पण तो अनुषंगाने, संपूर्णतया तर नाहीच नाही. व्यवहारसापेक्ष इंग्लिश किंवा हिंदी किंवा मराठी (किंवा शैलीसापेक्ष इंग्लिश किंवा हिंदी किंवा मराठी) येणें म्हणजे परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार येणें नव्हे. कोणत्याही भाषेत परिभाषासापेक्ष (किंवा शैलीसापेक्षा) भाषाव्यवहार येण्यासाठी व्यवहारसापेक्ष भाषाव्यवहार येणें आवश्यक आहे पण पुरेसें नाही. कोणत्याही एका भाषेत परिभाषाव्यवहार करता येऊ लागला म्हणजे तो कोणत्याही इतर भाषेत करता येऊ लागणें फारसें अवघड नाही. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार करायला शिकवणें ही जबाबदारी मुख्यत: शिक्षकांची –प्राथमिक शिक्षकापासून संशोधन-मार्गदर्शकापर्यंत सर्व शिक्षकांची–आहे. (स्वयंभू विद्यार्थी फार थोडे.) ती जबाबदारी पेलण्याची क्षमता त्या त्या पातळीवरील शिक्षकांमध्ये कशी येऊ शकेल हा एक स्वतंत्र विषय आहे.

तिसरा म्हणजे परिभाषानिर्मितीच्या यंत्रणेसंबंधीचा गैरसमज आहे. जात्यावर बसलें म्हणजे सुचणारी ओवी अस्सल असते आणि आधुनिक विज्ञान व तंत्रविद्या ह्या संबंधीची परिभाषा पश्चिमेकडे याच अस्सल मार्गाने गेली काही शतकें तयार होत आली हें जरी खरें असलें तरी शतकांची प्रगति दशकात करायला उद्युक्त झालेल्या समाजाला सुरवातीला तरी स्वाभाविक निर्मितीच्या बरोबर नियोजित कृत्रिम निर्मितीची कास धरावी लागणार हेंही तितकेंच खरें आहे. (आणि ह्यात काही वावगें नाही हें मी अन्यत्र दाखवलें आहे— पहा : ‘ भाषेचें नियोजन ’.) ही कृत्रिम निर्मिति कुणी आणि कशी करायची ह्याबद्दल काही भाबडे समज आपल्याकडे आहेत. मराठी जाणणारे त्या क्षेत्रातले काही जाणकार एकत्र बसवले, फार तर त्यांच्या मदतीला एखादा संस्कृतज्ञ दिला की झालें. नंतर त्यांनी एक तयार इंग्लिश यादी पैदा करायची आणि शब्दाला त्या त्या वेळी सुचेल तो शब्द ठेवून ती यादी वर्णानुक्रमाने संपवून मुद्रकाच्या स्वाधीन करायची असा एकंदर खाक्या असतो. नंतर हे शब्द निमूट सर्वांनी सगळेच्या सगळे स्वीकारायला पाहिजेत अशीही गर्भित अपेक्षा असते. नाही तर त्या शब्दांचें अभिसरण व्हायचें कसें ? हें सर्व बदलायला पाहिजे आणि भाषावैज्ञानिकांच्या आणि तत्त्वज्ञांच्या मदतीने नवी घडी बसवावी लागेल. योग्य जाणिवेच्या

अभावी संस्कृतचा व्यासंग हा अडथळा ठरतो असा अनुभव आहे. किमान पक्षी परिभाषा-समितीच्या सदस्यांना अल्प मुदतीचें प्रशिक्षण द्यायची सोय करायला लागेल; आणि तयार झालेली परिभाषा रुजवण्यासाठी शिक्षकांचें प्रशिक्षण करावें लागेल. शेवटी म्हणजे ही परिभाषा हा अखेरचा शब्द नव्हे हें संबंधितांना पटवून घ्यावें लागेल ! (कमाल पक्षी ज्या जुनाट बौद्धिक-भाषिक-शैक्षणिक भारतीय दुखण्याचा पूर्वी उल्लेख केला आहे त्याचा पुरता छडा लावला पाहिजे. माझी अटकळ अशी आहे की जेव्हा संस्कृतभाषा मृत झाली, गुणलक्षी संज्ञांची बोळवण वस्तुलक्षी संज्ञा म्हणून होऊ लागली, आणि ज्ञानव्यवहारात संस्कृतच्या जागी जीवंत भाषा आल्या नाहीत, तेव्हापासूनच आपण भारतीय अंधारात चाचपडत आहोत.)

चौथा गैरसमज म्हणजे परिभाषा उपलब्ध असली की परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार सुरळीत चालू लागेल. परिभाषासापेक्ष भाषाव्यवहारात सर्वच शब्द एका निराळ्या शिस्तीने वापरावे लागतात. त्यासाठी पारिभाषिक संज्ञाच्या बरोबरीने ज्यांना वैचारिक उपकरणें म्हणता येईल अशा निरनिराळ्या ज्ञानक्षेत्रांना समाईक अशा संज्ञाही उपलब्ध व्हायला पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रविद्या ह्या क्षेत्रांमधल्या परिभाषेविषयी आणि परिभाषासापेक्ष भाषाव्यवहाराविषयी मी जें जें काही म्हटलें आहे ते तें मानव्यविद्या, कायदा आणि प्रशासन इत्यादि अन्य क्षेत्रांनाही लागू पडण्यासारखें आहे.

ह्या निबंधाच्या सुरवातीला मी ‘ पारिभाषिक संज्ञा ’ ही पारिभाषिक संज्ञा नाही अशी कबुली दिली होती. निबंधाच्या ह्या टप्प्यावर ती संज्ञा तुमच्या मनात पारिभाषिक झाली असेल असा भरवसा मी धरू का ? अशा इतर काही संज्ञांची द्वैभाषिक सूची :

परिभाषा (technical) terminology 1
परिभाषाशास्त्र terminology 2
गुणलक्षी संज्ञा । संज्ञावली term / terminology 3
वस्तुलक्षी संज्ञा । संज्ञावली name / nomenclature
पारदर्शी । अपारदर्शी transparent / opaque
परिभाषासंक्रमण transfer of terminology 1
परिभाषांतरण translation of technical language
प्रदान, प्रदत्त शब्द loan 1, loan 2
आदान, आदत्त शब्द borrowlng 1, borrowing 2
प्रत्यक्ष (आदानप्रदान) direct (borrowing / loan)
भाषांतररूप (आदानप्रदान) translation (borrowing / loan)

ऋणनिर्देश

संस्कृत मृत झाल्यामुळे गुणलक्षी संज्ञांचें अवमूलन झालें ही कल्पना डॉ. द. ना. शंकरभट यांची. भाषाव्यवहाराची त्रिपुटी डॉ. पुण्यश्लोक राय यांची. ' टर्म ' आणि ' नेम ' ह्या भेदाचा छडा लावण्याचा एक निकराचा पण अयशस्वी प्रयत्न डॉ. ओल्गा आख्मानोवा ह्यांचा. अन्वर्थ / शबलार्थ हा भेद प्राचीन भारतीयांचा. परिभाषा-निर्मितीविषयी अनेकांचे स्वानुभवाचे बोल वाचायला-ऐकायला मिळाले त्यांपासूनही लाभ झाला.

परिशिष्ट

एका बाजूला परिभाषासापेक्ष भाषाव्यवहार, दुसऱ्या बाजूला शैलीसापेक्ष भाषा-व्यवहार, आणि दोहोंना सांधणारा, त्यांच्या मधला व्यवहारसापेक्ष (म्हणजे साधा-सुधा) भाषाव्यवहार या त्रिपुटीची चर्चा लेखाच्या सुरवातीला आली आहे. ही चर्चा स्पष्ट होण्यासाठी उदाहरणांचा उपयोग होईल या अपेक्षेने पुढे तीन उतारे अनुक्रमे परिभाषासापेक्ष, व्यवहारसापेक्ष, आणि शैलीसापेक्ष भाषाव्यवहाराचे म्हणून दिले आहेत. मधला व्यवहारसापेक्ष भाषेतील उतारा पहिल्याच्या तुलनेने शैलीसापेक्ष वाटला आणि तिसऱ्याच्या तुलनेने परिभाषासापेक्ष वाटला तर त्याचें आश्चर्य वाटायला नको. तिन्ही उताऱ्यांचा विषय ढोबळ मानाने एकच आहे.

(१) प्राथमिक अवस्थेंत जीवाची किंवा व्यक्तीची संज्ञाशक्ति तरलतेने सबंध शरीरांतून किंवा जडदेहांतून पुलकित होत असे. सबंध शरीर हेंच ज्ञानेंद्रियांचें काम करीत असे. अशा संज्ञाशक्तीचे व्यापार किंवा तिची जाणीव कितीशी सूक्ष्म असणार ! हळू हळू सभोवतालच्या परिस्थितीनुरूप प्राण्याला एकेक ज्ञानेंद्रिय लाभत गेलें. त्यानुसार प्राण्याच्या संवेदनांची विविधता आणि सूक्ष्मता वाढत गेली. त्यानंतर निर-निराळ्या ज्ञानेंद्रियांमार्फत येणाऱ्या संवेदनांची, त्या संवेदना प्रत्यक्ष अनुभवीत असतांनाच फक्त, संगति लावण्याची शक्ति आली. त्यानंतर त्या संवेदनांचीं प्रतिबिंबें किंवा कल्पनाचित्रें प्राण्याच्या संज्ञाशक्तीच्या कक्षेंत येऊ लागली. त्यांनी स्मृतीला जन्म दिला. त्यांतून स्थलकालाची कल्पना उदयाला आली. नंतर स्थलकालातील संबंधांचीं दृश्यें दिसूं लागली. तत्त्वजिज्ञासा आली.

संज्ञाशक्तीचा ज्ञानानुरोधाने असा विकास होत असतांनाच भावनानुरोधानेंहि तिचा विकास होत गेला. प्राथमिक भावना बहुधा प्राण्याच्या सबंध शरीर–मनाची (आणि त्या स्थितींत शरीर व मन एकच होती म्हणावें वाटेल तर) एक तरल उत्तेजित स्थिति असावी. त्यानंतर भावनेला शरीराच्या वाढीबरोबर विवक्षित फिजिओलॉजिकल केंद्रें निर्माण झालीं. बुद्धीच्या विकासाबरोबर भावनेतही मूळचा ढोबळपणा जाऊन सूक्ष्मता आली. भावनेच्या छटा विविध झाल्या.

संज्ञाशक्तीचा आणखीहि तिसऱ्या रीतीने विकास झाला. क्रियांचा प्रतिक्षिप्तपणा मर्यादित झाला. सहजप्रेरित क्रियांवर बुद्धि संस्कार सुचवूं लागली. शरीराचे अवयव विवक्षित झाले. विवक्षित अवयवांनी कृतींची विविधता वाढली. आणि निरनिराळ्या अवयवांच्या कृति एकमेकांना पोषक अशा रीतीने संघटित करतां येऊ लागल्या. इच्छाशक्तीचा उदय झाला. तिच्या स्वातंत्र्याचा प्रभाव पडूं लागला.

(२) उत्क्रांतिवादाच्या श्रेणींतील कनिष्ट अशा अमीबापासून तों श्रेष्ठ अशा मनुष्यापर्यंतचे हरएक जलचर, भूचर, खेचर प्राणी एकेक दृष्टीपुढून जातात! आपल्या इवलाश्या चैतन्याने प्रकंपित होऊन पाण्यांतून इतस्ततः तरंगणाऱ्या अमीबा; टीचभर देहांत सौंदर्याने पुलकित होऊन मोहकपणे पोहणारी मासळी व अजस्त्र सामर्थ्याने समुद्रातून पाणी कापीत जाणारीं नक्रादि धुडें; चांदण्या रात्रीच्या प्रशांत निःशब्दतेंत आपल्या निबिड अंधारमय स्थानबद्धतेतून आकाशांतल्या तेजोमय ग्रहगोलांच्या संगीताला चैतन्याची आर्त पण एकाकी साद देणारा रातकिडा; मानेवर रुबाबदार आयाळ घेऊन गिरिशिखरांवर किर्र्र दाट अरण्यांतून दुर्दम्य डरकाळीने शेपटी आपटणारा वनराज केसरी; उबदार मऊ पिसांच्या विविधरंगी पल्लेदार पंखावर झेप घेऊन झाडांवरच्या घरट्यांतील चिवचिवणाऱ्या पिलांना ओळखीचा कलरव देत गगनांत स्वैरपणे विहरणारा पक्षिगण; एका पायांतून रक्ताचा पाट वहात असतांना तीन पायांवर आपलें क्षीण शरीर आणि मानेवर गाड्याचें जूं सांवरीत उभा असलेला, आपल्या वेदनांचे रहस्य कांचेसारख्या डोळ्यांमागें लपविणारा बैल; मुलाला दूध देणारी आई; स्वतःच्या गुहेला चित्रकलेने सुशोभित करणारा गुहावासी मानव आणि सबंध विश्वाच्या स्वरूपावर आपल्या अतुल बुद्धिसामर्थ्याने प्रकाश पाडणारे शंकराचार्य व आइन्स्टाइन –सचेतन सृष्टीच्या या अखंड यात्रेच्या प्रचंड वैभवानें, संज्ञाशक्तीच्या कळीची एकेक पाकळी उमलून तिच्या विकासाच्या या रमणीय शोभेनें कल्पना स्तिमित होते, शब्दांना पामरता येते !

संज्ञाशक्ति फक्त ओळखायची, अजमावायची आणि तिच्यापुढें मान वांकवायची. तिचा इतिहास व विकासाचें स्वरूप सांगता येईल. पण तिचा ' वाढविता धनी ' कोण असेल, कुणास ठाऊक ? गाढवापुढे गीता वाचून गाढवाची संज्ञाशक्ति वाढवितां येणार नाहीं. मातेच्या उदरांतून येणारें मूल आपलें संज्ञाशक्तीचें घेणें घेऊन येतें. त्याची वाढ पूर्ण झाली म्हणजे त्याची संज्ञाशक्ति पूर्वनिश्चित पातळीवर येऊन पोहोचते. नंतर वार्धक्य येऊं लागतें. संज्ञाशक्तीचें सूर्यफूल कोमेजूं लागतें ! आणि ज्या जमिनीं-तून हें सूर्यफूल वर आलें ती जमीन शेवटीं अनिर्वचनीय विशाल कारुण्यानें त्याला आपल्या पोटांत घेते !

(३)

कधीं जन्मली पृथ्वी ? जमल्या
निळया वायूच्या लगडी सलग
कधीं ?
   कधीं अन् जडतेला त्या
मनामनाचें आलें पोत ?
तेजाच्या अन् निळ्या नळींतुन
जसा फुलावा निळसर चाफा,
सपोत संज्ञेमधून तैसा
अनुभूतींचा फुलला वाफा
कधीं ?
   पहावें तेजांतून ह्या
काय ?
   कुणाला शोधावें अन् ?

टीप : पहिले दोन उतारे बा. सी. मर्ढेकरांच्या ' धूमकेतु ' या निबंधातून (पहा : त्यांचें ' सौंदर्य आणि साहित्य ' हें पुस्तक) थोड्या फरकानें घेतले आहेत. तिसरा उतारा त्यांच्या ' फक्त तुझी जर दगडी भिवयी ' ह्या कवितेमधला आहे. (पहा : ' मर्ढेकरांची कविता ', १९५९, पृ. १६०–१.)

मराठी भाषेचें भवितव्य

Ripeness is all.—शेक्सपियर, ' किंग लियर ' ५:२

मराठी भाषेचें भवितव्य असा विषय अधूनमधून चर्चेसाठी पुढे येतो तो का ? असें तर नाही की समाजातल्या चर्चा करण्याऱ्या मंडळींना मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल तितका भरवसा राहिलेला नाही ? मराठी भाषेला फार तर भविष्य काळ असेल, पण जें होणार आहे तें भविष्य जें व्हायला पाहिजे असें वाटतें त्या भवितव्याशी फारसें जुळणारें नसेल–अशी ही अशुभ शंका असावी. आणि मग साहजिकच इतिहासकार राजवाड्यांनी १९२६ मध्ये पुण्याच्या शारदोपासक संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून विचारलेल्या प्रश्नाची आठवण व्हावी– ' मराठी भाषा मुमूर्षु आहे काय ? '[१] ह्या प्रश्नाचें प्रश्नकर्त्यानें स्वतःच दिलेलें उत्तर स्वच्छ आहे– " कांहीं थोडीं सबल दुर्बल वर्तमानपत्रें, लेंचींपेंचीं गद्यपद्य पुस्तकें, गृह्य व ग्राम्य व्यवहार ह्यांच्यांत मराठी भाषेचा उपयोग अद्याप आपण करीत आहोंत, त्यावरून दिसतें की मराठी भाषा अद्याप मेली नसून तिच्यांत कांहीं धुगधुगी उरली आहे. परंतु गृह, ग्राम, दुर्बल वर्तमानपत्रें व दुर्बलतर पुस्तकें सोडलीं म्हणजे समाजाच्या व्यवहाराचे जे बाकीचे प्रांत, त्यांत मराठी भाषेचीं झाडून सारीं अंगें थंडगार पडून गेलेलीं आहेत. देशांतील सर्वांतली अत्यंत मोठी व महत्त्वाची संस्था म्हणजे राज्य-संस्था तिचा सर्व महत्त्वाचा व्यवहार परकीय भाषेंत चालतो....शिकलेले म्हणून ज्यांना म्हणतात ते प्रत्येक दहा शब्दांत पांच चार इंग्रजी शब्द ढकलून देतात.... मनांत विचारांचा संकल्प प्रथम इंग्रजी भाषाद्वारां करतात व नंतर त्या इंग्रजीचें भाषांतर इंग्रजीमराठीमिश्र अशा धेडगुजरी अपभ्रंशाच्या द्वारा तोंडांतून सहज उच्चारितात....येणेंप्रमाणें मराठीची तोंडदाबणी....अशीच आणीक पांच पंचवीस वर्षें होत गेल्यास, लवकरच सर्व महाराष्ट्र इंग्रजी भाषा, शुद्ध किंवा अपभ्रष्ट अशी,

१. वि. का. राजवाडे यांच्या अध्यक्षीय भाषणाची पुस्तिका : ' मराठी भाषा मुमूर्षु आहे काय ? ' पुणें : महाराष्ट्र–शारदा–मंदिर, १९२६. समावेश : निरंतर, गं. भा.; देव, दि. वि. (संपा.). शारदा–विहार. पुणें : महाराष्ट्र–शारदा–मंदिर, १९४०. पृ. १–३१. अवतरण त्यांपैकी पृ. ७–८ वरून.

हांगकांगमधील पीज्यन इंग्लिशप्रमाणें, बोलूं लागेल असा निश्चित अंदाज दिसतो. ” राजवाड्यांच्या ह्या मर्मभेदी आणि नमुन्यादाखल थोडे पुरावे देऊन केलेल्या विधानां-मुळे ऐकणारे साहजिकच अस्वस्थ झाले.[१]

श्री. कृ. कोल्हटकर, श्री. व्यं. केतकर, आणि भा. वि. वरेरकर ह्यांनी त्यांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला.[२] पण ह्या प्रत्युत्तरात बचावाचाच भाग अधिक आहे. कोल्हटकर बचाव करताना “ पूर्वीं एकदां संस्कृत भाषेचा दुभाषेपणा पतकरिल्यामुळें मराठी भाषेचे जसे हाल झाले, तसे आतां इंग्रजी भाषेचा दुभाषेपणा पतकरिल्यामुळें होऊं लागले ” हें नमूद करतात आणि गडकऱ्यांच्या ‘ कांहीं इंग्रजी कविता वाचून ’ ह्या कवितेमधल्या काही ओळी उद्धृत करतात— “ पिठांत पाणी घालुनि केलें, दूध भलें निष्ठुर काळें । पितात गरिबांचीं बाळें । आम्हां मराठी शाहि-रांच्या कवनांचा वाहे पूर । समाधान त्यांतच चूर । ”

प्रत्युत्तर देणारे दुसरे केतकर हे स्वतःच महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या ११ व्या खंडात (‘ काव्य ते खतें ’, १९२४, पृ. ४४४) काय म्हणतात तें पाहण्यासारखें आहे “ एकंदरीनें पहातां मराठींतील काव्यवाङ्मय म्हणजे उष्टें आणि भिकार होय यांत शंका नाहीं....आजपर्यंत झालेलें मराठी वाङ्मय सर्व जळून जरी गेलें तरी जगाचें काव्यनाश या दृष्टीनें कांहीं एक नुकसान व्हावयाचें नाहीं. झालें तर तें भाषेचा इति-हास, खुंटलेल्या राष्ट्राच्या मनःस्थितीचें व ज्ञानमर्यादेचें उदाहरण व स्त्रीशूद्रांच्या धार्मिक शिक्षणासाठीं झालेल्या प्रयत्नाचा इतिहास या नात्यानेंच होईल. मराठींतील प्रसिद्ध झालेली अर्वाचीन कविता पंचविशीच्या आतल्या पोरांनीं लिहिलेली आहे व त्याच मंडळींनीं प्रौढ वयांत कवितारचनेचा क्रम टाकून दिलेला आहे. ”

सरतेशेवटी त्याच काळातली आणखी एक साक्ष काढायची ती विठ्ठल रामजी शिंदे यांची. १९२६ मधल्या एका लेखाच्या अखेरीस ते म्हणतात– “ शेवटी एका नाजूक मुद्द्यावरील माझे किंचित विक्षिप्त मत कळवून आटोपते घेतो. हल्ली आम्ही इंग्रजी शिकलेले लोक मराठी म्हणून जी भाषा बोलतो व लिहितो ती अशिक्षित

---

१. ‘ विविधज्ञानविस्तार ’ मध्ये या विषयावर दोन अनामिक लेख पुष्कळ पूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत तेही पहावेत : ‘ आपल्या भाषेची स्थिति’, डिसेंबर १८७३, पृ. १३०–४; ‘ आपल्या भाषेचें पुढें काय होणार ? ’, सप्टेंबर– ऑक्टोबर १८८९, पृ. २०७–१७.

२. कोल्हटकर, अध्यक्षीय भाषण, १२वें महाराष्ट्र–साहित्यसंमेलन पुणें १९२७ (लेखसंग्रह, मुंबई १९३२; समग्र कोल्हटकर, खंड २. मुंबई १९७५). केतकर, ‘ मागणी तसा पुरवठा ’ १९२७ (शारदा–विहार, पृ. ३२–५२). वरेरकर, ‘ मराठी भाषा जगेल– पण कशाने ? ’ (शारदा–विहार, पृ. ३३२–४८).

बहुजन समाजास– विशेषतः खेड्यात राहणाऱ्यांस कळत नाही. ह्याचे कारण, आमचे शब्द जरी मराठी असतात तरी विचार इंग्रजी व अबालबोध असतात. 'अबालबोध' हा अवघड शब्द मी येथे मुद्दाम वरील दुबळेपणाच्या उदाहरणार्थच योजिला आहे. खरी मराठी भाषा ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतच होती. ती प्रथम मोरोपंताने बिघडविली. बिघडता बिघडता लोकहितवादी आणि ज्योतिबा फुले ह्यांचेपर्यंत ती कशीबशी जीव धरून होती. पण चिपळूणकर व आगरकरांनी तर तिचा गळाच चेपला. टिळकांनी व हरिभाऊ आपट्यांनी तोंडात शेवटचे दोन घोट सोडले. पण ते शेवट-चेच ठरले. आजकाल चिपळूणकरांचा इंग्रजी–संस्कृत कित्ताच आम्ही सर्वजण आधा-शासारखे गिरवत आहो." शिंदे यांचें असमाधान भाषेपुरतें मर्यादित नव्हतें हें त्यांनी पुण्यातील सार्वजनिक व्याख्यानांबद्दल आपल्या विद्यार्थिदशेतल्या रोज-निशीत १८९८ साली केलेल्या काही नोंदींच्या वरून दिसून येतें– "पुण्याच्या सार्वजनिक सभातून एखाद्या वक्त्यास टाळ्या मिळाल्या की त्याने काही पोरकटपणा [केला] असावा असे बाहेरच्याने समजावे...." पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेच्या संबंधात ते म्हणतात, "माझ्या मते असल्या मालेच्याद्वारे....महाराष्ट्रातल्या चार विद्वान डोक्यात ज्या काही विचारांची वर्षभर घालमेल होत असेल ती सर्व....लोकां-पुढे आली पाहिजे....असे न होता....मालासंप्रदाय आहे म्हणून काही तरी शिळो-प्याच्या गप्पा होतात. आमच्या व्याख्यानमाला व आमचे विवाह ह्यांत बरेच साम्य आहे. विवाह झाला म्हणून जोडप्यास एकमेकांवर प्रीती करणे भाग आहे. प्रीती असते म्हणून विवाह होत नसतो." "न रुचणारा असा स्वतंत्र विचार बाहेर पडतो न पडतो तोच सभा आपले उग्र स्वरुप धारण करील" ह्या भीतीमुळे "मुळी कमी" असलेला "स्वतंत्र विचार....उघडपणे येण्याचा संभव मुळीच नाही." "काहीतरी दुतोंडी अर्धवट भाषण करून वेळ मारून नेण्याची व शिंगे मोडून वासरात घुसण्याची कला" न. चिं. केळकरांना "चांगली साधली आहे" असेही शिंदे म्हणतात.[१]

राजवाडे, गडकरी, केतकर, शिंदे ह्यांनी मांडलेले हे विचार सर्वच पटण्यासारखे आहेत अशी स्थिति नाही. सत्य हें पुष्कळदा अप्रिय असतें म्हणून अप्रिय हें नेहमीच सत्य असेल असें नाही. असें जरी असलें तरी ह्या सर्वांनी लावलेला कठोर आत्म-परीक्षणाचा सूर निश्चितच पकडण्याजोगा आहे आणि त्यांच्या सांगण्यामधला ग्राह्यांश

१. लेख 'मराठी भाषेच्या द्वारा ब्राह्मधर्माचा प्रसार' (सुबोधपत्रिका १९२६. १०.१७) हा आहे. त्यामधलें व नंतरचीं अवतरणें घेतलीं आहेत तीं गो. मा. पवार संपादित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी' पुस्तकामधून (औरंगाबाद : मराठवाडा साहित्य परिषद्, १९७९, पृ. त्रेचाळीस, २३, ३६, ३२ अनुक्रमे).

बाजूला काढण्यासारखा आहे. मराठी राजभाषा नाही ही राजवाड्यांची खंत काही अंशी दूर झाली असली तरी इतक्या वर्षांनी परिस्थितीत खूपच अनुकूल फरक पडला आहे अशी स्थिति नाही हें मान्य करावें लागेल. बाजूला काढण्याजोगा पहिला महत्त्वाचा विचार म्हणजे भाषेचा भूत, वर्तमान, आणि भावी उत्कर्ष आणि अपकर्ष ती भाषा बोलणाऱ्यांच्या उत्कर्षा–अपकर्षाशी निगडित आहे. एकंदर सामाजिक व्यवहाराच्या संदर्भात भाषाव्यवहाराचें स्वरूप ठरतें, आणि भाषाव्यवहाराच्या संदर्भात भाषेची व्यवस्था म्हणजे तिचें शब्दभांडार, वाक्याची मोडणी, लेखन–उच्चारण यांची सरणी, आणि ह्या सगळ्या गोष्टींचा अर्थवत्तेशीं असलेला अनुबंध ह्या भाषाव्यवस्थेच्या सगळ्या अंगांचें स्वरूप ठरतें. दुसरा महत्त्वाचा विचार म्हणजे आपल्या भाषाव्यवहाराला पुरेशी विविधता आणि सर्वांगीणता नाही. सर्वसामान्य व्यवहारसापेक्ष भाषा, ज्ञान आणि तंत्रविद्या यांच्याशी निगडित परिभाषासापेक्ष भाषा, आणि वक्तृत्व, ललित-वाङ्मय, धर्मभावना इत्यादींशी निगडित शैलीसापेक्ष भाषा ह्या तिहींच्या अनुरोधाने भाषाव्यवहाराचे तीन प्रकार मानले तर हें अधिक स्पष्ट करता येईल. मराठीचा सामान्य भाषाव्यवहार मुख्यतः घरगुती आणि खेडवळ, गृह्य आणि ग्राम्य आहे, नागर आणि सार्वजनिक व्यवहारात इंग्लिशचा राबता आणि प्रभाव बराच आहे. मराठीचा परिभाषासापेक्ष म्हणजे विचार आणि माहिती देण्याचा व्यवहार हा मुख्यतः शालेय आणि थोडीबहुत महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकें ह्यांच्या भोवती घोटाळतो आहे. वैचारिक "घालमेल" त्यात क्वचितच दिसते, संस्कृत किंवा इंग्लिश भाषेमधलें ज्ञानभांडार खुलें करण्यावरच तो समाधान मानतो. काही अव्वलचें सांगायचें तर मराठीभाषी पूर्वी संस्कृतमध्ये व आता इंग्लिशमध्ये बोलतात–लिहितात. सरते शेवटी मराठीच्या शैलीसापेक्ष भाषाव्यवहाराकडे पाहिलें तर काय दिसतें? लोकजागृति व करता लोकानुनय करणारें शैलीग्रस्त लटकें 'वैचारिक गद्य' बाजूला ठेवलें तर मध्ययुगीन धार्मिक आणि ललित पद्य आणि अर्वाचीन ललित गद्यपद्य अगदी सर्वथा "लेचेंपेचें" नाही पण बरेंचसें परभृत आहे. मध्ययुगीन काळात तर म्हणण्यासारखी गद्याची परंपराच नाही. जीवनाचीं नवीन दालनें खोलण्याची क्षमता या वाङ्मयात फारच कमी आहे. मध्ययुगीन पद्यात ऐहिक जीवनाचा आलेख नाही आणि अर्वाचीन गद्यपद्यात तो मुख्यतः मध्यमवर्गीय किंवा नागर जीवनापुरता मर्यादित आहे. तिसरा महत्त्वाचा विचार भाषेच्या क्षमतेबद्दल आणि तिच्या द्वारे ती भाषा बोलणाऱ्याचें जें पोषण होतें त्याबद्दलचा आहे. विठ्ठल रामजी शिंदे ह्यांनी मराठीच्या इतिहासाचे दोन टप्पे पाडले आहेत—एक ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतचा आणि दुसरा मोरोपंतापासून चालू काळापर्यंतचा. खऱ्या मराठीचा काळ आणि बहुजन समाजास न समजणाऱ्या संस्कृत–ग्रस्त किंवा इंग्रजी-संस्कृत–ग्रस्त मराठीचा काळ अशासारखें ते या दोन टप्प्यांचें वर्णन करतात. ही

कल्पना थोडी पुढे नेण्यासारखी आहे. वास्तविक असें म्हणता येईल की हे दोन स्पष्ट कालखंड नसून ह्या मराठी भाषेच्या इतिहासात दिसणाऱ्या दोन प्रवृत्ति आहेत आणि कोणत्या कालखंडात कोणत्या प्रवृत्तीचा जोर दिसतो तें पाहता यावें. मराठी भाषेवर दुसऱ्या भाषेचा वरचष्मा एवढ्यापुरता हा प्रश्न मर्यादित नाही. तेराव्या शतकात ज्ञानेश्वर आणि महानुभावपंथ ह्यांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाविरुद्ध, सोळाव्या शतकात एकनाथांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाविरुद्ध, सतराव्या शतकात शिवाजीच्या प्रेरणेने बनवलेल्या 'राजव्यवहारकोशा'च्या निमित्ताने फार्सी भाषेतून आलेल्या शब्दांविरुद्ध, आणि विसाव्या शतकात राजवाडे, सावरकर, माधवराव पटवर्धन यांनी इंग्लिश व फार्सी भाषांमधून आलेल्या शब्दांविरुद्ध भूमिका घेतल्या आणि त्या त्या काळी त्यांचा काही प्रभावही दिसून आला. पण हा केवळ भाषिक अस्मितेचा प्रश्न नाही. भाषा बालबोध आहे किंवा 'अबालबोध' आहे ह्याचा हा मुख्यतः प्रश्न आहे. आता ज्या दोन प्रवृत्तींचा उल्लेख केला त्यांचें वर्णन घट्टीघट्टी गरिबी आणि लुळीपांगळी श्रीमंती असें आपल्याला करता येईल. जर द. ग. गोडसे यांच्या 'पोत' (मुंबई १९६३) या पुस्तकामधली यादव काळाबद्दलची मीमांसा बरोबर असली तर यादवकालीन पंडिती गद्य आणि 'ज्ञानेश्वरी' हे लुळ्यापांगळ्या श्रीमंतीचे सुरवातीचे प्रतिनिधि ठरतात.[१] महानुभाव गद्य, एकनाथ, तुकाराम, रामदास, बखरगद्य, लोकहितवादी, फुले, 'बालबोध' मासिक, 'यमुनापर्यटण' कादंबरी, टिळक, आपटे, केशवसुतांची 'खडबडीत' शब्दकळा ही घट्ट्याकट्ट्या गरिबीची साखळी ठरावी. 'ज्ञानेश्वरी' नंतर वामन, मोरोपंत, 'मोचनगड' आणि 'मुक्तामाला' कादंबऱ्या, चिपळूणकर, गडकरी, तांबे, रविकिरण-मंडळ अशी लुळ्यापांगळ्या श्रीमंतींची साखळी ठरावी. घट्टीकटी गरिबी असें जिला मी नाव दिलें तिचे दोन विशेष सांगता येतील— एक म्हणजे भाषेचा थेटपणा आणि जोरकसपणा, आडवळण, शब्दांची उधळण, नाजूकपणा न मानवणें, दुसरा म्हणजे आशयाचा साधेपणा आणि एकरंगीपणा, पर्यायाने गुंतागुंत, बहुपदरीपणा न मानवणें. लुळीपांगळी श्रीमंती असें जिला मी नाव दिलें तिचे दोन विशेष सांगता येतील—एक म्हणजे शब्दभांडार मोठें आणि त्याचा सढळ वापर करणें, पण नेमकेपणा, थेटपणा हरवणें, दुसरा म्हणजे आशयात चमत्कृति, परस्परविरोधी गोष्टी एकत्र आणण्याचा हव्यास, बहुरंगीपणा. आज मराठीभाषी लेखक–वक्ते आणि वाचक–श्रोते यांच्यासमोर दोन पर्याय आहेत—एक म्हणजे प्रवाहपतित राहणें आणि याची परिणति म्हणजे लुळीपांगळी गरिबी पतकरणें; दुसरा म्हणजे डोळसपणाने घट्ट्याकट्ट्या श्रीमंतीसाठी धडपडणें आणि मेहनत घेणें.

१. जर–तर–ची भाषा इथे केली आहे कारण माझा ह्या विषयाचा स्वतंत्र अभ्यास नाही.

मराठी भाषेचा अवघा संसार धट्ट्याकट्ट्या श्रीमंतीचा झाला तर प्रकृतिभेदानुरूप जो तो आपली शैली निवडू शकेल आणि ती परिणामकारक करू शकेल. पहिलें संभाव्य भविष्य आहे आणि दुसरें कष्टसाध्य भवितव्य आहे.

ह्या दोन्ही पर्यायांच्या शक्यता आजकालच्या मराठी भाषाव्यवहारात कुठकुठे दिसतात तें आता पहायचें. प्रथम लुळ्यापांगळ्या गरिबीच्या खुणा नोंदवू.

"ही गुंडगिरी अशीच चालू राहिली तर समाज कंटकांचे प्राण संकटात येतील." "काही सदस्य 'पाहून घेतो बाहेर ये' वगैरे आरोप करू लागले." "विद्यार्थ्यांनी आपल्या ११ कलमी मागण्यांच्या निषेधार्थ काल हरताळ पाळला." हीं प्रतिष्ठित वृत्तपत्रांमधून आढळलेलीं काही वाक्यें. त्यांचा शब्दामधून निघणारा अर्थ आणि वाचकाने अनुमानाने काढायचा अर्थ ह्यांचा संबंध दूरचा आहे. हा भाषेबद्दलचा निष्काळजीपणा आपल्या रोजच्या बोलण्यामध्ये देखील दिसतो— "रविशंकरच्या गाण्याला गेलो होतो", "कृष्णाचा फोटो लावला होता", "कवि हा शब्द मी दीर्घ लिहितो" हीं मी ऐकलेलीं उदाहरणें. काही वेळा अपरिचित शब्द वापरण्याच्या हौसेमधून शब्द आणि अर्थ ह्यांना जोडणारा धागा तुटतो— "ह्या सर्वच कथा चोखंदळ आहेत" अशी एक प्रकाशक शिफारस करतो तर "झोपडपट्ट्यांचा प्रश्न कुटिल झाला आहे" असे कुणी महानगरपालिका–आयुक्त म्हणतात. काही वेळा मराठी शब्द सहज उपलब्ध असताना हाती येईल तो हिंदी वा इंग्लिश शब्द आळसाने वापरल्यामुळे भाषा प्रदूषित होते— "पूर्वी पोलिसांना कठिणाइया नव्हत्या ?" किंवा "मला सोशल सायन्सेसची बॅकग्राउंड नाही. त्यामुळे ते क्लेम करण्यात अर्थ नव्हता. व त्या प्रकारचं वर्क मी प्रोड्यूस करणार नव्हतोच !" काही वेळा शब्दाची अर्थाशी गाठ न मारता शब्दाची शब्दालाच गाठ मारली जाते— कार्यकर्ता हा निरलस, पत्रकार हा झुंझार, भाषण हें उद्बोधक असणारच, विनोदाला कारुण्याची झालर असायचीच, बरींच वर्षे गायन करणारा माणूस असला की तो योगी, तपस्वी, किंवा महर्षि ठरतोच. काही वेळा यातून अभावित विनोद उत्पन्न होतात आणि ते संबंधितांना भोवतातही. महाराष्ट्र सरकारने 'एक्सरसाइज बुक्स'वरचा कर उठवला पण विक्रेत्यांना त्याचें काय ? कारण नागपुर महानगरपालिकेच्या निवेदनात व्यायामाच्या पुस्तकांच्यावरचा कर माफ केला होता ! पाठ्यपुस्तकामध्ये 'इमर्जन्सी वॉर्ड' हा शब्द आला म्हणून कुणा तपासनिसाने त्यातल्या 'इमर्जन्सी' शब्दाला राजकीय आक्षेप घेतल्याचें सांगतात. काही वेळा मात्र हे अभावित विनोद अर्थपूर्ण वाटू लागतात. महाराष्ट्र सरकारच्या राज्यपरिवहनमंडळाच्याबद्दलच्या एका अधिसूचनेत 'तक्रारींची वासलात' लावण्याची तरतूद होती !

मराठीमधल्या वाढत्या भाषाप्रदूषणाचें मी विस्ताराने विवेचन अन्यत्र केलेंच आहे (**मराठी भाषेचा आर्थिक संसार**, १९७७, प्रकरण ३). या प्रदूषणाचा परिणाम

असा होतो की सगळेच शब्द म्हणजे वस्तूला नुसती डकवलेलीं लेबलें होतात किंवा विविध प्रसंगी पाळायचे कोरडे उपचार होतात. वस्तूचें वक्त्याच्या किंवा लेखकाच्या मनात असलेलें स्वरूप कसें आहे तें स्पष्ट करणारी संकल्पना अशा शब्दातून झिरपून निघून गेलेली असते आणि ती कुणापर्यंत पोचतच नाही. असें झालें की त्या शब्दाचा दूषित उपयोग करणें आणखी सोपें होतें आणि तो शब्द एका घातचक्रात अडकतो. "गरिबांचे अश्रु पुसणें", "पक्षातले मतभेद म्हणजे केवळ पेल्यातलें वादळ आहे", "अतींद्रिय शक्तीचा आविष्कार", "विद्रोहाचा प्रबळ हुंकार" यासारख्या शब्दप्रयोगांची मग पुरतीच परवड होते.

धट्टयाकट्टया श्रीमंतीचें एक प्रसादचिन्ह श्री. म. माट्यांना दिसलें होतें. 'भाषा-भिवृद्धीची सामाजिक दृष्टि' (**साहित्यधारा**, पुणें १९४३) या निबंधात लोहार, सुतार, चांभार, शेतकरी इत्यादि विविध व्यावसायिक शिक्षित होऊन सभेत बोलू किंवा छाप्यात लिहू लागतील तेव्हा आपापल्या व्यवसायातील शब्द लक्षणेने वापरून प्रमाण–मराठीला समृद्ध आणि जोरकस करतील असें स्वप्न त्यांनी पाहिलें होतें. अर्थात् हा केवळ व्यावसायिक शब्दभांडाराचाच प्रश्न नाही. प्रमाणेतर बोलींमधून जीवंत, नेमके, अल्पाक्षर शब्द प्रमाण–मराठीच्या बोली आणि लेखी आविष्कारात येऊन मिळतील अशी ही अपेक्षा आहे. पण असें घडतेंच आहे आणि घडणारच आहे असें म्हणवत नाही. असें होण्यामध्ये दोन अडथळे आहेत ते दूर झाले पाहिजेत. नव-शिक्षित वर्गातली मंडळी एक कवितालेखन आणि काही अंशी कथालेखन सोडलें तर ज्या इंग्रजी– संस्कृत मराठीबद्दल विठ्ठल रामजी शिंद्यांनी तिटकारा व्यक्त केला तिचाच कित्ता गिरवण्यात धन्यता मानताना पुष्कळदा दिसतात. दुसरा अडथळा म्हणजे एका प्रदेशातले किंवा जातीजमातीमधले शब्द दुसऱ्या प्रदेशातल्या किंवा जातीजमातीमधल्या श्रोत्यांना किंवा वाचकांना नेहमी समजतीलच असें नाही. मग त्यांना तळटिपांचे पैंजण बांधावे लागतात आणि अर्थग्रहणाचा ओघ खंडित होतो. ह्या अडथळयांमधून मार्ग काढणें सोपें नाही, पण सर्वांचें सहकार्य मिळालें तर अशक्यही नाही.

काही वेळा शब्द परिचित किंवा परिचयसुलभ असतो, पण त्याच्या भोवती योग्य त्या संदर्भाचें वलय अजून तयार झालेलें नसल्यामुळे त्याचा अर्थ संदर्भपुष्ट होत नाही. "पाणी" ह्या भाषाचिह्नाचा अर्थ आपल्याला समजतो तो "हैड्रोजनचे दोन अणु, ऑक्सिजनचा एक अणु मिळून झालेल्या रेणूचा द्रवावस्थेमधील पदार्थ" असा समजत नाही; तर "जें पितात, ओततात, गरम किंवा गार असतें, आकाशातून पडतें, कपडे भिजवतें, ज्यात डुंबायला फारच गंमत येतें असें काहीतरी तें" अशी आपली लहानपणापासून त्याच्याशी ओळख होते. मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने आपला विचार ह्याच्यापुढे न्यायला पाहिजे— पहिली गोष्ट म्हणजे परिभाषासापेक्ष भाषा-

व्यवहारात हें संदर्भपोषण निग्रहाने बाजूला सारून "हैड्रोजनचे दोन अणु" इत्यादि अर्थविधानाला चिकटून रहायला आपल्याला शिकलें पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे "पाणी" शब्दाचें हें संदर्भपोषण इथेच थांबत नाही. पांढरपेशा समाजातील माणसाच्या मनात "पाणी" म्हणजे "स्वच्छतेचें साधन, पूजाद्रव्य, नळातून येणारें किंवा नाहीसें होणारें, ज्यात मिसळावें तो रंग उचलणारें व स्वतःचा रंग नसणारें" असेंही काही तरी ठरणार, तर दलित समाजातील माणसाच्या मनात "पाणी" म्हणजे आणखी काही निराळेंच ठरणार. शैलीसापेक्ष भाषाव्यवहारात संदर्भपोषणाच्या ह्या नाना परींची ओळख पटणार, ती पटेपर्यंत दया पवारांच्या एखादया कवितेचा अर्थ पांढरपेशा वाचकाला पुरा समजणार नाही किंवा चिं. वि. जोशींच्या एखादया गोष्टीचा अर्थ दलित वाचकाला पुरा समजणार नाही. पण जेव्हा या दोन्ही वाचकांना ते ते अर्थ पुरे समजतील तेव्हा त्याचेंत्याचें शब्दविश्व अधिक समृद्ध, श्रीमंत होईल.

ही संदर्भपोषणाची अडचण वैचारिक जीवनाला आवश्यक अशा शब्दांच्या बाबतीतही येते. संस्कृतमधला 'व्यापार' हा शब्द वाणिज्यापुरता मर्यादित नाही हें ठाऊक झाल्याशिवाय मराठी माणूस आस्वादव्यापाराविषयी बोलू लागणार नाही किंवा इंग्लिशमधला 'ॲक्सिडेंट' हा शब्द मोटार अपघातापुरता मर्यादित नाही ही समजूत पटल्याशिवाय "मला अपघाताने सोलापुराला नोकरी मिळाली" यासारखें भाषाप्रदूषण करणारें वाक्य वापरातून जाणार नाही. सुशिक्षित माणूस 'माणूस', 'मनुष्य', 'इसम', 'असामी', 'व्यक्ति', 'मानव', 'पुरुष', 'मानवप्राणी' हे शब्द आत्मविश्वासाने त्या त्या संदर्भात वापरू शकतो. नवशिक्षित वर्गातून येणाऱ्या सुशिक्षित माणसाला हा आत्मविश्वास मिळवायला थोडे प्रयास पडतील, थोडी मदतही लागेल. (अशी मदत देणाऱ्या मराठी कोशाची आज वाण आहे.) अमेरिकन समाजात एकुणिसाव्या शतकात वेब्स्टरचा कोश आणि तो वापरायला शिकवणारी शाळेमधली शिक्षिका यांनी मोठेंच शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य केलें आणि एकसंध पण बहुजिनसी अमेरिकन समाज घडवण्यात आपला वाटा उचलला याची ह्या संदर्भात आपल्याला आठवण यावी.

भाषेची श्रीमंती हा केवळ शब्दभांडाराचा आणि संदर्भपोषणाचा प्रश्न नाही. वाक्याच्या विविध मोडणी उपलब्ध होण्याचाही आहे. इंग्लिश भाषेमधल्या विवेचक आणि वैचारिक गद्याचें मराठी भाषांतर करताना नेहमी येणारा एक अनुभव म्हणजे इंग्लिशमधलें पल्लेदार वाक्य तोडून मराठीत त्याची छोट्याछोट्या सुट्या वाक्यांची माळ बनवावी लागते. असें का होतें ? मराठी वाचकाची क्षमता किती गृहीत धरायची हा प्रश्न आहे. वाक्य तोडल्यामुळे आपण काही गमावतो का हेंही ठरवण्याचा हा प्रश्न आहे. भाषांतराचा प्रश्न सोडला तरी स्वतंत्रपणे मराठी लिहिताना आपल्याला लहान वाक्यांची माळ आणि पल्लेदार वाक्य हे दोन्ही पर्याय गरजेप्रमाणे

उपलब्ध असतात की नाही ह्याचाच हा प्रश्न आहे. प्रथम रोजच्या व्यवहारामधलें हें वाक्य पहा —

(१) "तो कामावरून आल्याआल्या त्याची बायको त्याला घरच्या सगळ्या कटकटी सांगू लागली."

ह्या वाक्याचा पल्ला तसा काही मोठा नाही. पण अशिक्षित वक्त्याला किंवा श्रोत्याला तेवढाही पल्ला पेलवत नाही. मग हाच मजकूर अशा काही पद्धतीने अशा वक्त्याला किंवा अशा श्रोत्याशी बोलणाऱ्या वक्त्याला सांगावा लागतो.

(२) "तो म्हंजी कामावरून आला का? मंग काय झालं? त्याची बायकू त्याच्याशी बोलू लागली. काय बोलायला लागली? घरातल्या कटकटी पघा. त्या सांगू लागली. अगदी समद्या."

त्याला बऱ्यापैकी बुद्धि असेल तर एवढ्या टप्प्यांनी गेल्यावर त्याच्या मनात अर्थाची समग्र गुंतागुंत जुळून येईल, नाही असें, नाही पण एकंदरीने अशी फोड केल्यामुळे काही अर्थ गमावला असेंच म्हणावें लागेल. लहान मुलाचा भाषाव्यवहार नेहमीच या दुसऱ्या प्रकारचा, दर टप्प्यावर थांबणारा असा असतो. आता हा मजकूर पहा.

(३) "विचारवंताच्या मनात वर्षभर काही वैचारिक उलाढाल चालू असते. तिचा ताळेबंद वर्षातून केव्हातरी सर्वांच्या समोर ठेवणें जरुरीचें आहे. असा तो ठेवणें संमेलनांचें एक प्रधान कार्य आहे. हें कार्य नीट पार पडायचें तर तें वेळमारू किंवा टाळ्याखाऊ किंवा अतिसुबोध भाषणांच्या द्वारे कसें पार पडणार? पार पडणार नाही. उलट अशा कार्याला अशा भाषणांमुळे अडथळा मात्र होणार."

सर्वसाधारण मराठी वाचकाला ही वाक्यांची साखळीं पेलवते. पण तिच्याऐवजी अशा प्रकारचें पल्लेदार वाक्य त्याच्यासमोर आलें तर?

(४) "विचारवंताच्या मनात वर्षभर जी काही वैचारिक उलाढाल झालेली असेल तिचा ताळेबंद सर्वांच्या समोर ठेवणें हें संमेलनांचें एक प्रधान कार्य असून तें वेळमारू, टाळ्याखाऊ, अतिसुबोध भाषणांच्या द्वारे होण्यासारखें तर नसतेंच, उलट अशा कार्याला अशा भाषणांचा अडथळा मात्र होत असतो."

असें वाक्य समोर आलें तर तो म्हणू लागतो, की हें सर्व डोक्यावरून गेलें बुवा. जास्त हुषार असला तर तो असेंही म्हणेल, की ही भाषा फारच इंग्रजी वळणावर गेली. त्यातले काही असेंही निघतील की हें वाक्य इतकेंच पल्लेदार ठेवून इंग्लिशमधून त्यांना सांगितलें तर तें त्यांना बिनबोभाट समजेल! आता दुसरा एक मुद्दा. हे दोन्ही मजकूर पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचले तर असें लक्षात येईल की दुसऱ्या पल्लेदार वाक्याने विचारांचा व्यूह अधिक स्पष्ट होतो. पहिल्या वाक्यशृंखलेत तसें होत नाही.

यंत्राचे सुटे भाग तुमच्यापुढे टाकले आहेत, कुवत असली तर ते तुमचे तुम्ही जुळवून घ्या, नाही पेक्षा राहू देत तसे सुटेच— असा काही प्रकार इथे होतो आहे.

मजकूर (२) पासून मजकूर (१) पर्यंतचा प्रवास आणि मजकूर (३) पासून मजकूर (४) पर्यंतचा प्रवास एकाच जातीचा आहे. सुशिक्षित मराठी घरातलीं मुलें पहिला प्रवास सहज पार पाडतात, दुसरा प्रवास मात्र तीं पार पाडत नाहीत, पार पाडलाच तर इंग्लिशमधून पार पाडतात, तो मराठीमधून पार पाडायला त्यांना कुणी उद्युक्त करत नाही. अशिक्षित मराठी घरातल्या मुलांना अजून पहिला प्रवासच पार पाडायचा आहे, दुसऱ्या प्रवासाची गोष्ट तर दूरच राहू द्या. भाषेचें दारिद्र्य हें अखेर ती भाषा बोलणारांचें सांस्कृतिक दारिद्र्य असतें.

इंग्लिश भाषा मराठी भाषेपेक्षा प्रगल्भ आहे. याचा खरा अर्थ इंग्लिशभाषी मराठीभाषियांपेक्षा या बाबतीत प्रगल्भ झालेले आहेत. असें होण्याचें कारण त्यांच्या पूर्वजांची चार शतकांची तपश्चर्या त्यांच्या कामी येत आहे हें आहे. नाण्याची दुसरी बाजू म्हणजे— मराठीभाषी या बाबतीत अजून पुरेसे प्रगल्भ नाहीत, कारण त्यांच्या पूर्वजांनी सहासात शतकें मराठीमधून प्रगल्भ विचार स्वतःच्या हिमतीवर करणें सोडूनच दिलें होतें, त्यांच्यापैकी जे जात्या प्रगल्भ होते त्यानी संस्कृतचें दुभाषेपण पतकरण्यातच संतोष मानला. ब्रिटिशांचा अंमल आल्यानंतर ह्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही.[1] फक्त मकॉलीच्या कृपेने संस्कृतच्या दुभाषेपणाच्या जोडीला इंग्लिशच्या दुभाषेपणाची भर पडली. ही सर्व गरिबी उच्चवर्णीय पुरुष आणि स्त्रीशूद्रादिक ह्या दोघांनीही निमूट सोसली. हा डोस कडू आहे, पण तो पचवला पाहिजे.[2] तसा तो पचवला नाही तर आपण केवळ इंग्लिशभाषेच्या किंवा संस्कृतभाषेच्या नावाने बोटें मोडण्यातच धन्यता मानू आणि स्वतःच्या हिमतीवर प्रगल्भ विचार करायचें विसरूनच जाऊ. असा विसर पडला तर मराठी भाषेला सुतराम् भवितव्य नाही, मग तुम्ही

---

१. स्वतःच्या हिमतीवर विचार करण्याची सवय किती सुटावी ह्याची एक भाषिक खूण म्हणजे 'अभ्यास' हा शब्द पहा. अभ्यास म्हणजे पुनरुक्ति, गीतेचा अभ्यास करणें म्हणजे गीतेची पुनरुक्ति करणें ! शाळेतल्या अभ्यासाची मग काय कथा असणार !

२. मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफ याचा मुलगा ग्रँट डफ हा १८८६ साली मद्रास विद्यापीठात केलेल्या दीक्षांत–भाषणात काय म्हणतो आहे तें पहा – " Are you satisfied with what you are doing for your own literature? How many of you, whether speaking Tamil, Telugu, Malayalam, Canarese, Tulu, or any other tongue, are doing anything

[पुढील पानावर चालू]

कितीही कायदेकानू करा. असा विसर आपल्याला पडला तर आपल्या मागच्या एका पिढीला आपण दूषण दिलें (समाजाच्या मुख्य दुखण्यांकडे दुर्लक्ष करून स्त्रियांनी सकच्छ नेसावें की विकच्छ नेसावें यासारख्या फालतू प्रश्नावर शिरा ताणणारी पिढी म्हणून) तसेंच दूषण आपल्यानंतरची एखादी पिढी आपल्या पिढीला देईल (भाषेच्या मुख्य दुखण्यांकडे दुर्लक्ष करून दुकानावरच्या पाट्या इंग्रजीत असाव्यात, लिप्यंतरित इंग्रजीत असाव्यात, मराठीत असाव्यात, का दोन्ही भाषांमधून असाव्यात यासारख्या फालतू प्रश्नावर शिरा ताणणारी पिढी म्हणून). जर असा विसर पडला नाही तर प्रगल्भ विचार स्वतःच्या हिंमतीवर तुम्ही इंग्लिश भाषेत केला तरी चिंता नाही. मराठी भाषेला तरीही बरे दिवस येतील. कारण इंग्लिशमधून स्वतःच्या हिंमतीवर प्रगल्भ विचार करणाऱ्या एखाद्या धनंजय गाडगीळला किंवा जयंत नारळीकरला तो आपल्या बांधवांना मराठीत सांगण्याची ऊर्मि येणारच येणार. फक्त प्रीति जडली म्हणून विवाह केला असा प्रकार तिथे होईल, आणि त्यात वावगें काहीच नाही.

सकस वैचारिक गद्य हें सकस विचारांचें फलित असतें तसें साधनही असतें. सकस वैचारिक जीवन समाजाच्या प्रगतीचें फलित असतें तसें साधनही असतें. कार्यकारण-भावाचीं सारींच चक्रें काही घातचक्रें नसतात, काही प्रसादचक्रेंही असतात.

[मागील पानावरून चालू]

or seriously proposing to do anything, to add to the literature of these languages, or any of them? I do not refer to books of information that you may have published in those languages, books merely imparting a little of the knowledge of the West–they are good in their way–but to books containing something that is at once new and striking, books adding, if it be by only one verse or one paragraph, to the things already existing in the world, which are acknowledged to be beautiful, or to be at once new and true." खेदाची गोष्ट ही की हे प्रश्न अजूनही विचारण्याजोगे आहेत.

राजभाषावर्षाचें एक फलित

भारत सरकारच्या प्रेरणेने महाराष्ट्र सरकारने १९७९ हें वर्ष राजभाषावर्ष म्हणून साजरें केलें. त्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मुंबईला १९७९.०६.२५ ला महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचें स्थान ह्या विषयावर एक परिषद् बोलावली. ह्या परिषदेत अशोक रा. केळकर यांनी मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापणें कसें जरूर आहे आणि त्या संस्थेचें स्वरूप कसें रहावें याबद्दल एक विस्तृत टिपण वाचलें. (अशा संस्था आंध्रप्रदेश, तमिळनाडु, कर्नाटक, केरळ, गुजरात, राजस्थान राज्यात आहेत इकडेही त्यांनी लक्ष वेधलें.) परिणामी महाराष्ट्र शासनाने अशी संस्था असावी किंवा कसें, असल्यास कशी असावी ह्याचा विचार करण्यासाठी एक अभ्यासगट नेमला. प्राध्यापक वसंत बापट निमंत्रक आणि प्राध्यापक मे. पुं. रेगे, वसंत दावतर, अशोक रा. केळकर, मं. वि. राजाध्यक्ष हे इतर सभासद असा हा गट होता. त्याच्या १९७९.१२.०६ ला आणि १९७९.१२.१९ ला अशा दोन बैठकी झाल्या. अशी ' राज्य–मराठी–विकास–संस्था ' असावी आणि तिचें स्वरूप असें असावें ह्या संबंधी त्यांनी एक तपशिलवार टिप्पणी तयार केली. शालेय मराठीचा पाया सुधारण्याबद्दल्ची प्राध्यापक दावतरांची टिप्पणीही त्याला जोडण्यात आली. हा अहवाल त्या वेळचे शिक्षणमंत्री प्राध्यापक सदानंद वर्दे यांना सादर करण्यात आला. तो सरकारकडे विचाराधीन असताना महाराष्ट्रातली विधानसभा व मंत्रिमंडळ बरखास्त होऊन राष्ट्रपति-राजवट आली. आता ही सर्वच योजना बारगळल्यातच जमा आहे. अशा परिस्थितीत ही योजना होती तरी काय हें मराठी जनतेच्या पुढे यावें म्हणून ह्या लेखाचा प्रपंच केला आहे. हा गोषवारा असल्यामुळे या लेखाची जबाबदारी अर्थातच लेखकावर आहे. बरखास्त झालेल्या अभ्यासगटावर नाही.

मराठी भाषेसाठी राज्यस्तरीय संस्था का असावी ?

इंग्लिश भाषेच्या शिक्षणाच्या रूपाने जें वाघिणीचें दूध मराठी भाषा प्यायली त्याचा प्रभाव आता संपत आला आहे की काय असें वाटण्याजोगी परिस्थिति आज उत्पन्न झालेली दिसते. बाहेरून मिळालेल्या पोषणाचा प्रभाव आज ना उद्या संपावा ह्यात अस्वाभाविक आणि चिंताजनक असें काही नाही. पण अशा बाह्य प्रभावाची जागा

अंतर्गत प्रेरणेने पुरेशा प्रमाणात घेतली आहे असें दिसत नाही. ती मात्र चिंतेची बाब आहे. मराठीचा अध्यापकवर्ग काहीसा हताश, हतोत्साह दिसतो. शिक्षणाचें माध्यम म्हणून मराठीचा स्वीकार माध्यमिक व विद्यापीठीय स्तरावर होतो आहे पण तोही नाइलाज किंवा आपद्धर्म म्हणून. इंग्लिश आणि संस्कृत ह्या भाषांवर भरवसा ठेवण्याच्या प्रवृत्तीमागे मराठी भाषेवर, तिची क्षमता आणि तिच्या शक्यता ह्यांच्या-वरच अविश्वास आहे. आणि हा अविश्वास पुष्कळदा मराठीभाषीच दाखवतात.

मराठीला महाराष्ट्रात रास्त मानाचें स्थान मिळावें म्हणून राजकीय पातळीवर आग्रह धरणें, त्यासाठी कायद्याच्या आणि नियमांच्या तरतुदी करणें हें सर्व एका मर्यादेपर्यंतच उपयुक्त ठरतें. अखेर व्यक्तिगत जिव्हाळा आणि कुवत ह्यांचा कसच भाषेची अभिवृद्धि होताना लागतो. मात्र अशा उद्योगाला सार्वजनिक व शासकीय उत्तेजन आणि पाठबळ मिळणें जरूर आहे.

अन्यभाषी भारतीय किंवा परदेशी लोकांनी मराठी शिकावें असें वाटत असेल तर तें आकर्षक व परिणामकारक पद्धतीने शिकविण्याची सोय व्हायला पाहिजे. खुद्द मराठी-भाषीयांना मराठीचें आकर्षण वाटायचें असेल तर वाचकाला मराठीमधून उत्कृष्ट ललित वाङ्मय आणि सकस वैचारिक, माहितीपर वाङ्मय मिळालें पाहिजे, तसेंच दर्जेदार वाङ्मय लिहू शकणाराला आस्वादशक्ति आणि ग्रहणशक्ति असलेले वाचक मिळाले पाहिजेत, आणि मराठी भाषा आणि साहित्य ह्यांच्या विशेष अभ्यास-क्रमामध्ये बुद्धिमान् विदयार्थ्याला खेचण्याची ताकद पाहिजे. (आज ती ताकद दिसत नाही हें खेदपूर्वक नमूद केलें पाहिजे.)

महाराष्ट्र शासनाचें भाषासंचालनालय, साहित्य–संस्कृति–मंडळ, पाठ्य–पुस्तक–निर्मिति–मंडळ, आणि विदयापीठीय–ग्रंथ–निर्मिति–मंडळ हीं सर्व आपापल्या क्षेत्रांत व आपापल्या पद्धतीने उपयुक्त कामें करीत आहेतच. विद्यापीठीय पातळीवरचें मराठी विभाग आणि तत्सम केंद्रें ह्यांचें कार्य नित्याच्या कामांच्या व तणावांच्या संदर्भात आणि साहित्याच्या पठडीत चालतें. भाषाविज्ञान आणि संस्कृतीचा वैज्ञानिक अभ्यास ह्यांचें अधिष्ठान त्या ठिकाणीं पुरेशा प्रमाणांत दिसत नाही. हें सर्व लक्षांत घेतलें तर निराळ्या स्वरूपाच्या राज्यस्तरीय संस्थेची आवश्यकता आहे. तिला एक स्वतंत्र कार्यक्षेत्र आहे.हें कार्य आणि आधीपासूनच्या संस्थांमधील कार्य परस्परपूरक ठरेल, त्यांमध्ये निष्फळ स्पर्धा होण्याचें कारण दिसत नाही. (इतर राज्यांतूनही अशा संस्था अगोदरपासून आहेत हें लक्षात घ्यावें.)

प्रस्तावित संस्थेचें सर्वसाधारण स्वरूप

संस्थेचें नाव ‘ राज्य–मराठी–विकास–संस्था ’ (स्टेट इन्स्टिटयूट ऑव्ह मराठी) असें रहावें. ही जरी राज्यस्तरीय संस्था असली तरी पुढे अधिक विकसित झाल्यावर

ती भारतातील व परदेशातील अशाच इतर संस्थांशी संपर्क साधून राहील. ‘ मराठी भाषा ’ असा उल्लेख करून संस्थेचें कार्यक्षेत्र कायमचें भाषेपुरतें मर्यादित करू नये. एक तर भाषेचा विकास साहित्य, संस्कृति यांपासून अलगपणे होत नाही. परभाषी-यांची गरज केवळ भाषेपुरती नसते. साहित्य आणि प्रादेशिक जीवन ह्यांबद्दलची त्यांची जिज्ञासा कोण पुरी करणार ? ह्याच संस्थेला त्यासाठी देखील सामग्री तयार करावी लागेल. शेवटी म्हणजे प्रादेशिक जीवनाचा अभ्यास (रीजनल किंवा एरिया स्टडीज) हें क्षेत्र भारतात दुर्लक्षित आहे. महाराष्ट्राच्या प्रादेशिक संस्कृतीचा अभ्यास एकत्रितपणे करण्याची सोय जर्मनीत हायडेलबेर्ग विद्यापीठात आहे ती महाराष्ट्रात का नसावी ? प्रस्तावित संस्थेला थोडें व्यापक स्वरूप दिल्याने ह्या दुर्लक्षित अभ्यास-क्षेत्राला महाराष्ट्रापुरती चालना दिल्यासारखें होईल. मात्र ह्या सर्व कार्याचें केंद्र मराठी भाषा राहील हें उघड आहे.

संस्थेचें स्वरूप पुरेसें लवचीक आणि भावी विकासाच्या शक्यता सुचवणारें असावें. सुरवातीच्या काळात मात्र मर्यादित प्रमाणात उपलब्ध असलेलें मनुष्यबळ आणि साधनसामग्री यांचा पुरेपूर उपयोग व्हावा या दृष्टीने पसरटपणा टाळावा. भाषाविज्ञान आणि साहित्य, संस्कृति यांचा भाषाकेंद्री अभ्यास ह्या क्षेत्रात प्रशिक्षित व्यक्ति मराठी भाषीयांत फार थोड्या आहेत. योग्य व्यक्ति मिळतील तसतशा नियोजित जागा भरून काम वाढवीत न्यायचें धोरण श्रेयस्कर ठरेल. सुरवातीलाच सर्व जागा अट्टाहासाने अर्धप्रशिक्षित किंवा जवळपासच्या विषयात प्रशिक्षित लोकांनी भरायच्या आणि मग पस्तावायचें हा नेहमी होणारा प्रकार इथे तरी होऊ नये.

ही संस्था सरकारशी संलग्न असली तरी बऱ्याच अंशी स्वायत्त असावी. भाषेचा विकास वर्षावर्षात ठरीव कामाचा उरका पाडून होत नसतो. ह्या संस्थेचें काम काहीसें संथपणे आणि विद्वत्सुलभ (अॅकॅडमिक) पद्धतीने चालेल आणि तिच्या कामाचीं फळें कालांतराने चाखायला मिळतील ह्याचें भान ठेवणें जरूर आहे. संस्थेच्या नियामक मंडळावर शासनाला प्रतिनिधित्व राहील खरें. पण संस्थेचें काम राजकीय आणि प्रशासकीय दबावापासून सर्वस्वी मुक्तपणे पण अंगभूत विद्वत्सुलभ शिस्तीने चालेल अशीच तरतूद करावी. निदानपक्षी माणसें लायक, निरलस आहेत, पण लालफीत आणि बाहेरून होणारी ढवळाढवळ ह्यामुळे त्यांची कुचंबणा होत आहे असें चित्र दिसू नये.

संस्थेला आर्थिक पाठिंबा मुख्यतः महाराष्ट्र सरकारचा राहील. संस्थेने निर्मिलेली प्रकाशनें व दृश्य–श्रव्य साधनें ह्यांच्या विक्रीचें उत्पन्न व्यापारी पायावर ठेवता येणार नाही. भावी काळात परभाषीयांना मराठी शिकवण्याच्या किंवा इतर कामासाठी केंद्र-शासन; उद्योजक, आणि इतर ठिकाणांहून मदत मिळवायचा प्रयत्न करता येईल.

संस्थेचें कार्यक्षेत्र आणि कार्यपद्धति

प्रस्तावित संस्थेच्या सर्वसाधारण प्रयोजनाशी अनुरूप अशीं कार्यक्षेत्रें आणि अशा कार्यपद्धति निवडाव्या लागतील.

संस्थेच्या आवाक्यात पुढील विषय अग्रक्रमानुसार येतील.

(१) मराठीचा स्वभाषा म्हणून अभ्यास.

(२) मराठीचा परभाषा म्हणून अभ्यास.

(३) मराठीतून इतर भाषांमध्ये आणि इतर भाषांमधून मराठीत भाषांतर करण्याची कला.

(४) आधुनिक व्यापकप्रसारमाध्यमें (मास मीडिया) आणि विशिष्ट व्यवसाय-क्षेत्रें (उदा. कायदा व न्यायव्यवहार) ह्यांमधून होणारा मराठीचा उपयोग.

(५) मराठी ललित व ललितेतर वाङ्मयाचा स्वभाषीयांकडून आणि परभाषीयांकडून अभ्यास.

(६) मराठीच्या प्रादेशिक आणि सामाजिक बोली, बोलींमधलें मौखिक वाङ्मय, आणि त्यांतून व्यक्त होणारी प्रादेशिक संस्कृति ह्यांचा अभ्यास.

(७) भाषेशी संबंधित तंत्रविद्या (उदा. लघुलेखन, मुद्राक्षरविद्या, टंकलेखन).

ह्या विषयांच्या संबंधात संस्था नेमकें कोणत्या पद्धतीचें कार्य करणार ?

(१) संशोधन—अर्थात् मुख्यतः व्यावहारिक वळणाचें.

(२) चर्चासत्रें, कृतिसत्रें या मार्गानें नव्या कल्पनांचा संचय आणि प्रसार करणें.

(३) अल्प मुदतीचे अभ्यासक्रम आखणें, त्यांच्यासाठी सामग्री तयार करणें, आणि सुरवातीला ते राबवून दाखवणें.

(४) संशोधनइतिवृत्तें, चर्चा–इतिवृत्तें, नियतकालिक, पाठ्यपुस्तकें, दृश्य–श्रव्य साधनें अशा स्वरूपाची सामग्री तयार करून उपलब्ध करणें.

(५) शासनाला मराठीच्या योजनापूर्वक विकासाविषयी सल्ला देणें.

(६) सामान्य नागरिक, शिक्षणसंस्था इत्यादींसाठी माहितीकेंद्र चालवणें, तांत्रिक बाबींविषयी शिफारसी करणें आणि मानदंडांचा पुरस्कार करणें (उदा. लहान मुलांसाठीच्या पुस्तकाची छपाई कशी असावी, वर्णक्रमी निश्चित करणें).

(७) महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य, संस्कृति यांसंबंधी कार्य करणाऱ्या संस्थांशी व व्यक्तींशी संपर्क ठेवणें.

प्रस्तावित संस्थेत काम करणारा अभ्यासकवर्ग (ॲकडेमिक स्टाफ) आणि इतर केंद्रांमधील अभ्यासक ह्यांची देवाणघेवाण होत रहावी, त्यामुळे अशा अभ्यासकांच्या कामात ताजेपणा व व्यापक दृष्टि यायला मदत होते. यासाठी संस्थेच्या अंतर्गत गरजांपेक्षा थोडी जास्त माणसें ठेवावीं लागतील.

संस्थेला उपलब्ध व्हाव्या अशा सुविधा

काही वेळा इतर ठिकाणच्या सुविधा संस्थेला नियमित रूपाने अल्प खर्चात उपलब्ध करून देता येतील. पण संस्था शक्यतो स्वयंपूर्ण होईल तेवढें चांगलें. ग्रंथालय, ध्वनिफिती, फिल्म्स्ट्रिप्स्, दृश्य लोककलांचे नमुने इत्यादि सामग्री जतन करून अभ्यासकांना उपलब्ध करणें (उदा. मराठी कवि, वक्ते इत्यादिकांच्या आवाजांचें ध्वनिमुद्रण), स्वनवैज्ञानिक (फोनेटिक) व इतर प्रयोगशाळा, ध्वनिमुद्रण-शाळा, भाषेच्या अध्यापनास उपयुक्त लँग्वेज लॅबॉरेटरी अशा काही सोयींचा उल्लेख करता येईल.

संस्थेला तांत्रिक स्वरूपाचें मुद्रण (उदा. विशेष खुणा, भिन्न लिप्यांचें मिश्रण) बाहेरून करावें लागणार. त्यातली जिकीर कमी करण्यासाठी संस्थेला स्वतःचा छापखाना जरी नसला तरी छोटीशी चित्रशाळा, जुळणीघर, ठसे वा प्लेट बनवण्याची सोय, प्रुफें काढण्यासाठी ट्रेडलमशीन असायला हरकत नाही. शिवाय ही पूर्वमुद्रण-सेवा शैक्षणिक संस्थांना माफक दरात उपलब्ध करता येईल.

संस्थेचें केंद्र एका ठिकाणी रहावें. जरूर लागल्यास विशिष्ट कामापुरती अन्य गावात उपकेंद्रें उघडता येतील. सुरवातीला संस्थेला लहान वास्तु पुरेलही. पण भावी काळात वास्तु वाढायला अवकाश राहील एवढी जमीन (सुमारे १ हेक्टेअर) असावी. हवामान आणि पर्यावरण कामाला प्रोत्साहक राहील, संस्थेतल्या कार्यक्षेत्रातल्या विषयांतील विशेषज्ञांशी संपर्क सहज ठेवता येईल अशा गावी संस्था ठेवावी. (कर्नाटक, गुजरात राज्यातील अशा संस्था विद्यापीठांच्या परिसरातच आहेत.)

संस्थेची संघटनात्मक रचना व आर्थिक अंदाजपत्रक

संस्थेचें प्रयोजन व स्वरूप, कार्यांचीं क्षेत्रें व पद्धति, हव्या असलेल्या सुविधा ह्या लक्षात घेऊन संघटनात्मक रचना आणि पैशाची तरतूद यांचा विचार करावा लागेल.

संस्था स्वायत्त ठेवायची असल्याने तिच्यासाठी विस्ताराने घटना करावी लागेल. स्थूल मानाने संस्थेचे तीन घटक मानता येतील : (१) नियामकमंडळ, (२) अभ्यासक-वर्ग, (३) प्रशासन व सेवा.

संस्थेचें सर्वतोपरी नियमन १६–१७ जणांच्या नियामकमंडळाकडे राहील : त्यात चारपाच पदसिद्ध सभासद राहतील (उदा. महाराष्ट्राचा भाषासंचालक, साहित्य-संस्कृति-मंडळाचा अध्यक्ष), संस्थेमधल्या अभ्यासक-वर्गाचें प्रतिनिधित्व संचालक धरून चारजण करतील. साहित्यसंस्था, पत्रकारसंघ, विद्यापीठांचे संबंधित विद्या-विभाग इत्यादींचें प्रतिनिधित्व चारजण करतील, आणि साहित्य, भाषा, शिक्षण इत्यादि विषयांतील नियुक्त तज्ज्ञ चारपाच राहतील. निवडणुका शक्यतो टाळाव्या.

संस्थेला जागा देणाऱ्या विद्यापीठाचा कुलगुरु आणि तो नसल्यास संस्थेचा संचालक हा मंडळाचा अध्यक्ष राहील.

संचालक इतर सेवकांप्रमाणेच संस्थेचा सेवक असावा, शासकीय सेवक नसावा. तो भाषा आणि संस्थेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या इतर एखाद्या विषयात मान्य तज्ज्ञ असावा. त्याच्या जोडीला काही अभ्यासक प्राध्यापक, प्रपाठक, व्याख्याता, संशोधन-सहायक अशा ठरीव पगारी श्रेणीतले असतील. काही अभ्यासक ज्येष्ठ आणि कनिष्ठ संशोधन–अध्येते म्हणून कमीअधिक संख्येने कमीअधिक मुदतीपुरते राहतील. (संशोधनाला पूरक असें अध्यापन त्यांनी करायला हरकत नसावी.) काही मानसेवी अभ्यासक आपापल्या जागी राहून संस्थेच्या संशोधनाला मदत करतील. मराठीचे व इतर विषयाचे अध्यापक आणि अध्यापनक्षेत्राच्या बाहेरची जाणकार मंडळी ह्यांचा उपयोग संशोधन-अध्येता किंवा मानसेवी अभ्यासक म्हणून करून घेता येईल.

संचालक हा मुख्य प्रशासक, प्राध्यापक (सुरवातीला अनुयोजित भाषाविज्ञान, भाषाकेंद्री साहित्याभ्यास, लोकसंस्कृति अशा तीन विषयांचे पुरे) हे पदसिद्ध उपसंचालक, शिवाय जरूर तो प्रशासकीय, कार्यालयीन, आणि ग्रंथालय, संग्रहालय, ध्वनितंत्रविभाग, प्रकाशनविभाग अशा विशेष सेवाविभागांचा सेवकवर्ग असे राहतील.

अभ्यासकवर्ग आणि इतर सेवकवर्ग निवडताना त्यांना मराठीखेरीज अन्यभाषा, विशेष कला वा तंत्र यांचें अंग आहे का याचा काही एका प्रमाणात विचार करावा.

संस्थेला सुरवातीला अनावर्तनी किंवा भांडवली खर्च सुमारे २४ लाख रुपये येईल. (यात जमिनीचा विचार केलेला नाही. वास्तु, फर्निचर, तांत्रिक सामग्री यांचाच केला आहे.) नंतर आवर्तनी खर्च सुरवातीच्या काळात वर्षाला १० ते १५ लाख रुपये येईल. बाहेरच्या संशोधनाला उत्तेजन अनुदानाच्या रूपाने न देता अध्येतृवृत्तींच्या (फेलोशिप्स) रूपाने द्यावे. (खर्चाचे अंदाज साहजिकच १९८० मधले आहेत.)

संस्थेसाठी एक स्वतंत्र निधि (कॉर्पस) निर्माण करणें अनेक दृष्टीने श्रेयस्कर होईल, म्हणून त्याचा विचार व्हावा. शिवाय इतर देणग्यांचाही पैशाच्या किंवा वस्तूच्या रूपाने स्वीकार करावा.

संस्था हाती घेऊ शकेल अशा काही नमुन्यादाखल योजना

संस्थेच्या कार्यक्षेत्रात पडू शकणारे जे सात विषय मागे उतरत्या क्रमाने सांगितले त्यातल्या प्रत्येक विषयात काही योजना सुचवता येतील.

(१) स्वभाषा म्हणून मराठी : (क) शालेय मराठी आणि महाविद्यालयात शिक्षणाचें माध्यम म्हणून वापरायचें प्रगल्भ मराठी ह्यांच्यात पूल बांधणारे अभ्यास-क्रम व पाठ्यपुस्तकें (यांत मराठीत व्याख्यानाचीं किंवा पुस्तकांचीं टिपणें काढणे, मुलाखत देणें व घेणें अशा नैपुण्यांचाही समावेश करावा लागेल). (ख) शालेय

मराठीचा पाया सुधारण्यासाठी योजना. (ग) आकाशवाणी, दूरदर्शन, प्रवासस्थानकें येथील मराठी निवेदकांसाठी उच्चारशिक्षण.[१]

(२) परभाषा म्हणून मराठी : (क) परदेशी अन्यभाषीयांसाठी मराठी-भाषा-परिचय. (ख) भारतीय अन्यभाषीयांसाठी मराठी-भाषा-परिचय.

(३) भाषांतरकला : (क) भाषांतरकारांसाठी अभ्यासक्रम, चर्चासत्रें, कृतिसत्रें. (ख) मराठी-इंग्लिश कोश (मोल्स्वर्थ—कँडी ह्यांचा कोश आता कालबाह्य झाला आहे). (ग) भाषांतरमार्गदर्शिका : इंग्लिश-मराठी, मराठी-इंग्लिश, संस्कृत-मराठी, मराठी-हिंदी, हिंदी-मराठी, मराठी-बांगला इत्यादि.

(४) व्यापकप्रसारमाध्यमें व व्यवसायक्षेत्रें यांमधील मराठी : (क) कायदा, न्यायव्यवहार यांमधील मराठी. (ख) रंगभूमि, चित्रपट, नभोनाट्य, दूरचित्रवाणी-नाट्य ह्यांमधील वाचिक अभिनयाविषयी संशोधन (आरोहावरोह, वजन, फेक इ.).

(५) ललित आणि ललितेतर वाङ्मय : (क) परभाषीयांसाठी मराठीच्या अभ्यासासाठी वेचे (टिपा, लेखक-परिचय इत्यादि सामग्रीसह). (ख) मराठी साहित्याच्या इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी एकेक पुस्तक (गद्य-पद्य-वेचे; पत्रें, शिलालेख इ. पूरक समकालीन सामग्री; टिपा, लेखक-परिचय, संदर्भसूची इ. सामग्रीसह). (ग) मराठी भाषण आणि लेखन यात प्रचलित असणाऱ्या मराठी, हिंदी, इंग्लिश, संस्कृत अवतरणांचा कोश. (घ) ललितेतर मराठी गद्याचा अभ्यास (उदा. विद्यापीठीय पाठ्यपुस्तकांची शैली). (ङ) शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय स्तरांवर ललित व ललितेतर वाङ्मय परिणामकारक रीतीने व जीवनाच्या इतर क्षेत्रांशी अनुबंध ठेवून स्वभाषीयांना कशा रीतीने शिकवावें याबद्दल चर्चा, प्रयोग, संशोधन. (च) ललित व ललितेतर लेखकांवरील समीक्षेचे संग्रह.

(६) बोली, मौखिक वाङ्मय, प्रादेशिक संस्कृति : (क) मराठीच्या बोलींचीं हस्तपुस्तकें (स्वनव्यवस्था, व्याकरण, शब्दकोश, स्वाभाविक भाषण-संभाषण आणि लोकवाङ्मय ह्या स्वरूपाचे नमुने, ऐतिहासिक अनुबंध). (ख) मराठीच्या बोलींमधून जतन झालेली आदिवासी संस्कृति. (ग) ग्रामीण महाराष्ट्राच्या विविध जनसमूहांच्या नित्याच्या भाषेतले भाषिक व सांस्कृतिक विशेष —विशेषतः कारूनारूंच्या.

(७) भाषेशी संबंधित तंत्रविद्या.

मराठी भाषा विकसित व्हावी यासाठी ह्या व अशा योजनांचा कसा आणि किती हातभार लागेल तें वेगळें सांगायला नको.

---

१. व्यावहारिक मराठीच्या विविधांगी विचारासाठी पहा : व्यावहारिक मराठी : गरज, मागणी, पूर्तता, **नवभारत**, विशेषांक ऑगस्ट—सप्टेंबर १९८१.

संस्थेच्या कामामध्ये अध्येतृवृत्ति, मानसेवी अभ्यासकपदें, चर्चासत्रें, कृतिसत्रें इत्यादींच्या द्वारा बाहेरच्या लोकांना गुंतवून घेऊनच तिचें कार्य फलद्रूप होईल. ह्या बाहेरच्या लोकांत शालेय शिक्षकांनाही महत्त्वाचें स्थान राहील. भाषेचा विकास हा अखेर ती भाषा बोलणाऱ्यांचा विकास असतो. परिभाषा, साक्षरताप्रसार, शुद्धलेखन-सुधारणा ह्या किंवा अशा मोजक्या अतिपरिचित विषयांमध्येच भाषेच्या विकासाचा विचार अडकून पडणें हिताचें नाही.

समारोप

राजभाषावर्षामध्ये विविध परिसंवाद, चर्चासत्रें, लेखमाला झाल्या. ह्या विचार-मंथनामधून ही एक निश्चित योजना मराठी जनता आणि महाराष्ट्र सरकार यांच्या-पुढे आली आहे. तिच्यावर आणखीही साधकबाधक विचार करता येईल.

योजना मांडताना सरकार तिला राबवील आणि सरकारच्या पाठिंब्याने एक बरीचशी स्वायत्त संस्था उभी राहू शकेल हीच कल्पना डोळ्यासमोर होती. आता तीच इथे लेखरूपाने मांडताना डोळ्यासमोर दुसरीही एक शक्यता उभी राहते. लोकांनी खाजगी प्रयत्नाने अशी संस्था उभारावी आणि मागाहून त्याला सरकारचे पाठबळ मिळवावें याही रीतीने ती राबवता येईल. (दाक्षिणात्य राज्यामधल्या काही संस्था ह्या पद्धतीने उभ्या राहिल्या आहेत तर काही विद्यापीठांच्या पुढाकाराने स्थापल्या गेल्या आहेत.)

महाराष्ट्र या विषयात मागे किती दिवस राहणार? स्वभाषेच्या अभिमानाला विधायक कर्तृत्वाचें वळण केव्हा लागणार? मराठी भाषेला इतरांनी न्याय द्यावा अशी अपेक्षा करण्यापूर्वी स्वतः न्याय द्यायला आम्ही केव्हा पुढे होणार? मराठी-भाषी धनिक अशा शैक्षणिक स्वरूपाच्या पण नव्या वळणाच्या योजनांमध्ये समाजाच्या वतीने भांडवल गुंतवायला कधी पुढे येणार?

आदिवासींच्या प्रश्नाची भाषिक बाजू

आदिवासी कोण ? त्यांचा प्रश्न कोणता ?

आदिवासी हा शब्द aboriginal ह्या इंग्लिश शब्दावरून घेतलेला आहे. युरोपियन लोकांनी जेव्हा अमेरिका, दक्षिण आणि पूर्व आफ्रिका, ऑस्ट्रेलेशिया ह्या भूप्रदेशांत वसाहती स्थापल्या तेव्हा तिथल्या आधीपासून राहणाऱ्या रहिवाशांना त्यांनी आदिवासी हें नाव दिलें. (भारतासारख्या इतर देशांवर साम्राज्य स्थापताना मात्र त्यांनी native (एतद्देशीय) ह्या शब्दाचा उपयोग केला हें पाहण्यासारखें आहे.) आदिवासींना tribal असेंही संबोधन आहे. भारतीय संविधानात Scheduled Tribes (अनुसूचित जनजाति किंवा जमाती) असा शब्दप्रयोग आहे. Tribe (जमात) कशाला म्हणावें ? जमात म्हणजे असा एक समाज की–

(क) जो रक्ताच्या आणि लग्नाच्या नात्यावर म्हणजे ज्याला आपण पूर्वी चक्क शरीरसंबंध म्हणत असू त्यावर आधारलेला आहे, निरनिराळीं कुलें एकत्र येऊन जो बनलेला असतो.

(ख) जो समाज म्हणून स्वयंपूर्ण राहू पाहतो – समाजव्यवस्था, चालीरीती, समजुती ह्या सर्व बाबतीत जो समाज आपलीं वैशिष्ट्यें राखून आहे, आणि

(ग) जो बेटीबंद आहे.

ही व्याख्या पाहिल्याबरोबर आपल्या लक्ष्यात येईल की tribe आणि caste, जमात (जनजाति) आणि जात (जाति) ह्यात बरेंच साम्य आहे. किंबहुना, भारतातल्या विविध जमातींना एकत्र गुंफण्यातूनच, जमातींचें स्वयंपूर्णत्व मर्यादित करण्यातूनच जमातींच्या जाती बनल्या आणि ह्या जातींच्या उतरंडीतूनच हिंदू समाज बनला अशी एक उपपत्ति मांडली गेली आहे. सामान्य माणसाला जर विचारलें तर, ज्यांचें स्थान हिंदूंच्या जातिव्यवस्थेत सांगता येत नाही आणि जे पूर्वीपासून मुस्लिम, ख्रिस्ती इत्यादिही नाहीत ते आदिवासी, अशी त्याची कल्पना दिसते. (अलीकडचीं धर्मांतरें लक्षात घेतलीं नाहीत तरी काही आदिवासी पूर्वीपासूनचे बौद्ध आहेत हें मात्र लक्षात घेतलें पाहिजे.) समाज आणि संस्कृति ह्यांच्या अभ्यासकांना विचारलेंत तर ते आदिवासी आणि जमातबंद लोक ह्या खेरीज preliterate असाही एक शब्द वापरतात. जो समाज स्वयंपूर्ण राहू पाहतो त्या समाजातील लोकांचें भाषेमार्फत

आहे. (आदिवासींना आदिवासी म्हणू नये, वनवासी असें काही म्हणावें, उद्या त्यांनी आम्ही आद्य वस्ती करणारे म्हणून आपल्याला इथून जा म्हणून सांगितलें तर काय घ्या, इत्यादि युक्तिवाद काही मंडळी करत असतात. त्याच्या मागची मनोभूमिकाही चिंता करण्यासारखी आहे.)

आमचा प्रश्न ओझ्यासारखा वागवू म्हणणारे तुम्ही कोण हो असें कुणा आदिवासीयाने इतर भारतीयांना विचारलें तर? (आम्ही नागा, तुम्ही भारतीय, आणि आम्हाला पडलेला तुम्हा भारतीयांचा प्रश्न अशी भाषा बोलणारे नागा समाजातील विद्यापीठीय विद्यार्थी माझ्या एका सहकाऱ्याला भेटलेले आहेत. तेव्हा मी एक नसती शंका काढतो आहे असें वाटायला नको!) तर अशा प्रश्नाला एकच समाधानकारक उत्तर आहे तें म्हणजे – तुम्ही नागा (किंवा गोंड किंवा कोलाम किंवा संताळ किंवा आणखी कुणी) आणि आम्ही बिगर–आदिवासी असे आपण एकाच ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक, आणि राजकीय नौकेत आहोत (पाहिजे तर अडकलो आहोत म्हणा!). हा तुम्हा–आम्हांला सामावणारा 'आपण' कसा अधिकाधिक सार्थ होईल आणि नौकेत अडकल्याची भाषा बोलावी कशी लागणार नाही हा खरा 'आपला' प्रश्न आहे. आदिवासींचे प्रश्न आमचे आहेत आणि आमचे प्रश्न त्यांचे आहेत. हें काही रोमँटिक स्वप्नरंजन नाही, हें रोखठोक वास्तव आहे. वर ज्यांना सोप्या पळवाटा म्हटलें त्या हें रोखठोक वास्तव नाकारण्यामधून फुटल्या आहेत. (मिशनरी आणि नक्षलवादी ह्यांचे आपण खरें म्हणजे आभार मानायला हवेत.)

आदिवासींच्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करणें हें ह्या लेखाचें उद्दिष्ट नसून केवळ त्याच्या भाषासंलग्न अंगाचाच विचार इथे करायचा आहे. आदिवासींच्या कोणत्याच प्रश्नाची सोडवणूक आरामखुर्चीतलें भाबडें स्वप्नरंजन किंवा जीपमधून फिरताना बांधलेले हिशेबी आडाखे ह्यांच्यामुळे होणार नसून डोळस, प्रयोगशील कष्टांतूनच होईल. आदिवासींच्या भाषिक प्रश्नांबद्दल डोळस व्हायचें तर महाराष्ट्रातले आदिवासी आणि त्यांच्या भाषा ह्यांची धावती ओळख करून घेणें अनुचित ठरणार नाही.

महाराष्ट्रातले आदिवासी आणि त्यांच्या भाषा

महाराष्ट्राचे भौगोलिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक दृष्ट्या पाच भाग पडतात – कोकणपट्टी (ठाणें, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग), कृष्णा – भीमा खोरें (पुणें, दक्षिण नगर, सातारा, कोल्हापुर, सांगली), गोदावरी-मांजरा खोरें (नाशीक, उत्तर नगर, औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद), तापी खोरें (धुळें, जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती), आणि प्राणहिता खोरें (यवतमाळ, नागपुर, भंडारा, चंद्रपुर). (पश्चिम महाराष्ट्र, नागविदर्भ, आणि मराठवाडा ही आगंतुक कारणांमुळे झालेली उपरी विभागणी आपण जेवढ्या लवकर विसरू तेवढें बरें.) ह्या

भागांच्या सीमारेषा सह्याद्रि, सातपुडामहादेव, सातमाळ–अजिंठा, आणि बीड–उस्मानाबाद जिल्ह्यामधील बालाघाट डोंगर ह्या रांगांनी निश्चित झाल्या आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींची वस्ती बरीचशी ह्या डोंगरपट्टयांतून आहे. भौगोलिक दृष्टया आदिवासी जमातींचे मुख्यतः चार गट पाडता येतील. भाषिक दृष्टया, भारतीय–आर्य (संस्कृतोद्भव), द्राविड, आणि ऑस्ट्रो–एशिॲटिक (दक्षिण एशियाई) अशा तीन भाषाकुलांतून त्यांच्या बोली विभागता येतील. एकत्रित चित्र तालिका १ मध्ये पहा.

म्हणजे प्रादेशिक भाषा प्रमाण–मराठी हिला जवळ असणाऱ्या बोली बोलणारांचा भाषिक प्रश्न थोडा सोपा म्हणता येईल. द्राविड किंवा मुंडा–नहाली कुलांतील भाषा बोलणारांना प्रमाण–मराठी शिकताना अधिक अडचणी येतील. इतरांना म्हणजे भारतीय–आर्य भाषा बोलणाऱ्या आदिवासींना अडचणी नाहीत असें मात्र नव्हे. अडचणी सर्वच आदिवासी जमातींना आहेत आणि त्या आपण डोळस सहानुभूतीने समजावून घेतल्या पाहिजेत. (नुसता डोळसपणा किंवा नुसती सहानुभूति पुरेशी नाहीत.)

त्यासाठी अगोदर आपल्याला भाषेचें नेमकें कार्य काय ह्याची थोडी ओळख करून घ्यायला हवी. त्याशिवाय एखादा मानवसमाज आपल्या भाषेला चिकटून राहतो तर दुसरा त्या जोडीला दुसरी भाषाही शिकायला तयार होतो तर तिसरा आपलीच भाषा विसरून जाऊ शकतो हें सर्व का होतें आणि त्याचे परिणाम काय होतात हें नीट लक्षात येणार नाही. भाषा शिकून घेणें म्हणजे लिहायला–वाचायला शिकणें नव्हे हेंही लक्षात ठेवायला हवें.

भाषेचीं विविध कार्यें

एखादी भाषा मनुष्य स्वीकारतो, शिकतो, आणि टिकवून धरतो ह्याचीं काही कारणें उपयुक्ततेवर आधारलेलीं आहेत. सभोवतालचा नैसर्गिक परिसर आणि मानवी समाज समजावून घेणें किंवा देणें, त्याचा उदरभरण, स्वसंरक्षण इत्यादि मूलभूत गरजा भागविण्यासाठी उपयोग करून घेणें ह्यासाठी भाषा कामी येते. एखाद्या जंगलातून माझ्यासारखा शहरी माणूस फिरला तर तो वाट तर चुकेलच, पण निरनिराळी रंगरूपें, वास, स्पर्श ह्यामुळे तो नुसता नादावेल किंवा गोंधळेल. उलट एखाद्या आदिवासीचा शब्दसंग्रह ह्या बाबतीत समृद्ध असेल. त्याच्या मदतीने कोणत्या वनस्पतीला काय नाव आहे, ती विषारी आहे, औषधी आहे, खायला बरी आहे, कोणते किडे कामाला येतात इत्यादि एक ज्ञानकोशच तो खोलू शकेल. तशीच उपयुक्तता भाषेला मानवी परिसराच्या संदर्भात प्राप्त होते. एखादी नवी भाषा शिकायची तर कोणत्या शब्द-

प्रयोगाचा कोणावर अनुकूल–प्रतिकूल परिणाम होतो तें माहीत करून घेतल्याशिवाय तिच्या मदतीने इतरांवर प्रभाव पाडता येणार नाही. पण तसा तो पाडता आला की ती भाषा बोलणाऱ्या समाजात आपल्याला नवख्यासारखें वाटणार नाही. ही सामाजिक उपयुक्तता भाषेकडून अपेक्षित नसती तर प्रश्नार्थकें, आज्ञार्थ, विधि–निषेध–वाचकें ह्या भानगडी भाषेत कशाला आल्या असत्या !

पण माणूस माणसाला वागवून घेतो, त्याच्याशी वागतो तो काही केवळ त्याचा उपयोग करून घ्यावा एवढ्यासाठीच नाही. (असें जर नसतें तर आपण आदिवासींच्या

तालिका १

भौगोलिक गट	भूप्रदेश	भारतीय–आर्य बोली बोलणारे	द्राविड बोली बोलणारे	ऑस्ट्रोएशिॲटिक बोली बोलणारे (मुंडा व नहाली उपकुलें)
१	ठाणें, रायगड, नाशीक, पुणें, जिल्ह्यांतील डोंगरपट्टी	भिल्ल, कोकणा, धोडिया भिल्ल, वारली, ठाकूर,* दुबळा, कातकरी, महादेव कोळी*	....	....
२	सातपुडा (धुळें, जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती)	भिल्ल	....	नहाली, कोर्कू (पैकी कोर्कू ही मुंडा–उपकुला-मधील)
३	गोदावरी खोरें–पश्चिम भाग	पारधी	....	....
४	सातमाळ डोंगर (नांदेड, यवतमाळ); चंद्रपुर जिल्हा	आंध, हळबा	गोंड, कोलाम, पर्धान	....

टिपा : तारकांकित जमाती मराठीची स्थानिक बोली बोलतात. बरेच नहाली कोर्कू बोलतात, नहाली विसरले आहेत. सर्वच हळबा म्हणवून घेणारे लोक हळबी बोलत नाहीत. कृष्णा–भीमा खोऱ्यात आणि बालाघाट डोंगरात आदिवासींची वस्ती त्यामानाने बरीच कमी आहे.

बद्दल फिकीर कशाला केली असती ?) भाषेचीं दुसऱ्या प्रकारचीं कार्यें मानवाच्या सामाजिकतेवर आधारलेलीं असतात. तसें नसतें तर आपल्या तान्हुल्याशी आई बड-बडत राहिली नसती किंवा बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या परिचिताला आपण कुशल विचारलें नसतें किंवा झाडाच्या पारावर बसून लोकांनी रिकामपणच्या गप्पा मारल्या नसत्या किंवा भाषेत शिव्या मोजण्याची आणि दुवा देण्याची तरतूद झाली नसती. भाषेमुळे पिढ्या, सामाजिक वर्ग, भौगोलिक अंतरें ह्यांना जोडून घेऊन एक सुसंघटित समाज उभा राहतो आणि आपली संस्कृति आणि वेगळेपणा ह्यांना जपू शकतो. परप्रांतात स्वतःची भाषा ऐकू आली की वेगळाच आनंद होतो हें कदाचित् तुमच्या अनुभवाला आलें असेल.

उपयुक्तता आणि सामाजिकता ह्यांच्या पलीकडचींही काही तिसऱ्याच प्रकारचीं कार्यें भाषेला असतात. माणसाला त्याची स्व–भाषा ती आहे ह्याचेंच अप्रूप असतें. मग ती इतरांना वेडीवाकुडी वाटली तरी त्याची त्याला फिकीर नसते. उखाणे घालणें, भेंड्या किंवा भेंड्या लावणें इथपासून तो तहत कविता करणें व वाचणें, तत्वज्ञाला कोडीं पडणें आणि त्याने त्यांच्याशी झुंज घेणें अशा निरनिराळ्या माध्यमांतून मानवी मन भाषेशी खेळतें. आपण ह्याला भाषेचें आत्मिक कार्य म्हणू. ('आत्मिक' शब्दाला लाजण्याचें काही कारण नाही ! भुलण्याचें तर नाहीच नाही.)

भाषेच्या ह्या त्रिविध कार्यांकडे नजर टाकली तर आदिवासी माणसाला प्रमाण–मराठी किंवा हिंदी शिकून घेण्याची जितकी गरज आहे तितकीच गरज त्याच्या स्वतःच्या बोलीची आहे हें दिसून येईल. कल्पना करा–एखाद्या मुलाच्या आयुष्याचीं बहुमोल अशीं पहिलीं ६।७ वर्षे केवळ कोलामी भाषेत गेलीं आहेत. त्याचे कुटुंबीय, सवंगडी तीच बोलतात. त्याचा अनुभव, त्याचा स्वभाव ह्यांची जडणघडण कोलामीत झालेली आहे. आणि त्याला एकदम मराठी शाळेत घातलें. जी प्रमाण–मराठी त्याला धड समजत नाही, तिच्यामध्ये उत्तरें द्यायचीं, लेखन लिहायचें, गणित आणि सामान्य ज्ञान ह्यासारखे इतर विषय शिकायचे अशी अ–रास्त अपेक्षा आपण केली. 'अशुद्ध' मराठी बोलण्याबद्दल, 'चुकून' कोलामीमध्ये बोलण्याबद्दल, शिक्षकाचें मराठी न समजल्यामुळे झालेल्या प्रमादांबद्दल त्याला बोलून घ्यावें लागतें आहे, शिक्षा होते आहे. त्याची भाषा, त्याची संस्कृति ह्याबद्दल अवहेलना आणि तुच्छताबुद्धि त्याच्या वाट्याला येत आहे. परिणाम काय होईल ? शाळेला तो रामराम ठोकील. स्वतःबद्दल हीनतेची भावना उत्पन्न होईल. जर त्याने हिमतीने शिक्षण पुरें केलेंच तर स्वतःच्या समाजाला तो पारखा होईल. परिणाम हा किंवा तो होईल, पण वाईटच होईल. आदिवासींच्या प्रश्नाच्या सोडवणुकीपासून आपण दूरच जाऊ. माणसाने माणसाला अवमानित केल्याचें श्रेय हेंच फक्त आपल्या पदरात पडेल. (आदिवासी भाषा आणि इतर प्रमाणेतर बोली ह्या म्हणजे भारताच्या एकात्मतेच्या मार्गातील

नुसत्या अडगळी आहेत असा भाव पोटात ठेवणें राष्ट्रप्रेमाचें तर लक्षण नव्हेच, पण तो मानवद्रोह आहे. भाषेच्या केवळ पहिल्याच उपयुक्ततालक्षी कार्याची ओळख पटल्याची ती खूण आहे.)

तात्पर्य, आदिवासी बोली आणि संस्कृति एका बाजूला आणि भारतीय संस्कृति आणि तिचें वाहन अशी प्रमाण–मराठी किंवा हिंदी दुसऱ्या बाजूला ह्यांच्या मधला शैक्षणिक पूल अधिक काळजीपूर्वक आणि अधिक भक्कम पायावर बांधला पाहिजे. आताचें उदाहरण पुढे चालवायचें आणि कोलामी मुलाची शाळेशी दोस्ती कशी होईल याचा विचार करायचा तर–प्रथम कोलामी देवनागरीत लिहायला शिकवायला हवें म्हणजे बोलक्या ढलप्याचें कोडें त्या कोलाम मुलाला सहज उलगडेल. (कोलामी मूल अलिखित–भाषी समाजातून आलेलें आहे. उलट अगदी निरक्षर समाजातून आलेलें मराठी-भाषी मूल घेतलें तर त्याला आपलें बोलणें आणि पाटीवर विशिष्ट तऱ्हेने रेघा काढणें ह्यांचा संबंध असतो एवढी तरी कल्पना अवलोकनाने आलेली असते.) तोपर्यंत तो हळूहळू प्रमाण–मराठीत बोलायला शिकेल. त्याला 'हसत-खेळत' प्रमाण–मराठी शिकवण्याचें काम शिक्षकापेक्षा इतर मुलेंच जास्त चांगलें करतील. इतर विषयांसाठी माध्यम म्हणून प्रथम कोलामी वापरायचें नंतर शेवटी गोषवारा मराठीत सांगायला सुरवात करायची. दुसऱ्या वर्षात त्याला मराठीत साक्षर करायचें. मराठीत विषय सांगून शेवटी कोलामीत गोषवारा सांगायचा. तिसऱ्या वर्षापर्यंत हळू-हळू तो मराठीभाषी मुलांच्या वर्गात बसू शकेल. अर्थात् अशी योजना राबवायची हें सोपें नाही.

आदिवासींना जसें स्व–भाषेच्या आईच्या दुधापासून तोडणें बरोबर नव्हे तसेंच शालेय आणि (क्षमता असेल तिथे) उच्च शिक्षणाच्या वाघिणीच्या दुधालाही पारखें व्हावें लागणें बरोबर नव्हे. ही दुहेरी भूमिका जर आपण घेतली तर वर सुचवलेली दोनदा साक्षर करण्याची योजना अवघड म्हणून दूर सारणें योग्य होणार नाही. ('आपण' म्हणजे आपण सर्व–आदिवासी आणि बिगर-आदिवासी–केवळ 'आम्ही' बिगर-आदिवासी नव्हे.)

ह्याच नाण्याची दुसरी बाजू बिगर-आदिवासींनी कोलामी-कोर्कू सारख्या आदिवासी भाषा शिकून घेणें. सामाजिक कार्यकर्ते, शाळाशिक्षक, समाजकल्याण अधिकारी, फार काय वरच्या श्रेणीतले शासक ह्यांना ह्यांच्यापैकी एखादी भाषा शिकून घ्यायला उत्तेजन दिलें पाहिजे आणि तशी सोय उपलब्ध करून द्यायला पाहिजे.

आदिवासी क्षेत्रात कार्य करण्याचीं पथ्यें

एखाद्याला आदिवासी समाजात जाऊन काम करायचें असेल किंवा आदिवासींच्या जीवनाचा वैज्ञानिक अभ्यास करायचा असेल आणि हें सर्व यशस्वीरीत्या करायचें असेल

तर त्याला त्या समाजाची भाषा बोलता येणें हें अत्यावश्यक आहे. आदिवासी लोकांना आपण बोलतो ती भाषा शिकवल्याशिवाय यावी अशी अपेक्षा करणें वास्तवाला धरून नाही. आदिवासी लोकांची एक वेगळीच संस्कृति असते. त्यांची समाजरचना, राहणी, खाणें-पिणें, धार्मिक व इतर कल्पना, करमणुकीचीं साधनें, व पोटासाठी करावीं लागणारीं कामें हीं शहरी लोकांपेक्षा, फार काय बिगर-आदिवासी खेड्यांतील लोकांपेक्षा देखील फार वेगळीं असतात आणि या सर्व गोष्टी भाषेशी निगडित असतात. त्यांच्या भाषेतून त्यांची संस्कृति प्रकट होते. त्यामुळेच त्यांना आपली भाषा शिकवणें म्हणजे त्यांचा अगदी वेगळ्या संस्कृतीशी परिचय करून देणें आहे व ज्या संस्कृतीची त्यांना अजिबात कल्पना नाही त्या संस्कृतीची भाषा त्यांना मोठ्या वयात शिकवणें हें कठीण काम आहे. म्हणून त्यापेक्षा सोपा मार्ग म्हणजे त्यांचीच भाषा आत्मसात् करणें. ती आत्मसात् करणें हें फक्त शहरात त्या भाषेच्या परीक्षा पास होऊनच साध्य होत नसतें. त्यासाठी त्या भागात राहून, लोकांत मिसळून त्यांच्याच भाषेत बोलण्याचा प्रयत्न केला तरच ती बऱ्यापैकी बोलता येते. शिवाय फक्त बाहेरून त्या भाषेचा अभ्यास केल्याने आपल्याला त्यांच्या संस्कृतीविषयी काहीच माहीत होत नसतें व पुष्कळदा भाषा येऊनदेखील त्यांच्यात व आपल्यात गैरसमज निर्माण होतात. भाषेशिवाय संस्कृति माहीत होत नाही व संस्कृति माहीत असल्याशिवाय भाषा येत नाही. म्हणूनच त्यांच्यात राहूनच त्यांची भाषा शिकणें हा उत्तम उपाय आहे.

आदिवासी भागात जाऊन राहणारे बाहेरचे लोक म्हणजे आदिवासी-कल्याण-विभागाचे वेगवेगळे कर्मचारी, ग्रामसेवक व सेविका, गावात प्राथमिक आरोग्यकेंद्र किंवा दवाखाना असल्यास डॉक्टर, कंपाउंडर व नर्स, शाळा असल्यास शाळेतले शिक्षक, पोस्ट-ऑफिस असल्यास पोस्टमास्तर, आणि वनविभागातले काही कर्मचारी. यांशिवाय पोलीस, पटवारी, तहसीलदार व त्याच्या हाताखालील माणसें, वनविभागातले वनसंरक्षक, मलेरिया-निर्मूलन योजनेतले लोक, कुटुंबनियोजनाचें काम करणारे कर्मचारी वगैरे त्या भागात सारखे जाऊन-येऊन असतात. त्यांचा गावकऱ्यांशी सारखा संबंध येत असतो. म्हणून ह्या लोकांना त्या भागातली भाषा येणें अत्यंत जरूर आहे. कारण कुठलीही नवीन कल्पना आदिवासींच्या मनावर बिंबवणें व त्यांच्या अडीअडचणी समजावून घेणें हें त्यांची भाषा येत असल्यासच शक्य होईल. ह्याशिवाय परक्यांनी परक्या भाषेतून सांगितलेली गोष्ट ऐकायला आदिवासी तयार नसतात. ते बाहेरच्या लोकांना भितात व त्यांच्याकडे संशयी वृत्तीने बघत असतात. त्यामुळे त्यांची भाषा आल्याने व त्यांच्याशी सारखा संपर्क साधल्याने त्यांचा आपल्यावर विश्वास बसतो, ते आपल्याला त्यांच्यापैकीच एक समजतात व मग आपण सांगितलेले निदान ऐकून तरी घेतात.

वरील लोकांपैकी विशेषतः डॉक्टर, नर्स, आणि कुटुंबनियोजनाचे प्रचारक, ग्रामसेवक, आणि शाळेतले शिक्षक या लोकांना आपलें कार्य नीट करायचें असेल तर त्यांची भाषा येणें अपरिहार्य आहे. कारण ह्याच लोकांचें काम आदिवासींच्या मूळच्या कल्पना बदलून त्यांना नवीन कल्पनांचा परिचय करून देण्याचें असतें. याच लोकांना त्यांच्यात परिवर्तन घडवून आणून त्यांना आरोग्यपूर्ण आणि समृद्ध जीवन जगण्यास मदत करायची असते. रोगांविषयी व मुलें होण्याविषयींच्या आदिवासींच्या कल्पना ह्या त्यांच्या धर्माशी पक्क्या निगडित असतात. त्यामुळे त्यांच्या ह्या कल्पना बदलणें हें अत्यंत कठीण काम असतें.

वरील सर्व लोक जर त्यांची भाषा शिकले तर त्यांच्या कार्यात निदान पन्नास टक्के तरी यश येईल. फक्त पन्नास टक्के अशासाठी की नुसती भाषा आली तरी आदिवासींच्याविषयी जर मनात आपुलकीची भावना नसेल व त्यांना मदत करण्याची कळकळ नसेल तर हें काम पूर्ण यशस्वी होत नाही. भाषा येऊन त्यांच्यात गोडीगुलाबीने मिळूनमिसळून राहता आलें पाहिजे. त्यांच्या भाषेबद्दलच नव्हे तर त्यांच्याबद्दलही आपुलकी हवी. जर ह्या गोष्टी आपल्याला साधल्या तर त्या लोकांनाही आपल्याबद्दल आपुलकी वाटल्याशिवाय रहात नाही. ते अगदी तावडतोब जरी नाहीं तरी हळूहळू आपलें म्हणणें विचारात घेतात असा अनुभव आहे. पण बरोबर ह्याच गोष्टींचा अभाव तिकडे जाणाऱ्या बऱ्याचशा कर्मचाऱ्यांत दिसून येतो. आदिवासी भागात पाठवलें, जंगलात पाठवलें म्हणजे जणू काही काळ्या पाण्यावर पाठवलें अशी त्यांची धारणा असते. ते आदिवासींचा अत्यंत तिरस्कार करतात. त्यांना हिडीस-फिडीस करतात. गावात आल्यावर त्यांच्याकडून निरनिराळ्या वस्तु धाकदपटशा दाखवून उपटतात. त्यामुळे आदिवासी लोकांना त्यांची एक प्रकारची भीती वाटत असते.

कर्मचारी बोलूनचालून भाडोतरी, त्यांच्याकडून समजूतदारपणाची अपेक्षा कशाला करायची असा साळसूद विचार जरी करायचा म्हटलें तरी स्वतः होऊन ज्यांनी आदिवासींच्या सेवेला वाहून घेतलें आहे अशा कार्यकर्त्यांचें काय ? ते आदिवासींना लुबाडत नसतील, पण त्यांच्याही मनात आदिवासींबद्दल उच्चतागंड असतोच. सहानुभूति असते, पण सह-अनुभूति नसते. डोळसपणा नसतो. आदिवासींनाही काही स्वतःचा दृष्टिकोन असेल, स्वतःची संस्कृति असेल, आणि हा दृष्टिकोन आणि ही संस्कृति ह्यांच्यापासून आपल्याला काही शिकता येईल हें मानण्याची तयारी नसते. थोडक्यात म्हणजे असे कार्यकर्ते म्हणजे मिशनऱ्यांचीच एक स्वदेशी आवृत्ति असते. मात्र मिशनरी किंवा जुन्या काळातले गोरे अधिकारी निदान भाषा शिकण्याची तरी तयारी दाखवीत. उलटपक्षी, आदिवासींच्या भाषिक प्रश्नाची जाणीव किंवा त्या भाषा शिकून घेण्याची तयारी ह्या बाबतीत हे सामाजिक कार्यकर्ते शासनाच्या

कर्मचाऱ्यांपेक्षा फारसे वेगळे नसतात. भांडणाप्रमाणे मैत्रीचीही टाळी एका हाताने वाजत नाही हें त्यांना लवकर उमगेल तर बरें होईल.

ही परिस्थिति दूर व्हायची तर राज्यपातळीवर शासनाच्या धोरणात महत्त्वाचे बदल व्हायला पाहिजेत. आदिवासींच्या भाषा आणि प्रादेशिक भाषा ह्यांचे संबंध काय असावेत ह्याचा नीट पुनर्विचार व्हायला हवा. आपण एकतर्फी व्यवहार करणारे अज्ञान-पालक आहोत ही भूमिका राज्यशासनाने आणि समाजसेवकांनी सोडायला हवी. आदिवासींची भाषा शिकायची तयारी दाखवणें म्हणजे त्यांना आपण खरेखुरे बरोबरीचे समजतो असा विसार, असा दिलासा देणेंच आहे.

आदिवासींचे भाषिक प्रश्न सोडवताना विद्यापीठांचे भाषाविज्ञानविभाग, तत्सम संशोधनसंस्था, आणि मैसूरचे भारतीय–भाषा–संस्थान ह्यांना बरेंच कार्य करता येण्यासारखें आहे. राज्यशासनांना त्यांची मदत घेता येण्यासारखी आहे. भाषावैज्ञानिकाचें कार्य मुख्यतः पडद्याआड राहून सल्लामसलत देण्याचें, तटस्थ निरीक्षणाचें, पूर्वतयारी करण्याचें आहे. तो वैज्ञानिक पद्धतीने भाषांचें सर्वेक्षण करील, आदिवासी भाषांचे उच्चार, व्याकरण, आणि शब्दसंपत्ति ह्यांचें वर्णन लिहून प्रसिद्ध करील, त्या वर्णनाच्या आधारे बिगरआदिवासींना आदिवासी भाषा शिकवण्यासाठी आणि आदिवासींना स्वभाषेत साक्षर करण्यासाठी भाषाशिक्षकाच्या मदतीने पाठ्यपुस्तकें तयार करील, आदिवासी मुलांना प्रादेशिक भाषा शिकता यावी आणि पहिल्या संधिकाळात स्वभाषेतून निरनिराळ्या शालेय विषयांचें ज्ञान करून घेता यावें म्हणून द्वैभाषिक पाठ्यपुस्तकें तयार करायला मदत करील, आणि मुख्य म्हणजे शिक्षक, शासक, समाजसेवक, आणि सामान्य नागरिक ह्यांची ह्या प्रश्नासंबंधीची दृष्टि इष्ट दिशेने बदलण्याचा आणि (तशी दृष्टिच नसेल तिथे ती) जागृत करण्याचा प्रयत्न करील.

(असा हा प्रयत्न करताना माझ्या विद्यार्थिनी कु. चित्रा कौशिककर म्हणजे आता डॉ. सौ. चित्रा परांजपे ह्यांचा प्रत्यक्ष क्षेत्रीय अध्ययनातून आलेला अनुभव मला उपयोगी पडला हें साभार नमूद करायला हवें.)

ताजा कलम : पुणें येथील महाराष्ट्र सरकारच्या राज्य–शिक्षणशास्त्र–संस्थेने मूळ लेख प्रसिद्ध झाल्यानंतर तीन वर्षांनी म्हणजे १९७५ साली महाराष्ट्रातील आदिवासींच्या बोलींचा शैक्षणिक संदर्भात विचार करून उपयुक्त सामग्री तयारी करण्यासाठी एक छोटासा प्रकल्प पुण्यातील भाषातज्ज्ञांच्या सल्ल्यानिशी आणि सुरवातीला मैसूरच्या भारतीय–भाषा–संस्थान या केंद्र सरकारच्या संस्थेच्या मदतीनिशी हाती घेतला. सुरवातीला तीन बोलींच्या अभ्यास हाती घेतला, नंतर इतरही बोलींचा विचार व्हायचा आहे. ही सामग्री दोन प्रकारची आहे. या बोली आपल्याला याव्या असें वाटणाऱ्या मराठी–भाषी प्रौढांसाठी भाषापरिचय-पुस्तिका, कोश, जीवनपरिचय करून देणाऱ्या वाचनपुस्तिका अशा प्रकारची सामग्री आहे. उलटपक्षी ज्या बोली

भारतीय–आर्य–कुलातल्या नसल्यामुळे मराठीपेक्षा पार वेगळ्या आहेत अशा बोली बोलणाऱ्या प्राथमिक शाळेतील मुलांसाठी पूरक वाचनपुस्तिका आणि त्यांच्या शिक्षकांसाठी मार्गदर्शकपुस्तिका अशा प्रकारची सामग्री बनवायची आहे. १९८० मध्ये ह्या सामग्रीचा पहिला हप्ता बाहेर पडला.

प्रस्तुत प्रकल्पामधले कोलामी आणि माडियागोंडी भाषांमधले प्रायोगिक बाल-वाचनपाठ त्या मुलांच्या समोर ठेवले तेव्हा त्यांच्या तोंडावर झळकलेला आनंद पूर्वी कधीच दिसला नव्हता असें त्यांच्या शिक्षकांनी कबूल केलें, आणि प्रस्तुत लेखातील वैज्ञानिक अनुमानांना वस्तुस्थितीचा आधार आहे असें मानायला जागा मिळाली.

ताजा ताजा कलम : अलीकडे या योजनेचे पंख कापण्यात आले आहेत. महाराष्ट्र सरकारचें धोरण फारसें अनुकूल राहिलेलें नाही. जो प्रश्न आम्ही तीस वर्षांत सोडवू शकलो नाही तो हीं ‘ शास्त्रज्ञ ’ मंडळी काय सोडवणार अशी यामागची वृत्ति दिसून येते. प्रशासक आणि सामाजिक – राजकीय कार्यकर्ते यांची भूमिका सामान्यतः प्रकट होत आली आहे ती अशी मांडता येईल : आम्ही सर्वज्ञ आहोत, तुमचें भाषाशास्त्र आणि शिक्षणशास्त्र ठेवा तुमच्याजवळ आपली एक हॉबी म्हणून. म्हणजे असें झालें की आम्ही नुसते विज्ञानाला ‘ शास्त्र ’ म्हणून थांबत नाही तर पुराणातली वांगीं पुराणात ठेवायचीं असतात, ‘ व्यवहारा ’मध्ये आणायचीं नसतात हा न्याय पारंपरिक शास्त्र आणि आधुनिक विज्ञान या दोन्हींना सारख्याच तत्परतेने लावून राहिलो आहोत !

संस्कृत भाषेचा अभ्यास, अध्ययन, आणि व्यासंग

संस्कृत भाषा जीवंत आहे का मृत आहे असा एक भाकड वाद कधीकधी खेळला जातो. या वादाला भाकड अशासाठी म्हणायचें की कोणत्याही भाषेला जीवंत केव्हा म्हणायचें आणि मृत केव्हा म्हणायचें हें एकदा स्पष्ट झालें की हा वाद सहज संपुष्टात येण्यासारखा आहे. जीवंत आणि मृत हीं विशेषणें भाषेला लावण्यात जी लक्षणा आहे ती आपण बाजूला ठेवू आणि भाषेचें अस्ति–त्व कशावर अवलंबून आहे तें पाहू. एखादी भाषा आज अस्तित्वात आहे की नाही हें ठरवायला आपल्याला काही प्रश्न विचारणें जरूर आहे :

प्रश्न १ : त्या भाषेत भाषण - श्रवण - व्यवहार आज होतो का ?

प्रश्न १. १ : तसा तो होत असल्यास तो नित्याचा व्यवहार असतो का ?

प्रश्न २ : ती भाषा एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे संक्रांत होते आहे का ?

प्रश्न २. १ : तशी ती होत असल्यास पुढच्या पिढीतल्या लहान मुलांची प्रारंभिक बोली म्हणून ती संक्रांत होते का ? त्यांची ती मातृभाषा ठरते का ?

उदाहरणार्थ, आज लॅटिन आणि ग्रीक भाषांच्या बाबतीत प्रश्न १ व २ यांचीं उत्तरें होकारार्थी आहेत, उलट प्रश्न १.१ व २.१ यांचीं उत्तरें नकारार्थी आहेत. हीब्रू भाषेच्या बाबतीत काही दशकांपूर्वी अशीच स्थिति होती, इस्रायलमध्ये मातृभाषा म्हणून हीब्रू बोलणाऱ्या मुलांची पिढी उदयाला आल्यानंतर मात्र चारही प्रश्नांचीं उत्तरें होकारार्थी मिळतात. कुराणकालीन अरबी भाषेच्या बाबतीत प्रश्न १, १.१, व २ यांची उत्तरें होकारार्थी आहेत तर प्रश्न २.१ चें उत्तर नकारार्थी आहे. अशीच काहीशी स्थिति ११ व्या शतकातल्या तेलुगूची आज आहे. (तिला आज ग्रांथिक तेलुगु म्हणतात.) आता हें उघड आहे की ह्या चार प्रश्नांपैकी कोणते प्रश्न आपण भाषेच्या जीवंतपणाच्या कसोट्या ठरवताना हिशेबात घेऊ यावर लॅटिन इत्यादि भाषांपैकी कोणत्या जिवंत आहेत, कोणत्या मृत आहेत हें आपोआप ठरेल. एखाद्या भाषेला जीवंत ठरवायचें का मृत ठरवायचें हें अगोदर ठरवून मग त्याप्रमाणे कसोट्या ठरवायच्या हा केवळ वकिली डावपेच होईल.

आता आपण संस्कृत भाषेच्या बाबतीत हे प्रश्न विचारून बघू—

प्रश्न १ : होय, संस्कृत भाषा बोलली जाते. उदाहरणार्थ, हिंदूचे धर्मविधि, शास्त्री-

पंडितांच्या वादसभा, भारताच्या आकाशवाणीवरच्या बातम्या, ज्यांना दुसरी समान भाषा नाही अशा दोन शास्त्रीपंडितांमधलें संभाषण. (तसें पाहिलें तर ह्यांच्यापैकी पहिलीं तीन उदाहरणें विधि या सदरातच मोडणारीं आहेत. जी कृति करण्यामुळे खरोखरी काही हाती येईल किंवा ती न करण्यामुळे काही नडेल अशी अपेक्षाच नसते, पण जी करण्याला केवळ प्रतीकात्मक महत्त्व असतें तिला विधि म्हणणें सयुक्तिक दिसतें, मग ती कृति धर्मविधि असो वा नसो. ज्यांना अशी प्रतीकात्मकता एखादया कृतीमध्ये भावत नाही त्यांना ती कृति कार्यशक्तीचा निरर्थक व्यय वाटणें साहजिक आहे. फार तर ते लोक इतरांच्या भावना दुखवू नयेत म्हणून असें स्पष्ट म्हणणार नाहीत, इतरांना खूष करण्यासाठी त्यांच्यापैकी कुणी अशी कृति स्वतःदेखील करील.)

प्रश्न १.१ : नाही, संस्कृत भाषा नित्याच्या व्यवहारात बोलली जात नाही. (दक्षिण भारतामधल्या कुंभकोणमूनजीकच्या एका ब्राह्मणवस्तीच्या खेड्यात वा अग्रहारात असा काही प्रकार विसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत होता असें माझ्या ऐकिवात आहे. यासंबंधी अधिक शोध घेणें ऐतिहासिक कुतूहल शमवणें म्हणून उपयुक्त ठरेल.)

प्रश्न २ : होय, अजून तरी संस्कृत भाषा पुढच्या पिढीपर्यंत पोचवली जात आहे. मात्र याचें मान झपाट्याने कमी होत आहे. (काही वर्षांनी भारतीयांना संस्कृत शिकण्यासाठी पाश्चात्त्य विद्यापीठांत पाठवायला लागेल असे विषादपूर्ण उद्‌गार मला ऐकायला मिळाले आहेत.)

प्रश्न २.१ : नाही, आज तरी संस्कृत ही कुणाचीच मातृभाषा नाही. (पूर्वी तरी कधी ती तशी होती की नाही ह्याबद्दल विद्वानांत मतभेद झालेले आहेत.)

संस्कृत भाषेचें महत्त्व प्रस्थापित करायला ती जीवंत आहे असें ठरण्याची खरें म्हणजे काही जरुरी नाही. तिचें महत्त्व आहे तें ही भाषा काही मोठ्या मानवसमाजांची अभिजात-भाषा आहे म्हणून. (लॅटिन, ग्रीक, कुराणी अरबी, अभिजात फार्सी, प्राचीन चिनी ह्या भाषांचीही तीच स्थिति आहे.) एखादी भाषा अमूक समाजाची अभिजात - भाषा म्हणून ठरते ती केव्हा ? जेव्हा ती कुणाचीच मातृभाषा नसेल किंवा राहिलेली नसेल, पण तिच्यात समृद्ध लिखित वाङ्मय म्हणजे ज्याचें पारायण व्हावें असा स्मरणीय मजकूर उपलब्ध आहे आणि म्हणून ती त्या समाजाच्या नेते - वर्गात किंवा अभिजनात मोठ्या प्रमाणात अभ्यासिली जाते ती त्या समाजाची अभिजात - भाषा ठरते. तेव्हा संस्कृत भाषेचें भारतीय जीवनात उपयुक्ततेच्या वळणाने, सामाजिकतेच्या वळणाने, आणि सांस्कृतिकतेच्या वळणाने काय कार्य आहे हें पहायचें असेल तर भाषणश्रवण-व्यवहारापेक्षा लेखनवाचन-व्यवहाराकडे मुख्यतः नजर टाकायला पाहिजे—

(१) उपयुक्ततेचें वळण : प्राचीन आणि काही अंशी मध्ययुगीन भारताच्या जीवनाचें विशेषतः अभिजनांच्या जीवनाचें एक फलित म्हणून संस्कृत वाङ्मय आपल्याला, किंबहुना सर्वच मानवजातीला, उपलब्ध आहे. (या वाङ्मयाचा एक स्थूल नकाशा मी इतरत्र दिलेला आहे, पहा : ' प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा : एक आकलन ', १९७९, छेदक : ' पूर्वतयारी (क) प्राचीन भारतीयांचें वाङ्मय-विश्व '.) ह्या वाङ्मयाचें खोलात जाऊन अध्ययन करायचें तर अर्थ न समजता केलेलें पाठांतर किंवा अर्वाचीन भाषांमधून केलेला अनुवाद यावर समाधान होण्यासारखें नसतें म्हणून संस्कृत भाषा शिकावी लागते. या वाङ्मयाचीं काही दालनें तर अशीं आहेत की त्यांचा प्रत्यक्ष आचारात किंवा कामात उपयोग आहे. उदाहरणार्थ, आयुर्वेद, अभिजात नृत्य, हिंदूंचीं धर्मकृत्यें यासंबंधीचे शास्त्रग्रंथ. अजून तरी हिंदु कायदा या क्षेत्राचाही या सदरात समावेश करावा लागेल. अर्वाचीन भारतीय भाषांमध्ये त्यांच्या स्वतःच्या प्रक्रियांखेरीज अजूनही संस्कृतच्या शब्दभांडाराच्या आणि व्याकरणाच्या वळणाने नव्या शब्दांची निर्मिति आणि स्वीकार होत आहे – याला अंशतः अपवाद उर्दू, काश्मीरी, सिंधी, पंजाबी, आणि तमिळ यांचा. तेलुगु, बांगला, मलयालम ह्या तर विशेष संस्कृतप्रचुर भाषा आहेत. शास्त्रीपंडितांच्या बोलण्यातली संपर्कभाषा म्हणून संस्कृतचा उल्लेख अगोदरच केला आहे – शिवाय संस्कृतमध्ये तुरळक नियतकालिकें निघतात, पाठशाळांमध्ये मौखिक – ग्रांथिक शिक्षणाचें आणि तोंडी – लेखी परीक्षांचें माध्यम म्हणूनही संस्कृतचा उपयोग होतो इत्यादि गोष्टींचाही उल्लेख करता येईल.

(२) सामाजिकतेचें वळण : संस्कृत जाणणाऱ्या लोकांची ती अखिलभारतीय पातळीवरची संपर्कभाषा ठरू शकते. पण इतर लोकांच्या दृष्टीनेही तिचें प्रतीकात्मक महत्त्व आहे – संस्कृतभाषा ही ब्राह्मणत्वाचें प्रतीक; हिंदुत्वाचें प्रतीक; आणि अलीकडे भारतीय अस्मितेचें प्रतीक ठरली आहे. संस्कृत भाषेचें अध्ययन करणारांमध्ये ब्राह्मणांबरोबर इतर हिंदु आणि हिंदूंबरोबर इतर भारतीय यांचाही समावेश होत आला आहे. आज त्याचें मान तुलनेने वाढतें असावें. भारतीय जनगणनेत संस्कृत भाषा ही आपली मातृभाषा म्हणून काहींनी नोंदवली आहे तें वस्तुस्थितीचें प्रतिबिंब नसून तो या अस्मितांचा एक चमत्कारिक आविष्कार आहे एवढेंच म्हणावें लागेल.

(३) सांस्कृतिकतेचें वळण : संस्कृति ही संस्कृताश्रित आहे ह्या आधुनिक सुभाषिताला परमार्थाने ग्राह्य समजणें भोळेपणाचें किंवा भोंदूपणाचें ठरेल. परंतु त्याचबरोबर हेंही खरें की संस्कृत भाषेतील ललितवाङ्मयाचा रसास्वाद आजही काही मंडळी मनापासून घेतात किंवा संस्कृतमधील वैचारिक वाङ्मय आजही काही मंडळींना चिंतनमग्न बनवतें. संस्कृत ललित व ललितेतर वाङ्मयाची अर्वाचीन भारतीय भाषांमधल्या वाङ्मयावर पडलेली छाया मात्र बरीच कमी होत चाललेली आहे.

संस्कृत भाषेचें भारतीय जीवनामधलें स्थान याप्रमाणे निरखल्यानंतर आधुनिक भारतीय जीवनात संस्कृत भाषेचा आणि संस्कृत भाषेतील वाङ्मयाचा अभ्यास, अध्ययन, व्यासंग यांचें स्थान काय राहण्यासारखें आहे याचा विचार आता करू.

संस्कृतचा अभ्यास

ह्या ठिकाणी एका सार्वत्रिक गैरसमजाचें निराकरण केलें पाहिजे. संस्कृत शिकल्याने मराठी सुधारतें किंवा संस्कृत न शिकल्याने मराठी बिघडतें (निदान सुधारावें तितकें सुधारत नाही) असा हा समज आहे. ह्या समजाला प्रत्यक्ष अवलोकनाचा, भाषाविज्ञानाचा, आणि भाषेच्या मनोविज्ञानाचा आधार नाही. काही तथ्य असलें तर तें एवढेंच आहे की विद्यापीठीय पातळीवर प्रगल्भ मराठीचा ज्ञानाच्या देवाणघेवाणीचें माध्यम म्हणून आपण स्वीकार केला तर शब्दांची नवनिर्मिति आणि अजून कोशगत न झालेल्या नवनिर्मित शब्दांचें आकलन हीं भाषानैपुण्यें अपेक्षित असतात आणि त्यासाठी संस्कृत शब्दनिर्मितीचा दुरून परिचय उपकारक होतो. (फार जवळून परिचय असेल तर ' अंताराष्ट्रिय ' म्हणायला पाहिजे असा आग्रह धरण्याचा किंवा ' अनुग्रहोत्तीर्ण ' हा **शासन व्यवहार कोशा**तील शब्द किती बरें सोपा सुटसुटीत आहे असें म्हणण्याचा मोह होतो.) ह्या तथ्याची शैक्षणिक दखल घ्यायची तर असें म्हणता येईल की उच्चमाध्यमिक पातळीवर (इयत्ता ८ ते १० मध्ये) मराठी स्वभाषा म्हणून शिकताना मराठीभाषेमधल्या ' तत्सम ' शब्दांच्या घटनेचा परिचय व्हायला पाहिजे. (मागच्या पिढीतील लोकांना इंग्लिश भाषा शिकताना पूर्वी juncio ' I join ', chronos ' time ', – phobia ' fear or hatred ' असें काही शिकावें लागे त्याची या संदर्भात आठवण व्हावी.) मराठीच्या शालेय कोशातून **–तव्य, सृज् / सर्ज्–, –वाचक** अशा शब्दघटकांची जंत्री देणें उपयोगी ठरेल. पण ह्या सर्व शैक्षणिक क्रियेला संस्कृत भाषेचा अभ्यास (अभ्यास म्हणजे सवय) म्हणावें; संस्कृत भाषेच्या अध्ययनाची त्यासाठी जरुरी नाही. असा अभ्यास सुलभतेने घडविण्यासाठी शैक्षणिक कल्पकतेची जोड द्यावी लागेल.

संस्कृत वाङ्मयाचा ' अभ्यास ' यालाही शिक्षणक्रमात स्थान देता येईल. त्यासाठी सुद्धा संस्कृत भाषेच्या अध्ययनाची गरज नाही. इंग्लिश साहित्याच्या अभ्यासक्रमात ज्याप्रमाणे अभिजात ग्रीक नाटकांचा किंवा ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्रावरील ग्रंथाचा अनुवादित स्वरूपात समावेश करतात तसेंच इथेही काही करता येईल. त्याचप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञान किंवा समाजविज्ञान शिकताना शांकरभाष्य किंवा मनुस्मृति या ग्रंथामधले अनुवादित उतारे अभ्यासाला नेमणें उपयुक्त होईल.

संस्कृतचें अध्ययन

एक ऐच्छिक विषय म्हणून संस्कृत भाषेचें आणि वाङ्मयाचें विधिवत् अध्ययन उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन, आणि पदव्युत्तर पातळीवर करवून घ्यावें. त्याला उत्तेजन देण्याबरोबर तें अधिक परिणामकारक आणि रोचक कसें होईल यासाठी शैक्षणिक कल्पकता कामाला लावणें जरूर आहे. आज वापरात असलेलीं पाठ्यपुस्तकें आणि प्रत्यक्ष प्रचारात असलेली अध्यापनपद्धति यांचा परिणाम अनेकदा विद्यार्थ्यांवर असा होतो की संस्कृतच्या वाटेला पुन्हा कधी जायचें नाही असें त्याच्या मनावर पक्कें ठसावें !

महाविद्यालयीन किंवा पदव्युत्तर पातळीवर आयुर्वेद, भारतीय अभिजात नृत्य, भारतीय तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांच्या अध्ययनाला पूरक म्हणून संस्कृतचे पदविका पाठ्यक्रम आखता येतील. रसायनाच्या अध्ययनाला जरूर तेवढ्या फ्रेंचचा परिचय रसायन–विषयावरील फ्रेंच भाषेतील उताऱ्यांच्या मदतीने करून देणारीं पुस्तकें आज उपलब्ध आहेत. त्याच धरतीवर ‘ आयुर्वेदासाठी संस्कृत ’ असें पुस्तक (उदाहरणार्थ) का निघू नये ?

संस्कृतचा व्यासंग

संस्कृत भाषेचा व्यासंग आणि संस्कृत वाङ्मयाचा व्यासंग आज त्रिभंगलेल्या आणि अतिशय असमाधानकारक अवस्थेत आहे.

एक म्हणजे पाठशाळाप्रणालींमधून अध्ययन झालेल्यांचा व्यासंग. यांना इंग्लिश भाषा आणि समांतर ज्ञानक्षेत्रामधली पाश्चात्त्य विद्या यांचा गंध नसतो किंवा फक्त गंधच असतो. हा व्यासंग आणि त्याचा आधुनिक जीवनाचा संदर्भ यांची सांगड ही मंडळी सामान्यतः घालू शकत नाहीत.

दुसरा म्हणजे ‘ ऐच्छिक संस्कृत ’ विषयाचें शालेय व विद्यापीठीय अध्ययन झालेल्यांचा व्यासंग. इंग्लिश भाषा आणि आधुनिक जीवनाची जाणीव याबाबतीत ह्या मंडळींची स्थिति शास्त्रीपंडितांपेक्षा काहीशी बरी असते. पण समांतर ज्ञानक्षेत्रामधल्या पाश्चात्त्य विद्येचा त्यांना गंध नसतो किंवा फक्त गंधच असतो. यामुळे एक यांत्रिक पढीकपणा यांच्या व्यासंगात येतो. याचे दोन वाईट परिणाम दिसतात : त्यांना आपल्या विषयाचा परिचय चांगल्या मराठीत आणि प्रगल्भ पातळीवर इतरांना करून देता येत नाही, आणि मूळ संस्कृतमधले ग्रंथकार त्या त्या विषयामधल्या ज्या आह्वानांना सामोरे जात असतात त्यांचें यांना काही सोयरसुतक नसतें. त्यांची बांधिलकी असलीच तर भाषेशी असते.

तिसरा म्हणजे त्या त्या विषयाचें आधुनिक पाश्चात्त्य अंगाने ज्यांचें अध्ययन झालेलें आहे अशांचा व्यासंग. ह्यांना संस्कृत भाषा आणि त्यांच्या विषयातली संस्कृत

भाषेतली विद्या यांचा गंध नसतो किंवा फक्त गंधच असतो. ते पढीकपणामधून कधी कधी वैयक्तिक गुणामुळे वाचतात. पण तरी देखील त्यांच्या पाश्चात्त्य अंगाने मिळालेल्या ज्ञानामध्ये देखील प्राचीन भारतीय संदर्भाच्या अभावी एक उपरेपणा येण्याचा धोका असतो.

एकूण चणे आणि दात यांची गाठ पडत नाही, पण ती पाडणें कसें शक्य आहे याची कल्पना अभ्यास आणि अध्ययन ह्या सदरांखाली केलेल्या विवेचनावरून यावी. संस्कृतच्या नावे भाबडा जप करून किंवा तिचा केवळ प्रतीकात्म उपयोग करून मात्र ही गाठ पडणार नाही हें नक्की.

मराठी व्याकरणाची नवी दिशा

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आणि विसाव्या शतकाच्या आरंभी असा जो पंचवीस-तीस वर्षांचा काळ आहे तो महाराष्ट्राच्या इतिहासातला एक महत्त्वाचा आणि अभिमानास्पद असा काळ आहे. मराठी समाजाचा थंड गोळा तापून जिवंत झाल्यावर त्याने काय काय केलें तें पाहण्यासारखें आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या अंगांची वाढ ह्या काळात झालेली आहे. पैसा-फंड कारखान्यापासून भारत-इतिहास-संशोधक-मंडळापर्यंत, मुंबईच्या कामगारांच्या पहिल्या संपापासून केशवसुतांच्या नवकवितेपर्यंत ह्या पिढीच्या कर्तबगारीचा आढावा घ्यायचा तर तो एक स्वतंत्र विषय होईल. इतिहासाचार्य राजवाड्यांचें ह्या पिढीतलें स्थान महत्त्वाचें आहे. इतिहाससंशोधन ह्या त्यांच्या मुख्य कार्यक्षेत्राखेरीज अनेक वैचारिक क्षेत्रात त्यांच्या प्रतिभेने संचार केलेला आहे. भाषेच्या अभ्यासालाही—विशेषतः प्राचीन आणि आधुनिक मराठीच्या अभ्यासालाही—राजवाड्यांच्या लेखणीचा लाभ झालेला आहे. (आधुनिक मराठीच्या अभ्यासाला मी जेव्हा थोडीबहुत सुरवात केली तेव्हा पहिल्यांदा मी विकत घेतलेलीं पुस्तकें म्हणजे दामल्यांचें व्याकरण आणि त्यावरची राजवाड्यांची प्रदीर्घ टीका.)

तेव्हा आजच्या राजवाडे जन्म-दिन साजरा करण्याच्या प्रसंगी राजवाड्यांच्या भाषा-वैज्ञानिक कामगिरीचा आढावा घेणें आणि तिचें मूल्यमापन करणें खरें म्हणजे उचित झालें असतें. राजवाड्यांची प्रतिभा जशी स्तिमित करणारी आहे तसेच तिला जोडून येणारे काही दोषही स्तिमित करणारे आहेत. शेक्सपियरच्या एखाद्या दारुणिकेच्या नायकासारखें त्यांचें व्यक्तिमत्त्व आहे. तीच भव्यता, तोच एकाकीपणा, तेच गुणांमध्ये दोषांचें आपल्या मनाला खिन्न करून सोडणारें मिश्रण. ह्यात आणखी भर म्हणजे परखडपणा आणि स्पष्टवक्तेपणा. राजवाड्यांचे हे गुण खरे, पण ते त्यांच्या भक्तांना तितके आवडत असल्याचें दिसत नाही. तेव्हा राजवाड्यांच्या भाषावैज्ञानिक कार्याचा आढावा घेण्याचें हें जबाबदारीचें, स्वतंत्र अभ्यासाचें—आणि काहीसें ‘ थँकलेस जॉब ’ ह्या सदरात मोडणारें—काम माझ्यापेक्षा अधिकारी अशी कोणी अन्य व्यक्ति पुढेमागे अंगावर घेईल अशी आशा व्यक्त करून मी त्या विषयाची रजा घेतो.

माझ्या विवेचनाचे मी दोन भाग करणार आहे. पहिल्या भागात ‘ मराठी

व्याकरणाची नवी दिशा ' ह्या विषयाचें सर्वसाधारण विवेचन येईल. उत्तरार्धात मराठी भाषेतलीं उदाहरणें घेऊन पहिला तात्त्विक भाग अधिक स्पष्ट करता येतो का तें मी पाहणार आहे.

१

' व्याकरण ' शब्दाचे दोन अर्थ होतात. ' व्याकरण$_1$ ' म्हणजे एका विशिष्ट भाषेची व्यवस्था आणि ' व्याकरण$_2$ ' म्हणजे त्या व्यवस्थेच्या पद्धतशीर अभ्यासाचें फलित, व्यवस्थेचें वर्णन. ' हिंदीचें व्याकरण मराठीच्या व्याकरणापेक्षा सोपें असतें ' किंवा ' फ्रेंच आणि मराठी ह्या भाषांमध्ये व्याकरणाचें काही साम्य आहे ' अशा शब्द-प्रयोगांमध्ये ' व्याकरण ' शब्दाचा पहिला अर्थ आपल्याला अभिप्रेत आहे. ह्याउलट ' राजवाड्यांचें ज्ञानेश्वरी-मराठीचें व्याकरण ', ' हल्ली इंग्लिशच्या शालोपयोगी व्याकरणांना बरीच मागणी आहे ', ' शाळांमधून व्याकरणाची फार हेळसांड होत आहे ' ह्यासारख्या प्रयोगात ' व्याकरण ' शब्द दुसऱ्या अर्थाने वापरला आहे. कोणत्याही भाषेचें व्याकरण$_1$ ती भाषा बोलणारे घडवतात. व्याकरण$_2$ भाषेचे अभ्यासक लिहितात. ' मराठी व्याकरणावर इंग्लिश व्याकरणाचा परिणाम ' या शब्दप्रयोगात ' व्याकरण ' शब्द पहिल्या अर्थाने वापरला आहे (उदाहरणार्थ डॉक्टर जॉन्सनच्या वाक्यरचनेचा चिपळूणकरांच्या वाक्यरचनेवर झालेला परिणाम) का दुसऱ्या अर्थाने वापरला आहे (उदाहरणार्थ वेनच्या इंग्लिश व्याकरणाचा आगरकरांच्या वाक्य-मीमांसेवर पडलेला प्रभाव) तें मुद्दाम स्पष्ट करावें लागेल. वार्त्तिककारांच्या शब्दात व्याकरण$_1$ म्हणजे लक्ष्य आणि व्याकरण$_2$ म्हणजे लक्षण. ' मराठी व्याकरणाची नवी दिशा ' हा जो विषय मी निवडला त्यात ' व्याकरण ' शब्दाचा दुसरा अर्थच मला अभिप्रेत आहे. मराठी भाषेच्या व्यवस्थेत सध्या काय फरक पडत आहेत आणि उद्यापरवा काय पडण्याचा संभव आहे हा विषय जरी अभ्यसनीय असला तरी तो काही मला आज घ्यायचा नाही. मराठी भाषेच्या व्यवस्थेच्या अभ्यासात काय फरक होत आहेत, तिच्या वर्णनाची मांडणी नव्याने कशी होत आहे, होऊ शकेल ह्याबद्दल मला आज थोडेंसें सांगायचें आहे.

पारंपरिक व्याकरणें आणि नवीन व्याकरण ह्यांच्यात पहिलाच महत्त्वाचा फरक जाणवतो तो ' वर्णन ' ह्या शब्दानेच सुचवला जात आहे. भाषेला जी व्यवस्था आहे तिचें प्रतिबिंब वर्णनातही पडावें आणि तें वर्णनदेखील व्यवस्थेशीर असावें ही साह-जिकच अपेक्षा असणार. थोड्या निराळ्या बाजूने पहायचें तर व्याकरण$_2$ हें आता ' शास्त्र ' ह्या स्वरूपात आपल्या पुढे येत नसून भाषाविज्ञानाचा एक भाग म्हणून येत आहे. ' शास्त्र ' म्हणजे ' व्यवस्थित ' मांडलेली आदेशांची एक मालिका आणि अपेक्षा ही की भाषेच्या प्रत्यक्ष प्रयोगात ह्या आज्ञा पाळल्या जाव्यात. ' विज्ञान ' म्हणजे ' व्यवस्थित ' मांडलेलें वर्णन आणि अपेक्षा ही की भाषेच्या प्रत्यक्ष प्रयोगाला

तें शक्य तितकें लागू पडावें. आता वैयाकरणासमोर मुख्य प्रश्न—प्रयोगाला आट्या घालून, नाखुषीने शरण जायचें, का प्रयोगाला हारतुरे घेऊन सामोरे जाण्याच्या धांदलीत राहायचें—हा राहिलेला नाही. त्याची भूमिका तटावर उभें राहून नोंद घेण्याची आहे. भाषा म्हणून जेवढी आहे—मग ती पुण्याच्या शिष्ट स्वभावाच्या शिष्टांची असो किंवा वऱ्हाडमधल्या शेतकऱ्याची असो किंवा अंदमान बेटातल्या रानटी जमातीची अनामिक भाषा असो—तिला व्याकरण$_1$ हें असतेंच, तिची आपली पृथगात्म व्यवस्था ही असतेच, हें व्याकरणकाराचें गृहीतकृत्य आहे. व्याकरण$_2$ लिहायचें म्हणजे ही व्यवस्था, हें व्याकरण$_1$ हुडकून काढायचें आणि त्याची अधिकात अधिक बिनचूक, समव्याप्त, व्यवस्थित मांडणी करायची हा त्याचा ध्यास आहे. व्याकरण$_1$ ह्याची सरसकट हेळसांड करणें लहान मूल किंवा वेडा ह्यांच्याखेरीज कुणाला परवडण्यासारखें नाही. व्याकरण$_1$ची हेळसांड करून तुम्ही बोललात तर तुमचें म्हणणें इतरांना समजणार नाही किंवा चुकीचें समजेल. व्याकरण$_2$ ह्याची उठाठेव करणारे लोक मात्र समाजात मोजकेच असणार आणि ह्यात वावगें असें काही नाही.

हें तत्व झालें. प्रत्यक्षात तें कसें साकार होतें तें आता पहायचें. एक सहज ध्यानात येण्याजोगी गोष्ट म्हणजे "मी मराठीचें व्याकरण$_2$ लिहीत आहे" एवढेंच नुसतें म्हणून आता भागणार नाही. "मराठीचें" म्हणजे कोणत्या मराठीचें ? मराठीच्या कोणत्या कालविशिष्ट अवस्थेचें ? तेराव्या शतकातली मराठी का विसाव्या शतकातली ? एकाच व्याकरणात ज्ञानेश्वरीपासून केसरीपर्यंतचीं उदाहरणें देण्याचा सोस आता आवरला पाहिजे. बरें, समजा, विसाव्या शतकातल्या मराठीचें व्याकरण म्हटलें तरी तिचा कोणता उपभेद वर्णायचा आहे ? लिखित साहित्याला किंवा मारदस्त व्याख्यानाला योग्य असा महाराष्ट्रभर जो मानला जातो तो उपभेद ? किंवा महाराष्ट्राच्या कोणत्या तरी प्रदेशाचा म्हणून जो ओळखला जातो असा एखादा उपभेद ? किंवा ह्या दोहोंच्या मधला, शिक्षितांच्या अनौपचारिक, घरगुती बोलण्यातला, एखादीच स्थानिक लकब दिसणारा असा उपभेद ? आजच्या व्याकरणकाराला प्रारंभीच हें नमूद करावें लागेल, की त्याने अमूक कालखंडातला अमूक उपभेद निवडला आहे. त्यानंतर फार तर तो अशी एखादी समाजवैज्ञानिक तळटीप जोडील, की सदर उपभेदाला फारशी प्रतिष्ठा नाही किंवा ह्या उपभेदाची थोडीबहुत नक्कल करण्याचा इतर लोक प्रयत्न करतात किंवा ह्या उपभेदाची जरा टवाळीच होते असें माझ्या अवलोकनात आलें नाही. (आजच्या प्रसंगी मी जीं उदाहरणें देणार आहे तीं जास्त करून पुण्याच्या शिक्षित लोकांच्या अनौपचारिक बोलण्यातल्या मराठीचीं राहतील. हा उपभेद बोलण्याखेरीज कधी कधी खाजगी पत्रलेखनासाठीही वापरला जातो.)

ह्यावर कुणी म्हणतील की ह्या भाषावैज्ञानिक-प्राण्याला काही भ्रष्टाभ्रष्ट आहे की नाही ? ह्या प्रश्नाचें उत्तर आहे की —नाही, कारण त्याच्या लेखी सर्वच भाषा भ्रष्ट

आहेत. म्हणजेच (वैज्ञानिकाला शोभणारी परिभाषा वापरायची तर) जीवंत असताना सर्वच भाषा परिवर्तनशील असतात आणि परस्परसंस्कारक्षम असतात. उदाहरणार्थ, "मी येईपावेतों येथेंच ऐस" असे कोणी आता म्हणणार नाही; "मी येईपर्यंत इथंच अस" अशासारखें काही म्हटलें जाईल. तसेंच भाषेचा शिक्षितांकडून वापरला जाणारा उपभेद वापरणारा माणूस सुद्धा विशिष्ट संदर्भात "या बामणांच्या येडेपणाला सीमा नाही" असे बोलायला कचरणार नाही. पण हें काही ह्या प्रश्नाचें पुरें उत्तर नाही. ह्या उत्तराचा दुसरा भाग पुढे असा आहे, की ह्या भाषावैज्ञानिकाला भ्रष्टाभ्रष्ट नसलें तरी शुद्धाशुद्धविवेक जरूर आहे. शिष्टांकडून अगदी बहिष्कृत अशी मानलेली बोली जरी त्याने अभ्यासाला घेतली तरी तिच्यात पुन्हा त्याला शुद्ध-अशुद्ध निवडावेंच लागणार. किंवा दुसरें एक शिष्ट बोलीतलें उदाहरण घेऊ. शुद्धलेखनाबद्दल बोलणं चालू असताना एका गृहस्थांनी माझ्याजवळ युक्तिवाद केला तो असा: "शक्य तो उच्चारानुसारी लिहावें असें तुम्ही म्हणता ना, तर मग आपण बुवा नीति शब्दाचा उच्चार नीऽति असा करतो. तेव्हा आम्हाला तरी 'ती' ह्रस्व लिहायला मोकळीक आहे की नाही?" त्यावर मी त्यांना म्हटले, "नीऽति असा उच्चार तुम्ही करू शकता आणि कधी कधी (उदाहरणार्थ आताच्या प्रसंगी) करण्याचा धीरही करता ह्याबद्दल मला शंका नाही. पण तो उच्चार अशुद्ध आहे, जितके 'रेघा आखायचा रूल' किंवा 'गुन्ह्यात शामिल' किंवा 'ज्यातिमान् घोडा' हे प्रयोग तुमच्या भाषेत अशुद्ध आहेत. 'रूळ', 'सामील,' 'जातिवंत' हीच रूपें शुद्ध आहेत. ह्याला सबळ पुरावा म्हणजे तुम्हीच आता 'नीऽति शब्दाचा उच्चार' असें न म्हणता '<u>नीती</u> शब्दाचा उच्चार' असेंच म्हणालात." बोलणाऱ्याच्या तोंडून जें निघतें तें सगळेंच अभ्यसनीय असतें, पण तें सगळेंच व्याकरणीय नसतें; त्या सगळ्याची तरतूद आपल्या व्याकरणात करण्याची वैयाकरणावर जबाबदारी नसतें. एखाद्या खऱ्याखुऱ्या संभाषणाचें टेपरेकॉर्डिंग करून जर तें काळजीपूर्वक ऐकलें तर असें आढळून येईल, की बोलणारा पुष्कळदा अडखळतो, 'फाटका मुकटा'च्या ऐवजी 'फाटका मुटका' किंवा 'फाकटा मुकटा' म्हणून जातो, एखादें वाक्य अर्धवट सोडून देतो, तोतरा नसताना देखील 'तोतरतो', भाषेची बुद्ध्या जोडतोड करून 'काँग्रेसवासी', 'तोतरणें', 'त्याला विचाऱ्याला गेल्या उन्हाळ्यापासून भाषाशास्त्र झालें आहे!' असे शब्दांचे वाळूतले किल्ले उभारतो. व्याकरणाला असल्या गोष्टींची दखल घेता येत नाही. अर्थात् असल्या प्रकारांपैकी 'डुकली' ('डुलकी'च्या जोडीला) किंवा वि. आ. बुवांचा 'पोटिमा' किंवा टिळकांचा 'नोकरशाही' किंवा राजवाड्यांचा 'संस्कृति' ह्यासारखे प्रयोग भाषेत स्थिर होऊन तिच्या व्यवस्थेत दाखल होतात हा भाग निराळा. तसे ते दाखल झाल्यावर भाषेच्या वर्णनात त्यांचें निर्वचन करावें लागतें. व्याकरणात भाषेतल्या सर्व आणि केवळ व्याकरणशुद्ध प्रयोगांची सोय लावावी लागते. मग असा

एखादा शुद्ध प्रयोग वापरण्याची वेळ क्वचितच का येई ना ! उदाहरणार्थ, " रावणानं रामाला मारलं " किंवा " रामानं रावणाला मारलं " ही दोन्ही वाक्यें शुद्ध असून प्रत्यक्षात कानावर पडण्याचा संभव फारच कमी. (ह्यातलें दुसरें वाक्य व्याकरणचर्चे-खेरीज अन्यत्र मी तरी कधी ऐकलेलें नाही !) उलट त्यांच्यापेक्षा जास्त वेळा कानावर आदळणारा " आईनी माला माल्लं ! " हा प्रयोग अशुद्ध आहे. तो व्याकरणाच्या कानाने जेव्हा मी प्रथम ऐकला तेव्हा लगेच " र्च्या पुढे ल् आल्यास पहिल्याला विकल्पाने ल् असा आदेश होतो " असा नियम करायला काही मी सरसावलो नाही ! मी मनाशी एवढेंच म्हटलें, की एकवचनी " ने " ह्या शब्दयोगी अव्ययाला ' ने ' आणि ' न ' ह्याच्याबरोबर ' नी ' असा विकल्प होतो की काय ? यानंतर काही शुद्ध प्रयोग तपासल्यानंतर ह्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळालें. (लेखनात आपण ' नी ' केवळ अनेकवचनात लिहितो हा भाग अलाहिदा.)

दुसरी एक शंका निघण्याचा संभव आहे ती अशी : तुमच्या व्याकरणकाराने मराठीचा स्थलकालविशिष्ट असा एकच उपभेद जरी अभ्यासाला निवडला तरी त्याच्या अगोदरच्या, आणि जिथे शक्य असेल तिथे नंतरच्या, अवस्थांचें ज्ञान त्याला करून घ्यायला नको का ? ह्याला उत्तर असें आहे, की मराठीच्या व्याकरण$_1$ मधील स्थित्यंतरांचा ज्याला ऐतिहासिक भाषाविज्ञानपद्धतीने अभ्यास करायचा आहे त्याला एकामागून येणाऱ्या बदलत्या अवस्थांचीं आपापलीं व्याकरणें डोळ्यासमोर उभीं करायला हवींत. पण विश्लेषणात्मक भाषाविज्ञान पद्धतीने ह्या प्रत्येक अवस्थेचें किंवा प्रत्येक स्थानिक उपभेदाचें व्याकरण$_2$ लिहिणें हें त्या अगोदरचें आणि स्वतंत्र असें काम आहे. त्यासाठी त्या विशिष्ट उपभेदाचे पुरेसे नमुने उपलब्ध असले म्हणजे झालें. हे नमुने पुरवायला ती भाषा बोलणाऱ्या एक वा अधिक व्यक्ति मिळू शकल्या तर फारच उत्तम. कोणत्याही एका भाषाभेदाचा व्यवहार स्वयंपूर्ण रीतीने चाललेला असतो. तो व्यवहार करायला पूर्वीचे लोक किंवा शेजारच्या प्रदेशातले लोक कसे बोलत होते वा बोलत असतात ह्या माहितीची जरुरी बोलताना किंवा बोललेलें ऐकताना लागत नाही. तर मग त्या भाषेच्या व्यवहारातली अंतर्गत सुसंगती, व्यवस्था शोधून काढायला अशी आवश्यकता का भासावी ? (ह्या अवांतर माहितीची झाली तर मदत होईल, पण झाली तर अडगळ सुद्धा होते असा अनुभव आहे. आवश्यकता मात्र बिलकूल नाही.) संस्कृत भाषेच्या पूर्वीच्या अवस्थांची—आदि-भारतीय-इराणी किंवा आदि-भारतीय-यूरोपीय ह्यांची—माहिती पाणिनीला असती तर तिचा त्याला फार उपयोग झाला असता किंवा अशी माहिती नसल्यामुळे त्याचें कार्य कुठे अडून राहिलें असें आपल्याला दिसत नाही.

' वर्णन ' ह्या शब्दामध्ये काय-काय अभिप्रेत आहे हें आतापर्यंत आपण पाहिलें. आता विवेचनाच्या उरलेल्या भागात मराठी व्याकरण$_1$ मधील काही स्थळें

नमुन्यादाखल घेऊन त्यांची नवी मांडणी कशी करता येते हें आपण पाहू. परंतु तत्पूर्वी एखाद्या भाषेचें वर्णन म्हणजे तरी काय ह्याचा स्थूल आराखडा आपल्या डोळ्यासमोर हवा.

भाषणाचा एक लहानसा सलग संपूर्ण तुकडा आपण घेतला तर त्याचें विश्लेषण आपल्याला तीन पातळ्यांवर करता येईल.

१. स्वनव्यवस्था/स्वनव्यवस्थाविचार

२. व्याकरण$_1$/व्याकरण$_2$ (म्हणजे व्याकरण$_1$ चा विचार)

३. अर्थांगव्यवस्था/अर्थांगव्यवस्थाविचार

व्याकरण हा ध्वनि आणि अर्थ ह्यांमधला दुवा आहे. व्याकरणाच्या पातळीवरचा मोठ्यात मोठा घटक म्हणजे वाक्य. त्याचें विश्लेषण करीत करीत व्याकरणातल्या लहानात लहान घटकापर्यंत आपण पोचतो. स्थूल मानाने हे लहानात लहान घटक म्हणजे धातु , प्रत्यय आदि. ह्या सर्वच लहानात लहान घटकांना एखादी समावेशक संज्ञा असणें सोयीचें आहे. इंग्लिशमध्ये ही संज्ञा ' मॉर्फीम '– morpheme आहे. जीवविज्ञानात ज्याप्रमाणे ' सेल् ' –cell किंवा वर्णविन्यासात ज्याप्रमाणे ' फोनीम ' –phoneme त्याप्रमाणे व्याकरणात ' मॉर्फीम '—आपण ह्या व्याकरणातल्या अणूंना रूपिम म्हणू या. ' बहुवचन '; ' द्वितीय पुरुष '; जो, जेवढा, जिथे मधला ' संबंधी ज् '; ' बेडूक '; ' आत '; खालून, खाली, खालचा यांमधला ' खाल् '; मोकळा, मोकाट मधला ' मोक् '; घोडा, घोडी, घोडदळ मधला ' घोड् ' असे मराठीतले काही रूपिम आहेत. आता एक वाक्य घेतलें आणि त्याची समजा,

" घोड् + पुंलिंग + बहुवचन + मोक् + आट् + सुट् + ल् + पुंलिंग + बहुवचन + प्रश्नवाचक आरोह "

ह्याप्रमाणे आपण रूपिम वेगळे केले, आणि नंतर त्या रूपिमांचे परस्परसंबंध उलगडून दाखवले. खरें तर भाषेच्या वर्णनातल्या व्याकरणखात्याचें काम इथे संपलें. पण हें वाक्य बोलायचें कसें, ह्या रूपिमांची व्यक्त रूपें कशी सिद्ध होतात हें वर्णिल्याशिवाय काम भागत नाही. ह्यासाठी व्याकरण$_2$ आणि स्वनव्यवस्थाविचार ह्यांना जोडणारा रूपसिद्धिविचार हा पूल बांधण्यात आला आहे. रूपसिद्धि खात्यात ही रूपिमांची मालिका नेऊन दिली तर, त्याबदली स्वनव्यवस्थेला हाताळता येईल अशी फोनीम्सची किंवा वर्णांची एक साखळी आपल्याला मिळेल. अधिक तपशील स्वनव्यवस्थाविचारामधून समजावून घेतला म्हणजे आपण म्हणू शकतो की

" घोड् + बहुवचन........ " इत्यादि वाक्य म्हणजेच

" घोडे मोकाट सुटले ? "

किंवा

/ghoḍe + mokaṭ + suṭle ↑ ||/

आपल्याला सध्या फक्त व्याकरण, आणि त्याच्याशी अत्यंत निगडित असा भाग म्हणजे रूपसिद्धि ह्यांचा विचार करायचा आहे. (स्वनव्यवस्था आणि अर्थांगव्यवस्था ह्यांचा आज विचार करायचा नाही.) रूपसिद्धिविचारामध्ये जे सर्वसामान्य नियम द्यायचे त्यांच्यामधला बराच भाग संधिविचाराने व्यापलेला असतो. पण इतरही विषय त्यात येतात. खुद्द व्याकरणाचे दोन भाग पडतात :

२ क. वाक्यव्याकरण : वाक्याची पदांमध्ये फोड हा एक टप्पा.

२ ख. पदव्याकरण : पदाची रूपिमांमध्ये फोड हा एक दुसरा टप्पा.

रूपसिद्धि, पदव्यकरणा, आणि वाक्यव्याकरण ह्यांमधलें एक एक उदाहरण आपण घेऊ.

२

पहिलें उदाहरण रूपसिद्धीतलें आहे. **राहणें, पाहणें** इत्यादि क्रियापदांची रूपें लिहायची वेळ आल्यावर आपणांपैकी पुष्कळजण कधी ना कधी अडखळलेले असाल. तीं रूपें कशीं लिहायचीं ह्याचा विचार आपण सोडून देऊ. स्वनव्यवस्थाविचार आपण करून ठेवलेला आहे. त्याच्या आधारे कानावर भिस्त ठेवून प्रथम भिन्न रूपें मांडायचीं, जास्तीत जास्त सामान्य नियम शोधायचा, आणि शक्य तेवढ्या टापटिपीने तो मांडायचा ही आपली पद्धत राहील. हीं पथ्यें पाळून आपल्याला काय करता येतें तें पाहू. प्रथम **राहणें, पाहणें** हीं त्रासदायक क्रियापदें बाजूला ठेवून **पोहणें, लिहणें** ही तत्सदृश क्रियापदे पाहू. त्यांना निरनिराळे प्रत्यय लागून जीं रूपें होतात त्यातलीं प्रातिनिधिक अशीं काही रूपें तपासू. (भाषावैज्ञानिक अभ्यासाला रोमन लिपी सोयीची पडते आणि आपल्या शुद्धलेखनपद्धतीमधून उत्पन्न होणारे पूर्वग्रह बाजूला ठेवायलाही तिची मदत होते म्हणून तीच इथे वापरली आहे. वाचकांनी रोमनमधला मजकूर मोठ्याने वाचावा. प्रचलित देवनागरी लेखन दिले आहे तें केवळ सोयीसाठी. विवेचनात त्याला महत्त्व नाही.

po*h*un पोहून	li*h*un लिहून
po*h*to पोहतो	li*h*to लिहतो
po*h*ot पोहोत	li*hi*t लिहीत
po*h*o पोहो	li*hi* लिही

ह्यावरून ध्यानात येईल की ह्या गटातल्या धातूंचीं दोन दोन रूपिकांतरें होतात : /oh/,/ih अंती येणारीं आणि ज्यांमध्ये /h/ च्या अगोदरच्या स्वराची /h/ नंतर आवृत्ति झाली आहे अशी /oho,/, /ihi/ अंती येणारीं. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या प्रत्ययांपूर्वी /oh/ आणि /oho/ येतात त्याच प्रत्ययांपूर्वी अनुक्रमे /*i*h/ आणि /*i*hi/ अंती असणारीं येतात. ही परिस्थिति लक्षात घेऊन आपण समजा पुढील नियम मांडले :

१. पदांती किंवा /–t/ आदि प्रत्ययांच्या पूर्वी /h/ पूर्वीचा स्वर /h/ नंतर आवृत्त होतो.

२. अन्यत्र तसें होत नाही.

पण आता टेहेळणें क्रियापद घेऊन पाहू.

po*h*un पोहून	—
po*h*to पोहतो	ṭe*h*ḷun, ṭe*h*ḷət टेहळून, टेहळत
po*ho*t पोहोत	ṭe*he*ḷ, ṭe*he*ḷto टेहेळ, टेहेळतो
po*ho* पोहो	—

ह्यावरून आपले नियम आहेत तसे लागू पडत नाहीत, पण त्यात फेरफार केल्यास सामान्य नियम बसवता येतील, हें लक्षात यावें. स्वरावृत्तीचा संबंध भोवतालच्या व्याकरणिक परिस्थितीकडे नसून भोवतालच्या वर्णावलीकडे पोचत आहे. तेव्हा नियम फिरवून असे मांडावें लागतील :

१. [मूळ रूपें /poh–, /lih–/, /tehḷ–/ अशीं मानून त्यांपासून प्रत्यय लावून पदें सिद्ध केलीं. ह्या पदांमध्ये—] /h/ पदांती किंवा अंत्य व्यंजनापूर्वी किंवा एकापेक्षा अधिक व्यंजनांपूर्वी जर आला तर /h/ नंतर त्याच्या अगोदरच्या स्वराची आवृत्ति होते.

२. अन्यत्र तसें होत नाही.

ह्यामुळे /pohot/ आणि /teheḷ/ ह्यांमधील साम्य स्पष्ट होतें, /pohto/ आणि /tehḷun/ मधीलही साम्य दिसून येतें. /pohun/ मध्ये /h/ स्वरापूर्वी येत आहे. टेहळणेंच्या पदव्यवस्थेंत असें होणें शक्य नाही, कारण /eh/ नंतरचा /ḷ/ तिथून हलणें अशक्य आहे. निरनिराळ्यां रूपांच्या बाह्य, वर्णमय स्वनिममय आकाराला येथे महत्त्व आहे, अंतर्गत, रूपिममय आकाराला नाही. त्यामुळे अपेक्षा ही की हे नियम क्रियापदांखेरीज अन्य पदांनाही लागू पडावे. उदाहरणार्थ :

tehḷun टेहळून	mohrun मोहरून	mohra (नाम, अनेकवचन) मोहरा
teheḷto टेहेळतो	mohorto मोहोरतो	mohor (नाम, एकवचन) मोहोर

आता राहणें, सहा, किंवा पहाट ह्यांची परिस्थिति बघू. लिहणें, मोहोर ह्यांच्या चालीवर बनणारीं पदें मांडू.

पदान्ती :	l*ihi* लिही	*r*aha*	*s*aha*	—
अंत्यव्यंजन–पूर्व / व्यंजन–संघात–पूर्व	l*ihi*t लिहीत	*r*aha*t	*s*aha*c	*p*aha*ṭ
स्वरपूर्व :	l*ih*un लिहून	r*ah*un राहून	s*ahi* साही (जणांना)	
अन्यत्र :	l*ih*to लिहितो	r*ah*to राहतो	s*ah*səsṭə साहसष्ट	p*ah*ṭe पाहटे

नियम लागू पडायला हरकत नाही असें वाटतें, पण तारांकित रूपें खटकतात —म्हणजेच अशुद्ध वाटतात. तीं अनुक्रमें : rəha, rəhat, səha, səhac, pəhaṭ (रहा, रहात, सहा, सहाच, पहाट) अशीं यायला हवींत.[1] तीं दुरुस्त करण्यासाठी वरच्या दोन नियमांनंतर तिसरा एक नियम लावायला हवा.

३. जिथे aha असा वर्णसंघात येतो तिथे पहिल्या a ला ə असा आदेश होतो.

अर्थात् हा नियम /rah/ नंतर /–a/ (तुम्ही रहा) किंवा /–avi/ (रहावी) लागून तयार झालेल्या रूपांनाही लागू पडतो. आज्ञार्थी एकवचन ज्याप्रमाणे lihi च्या जोडीला rəha, त्याप्रमाणे आज्ञार्थी अनेकवचनही liha च्या जोडीला rəh–a असेंच येणार.

ह्याप्रमाणे आणखी दुरुस्त्या करीत, पुरत्या जोडीत नियमांची बिनचूक, समव्याप्त, लाघवयुक्त, व्यवस्थित मांडणी तयार होईल. /ṭẹhḷ–/ला /–ya/ सागल्यावर पहिल्या नियमानुसार */ṭẹhəḷya/ न होता /ṭẹhḷya/ हेंच रूप का राहतें, /rəhəyla/ (राहण्यासाठी) आणि /rahila/ (भूतकाळ) ह्या दोहोंना जलद बोलण्यातला /rahyla/ हा विकल्प कसा होतो, इत्यादि गोष्टींचा उलगडा करीत करीत ही वाट काढावी लागेल. (ह्याच वाटेने पाणिनि आपल्यापूर्वी गेलेला आहे ही जाणीव आजच्या व्याकरणकाराला निश्चित दिलासा देणारी आहे. वाट बिकट आहे थोडी, पण कंटाळवाणी नक्की नाही.)

रूपसिद्धीमध्ये संधिनियमांचाही समावेश होतो हें पूर्वीं सांगितलेंच आहे. रामष्टीकते सारखीं मराठीच्या दृष्टीने अर्थशून्य उदाहरणें न देता, कानावर भिस्त ठेवून मराठीतल्या संधींचा नव्याने अभ्यास करता येण्यासारखा आहे. वानगीदाखल हीं उदाहरणें पहा :

(१) aṭh– आणि –da मिळून (आटदा) ɛṭda किंवा aḍḍa.

(२) vaḍh– आणि –to मिळून (वाढतो) vaḍhto किंवा vahḍto किंवा vaḍto (पण *vaḍḍo मात्र नाही!).

(३) hat– आणि –ca मिळून hacca (हातचा).

३

दुसरें उदाहरण पदव्याकरणामधलें आहे. नामांना लिंग, वचन हे विकार होतातच. जास्त काटेकोरपणाने बोलायचें तर प्रत्येक नामाला पुंलिंग, स्त्रीलिंग,

---

१. 'वाहतुकीचें साधन किंवा साधनें' ह्याअर्थी vəhan आणि vahnə: हीं रूपें pəhaṭ, pahṭe ह्याच चालीवर आहेत. (अधिक शिष्ट बोलीत अर्थात् vahən वाहन, vahnə : अशीं रूपें मिळतात. मालट्रकवर मात्र 'भाडोत्री वहान' असें लिहिले असतें!)

नपुंसकलिंग ह्या तीन रूपिमांपैकी एकाची अपेक्षा असते. ह्या लिंगांची अभिव्यक्ति काही नामांच्या बाबतीत केवळ संलग्न विकारी विशेषणादि पदांमुळे होते तर काही नामांच्या बाबतीत संलग्न प्रत्ययांतूनही होते. काही प्रातिपदिकें एकेरी लिंगाचीं असतात (उदा. चादर–, राज्–) तर काही दोन किंवा तीन लिंगांत चालतात) उदा. विळ्–पु. व स्त्री., वेळ्–पु. व स्त्री., घोड्–पु. स्त्री. व न.) आणि तसें होताना अर्थभेद असतोच असें नाही (उदा० विळ्–, वेळ्–, घोड्– अर्थभेदासहित आणि कोच्– पु. व न. अर्थभेदाविरहित). तीन लिंगें आणि दोन वचनें ह्यांच्या-खेरीज काय विकार असतात ह्याचा आपल्याला विचार करायचा आहे. एक शक्यता अशी दिसते की नाम-प्रातिपदिकाला वचन वगैरे काहीच न दर्शविता एकदम काही प्रत्यय सगळ्या नामांना सरसकट न लागता काही थोड्या नामांनाच लागतात. ते म्हणजे—

–i (ghər–, dhəḍpəṇ– घरी, धडपणी)
–un, विकल्पाने –nə: (ghər–, hat– घरून, हातून)
–e (bəḷ–, əndaz– बळे, अंदाजे)
–il (ghər– घरील)
–c– (ghər–, zag– घरचा, जागचा)
–a (pay– पाया)

ह्या प्रत्ययांचा विचार आपण इथे करणार नाही.

दुसरी शक्यता अशी दिसते की वचनाची निश्चिति होऊन शिवाय तें रूप सरळ, सामान्य, किंवा संबोधन ह्यांपैकी एक असतें. सामान्यरूप क्वचित् तसें सुटेंच वाक्यात वापरलें जातें. उदाहरणार्थ :

देवा घरी, लोका सांगे, भल्या पहाटे, बायका मुलांना.

पण बहुशः सामान्यरूपानंतर काहीतरी जोडावें लागतें. इथून मतभेदाला खरी सुरवात होते. प्रथम मी नव्या मताप्रमाणे मांडणी करतो. मग पारंपरिक मांडणीशी तिची तुलना करू.

सामान्यरूपानंतर शब्दयोगी लागतात. हे शब्दयोगी सविकारी असतील किंवा अविकारी असतील. तसेच ते अन्यत्र वाक्याचा सुटा घटक म्हणून प्रयोगार्ह म्हणजे मुक्त असतील किंवा बद्ध असतील. म्हणजे शब्दयोग्यांचे एकंदर चार पोटभेद होतात.

१. बद्ध अविकारी, उदा. –s, –la, –ni (विकल्पाने एकवचनी सामान्य-रूपांनंतर –ne किंवा –nə:), –ši, –hun, –niši, –pekša, –gət, –pəryyənt, (स, ला, ने, शी, हून, निशी, पेक्षा, गत, कडे, पर्यंत)

२. बद्ध सविकारी, उदा. –c– (घराचा इ०), –zokt– (घराजोगता इ०)

३. मुक्त अविकारी, उदा. at, atun, vər, vərun, səhə (तो बायकोसह आला किंवा तो सह आला) (आत, आनून, वर, वरून, सह)

४. मुक्त सविकारी, उदा. vegḷ–, atl–, sarkh–, purt– (पोटापुरती अक्कल किंवा पुरती अक्कल) (वेगळा, आतला, सारखा, पुरता)

मराठी नामांना तीन विभक्ति असतात— सरळ, सामान्य, आणि संबोधन. सामान्य विभक्ति कधी सुटी वापरली जाते तर कधी अनेक शब्दयोग्यांपैकी एक पुढे जोडून येते. बद्ध शब्दयोग्यांपैकी –s/–la, –ni, आणि –c– ह्यांना वाक्यव्याकरणात विशेष महत्त्व असतें. नवी मांडणी इथे संपली.

पारंपरिक विभक्ति आणि विभक्ति-प्रत्यय ह्यांची गणना अर्थशून्य वाटावी इतकी भोंगळ आहे. एक तर एका विभक्तीखाली परस्परतुल्यच प्रत्यय यावेत ह्याची काळजी घेतलेली नाही. –la आणि – na हीं किंवा –ne, –nə:, आणि –ni हीं एकेका प्रत्ययाचींच रूपिकांतरें आहेत असें म्हटलें तर तें मान्य होण्यासारखें आहे. पण –ni आणि –ši ह्यांचा अर्थाअर्थी काही संबंध ? घराने आणि घराशी ही काय एकाच विभक्तीचीं दोन रूपें समजायचीं ? दुसरें म्हणजे सर्व विभक्तिप्रत्ययांचा एक वर्ग बनायचा असेल तर ते एकाच स्थानी आले पाहिजेत. घरून मधला –un किंवा सटवे मधला संबोधनवाचक –e प्रातिपदिकाला सरळ लागतो तर घराहून मधला –hun प्रातिपदिकाच्या सामान्यरूपाला लागतो. ह्या सर्वांना विभक्ति ह्या एकाच वर्गात घालता येणार नाही. त्यांना सामान्य असें कार्य नाही, ते समस्थानीय नाहीत. तिसरें म्हणजे –तें, –हीं ह्या प्रत्ययांना आधुनिक मराठीच्या व्यवस्थेतच काही स्थान नाही तर विभक्तिप्रत्ययात कुठलें ? राहता राहिले –s, –la, –ni, –hun, –ši, –c–, –t. ह्या सर्वांना काहीतरी एकजिनसीपणा आहे— सर्व शब्दयोगी आहेत. (ह्यांपैकी –s आधुनिक मराठीतून जवळजवळ गेलाच आहे.) उरलेल्यांच्या प्रत्येकी एक ह्याप्रमाणे सहा विभक्ति मानाव्यात तर उरलेल्या शब्दयोगींपासून त्यांना वेगळें काढायचें कुठल्या मुद्द्यावर ? बद्धत्व हें लक्षण म्हणावें तर –pəryyənt, –gət हीं त्यांत का नको ? आणि –t ला घ्यायचें तर –tun (खोलीतून), –tl– (घरातला) इत्यादि का नको ? त्या सर्वांना घ्यायचें तर तीं सर्व at, atun ह्या मुक्त पदांचींच संधीमुळे झालेलीं रूपें आहेत हें लक्षात येतें. बरें, सर्वच शब्दयोगींना आत घ्यावें तर डझनावारी विभक्ति मानण्याचा प्रसंग येणार. उत्तम मार्ग म्हणजे संस्कृतच्या चौकटीत मराठीला कोंबून बसवण्याचा हा अव्यापारेषु व्यापार सोडून द्यावा. दोन भाषांमध्ये साम्य जरूर शोधावें पण तें त्यांचें प्रथम पृथक् वर्णन केल्यानंतर फावल्या वेळी. एखादी भाषा वर्णायला घेतली म्हणजे मन घट्ट करायला पाहिजे. तिच्यामध्ये द्विवचन सापडलें नाही, किंवा नपुंसकलिंग सापडलें नाही तर मनाची तयारी पाहिजे. फार काय, वचन आणि लिंगच

सापडलें नाही तर त्यालाही तयारी हवी. **नाम, वचन** ह्यासारख्या संज्ञा प्रत्येक भाषेला नव्याने लावून पहायला हव्या, आणि त्या तशा जर लागल्याच तर त्यांची नव्याने व्याख्या करायला हवी.

आता लिंग, वचन, विभक्ति ह्यांना अनुसरून नामांची रूपसिद्धि कशी होते तें थोडक्यात पाहू. संबोधनविभक्तीचीं रूपें सामान्यविभक्तीसारखी प्रायः होतात. किंबहुना **सटवे** (संबोधन), **सटवी** (सामान्य) अशी भेदस्थळें नसतीं तर संबोधनविभक्ति अशी वेगळी मानण्याचेंच कारण नव्हतें. (हिंदीमध्ये दोनच विभक्ति मानून भागतें.) म्हणजे प्रत्येक नामाचीं चार रूपें होतात : एकवचन सरल, एकवचन सामान्य, बहुवचन सरल, आणि बहुवचन सामान्य. हीं रूपें सिद्ध करताना पारंपरिक व्याकरणात नामांचे गण काटकसरीने कमीत कमी किती पाडता येतील इकडे म्हणजे लाघवाकडे लक्ष दिलेलें नाही. बारीकसारीक तपशील सध्या सोडून दिला तर मराठी नामांचे आठ गण पडतात—पुंलिंगी दोन, स्त्रीलिंगी चार, आणि नपुंसकलिंगी दोन. बहुवचनी सामान्य विभक्तीचा –n प्रत्यय सर्व गणांना समान आहे. (रूपें देताना एकवचन सरल, एकवचन सामान्य, बहुवचन सरल, बहुवचन सामान्य हाच क्रम ठेवला आहे. प्रत्यय दिसत नाही तिथली रिकामी जागा शून्याने दाखवली आहे.)

पु. १ : ghoḍ–a घोडा, ghoḍ–ya, ghoḍ–e, ghoḍ–ya–n. तद्वत् फेटा, ससा, गडवा, सोफा इत्यादि.

पु. २ : vagh–० वाघ, vagh–a, vagh–०, vagh–a–n. तद्वत् घाट, विंचू, धोबी, उडपी, चहा इत्यादि.

स्त्री. १ : ghoḍ–i घोडी, ghoḍ–i, ghoḍ–ya, ghoḍ–ya–n. तद्वत् सटवी, इडली, बॉडी इत्यादि.

स्त्री. २ : śaḷ–a शाळा, śaḷ–e, śaḷ–a, śaḷ–a–n. तद्वत् जागा, हवा इत्यादि.

स्त्री. ३ : vaṭ–० वाट, vaṭ–e, vaṭ–a, vaṭ–a–n. तद्वत् झोप, बेगम, बँक, जळू, टाळू इत्यादि.

स्त्री. ४ : bhintə–० भिंत, bhint–i, bhint–i, bhint–i–n. तद्वत् रीत, बात, वाळू (कीटक), बॅट इत्यादि.

न. १ : ghoḍ–ə: घोडें, ghoḍ–ya, ghoḍ–i, ghoḍ–ya–n. तद्वत् खेडें, ज्ञानवें इत्यादि.

न. २ : zhaḍ–० झाड, zhaḍ–a, zhaḍ–ə:, zhaḍ–a–n. तद्वत् माकड, दही, बाळकडू, गळू इत्यादि.

ससा ह्या पु. १ नामाचे एकवचनी सामान्य रूप səs–ya होते, ते पुढे रूपसिद्धीच्या सामान्य संधि–नियमानुसार səśa (सशा–) असें आपण करून घेतो. तेवढ्यासाठी

काही आपण **सता** वेगळ्या गणात घालत नाही. ह्याच न्यायाने विंचू, जळू, दही ह्यांचे वेगळे गण पाडण्याचें कारण दिसत नाही. पु. हत्ती, स्त्री. वाळू (सिकता), न. सुकाणू इत्यादि शून्यप्रत्ययी नामांना –n खेरीज अन्य काही लागत नाही.

४

तिसरें आणि शेवटचें उदाहरण वाक्यव्याकरणातलें घेऊ. एका वर्गात वालायचीं रूपें समस्थानीय पाहिजेत हें जाता जाता सांगितलेलें तत्त्व अधिक विशद करायचें आहे. ज्याला पारंपरिक व्याकरणात चतुर्थ्यन्त कर्ता म्हणतात (उदा० **मला सदरा आवडला** मधला **मला**) त्याचा विचार इथे करायचा आहे. क्रियापद ज्याच्या केंद्र-स्थानी आहे असें एखादें मराठी वाक्य घेतलें तर त्यातील क्रियापदाच्या प्रभावळीत बसणारे अन्य घटक म्हणजे कर्ता, कर्म, स्थल, काल, प्रयोजन इत्यादि कारकें होत. ह्यातलीं जीं सर्व क्रियापदांना चालणारीं स्थलकालादि कारकें असतात त्यांना आपण बाह्य कारकें म्हणू. ज्या कारकांच्या बाबतीत क्रियापदाची त्याच्या उपभेदानुसार विशिष्ट अपेक्षा असते त्यांना आपण आभ्यंतर कारकें म्हणू—त्यांचाच विचार सध्या थोड्या बारकाव्याने करायचा आहे.

आभ्यंतर कारकें म्हणजे कर्ता, संप्रदान, कर्म, पूरक एवढी तरी सुरवातीला मानायला हरकत नाही. एका टोकाला **उजाडणें** सारखें क्रियापद घेतलें तर त्याला ह्यापैकी कोणत्याच कारकाची अपेक्षा नाही. दुसऱ्या टोकाला हीं सर्व कारकें हजर असलेलीं वाक्यें सापडतात—उदा. **त्याने मला पैसे उसने दिले.** (अनुक्रमे कर्ता, संप्रदान, कर्म, पूरक, क्रियापद.)

दिलेल्या वाक्यात कर्ता (असल्यास) कोणता, कर्म (असल्यास) कोणतें इत्यादि ठरवताना लौकिक अर्थाने कर्तृत्व कुणाचें इत्यादि आपण पहात नाही. **कुत्र्याने चावा घेतला** किंवा **दुकानदाराने पैसे घेतले नाहीत** मध्ये जितका **कुत्र्याने** किंवा **दुकानदाराने** हा कर्ता आहे तितकाच **डिब्याने पेट घेतला** किंवा **गिऱ्हाइकाने पावती हरवली** ह्यांमध्ये **डिब्याने** किंवा **गिऱ्हाइकाने** हा कर्ता आहे. कोणता शब्दयोगी (–ni, –la) कुठे लागला आहे, कोणत्या घटकाचें लिंग, वचन कोणत्या घटकानुसार फिरतें आहे, कोणता घटक सामान्यतः कोणत्या घटकानंतर येतो इत्यादि व्याकरणिक बाबींचाच विचार आपण करतो आणि वाक्यांचे साचे हुडकून काढतो. ह्या पार्श्वभूमीवर **मला सदरा आवडला** ह्या वाक्याकडे पाहिल्यास आपल्याला काय दिसते ?

मला सदरा आवडला आणि **मला सदरा** झाला ह्यांचा साचा वेगळा असल्याचें दिसत नाही. **मला सदरा आवडतो, आवडेल** आणि **मला सदरा होतो, होईल** इत्यादि फिरवाफिरव करून पहावी. (इंग्लिशच्या शिक्षकांना येथे structural method ची आठवण व्हावी.) असें असताना पहिल्या वाक्यात कर्ता, कर्म, क्रियापद अशी रचना मानायचें कारण नाही. **आवडणें, होणें** (to fit ह्या अर्थी) ह्या दोन्ही अकर्मक

क्रियापदांचा कर्ता सदरा आहे. मग मला ह्यांचें दोन्ही वाक्यात कारक म्हणून स्थान कोणतें ?

व्याकरण$_2$मध्ये आपलें धोरण काटकसरीचें असल्यामुळे चटकन क्लृप्ति सुचते ती अशी की देणें, लावणें सारख्या काही सकर्मक क्रियापदांना ज्याप्रमाणे संप्रदानाची अपेक्षा असते त्याप्रमाणे आवडणें, होणें ह्या अकर्मक क्रियापदांनाही संप्रदानाची अपेक्षा असते असे म्हणून मोकळें व्हावें. दोन्ही ठिकाणी ह्या कारकाचें चिह्न –la हेंच आहे. पुष्कळ वाक्यें ह्या साच्यात बसतात असें दिसतें.

मला	सदरा	आवडला.
,,	,,	झाला.
,,	उशीर	,,
,,	पैसा	पुरला.
,,	विचार	सुचला.
,,	,,	रुचला.
,,	वजन	झेपलें.
,,	,,	उचललें.
,,	पडसें	भोवलें.
,,	,,	आलें.
,,	झोप	आली.
,,	स्वप्न	पडलें.
,,	शिंगें	फुटलीं.
झाडाला	फांद्या	फुटल्या.
वादाला	फाटे	फुटले.
मला	शिंगें	आहेत.
,,	मंगळ	आहे.
,,	त्रास	,,
,,	ताप	,,
,,	मुलगा	,,

येथे एक लहानशी शंका मनाला त्रास देते आहे. देणें, लावणें इत्यादि सकर्मक क्रियापदांचे संप्रदान स्वभावतः कर्त्याच्या नंतर येते. पण ह्या अकर्मक क्रियापदें वापरलेल्या वाक्यात तर तें कर्त्याच्या पूर्वी येत आहे. ही शंका बरोबर असल्याचें पुढच्या वाक्यावरून दिसून येते.

कर्तव्याला मी चुकलो.
,, ,, जागलो.
सुखाला ,, मुकलो.
लाकडाला ,, शिवलो.
पसंतीला ,, उतरलो.
कसाला सोनें उतरलें.

हीं वाक्यें **मला सदरा आवडला** ह्या साच्यात जबरीने बसवलीं आहेत आणि त्यामुळे कर्त्यावर अकारण जोर पडतो हें ध्यानांत येते. (दोन्ही गटातलीं काही वाक्यें मोठ्याने म्हणून पहावीत.)

मी कर्तव्याला चुकलो.
सोनें कसाला उतरलें.

ह्या त्यांचा स्वाभाविक पदक्रम आहे.

ह्या दोन साच्यांतला फरक एक नवीन कारक मानून व्यक्त करता येईल.

मला सदरा आवडला.
(भोक्ता + कर्ता + क्रियापद)
मी कर्तव्याला जागलो.
(कर्ता + संप्रदान + क्रियापद)

' कर्ता ' ह्या कारकाशी कर्तृत्वाचा संबंध जसा मर्यादित रीतीनेच जोडायचा, त्याचप्रमाणे ' भोक्ता ' ह्या नवीन सुचवलेल्या कारकासंबंधी समजायचें. ह्यामुळे आणखी काही रचना उलगडून दाखवायला मदत होते. **सदरा मला आवडला** असा क्रम ठेवला तर भोक्त्यावर जोर पडतो.

मला करमत नाही.
(भोक्ता + क्रियापद)
मला वाईट वाटलें.
(भोक्ता + पूरक + क्रियापद)
यमुना गंगेला मिळते.
(कर्ता + संप्रदान + क्रियापद)
गंगूला नवरा मिळाला.
(भोक्ता + कर्ता + क्रियापद)

शेवटल्या दोन वाक्यांत जसा स्पष्ट फरक दिसून येतो, तसा पुढील जोडयांमध्ये मात्र दिसत नाही.

वारा अंगाला झोंबतो.
अंगाला वारा झोंबतो.
साप मुंगसाला चावला.
मुंगसाला साप चावला.

अर्थात् ह्याविषयी अधिक अभ्यासाची जरुरी आहे. **मला ढेकूण चावतात** आणि **मला हरभरे चावतात** ह्या वाक्यांचाही ह्या संदर्भात विचार करावा लागेल.

मराठी व्याकरणाची नवी दिशा कोणती रहावी ह्याबद्दल किंचित् दिग्दर्शन करावें एवढाच माझा इथे हेतु होता. ह्या लांबलेल्या विवेचनाचा समारोप राजवाड्यांच्याच शब्दांत करणें योग्य होईल :

"व्याकरणशास्त्रावांचून सध्यां काय अडलें आहे, असा बालिश प्रश्न कोणीकोणी करतात. त्यांना उत्तर एवढेंच कीं हरएक शास्त्रावांचून तर ह्या देशाचें सर्वत्र नडत आहे. जितकें रसायनशास्त्रावांचून नडत आहे, जितकें राज्यशास्त्रावांचून नडत आहे; जितकें युद्धशास्त्रावांचून नडत आहे, तितकें च व्याकरणशास्त्रावांचून हि नडत आहे. येथे युद्धशास्त्राच्या जोडीला व्याकरणशास्त्राला नेऊन बसविलेलें पाहून, कित्येक सुज्ञांना आचंबा वाटेल, परंतु त्यांनीं अंमळ सबूरी करावी. त्यांच्याहून सहस्त्रपट मोठ्या अशा एका युद्धशास्त्रज्ञाच्या कृतीकडे सहृदय अंतःकरणाने पहाण्याची त्यांनीं कृपा करावी. ज्यूलियस कैझर याचें नांव सुज्ञांनीं ऐकिलें च असेल. तो योद्धा मोहिमेवर असतांना ल्याटिन भाषेच्या व्युत्पत्तीवर व व्याकरणावर शास्त्रीय टिपणें मोठ्या काळजीनें लिहून ठेवी. हातांत तरवार ज्यानें लखलखवावी त्यानें त्या च हातानें त्या च वेळीं व त्या च स्थळीं लेखनी सारख्या तीक्ष्णतर आयुधाच्या साहाय्यानें व्याकरणाचा मान राखावा हा काय चमत्कार आहे बरें ! ज्यांना सामान्य सुरी हि कशी ती धरतां येत नाहीं, ज्यांनीं साऱ्या जन्मांत सूपाखेरीज इतर कोणतेंहि रसायण पाहिलेलें नाहीं, त्यांना व्याकरणाच्या योग्यतेची पारख कशी होणार ! व्याकरणशास्त्र हें मानवी व्यवहाराला फार उपकारक आहे.... व्याकरणशास्त्र हें समाजशास्त्राचें व इतिहासशास्त्राचें व मानववंशशास्त्राचें मोठें उपकारक आहे. समाजशास्त्रांत, इतिहासशास्त्रांत व मानववंशशास्त्रांत तौलनिक व ऐतिहासिक व्याकरणाच्या साहाय्यानें अनेक गोष्टींचा उलगडा होत असतो.... तौलनिक व ऐतिहासिक व्याकरण सिद्ध व्हावयाला वैयक्तिक व्याकरणाची आवश्यकता असते; सबब, वैयक्तिक व्याकरणशास्त्राची अत्यंत जरूर असते."

राजवाड्यांचें 'वैयक्तिक व्याकरणशास्त्र' म्हणजेच आजचें वर्णनात्मक किंवा विश्लेषक भाषाविज्ञान.

राजवाड्यांच्या स्मृतीला हें गौरवपुष्प वाहण्याची संधि ज्यांच्या सौजन्यामुळे मला मिळाली त्या सर्वांचे आभार मानून हें काहीसें लांबलेलें विवेचन पुरें करतो.

मराठीचें श्रवणप्रत्ययी लेखन

मराठीच्या मराठीभाषिकांसाठी मराठी–मराठी आणि अन्य भाषिकांसाठी मराठी–इंग्लिश वा मराठी–हिंदी कोश रचताना उच्चारण दाखवणें जरुरीचें आहे. विशेषतः प्रमाणमराठी ज्यांची लहानपणापासूनची बोली नाही अशा काही मराठी आणि सर्व अन्यभाषिक वाचकांची त्यामुळे मोठीच सोय होणार आहे. एखाद्या मराठी शब्दाच्या मान्य लेखनावरून त्याचा उच्चार ताडणें बऱ्याच वेळा सोपें असतें– उदाहरणार्थ काठी, पिस्ता हे शब्द. त्यामुळे दर शब्दाचा उच्चार वेगळा दाखवण्याची वेळ जशी इंग्लिश भाषेच्या कोशकारावर येते तशी मराठी भाषेच्या कोशकारावर येणार नाही हें उघड आहे. मात्र ह्याउलट कोशाच्या वाचकाला उच्चाराबद्दल कसलीच मदत देऊ करायची नाही हेंही धोरण बरोबर होणार नाही. ज्या मराठी शब्दांचा उच्चार त्यांच्या मान्य लेखनावरून ताडण्यात अडचणी आहेत अशा शब्दांच्या बाबतीत दोन प्रकारच्या तरतुदी करणें सोयीचें ठरेल—

(१) कोशाच्या प्रास्ताविक भागात काही सोपे सुटसुटीत नियम देणें.

(२) ज्या शब्दांना लागू पडणारे नियम गुंतागुंतीचे आहेत किंवा जे शब्द अपवाद स्वरूपाचे आहेत किंवा ज्या ठिकाणी नियम सापडत नाहीत– थोडक्यात सांगायचें तर जे जे शब्द कोशाच्या प्रास्ताविक भागात दिलेल्या नियमात पूर्णपणे बसत नाहीत त्या त्या शब्दांपुढे नोंदीच्या शीर्षकाच्या नंतर चौकोनी कंसात त्या शब्दाचा प्रमाणमराठीतला रूढ उच्चार (पर्याय असल्यास पर्यायांसकट) द्यावा. असा उच्चार दाखवण्यास जरूर तिथे नेहमीचें रूढ लेखन न वापरता श्रवणप्रत्ययी लेखन वापरावें.

मराठी कोशकार, अध्यापक, आणि इतर अभ्यासक ह्यांना उपयोगी पडेल अशी एक देवनागरी लिपीवर आधारलेली श्रवणप्रत्ययी लेखनपद्धति बसवण्याचा प्रयत्न इथे केला आहे. ही वर्णिलेली पद्धति सर्व संबंधितांच्या पसंतीस उतरेल अशी उमेद आहे. तिचे नियम बिनचूक आणि पुरेसे सोपे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

हें श्रवणप्रत्ययी लेखन करताना रूढ झालेलीं ॲ, ऑ हीं अक्षरें किंवा हेल दाखवणारा द्विखंड (ऽ) तर वापरायचाच आहे, पण पुढील चिह्नांकित अक्षरेंही

वापरायचीं आहेत—

अ (साधा ह्रस्व अ), अ (शब्दाच्या शेवटच्या अवयवात येणारा दीर्घ अ), अ (अतिह्रस्व अ) (उदाहरणार्थ : गवत [ग व त्], पत्र [प त्र], स्मित [स्मि त] अब्ब [अब्ब], सब्ब [स ब्ब])

आ (साधा दीर्घ आ), आ (ह्रस्व आ) (उदाहरणार्थ : आकाश [आ काश्, आ काश्], अगदी [अग् दी, आग् दी])

इ, उ (अतिह्रस्व इ, उ) (उदाहरणार्थ : पहिला [प हि ला, प हि ला], चर्या [च रि या], मेहुणा [मे हु णा मे हु णा])

च, छ, ज, झ (संस्कृत मधले तालव्य उच्चार), च, ज, झ (दंतमूलीय उच्चार) (उदाहरणार्थ : चारशे [चार् शे], चारणें [चार् ण, चार् णे], जाडजूड [जाड् जूड्], झाड् [झाड्]) (जाताजाता सांगायची गोष्ट म्हणजे दंतमूलीय उच्चारांना दंततालव्य म्हणतात तें बरोबर नाही.)

फ़् (दंतौष्ठ्य घर्षक; इंग्लिश एफ़् अक्षरासारखा)

रूढ लेखनावरून रूढ उच्चारण ताडण्यास जिथे अडचण येऊ शकेल अशी सर्व स्थळें आता आपण एकामागून एक तपासू. प्रथम प्रश्न, नंतर सुचवलेली व्यवस्था सांगणारा नियम, आणि नंतर जरूर तिथे युक्तिवाद असा क्रम ठेवला आहे. उदाहरणें देताना प्रथम रूढ लेखन, नंतर चौकोनी कंसांत श्रवणप्रत्ययी लेखन अशी मांडणी आहे. दोन्ही प्रकारच्या लेखनात एकापेक्षा अधिक पर्यायही असू शकतील. आद्य, मध्य, अंत्य म्हणजे शब्दाच्या सुरवातीचा, मधला, शेवटचा (उदाहरणार्थ आद्य इ इकडे; मध्य इ तिकडे, सुविधा; अंत्य इ आणि). श्रवणप्रत्ययी लेखनात उच्चाराचे अवयव तोडून दाखवले आहेत (उदाहरणार्थ पिस्ता [पिस् ता]).

(१) आद्य अ, आद्य आ ह्यांचा उच्चार

अट [अट्]	आड [आड्]
अगदी [अग् दी, आग् दी]	आडोसा [आ डो सा, आ डो सा]
अकरा, आकरा [अक् रा आक् रा]	आकाश [आ काश्, आ काश्]
अधीन [अ धीन्, आ धीन्]	आवड [आ वड्, आ वड्]

नियम : आद्य अ, आ चा उच्चार दीर्घ समजावा (अट, आड). तसें नसेल तेव्हा कोशात दिला आहे (अगदी, आडोसा इ.).

(२) मध्य अ चा उच्चार

कड	[कड्]	कड	[कु डा]
पितळी	[पि तु ळी]	वाकबगार	[वा कुब् गार्]
कडकी	[कुड् की]	सवंगडी	[सु वुङ् गु डी, सुव्ङ् गु डी]
एरंडेल	[ए रुण् डेल्, एर्‌ण् डेल्]	गावंढळ	[गा वुण् ढळ्, गाव्‌ण् ढळ्]
कडक	[कु डक्]	पत्र	[पु त्रु]
पाहरा	[पा हु रा]	सहा	[सु हा, सा हा]

नियम : मध्य अ शब्दाच्या शेवटच्या अवयवात असेल तेव्हा दीर्घ उच्चारावा (कड मधला क, कडक मधला ड). इतरत्र शब्दाच्या सुरवातीच्या अवयवात असेल तेव्हा ह्रस्व उच्चारावा (कडकी, कडक, कडा मधला क, सवंगडी मधला स, पत्र मधला प). इतर ठिकाणी कोशात दिल्याप्रमाणे उच्चारावा (पितळी मधला त, कडकी मधला ड, एरंडेल मधला र, वाकबगार मधला क आणि ब, सवंगडी मधला व आणि ग, गावंढळ मधला व आणि ढ, पाहरा मधला ह, सहा मधला स).

युक्तिवाद : हाताशी असलेल्या मराठी कोशातल्या कोणत्याही दोनतीन पानांना हा नियम लावला तर फारच थोड्या शब्दांमधल्या अ अक्षरांसाठी त्यांचें कंसात श्रवणप्रत्ययी पुनर्लेखन करावें लागेल असें दिसून येईल.

(३) अंत्य अ चा उच्चार

गार	[गार्]	व	[वु]
त्रिक	[त्रि कु, त्रीक्]	रंग	[रुङ् गु]
स्मित	[स्मि तु]	शांत	[शान् तु, शान्त्]
देह	[दे हु]	पत्र	[पु त्रु]
अग	[अ गु]	चित्त	[चित् तु]

नियम : अंत्य अ एकाक्षरी शब्दात दीर्घ उच्चारावा (व मधला अ). जोडाक्षरानंतर किंवा एकेरी व्यंजनाअगोदर शिरोबिंदु येऊन तें जोडाक्षर झालें असलें तर त्यानंतर अंत्य अ अतिह्रस्व उच्चारावा (पत्र, चित्त, रंग मधला अंत्य अ). इतरत्र अंत्य अ चा उच्चार करू नये (गार मधला अ). मात्र ह्या नियमाला अपवाद असतील ते कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (त्रिक, स्मित, देह, अग, शांत मधले अंत्य अ).

युक्तिवाद : अ च्या पुनर्लेखनासाठी चिन्हें (‸ ˘ ‿ –) मुद्दाम सर्व खाली लागणारीं ठेवलीं आहेत. छपाईची काही अडचण असेल तेव्हा ˘ ऐवजी ॰ वापरायला हरकत नाही. अ अक्षराच्या ह्या चार प्रकारांना अनुक्रमे अनुच्चारित, अतिह्रस्व, ह्रस्व, आणि दीर्घ अ म्हणावें.

(४) इ, उ ह्यांचा उच्चार

आणि	[आ णी, आ़ णी]	सगुण	[स़ गु ण़]
गुरु, गुरू	[गु रू]	पाहिजे	[पा हि़ जे]
अधिक	[अ़ धीक्, आ़ धीक्]	सव्वीस	[सुव् वीस्, स़ हु़ वीस्]
अवगुण	[अव् गूण्, आव् गूण्]	शहाण्णव	[शि़ हाण् णव्, शा हु़ण् णव्]

नियम : इ, उ जेव्हा शब्दाच्या शेवटच्या अवयवात असतील तेव्हा दीर्घ उच्चारावे (आणि, गुरु, अधिक, अवगुण). इतरत्र ह्रस्व उच्चारावे (इकडे, तिकडे, महिला, अतिशय). अपवाद असतील ते कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (सगुण, पाहिजे, मेहुणा). काही थोड्या शब्दात इ उ लेखनात नसूनही उच्चारात अतिह्रस्व स्वरूपात येतात (सव्वीस, शहाण्णव मधले वर दाखवल्याप्रमाणे हु़, शि़).

युक्तिवाद : छपाईची काही अडचण असेल तेव्हा ˘ ऐवजी • वापरायला हरकत नाही.

(५) ऋ ऌ चा उच्चार

मृत	[मृ तु़, मु तु़]	सहृदय	[स हृ दय्, सर् ऱ्हु दय्]
अमृत	[अ़ मृत्, अ़ मृत्, आ़ मृत्, आ़ मूत्]	गृह	[गृ हु़, ग्रु हु़]
ऋण	[ऋ ण़, रूण्]	नैर्ऋत्य	[नैर् ऋत् त्य़, नैर् रुत् त्य़]
हृदय	[हृ दय्, ऱ्हु दय्]	क्लृप्ति	[क्लृप् ती, क्लुप् ती]

नियम : ऋ चा उच्चार ऋ होतो किंवा रु होतो, मात्र शब्दाच्या शेवटच्या अवयवात तो ऋ किंवा रू समजावा; ऌचा उच्चार ऌ किंवा लु होतो (मृत, अमृत, ऋण, गृह, क्लृप्ति) अपवाद असतील ते कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (हृदय, सहृदय, नैर्ऋत्य).

युक्तिवाद : ऋ ऐवजी रु/रू न वापरता रि/री किंवा ऱ्/ऱ घालण्याची प्रवृत्ति दिसते ती अपवादात्मक समजावी. उदाहरणार्थ : ऋण [रीण्], गृह [ग्रु हु], हृदय, [ऱ्हु दय्], किंबहुना काहींजण तिला प्रमाणेतर प्रवृत्ति समजतील.

(६) ॲ ऑ चा उच्चार

बॅट	[बॅट्, ब्याट्]	ऑफिस	[ऑ फ़ीस्, आ फ़ीस्, आ़ फीस्]
बॉल	[बॉल्, ब्राल्]	डॅबीस, डांबीस	[डॅम् बीस्, ड्याम् बीस्, डाम् बीस्]
ब्रॅंडी	[ब्रॅण् डी, ब्राण् डी]	ॲसिड	[ॲ सीड्, आ़ सीड्, आ सीड्]

नियम : ॲ चा उच्चार ॲ होतो किंवा या होतो, मात्र आद्य ॲ मध्ये तो ॲ किंवा आ़ किंवा आ समजावा (बॅट, डॅबीस, ॲसिड). ऑ चा उच्चार ऑ होतो किंवा

आ होतो (बॉल, कॉफी), मात्र आद्य ऑ मध्ये ऑ किंवा आ किंवा ॵ समजावा (ऑफीस), अपवाद असतील ते कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (ब्रँडी).

(७) द्विखंड हें स्वरयोगी चिह्न पुढे येणाऱ्या स्वराचा उच्चार
मनोऽवस्था, मनोवस्था [मु नो वुस् था] कुकूऽचकू, कुकूचकू [कु कूऽ चु कू]

नियम : कोशात पुनर्लेखन करून दाखवलें आहे.

युक्तिवाद : संस्कृतमधून आयात झालेल्या शब्दात द्विखंडाची दखल उच्चारात घ्यायची नसते. हेल दाखवण्यासाठी द्विखंडाच्या उपयोग करणें ही मराठीमधली अलीकडची लकब आहे.

(८) शिरोबिंदु ह्या स्वरयोगी चिह्नाच्या पुढे य् पासून ज्ञ् पर्यंतचीं अक्षरें आलीं तर होणारा उच्चार

संयम [संय् युम्]	मीमांसा [मी मांव् सा]
संरक्षण [संव् रक्ष् षण्, संव् रक् शण्]	मांसाहार [मांव् सा हार्]
संलग्न [संव् लग् नु, संल् लग् नु]	नपुंसक [नु पुंव् सुक्]
पुंलिंग [पुंल् लिङ् गु]	संहार [संव् हार्]
किंवा [किंव् वा]	सिंह [सिंव् हु]
वांशिक [वांव् शीक्]	संक्षेप [सङ् षेप्, सङ् शेप्]
कंस [कंव्स्]	संज्ञा [संव्द् न्या]

नियम : शिरोबिंदूनंतर य् आल्यास त्याचा उच्चार [यं] असा, ल् आल्यास [वं] किंवा [लं] असा, र्, व् , श्, ष्, स् , ह्, ज्ञ् आल्यास [वं] असा करावा.

युक्तिवाद : पुंलिंग, संक्षेप हे शब्द शिरोबिंदूबद्दलच्या नेहमीच्या नियमातच बसतात (क ख ग घ आल्यास [ङ्] सारखा).[1] संज्ञा शब्दाला लागू पडणारा नियम मराठीच्या रूढ उच्चाराप्रमाणे बसवला आहे, संस्कृतमधल्याप्रमाणे नाही. आता नव्या शुद्धलेखनाप्रमाणे राहता राहिला बहुवचनी सामान्यरूपांवरचा शिरोबिंदु.

---

१. पुंलिंग असें संस्कृत पुंलिङ्गच्या जवळचें लेखन केलें आहे. नियमानुसार उच्चार [पुंल् लिङ् गु] असा मांडावा लागेल, किंवा [पुंव् लिङ् गु] असा मांडावा लागेल. मराठीमध्ये [पुल् लिङ् गु] असाही उच्चार आहे.

सर्वांशी (लाभदायक ठरला) [सुर् वांव् शी]
सर्वांशी (गोड बोलावें) [सुर् वान् शी, सुर् वां शी, सुर् वा शी]
सर्वांचा (लोभ) [सुर् वान् चा]
सर्वांच्या (नजरा) [सुर् वान् चा]
सर्वांवर (मात केली) [सुर् वान् वर्, सुर् वां वर्, सुर् वा वर्]
सर्वांपुढे (गेला) [सुर् वाम् पु ढे, सुर् वां पु ढे, सुर वा पु ढे]

७९ ते ८८ पर्यंतचे आकडेही पाहण्याजोगे आहेत.

न्यायशी, न्यांयशी [न्याय् शी, न्यांय् शी]

आकड्यांचे पुनर्लेखन कोशात करावें लागेल. सामान्यरूपांचा विचार कोशात येणार नाही. पाहिजे तर प्रास्ताविकात करावा.

(९) विसर्ग ह्या स्वरयोगी चिह्नाचा उच्चार

प्रायः [प्रा युहूहू, प्रा यु हु] अधःपात [अ धुप् पात्, आ धुप् पात्]
प्रातःकाल [प्रा तुहूक् काल] निःशंक, निश्शंक [निश् शुङ् कु]
दुःख [दुक् खु] दुःसह, दुस्सह [दुस् सु हु]
निःपात [निहूप् पात्] निःस्पृह, निस्स्पृह [निस् पृ हु, निस् प्रु हु]

नियम : विसर्गाचा उच्चार कोशात दिल्याप्रमाणे करावा.

युक्तिवाद : विसर्गाबद्दलचा मराठी उच्चाराचा नियम गुंतागुंतीचा आहे. निष्पक्षपाती, घनश्याम सारख्या शब्दात विसर्ग नाही हें कोशात स्पष्ट करावें.

(१०) पायमोड केलेल्या व्यंजनांचा उच्चार

क्वचित्, क्वचित [क्वु चित्त्, क्वु चीत्] उद्गार [उद् गार्]
सत् [सुत्त्] षट्कार [षुट् कार्, शुट् कार्]
सुस्वागतम् [सुस् वा गु तुम्म्] जीर्णोद्धार [जीर् णोद् धा_]
अर्थात्, अर्थात [अुर् थात्त्, आर थात्त्, आर थात्] षड्ज [षड् जु, शुड् जु]
एम्. ए. [एम्म् – ए] द्वाही [द्वा ही]

नियम : पायमोड केलेलें व्यंजन आद्य किंवा मध्य असल्यास त्या ठिकाणी जोडाक्षर समजून नेहमीसारखा उच्चार करावा (उदाहरणार्थ जीर्णोद्धार, द्वाही); अंत्य असल्यास व्यंजन लांबतें (म्हणून [त्त् म्म्] असें पुनर्लेखन) आणि आधीचा स्वर आखडतो (सत् ची मत [मुत्] शी आणि क्वचित् ची अयाचित [अु या चीत्] शी तुलना करा); वर दिलेले नियम २ व ४ (कड, अधिक, अवगुण हीं उदाहरणें पहा) अंत्य पायमोड असताना स्थगित होतात.

युक्तिवाद : अंत्य विसर्ग आणि पायमोड केलेलें अंत्य व्यंजन ह्यांच्या उच्चारांतलें साम्य ध्यानात घ्यावें : प्रायः [प्रा युहूहू], सत् [सुत्त्].

(११) च्, छ्, ज्, झ्, ञ् ह्यांचे उच्चार

चव [च़व्]	चिमणी [चिम् णी]
चरबी [चुर् बी, च़र् बी]	चीड [चीड्]
चार [चार्]	च्यवनप्राश [चु वुन् प्राश्]
चारोळी [च़ा रो ळी]	त्याच्या [त्या चा]
छान [छान्]	सुवाच्य [सु वाच् च]
जास्त [जास् तु]	जिवाणू [जि वा णू]
जेवण [जे वृण्]	ज्या [जा]
झाड [झाड्]	त्रिज्या [त्रिज् जा]
झंझावती [झन् झा वा ती]	भोज्या [भोज् जा]
ञकार [यं कार्]	ताज्या [ता जा]
समाज [सु माज्]	सामाजिक [सा मा जीक्]

नियम : छ् चा उच्चार नेहमीच तालव्य करावा. च् ज् झ् ह्यांच्यानंतर इ ई आल्यास त्यांचा उच्चार नेहमी तालव्य करावा. च्य् ज्य् झ्य् ह्यांचा उच्चार [च् ज् झ्] असा तालव्य करावा, ह्या ठिकाणी य् चा वेगळा उच्चार होत नाही. इतरत्र च् ज् झ् ह्यांचा उच्चार दंतमूलीय करावा. ह्याला अपवाद असतील ते सर्व उच्चार कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (चरबी, चर, जास्त, जेवण, झंझावाती, समाज, सुवाच्य, त्रिज्या, भोज्या). ञ चा उच्चार [यं] करावा.

युक्तिवाद : दंतमूलीय च् झ् साठी वेगळीं चिह्नें [च़् ज़् झ़्] वापरण्यापेक्षा तालव्य च्, ज्, झ् साठी [च्य् ज्य् झ्य्] वापरून का मोकळे होऊ नये असा एक विचार मांडला जातो. (च्यवनप्राश, त्याच्या, ज्या, ताज्या हीं उदाहरणें ह्या दुसऱ्या विचाराला पोषक आहेत.) मराठीच्या दृष्टीने दंतमूलीय उच्चार स्थायी आणि तालव्य उच्चार पर्यायी असें दिसतें हेंही खरें आहे. उलट पक्षी देवनागरीतच लिहिल्या जाणाऱ्या हिंदी आणि संस्कृतमध्ये केवळ तालव्यच उच्चार आहेत, दंतमूलीय नाहीत हेंही तितकेंच खरें आहे. हा विचार स्वीकारण्यात इतरही काही अडचणी आहेत त्या अशा—

(क) छ चा वेगळेपणा स्पष्ट होत नाही, तो होण्यासाठी छान चें पुनर्लेखन [छ्यान्] करायचें का ?

(ख) चि, ची, जि, जी, झि, झी ह्यांचा वेगळेपणा स्पष्ट होत नाही. त्यासाठी [च्यिम् णी], [च्यीड्], [ज्यि वा णू], [ज्यीव्] लिहायचें का ? तसेंच [सा मा ज्यीक्] सुद्धा.

(ग) माज आणि समाज, बाजरी आणि वज्र ह्यांमधला फरक दाखवण्यासाठी [माज्], [सु मा ज्य्], [बाज् री], [वुज्य रु] लिहायचें का? तसेंच टीच [टीच्] आणि नीच [नीच्य्] सुद्धा.

(घ) सुवाच्य, त्रिज्या, भोज्या ह्यांचा वेगळा उच्चार दाखवण्यासाठी [सुवाच्य् च्यु], [त्रिज्य् ज्या], [भोज्य् ज्या] लिहायचें का? तसेंच [उच्य् च्यु], [सुज्य् ज्यु] सुद्धा.

तलबिंदु लिहून दंतमूलीय उच्चार दाखवण्यात एक अडचण काहींना वाटते. नेहमीपेक्षा वेगळें लेखन म्हणून स्थायी उच्चारापेक्षा वेगळा पर्यायी तालव्य उच्चार असें फसवें समीकरण विद्यार्थ्यांच्या मनात येईल. पण इथे सुचवलेली व्यवस्था पाहता 'इतरत्र दंतमूलीय' ह्या नियमानुसार तलबिंदूचें पुनर्लेखन बहुसंख्य शब्दांच्या बाबतीत आवश्यक ठरणारच नाही. ठरलें तर चरबी [चुर् बी, चर् बी] असे पर्यायी उच्चार दाखवतानाच ठरेल. अशा ठिकाणी फसवें समीकरण मनात यायला वावच नाही. उलट [सु माज्य्, सा मा ज्यीक्, वज्य् रु, भोज्य् ज्या] ह्यासारखें पुनर्लेखन पाहून मात्र विद्यार्थी बुचकळ्यात पडण्याचा संभव अधिक वाटतो.

ह्याप्रमाणे साधकबाधक विचार केल्यावर [च्] – [च्] अशी व्यवस्था [च्] – [च्य्] अशा व्यवस्थेपेक्षा अधिक सोयीची आणि कमी अडचणीची वाटते.

(१२) काही जोडाक्षरांचा उच्चार : न्य्, र्य्, र्न्य्, न्ह्, र्ह्, न्ह्य्, र्ह्य्, ह्य्, श्य्, ष्य्

दन्या	[द न्या]	बाह्या	[बा ह्या]
चर्या	[चु रि या]	बाह्यात	[बा हि यात्, बाय् ह्यात्]
कुर्न्यात	[कुर् न्यात्]	बाह्यात्कार	[बा हि यात् कार्, बाय् ह्यात् कार्]
तन्हा	[तु न्हा]	श्यामल	[शा मु लु]
न्हास	[न्हास्]	मिश्या	[मि शा]
गर्हणीय	[गुर्ह् हु णी यु]	वेश्या	[वेश् शा]
गोन्ह्याला	[गो न्ह्या ला]	गोष्यात	[गो षात्, गो शात्]
गर्ह्य	[गु रि ह्यु]	शिष्या	[शिष् षा, शिश् शा]

दुन्या, दुर्न्या [दु न्या, दुर् न्या]

बाह्या हा शब्द बाही चें बहुवचन किंवा ढगा हें वाद्य ह्या अर्थी समजावा.

नियम : न्य् [न्य्], र्य् [रि य्] र्न्य् [र् न्य्], न्ह् [न्ह्], र्ह् [र्ह् ह्], र्ह्य् [रि ह्य्] हे उच्चार र् हें व्यंजन ॖ आणि ॅ ह्या दोन पद्धतींनी लिहिल्यामुळे वेगळे पडतात, ह्य्, श्य्, ष्य् ह्यांचे उच्चार [ह्य् श् ष्] समजावे, मात्र अपवाद

असतील ते कोशात पुनर्लेखन करून दाखवले आहेत (वाह्यात, बाह्यात्कार, वेश्या, शिष्या).

युक्तिवाद : र लिहिण्याच्या ॅ = आणि ॒ (क्र, द्र, ट्र) ह्या तीन पर्यायांना शिरोरेफ मध्यरेफ, आणि तलरेफ अशीं नावें द्यावीं. श्य्, ष्य्, आणि मागच्या नियमात, चर्चिलेले च्य्, ज्य्, झ्य् ह्यांमधलें साम्य ध्यानात घ्यावें. (क्ष्य् च्या बाबतीतही साहजिक तेंच होतें.) च्य्, ज्य्, झ्य्, श्य्, ष्य् आद्य म्हणून आले (च्यवनप्राश, ज्या, श्यामल) किंवा व्यंजनानंतर आले (वर्ज्य, लक्ष्य) तर त्यांच्या उच्चारात द्वित्व येत नाही, इतरत्र येतें किंवा येत नाही (म्हणून पुनर्लेखनाची जरुरी). नियम बांधताना शब्द संस्कृतमधून आयात झाला आहे किंवा दुसरा काही इतिहास आहे किंवा कसें हें पाहण्याची जरुरी कोशाच्या वाचकाला पडू नये असें बंधन आपण मानलें आहे हें ध्यानात घ्यावें. नियम सोपा ठेवण्याकडे आपला कटाक्ष आहे. (त्याच कारणासाठी आद्य आणि व्यंजनोत्तर स्थानी द्वित्व होत नाही हा बारकावा आपण नियमात समाविष्ट करण्याचा मोह दूर ठेवला. असेच इतरही बारकावे आपण ह्यापूर्वी दूर ठेवले आहेत. उदाहरणार्थ अंत्य अ चा उच्चार ह्, इय्, ईय्, एय् ह्यांच्यानंतर अतिह्रस्व होतो, तो अनुच्चारित रहात नाही.)

(१३) य् किंवा ह्य् किंवा य् शेवटी येणाऱ्या उरलेल्या जोडाक्षरांचा उच्चार

न्याय [न्याय्] — बुद्ध्या [बुद् ध्या]
अन्याय [अन् न्याय्, आन् न्याय्] — ब्राह्मण [ब्राम् ऽह्मण्]
न्याहरी [न्या ह्‌ु री, न्‌ि हा री] — ताम्हन [ता म्हन्]
चाकरमान्या [चा कर मा न्या] — जिल्हा [जिल् ल्हा]
अरण्यात [अ रुण् ण्यात्, आ रुण् ण्यात्] — आह्लाद [आल् ल्हाद्, आल् ल्हाद्]
बरण्या [बुर् ण्या]
हत्यार [हु त्यार्, हुत् त्यार्] — गुन्ह्यात [गु न्ह्यात्]
सध्या [सुद् ध्या] — जिल्ह्यात [जिल् ल्ह्यात्]
अध्यात [अ ध्यात्, आ ध्यात्] — भत्त्याला [भत् त्या ला]

नियम : व्यंजनाच्या पुढे य्, ह्, किंवा ह्य् आणि मागे स्वर असला तर त्या व्यंजनाचें कधी द्वित्व होतें तें कोशात पुनर्लेखन करून दाखवलें आहे. मात्र रूढ लेखनातच जिथे असें द्वित्व दाखवलें असेल तिथे अर्थातच असें पुनर्लेखन केलेलें नाही (भत्त्याला, कुर्ल्यात). तसेंच यॅ्, ह्य्, ईं, ह्यॅ् ह्यांच्या बाबतीत नियम थोडा निराळा आहे तो पूर्वीच दिला आहे.

युक्तिवाद : पुण्याचा (पाहुणा) आणि पुण्याचा (संचय) ह्या जोडीची नेहमी

चर्चा होते तिची व्यवस्था आपण लावली, आणि त्याच चालीवरच्या इतरही जोड्यांची आपण दखल घेतली (ब्राह्मण, ताम्हन, जिल्ह्यात, गुन्ह्यात).

नियम ११, १२, १३ मधलीं उदाहरणें बारकाईने पाहिलीं तर श्रवणप्रत्ययी पुनर्लेखनात अवयव तोडून दाखवणें कसें सोयीचें आहे तें ध्यानात येईल. असे अवयव किंवा उच्चारित अक्षरें सुटीं दाखवलीं नाही तरी उच्चारभेद (आणि त्यावर अवलंबून असलेले अर्थभेद) कायम राहतील. तशीं तीं सुटीं दाखवल्यामुळे उच्चार-भेद समजायला मदत होते एवढेंच. (ताजा, त्रिज्या; दऱ्या, दर्या; हत्यारचे दोन उच्चार ह्यांसारख्या जोड्या पुन्हा एकवार पहाव्या.)

(१४) फ् चा उच्चार

फारशी (मदत) [फार् शी]   फार्सी (भाषा) [फ़ार् सी, फार् सी]

काफी (राग) [का फी]   कॉफी (पेय) [कॉ फी, कॉ फी, का फी]

नियम : काही शब्दात फ् चा उच्चार [फ्] किंवा [फ़्] होतो तो कोशात पुनर्लेखन करून दाखवला आहे.

(१५) द्वित्व झालेल्या महाप्राण व्यंजनाचा उच्चार

अच्छा [अच् छा, आच् छा]   सख्खा [सक् खा]

फुप्फुस [फुप् फूस्]   लफ्फा [लप् फा]

नियम : महाप्राण व्यंजनाचें द्वित्व झालें तर जोडीपैकी आधीच्या व्यंजनाचा उच्चार महाप्राणविरहित होतो.

(१६) ष् (तसेंच क्ष्) ह्यांचा उच्चार

षोक, शोक [षोक्, शोक्]   शुश्रुषा [शुश् रु षा, शुश् रु शा]

गोषा [गो षा, गो शा]   भक्ष्य [भक् षु, भक् शु]

नियम : ष्, क्ष् ह्यांचे उच्चार [ष्], [क्ष्] किंवा [श्], [क्श्] असे अनुक्रमे होतात.

युक्तिवाद : ष् (तसेंच क्ष्) ह्यांच्या पुढे य् आला तर त्याचा उच्चार होत नाही हें नियम १३ च्या वेळी आपण पाहिलेंच आहे.

(१७) ज्ञ् चा उच्चार

ज्ञान [द्न्यान्]   तज्ज्ञ [तज् द्न्यु, तद् न्यु]

विज्ञान [विद् न्यान्]   मदन्या [म द न्या, मद् न्या]

नियम : ज्ञ चा उच्चार [द्न्य्] असा होतो.

युक्तिवाद : मदन्या म्हणजे मदन नावाचा मुलगा; उलट पदन्यास चा उच्चार [प दन् न्यास्] असा होईल.

(१८) विशिष्ट शब्दांचे अनपेक्षित उच्चार पुनर्लेखन करूनच दाखवावे लागतील. असे काही शब्द पूर्वी आलेच आहेत— सव्वीस, शहाण्णव, न्याहरी, तज्ज्ञ. आणखी काही देता येतील—

वाय्वस्त्र [वा यु वुस् त्रु]

शहायशी, शहांयशी [शु हाय् शी, शि हाय् शी, शु हांय् शी, शि हांय् शी]

मथितार्थ [मु थि तार् थु, मु ति तार् थु]

इकडे [इक् डे, इक् डु]

असे काही शब्द आहेत की ज्यात अहा लिहितात, पण [आ हु] उच्चार करतात; आह हें लेखन इतकें रूढ झालेलें नाही.

महाराज [मु हा राज्, मा हु राज्] (त्याचप्रमाणे महात्मा)

राहतो, रहातो [रा हु तो] (त्याचप्रमाणे राहणें, राहणार इत्यादि)

पाहटे, पहाटे [पा हु टे]

बहाद्दर [बु हाद् दुर्, बा हुद् दर्]

बहात्तर, बाहत्तर [बु हात् तर्, बा हुत् तर्] (त्याचप्रमाणे त्र्यहात्तर, त्र्याहत्तर; शहात्तर, शाहत्तर)

असे काही शब्द आहेत की ज्यांचे एकापेक्षा अधिक उच्चार आहेत तशींच रूढ लेखनेंही आहेत.

कोलांटी, गोलांटी [को लाण् टी, गो लाण् टी]

अपयश, अपेश [अ पु यश्, आ पु यश्, अ पेश्, अ पेश्]

ताकद, ताकत [ता कद्, ता कुत्]

निंब, लिंब [निम् बु, लिम् बु]

बोलाव, बोलव [बो लाव्, बो लुव्]

मध्ये, मधे [मुद् ध्ये, मु धे]

सुटी, सुट्टी [सु टी, सुट् टी]

नाहणी, नहाणी, न्हाणी [ना हु णी, न्हा णी]

स्वयंपाक, स्वैंपाक, सैंपाक [स्वु युम् पाक्, स्वयुम् पाक्, सुयुम् पाक्]

ह्याला, याला [ह्या ला, या ला]

आणि, अन [आ णी, आ णी, अन्] (छन् [छुन्न्] शब्दाप्रमाणे [अन्न्] असा उच्चार मात्र नव्हे)

करीन, करेन [कु रीन्, कु रेन्]

उठेन, उठीन [उ ठेन्, उ ठीन्] (उठीन हें लेखन इतकें प्रचलित मात्र नाही.)

सुरुवात, सुरवात [सु रु वात्, सुर् वात्]

अशा शब्दांपैकी शेवटी एं (आणि आता ए) येणाऱ्या शब्दांचें लेखन व उच्चार बहुचर्चित आहेत.

घोडें, घोडे, घोडं [घो डॢ, घो डे]

जिथें, जिथे, जिथं [जि थे, जि थॢ] (शिवाय जेथें, जेथे, जेथं)

घरें, घरे, घरं [घु र, घु रे] (त्याचप्रमाणे पत्रें, पत्रे, पत्रं)

अशा शब्दात घोडं, जिथं, घरं, पत्रं, इकडं ऐवजी घोड, जिथ, घर, पत्र, इकड लिहिण्याची प्रवृत्ति अलीकडे दिसते ती मात्र बरोबर नाही.

काही बोलभाषेतल्या उच्चारांना रूढ लेखनाची प्रतिष्ठा अजून तरी मिळालेली नाही.

बहिरा [बु हि रा, बु हि॒ रा, भय् रा]

शनिवार [शु नि वार्, शुन् वार्]

नारायण [ना रा युण्, ना रा इ॒ण्]

नाईक [ना ईक्, ना इ॒क्]

मालवणकर [माल् वुण् – कुर्, मा लु॒ण् कुर्]

पटवर्धन [पुट् वुर् धुन्, पु टु॒र् धुन्]

प्रश्न [प्रुश् नु॒, प्रुश् णु॒]

इथें, इथे, इथं [इथे, इथॢ, हि ते, हि त] (शिवाय येथें, येथे येथं)

मला [मु ला, मु॒ ला, मा॒ल्]

नाही [ना ही, ऩा ई]

काही [का ही, क़ा ई]

नये [नु ये, ऩा ई]

मग [मुग्, मु॒]

तर [तुर्, तु] (अव्यय, स्त्रीलिंगी नाम नव्हे)

आग्रह [आग् रु हु, आ॒ग् रु हु॒, आघ् रु, आ॒घ् रु]

आहे [आ हे, आ॒ हे, आ॒ ए, ए, य्] (त्याचप्रमाणे आहेत, आहेस)

आहोत [आ होत्, अ़ा होत्, अ़ा ओत्]

होता [हो ता, हु ता, व् ता] (त्याचप्रमाणे होतात, होतास, होतो, होते)

त्याने, त्यानं [त्या ने, त्या न, त्या नी] (त्याचप्रमाणे माणसाने वगैरे)

शेवटी एक सर्वसाधारण नियम म्हणून सांगायचा म्हणजे सर्वच ई, ऊ, आणि अ़ बोलण्याच्या ओघात (विशेषतः तो शब्द तीन वा अधिक अवयवांचा असेल तर किंवा त्या शब्दावर वाक्यात विशेष बल नसेल तर) ह्रस्व होऊ शकतात (उदाहरणार्थ मऊमऊ [मु ऊ – मु ऊ, मु उ मु ऊ], तीरकमठा [तीर् – कुम् ठा, तिर् कुम् ठा], भात अन पोळी [भात् – अ़न् – पो ळी, भात् – अुन् – पो ळी]).

मराठीची श्रवणप्रत्ययी वर्णमाला : मराठीची वर्णमाला म्हणून जी परंपरेने देतात ती वर्णांची यादी नसून वर्णचिह्नांची म्हणजे मातृकांची यादी आहे. (दीर्घ ॠ, दीर्घ ॡ, ङ्, क्ष्, ज्ञ् ह्यांना तोही आधार डळमळता आहे.) मराठीचें श्रवणप्रत्ययी लेखन करताना आपल्याला पुढील वर्ण मानावे लागले.

अ़ अ अ़ अ़ा आ इ इ ई उ उ ऊ ऋ ऌ

ए अॅ ऐ ओ ऑ औ ं क् ख् ग् घ् ङ् च् छ् ज् झ्

च़् ज़् झ़् ट् ठ् ड् ढ् ण् त् थ् द् ध् न्

प् फ् ब् भ् म् फ़् य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ्

चौकोनी कंसांत आपल्या शिरोबिंदूचा उपयोग केवळ स्वर, य्, आणि व् ह्यांचें नासिक्यरंजन (नाकातला उच्चार) दाखवण्यासाठी करावा लागला आणि विसर्गाचा उपयोग तर अजिबात करावा लागला नाही हें वाचकांच्या ध्यानात असेलच. (नियम ८ व ९ आणि त्यांची चर्चा पहावी.)

शास्त्रीय लाघवाचा विचार करायचा आणि व्यावहारिक सोयगैरसोय आणि अपरिचितपणा ह्यांची फिकीर करायची नाही असें ठरवलें तर ह्या यादीत आणखी काटछाट करता येईल. एक म्हणजे इ, उ ह्यांचा समावेश केल्यावर ऐ (अइ, आद्यस्थानी कधी आइ), औ (अउ, आद्यस्थानी कधी आउ), य्, व् ह्यांचा निराळा उल्लेख करण्याची जरुरी नाही. (उदाहरणार्थ [ना रा इण्] लिहिलें काय किंवा [ना रा य्ण्] लिहिलें काय, [मांव्स्] लिहिलें काय किंवा [मांउस्] लिहिलें काय, तोच अर्धस्वर ज्या स्थानी व्यंजनत्वाकडे अधिक झुकेल त्या ठिकाणी आपण य्, व् चिह्नें वापरण्याची सवलत घेतली आहे इतकेंच.) दुसरें म्हणजे ऋ आणि ऌ ह्या उच्चारांचें आपण पृथक्करण केलें म्हणजे आपल्याला इ आणि उ ह्यांचा मधला एक

स्वर मानावा लागेल. समजा त्यासाठी आपण [ॾ] हें चिह्न वापरलें तर वर्णमालेत [ॾ] चा समावेश करून ऋ [र्ॾ] आणि ऌ [ल्ॾ] वगळता येतील. तिसरें म्हणजे [च्] आणि [च़्], [ज्], आणि [ज़्], [झ्] आणि [झ़्] अशा जोड्या न मानता त्यांच्या जागी तीनच वर्ण मानता येतील आणि पुढील नियम दाखल करावे लागतील :

(क) पुढे (इ॒, इ, ई) हे तालव्य स्वर आले म्हणजे तालव्य उच्चार करावा. पुढच्या इ॒ चा सदैव लोप होतो. (चि॒आर्, चीड्, नीचि॒, उच् चि॒अ॒, सुवाच् चि॒अ॒] आणि [छि॒आन्, स्वच् छि॒अ॒] अशीं काहीशीं चमत्कारिक भासणारीं लेखनें आपल्याला शास्त्रीय लाघवापोटी पत्करावीं लागतील (परिचित लेखन : चार, चीड, नीच, उच्च, सुवाच्य आणि छान, स्वच्छ).

(ख) असा तालव्य उच्चार होणारें व्यंजन पुढे आलें म्हणजे सुद्धा तालव्य उच्चार करावा. (या नियमामुळे उच्च, सुवाच्य, स्वच्छ ह्या शब्दामधल्या व्यंजनाअगोदरच्या च ची सोय होते.)

(ग) इतरत्र दंतमूलीय उच्चार करावा. (हा स्थायी उच्चार.)

बिचकवणारें पुनर्लेखन आणि गुंतागुंतीचा भासणारा नियम टाळण्यासाठी आपण तीन अधिक वर्ण मानण्याची व्यावहारिक तडजोड केली इतकेंच. चौथें म्हणजे ज्या वर्णांचा उपयोग काही लोकच करतात (इतर लोक पर्याय वापरतात) ते बाजूला काढायचे झाले तर अंत्येतर अवयवामधले ई, ऊ (जीवात्मा, सुशीला, रूढी, स्वरूपात), ॾ, ॲ, ऑ, आणि फ़्, ष् हे वर्ण बाजूला काढावे लागतील.

मराठीची खरीखुरी श्रवणप्रत्ययी वर्णमाला मग अशी होईल :

अतिह्रस्व स्वर : अ॒

ह्रस्व स्वर : अ॒, आ॒, इ, ॾ, उ

दीर्घ स्वर : अ, आ, इ, ऊ, ए, ओ, ॲ, ऑ

अर्ध स्वर : इ॒, उ॒ (कधी लोप, कधी व्यंजनासारखा उच्चार, कधी अतिह्रस्व स्वर म्हणून उच्चार)

स्वरयोगी : (नासिक्यरंजन) ँ

व्यंजनें : तालुपटलीय : क् ख् ग् घ् ङ्

दंतमूलीय / तालव्य : च् छ् ज् झ्

प्रतिवेष्टित : ट् ठ् ड् ढ् ण् ष् ळ्

दंत्य : त् थ् द् ध् न् ल्

ओष्ठ्य : प् फ् ब् भ् म्
दंतौष्ठ्य : फ़्
तालव्य : श्
दंतमूलीय : स् र्
कंठीय : ह्

स्वरांचें स्थानांनुसार वर्गीकरण वर दिलेलें नाही. तें द्यायचें झालें तर पुढीलप्रमाणे देता येईल (प्रत्येक स्थानातील स्वर क्रमशः अधिकाधिक विवृत समजावे) :

ताळुपटलीय – कुंचितोष्ठ्य : उ̮ ऊ उ ओ ऑ

ताळुसीमीय – प्रसृतोष्ठ्य : इॅ अ̱ अ̮ आ̮ आ

तालव्य – प्रसृतोष्ठ्य : इ̮ ई इ ए अॅ

व्यंजनांचें प्रयत्नानुसार वर्गीकरण वर दिलेलें नाही. दयायचें झालें तर पुढीलप्रमाणे देता येईल :

स्पर्श : क् ग्, ट् ड, त् द्, प् ब्
महाप्राणस्फुट – स्पर्श : ख् घ्, ठ् ढ्, थ् ध्, फ् भ्
घर्षस्फुट – स्पर्श : च् ज्
महाप्राणस्फुट – घर्षस्फुट – स्पर्श : छ् झ्
नासिक्य – स्पर्श : ङ् ण् न् म्
घर्षक : ह् श् ष् स् फ़्
पार्श्विक : ळ् ल्
स्पंदित : र्

पुढील व्यंजनें अघोष (श्वासयुक्त) आहेत : क् ख् च् छ् ट् ठ् त् थ् प् फ् श् ष् स् फ़्. कंठीय घर्षक ह स्थानानुसार बदलतो. उरलेलीं सर्व व्यंजनें आणि सर्वच स्वर सघोष (नादयुक्त) आहेत.

स्वरांपैकी इॅ नित्य ह्रस्व आहे, ए ओ अॅ ऑ नित्य दीर्घ आहेत. उरलेल्या स्वरांचे अ̮ अ̫ अ̱, आ̮ आ, इ̫ इ ई, उ̫ उ ऊ असे गट पडतात. इॅ अॅ ऑ अ̮ आ̮ इ̫ उ̫ आ आणि अंत्येतर अवयवातले ई ऊ हे स्वर निरनिराळ्या कारणामुळे बाजूला पडतात. उरलेल्या स्वरांबद्दल पुढील नियम सांगता येतो.

अंत्य अवयव : दीर्घ : ई अ̱ ऊ, ए आ ओ
अंत्येतर अवयव : ह्रस्व : इ अ̱ उ
अर्धदीर्घ : ए आ ओ

मात्र अंत्य अवयवात स्वरानंतर एकापेक्षा अधिक व्यंजनें आलीं तर अंत्येतर अवयवाचा नियम लागतो (उदाहरणार्थ [सत्त्, चुस्त्, शान्त्, ओम्म्] ह्यांमधील स्वर ह्रस्व किंवा अर्धदीर्घ आहेत).

समारोप : प्रमाण–मराठीचें रूढ देवनागरी लेखन हें पूर्णतः उच्चारानुसारी आहे ह्या भ्रमात आता कुणी राहू नये हें बरें. च़, ज़, झ़ बद्दल काही तरतूद केली की पुरे अशाही भ्रमात कुणी राहू नये. आतापर्यंतच्या सर्व नियमावलीत बोलभाषेतले अंतः-संधि आणि बाह्यसंधि मुद्दामच बाजूला ठेवले आहे हेंही स्पष्ट करायला हवें. (उदाहरणार्थ पोचता [पोस् ता], जांभळा [जाम् ब्हा], नागपुर [नाक् पूर्], नाकदुऱ्या [नाग् दु ऱ्या], उपजत [उब् ज़त्], दूध सांड [दूत् साण्ड्]). एक तर ह्या सर्वांची कोशात दखल घेणें व्यवहार्य नाही; आणि त्याची तितकी आवश्यकताही नाही. जिथे अशी दखल घेणें आवश्यक वाटावें तिथे तशी दखल रूढ लेखनातून आधीच घेतली गेली आहे (उदाहरणार्थ मातीला [मा ती – ला] पण तिला [ति ला], घराच्या आतून [घ रा – चा – आ तून्, घ रा – चा – आु तून्] पण घरातून [घ रा – तून्], मातीतून [मा ती – तून्]). (अवयव किंवा अक्षरें तोडण्यासाठी कोरी जागा वापरल्यामुळे इथे उच्चारात शब्द तोडण्यासाठी संयोगीचिह्न वापरलें आहे. आणखी मोठे खंड तोडण्यासाठी अनुक्रमे एकेरी व दुहेरी दंड वापरता येतील. उदाहरणार्थ – थोडें ठेवलें होतें दूध तें सगळें सांडून गेलें. [थो ड – ठेव् ल – हु त – दूद् । ते – स् ऽ ग् ळ – साण् डून् – गे ल ॥]). ह्या ठिकाणी द्विखंडाचा उपयोग सगळें शब्दावर दिलेला हेल दाखवण्यासाठी केला आहे. (नियम ७ पहा.) वाक्यातली बलयोजना (जोर देणें) आणि सुरयोजना (आरोही – अवरोही सूर) दाखवायची झाली तर आणखी काही चिह्नें ह्या लेखनपद्धतीत समाविष्ट करावीं लागतील. सध्या ही पद्धती शब्दाच्या पातळीवर कानावर पडणाऱ्या उच्चारणभेदांचीच मुख्यतः दखल घेत आहे.

मराठीमधील विशेषनामांचें उच्चारण आणि लेखन

'केसरी'च्या रविवार दि. १९६९·१०·२६ च्या अंकात श्री. के. क्षीरसागर आपल्या 'सहजसंवाद' ह्या सदरात म्हणतात की जिला आपण आजवर 'कानडी' म्हणत आलो आहोत तिला तद्भाषिकांच्या अनुकरणाने 'कन्नड' म्हणायचें काही कारण नाही. रविवार दि. १९६९·१२·१४ च्या 'केसरी'त ह्यावर दि. के. बेडेकर ह्यांचें पत्र प्रसिद्ध झाले आहे. ते म्हणतात–परकीयांच्या भाषा आणि चालीरीती समजावून घ्यायला जी खरी सभ्यता क्षीरसागरांच्या मते लागते त्या सभ्यतेचाच 'कानडी'च्या ऐवजी 'कन्नड' म्हणणें हा भाग आहे. (परभाषिकाने 'तिलक', 'महेंडाले', 'पुणा'च्या ऐवजी 'टिळक', 'मेहेंदळे', 'पुणें' असें आवर्जून म्हटलें किंवा लिहिलें तर मराठी माणसाला बरें वाटेल ही ह्या नाण्याची दुसरी बाजू.) ह्या वादात ज्यांना बेडेकरांचें म्हणणें पटेल त्यांच्या उपयोगासाठी हें टिपण आहे. विशेषनामांच्या बरोबर तज्जन्य विशेषणांचाही विचार येथे केला आहे. तसेंच काही ठिकाणी विशिष्ट विशेषनाम कसें लिहायचें किंवा उच्चारायचें हा प्रश्न नसून उपलब्ध विशेषनामांपैकी कोणतें वापरायचें हा प्रश्न येतो, उदाहरणार्थ, सिलोन आणि श्रीलंका, वाराणसी आणि काशी, जर्मनी आणि डॉइचलांट, गोवा आणि गोमंतक, चांदा आणि चंद्रपूर. अशा प्रकारचीं उदाहरणें तारांकित केलीं आहेत.

ह्या सर्वच प्रश्नांच्या बाबतीत मराठीच्या दृष्टीने तपशिलवार शिस्त लावून देण्याचा प्रयत्न मेजर कँडी ह्यांनी केलेला दिसतो. त्यानंतर बराच काळ लोटला असल्यामुळे पुनर्विचार करण्याची गरज उत्पन्न झालेली आहे.

ह्या विषयात सर्वसाधारण धोरण म्हणून काही सूत्रें सुचवता येतील. हीं सूत्रें बसवताना परकीय विशेषनामांबरोबरच स्वकीय म्हणजे मराठी विशेषनामांचाही विचार करणें सोयीचें आणि अगत्याचें वाटलें. उदाहरणें देताना त्या त्या सूत्रानुसार ग्राह्य रूप प्रथम दिलें आहे, त्याज्य रूप नंतर दिलें आहे, क्षम्य रूप वेगळें असल्यास ह्या दोहोंच्या मध्ये दिलें आहे. (उदाहरणार्थ : शीव । शींव–सायन, लंडन–लंदन).

(१) महाराष्ट्र आणि संलग्न भूप्रदेश ह्यांमधील स्थलनामें आणि मराठी मनुष्यनामें प्रमाण-मराठीप्रमाणेच लिहावींत.

मुंबई–मुंबय, मुंबै, बॉम्बे, बंबई, शीव । शींव–सायन, पुणें–पुणा, पुना, पूना,

मडगाव–मर्गाओ, मुरगाव–मर्मगाओ, गोवें । गोवा–गोंय, पणजी–पंजिम, पँजिम, उत्तर कानडा. उत्तर कॅनरा, वणी–वून, कोट–*फोर्ट, शिवडी–सेवरी, आंबेजोगाई–*मोमीनाबाद, गुहागर–गोगर, व्हागर, सीताबर्डी–*बल्डी, वेरूळ–एल्लोरा, नाशीक । नासीक–नाशिक, नासिक, औरंगाबाद–*खडकी, वांदेंर । वांद्रे–बँड्रा, बांड्रा, बांदरा, विलेंपारलें । विलेपार्ले–विलापारला, नागपुर । नागपूर–नॅगपूर, नाक्पुर.

सरदेसाई–सरदेसाय, साने । सान्या–*साना, यशोदा–यश्वदा, यशवंत–*यशवंता, ए°, ये°, यस°, शरच्चंद्र–शरदचंद्र, शरत्चंद्र.

(१ क) काही अतिपरिचित आणि अधिकृत ठरलेलीं रूपें क्षम्य किंवा ग्राह्यही समजावीं लागतील. गोवा हें ह्या प्रकारचें उदाहरण वर दिलेंच आहे. इतर उदाहरणें :

सातारें, सातारा, लोणावळें, लोणावळा–लोनावली (भारतीय सर्वेक्षण विभागाच्या नकाशात Lonauli!), दत्तात्रेय । दत्तात्रय, नरसिंह, *नृसिंह, धाराशीव, *उस्मानाबाद.

सातारा हें रूप फार्सी लिपीतून मराठीत आल्याचें दिसते; रोमनमधून नव्हे.

(१ ख) काही ठिकाणी मराठी नावाचें संस्कृतीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यांच्याही बाबतीत (१ क) प्रमाणेच धोरण ठेवावें.

उंबरावती, *अमरावती, चांदा, *चंद्रपुर, एलिचपुर । *अचलपुर, शेवगाव, *सेवाग्राम, कुळकर्णी । कुलकरणी, मराठी भाषा । *महाराष्ट्र-भाषा, मुंबई । *मुंबापुरी–मुंबय, मुंबै, बॉम्बे, बंबई.

(२) प्राचीन आणि मध्यकालीन भारतीय-आर्य भाषांमधील नावांचें उच्चारण आणि लेखन संस्कृतप्रमाणेच ठेवावें.

अशोक–असोक, अशोका, कात्यायन (पालीचा व्याकरणकार)–कच्चायन, गौतमबुद्ध–गोतमबुद्ध, गुप्त–गुप्ता, पुरु–पोरस, माहाराष्ट्री (प्राकृत)–महाराष्ट्री (प्राकृत), प्राकृत–पाइअ.

(२ क) संस्कृत विशेषनामाच्या प्रातिपदिकाच्या अंती जर ऋ किंवा व्यंजन येत असेल तर प्रथमेच्या एकवचनाचें रूप घ्यावें. (ह्या संकेतामुळे ऋ–कारांत पुंलिंगी नामें आकारांत स्त्रीलिंगी समजलीं जातात!) एरवी प्रातिपदिकच वापरावें.

सविता–सवितृ, नचिकेत–नचिकेतस्, पुलकेशी–पुलकेशिन्, उलट : बुद्ध–बुद्धः.

(३) वरील दोन सूत्रांच्या कक्षेत न पडणारीं अन्य भारतीय विशेषनामें आणि पाकिस्तान, अफगाणिस्तान, मध्य एशिया, अरबस्तान, इराक, इराण, नेपाळ, सिक्किम, भूटान, श्रीलंका ह्या भारताला संलग्न भूभागांतील विशेषनामें शक्यतो त्या प्रादेशिक भाषेतील लेखनाला धरून लिहावींत आणि उच्चारावींत.

हरियाणा–हरियाना, हर्याना, अलीगढ–अलिगड, पटना–पाटणा, आगरा–आग्रा, शिमला–सिमला, शिवालिक–सिवालिक, लद्दाख–लडाख, खूबचंदाणी–खूबचंदानी,

धारवाड–धारवार, इंदौर–इंदूर, गुजरात–गुजराथ, मेरठ–मीरत, ढाका–डाका, कोझीकोडे–कालिकत, कॅलिकट, सेलम–सालेम, कोलम–क्विलॉन, खडगपूर–खरगपूर, भाकडा–भाकरा, रींवा–रेवा, ग्वालियर–ग्वाल्हेर, मुंगेर–मोंगीर, देहरादून–डेहराडून, मालवा–माळवा, मदुराई–मदुरा, मॅडयुरा, तंजावूर–तंजावर, टँजोर, तिरुच्चिराप्पल्लि–त्रिचनापल्ली, मैसूर–म्हैसूर, पुदुच्चेरि–पांडेचेरी, पाँदिशेरी चंडीगढ–चंदिगड, मुगलसराय–मोगलसराई, गांतोक–गंगटोक, गुवाहाटी–गौहत्ती, नागराजय्य–नागराजय्या, वेंकटरमण–व्यंकटरामन, वेंकटरामन्, तेलुगु–तेलगू, पटौदी–पतौडी, पटौडी, लखनऊ–लखनौ, केरळ–केरल, ठाकुर–टागोर, टॅगोर, बंगळूर–बंगलोर, बँगलोर, पटियाळा–पत्याळा, हिराकुद–हिराकुड, बदायूं, बदायूँ–बदाऊन, कुमाऊं–कुमाऊन, विशाखापटनम–विजगापट्टण, काकीनाडा–कोकोनाडा, बीदर–बेदर, मचिलिपटनम–मच्छलीपट्टण, सत्यजित् राय–सत्यजीत रे, नीरद चौधुरी–निराद चौधरी, चाटार्जी–चटर्जी, चॅटर्जी, चतर्जी, संताल–संथाल, संताळ, भोपाल–भोपाळ, इम्फाल–इंफळ, कन्नड–कानडी, कानडा–कॅनरा (कारवार–मंगळूर जिल्हे), भूटान–भूतान.

प्रादेशिक भाषेतील म्हटलें आहे, स्थानिक बोलीमधील रूप नव्हे; लेखनाला धरून म्हटलें आहे, उच्चाराला धरून नव्हे.

लखनऊ–नकलऊ, जयपूर–जैपूर, रमेशचंद्र–रोमेश चंदर, भुवनेश्वर–भुबॉनेस्सॉर, बलेश्वर–बॉलेस्सॉर, भटिंडा–पटिंडा, काठमांडू–काठमांडँव (खाटमांडू नक्कीच नव्हे), नक्षलबाडी–नॉक्खॉल्बाडी, असम–ऑहॉम (आसाम नक्कीच नव्हे), असमिया–ऑहोमिया (आसामी मात्र नव्हे) (भाषा).

गौरीशंकर आणि एव्हरेस्ट हीं वेगळीं शिखरें आहेत हें ह्या संदर्भात लक्षात ठेवावें.

प्रादेशिक लेखनाचें अनुसरण करताना रोमन लिप्यंतरणात शिरलेली समासाची पदें तोडून लिहिण्याची पद्धत त्याज्य समजावी.

राजेंद्रप्रसाद–राजेंद्र प्रसाद, आंध्रप्रदेश–आंध्र प्रदेश (मात्र संक्षेप आं. प्र. असा लिहायला हरकत नाही–म. सा. प. प्रमाणेच), बांगलादेश–बांगला देश.

बांगला भाषेच्या लेखनात य–ज, श–स इत्यादि फरक कायम रहात असले तरी ब–व हा फरक रहात नाही.

विपिनचंद्र । बिपिनचंद्र–बिपिन चंदर, प्रवाल । प्रबाल–प्रॉबाल.

(३ क) मात्र तमिळ नावांच्या लेखनात क, ह, ग हे उच्चारवत् लिहावे, केवळ लिप्यंतरण करू नये; तीच स्थिति च, स, ज; ट, ड; त, द; प, व, ब ह्यांची आणि ट्र, ण्ड्र (र्र, न्न नव्हे) ह्या जोडव्यंजनांची समजावी.

तमिळनाडु । तमिझनाडु–तमिझनाड्डु, मदरास । मद्रास–मतरास, मदुरै–मदुरा, मॅडयुरा, सेलम–सालेम, चेलम, तंजावूर–तंजावर, टँजोर, तंचावूर.

द्राविड नावाच्या रोमन लिप्यंतणात th, dh असतें हे t, d चा उच्चार ट्, ड्

नसून त्, द् आहे हें दाखवण्यापुरतें असतें. दुसरें म्हणजे तमिळ नावें संस्कृतोद्भव असतील तेव्हा हा नियम लागू करू नये. उदाहरणार्थ Anantha Murthy म्हणजे अनंतमूर्ति–अनंथमूर्थि, अनंदमूर्दि, अनंत मूर्ती नव्हे.

तेलुगु, कन्नड नावांच्या शेवटचा उ कधीकधी गाळला तर ग्राह्य समजावें.

रामरावु, रामराव; बंगळूरु, बंगळूर; मैसूरु, मैसूर–म्हैसूर.

ओडिया नावांच्या अंतीचा अ आपण अनुच्चारित ठेवतो.

कटक (तीन अवयव), रथ (दोन अवयव).

(३ ख) अरबी–फार्सी–तुर्की नावांच्या बाबतीत उर्दूचें हिंदी लिप्यंतरण ग्राह्य धरावें.

अहमदाबाद—अमदावाद, मुहम्मद पैगंबर—महमद पैगंबर, मिर्जापुर—मिर्झापूर, जाकिर हुसैन—झकीर हुसेन, बहावलपुर—भावलपूर, कहलील जिब्रान—खलील गिब्रान (हा सिरियन ख्रिस्ती अरब होता), ताजिकिस्तान—टॅडझिकिस्टॅन.

(३ ग) काही अतिपरिचित रूपें क्षम्य किंवा ग्राह्यही समजावीं लागतील.

ईरान । इराण, अफ़ग़ानिस्तान । अफगाणिस्तान, तमिळनाडु । तमिझनाडु, इलाहाबाद । अलाहाबाद, वडोदरा । बडोदें, बडोदा, तमिझ । तझिम–तामिल, तामिळ मात्र नव्हे, ओडिसा । ओरिसा–उडिसा, ओडिया–ओरिया, उरिया, ओडिसी (नृत्य) –ओरिसी, कलिकाता । कलकता–कल्कत्ता, कन्नड । कानडी, बाङ्ला, बांगला । बंगाली (भाषा), तिरुअनंतपुरम् । त्रिवेंद्रम (स्थानिक : तिरुवन्तपुरम्, ट्रिवांड्रम), ताता, टाटा, नेपाल, नेपाळ.

(३ घ) काही ठिकाणी संस्कृत किंवा 'संस्कृतीकृत' रूप मराठीत रूढ झालें आहे. काही ठिकाणी तें अधिकृत ठरलेलें आहे.

श्रीनगर । शिरीनगर, वाराणसी । बनारस, उज्जयिनी । उज्जैन, चटोपाध्याय, चाटार्जी । चाटुर्जे (चतर्जी मात्र नव्हे), वंद्योपाध्याय, बानार्जी (बॅनर्जी, बानर्जी मात्र नव्हे), मुखोपाध्याय, मुखर्जी (मुकर्जी मात्र नव्हे), वसू, बसू (बोस मात्र नव्हे), शोण । सोन, यमुना । जमना, दुर्ग । द्रुग, अमृतसर । अम्रीतसर, हृषिकेश । रिशिकेश (ऋषिकेश मात्र नव्हे), वंग, बांगाल, बांगला, (३ ग अन्वये) बंगाल, सुब्रह्मण्यम्, सुब्रामानियम्, व्रज । व्रज (बृज, बृज मात्र नव्हे).

ह्या ठिकाणी कंसाबाहेरील सर्व रूपें ग्राह्य धरावीं.

अनेक प्रदेशांतून वाहणाऱ्या आणि प्राचीन वाङ्मयापासून उल्लेखित अशा प्रमुख नद्यांच्या नावांच्या बाबतीत हें विशेषच खरें आहे. तीच गोष्ट हिमालयापलीकडच्या काही भूविशेषांबद्दलची.

नर्मदा । नर्बदा, ब्रह्मपुत्र । *ब्रह्मपुत्रा, शरयु–सरजू, मानस सरोवर । *मान सरोवर (हें तिबेटमध्ये आहे), कैलास पर्वत, राक्षस सरोवर । *रावण ह्रद.

(३ ङ) भारत व संलग्न देशात जीं इंग्लिश, फ्रेंच, पोर्तुगीज नावें आहेत (विशेषतः ज्यांना भारतीय पर्याय नाहीत) तीं इतर इंग्लिश, फ्रेंच, पोर्तुगीज नावांप्रमाणेच ठेवावींत.

एव्हरेस्ट शिखर, डेकन जिमखाना–डेक्कन जिमखाना, सँ तोमे, कॅसल रॉक.

(४) वरील तीन सूत्रांच्या कक्षेत न पडणाऱ्या पृथ्वीच्या भूभागांतील आणि जलाशयांतील स्थलनामें आणि मनुष्यनामें ह्यांचा परिचय आपण साधारणतः इंग्लिशच्या मार्फत घेत असल्याने तीं इंग्लिशच्या उच्चारणाला धरून लिहावींत व उच्चारावींत. इंग्लिशमध्ये पर्याय असतील तर तद्देशीय उच्चाराला जवळचा पर्याय निवडावा. तद्देशीय उच्चाराचें त्यातल्यात्यात लेखनाला धरून राहणारें अनुकरणही ग्राह्य समजावें. विशेषतः तद्देशीय साहित्याचें भाषांतर करताना, किंवा ज्ञानदायी स्वरूपाचें लेखन करताना ह्या दुसऱ्या पर्यायाला योग्य तें महत्त्वही द्यावें.

लंडन—लंदन, कीट्स्—कीटस्, कीट्स, कीटस, पॅरिस । पारि–पारीस, प्यारीस, बर्लीन । बेर्लीन, नासिर (३ ख अन्वये)। नासर—नासेर, कैरो । काहिरा—कैरो, ईजिप्ट । *मिस्र—इजित, मिसर, जर्मनी । डॉइचलांट–डॉइशलँड, जर्मणी, कोपनहेगन । क्योबनहाव्हन, म्यूनिक । म्युंछेन, म्यूलर । म्युलर—मुल्लर, रोम । रोमा, इटली । इतालिया, फ्रान्स । फ्राँस, सोव्हिएट । सोव्येत, गाना—घाना (तद्देशीय उच्चार देवनागरीत विशेष चिह्नांच्या मदतीशिवाय लिहिणें शक्य नाही, तो घाना असा मात्र खासच नाही), एशिया—आशिया, कॅनडा—कानडा (उत्तर अमेरिकेमधील देश), जकार्टा । जाकार्ता–याकार्ता, जोग्यकार्टा । जोग्यकार्ता—जोगजाकार्टा, एड्वर्ड—एडवर्ड, मॉलिएर । मॉल्येर—मोलियर, सरव्हँटीज, डॉन जूअन । दॉन हुआन, डॉन क्विक्सोट—डॉन क्विक्झोट (तद्देशीय दॉन किहोदा), स्टालिन । स्तालीन—स्तलीन, स्टॅलिन, चेखोफ़ । चेखोव्ह, ख्रुश्चोफ । खुश्चोव्ह (रशियनमध्ये, स्तलीन चेखॉफ़, ख्रुश्शॉफ़ असे नेमके उच्चार असले, तरी लेखनापासून ते दूर जात असल्यामुळे दुर्लक्षिले आहेत), हीब्रू—हिब्रू.

मात्र जीं इंग्लिश नावें स्थानिक नावांचीं भाषांतरें असतील किंवा निरनिराळ्या भाषिक प्रदेशांशी संलग्न भूविशेषांचीं नावें असतील त्यांची रूढ भाषांतरें चालू ठेवण्यास हरकत नाही. मात्र नवीं भाषांतरें करण्याच्या भरीस पडू नये.

पांढरा समुद्र, श्वेत समुद्र–व्हाइट सी, उत्तर समुद्र–नॉर्थ सी, आर्क्टिक महासागर–उत्तर महासागर, नोव्हाया झेम्ल्या–नवद्वीप, नवें बेट, सॉव्हिएट यूनियन । सोव्येत संघ. (लँड्ज् एंड, न्यूफाउंडलँड, युनायटेड स्टेट्स् हीं नावें तशींच राहतील; व्हाइट रशियाबद्दल ब्येलोरुसिया ठेवावें.)

(४ क) विशेषतः तद्देशीय त, द, ध बद्दल इंग्लिशमध्ये येणारीं ट, ड हीं टाळता आलीं तर पहावें.

सार्त्रे—सार्ट्र, द गोल—ड गोल (डी गॉल मात्र नव्हेच नव्हे), डॉस्टोएव्हस्की, दोस्तोयेफ़्स्कय, तॉल्स्तॉय । तोल्स्तोय— टॉलस्टॉय, तल्स्तॉय्

(४ ख) काही अतिपरिचित रूपें क्षम्य किंवा ग्राह्यही समजावीं लागतील.

बर्मा । ब्रह्मदेश, रँगून । रंगून, मँडले । मंडाले (तद्देशीय उच्चार सुमारे बमा, यांगौन, मांद्लेय), इंग्लिश । इंग्रज, इंग्रजी, यूरप । यूरोप – युरोप, पॉर्ट्युगीज, पोर्तुगीज.

मात्र ‘ ब्रह्मदेश ’प्रमाणे आणखी ‘ संस्कृतीकृत ’ नावें रूढ करण्याच्या भरीस पडू नये. ‘ कांचेनजुंगा ’ऐवजी ‘ कांचनगंगा ’ ह्या त्यातलाच प्रकार आणि म्हणून त्याज्य समजावा.

सुकार्नो– सोकार्नो, सुकर्ण, शिवकर्ण, प्रोजाधिपोक—प्रजादीपक, आयूथिया—अयोध्या, इरावादी—इरावती (तद्देशीय एइयावदी.)

‘ माक्स म्युलर ’ ऐवजी ‘ मोक्ष मुल्लर ’ चालू ठेवण्याचें कारण दिसत नाही.

तद्देशीय उच्चार जसेच्या तसे देण्यामध्ये अडचणी आहेत आणि त्या संबंधात तारतम्य बाळगावें लागेल हें तर खरेंच आहे. ह्यासाठीच तऱ्हेतऱ्हेची मुरड कशी घालावी हें दाखवणें हाच वरील सूत्रांच्या मागचा मुख्य हेतु आहे. एक अडचण म्हणजे तद्देशीय उच्चार पुष्कळदा मुदलात ठाऊकच नसतात ! ठाऊक असले तरी मराठीच्या उच्चारणपद्धतीपासून फारच दूर असू शकतात. देवनागरीत विशेष चिह्नांशिवाय तें लिहिणें दुरापास्त असू शकतें. ॲ आणि ऑ ह्या विशेष खुणा जशा छापखान्यात सरसकट उपलब्ध आहेत तशा इतर असतीलच असे नाही. फ़ ख़ सारख्या खुणाही नेहमी मिळतीलच असें नाही. दुसरें म्हणजे अशा खुणांबद्दल नवीन प्रघात पाडायचे असतील तर ते वाचकांना समजणार नाहीत किंवा त्यांच्या संबंधात एकवाक्यता नसल्यास वाचकाला गोंधळात टाकतील. खुणा टाळून काही प्रघात पाडता येतील—उदाहरणार्थ जर्मनमधील ü, ö आणि फ्रेंचमधील तसल्याच स्वरांबद्दल यु, यू, यो (म्युलर, सोस्यूर, ग्योटे), जर्मनमधील ch बद्दल ख्, छ् (बाख, म्युंछेन), फ्रेंच-मधील j बद्दल झ आणि अनुनासिक्याबद्दल साधा शिरोबिंदू (झां, झूल, रनेसांस—रनेसाँ नक्कीच नव्हे). शास्त्राद्रूढिर्बलीयसी ही अडचणही अगदीच दुर्लक्षणीय नाही. (वरचीं सूत्रें १ क, २क, ३ग, ४ख पहावींत.)

सर्वस्वी दुर्लक्षणीय अशी अडचण मात्र एक आहे—ती म्हणजे आळस आणि अनास्था. शीवला सायन म्हणण्याचें समर्थन करणें अवघडच आहे. (मुंबई महानगर-पालिका आणि रेलवे ह्यांनी ह्याबद्दल प्रशंसनीय जागरूकता दाखवली आहे. रेलवेने तर Poona बद्दल Pune करूनही टाकलें; पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र शासन, पुणें विद्यापीठ, आणि टपालखातें मात्र Poona च लिहितात. अनास्थेचें भारतातलें महाराष्ट्राबाहेरचें उदाहरण म्हणजे सागर ह्या नावाच्या रोमन लेखनाबद्दलची अवस्था

—नगरशासन, विद्यापीठ, टपालखातें, रेलवे, आणि भारतीय सर्वेक्षण विभाग ह्यांची एकवाक्यता अजून झालेली नाही ! भारतीय सर्वेक्षण विभागाच्या नकाशात अजून मोमीनाबाद, उस्मानाबाद, वून आहेत.) शालेय पुस्तकांपासून सुधारणेला सुरवात व्हावी.

ताजा कलम : टपालखात्याने आता **Pune** स्वीकारलें आहे. त्यामुळे विद्या-पीठाचा पत्ता **University of Poona, Pune** ठरतो.

मराठी देवनागरी वर्णक्रमी

मराठीमध्ये अकारविल्हे कशी करायची ह्या बाबतीत दुहेरी अराजक आहे. एक तर नियमांसंबंधी एकवाक्यता नाही—उदाहरणार्थ, कुणी अं हा औ नंतर घेतात, कुणी अ नंतर, कुणी आणखी कुठे. दुसरें म्हणजे अकारविल्हे किंवा वर्णक्रमी ह्या संबंधात काही नियम असतात ह्याचाच कुणाला पत्ता नसतो—उदाहरणार्थ, पटवर्धन, प्रकाश, पित्रे, पिता अशी विल्हेवाट लावणारे बहाद्दरही मिळतात !

देवनागरीची मराठीपुरती वर्णक्रमी काही सोप्या आणि सुसंगत पद्धतीने करता येते का हें पाहण्याचा ह्या टिपणामध्ये उद्देश आहे. पुस्तकाच्या शेवटी सूची जोडणें, मतदारांच्या, टेलिफोनधारकांच्या किंवा इतर यादया करणें, शब्दकोश आणि ज्ञानकोश ह्यांच्यामधल्या नोंदींचा क्रम ठरवणें अशा निरनिराळ्या कामांत ह्या वर्णक्रमीचा उपयोग आहे. जर सर्वांना मान्य अशी पद्धत ठरली तर शालेय अभ्यासक्रमात 'पुढील शब्द वर्णक्रमीनुसार लावून दाखवा' असा प्रश्नही विद्यार्थ्यांकडून सोडवून घेता येईल.

(१) वर्णक्रमी ठरवण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे वर्णमाला मानावी—

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ
ए ॲ ऐ ओ ऑ औ
ं ः
क् ख् ग् घ् ङ् च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण् त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ्
क्ष् ज्ञ्

दोन शब्दांमधली कोरी जागा (शब्दखंड) आणि संयोगीचिह्न (-) ही वर्णमालेच्या सुरवातीचीं, म्हणजे अ च्या आधीचीं दोन चिह्नें आहेत असें मानावें. औ आणि क् ह्यांच्या मधलीं चिह्नें शिरोबिंदु (डोक्यावरचें टिंब) आणि विसर्ग अशीं आहेत, अं आणि अः नाहीत हें ध्यानात ठेवावें.

वर्णक्रमी ह्या पद्धतीने रहावी. एवढा एकच नियम खरें म्हणजे पुरेसा आहे. काही

उदाहरणांनी तपशिलाचे मुद्दे स्पष्ट करता येतील.

(२) ग्राह्य क्रम	त्याज्य क्रम
अभ्यास	अभ्यास
अभ्यास व परीक्षा	अभ्यासक्रम
अभ्यास-मंडळ	अभ्यास-मंडळ
अभ्यासक्रम	अभ्यास व परीक्षा
अभ्यासू	अभ्यासू

युक्तिवाद : वर त्याज्य ठरवलेल्या क्रमात शब्दखंड आणि संयोगीचिह्नें ह्यांच्याकडे दुर्लक्ष केलें आहे. अशा पद्धतीत पद आणि त्याने आरंभ होणाऱ्या पदांच्या साखळ्या ह्यांमध्ये दुसरी पदें घुसण्याचा संभव असतो. 'विमा' आणि 'विमायोजना' ह्यांच्या-मध्ये 'विमान' घुसेल. 'विद्युत्' आणि 'विद्युत्-मंडळ' ह्यांच्यामध्ये 'विद्युतीकरण' शिरेल. असें होणें सोयीचें नाही. पहिल्या ग्राह्य क्रमात 'अभ्यास'मधल्या स नंतर शब्दखंड, स नंतर संयोगीचिह्न, आणि स नंतर अ पासूनचे वर्ण अशी व्यवस्था आहे. जेव्हा कवितांच्या पहिल्या चरणांची सूची बनवण्याची वेळ येते, तेव्हा ह्या व्यवस्थेचें महत्त्व अधिक लक्षात येतें.

(३) ग्राह्य	त्याज्य
असिधाराव्रत	असिधाराव्रत
अळणी	ॲसिड
एरंड	अळणी
ॲसिड	एरंड
कोरड	कॉफी
कॉफी	कोरड

युक्तिवाद : ॲ हें चिह्न ऍ (म्हणजे ए) ची शिरोमात्रा उलटी करून तयार केलेलें आहे, अ वर चंद्र टाकून केलेलें नाही. त्याचप्रमाणे ऑ हे ओ ची मात्रा उलटी करून बनलें आहे, आ पासून नाही. गुजरातीमध्येही कधी असे करतात : गोळ (गोल), गॊळ (गूळ). अखेर ॲ आणि ऑ ह्या अनुक्रमे ए आणि ओ ह्याच अधिक विवृत (जबडा अधिक वासून उच्चारलेल्या) आवृत्त्या आहेत. देवनागरीचा वर्णक्रम उच्चारानुसारी आहे, अरबी लिपीच्या वर्णक्रमाप्रमाणे रेखनानुसारी (ग म भ न प्रमाणे) नाही, अशा स्थितीत ॲ आणि ऑ हीं दोन नवीं वर्णचिह्नें उच्चारा-प्रमाणेच क्रमान्वित करावींत, रेखनाप्रमाणे क्रमान्वित करू नये हें स्वाभाविक व उचित दिसतें.

(४)

ग्राह्य	त्याज्य	त्याज्य
अ	अ	अ
अंडें	अकाल	अकाल
अकाल	औत	अंडें
औत	अंडें	औत
कमळ	कमळ	कमळ
निंब	निकाल	निकाल
निःपात	निःपात	निंब
निकाल	निंब	निःपात
सई	सई	सई
संत	संत	सतावर्णे
संप	सतावर्णे	समाप्त
सतावर्णे	संप	संत
समाप्त	समाप्त	संप

युक्तिवाद : जो न्याय अं, अः ला लावायचा तो इं, इः किंवा उं, उः इत्यादि जोड्यांना लावायला पाहिजे. लहान मुलांच्या वर्णमालेत औ नंतर ं ः असें न घालता अं अः असें घातलें जातें तें केवळ ं ः चीं उदाहरणें देऊन समजूत पटवावी म्हणून. अं अः हे अक् अख् च्या आधी का घालायचे, तर एक सोपा सुसूत्र नियम असतो म्हणून. संस्कृत, हिंदी कोश आणि हिंदी टेलिफोन डिरेक्टरी ह्यांतून हाच क्रम आहे. मराठीत शिरोबिंदु दुर्लक्षून वर्णक्रमी ठरवण्याची सवलत का घेतली गेली ? त्या वेळी 'विसांवा', 'लांकूड'सारख्या शब्दांमधून अनुच्चारित शिरोबिंदुचा संचार सर्वत्र असल्यामुळे कोश पाहणाराला खात्री नसे की, आपल्याला हव्या असलेल्या पदात शिरोबिंदु आहे की नाही. त्या वेळी कोशकार वाचकाला म्हणे, तुला तें माहीत नसलें तरी चालावें, अशा खुबीने मी क्रम रचला आहे. (मधला स्तंभ पहा.) आज अशा शिरोबिंदूंचें उच्चाटन झाल्यावर ही (आता) निरर्थक सवलत ठेवून इतर भारतीय भाषांपेक्षा वेगळी वर्णक्रमी ठेवण्याची गरज काय ? हिंदी व संस्कृत भाषांच्या कोशांत सामान्यतः इथे ग्राह्य मानलेला क्रमच वापरतात.

ह्या संबंधात आणखी एक पर्यायी क्रम कधी सुचवण्यात येतो, तो तिसऱ्या स्तंभात दाखवलेला आहे. त्यामध्ये अं, अः; इं, इः इत्यादी जोड्यांना एकच न्याय लावला आहे हें खरें. मात्र तो न्याय म्हणजे अ नंतर अं, अः; इ नंतर इं, इः ह्या पद्धतीने व्यवस्था लावायची. निराळ्या शब्दांत सांगायचे तर ं ः ह्या स्वरयोगी चिह्नांचा गट नेहमीप्रमाणे स्वर आणि व्यंजनें ह्यांच्यामध्ये न टाकता वर्णमालेच्या शेवटी टाकायचा. (स्वरयोगी चिह्नें म्हणजे नेहमी स्वरानंतर त्याला जोडून येतात अशी चिह्नें).

ही फिरवाफिरव करण्यापेक्षा ं ः परिचित जागीच ठेवणें बरें.

जेव्हा नासिक्य व्यंजनें जोडाक्षराच्या सुरवातीला किंवा मध्ये येतात (उदाहरणार्थ वाङ्मय, शार्ङ्गधर, अन्न, संन्यास, सम्राट) तेव्हा अर्थात् अशीं जोडाक्षरें इतर जोडाक्षरांप्रमाणेच गणलीं जातात. सर्व ं आणि ः ह्यांना एका मापाने न मोजता संत, संप यांसारखे शब्द जोडाक्षराचे समजावे (सन्त, सम्प) आणि संशय, संज्ञा, दुःख, निःपात यांसारखे शब्द मात्र स्वरयोगी–युक्त समजावे असें काहीजण सुचवतात. (उदाहरणार्थ, शेवटचे चार शब्द सतावणें, संत, समाप्त, संप असे ठेवावे असें त्यांचें म्हणणें.) वर्णक्रमीचे नियम क्लिष्ट करण्याखेरीज ह्यात काही लाभ दिसत नाही. शिवाय संक्षेप सारखे शब्द संकेत बरोबर घ्यायचे किंवा संज्ञा बरोबर घ्यायचे हा प्रश्न आहेच. वर्णक्रमी रचताना किंवा रचलेली वर्णक्रमी वाचताना लेखनाचें भान ठेवणें पुरेसें ठरावें. उच्चाराचें भान ठेवायचें, तर संव्शय, संव्ज्ञा, दुक्ख, निह्पात असे उच्चार ध्यानात घेऊन वर्णक्रमी ठरवणें का नको, हाही मग एक प्रश्न आहेच!

	ग्राह्य	त्याज्य
(५)	क्वचित्	क्वचित्
	जेवण	क्षमा
	हळद	जेवण
	क्षमा	ज्ञान
	ज्ञान	हळद

युक्तिवाद : जोडाक्षरें हीं त्यांच्या घटक व्यंजनांनुसार योग्य ठिकाणी घालायचीं हा सोपा नियम. वर्णमाला ळ् पाशी थांबते हेंही खरें. पण ज्या जोडाक्षरांच्या दर्शनी आकारावरून त्यांचीं घटक व्यंजनें चटकन ध्यानात येत नाहीत, त्यांपैकी काही वर्णमालेच्या शेवटी शिकाऊ मुलांच्या समजुतीसाठी घालण्याची पद्धत पडली. हिंदी-मध्ये क्ष, त्र, ज्ञ, तर मराठीत क्ष, ज्ञ ठेवतात. मात्र द्य (दय), क्त (क्त), श्र (श्र) हीं जोडाक्षरें ह्याच जातीचीं असूनसुद्धा त्यांना कुणीच स्वतंत्र गणत नाही. आता ह्या जोडाक्षरांची वर्णक्रमीत दखल घ्यावी का? क्ष ची फोड क्ष अशी करणें, किंबहुना असेंच लेखन करणें अवघड नाही. (रोमन लिपीत Dixit दिक्सीत लिहिणें समर्थनीय नाहीच!) परंतु ज्ञ च्या बाबतीत अडचण आहे. ज्ञ म्हणजे संस्कृतात ज् + ञ्, हिंदीत ग् + य् + ँ, गुजरातीत ग् + न्, मराठीत द् + न् + य् अशी विविधता आहे. (त्यामुळे रोमन लिप्यंतरातही अनिश्चितता आहे – jn, gy, gn, dny.) म्हणून तडजोड करावी लागते. क्ष्, ज्ञ् हीं अक्षरें परंपरेप्रमाणे ळ् नंतर ठेवावीं. शास्त्रीय ग्रंथांत मात्र वर्णमाला ळ् पाशीच थांबेल.

(६) ग्राह्य	त्याज्य
कलम	कलम
कहर	कळस
कळस	कहर

युक्तिवाद : काही लोक मात्र वर्णमालेच्या शेवटी ळ् हें व्यंजन ठेवायला तयार नाहीत. वैदिक संस्कृतात क्वचित ळ् दिसत असला तरी संस्कृत वर्णमालेत त्याला स्वतंत्र स्थान नाही. संस्कृतमध्ये ळ् आणि ळ्ह् हे अनुक्रमे ड् आणि ढ् चे पर्याय म्हणूनच वावरतात. मराठीत ळ् हा ल् नंतर घालावा असें सुचवण्यात आलेलें आहे. (गुजरातीमध्ये पारंपरिक क्रम ह् ळ् क्ष् ज्ञ् असाच आहे. ओडिया लिपीत य् र् ळ् ल् व् असा क्रम आहे. किंबहुना काही दशकांपूर्वी ओडिया लिपीत ळ् आणि ल् एकाच चिह्नाने दाखवीत असत.) मराठीत ळ् हा सध्याच्या रूढीनुसार ह् नंतर घालावा हें बरें. ल् नंतर ळ् घालण्यात काही खास शास्त्रीयता साधते असाही भाग नाही. उच्चारणस्थानें पाहिलीं तर ळ् हा र् ला जवळचा; अंतस्स्थवर्ण असण्याचा गुण पाहिला तर य् र् ल् व् ह्या गटात ळ् चा समावेश होऊ शकत नाही.

समारोप : प्रस्तुत टिपणात सुचवलेल्या वर्णक्रमीच्या बाजूने सामान्य पातळीवर सांगता येतील अशा दोन गोष्टी म्हणजे ती एकाच सुटसुटीत नियमात बसते; 'मात्र', 'जर–तर', 'किंवा' ह्यांचें जंजाळ तिच्यात नाही, आणि दुसरें म्हणजे अन्य भारतीय भाषांतील वर्णक्रमीशी तिने जास्तीत जास्त मेळ राखला आहे. अखेर मराठी माणसाला हिंदी टेलिफोन डिरेक्टरी बघावी लागणार.

प्रा. रा. श्री. जोग ह्यांनी काही वर्षांपूर्वी वर्णक्रमी ह्या साध्या सोयीच्या तरतुदी-विषयी किती अराजक आहे हें सोदाहरण दाखवून काही व्यवस्थाही सुचवली होती. ('मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी', महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, जुलै–सप्टेंबर १९५७.) अलीकडे म्हणजे 'मराठी–तत्त्वज्ञान–महाकोश' (१९७६) ह्या ग्रंथाच्या प्रास्ताविकात ह्या प्रश्नाचा नव्याने विचार केला आहे. अजून तरी मंडळी जागीं होतील, आणि काही शिस्त आणि एकवाक्यता येईल अशी उमेद बाळगावी काय ? (वर्णक्रमी म्हणजे वर्णानुक्रमाने रचना करण्याची युक्ति भारतीयांनी पाश्चात्त्यां-कडूनच घेतली असावी असा माझा कयास आहे.)

लेखकाच्या भाषाविषयक लेखनाची सूची

या सूचीमध्ये **वैखरी** ह्या पुस्तकात समाविष्ट केलेले सर्व लेख आलेले आहेत आणि ते * अशा खुणेने दाखवले आहेत. समावेश करताना त्यांच्यावर पुढील संस्कार केलेले आहेत : लेख आता सुटा लेख नसून इतर लेखांशी जोडून घेतलेला आहे, साहजिकच केवळ प्रासंगिक स्वरूपाचे उल्लेख वगळले आहेत आणि सहज टाळण्याजोगी पुनरुक्ति टाळली आहे, पारिभाषिक संज्ञांमध्ये काहीशी एकरूपता आणली आहे, लेखाच्या मूळ चौकटीत बसणारे बदल आणि भर घातली आहे. जिथे हें बसण्यासारखें नव्हतें तेथे तो मजकूर ' ताजा कलम ' या स्वरूपात लेखाच्या शेवटी टाकला आहे, आणि लेखन-पद्धतीमध्ये मला अभिप्रेत असलेली एकरूपता आणली आहे. साहित्यभाषाविषयक लेखनाचा समावेश या सूचीत केला आहे. मात्र अशा काही लेखांचा समावेश लेखकाच्या **रुजवात** ह्या आगामी पुस्तकात व्हायचा आहे.

वैखरीमध्ये समाविष्ट लेखांच्या पूर्वरूपांचे प्रकाशक, संपादक, संबंधित चर्चासत्रांचे निमंत्रक, आणि भाषण ऐकणारे किंवा हस्तलिखित वाचणारे चर्चिक ह्या सर्वांचे या ठिकाणी एकत्र आभार मानतो.

ह्या सूचीमधील नोंदी सामान्यतः कालानुक्रमे दिल्या आहेत. पूर्णविरामानंतर आलेले आकडे पृष्ठांचे आहेत किंवा तारखांचे आहेत.

१९५६ परीक्षण : ना. गो. कालेलकर, ध्वनिविचार, पुणें १९५५. नवभारत, एप्रिल १९५६, पृ. ६०–४.

१९५७ " Marathi English " : A Study in foreign accent. Word, 13. 268–82, August 1957; Notes, 14. 435–6, 1958.

१९५८ The Phonology and morphology of Marathi. Ph. D. diss., Cornell University, 1958. Microfilm : Uuiversity Microfilms, Ann Arbor, Michigan, USA, 1959.

१९५९ The Category of case in Marathi : A Study in method. Indian linguistics, 20. 131–9, 1959.

१९६२ Marathi kinship terms : A Lexicographical study. Transactions of the Linguistic Circle of Delhi, 1959–60, pp. 1–22,

published 1962.

१९६३ परीक्षण : ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृति, मुंबई १९६२. केसरी, १९६३.०२.१२, पृ. २.

१९६४ परीक्षण : द. ह. अग्निहोत्री, मराठी वर्णोच्चार विकास, नागपुर १९६३; वि. बा. प्रभु-देसाई, सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली, मुंबई १९६३. केसरी, १९६४.०२.१७, पृ. ४.

१९६४ Kashmiri word phonology : A First sketch. Anthropological linguistics, Jan. 1964, pp. 13–22. With Pran Nath Trisal.

१९६४ Marathi baby talk. Word, 20. 40-54, April 1964.

१९६४ Review : Ruth Hirsch Weir, Language in the crib, The Hague 1962. Word, 20.98–101, April 1964.

१९६४ Rewrite formulas in glossing. Indian linguistics 24. 25–30, 1963, published 1964.

* १९६५ मराठी व्याकरणाची नवी दिशा. सत्यकथा, जाने. १९६५, पृ. १९–३१. भाषण : राजवाडे १०१ वा जन्मदिन, भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें, १९६४.०७.१५. डॉ. ना. गो. कालेलकर, डॉ. अ. मा. घाटगे, डॉ. म. अ. मेहेंदळे, डॉ. मु. ग. पानसे, डॉ. म. ल. आपटे यांनी उपयुक्त सूचना केल्या.

१९६५ A Reexamination of some of the fundamental properties of language, Indian linguistics, 25. 83–92, 1964, published 1965.

१९६५ परीक्षण : ना. गो. कालेलकर, भाषा : इतिहास आणि भूगोल, मुंबई १९६४. साधना, १९६५.०३.२०, पृ. ८.

१९६५ Participant placement in Algonquian and Georgian. International journal of American linguistics, 31.195–205, July 1965.

१९६६ [समालोचन] १९६४ मधील भाषाविषयक लेखन. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १५५. ८६–८, १९६५, प्रकाशन १९६६.

१९६६ परीक्षण : य. ब. पटवर्धन, शब्दकौमुदी, पुणें १९६५. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १५६.७०–१, १९६६.

१९६६ परीक्षण : A. M. Ghatage, Konkanī of South Kanara, Bombay 1963. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १५६.७१–२, १९६६.

१९६६ A Note on Standard Chinese numerals. Indian linguistics, 26.196–202, 1965, published 1966.

१९६६ Phonemic and morphemic frequency count in Oriya. Pune : Deccan College, 1966. Typescript.

१९६७ मराठी महाकोशाची योजना. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका अंक १६०.३–४, १९६७.

१९६७ परीक्षण : भाऊ मांडवकर, कोलाम, अमरावती १९६६. महाराष्ट्र–साहित्य पत्रिका अंक १६०, ४६–८, १९६७.

* १९६७ भाषेचे नियमन. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका अंक १६१.४१–५४, १९६७. प्रसंग : वि. भि. कोलते, ४७ व्या मराठी–साहित्य–संमेलनाचे अध्यक्ष, यांच्या भाषणामधलें (भोपाळ, मे १९६७) भाषाविषयक प्रतिपादन.

१९६८ Boro kinship terms. In : Bh. Krishnamurti (ed.), Studies in Indian linguistics [dedicated to M. B. Emeneau]. Pune : CASL, Deccan College, 1968. Pp. 166–73.

१९६८ Hints on the pronunciation of English... In : Learning through English, 2nd ed. Pune : University of Poona, 1968. Pp. 245–56.

१९६८ परीक्षण : A. M. Ghatage, Kunabī of Mahāḍ; Cochin, Bombay, 1966 & 1967 respectively. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १६४. ७४–५, १९६८.

१९६८ Studies in Hindi–Urdu I : Introduction and word phonology. Pune : Deccan College for CASL, 1968.

१९६८–७१. [टिपणें] शब्दवेध. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १६६.५८–६०, १९६८; अंक १६७.४४–६, १९६८, प्रकाशन १९६९; अंक १६८.७३–४, १९६९; अंक १७३.५६–६०, १९७०; अंक १७५.१६–८, १९७०, प्रकाशन १९७१; अंक १७६–७.१२३–७, १९७१; अंक १७८.५४–८, १९७१; अंक १७९, १९७१.

१९६८ Review : N. B. Kavadi; F. C. Southworth, Spoken Marathi, Book I, Philadelphia 1964. Bulletin of the Deccan College Research Institute 26:3–4. 44–6, 1965–6, published 1968.

१९६९ Review [anonymous] : Y. R. Chao, Language and symbolic systems, London 1968. The Progress of education, 43.230, 1969.

१९६९ Review [anonymous] : W. A. Bennet, Aspects of language and language teachlng, London 1968. The Progress of education, 43.230–1, 1969.

१९६९ Language : linguistics : the applications. In : Language and society in India. Simla : Indian Institute of Advanced Study, 1969. Pp. 76–88. Excerpted : Language Sciences, no. 4.11–3, Feb. 1969.

१९६९ Problems of unrecognized speech forms in India. In : Language and society in India. Simla : Indian Institute of Advanced Study, 1969. Pp. 299–303.

१९६९ Telegraph code for Marathi. In : Language and society in India. Simla : Indian Institute of Advanced Study, 1969. Pp. 520–4.

१९६९ The Scope of a linguistic survey. Pakha Sanjam 1:1.5–11, March 1969. Reprinted in : Sirarpi Ohannessian and others (ed.), Language surveys in developing nations. Washington, D. C. : Center for Applied Linguistics, 1972. Pp. 7–12.

१९६९ Language teaching : A Perspective. In : Conference on the Methodology of Teaching Indian Languages as Second Languages in Secondary Schools : Proceedings. New Delhi : Ministry of Education, Government of India, 1969. Pp. 71–91.

१९६९ The Teaching of Modern Indian languages in India. In : Conference on the Methodology of Teaching Indian Languages as Second Languages in Secondary Schools : Proceedings. New Delhi : Ministry of Education, Government of India, 1969. Pp. 91–103.

१९६९ General linguistics in South Asia. In : Thomas A. Sebeok (ed.). Current trends in linguistics, Vol. 5 Linguistics in South Asia. The Hague : Mouton, 1969. Pp. 532–42.

१९६९–८० काही नोंदी (कन्नड अनुवाद : हे. श्री. त्रिळिगिरि). कन्नड विश्वकोश. मैसूर : मैसूर विश्वविद्यालय. खंड १, १९६९; खंड ११, १९८०.

१९७० भाषा आणि साहित्य. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका अंक १७१–२. १८–२८ १९६९–७०, प्रकाशन १९७०. इंग्लिश भावानुवाद : Some notes on language and literature, Indian linguistics, 31.69–79, 1970. Revised : Language and literature. In : Kripa Shanker Singh (ed.). Readings in Hindi–Urdu linguistics, New Delhi : National, 1978. Pp. 259–76.

हिंदी भावानुवाद : अन्नपूर्णा स्वामी, भाषा और साहित्य, आलोचना (हिन्दी), अंक ५६-९-२१, १९७१, प्रकाशन १९७२. संशोधित : सुरेश कुमार; रवींद्रनाथ श्रीवास्तव (सं.). शैली और शैलीविज्ञान. आगरा : केंद्रीय हिंदी संस्थान, १९७६. पृ. १-१५. मराठी उतारा : गो. म. कुलकर्णी. रसग्रहण, २ री आवृत्ति, पुणें : कॉंटिनेंटल, १९७३. सुधारून वाढवलेलें रूप : वसंत स. जोशी (सं.). भाषा व साहित्य संशोधन. पुणें : महाराष्ट्र-साहित्य-परिषद्, १९८१.

१९७० परीक्षण : अनुराधा पोतदार, मराठीचा अर्थविचार, पुणें १९६९. समाज-प्रबोधन-पत्रिका, अंक ३५.८९-९२, १९७०.

१९७० Review : D. Crystal; D. Davy, Investigating English style, London 1969. Indian linguistics, 31.126–8, 1970.

* १९७० भाषा आणि शिक्षण. समाज-प्रबोधन-पत्रिका, अंक ३६. १७-२०, १९७०. भाषण : आकाशवाणी, पुणें १९७०.०७.२१. इंग्लिश भावानुवाद : Language and education. Vishveshvaranda Indological journal, 13.127–35, 1975.

१९७० Review : A. M. Ghatage, Some aspects of applied linguistics, Kolhapur 1970. Indian linguistics, 31.197–९, 1970.

१९७० Review : Anwar S. Dil (ed.). Shahidulla presentation volume, Lahore, 1966. Indian linguistics, 31.198–9, 1970.

१९७०-१. The Anatomy of a dictionary entry, With samples proposed for a Marathi–English dictionary. Indian linguistics, 29.142–9, 1968, published 1970; 30.50–64, 1969, published 1971. Reprinted : B. G. Misra (ed.). Lexicography in India : Proceedings.... Mysore 1970. Mysore : Central Institute of Indian Languages, 1980. Pp. 199–227.

१९७१ इंग्रजी विषयाचे विद्यापीठीय अभ्यासक्रमात स्थान : [लेख] ५. समाज-प्रबोधन-पत्रिका, अंक ३७.३८-४०, १९७०.

१९७१ परीक्षण : मो. के. दामले, शास्त्रीय मराठी व्याकरण, संपादक कृ. श्री. अर्जुनवाडकर, पुणें १९७०. समाज-प्रबोधन-पत्रिका, अंक ३८.९०-२, १९७१.

१९७१ Review : मो. के. दामले, शास्त्रीय मराठी व्याकरण, संपादक कृ. श्री. अर्जुनवाडकर, पुणें १९७०. Indian linguistics, 32.78, 1971.

१९७१ 'असं कसं' हें असें कसें ? महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, अंक १७५.२२-४, १९७०, प्रकाशन १९७१.

* १९७१ [शब्दवेध :] मराठीमध्ये विशेषनामांचे उच्चारण आणि लेखन.

महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १७६–७.१२३–७, १९७१. संस्करण : मराठीमधील विशेषनामांचें उच्चारण आणि लेखन. वैखरीमध्ये समाविष्ट.

१९७१ श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा भाषाविचार. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक १७८.५९–६२, १९७१.

* १९७२ आदिवासींच्या प्रश्नाची भाषिक बाजू. समाज–प्रबोधन–पत्रिका, अंक ४५.२०–५, १९७२. इंग्लिश भावानुवाद : Language study in the integration of tribal populations in India. Vivekanand Kendra patrika, 1:2.113–6, August 1972. मराठी पुनर्मुद्रण : भारतीय शिक्षण, मे–जून १९६९, पृ. १५३–८.

१९७२ न. चिं. केळकर आणि मराठी भाषा. समावेश : केळकर. पुणें : केसरी प्रकाशन, १९७२. पृ. १९२–२०२. परिसंवाद १९७२.

१९७२ Technical terminology : Problems and principles. Symposium on language planning, 3rd All–India Conference of Linguists, Hyderabad, 1972. Duplicated.

१९७३ The Scope of a historical dictionary. In : A. M. Ghatage and others (ed.). Studies in historical Sanskrit lexicography. Pune : CASL at Deccan College, 1973. Pp. 57–69.

१९७३ परीक्षण [अनामिक] : श्री. न. गजेंद्रगडकर, भाषा व भाषाशास्त्र (वर्णनात्मक), पुणें १९७२. आलोचना, जुलै १९७३, पृ. ३७–४०.

१९७३ परीक्षण [अनामिक] : शं. गो. तुळपुळे (सं.), मराठी भाषेचा तंजावरी कोश, १९७३. रविवार सकाळ, १९७३.१२.१६, पृ. ५.

१९७३ हिंदी अनुवाद : ठाकुरदास, आहिंदी भारतीयों के लिये हिन्दी उच्चारण-शिक्षण. भाषा, हिंदी भाषाविज्ञान अंक, पृ. ४०२–१३, १९७३. मूळ : The Teaching of Hindi pronunciation to non–Hindi–speaking Indians. In : रामकृष्ण भारती (सं.). विवरणिका (१९६७–१९७४). मुंबई : पश्चिम विभागीय कार्यालय, हिंदी अध्यापन योजना, गृहमंत्रालय, भारत सरकार, १९७५. चक्रमुद्रित. भाग २, पृ. ५६–६७.

१९७४ Relative clauses in Marathi : A Plea for a less constric ted view. Indian linguistics, 34.274–300, 1973, published 1974.

१९७४ Will, will, and must : A Study in family relationships. Indian philosophical quarterly, N. S. 1. 183–216, 1974.

* १९७४ लिपी. नवनीत : मराठी डायजेस्ट, जुलै १९७४, पृ. २२–८. भाषण : आकाशवाणी, पुणें, १९७४.०५.०४. संस्कारित : लिपि आणि लेखनव्यवस्था. वैखरी-

मध्ये समाविष्ट.

१९७४ Sound quality in human spceech : A Conceptual framework. Indian linguistics, 35.222–6, 1974.

१९७५ Review : Osmania papers in linguistics, Vol. 1, Hyderabad 1975. Indian linguistics, 36.81, 1975.

१९७६ "फॉर्म" संज्ञा आणि तिचे विविध अर्थ. संदर्भ, जाने.–फेब्रु. १९७६. संस्कारित इंग्लिश भावानुवाद : A Note on the meanings of 'form'. Indian philosophical quarterly, N. S. 3.325–33, 1976.

१९७६ [Obituary] P. B. Pandit. Indian linguistics 37.77–81.

* १९७६ Modern linguistics : A Historical perspective from a South Asian viewpoint. In : Seminar papers in linguistics. Kathmandu, Nepal : Institute of Nepal and Asian Studies, Tribhuvan University, 1976. Pp. 21–34. छेदक १ वगळून संस्कारित मराठी भावानुवाद : आधुनिक भाषाविज्ञानाची परंपरा. वैखरीमध्ये समाविष्ट.

१९७६– काही नोंदी. लक्ष्मणशास्त्री जोशी (सं.). मराठी विश्वकोश. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति–मंडळ. खंड १, खंड २, खंड ३, खंड ५, १९७६. खंड ७, १९७७. (आगामी खंडांत आणखी काही नोंदी.)

१९७७ [मृत्युलेख] सुनीतिकुमार चटर्जी : एक प्रसन्न बिद्वान. उत्तम कथा, जुलै १९७०, पृ. २४–५.

* १९७७ मराठी देवनागरी वर्णक्रमी : एक टिपण. महाराष्ट्र–साहित्य–पत्रिका, अंक २०२.६०–४, १९७७.

१९७७ मराठी भाषेचा आर्थिक संसार. डॉ. ना. गो. नांदापुरकर स्मारक व्याख्यानमाला १९७६. औरंगाबाद : मराठवाडा–साहित्य–परिषद्, १९७७. उतारे : राजस, फेब्रुअरी १९८०, पृ. ४५–७. प्रकरण ३ चा इंग्लिश भावानुवाद : Language pollution. South Asia digest of regional writing no. 4.1–23, 1975, published 1978. (Heidelberg : Sud Asien Institut, University.)

* १९७८ मराठीचें श्रवणप्रत्ययी लेखन. मराठी–संशोधन–पत्रिका, २५:२.३१–४६, १९७८. पुनर्मुद्रण : सु. आ. गावस्कर (सं.). मराठी संशोधन ११. मुंबई : मराठी संशोधन मंडळ, १९७८. पृ. ३१–४६.

१९७८ Tense and aspect in French. Indian linguistics, 39. 104–35, 1978.

१९७८ Correlative linguistics. In : William C. McCormack; Stephen A. Wurm (ed.). Approaches to language : Anthropological issues. World anthropology (series). The Hague : Mouton, 1978. Pp. 151–88.

१९७९ Review : L. Matejka; Irwin R. Titunik (ed.). Semiotics of art, Cambridge, Mass. 1977; Umberto Eco, A Theory of semiotics, Bloomington, Ind. 1976. The Indian journal of English studies, 18.151–4, 1978–9, published 1979.

* १९७९ Language planning. Lokrajya, 1979.10.01, pp. 7–10. मराठी छायानुवाद : भाषेचे नियोजन. लोकराज्य, १९७९·१०·०१, पृ. १५–२०.

* १९७९ परिभाषा घडवण्याचीं मार्गदर्शक तत्त्वें. मराठी परिभाषा चर्चासत्र, मॉडर्न महाविद्यालय, पुणें, १९७९. चक्रमुद्रित. संस्कारित : परिभाषेची परिभाषा. वैखरीमध्ये समाविष्ट.

१९८० Review : D. D. Mahulkar, Pathways in linguistics, Vadodara, 1979. Bulletin of the Deccan College Research Institute 39.181–2, 1976–80, published 1980.

१९८० मुलाखतकार : प्र. ना. परांजपे. डॉ. अशोक रा. केळकर. ललित, मे १९८०, पृ. २०–५, २८–९. 'आजचे समीक्षक' माला.

* १९८० राजभाषा वर्षाचे एक फलित. महाराष्ट्र टाइम्स, १९८०·०५·१८, पुरवणी पृ. १, ८. संस्कारित : राजभाषा वर्षाचें एक फलित. वैखरीमध्ये समाविष्ट.

* १९८० राजभाषा मराठीचा वाद. पंचधारा, २२:४.१९–३१, १९८०. भाषण : ५४ वें मराठी साहित्यसंमेलन, बार्शी १९८०, राजभाषा कशी असावी, कशी नसावी, अध्यक्षीय.

१९८० आदिवासींच्या बोलींची सामाजिक दखल. समावेश : नंदा देशपांडे (सं.). वारली शब्दकोश. पुणें : महाराष्ट्र राज्य शिक्षणशास्त्र-संस्था, १९८०. पृ. सहा ते दहा.

१९८० Marathi as a state language : A Case study in language planning. New Quest, no. 23. 265–77, Sept–Oct. 1980.

१९८० Dictionaries of modern Indian languages : Assessment and recommendations. In : Misra, B. G. (ed.). Lexicography in India. Mysore : Central Institute of Indian Languages, 1980. Pp. 228–34.

१९८० Prolegomena to an understanding of semiosis and culture. Mysore : Central Institute of Indian Languages, 1980.

* १९८१ भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा. समावेश : वसंत स. जोशी (सं.). भाषा व साहित्य संशोधन. पुणें : महाराष्ट्र–साहित्य–परिषद्, १९८१. लेखन १९७८.

* १९८१ भारताचे भाषिक प्रश्न. वैखरीमध्ये समाविष्ट.

* १९८१ इंग्लिश व मराठी भाषांचें शिक्षणात स्थान. वैखरीमध्ये समाविष्ट. डॉ. वा. ना. दांडेकर, डॉ. राम ताकवले, श्री. वसंत पळशीकर यांनी उपयुक्त सूचना केल्या.

१९८१ अभ्यागत संपादकाचें मनोगत. समावेश : विशेषांक–व्यावहारिक मराठी : गरज, मागणी, पूर्ति. नवभारत, ऑगस्ट–सप्टेंबर १९८१. अभ्यागत संपादक : अशोक रा. केळकर, अभ्यागत कार्यकारी संपादक : विजया चिटणीस–माडगूळकर, कल्याण काळे. पश्चिम विभागीय भाषा केंद्र (भारतीय भाषा संस्थान), डेकन कॉलेज, पुणें येथे ५–७ फेब्रुवारी १९८१ ला झालेलें चर्चासत्र : सूत्रपाताचें भाषण, निबंध, चर्चेचें सार, व काही टिपणें यांचा समावेश या विशेषांकात केलेला आहे.

* १९८१ संस्कृत भाषेचा अभ्यास, अध्ययन, आणि व्यासंग. वैखरीमध्ये समाविष्ट.

* १९८२ मराठी भाषेचें भवितव्य. अभिरुची, २३:६.७–१४, नोव्हेंबर–डिसेंबर १९८१, प्रकाशन मार्च १९८२. वैखरीमध्ये समाविष्ट. (स्वतंत्र) मराठी–साहित्य–संमेलन, मुंबई, १९–२० डिसेंबर १९८१, चर्चासत्र ३ मराठी भाषेचें भवितव्य–ह्यामध्ये दिलेल्या भाषणावरून बऱ्याच विस्ताराने मागाहून लिहिलेला लेख.

१९८२ What English can (and cannot) do for our young. The Literary criterion, 17:1.46–55, January 1982, published May 1982. Seminar on the Rôle of English as a Complementary Language, Indian Association of Commonwealth Literature and Language Studies, at Mysore, November 1981. Written up subsequently.

१९८२ लोकशिक्षण आणि मराठी. शिक्षण आणि समाज, ५ : ३–४.१६०–७१, १७६, एप्रिल–जून, जुलै–सप्टेंबर १९८२. आचार्य स. ज. भागवत स्मृतिदिन चर्चासत्र, इंडियन इन्स्टिट्यूट ऑव्ह एडयुकेशन, पुणें, १९८२.०३.२०–२१, यामध्ये वाचलेला निबंध.

आगामी : काही नोंदी. मराठी वाङ्मयकोश. मुंबई : मराठी संशोधन मंडळ.

आगामी : Kashmiri : A Grammatical sketch. In : Studies in Kashmiri. Patiala : Northem Regional Language Centre.

आगामी : To translate or not to translate? भाषांतरकलेसंबंधी सोदा-

हरण चर्चा करणारा लेख.

आगामी : रुजवात : समीक्षेकडून मीमांसेकडे. साहित्य, कला, साहित्याची भाषा ह्या विषयांवरील लेखांचा संग्रह.

आगामी : मराठीमधील वाक्याची जडणघडण. पुस्तक.

आगामी : आस्वादाकडून समीक्षेकडे. पुस्तक.

आगामी : मराठीची लेखनव्यवस्था : तत्त्व आणि तपशील. पुस्तक. ('वैखरी'-मधली लेखनव्यवस्था ह्या पुस्तकात सुचवलेल्या नियमावलीला धरून केलेली आहे.)

आगामी : The Format of teaching grammars. निबंध.

निर्देशसूची

ह्या सूचीत विषयनिर्देश (उदा. अरबी भाषा, आयुर्वेद), नामनिर्देश (उदा. अत्रे प्रल्हाद केशव, कुंभकोणम्), भाषारूपनिर्देश (उदा. ' अभ्यास ' संज्ञा) यांच्या नोंदी आहेत. पुस्तकें सामान्यतः लेखकांच्या नावांखाली पोटनोंदी म्हणून दिलीं आहेत (उदा. आगरकर –' वाक्यमीमांसा '). मात्र संदर्भग्रंथसूचींमधून आलेले निर्देश ह्या सूचीत नाहीत. संदर्भग्रंथसूचन, संज्ञाविवेक, ज्ञानव्यवहार अशा काही संकलन करणाऱ्या विषयनिर्देशाच्या नोंदी आहेत.

मुख्य नोंदींचा क्रम ' मराठी देवनागरी वर्णक्रमी ' या लेखात सुचवलेल्या वर्णक्रमीप्रमाणे आहे. (पहा : पृ. २३९, छेदक १.) मुख्य नोंदींमध्ये पोटनोंदी असतील तेथे वर्णक्रमीनुसार दिलेल्या नाहीत. नोंदींमधले आकडे पृष्ठांकाचे आहेत– एका पृष्ठात एकाधिक विलग निर्देश असू शकतील किंवा एक निर्देश एकाधिक पृष्ठांत सलगपणे असू शकेल. निर्देश तळटिपेत असेल तर पृष्ठांकानंतर ' टी ' जोडलें आहे. जिथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, लेखी किंवा तोंडी अवतरण असेल तिथे पृष्ठांकानंतर ' उ ' (उक्ति) जोडलें आहे. जिथे विषयाचें स्पष्टीकरण असेल तिथे पृष्ठांकानंतर ' स्प ' जोडलें आहे.

शुद्धिपत्र

ह्या पुस्तकाचें मुद्रण लेखकाच्या ‘मराठी भाषेची लेखनपद्धति : तत्त्व आणि तपशील’ या आगामी पुस्तकात सुचवलेल्या पद्धतीनुसार करून घेण्याचा प्रयत्न आहे. मात्र मुद्रणशोधन आपल्या हातून पुरेशा कसोशीने होऊ शकलें नाही याची लेखकाला सखेद जाणीव आहे. विशेषतः पहिल्या शंभरएक पृष्ठांत हें जाणवेल.

ज्या चुका वाचकाला आपल्या आपण दुरुस्त करून घेता येणार नाहीत अशा चुका जास्त करून ह्या शुद्धिपत्रात समाविष्ट केलेल्या आहेत. तेवढ्या दुरुस्त करून घेऊन पुस्तक वाचायला घेतलें तर बरें पडेल.

५ व १२ असत । असते म्हणजे पृष्ठ ५ ओळ वरून १२ असत नको, असते पाहिजे. याचप्रमाणे इतर नोंदी वाचाव्या. खा म्हणजे ओळ खालून इतकी.

५ व १२ असत । असते
५ व १८ भेटत । भेटतात
६ व ८ देवत्तानं । देवदत्तानं
६ व ८ नाहे । आहे
१९ व २५ रूपांगविचार । रूपांगव्यवस्थाविचार
१९ व २६ पदविन्यास । पदव्याकरण
१९ व २७ वाक्यविन्यास । वाक्यव्याकरण
१९ व २८ अर्थांगविचार । अर्थांगव्यवस्थाविचार
३१ व ५ पदविन्यास । पदव्यवस्था
३१ व ११ वाक्यविन्यास थोडाबहुत हस्तगत व्हावा । वाक्यव्यवस्था थोडीबहुत हस्तगत व्हावी
३३ खा १३ शोमेची । शोभेचीं
३४ व १३ माषाप्रकारात । भाषाप्रकारात
३४ व २७ अरबी, शब्द । अरबी शब्द हे
४१ व १ पारचात्य । पाश्चात्त्य (त्याचप्रमाणे ४४ व ४, १०; ४८ व ३३; ४९ व १२; ५४ व ६, १५, ३२; ५५ व १८; ५७ व १७; ५८ व २४)

५३ व २९–३० विदेशी, लोकांचे । विदेशी लोकांचें तर
५६ खा १५ कोनौ । कॉनॉव्ह
५५ खा १० सायन्स् ऑन । सायन्स ऑव्ह
५९ व ९ पाहिजे.[१] । पाहिजे
५९ व १७ chorallyric । choral lyric
६४ व १ भाषा(क्षेत्र) । भाषा (भाषिक क्षेत्र)
६७ व १५ 'गेट', । गाळून टाका
६७ व १६ 'चौकी' । गाळून टाका
७५ व ३ शब्दविन्यासदृष्ट्या, वाक्यविन्यासदृष्ट्या, । पदन्यवस्थादृष्ट्या, वाक्य-व्यवस्थादृष्ट्या,
८१ व १७ (पहा : । कंस गाळा
८३ व ६-७ भानण्यासारखें । भागण्यासारखें
८८ खा १३ झालें बुद्धीचा । झालें. बुद्धीचा
८९ व १४ काय । कार्य
८९ व १८ समजून । समजूत
९६ व ८ ध्यन्याश्रयी । स्वनाश्रयी
९८ व १० सहच । सहज
१०३ खा १० तिच । तिचें
११८ खा १ रूर । जरूर
११२ व ४ ध्यायच्या । द्यायच्या
१२५ खा १२ किंघा । किंवा
१२७ व १३ त्यातलें । त्यातल्या
१३० खा १२ माध्यय । माध्यम
१३३ खा १४ अम्यास । अभ्यास
१३३ खा २ वाङ्मयाकडे आपण । वाङ्मयाकडे
१३८ व १५ वांत्रिक । तांत्रिक
१३९ व १२ शिकण्यासाठी । शिकवण्यासाठी
१४१ व ६ अर्जाची । अर्जाची
१४१ खा २ कुतूहलाच । कुतूहलाचा
१४५ खा १५ **शासकीय । शासन** (त्याचप्रमाणे १४५ खा ६)
१४५ खा २ जोरदरा । जोरदार
१५५ खा १ १९७९–०१. । १९७९.०१.
१५६ खा ९ १९७९.१०.०१.–१६ । १९७९.१०.०१–१६

१५७ व २० १९५६ । १९५७
१५७ व २२ सरकार.) । सरकार, १९५७.)
१५८ व ५ १९६८.०२–०–०४. । १९६८.०२–०४.
१५८ खा १२ १९७९–०९. । १९७९.०९.
१६१ व ४ साध्य । साध्य
१६२ व १६ मर्यांदा । मर्यादा
१६६ व १० नाही. । नाही
१६७ खा १ ४ ते ८ । ५ ते ८
१७५ व ४ चर्चां । चर्चा
१७६ व ४ इस्क्रूर । इस्कूर
१७६ खा १२ निवडतात । निवडता
१७८ खा १२ compouud । compound
१८० खा २ ह्या । ह्या
१८२ व १२ शैलीसापेक्षा । शैलीसापेक्ष
१८७ व १ मवितव्य । भवितव्य
१९१ खा २ अभ्यास । व्यासंग
१९५ व १२ असें, नाही । असें नाही,
१९८ खा १३ ह्या संबंधी । ह्यासंबंधी
२०२ खा १२ कार्यांची । कार्यांची
२०३ व ४ एखाद्या विषयात । एखादा विषय ह्यांत
२०७ खा १५ ह्यासारख्या । ह्यांसारख्या
२२० खा २ आणि समाजविज्ञान । आणि भारतीय–संदर्भ–युक्त समाजविज्ञान
२२६ व १० बोलणं । बोलणें
२२६ खा १२ नसतें । नसते
२२६ खा ४, ५ वि. आ. बुवांचा । द. पां. खांबेटे यांचा
२२७ व ११ अनेकवचनात । बहुवचनात
२२९ खा ११ नाही. । नाही.)
२२९ खा ८ p*o*h*o*t । p*o*h*o*t
२२९ खा ७ p*o*h*o* । p*o*h*o*
२२९ खा ५ / ih अंती । /ih/अंती
२२९ खा ४ /oho,/ । /oho/
२२९ खा ३ /*i*h/ आणि /*i*hi/ । /ih/ आणि /ihi/
२३० व ८ ṭ*e*h*e*ḷ, । ṭ*e*h*e*ḷ

२३० व १३ /poh–, । /poh–/,
२३० खा ४ स्तंभ ५ रिकामी जागा । —
२३१ खा १ लिहिले । लिहिलेलें
२३३ व ८ येते. । येतो.
२३३ खा ४ शोधावें । शोधावें,
२३६ खा २ वाक्यात । वाक्यांत
२३६ खा १ वाक्यावरून । वाक्यांवरून
२४० व ३ [गु व त्]। गु व्ात्]
२४० व ४ अुब्र ब्र] । अु ब्रु ब्र]
२४४ व ३ [सुर् वान् चा]। सुर् वान् च़ा]
२४५ खा १३ च् झ् साठी । च्, ज्, झ् साठी
२४६ व २ वुज्य रु । [वुज्य् रु]
२४६ व ६ [सुज्य् ज्यु]। सुज्य् ज्यु]
२४६ व १७ न्यु्, वुं, । न्यु्, युं,
२४८ खा १२ [शुश् रु षा, । [शुश् ऋ षा,
२५४ व ९ [दूत् साण्ण्] । दूत् – साण्ण्]
२५४ व १७ – ठेव् ल – । – ठेव् ल़ –
२५४ व १८ – गे ल ॥]). । – गे ल़ ॥]).
२५६ व २ कानडा, । कानडा –
२५६ व ४ वांदेर । वांदरें
२५७ व ५ पाँदिशेरी । पाँदिशेरी,
२५७ खा १ लिप्यंतणात । लिप्यंतरणात
२५८ व १५ तमिझ । तझिम – | तमिळ । तमिझ –
२५८ व १८ ट्रिवाड्रम । ट्रिवांड्रम
२६९ व १६ Kunabī of Mah¯ḏ; | Kuṇabī of Mahāḏ;
२७१ व २ ५६-९ – २१, | ५६.९–२१,
२७५ खा २ Northem | Northern